लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी
L.B.S National Academy of Administration
मसूरी
MUSSOORIE
पुस्तकालय
LIBRARY
अवाप्ति संख्या
Accession No. JD 61
वर्ग संख्या
Class No. Mar R 491.553914 6
पुस्तक संख्या
Book No. फाशी

॥ श्री ॥

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-स्वीय-ग्रंथमाला क्रमांक २९

# फार्शी-मराठी-कोश

रचणार

प्रो. माधव त्रिंबक पटवर्धन, एम्. ए.

प्रकाशक :-

दत्तो वामन पोतदार, बी. ए.

गंगाधरराव नारायणराव मुजुमदार, एम्. एल्. सी.

चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें.

पुणें येथें

आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन

यांनी छापिलें.

पौष शु. ११।१८४७] किंमत रुपये चार [ता. २३।१२।२५

# प्रस्तावना

आपल्या मंडळाचे सभासद प्रो. माधव त्रिंबक पटवर्धन एम्. ए. यांनीं मोठ्या परिश्रमानें तयार केलेला फार्शी–मराठी कोश मंडळाचे सभासदांच्या व सकल महाराष्ट्रवाङ्मयभोक्त्यांच्या हातीं देण्यास अत्यंत संतोष वाटत आहे. प्रो. माधवराव यांनी एकट्यांनी एवढा परिश्रम आणि तो येवढ्या व्यवस्थेनें करावा हें त्यांस अत्यंत भूषणावह असून याविषयीं ते सर्वांचे धन्यवादास पात्र झाले आहेत यांत संशय नाहीं.

अशा ग्रंथाची मराठी जुनीं कागदपत्रें वाचणाऱ्या व अभ्यासिणाऱ्या मंडळीस अत्यंत आवश्यकता आहे आणि असा कोश नसल्यामुळें मराठी ऐतिहासिक साहित्याचे प्रकाशक यांस किती कष्ट पडतात आणि आरंभीं आरंभीं तर त्यांजकडून विलक्षण प्रमाद कसे झाले आहेत आणि कित्येक आधुनिक ग्रंथकार हि भलत्याच अर्थानें फार्शी शब्दांची प्रामादिक योजना करतांना कसे आढळून यतात तें लक्ष्यांत घेतलें म्हणजे या प्रयत्नाची उपयुक्तता फारच लवकर पटेल,

या कोशाचा विशेष असा आहे कीं त्यांत फारशी शब्दांचे मराठी उच्चार आणि अर्थ देऊन अर्थदर्शक उदाहरणें प्राचीन ग्रंथांतून काढून दिलीं आहेत. अशीं कामें वारंवार होत नसतात यास्तव तीं सर्व उदाहरणें नुसतीं दिग्दर्शित न करतां बहुतेक छापूनच काढिलीं आहेत. या उदाहरणांत क्वचित् गडकरी प्रभृति कांहीं अगदीं अर्वाचीन लेखकांचीं हि उदाहरणें दिलेलीं आहेत तीं ऐतिहासिक उदाहरणांच्या जोडीला जुळून दिसणार नाहींत खरें परंतु अशीं स्थळें थोडींच आहेत.

आरंभींच्या विस्तृत उपोद्घातांत रा. पटवर्धन यांनीं मराठींत आलेल्या फार्शी शब्दसंपत्ती विषयीं व प्रस्तुत ग्रंथरचने विषयीं आवश्यक तें स्पष्टीकरण केलें आहे. त्यांतील मतभेदाचीं स्थळें असतील तीं येथें दर्शविण्याचें प्रयोजन नाहीं. शेवटीं प्रो. पटवर्धन यांनीं कोशांत घेतलेल्या शब्दांचीं फार्शी मूळें फारसी अक्षरवटिकेंत लिहून दाखविलीं आहेत. येणेंप्रमाणें आपला प्रयत्न होईल तितका निर्दोष, सर्वोपयोगी व शास्त्रीय करण्यासाठीं रा. पटवर्धन यांनीं अत्यंत काळजी वाहिली आहे हें स्पष्ट होतें.

असा उपयुक्त व महत्त्वाचा ग्रंथ रा. पटवर्धन यांनीं भारत-इतिहास-संशोधक-मंडळाला प्रथमावृत्तिप्रसंगीं स्वीय मालेंत जसा गुंफूं दिला तसाच पुढील आवृत्तिप्रसंगीं हि ते तो मंडळाच्या स्वीय अथवा पुरस्कृत ग्रंथमालेंतच गोंवण्याचें श्रेय घेतील अशी आशा करितों.

पौष शु. ४
१८४७

दत्तो वामन पोतदार,
गंगाधरराव नारायणराव मुजुमदार,
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें.

टीपः—प्रस्तुत ग्रंथ १८४७ सालीं वर्ग २ व वरील बेबाक सभासदांस यथानियम भेट म्हणून मिळेल आणि वर्ग ३ व ४ चे सभासदांस अनुक्रमें निम्मे व पाऊण किंमतीस एक प्रत याप्रमाणें मिळेल.

# उपोद्‌घात

या पुस्तकास फार्शी-मराठी कोश हें नांव दिलें आहे; म्हणजे, यांत अरबी व तुर्की शब्दांचे अर्थ दिलेले नाहीत असें नाही. तुर्की शब्द तर फारच थोडे आहेत; अरबी शब्द शुद्ध फार्शी शब्दांहून सङ्ख्येनें अधिक भरतील. तरी हे अरबी व तुर्की शब्द फार्शी भाषेंत रूढ होऊन तिच्याच द्वारें मराठींत प्रवेशले असल्यानें साधारणपणें सर्वच यावनी शब्दांचा उल्लेख फार्शी या नांवानें करणें सोईचें आहे.

हा कोश एखाद्या फार्शी-इङ्ग्रजी अथवा फार्शी-उर्दू कोशाचें भाषान्तर नाही. तसें करणें सोपें होतें, परन्तु मराठी भाषेचा ऐतिहासिक दृष्टीनें अभ्यास करणाऱ्यास त्या तर्जुम्याचा फार अल्प उपयोग झाला असता. कारण, अनेक शब्दांचीं रूपें मराठींत बदललीं आहेत, कित्येकांचें मनस्वी अर्थान्तर झालें आहे व कित्येक नवीन सामासिक शब्द बनविले गेले आहेत. मुद्दाम हा शब्द मूळांत अम्दन् आहे; अगर याचा अर्थ मूळांत जर असा आहे तर मराठींत त्याचा अर्थ किंवा असा होतो. उज़ू-तवाज़ू, तवा-तोबरा इत्यादि नवीन अर्थानें उपयोगांत आणिलेले व नवीन बनविलेले सामासिक शब्द मूळांत सांपडणार नाहीत. म्हणून मराठी लिखाणांतील फार्शी शब्दांचा सन्दर्भ पाहून व त्यांचा तौलनिक दृष्टीनें अभ्यास करून हा कोश तयार केला आहे. स्पष्टीकरणार्थ जुन्या लिखाणांतील उदाहरणें दिलेलीं आहेत. दुर्मीळ शब्दांचीं उदाहरणें मिळतील तितकीं दिलेलीं आहेत. मध्यकालीन मराठींत म्हणजे स्थूलमानानें एकनाथापासून प्रभाकरापर्यन्त होऊन गेलेल्या लेखकांच्या लिखाणांत आढळणारे आणि आजच्या बोलींत ऐकूं येणारे फार्शी शब्द या कोशांत समाविष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक कागद-पत्रांत म्हणजे, तवारिखा, वाके, बखरी, कैफियती, रोज़-निशा, अखबारीच्या फर्दा, तहनामे, याद्या, अर्ज़-दास्ती, रोखे, कौल-नामे, सनदा, पर्वाने, खुर्दखतें, तक्रिरा, करिणे, राजी नामे, महज़र, निरखपत्रें, ज़ामीन-कतबे, हिशेब-कितेब, मेस्तकें, रहदारीचीं व ज़कात माफीचीं दस्तकें, कबजें, हुज्जती व इतर चिठ्ठ्या-चपाट्या यांत, आणि लावण्या व पोवाडे यांत येणाऱ्या बेसुमार फार्शी शब्दांचे अर्थ या फार्शी-मराठी कोशांत सांपडतील.

तत्राप या कामास पूर्णता आलेली नाही. शक्य ती काळजी घेतली असतांही अतिपरिचयादवज्ञा अशी स्थिती होऊन अब्रू, खिसा, रियासत यांसारखे कांहीं शब्द सङ्ग्रहित करण्याचें राहूनच गेलें. अशा कांहीं शब्दांना कोशाच्या अखेरीस दिलेल्या सूचींत मागाहून स्थल दिलें आहे. शिवाय जिल्हा निहाय बोलींत व दैनिक भाषेंत वावरणारे कांहीं वाङ्मयबाह्य शब्द या सङ्ग्रहांत नसतीलच. खरे, पारसनीस, राज-

वाडे, साने, वाडप्रभृति साहित्येतिहासप्रेमी विद्वानांनीं संशोधून सङ्ग्राहून व सम्पादून छापलेल्या जुन्या लिखाणांत न समजल्यामुळें राहून गेलेले कांहीं शब्द आहेतच.

मूळ मोडी वाचून बाळबोधींत नकलतांना संशोधकांच्या झालेल्या चुका ज्या दुरुस्त करितां आल्या त्या दुरुस्त करून घेतल्या आहेत. अशा चुका फार नाहीत. यावरून त्यांनीं काम किती काळजीनें व परिश्रमपूर्वक केलें आहे याची चाङ्गलीच जाणीव होते. अट्टाहासानें चुकीची परम्परा कुणी चालूं ठेवूं नये म्हणून कांहीं चुका पुढें दाखविल्या आहेत. मुद्रित पुस्तकांतील अर्गा–नर्गा, जङ्ग, पेश्वान वगैरे शब्द अर्गा–ज़र्गा, नङ्ग, पेश्वाज़ असे असायला पाहिजेत. कारन्दाज हा शब्द मूळांत कार्दान असावा. वरील वेलाण्टी न उमगल्यामुळे इस्तीफा हा शब्द एक दोन ठिकाणीं इस्ताफा असा छापला गेला आहे. चापकोसी हा शब्द चापलोसी पाहिजे. लान्हा पिणें शक्य नाही, तो शब्द कन्हा आहे. कांहीं ठिकाणीं अशुद्ध लेखनाच्या चुका मूळ लेखकांनींच केल्या असतील. सर्सब्जीबद्दल सरस्वाजी, सर्मोयबद्दल सरेमाय, बर्हमबद्दल बेहरम या चुका वरील प्रकारच्या होत. ज़न–पर्वर्शीबद्दल नान–पर्वेशी ही चूक जवळ जवळ रूढच झालेली आढळते.

आतां या पुस्तकांत जी शुद्धलेखनपद्धती स्वीकारिली आहे तिच्या स्पष्टीकरणार्थ दोन शब्द लिहिणें ज़रूर आहे. सुदैवानें बालबोध लिपी ही बहुतांशीं पूर्ण, व मराठीच्या गरजा भागविण्यास समर्थ आहे. उच्चार व लेखन यांत तन्तोतन्त मेळ ठेवणें म्हणजे शुद्धलेखन होय. कित्येकदां हें शक्य होत नाही कारण, मनुष्याचे उच्चार अर्धवट व अस्पष्ट असतात, तर लिपी व्यक्त करिते ते उच्चार स्पष्ट व रेखीव असतात. शब्दारम्भीं येणारा आ याचा उच्चार कित्येकदां अ होतो तर कित्येकदां ऱ्हस्व आ सारखा होतो. तेव्हां उच्चार जर सान्दिग्ध असेल तर लेखांत शब्दाचें शुद्ध स्वरूप यावें म्हणजे उच्चारान्तराला फारसा वाव मिळणार नाही.

शब्दाचें मूळ लेखी स्वरूप कायम ठेवणें, मग त्याच्या उच्चारांत फरक पडला असला तरी, म्हणजे शुद्धलेखन नव्हे. गज़ल हा शब्द घझल असा लिहिणें म्हणजे केवळ पाण्डित्याचा दुराग्रह होय. रूढ झालेल्या उच्चारान्तराला, शब्दाच्या परिणतीला योग्य मान आम्ही दिलाच पाहिजे. एकन्दर परिणतीच्या नियमांचा अभ्यास करून शुद्ध ठरणारीं शब्दरूपें ग्रन्थाच्या सूचींत दिलेलीं आहेत. जुन्या शब्दांचें पुनरुज्जीवन करूं इच्छिणाऱ्यांनीं सूचींतील रूपांकडे विशेष लक्ष्य द्यावें.

मराठी शुद्धलेखनांत स्वरहीन व्यञ्जनांचा प्रश्न मोठा बिकट आहे. अकारान्त शब्दांतील अन्त्य अ हा अनुच्चारित असतो या निरपवाद नियमाचा अवलम्ब करणें ज़रूर आहे. म्हणून तमाम् सनद् हे शब्द मराठींत तमाम सनद असे लिहिले तर हरकत नाही. परन्तु अशा शब्दांस प्रत्यय लागतात तेव्हां काय करावयाचें ? या बाबतींत एकसूत्री धोरण ठेवणें शक्य झालें नाही. म्हणून शब्द, ज़बाब्दार अथवा जबाब-दार अशा दोन्ही रितींनीं लिहिलेले आढळतील. या पुस्तकांत विग्रहचिन्हाचा

उपयोग सढळ हातानें केलेला आहे हें पाण्डित्याचें निदर्शक नव्हे. सामासिक शब्दांचा भलत्याच ठिकाणीं विग्रह होऊन अपभ्रंशास मदत होऊं नये म्हणून ही खबर्दारी घेतलेली आहे. नाहीतर सङ्ग-मर्मरी हा शब्द भलत्याच ठिकाणीं विभागला जाऊन ज्याप्रमाणें सङ्गम्-रवरी हें रूप झालें अशी अवस्था केवळ निष्काळजीपणानें अनेक शब्दांची व्हावयाची. सर्दार, दर्बार वगैरे शब्दांचे उच्चार आज ही मराठींत फार्शीतील उच्चाराप्रमाणेंच होत आहेत. म्हणून सरदार दरबार हे लेख, ग्रन्थबद्दल गरनथ लिहिण्याइतकेंच चुकीचे आहेत. अशा चुका सर्व सुधारून घेतल्या आहेत. परन्तु लोकांनीं अशुद्ध पाठ रूढ करण्याचा निश्चय केल्यास नाइलाज् आहे.

एकाच अनुस्वाराकडून अनुनासिक व नासिक्यव्यञ्जन हीं दोन्हीं दर्शविण्याचें काम करून घेणें अशास्त्रीय असल्यामुळें अनुस्वाराचा उपयोग फक्त अनुनासिक दर्शविण्या-कडे केलेला आहे. म्हणून जांफिशानी याचें रूप तेंच ठेविलें आहे. त्याचा उच्चार जाम् फिशानी असा करावयाचा नाही. उलट पक्षीं जङ्ग हा शब्द जंग असा लिहिला नाही. त्यामुळें अनुस्वार उडून जाऊन जग असा वाचण्याचा प्रसङ्ग रा. राजवाडे यांच्यावर आला तसा कुणावर येणार नाही. पोट फोडया ष चा उच्चार मराठींत श सारखाच होतो, फार्शींत ष चा शुद्ध उच्चार नाहीच, म्हणून लश्कर, नामुश्की वगैरे शब्दांतून ष चा जागीं श ची स्थापना केलेली आहे.

मराठींत च् ज़ आदिकरून दन्ततालव्यांस निराळीं चिन्हें नाहीत. त्यामुळें ज़रा व जरा, चुाम्बति व चुम्बित अशा शब्दांत फार घोंटाळा होतो. या पुस्तकांत च व ज या खालीं टिम्ब देऊन च़ व ज़ हे मराठी दन्त्यतालव्य उच्चार व्यक्त करण्या करितां नवीं चिन्हें साधून फार्शी शब्दांत त्याचा उपयोग केला आहे. तो सर्वत्र होणें इष्ट आहे.

या कोशांत दिलेले सर्वच शब्द सर्व ठिकाणीं सारखेच रूढ होते असें समजणें चुकीचें होईल. या सर्व जुन्या शब्दांपैकीं आजमितीस जेमतेम शेंकडा चाळीस शब्द जिवन्त आहेत. गैबी ( = निनांवी ), दखल ( = श्रुत, माहीत ) हे शब्द आज खान्देशांत प्रचारांत आहेत, तर अस्करा ( = प्रसिद्धी ) नगर जिल्ह्यांत व फरागत ( = स्वास्थ्य, स्वस्थपणें ) हा कुलाबा जिल्ह्यांत बोलींत आहेत. कांहीं शब्द पूर्वी सुद्धा फारसे रूढ नव्हते; उदाहरणार्थ नईस शब्द एकच ठिकाणीं आढळला. अइन या शब्दांचें उदाहरण अजून गवसलें नाही; तर उलट पक्षीं खामखा सारखे आतां मृत झालेले कांहीं शब्द प्रत्येक पानावर आढळतात. महेला हा शब्द फक्त काळ्यांच्या पत्रांत आढळतो तर शुका हा शब्द हिङ्गण्यांच्या पत्रव्यवहाराखेरीज् इतरत्र सापडत नाही. कांहीं शब्द केवळ अल्काबांतच आढळतात, उदाहरणार्थ आलम्पन्हा, आली-शान, खसूसीयत-दस्तगाह, वज़ारत्-मह्मा, वगैरे; उलटपक्षीं कांहीं शब्द नांवांतच घुसले आहेत जसें खाशेराव, दौलत्राव, पश्चाब्राव, रायज़ादे, रुस्तुम्राव, सर्जेराव, सुल्तानराव,

सुभानजी, हम्बीरराव, हिन्दूराव, हैबतराव, हौशाबाई इत्यादि. खैर–आफियत, मारूज्, रोशन, मर्सूल, शादमानी, दिल्ताज़गी वगैरे शब्द पत्रव्यवहाराच्या मामुली मायन्यांतच आढळतात. पुढील शब्द इस्लाम धर्मीयांसम्बन्धी असल्यामुळें मराठीशी त्यांचा जिव्हाळ्याचा सम्बन्ध येत नाही. असे शब्द अडार्से पन्नास आहेत; अज़ान, अल्बिदा, अल्ला, इन्शाल्ला, इमान, ईद, उज़ू–तवाज़ू, उरूस; औलिया, कन्दुरी, कफन, कबर, कल्मा, काजी, काफर, कुर्बाण, कुराण, खान्का, खुत्बा, खुदा, गोर–कफन, ज़जिया, चिल्ला, जहन्नम, जारत, जुम्मा, ताकिया, तवाफ, ताजिया, ताबूत; तुर्बत, दफन, दीन, निमाज़, फकीर, बक्रीद, बेहेस्त, बाङ्ग, बुत्परस्त, बुत्फरोश, बुत्शिकन; मर्शा, मवाज़न, मशायख, मुजावर, मुसल्मान, मुल्ला, रोज़ा, वगैरे.

फार्शी शब्दांचें प्रमाण लेखकाच्या जातिस्थलकालशिक्षणाच्या भिन्नपणामुळें निरनिराळें पडे. कांहीं फार्शी पारिभाषिक शब्द चोंहींकडे आढळावयाचेच. हिन्दुस्थानावर स्वाऱ्या करून राज्यें स्थापणाऱ्या मुसलमानांची राज्यव्यवहाराची भाषा फार्शी होती. हिन्दू कायस्थ काम–चलाऊ फार्शी शिकून जरी ठिकठिकाणीं मुन्शीगिरी व पारस्निशी करूं लागले तरी त्यांच्यावर अरबी अथवा फार्शी वाङ्मयाचा संस्कार झालाच नव्हता असं म्हटलें तरी चालेल. विजापूर सर्कारच्या फार्शी फर्मानांत सुद्धा क्वचित् स्थळीं आसरा यासारखा मराठी शब्द सांपडतो. मध्यकालीन मराठी गद्याची सजावट व अभिवृद्धी करणारे लोक कायस्थच होते. फार्शी शब्द बरेचसे घातल्यानें भाषा अधिक रुबाब्दार व प्रौढ होते अशी त्या काळीं समजूत असावी.

महेश्वर दर्बारच्या बातमीपत्रांपेक्षां दिल्ली येथील हिङ्गण्यांच्या पत्रव्यवहारांत फार्शी शब्द अधिक आहेत. पटवर्धनी दप्तरांतील पत्रांची भाषा हैदराबादेहून काळे यांनीं पाठविलेल्या पत्रांच्या भाषेपेक्षां पुष्कळच कमी फार्शीप्रचुर आहे. हैदरअल्लीकडून अथवा जञ्जिरेकर शामलाकडून आलेल्या पत्रांत साहजिकच फार्शी शब्द पुष्कळ आहेत. ऐतिहासिक लेखसङ्ग्रहाच्या सातव्या भागांत पेशव्यांच्या नांवानें परन्तु नाना फडणिसांनीं रचून इङ्ग्रजांच्या बादशहास पाठविलेलें पत्र छापलें आहे. हें पत्र ( अनुक्रमाङ्क २५७५ ) नमुनेदार समजलें जात होतें. कारण इतरत्रही त्याच्या नकला उपलब्ध होतात. यांत फडणिसांनीं फार्शी शब्दांचा पाऊस पाडला आहे. पुढील उतारा पहाः–

त्यास माधवराव साहेब वैकुण्ठवासी जालियावर किब्लेगाह नारायणराव साहेब दौलत करूं लागले. ते वक्तीं रघुनाथराव घरांतील बिरादर याणीं दगा करून आपण दौलत करावी हा इरादा केला, किब्लेगाह यांस फन्द करून मारिलें. ही गोष्ट हिन्दूचे महज़बांत बहुत ना–मुनासब व राज्याधिकारही आमचा रघुनाथराव यांस तालूक नाहीं. हें मदारुल–महाम व तमाम कार्पर्दाज़ अमीर, उमराव व सर्दार याणीं दिलांत आणोन रघुनाथराव यांस दौलतीखेरीज़ करावें असें मुकर्र करून मदारुलमहाम तमाम सरन्जाम व फौज़ सुद्धा त्यांचे ताकुबावर गेले असतां

खाली मैदान देखून व काबू-वख्त पाहून तामस माष्टीन पुण्यांत होते त्यांणीं ममईवाल्यांकडून सर्कारचें मकान साष्टी वगैरे चार जुझिरे घेतले. तेथें सर्कारचा अम्मल व लवा; रयतेची मालियत मुब्लग होती, ते मुम्बईकरांनीं आपले तसरुफांत घेतली. दूरन्देशी न करितां, करार-मदार, अहद-पैमान सर्व तोडून हङ्गामा बर्पा केला. तामस माष्टीन आं साहेबांचें खत घेऊन हुजूरास रहावयास आले होते. त्यांत मज़्मून कीं इङ्ग्रज कोणी बे-अदबी करितील त्यांस ताकीद करून दोस्ती चालवावी. विजयदुर्गची मालियत आङ्ग्रे यांची क्रोडो रुपयांची, करार सर्कारांतून द्यावयाचा नसतां, नेली. तें सर्व दर्किनार राहून माष्टीन मज़्कूरच बाजीगार होऊन बे अदबी करूं लागले. तेव्हां बादशाही हुकूम व अहदपैमान कोठें राहिलें ? "

या लहानशा उताऱ्यांत एकन्दर फार्शी शब्द ५७ आहेत. त्यांपैकीं २० शुद्ध फार्शी आहेत. एकूण ५७ शब्दांपैकीं आज मराठींत जिवन्त असे ३० आहेत. यांपैकीं—वर, व, खेरीज, कीं हीं चार अव्ययें आहेत व आं ( = तो ) हें दर्शक विशेषण आहे. साहेब, दौलत, फन्द, मदारुल्महाम, कार्पर्दाज़, अमीर, उमराव, सर्दार, सर्कार अम्मल, लवा, रयत, मालियत, तसरूफ, करार-मदार, अहद-पैमान, हङ्गामा, खत, हुज़ूर, बे-अदबी, दोस्ती, करार, बादशाही, हुकूम वगैरे चोवीस म्हणजे एक तृतीयांशापेक्षां अधिक शब्द राज्यव्यवहारोपयोगी आहेत. त्याच्या खालोखाल सात आठ शब्द लश्करी आहेत. बाकीचे मामुली व्यवहारांतील आहेत. एकन्दर शब्दसङ्ग्रहाची वर्गवारी अशीच पडेल. मात्र गायन व मज़ालस सम्बन्धी व इतर वस्तुदर्शक शब्द वरील उताऱ्यांत नाहीत, पण त्यांची सङ्ख्या बरीच आहे. स्वभाषेंतच लिहिण्याचा सङ्कल्प असता तर मैदान या एकच शब्दाला प्रतिशब्द हुडकून काढायला विशेष त्रास पडला असता.

फार्शी लेखक पर्यायवाचक शब्दांचे विशेष चाहते; त्यामुळें कांहीं शब्दांना प्रतिशब्द अनेक आहेत. ऐक्य व सख्य यास आश्नाई, इख्लास, इतलाखी, इतफाक, इतहाद, इर्तिबात, इस्तियाक, एक-दिली, एक-रङ्गी, एकी, खला-मला, खसूसीयत तस्फिया, दिल्ज़माई, दोस्ती, वसालत, मुस्ताकी, यगानगत वगैरे १८ वर प्रतिशब्द आहेत. वैर-भाण्डण या अर्थी अकस, कर्कशा, कजिया, किलाफ, खलश, खिसा, जिकीर, जुदाई, दावा, दुस्मनगी, दुही, निफाक, पुर्कश, बर्कशी, असे १४ वर शब्द आहेत. प्रतिष्ठा याअर्थी अब्रू, अस्करा, आब, आबूताब, इज़्ज़त, तम्मा, नक्श, नङ्ग, नामोश, वक्र, शोहरत, हुर्मत वगैरे १२ वर शब्द आहेत. कौटिल्य या अर्थी कवाईत, कैद, दगा, फन्द, फरेब, मकर, हुन्नर, हरिफी, हिक्मत, वगैरे ९ वर शब्द आहेत. संशय या अर्थी अन्देशा, गर्द, गुबार, गुमान, दग्दगा, वस्वास, वहीम, शक, शूभ वगैरे ९ वर शब्द आहेत. समाधान या अर्थी खातर, खातर्ज़मा, खातदारी, खातर्दास्त, तक्वा, तमानीयत, तशफ्फी, तसल्ली, दिल्दारी, दिल्भरी, दिलासा वगैरे ११ वर शब्द आहेत. पीडा या अर्थी आज़ार, कसाला, जबरी, जलाल,

जाजती, जुलूम, तश्वीस, ताशीस वगैरे ८ वर शब्द आहेत. शिक्षा या अर्थी तम्बी, नतिजा, नश्यत, शास्त, सज़ा असे पांच शब्द आहेत. परिश्रम या अर्थी कस्त, कोशीस, मशाघत, मेहनत, शिकस्त, सई असे सहा शब्द आहेत. चाल-रिवाज या अर्थी तन्हा, तरिका, दस्तूर, पाय-रव, मामूल, रव, रस्म, रवेश, रहा, रिवाज, शिरस्ता, सुदामत असे १२ शब्द आहेत. फार्शीनें मराठींत पर्यायवाचक शब्दांची भर कशी व किती ाकली आहे हें कळायला वरील विवेचन पुरें आहे.

कार्भाराखेरीज़ विशेषतः पुढील विषयासम्बन्धी शब्द मराठींत आले आहेत.

**युद्धः**–फौज़, इल्लाखी, सरन्ज़ामी, लश्कर, हशम, प्यादे, पागा, स्वार, बार्गीर, शिलेदार, करोळ, बर्कन्दाज़, गोलान्दाज़, तोफज़ी, अलगिोल, बेल्दार, तबल्दार, बुणगें, बिनी, हरोळ, कही, दुम्दारी, तलावे, कज़ाखी, गनिमाई, सफेजङ्गी, ताख्त-ताराजी, खानेजङ्गी, शब्खून, वगैरे.

**लष्करी सरन्ज़ामः**–जिरेटोप, गुर्गी, बक्तर, चिल्खत, शील, शिलेपोस, दस्ताना, अब्लख, अब्रश, बोर, ज़र्दा, कुमैत, जीन, पलाण, गाशा, लगाम, अनीन, तङ्ग, पुस्तङ्क, दुम्ची, रिकीब, झूल, कनात, कराचळी, खञ्जीर, गुर्दा, चाकू, जम्बिया, ज़ामगी, तबञ्चा, तर्कश, तीर, तुक्का, तेगा, तोदा, तोफ, बर्ची, सम्शेर, बन्दूक, सैफ, अराबा, बारूद, निशाण, बैरक, तणाव, तम्बू, शामियाना, सायबान, मेख, वगैरे.

**बान्धकामः**–(लश्करी) अर्क, किल्ला, जञ्जिरा, ज़मीदोज़, हवादोज़, अलङ्ग, सफेल, कङ्गोरा, खन्दक, धम्धमा, बुरूज़ व ( गैरलष्करी ) पाया, चौथरा, फर्श, दिवाळ, गिलावा, दर्वाज़ा, इम्ला, इमारत, तक्तपोशी, जिना, मज़ला, गच्ची, दालन, दिवाण्खाना, मेहेराप, ढेलज़, ज़मीन, घुमट, बाग, तलाव, फवारा वगैरे.

**पोशाखः**– ( कापडें ) ज़र्तारी, अत्लस, कलाबतू, किनूखाप, किन्तान, गुल्बदन, तमामी, ताफ्ता, नर्मीना, पार्चा, मश्रू, पश्मीना, मख्मल, मलमल, मुकेस, अस्तर, मग्जी, व ( कपडे ) दस्तार, सम्ला, जामा, खिलत, कार्चोबी, कुडूतें, सद्रा, खमीस, झगा, झबलें, कफनी, निमा, विज़ार, तुमान, सुर्वार, पायज़मा, फर्गोल, जोडा, पायपोस, पैज़ार, अस्तनी, गोस्पेच, जेब, खिसा, नेफा, नवार, पेश्वाज़, ( इतर कापडी सामान ) तकिया, गिर्दी, न्यहाल, ज़ाज़म, चादर, रजई, सर्पोस, गिर्दपोस, गलेफ, अभ्रा, वगैरे; ( अलङ्कार विशेष ) शिर्पेच, सर्ताज़, बुलाख, गोश्वारा, जेगा, तुरा, पर्गरी, बाज़ूबन्द वगैरे.

**गृहोपयोगी वस्तूः**–खुर्ची, मेज़, पलङ्ग, अफ्करा, आफ्ताबा, तस्त, डेग, डोल, कुजा, आब्खुरा, तस्त, तबक, समई, शामदान, गुलाबदाणी, ( सुगन्धी ) खुश्बोय, अम्बर, ज़वादी, ज़ाफरा, ताफा, अत्तर.

**फळेंः**– ( खुश्क मेवा ) अङ्गूर, कपापूचिनी, खस्खस, खिस्मीस, ज़र्दाळू, दालचिनी, पिस्ता, बदाम, मनुका व ( तर मेवा ) अञ्जीर, अनार, खर्बूज़, टर्बूज़,

तुरुञ्ज़, तूत, सेव वगैरे. ( इतर खाद्यपदार्थ ) कव्हा, चहा, अफू, बिर्याणी, पुलावा, खिमा, फालूदा वगैरे.

**सङ्गीतः**– ( वाद्यें ) खञ्जिरी, चङ्ग, डफ, ढोल, तब्ला, ताऊस, तुणतुणें, दायरा, दिल्रुबा, नगारा, नफेरी, नौबत, मर्फा, शहाजणें, सतार, ( गीत प्रकार ) कवाली, ख्याल, गज़ल, शाहीर, मैफल, जल्सा, तमाशा.

**लेखनः**– कलम, दौत, शाई, कागद, जुज़्दान, खलिता, खत, शुका, तालीक, तब्लख, तुमार, दप्तर, किताब, जिलीद वगैरे.

**व्युत्पत्ति–विचार.** कोशांत प्रत्येक शब्दापुढें ज्या फार्शी, अरबी अथवा तुर्की शब्दापासून तो निघाला आहे तो शब्द कंसांत दिला आहे. हा शब्द शोधून काढतांना कल्पनेचें जरी साह्य घेतलें असलें तरी व्युत्पत्तिनिश्चय करितांना चिकित्सेला, व शङ्केखोरपणाला पूर्ण वाव दिला गेलेला आहे. निश्चिती वाटली नाही तिथें कंसांत प्रश्नचिन्ह देऊन शङ्कार्हता व्यक्त केली आहे. मूळ शब्दाशी तद्भव शब्द ताडून पाहून उच्चारान्तर परिणतीच्या नियमांस अनुसरून झालें आहे कीं नाही हें पाहिलेलें आहे. केवळ काल्पनिक मध्य रूपांवर विसम्बणा केली नाही. उदाहरणार्थ शहाजणें या शब्दानें फारच त्रास दिला. त्याचा शहा म्हणजे राजा अगर ज़न् = मार, वाजीव यापैकीं कशाचाच सम्बन्ध लागेना. अखेर शाद्याना [ ∠ शाद् = आनन्दी ] अशी व्युत्पत्ती सुचली परन्तु शब्दांत झालेला बदल पाहून समाधान होईना. जहांबाज, जहागीर, महामूर, कहरी वगैरे शब्दांतील ह् प्रमाणें शहाजणें मधील ह् आगन्तुक असेल व मधील द् चा ज़् झाला असेल असें वाटलें, पण मुळाशी अधिक साम्य आहे असें विरळा का होईना, एखादें रूप सांपडेपर्यन्त खातरी होईना. अखेर एक दोन ठिकाणीं शाद्याना असें रूप सांपडल्यावर व्युत्पत्ती निश्चित केली. इतके परिश्रम घेऊन सुद्धा चुका आढळल्या तर त्या दुरुस्त केल्या जातील. कित्येक ठिकाणीं शब्दापुढें दिलेला कंसातील शब्द मूळ न समजतां त्याचा सहोदर समजावा. कारण फार्शी व संस्कृत याची एकच आई अगर आजी होती. म्हणून बारीश हा शब्द 'वर्षाचा' सहोदर होय, पुत्र नव्हे. पलाण म्हणजे खोगीर. या शब्दांची गम्मत आहे. पल्ययण पासून तो निघाला असेल असें वाटत नाही. फार्शींत पालान् असा शब्द आहे. मुक्तेश्वराच्या ग्रन्थांत पालाणणें हें क्रियापद सांपडतें. मराठींतील पलाण फार्शी पालानचें परिणत रूप असावें पण कालानुक्रमवार ऐतिहासिक माहितीशिवाय निश्चित कांहीं साङ्गतां येणार नाही. तसेंच पील–खाना, पील–नाळ यांतील पील म्हणजे हत्ती हा शब्द फार्शींतूनच आला. परन्तु आपटे यांच्या कोशांत पीलु = म्हणजे हत्ती असा दिला आहे, एवढ्यावरून पील शब्दाचें सरळ नातें 'पीलु'शी जोडणें दुराग्रहाचें व हास्यास्पद होईल. हीच स्थिती किसान ( कृषाण ) चम्चा ( चमस ) सफेद ( श्वेत ) जङ्गल ( जङ्गल ) वगैरे शब्दांची आहे. बे–गमी, हाल्युद्ध वगैरे सामासिक शब्द फार्शींत नाहीत. फार्शी शब्दांवरून मराठींत ते स्वन्तत्रपणें बनविले गेले आहेत.

**परिणतीचा विचारः**—कित्येकदां एकाच शब्दाचीं दोन परिणत रूपें प्रचारांत येऊन त्यांचा भिन्न भिन्न अर्थी उपयोग होऊं शकतो व भाषेच्या शब्दसङ्ग्रहांत भर पडते. उदाहरणार्थ आर्जव ( न० ) मनधरणी–आर्जू ( स्त्री० ) इच्छा; आफियत ( स्त्री० ) कुशल–ऐपत ( स्त्री० ) द्रव्यसामर्थ्य; कज़ाख शूर लुगारी, गनीम–कजाग भाण्डखोर, कर्कशा; चूप = निःशब्द–चोप = मार; शिताब = घाई–शिताफी = युक्ती, कारवाई; तबियत ( स्त्री० ) शिक्षण–तर्बेज़, निष्णात; कर्कशा ( स्त्री० ) भाण्डखोर स्त्री; कर्कशा (पु०) तण्टा; जिम्मा ( पु० ) जूबाब्दारी–दिमत ( स्त्री० ) सेवा; तल्लफ ( स्त्री० ) तीव्र इच्छा– तलब ( स्त्री० ) बोलावणें; मुज़रा ( पु० ) वन्दन–मुज़रा मान्य करून घेतलेला ( खर्च ); पार्शी = झर्थुश्त्री हिन्दी; फार्शी, इराणांतील भाषा; मिसल = दर्जेबन्दी–मिसाल = हूकूम; दाखल = प्रविष्ट – देखील = सुद्धा वगैरे. उलटपक्षीं कित्येकदां शब्दांचें परिणत रूप एक पण मूळ शब्द भिन्न असल्यानें भिन्न अर्थ होतात; जसें अर्क ∠ अर्ग् = पोट–किल्ला व अर्क ∠ अरक् = निष्कर्ष; किताब ∠ किताब् पुस्तक व किताब ∠ खिताब् = पदवी.

१ (अ) आ नन्तर आलेला अ य होतोः— अजायब, आयना, कायदा, कायम, ज़मायत, जिरायत, नायब, फ़ायदा, लायक वगैरे.

(आ) अथवा तो गळतोः— आदा, अज़्मास, आरास, ताफा, पैदास, फर्मास; तसेंच, अनात ∠ इनायत, अलादा ∠ अलाहिदा, कवात ∠कवाइद्, ज़मात, विलात वगैरे रूपें पहा.

२ (अ) कांहीं शब्दांत उपान्त्य आ ताणला जाऊन त्याच्या जागीं आय अथवा आई येतातः– बागाईत, बिछाईत, वायदा, मायना, ज़कायत ( राजवाडे ३।२९ ).

(आ) कांहीं ठिकाणीं आ चा अहा होतोः— जहांबाज़ ∠जांबाज़्, जहागीर ∠जागीर्, महामूर ∠मासूर्, शहारा ∠शार्, शहाज़णें ∠शायाना, कहरी ∠कारी, तह–हयात ∠ ता–हयात वगैरे.

( इ ) कित्येक स्थळीं उपान्त्य आ चा अ होतोः— अवई, तवई, रज़ई, सुरई, दालन, मिसल, मुदारत, पायमल्ली, हल्ली वगैरे.

( ई ) आरम्भीच्या आ पुढें जर जोडाक्षर अगर दीर्घाक्षर आलें तर तो ऱ्हस्व होऊन अ बनतोः– अज़्मास, अफ्करा, अफताब, अब्दागीर, अब्रू, अस्मान अस्करा, अबाद्, अवाज़्, चलाख, तलाव, बदाम, बबर्जी, पलाण, अईन, आलिजा, हल्ली, हशील वगैरे

३ पुढील शब्दांत आ चा ए झालेला आहेः– कितेब, खेरीज़, तेजी ( = अरबी), तेरीख, देखील, सेकीन.

४ (अ) आनन्तर व ऱ्हस्व अक्षरापूर्वीं येणाऱ्या इ चा अ होतो–आशक काफर, कायम, खातर, जाबता, नाज़र वगैरे.

(आ) किंवा उपान्त्य असल्यामुळें ती इ दीर्घ होतेः– काबीज, काबील, जामीन, जाहीर, जवाहीर वगैरे.

( इ ) परन्तु अलाहिदा, काहिली, मुलाहिजा, मुशाहिरा वगैरे कांहीं शब्दांत ती इ ऱ्हस्वच राहते,

५ ( अ ) इया च्या ऐवजी या येतोः– अख्त्यार, प्याला, न्यावत, न्याह्न, म्यान वगैरे;

( आ ) अथवा आ येतोः– कब्जा, गाशा; जादा, जाफत, जास्त, तवा, द्वानत, शाई, शास्त वगैरे.

६ ऱ्हस्व इ मागून ह् अगर जोडाक्षर आल्यास इ चा ए होतोः–एहसान, चेहरा, गिरे, जिरे, ढेलज, फेरिस्त, बेहेत्तर, मसाले, मेहनत' मेहमानी, मेहेर, मेहराप, शेतखाना, एक्बाल, एकरान, एख्लास, वगैरे.

७ दीर्घ ईच्या मागून दीर्घाक्षर आलें तर ती ऱ्हस्व होतेः– इमान, कबिला खजिना, बिमार, मिजान वगैरे.

८ ऱ्हस्व उच्या मागून ह् आला तर उचा ओ होतोः–तोहमत, मोहबत, मोहतर्फा, मोहकम, मोहरम, मोहरे, मोहर, मोसबा, सोबत, सोहलत वगैरे.

९ उपान्त्य ऱ्हस्व उ दीर्घ होतोः–चाबूक, झूल, नाजूक, पूल वगैरे.

१० ऊ पुढें दीर्घाक्षर आल्यास तो ऱ्हस्व होतोः–खुलाख, कुजा, तुमार, तुफान, दुबार, नमुना, सुभा वगैरे.

११ स्वरहीन ह् मागें ए अगर ओ आल्यास विकल्पें करून तो स्वर हस लातोः– चेहेरा, पेहेरण, मेहेरात, मेहेर, शेहेर, मेहेनत, मोहोरें वगैरे.

१२ (अ) द्व्यक्षरी शब्दांत जर पुढें जोडाक्षर आलें तर त्याचें पृथक्करण अनें होतेंः–कदर, कसब, जरब, बरफ, तकट, नगद, फजर, नरम वगैरे.

( आ ) परन्तु मागें ऱ्हस्व इ असल्यास मधें दीर्घ ई येतेः– इबीन, जिकीर, फिकीर शिलीग, हिरीस वगैरे.

( इ ) आणि मागें ऱ्हस्व उ आल्यास पृथक्करण दीर्घ ऊनें होतेंः–उजूर, उरूफ, उरूस, कुलूप, गुरूज, जुलूम, झुलूप, बुरूज, मुलूख, हुकूम वगैरे.

( ई ) स्त हें जोडाक्षर तसेंच राहतेंः–गस्त, तस्त, फस्त, बन्दोबस्त, मस्त, सुस्त वगैरे. हळूहळू कत व इ युक्त जोडाक्षरें तशींच राहूं लागलींः–तक्त, वक्त, सक्र, अर्क, खुर्द, जर्द, दर्द, फर्द, मर्द, सर्द, अर्ज, कर्ज, खर्च, गर्क, शर्त, वगैरे. पुढें या स्वरभक्तीच्या विरुद्ध आलेल्या प्रवृत्तीमुळें अरक्, बरक् व फकत् पासून अनुक्रमें अर्क, वर्क, व फक्त हे शब्द परिणत झाले.

(उ) पण जोडाक्षरांतील दुसरा वर्ग अ अगर ह असल्यास पृथक्करण ए नें होऊन ह् गळतोः—दफे, रफे, वसे, जबे, फत्ते, वजे वगैरे.

१३ शब्दांची परिणती होत असतांना वर्णाचा द्वित्तपणा जातो असें दिसतें:— कवाली, कसाब, दलाल, नवाब, फरास, बकाल, बजाज़, सराफ, हमाम-खाना, हजाम, हमाल, अलबत, कुवत, गुल्छबू, जिमा, तालुका, तवूकल, तुरा, दिमत, मनुका. मयत वगैरे.

१४ याच्या उलट अलीकडील मराठींत कांहीं वर्ण द्वित्त होतात.

(अ) लकारान्त त्र्यक्षरी शब्दांतील दुसरें अक्षर द्वित्त होतें:— अक्कल, अद्दल, अम्मल, अस्सल, कत्तल, गज़्ज़ल, नक्कल, फस्सल, रत्तल, शिक्कल. त्याचप्रमाणें पुढील शब्दांतील द्वित्तांना मूळांत आधार नाहीः— अत्तर, हुन्नर, बेहत्तर, बहाद्दर, जिन्नस, रक्कम, मुक्काम.

(आ) वरील शब्दांतील मध्याक्षराचा द्वित्तपणा व पुढील द्व्यक्षरी शब्दांतील दुसऱ्या अक्षराचा द्वित्तपणा हा दैनिक बोलींतील आत्ता मधील द्वित्त-पणाप्रमाणें आघातामुळें आला असावाः— अल्ली, किल्ला, किल्ली, गिल्ला, जिल्हा, सल्ला, हल्ली, हिल्ला, हल्ला, फैसल्ला, नक्की, निक्का, सद्दी, हुद्दा, कित्ता, मत्ता, फन्ना रद्दी, बिद्दी वगैरे.

१५ पुढील उदाहरणें वर्णविपर्ययाचीं आहेतः— अजून ∠ हनूज़, अनामत ∠ अमानत, अमदानी ∠ आमदनी, कुलूप ∠ कुफ्ल, कसोशी ∠ कोशिश्, गन्ज∠ ज़ह्ग्, जनावर ∠ जान्वर, तर्तीब ∠ तद्बीर, तोशीस ∠ तश्वीश्, नक्की∠यकीन्, पलिता∠फतीला, पन्हा ∠ पह्ना, बुद्रुक∠बुजुर्ग, मनुका∠मुनक्का, महशूर∠मश्हूर, मुकया ∠ मुक्बरा, रुस्कत∠रुख्सत् वगैरे.

१६ व्यञ्जनांसम्बन्धी नियम इतक्यांत निश्चित करितां येत नाहीत. तथापि कांहीं पुढें दिले आहेत. नुसते झालेले फरक 'विविधज्ञानविस्ताराच्या' १९२२ च्या डिसेम्बरच्या अङ्कांत नमूद केलेले सांपडतील.

१७ घ् आणि झ् मधील ह्कार जाऊन ते ग् व ज् झाले आहेत. हे नियम सर्व-सामान्य असल्यामुळें उदाहरणें देण्याची जरूरी नाही.

१८ फार्शींत दन्ततालव्य झ आहे पण दन्ततालव्य च् व ज् हे नाहीत. शब्दा-रम्भीं च् अगर ज् हे अकारयुक्त असल्यास त्यांचा उच्चार दन्ततालव्य होतो. मात्र पुढें, य्, ल् अगर श् यांपैकीं वर्ण आला तर दन्ततालव्य उच्चार विकल्पेंकरून होतो. स्वरहीन ज् हा दन्ततालव्य असतो. शब्दान्तीं येणारा च् अगर ज् हा दन्ततालव्य असतो. उकारयुक्त च् ज् हे दन्ततालव्य असतात; इकारयुक्त नेहमीं तालव्य अस-तात व आकारयुक्त व एकारयुक्त विकल्पेंकरून असतात.

१९ (अ) श् च्यापुढें त् आल्यास श् चा स् होतोः— अङ्गुस्तान, इस्तियाक, कुस्ती, गस्त, गुमास्ता, तस्त, फेरिस्ता, मुस्ताकी, शिरस्ता वगैरे.

(आ) परन्तु पुढें क् आल्यास श् तसाच विकल्पेंकरून राहतोः—इश्क, अस्करा, इस्काल, मश्क, मुश्क, लश्कर वगैरे.

( इ ) अन्त्य स्वरहीन श् चा स् होतोः– अज्मास आरास, खिस्मीस, खुर्नीस, तलास, तोशीस, पैदास, फरास, बक्शीस, लास, शाबास, शिफारस वगैरे.

२० इकारयुक्त स् चा श् होतोः— काशीद, शिक्का, शिपाई, शिकन्दर, शिकां, शिलेदार, शिवाय, फार्शी, नामोशी, खलाशी, तफ्शील, तहशील, वशिला, इशील, तक्शीर, तक्शीम, नशीब, मशीद वगैरे. परन्तु कित्येकदां प्रतिक्रिया दिसते जसें, सिताब ∠ शिताब् व सिकम ∠ शिकम.

२१ आ, ई, व ऊ नन्तर येणारीं अन्त्य व्यञ्जनें अस्पष्टोच्चारामुळें गळतात. ( १ ) जोडा, कित्ता, झाडू यांत अन्त्य ब् गळला आहे ( २ ) कलाबतू, कानू, खान्सामा, खुर्जी, जाफरा, फर्जी वगैरे शब्दांत अन्त्य न् गळला आहे. (३) अलिजा, अफ्वा, कम्बर्गा, खान्का, खाव्गा, जागा, तन्खा, दर्गा, निका, पागा, बुणगा, सल्ला, वाहवा, छबी, तम्बी, सही, गू, जिरे, मसाले यांत अन्त्य ह् गळला आहे.

२२ अन्त्य ही तील ह पुष्कळदां गळतो :–खाई–नखाई, गिर्द–नवाई, तवई, बादशाई, शाई, सर्वराई, सुरई वगैरे.

२३ पुढील, शब्दांत ह् मागील अक्षरांत मिळून गेला आहे. कुल्हा–पोश ' गुन्हा, तन्हा, पन्हा, मुभा वगैरे.

२४ म् नन्तर र् आला तर मध्यें ब् पर्यायें करून घुसतोः– अम्बारी, अम्बीर, उम्बर, कम्बर, खुम्ब, जाम्ब वगैरे. उलट पक्षीं घुमट ∠ गुम्बद्. तुमान ∠ तुम्बान् दुमाला ∠ दुम्बाला व सोमल ∠ सुम्बुल् यांतील ब् गळून गेला आहे.

२५ जिन्द, बुन्ध व फन्द या तीन शब्दांत आलेला द् आगन्तुक आहे.

२६ शब्द लाम्ब असल्यास उच्चारसौलभ्या करितां स्वरांचा सङ्कोच होतो त्यास अनुसरून पर्वर्श ∠ पर्वरिश, व फारकत ∠ फारिघ्–खत् हे दोन शब्द सिद्ध झालेले आहेत.

---

## फार्शीतून मराठींत आलेले व्याकरण विशेष

१ मराठीप्रमाणेंच फार्शींत विशेषणाचा उपयोग स्वतन्त्रपणें नामासारखा होऊं शकतो, परन्तु नाम व विशेषण यांचा सम्बन्ध आल्यास विशेषण नामाच्या पुढें येतें आणि सम्बन्धदर्शक इ हा इझाफतीचा प्रत्यय नामास लागतो. फार्शींत हा प्रत्यय

बहुधा लिहीत नाहीत; परन्तु त्याचा उच्चार होतो. मराठींत तो लिहीत नाहीत व उच्चारींतही नाहीत. उदाहरणार्थ, साल-मज्कुरीं, साहेब-बहादुरांनीं, 'खत-मसर्रत्नमत' (= आनन्ददायक पत्र, सानेपयाव ४८० ), व साअत-नेक ( = शुभ घटिकेस, साने पयाव २७७ ), तक-राव ( ८ तख़्त्-इ-रवान् ) वगैरे.

२ कांहीं विशेषणें विकल्पेंकरून नामाच्या आधीं येतात; जसें, चन्द रोज़ ( = कांहीं दिवस ), जवान्-मर्द, तमाम खलक, बिस्यार खुश्वक्ती ( = बहुत आनन्द, साने-पयाव ३८४ ) वगैरे.

३ विशेषणाचा तारतम्यभाव तर् व तरीन् या प्रत्ययांनीं दाखविला जातो. तर् हा प्रत्यय कम्तर, ज़ूद्तर, बर्तर, बेहतर ( बेहेत्तर ), व मेहतर ( = श्रेष्ठतर ) या शब्दांत आढळतो. "पातशाही कम्तर पडली असें पाहून" ( सभासद २० ). "ज़ूद्-तर... रवाना करून पाठवावें" ( साने-पयाव ३८७ ). "पादशाही हुकूम बर्तर म्हणोन" ( चित्रगुप्त ७० ). तरीन् प्रत्ययाचें उदाहरण कम्तरीन् हें एकच होय. "बन्दे कम्तरीन ( = अत्यन्त हलका सेवक, राजवाडे १५।९९ ); "यासेरीज् सिबन्दींचें कम्तरीन पन्नास साठ लक्ष देणें आहे" ( राजवाडे १२।८७ ).

४ सङ्ख्याक्रमदर्शक विशेषणें अव्वल, दूम, सानी, सीम, चहारूम हीं पांच आहेत. सङ्ख्या देतांना पूर्वी एक विशिष्ट शब्द नङ्ग या अर्थी घालण्याचा प्रघात आहे; जसें, माणसें, कस अथवा इसम इतके; बैल, रास; भाण्डीं, आवाज; तोफा व हत्ती, जञ्जीर; फळें, दाणे; सर्वसाधारण गोष्टी—सुमार.

५ फार्शी भाषेंत नामाचा लिङ्गभेद निसर्गानुसार आहे. पशुदर्शक नामाला नर् व मादा हे शब्द पुढें अगर मागें जोडून पुल्लिङ्गी व स्त्रीलिङ्गी नामें सिद्ध करितात; तर कित्येकदां लिङ्गभेद भिन्न शब्दांनीच व्यक्त होतो जसें, अस्प म्हणजे घोडा व मादयान ( ८फा० मायान् ) म्हणजे घोडी; पिदर अगर पदर म्हणजे बाप व मादर म्हणजे आई. मादर हा शब्द फक्त मादर्चोद म्हणजे मातृगमनी या शब्दांत आढळतो. पदर साठीं पहा "आमचे पदर किब्लेगाह नारायणराव' ( ऐति ५८ ) 'बयाजीराव आपले पदर' ( वाड-सनदा १४० ).

६ फार्शी भाषेंत 'हा' हा प्रत्यय लागून कोणत्याही नामाचें अनेकवचनाचें रूप सिद्ध होतें. "आम्ही हुज़ुरांत बार्हा अर्ज़ मारूज़ करितों कीं" ( राजवाडे २२।६२ ) या वाक्यांत बार्हा हें बार् चें अनेकवचनाचें रूप असून त्याचा उपयोग बार्बार् वारंवार या अर्थानें क्रियाविशेषणासारखा केलेला आहे. विचारवन्त प्राणीदर्शक नामाचें अनेकवचन आन् प्रत्यय लागून होतें. "कार्कुनानि हाल व इस्तक्बाल" या शब्दप्रयोगामध्यें कार्कुनान् हें अनेकवचनाचें रूप असून त्याला पुढील शब्दाशी षष्ठीचा सम्बन्ध दर्शविणारा इज़ाफतीचा इ हा प्रत्यय लागलेला आहे. परन्तु भाषेच्या अज्ञानामुळें आनी हाच अनेकवचनाचा प्रत्यय असें मराठी लेखक समजूं लागले आणि 'अर्कानि दौलत' ( = राज्यस्तम्भ ) हा शुद्ध प्रयोग जाऊन 'अर्कानी दौलतानी' ( इम २३६ ) असें लिहिण्यांत येऊं लागलें. तसेंच पुढील वाक्यांत

पडाः " महालीचे कार्कुनानी इस्कील करून हुम्याला करीत नाहीत " ( राज-वाडे २०।१५२ ).

७ मूळ शब्द अकारान्त असल्यास आन्‌च्या ऐवजी गान् हा प्रत्यय लागतो. बन्देगान अली या नांवानें निझाम्‌अली पुष्कळदां उल्लेखिला जातो. बन्देगान् ( ∠ फा० बन्दगान् ) हें बन्दा याचें अनेकवचनाचें रूप आहे. मूळांत बन्देगान्‌च्या आधी कम्तरीन् सारखें एखादें विशेषण असून तें अज्ञानानें गळलें आहे. तें धरून, 'कम्तरीनि बन्द्‌गानि अली' याचा अर्थ हज़रत अलीच्या सेवकांपैकी हीनतम असा होईल. प्यादगान हा शब्द पायदळ या अर्थानें एकवचनी जरी वापरला गेला असला तरी मूळांत पियादगान् हें पियादाचें अनेक वचनाचें रूप आहे. " प्याद-गानाची लढाई समोर लाऊन आपण सडी स्वारनिशी कम्बर्गा मारून फोजेचा मोड केला " ( दिमरा १।२५३ ).

८ मूळांत अकारान्त नामाचें अनेक वचनाचें रूप ज़ात ( ∠ जात ) हा प्रत्यय लागून होतें. उदाहरणार्थः " तमाम कार्खानेज़ात चराईस जाण्याचा हुकूम जाला " ( राजवाडे ७।१६६ ); " किल्लेज़ातचा बन्दोबस्त " ( वाड-समा ३।१६ ); " याच प्रमाणें तोफज़ात ( ∠ फा० तुहफ़जात्, उपायनें ) बराय नज़र नबाब वजीरखान मौसूफचे स्वाधीन केले " ( पद्मव ११८ ); " मेवेज़ातच्या ( = फळांच्या ) बहंड्या " ( राजवाडे ५।४४ ); " कन्धार हिरात वगैरे सुभेज़ातचा बन्दोबस्त " ( दिमरा २।६६ ). पुरा म्हणजे पेठ हा शब्द हिन्दी असूनही त्याचें पुरेज़ात हें रूप पुढील वाक्यांत आहेः– " तमाम पुरेज़ात व कार्खाने व राजमन्दिरीं चौक्या ठेऊन बन्दोबस्त केला " ( ऐटि १।६५ ).

९ आत हा प्रत्यक्ष मूळांत अरबी असूनही फार्शी व तुर्की नामाला लागून बागायत ∠ बाग़ात्, कुर्निसात ∠ कोर्निशात् व गैराद ∠ घैरात् अशीं रूपें सिद्ध होतात.

१० अनेक अरबी नामांचीं अनेकवचनांचीं रूपें मूळ धातूंत फरक होऊन होतात. तशा रूपांचा उपयोग फार्शींत रूढ आहे; मराठींत तो क्वचित आढळतो. " हुज़ूरचे अकारीब " ( = जवळचे लोक ) ( राजवाडे १५।२५ ); " अश्राफासिलेदार " ( राज-वाडे ७।५४ ); " अमला " ( = अम्मल्दार ) ( राजवाडे ७।४५ ); फैला ( राजवाडे १०।३४७ ); मकातीब ( ∠ मक्तूब् पत्रें ) ( राजवाडे १०।३१२ ); " मतालब " ( ∠ मत्लब्, हेतु–राजवाडे ८।२०३ ); " रिआया व मुज़ारियान " ( ∠ रईयत् रयती व शेतकरी–राजवाडे ६।१५३ ); " पातशाहजादे व सलातीन " ( ∠ सुल्तान्, राज-पुत्र–दिमरा १।२७२ ); वगैरे.

११ अशीं कांहीं अनेकवचनी नामें मराठींत एकवचनी अर्थानें उपयोगिलीं जातातः उदाहरणार्थ, अखबार ( ∠ खबर्, बातमीपत्रिका राजवाडे १०।२७३ ); अश्राफ ( ∠ शरीफ़् अभिजात, निरुपद्रवी ); असबाब ( ∠ सबब् माल—राजवाडे १।५३ ); असामी ( ∠ इस्म् ) नेमणूक, व्यक्ती; अल्काब ( ∠ लक़ब् मा ना–दिमरा १।७ ); अहकाम ( ∠ हुक्म् ) रुक्का, ( चिरा २४ ); अहवाल; हवाल

( ∠ हाल् स्थिती, कैफियत ); आदाब ( ∠ अदब् मुजरा-ऐदि ११२ ); उमराव ( ∠ अमीर् सर्दार ); औकात ( ∠ वक्त् निर्वाह-राजवाडे १५।२९३ ); औलाद् ( ∠ वलद्, प्रजा, कुळी ); औलिया ( ∠ वली, साधू ); औसाफ ( ∠ वस्फ् लौकिक-खरे ११।६१३५ ); कवाइंत ( ∠ काइदा, युक्ती, शिस्त ); कुफ्फार ( ∠ काफिर् लुच्चा, खरे १०।५२०२ ); कुर्निसात ( ∠ कोर्निश् वन्दन ); खतूत ( ∠ खत् पत्र-राजवाडे १०।१६४ ); तक्सीराती ( ∠ तक्सीर चूक-इऐ ५।४९ ); प्यादगान ( ∠ पियादा, पायदळ-दिमरा १।२४३ ); तवारीख ( ∠ तारीख् इतिहास ); मजालस ( ∠ माज्लिस्, बैठक-मुकेश्वर-सभापर्व २।३१ ); मरातब ( ∠ मर्तबा, किताब-राजवाडे ४।२३ ); मुशायख ( ∠ शेख् धर्ममूर्ती-राजवाडे ५।११२ ); मसाला ( ∠ मस्लहत् ) वगैरे. " रयायानी तरे कानद खोरें " ( राजवाडे १६।४९ ) यांत रयाया हें रयतचें अनेक वचनाचें रूप असून त्यास आनी हा प्रत्यय लाविला गेला आहे.

फार्शीत द्विवचन नाही. ऐन् प्रत्ययान्त जानिबैन, तर्फैन, वालिदैन् हे शब्द अरबी आहेत. ' जानीबैन " ( सानेपयाव ४८४ ) व " तर्फैन " ( खरे ७।३५ ६४ ) यांचा दुतर्फा, परस्परें याअर्थी क्रियाविशेषणासारखा उपयोग होतो. पुस्त ( ∠ पुश्त् ) पिढी हा शब्द फार्शी असतांही पुस्तैन असें द्विवचन पुढील वाक्यांत आढळतें: " दोन्ही रियासती पुस्तैन पासोन येक; जुदाई नाही " ( राजवाडे ७।१५१ ).

१२ विभक्तिप्रत्यय असे दोनच आहेतः– द्वितीयेचा अगर चतुर्थीचा रा व षष्ठीचा इ. प्रथमेच्या एकवचनाच्या रूपांत अनिश्चितपणा दाखवायचा असला म्हणजे ई हा प्रत्यय लागतो, जसें, मर्दी म्हणजे कोणी एक मर्द. कसोशी, किताबती, खुमारी, तफावती वगैरे पुष्कळच शब्दांत जो निरर्थक अन्य ई हा प्रत्यय आढळतो त्याचें मूळ उपरिनिर्दिष्ट नियमांत असावें.

१३ कर्मदर्शक नामास सन्दिग्धता घालविण्याकरितां विभक्तिप्रत्यय लागलाच तर रा लाविनात. मराठींतील ला हा प्रत्यय फार्शी रा पासूनच निघाला आहे असें दिसतें.

१४ इझाफत म्हणजे षष्ठी सम्बन्ध. यांत शब्दक्रम मराठीच्या उलट असतो; व षष्ठीचा प्रत्यय इ ( याचा उच्चार ए असाच बहुधा होतो ) हा पहिल्या नामाला लागतो; उदाहरणार्थ द्युतीचा गिरि याचें भाषान्तर कोह् इ-नूर, जूनचा महिमा याचें भाषान्तर माहे जून असें होतें. 'राहणार पुणें' 'किल्ले पुरन्दर', 'अ कोम क ' 'शिक्क माह गुद्रत' वगैरे अनेक वाक्प्रचारांत फार्शी शब्दक्रम दिसतो. सामासिक नामांत मात्र शब्दक्रम मराठीप्रमाणें असतो व प्रत्यय गळतो; जसें गुलाब म्हणजे आब्–ई गुल् फुल–पाणी, सु न्धी जळ. अकारान्त नामास य हा प्रत्यय लागतो जसें 'बकाय उमर' ( साने–पयाव ४७६ ) म्हणजे आयुष्याची शाश्वती.

१५ हा षष्ठीचा प्रत्यय शाह्–आलम्, शाह–जहान्, नूर–जहान वगैरे अपवादात्मक

शब्दांत व साहेब, वली वगैरे शब्दांनीं सुरू होणाऱ्या षष्ठी सम्बन्धांत उच्चारिला जात नाहीं; उदाहरणार्थ साहेब–हिम्मत हिम्मत्वान्; वली–न्यामत (=श्रीमन्त, राजवाडे १०।१६५) व वली-अहद् (राजवाडे ११।६३) म्हणजे युवराज वगैरे शब्दप्रयोगांत षष्ठीच्या प्रत्ययाचा उच्चार नाहीं. मराठींत त्याचा उच्चार होणें हीच गोष्ट अपवादात्मक आहे; उदाहरणार्थ "अज सबब-दूरी-राह" पदमव ११२, "अजबायेस बिमारी" (पदमव ११४); अज़ा मन्हामत. हिम्मत मर्दा-मदत खुदा या मश्हूर म्हणीचा अर्थ धीर-कसोशी मनुष्यांची (व मग) मदत ईश्वराची असा आहे. मूळांत हिम्मत् व मदद् या शब्दांच्या अन्तीं इ हा प्रत्यय आहे. तसेंच रङ्ग-रोगण मूळांत रङ्ग-इ-रोघन म्हणजे तैल-रङ्ग असें आहे.

१६ सम्बोधनासाठीं कवितेंत आ हा प्रत्यय वापरतात. गद्यांत नामाच्या-पूर्वी अरे या अर्थी 'अय्' अथवा अरबी 'या' हें अव्यय उपयोगितात; जसें 'या खुदा.'

१७ इतर विभक्तींनीं दाखविले जाणारे सम्बन्ध पूर्वगामी अव्ययांच्या साहाय्यानें व्यक्त केले जातात; जसें, अज़्–ई–सबब म्हणजे या कारणानें; दरीं विला म्हणजे या वेळीं वगैरे.

१८ पुरुषवाचक सर्वनामांपैकीं तृतीय पुरुषी एकवचनी ऊ म्हणजे तो–ती, हें पुढील वाक्यांत आढळतें:– "बाद ऊ (= त्याच्या मागून) अव्लाद व अह्फाद त्यांसी रवा करणें" ( राजवाडे १५।३६४). पुरुषवाचकच पण षष्ठीदर्शक संयुक्त सर्वनामांपैकीं तृतीय पुरुषी अश् "आखीरश" (= म्हणजे त्याच्या अन्तीं; साने–पयाव ४८०) यांत आढळतें.

१९ हरएक (∠ हर्यक्) व हर्दो (= दोघेही) यांचा उपयोग बराच आढळतो; उदाहरणार्थ "हर्दो जणांचा ज़मान घेणें" ( राजवाडे १५।४७). 'खुद्द' (∠ खुद् = आप) हें सर्वनामाप्रमाणें आहे. 'ब–जिन्नस' व 'बराय खुद' यांचाही उपयोग खुद्द तेंच असा अर्थ दर्शविण्याकडे होतो. "तें पत्र ब–जिन्नस त्यांणीं स्वामींचे सेवेसी पाठविलें" (राजवाडे ८।८५). "त्यांसी ब–जिन्नस नजर बेग खांजी याणींही पत्र सेवेसी लिहिलें आहे" (राजवाडे ८।२११). बराय याचा अर्थ साठीं अगर बुद्धीनें असा होतो. तथापि अज्ञानामुळें, "बराय खुद पादशहा याजवर मी छापा घालितों" (मराचिथोशा ३४), व "गोपाळराव गोविन्द यांनीं आपली फौजेचे तरफेस बराय खुदखास उभे राहून श्रीमन्तांचे हवेलीचें रक्षण केलें" (राजवाडे ११।५९) असे प्रयोग आढळतात.

२० दर्शक विशेषणांपैकीं ई (= हा) व आं (= तो) हीं मराठींत आढळतात. दर्बारी पत्रांत ई जानब (= ही बाजू) याचा उपयोग आम्ही दर्शविण्याकडे होतो; त्याचप्रमाणें "आं साहेबीं खत पाठविलें" यांत आं साहेबीं याचा अर्थ 'आपण' असा करावयाचा. या शिवाय अर्जीबाद, दरींविला इत्यादि प्रयोगांत ई आहे. "अर्जीबाद

( = बा नन्तर ) होईल तें नमूदास येईल " ( राजवाडे १०।१९३ ); शिवाय " दरीं सुरत " म्हणजे या स्थितींत ( राजवाडे १९।८ ).

२१ करणें, मारणें, देणें इत्यादि क्रियापदांच्या पूर्वीं क्रियावाचक अगर इतर नाम घालून संयुक्त क्रियापद सिद्ध करण्याचा प्रकार मराठीनें फार्शीवरूनच उचलला. कुदणें खान्देशांत अजून प्रचारांत आहे; हा प्रयोग कानाला गोड लागत नाही पण उडी मारणें ( ∠ फा० ज़दन् ) हा प्रयोग रूढ झाल्यामुळें गोड लागतो. मिशीवर ताव देणें यांतील ताव देणें हें बरोबर ताब् दादन्=पीळ देणें चें भाषान्तर आहे.

२२ सकर्मक क्रियावाचक नाम व असणें अगर होणें मिळून कर्मणि क्रियापद सिद्ध होऊं लागलें; जसें कत्तल होणें म्हणजे मारलें जाणें; गडप होणें म्हणजे ग्रस्त होणें इत्यादि. याचा एक परिणाम असा झाला कीं मागील क्रियावाचक नामांचा उपयोग कर्मणि धातुसाधित विशेषणासारखा होऊं लागला; जसें इतराज़ ( = नाराज़ ) गर्क, ( = निमग्न ), ज़मा ( = एकीकृत ), तर्बेज़ ( = शिक्षित, प्रवीण ), तहकीक ( सत्यनिर्णीत, खरें ), दखल ( = श्रुत, माहीत ), दिक्क ( = क्षीण ), माहीत ( = ज्ञात ) वगैरे.

२३ क्रियापदाच्या रूपांपैकीं " गुम् शूद, " " मोतेब सूद " मध्यें शुद म्हणजे झालें व " रवा अस्त " (राजवाडे १६।४९ ) मध्यें अस्त् म्हणजे आहे, ' रोशन गर्दीद ' मध्यें गर्दीद् म्हणजे झालें व ' गुदस्त ' म्हणजे झालें न रवा दारन्द मध्यें दारन्द म्हणजे ठेवावें असे पांच शब्द सांपडतात.

२४ पुढील क्रियापदें फार्शी शब्दांपासून झालेलीं आहेत

( १ ) धातुपासूनः— अज़्मावणें ∠ आज़्मा, गुज़रणें ∠ गुज़र्, गुज़राणणें ∠ गुज़रान्, छापणें ∠ चाप, तवानणें ∠ तवान्, नावाज़णें ∠ नवाज़्, फर्मावणें ∠ फर्मा, बजावणें ∠ बजा आर्.

( २ ) नामापासूनः— खर्चणें ∠ खर्च्, गन्ज़णें ∠ ग़ज़्, चोपणें ∠ चोब्, ज़बाबणें ∠ जवाब्, ज़मणें ∠ जम्अ, ज़ुमानणें ∠ गुमान्, ज़ोरावणें ∠ ज़ोर्, झाडणें ∠ जारूब, डागणें ∠ दाग़्, तपासणें ∠ तफह्हुस्, दगावणें ∠ दग़ा, दफनणें ∠ दफन्, दमणें दम्, नकलणें ∠नक्कल, नक्षासणें ∠ नक़्श्, पेचणें ∠ पेच्, पेहेरणें ∠ पैरहन्, फितणें ∠ फित्ना, बदलणें ∠ बदल्, बनावणें ∠ बिना, बिछावणें ∠ बिसात्, मुरणें ∠ मुरम्बा ∠ मुरब्बा, रन्ज़णें ∠ रञ्ज्, शिलगावणें ∠ शल्क्, सतावणें ∠ सतम्, सुलासणें ∠ सूराख़्, हवालणें ∠ हवाला, कुर्वण्डणें, ज़मावणें.

( ३ ) विशेषणापासूनः— जाहीरणें ∠ ज़ाहिर्, नरमणें ∠ नर्म्, लङ्गडणें ∠ लङ्ग् , सरदणें ∠ सर्द्, सुस्तावणें ∠ सुस्त्.

२५ पुढील क्रियाविशेषणें फार्शींतून मराठींत आलेलीं आहेत. असेर, अजीबाद ( = बिल्कूल, बापुडे राजवाडे १०।१६७,१७।१९३ ), अजून, अक़्करीब, अव्वल, अलबत्, अलाहिदा, आस्ते, खाईनखाई, खामखा, खास, खुफिया, खुसूस, गाय.

बाना, गुद्स्ता, गोया, जाहिराणा, जूद, फक्, फिल्फौर, फिल्वाके, फिल्हाल, पेशजी, बल्के, बार्बार, बाहाँ, बिल्एकरुई; बिल्कूल, बिल्फैल, बेलाशक, मबादा, महतकद्दुम, यन्दा, शायद, शिताब, हर्गीज़, हम्खास, हमेशा.

२६ पुढील उभयान्वयी अव्ययें फार्शींतून मराठींत आलीं आहेत– अगर ( = जर, पद्मव १०९ किंवा ), कीं ∠ कि, अम्मा, चुनांचे, मगर ( परन्तु ), या, व, लेकीन, लेहाज़ा, सबब.

२७ पुढील उद्गारवाचक अव्ययें फार्शींतून मराठींत आलीं आहेत, अफसोस ! खबर्दार ! गप ! खामोश ! खाशी ! खूप ! खैर ! चूप ! तोबा ! वाह ! वाहवा ! शाबास ! इत्यादि.

२८ पुढील पूर्वगामी व पुरोगामी शब्दयोगी अव्ययांच्या योगानें क्रियाविशेषणें सिद्ध होतात. अज़् ( ∠अझ् ) = मुळें, पासून; ते, ता = पर्यन्त; दर् = आंत; ब, बि = –ला, –नें; बा = सह; बर् = वर; बराय् = साठीं, व बे = वांचून हीं मूळ पूर्वगामी शब्दयोगी अव्ययें होत इतर नामांशी यांचा संयोग होऊन संयुक्त शब्दयोगी अव्ययें सिद्ध होतात; कित्येकदां मूळ उपसर्ग गळून जाऊन नामांचाच अव्ययासारखा उपयोग होतो. अव्ययात्मक नामाच्या अन्तीं व संयुक्त शब्दयोगी अव्ययांच्या अन्तीं इझाफत्चा इ हा प्रत्यय लागतो परन्तु मराठींत तो गळतो. भाषेच्या अज्ञानामुळें कित्येकदां पूर्वगामी अव्ययाच्या पुढील नामास –चा,–ची,–चें इत्यादि मराठी प्रत्यय लागतात तर कित्येकदां फार्शी पूर्वगामी व मराठी पुरोगामी दोन्ही अव्ययांचा उपयोग आढळतो; जसें, " अज़्रूय ( = रीतीनें ) वाजबीच्या, व हक्क–परस्तीच्या व इन्साफाच्या रीतीनें " ( पेअ ६१ ); " ब–ज़ोर्मर्दीनें " ( राजवाडे १०।२१९ ).

संयुक्त शब्दयोगी अव्ययें खालीं दिलीं आहेत.

१ अज़्:–अज़्–कदीम = पूर्वीपासून ( वाड–मा ११६५ ), अज़्तरफ = बाजूनें, कडून; अज़्बायेस = कारणानें ( पद्मव ११४ ); अज़्सबब = कारणानें ( पद्मव ११२ ) इत्यादि.

२ अज़्रा ( ∠अझ्राहि ) = मार्गें, पूर्वकः–अज़्रा एख्लास = स्नेहपूर्वक ( राजवाडे १०।११८ ); अज़्राहे खानगी = घरोब्याचे रीतीनें ( राजवाडे ५।८५ ); अज़्राहे दोस्ती = मैत्रीपूर्वक ( राजवाडे ५।१६४ ); अज़्रा–मन्हामत = कृपापूर्वक; अज़्राहे मेहेर्बानगी ( राजवाडे १०।२१२ ); अज़्राहे हरामज़ादगी ( राजवाडे ११।४१ ) वगैरे वगैरे.

३ अज़्रूय = रीतीनें ( पेअ ६१ ).

४ अजीं ( ∠अझ्–ईन् ) या पासून अर्थ न कळल्यामुळें पुढील वाक्यांत पासून शब्द निष्कारण पडला आहे:– "अजीं पासून कुसूर न कीजे " ( राजवाडे १।२४८ ). " अजींबाद " = यापुढें ( राजवाडे १०।१६७, १०।१९३ ); अजींबायेस ( ∠अझ्–इन्–बाइस् ) या कारणास्तव ( पद्मव ११२ ); अजीं वास्ते म्हणून ( इम ६६ );

अर्जी सबब; इत्यादि. अजीबाद् पासून अजी असा संक्षेप होतो व त्याचा उपयोग बिल्कूल या अर्थानें होतो.

५ अहद् ( ∠अज़् हद्द्–इ ) = च्या सीमेपासून. " अहद् रायगिरी " ( चित्रगुप्त १६१ ).

६ कबिले ( कब्ल्–इ ) पूर्वी. " कबिले माही " ( राजवाडे १०।१६४ ).

७ खिलाफ ( ∠ब–खिलाफ्–इ ) विरुद्ध. " खिलाफ–मर्जी " ( राजवाडे ३।४५६ ).

८ जहाती ( ∠ ब–जहत्–इ ) साठीं. "जहाती भण्डारा" ( राजवाडे १५।१५३ ).

९ तहद ( ∠ता–हद्द–इ ) सीमेपर्यन्त. " तहद्–दिल्ली " ( पारस्नीस ब्रप २५३ ).

१० ते; ता; तह. " तारीख एक ते सात " मधील ते हें अव्यय फार्शी ता चेंच रूपान्तर असावें. " ता–मग्दूर " शक्य तोंवर ( राजवाडे ७।३७ ); " ता–हाल " आजपर्यन्त ( खरे ७।३५७५; राजवाडे १०।१८२ ). तह हेंही ता चेंच रूप आहे; जसें तह–हयात म्हणजे आ–जन्म.

११ दर याचा अर्थ आंत असा आहे; जसें, " दर् हर् साल " म्हणजे प्रत्येक वर्षी ( राजवाडे २०।९ ); " दर्महा " = महिन्यास ( खरे ८।४११९ ). परन्तु हर् म्हणजे प्रत्येक याच्याशी दर् चा घोंटाळा होऊन दर् म्हणजे प्रत्येक असा अर्थ सम्भवला; जसें " दर्गाह " म्हणजे कधींही ( राजवाडे ११।३६ ); " दर्वक्त " = नेहमीं ( राजवाडे ११।३६ ); दर्महा = प्रत्येक महिन्यास.

१२ दर्म्यान ( ∠ दर् मियान् इ ) = मध्यें.

१३ दरीं ( ∠ दर–ईन् ) = या...आंत; जसें, " दरीं बाब " ( इम ६७ ); " दरीं वख्त " ( राजवाडे १६।१५२ ); " दरीं विला " = यावेळीं; " दरीं सुरत " ( राजवाडे १९।८ ) वगैरे.

१४ दिमत ( ∠ ब ज़िम्मत्–इ ) तर्फेचा, कडील; जसें, दिमत अ.

१५ नजिक ( ∠ नज़्दीक्-इ ) = सन्निध. " नजीक समाधी " ( राजवाडे १५।१५४ ); " नजीक नदी " ( राजवाडे १५।२५२ ).

१६ निस्बत ( ∠ ब-निस्बत्-इ ) = दिमत.

१७ ब ( ∠ब ) = नें : " ब-ई सबब " ( साने–पयाव ३८४ ); " ब–तारीख " = तारखेस ( राजवाडे १६।५९ ); " ब-वजे-अहसन " = उत्कृष्ट रीतीनें ( राजवाडे १५।११३ ); इत्यादि.

१८ ब ( ∠ बा ) = सह, निशी. " ब–अब्रू " ( दिमरा २।२६ ); " ब–जमियत " ( खरे १२।६३९९ ); " ब–पोशाख " = पोशाखी ( साने–पयाव २९६ ); " ब–वकूफ " = शहाणा ( दिमरा १।४८ ); " ब–सरन्जाम " ( राजवाडे १।१४९ ); " ब–सवाब " = युक्त ( राजवाडे ५।८५ ).

पुढील ठिकाणीं ब हें अव्यय निष्कारण आलेलें आहे. " बमय " या जोडण्यांतय बची जरुरी नाहीं. "बमयकुटुम्बासुद्धां " ( राजवाडे १०।२६५ ) यांत

एकाच अर्थाचीं दोन एक पूर्वगामी अव्यय व एक पुरोगामी अव्यय हीं उपयोगिलीं आहेत. तसेंच पहा , " ब-शर्ती-प्रमाणें " ( राजवाडे १९।१०८ ). " ब-हर्गीज़= कधींही, " ( राजवाडे ७।२३ ) यांत बची आवश्यकता नाही.

१९ ब-गैर ( ∠ बि-घैर्-इ ) वांचून. " बगैर जागीर " ( इम ६६ ).

२० ब-तरीक ( ∠ ब-तरीक्-इ ) मार्गें, दाखल. " ब-तरीक नज़रबन्द " ( दिमरा १।१२२ ); " ब-तरीक मेजवानी म्हणून " ( दिमरा १।११४ ).

२१ बदूल्, ताठीं. " बदल-नन्दादीप व भण्डारा " ( राजवाडे १५।१५८ ).

२२ बा=सह. " बा-ज़मियत " ( राजवाडे ५।१३२ ); " बा-यक्-दिगर " = एकमेकाशीं ( साने-पयात्र ४७३ ); " बा-वकर " ( राजवाडे १०।२५२ ); " बा-वकूफ " ( राजवाडे १२।२७ ); " बा-वजूद " = असें असूनही ( राजवाडे १।१२४ ).

२३ बि-कलम; बि-तफ्शील, " बि-तर्जुमा = " नियमानुसार ( राजवाडे १५।२७१ ).

२४ बर म्हणजे वर. मराठी वर हें बर् चेंच रूपान्तर असावें. " बर्तख्त " = तख्तावर ( दिमरा १।२६९ ); " बर्तर्फ " = बाजूस, पदच्युत; " बर्पा " पायावर, उपस्थित ( राजवाडे ५।७६ ); " बर्बाद " = वाऱ्यावर, वाताहत ( होकै १४); " बर्हक्क "= सत्यास अनुसरून; अनुसरून ( राजवाडे १५।३३; ३।११० ).

२५ बर्हुकूम ( ∠ बर्हुक्म्-इ ) प्रमाणें. " बर्हुकूम याद " ( वाड-बाबा २।६६ ).

२६ बिला ( ∠ अ० बिला ) वांचून. " बिला उज़ूर " ( गोइसा १५ ); " बिला कसूर ", " बिला-महसूल " ( राजवाडे ७।९४ ); " बिला हुज्जत " ( ऐटि २।७४ ).

२७ बराबर=सर्वें. "बराबरी माणकोजी हुकेबर्दार ऐवज़ पाठविला असे " ( राजवाडे ५।१३० ).

२८ बराय = साठीं. "बराय तिज़ारत "= व्यापारासाठीं ( पदमव ११३ ), " बराय नज़र " = उपायनासाठी ( पदमव ११८ ); " बराय मातम्पुर्सी " = दुखवट्यासाठीं ( पदमव ११४ ).

२९ बाद् ( ∠ बअद्-इ ). " बाद्-ऊ " त्याच्यानन्तर ( राजवाडे १५।३६४ ); " बाद्-दसरा " ( खरे ८।४३५२ ).

३० बादज़् ( ∠ बअद्-अज़् ): " बादज़्-ईद " ( दिमरा २।३७ ); " बादज़्-बर्सात " ( इम २६० ); " बदज़्-फत्ते " ( राजवाडे १२।१२५ ).

३१ बे वांचून. " बे-उज़ूर " ( राजवाडे १०।५७ ); " बे-कुसूर " ( राजवाडे २०।२२० ); " बे-खत्रे " = निर्भयपणें ( जोरा १०५ ); " बे-गुन्हा " ( गोरा १०५ ) " बे-ज़ाब " ( खरे १।४४१ ); " बे-तक्शीर" ( दिमरा २।१२० ) " बे-

द्क्कित " ( राजवाडे २२।१४ ); " बे-मुर्वत " (खरे ६।२६७९ ); " बे-मुलाज़ा" ( खरे ९५४ ); बे-रुख्सत् " ( दिमरा २।५७ ); " बे-शक; " " बे-शुभह " ( साने-पयाव ४८२ ) इत्यादि.

३२ बे ( ∠ बि ) = - नें. " बे-ज़रब " = ज़ोरानें ( पाच ४० ). " बे-ज़ोर " ( खरे ८।४१९९ ); " बे-तन्हा " ( राजवाडे १९।९३ ). " बे-वज़े " ( राजवाडे १२।२२ ); " बे-वाजवी " ( गोइसा १३ ); " बे-शर्त " ( वाड-समा ११३४ ).

३३ माफक ( ∠ मुवाफिक्-इ ) प्रमाणें " माफक-मरातब " ( दिमरा १।७५ ); " माफक-मामूल " (दिमरा २।९६); ' माफक-हुकूम-विलायत " ( पद्मव११५).

३४ मै, मये ( ∠ मअ-इ )-सह. " मै-ज़मियत" ( सानेपयाव ४९३ ); " मै-फर्जन्दां " ( वाड-सनदा ८७ ); " मै-फौज़ " ( साने-पयाव ४९४ ); " मये लक्ष्मणपन्त " ( राजवाडे १।१८४ ); " मये वसूल " ( राजवाडे १०।१६४ ); " मये ज़मियत " ( राजवाडे ५।१४२ ).

३५ शिवाय ( ∠ सिवाय ). " शिवाय पाटीलबावाचे पर्वानगी " ( दिमरा १।११९ ); " शिवाय तोफा ताहफ " = उपायनें वज़ा करून वर (दिमरा १।१०४).

२९ मराठींत पुढील अव्ययें पुरोगामी आहेत. त्यापैकीं (१) अखेर,(२) ऐवजी ∠ ब -इवज़्-इ, ( ३ ) खेरीज़ ∠ खारिज़्-इ = बाह्य, शिवाय, ( ३ ) ता-गायत ∠ ता-घायत्-इ =अन्तापर्यन्त, ( ५ ) दर्म्यान ∠ दर्मियान्-इ = मध्यें, ( ६ ) देखील ∠ ब दाखिल् धरून सुद्धां, ( ७ ) नजीक ∠ नज़्दीक् जवळ, ( ८ ) बर्हुकूम ∠ बर्हुक्म्-इ प्रमाणें, ( ९ ) बाद नन्तर; दाखलबाद बार केले असेल ( वाड समा १।१७५ ) (१०) मार्फत ∠ब- मुआरफत् इ ओळखीनें, मध्यस्थीनें, ( १० ) शिवाय या अव्ययांची विशेष ओळख करून देण्याची आवश्यकता नाही. (११ ) तरीक ∠ ब-तरीकि मार्गें; योग्यः— " सलाहतरीक " = युक्तिवाद म्हणून ( दिमरा १।७ ); " तोफा-तरीक " = नज़राण्यास योग्य ( ऐकिप्र २।६१ );" नज़राणा-तरीख " ( ऐटि २।७१ ). ( १२ ) निहाय याची व्युत्पत्ती अनेकवचनाचे प्रत्यय आन् अगर आनी व हा अशी असावी; पण ही समाधानकारक नाही. " किल्ले निहाय कैद ठेविले " म्हणजे किल्याकिल्या-वर कैद ठेविले, असा अर्थ होतो. ( १३ ) माफक ∠ मुवाफिक्-इ प्रमाणें. " मुद्यामा-फक " = इच्छेप्रमाणें ( सभासद ७९ ). ( १४ ) माविज़ा ∠ ब-मुआवज़-इ = ऐवजी- " वकलातीचे माविज़ा " ( राजवाडे ५।१९५ ). ( १५ ) वास्ते ∠ ब-वासित-इ = माध्यमें, साठीं. " मज़्मुना वास्ते " = मज़्कुरासाठीं ( साने-पयाव ३८७ ).

३० कित्येकदां नामाची द्विरुक्ती होऊन शब्दयोगी अव्यय मध्यें येतें:—

( १ ) अलाहिदा-ब-अलाहिदा, एक-ब-एक, कूच-ब-कूच, गिर्द-ब-गिर्द; जरा-ब-ज़रा, जा-ब-जा, देह-ब-देह, दर्-बदर माह-ब-माह, रोज़-ब-रोज़, रू-ब- रू, साल-ब-साल; हर्फ-ब-हर्फ.

( २ ) ज़ोर-बे-ज़ोर, रात-बे-रात, शर्त-बे-शर्त, सलामत-बे-सलामत.

( ३ ) कार्किर्दी-दर-कार्किर्दी, कूच-दर-कूच, मजल-दर-मज़ल, पुस्त-दर-पुस्त पैदर्पै वगैरे.

३१ बिल् ( ∠ पूर्वगामी अव्यय बि ( = नें ) + ( अ ) ल् निश्चायक उपपद ) व फिल् ( ∠ पूर्वगामी अव्यय फी ( =आंत ) + ( अ ) ल् ) हे अरबी उपसर्ग लागून पुढील क्रियाविशेषणें सिद्ध झालेलीं आहेत. बिल्–एकरूई = एकनिष्ठपणें ( राजवाडे ६।६०२ ), बिल्कूल, बिल्फैल = वस्तुतः ( राजवाडे १५।२४८ ), बिल्मक्ता ( राजवाडे १८।५३ ), फिल्फौर = त्वरेनें ( ऐटि १।५९ ), फिल्वाके = खरोखर; फिल्हाल = सध्यां ( पद्मव ११८ ).

३२ याखेरीज़ पुढील क्रियाविशेषणें मराठींत उपयोगिलीं जातातः

( १ ) कालवाचकः अखेर, अज़ून, अव्वल, गुद्स्तां, ज़ूद् = लौकर ( राजवाडे १९।७३ ), दीं-पेस्तर = उद्यां ( इम ६८ ), दुबार, पेस्तर, पेशजी = पूर्वी, बार्हा = वारंवार, यन्दा, रोज़, सानील्हाल = पुन्हां, हर्गाह, हर्गीज़ = कधींही हल्ली वगैरे.

( २ ) स्थलवाचकः आम–खास ( = सर्वत्र ), इस्तक्बाल = सामोरें ( राजवाडे ५।१४५ ), गर्दोगर्दी = चोंहीं बाज़ूस, चौगिर्द्, जानीबैन, तर्फेन, पेशवा = सामोरें ( दिमरा १।२।३ ).

( ३ ) रीतीवाचकः अजीबात, अजी, अल्बत्, अलाहिदा, आस्ते, खाई नखाई, खामखा ( = तुझी इच्छा असो, नसो तरी निश्चयपूर्वक ), खास, खुफिया = अन्तस्थ रीतीनें ( दिमरा २।१५ ), खुसूस = विशेषतः ( राजवाडे ५।५२ ); गायबाना = अपरोक्ष, ज़बानी = मुखें ( राजवाडे ८।१३८ ), ज़रूर, जलद्, जाहिराणा = उघडपणें ( राजवाडे १।२८१ ), जिन्हार = मुळींच ( सानेपयाव ४८४ ), तन्हा=एकाट्यानें ( राजवाडे ५।२५ ), थेट ∠ ताहद्, पैहम = लागोपाठ ( साने पयाव ४७८ ), न्यहायत = अत्यन्त, मुफस्सल = सविस्तर, राज़रोस, शायद् = कदाचित्, मबादा = कदाचित् ( राजवाडे १।४६ ), सर्मोय = बालाग्रहि ( राजवाडे १०।२७८ ), हकनाक, हमखास = निश्चयें.

———

# शब्दसिद्धी

१ नामास अगर विशेषणास पुढील प्रत्यय लागून भाववाचकनामें सिद्ध होतात.

१ आः- गर्मा; पन्हा ∠ पहूना ∠ पहून् = रुन्दी.

२ आईः-फार्शींत रोशनाई हा एकच शब्द आई प्रत्यय लागून झालेला दिसतो. मराठींत पुढील उदाहरणें आहेतः अमिराई ( प्रभाकर १३९ ); कदिमाई ( राजवाडे ८।११९ ); गनिमाई ( खरे ६।२७९६ ); जबराई (परशराम १३९); जलदाई; दिरङ्गाई यांतील आई हा प्रत्यय निष्कारण आहे; दुनियाई ( राजवाडे ५।२० ), दुरुस्ताई ( जोरा ५ ); नरमाई ( जोरा ६ ); नाजुकाई; बारकाई; सराफाई; सुस्ताई इत्यादि.

३ ईः-एकी; कार्कुनी; खुबी; दानाई; दुंही, सबुरी वगैरे.

४ कीः-हा प्रत्यय गीचेंच रूपान्तर असावें. गन्दकी ∠ गन्दगी = घाण; जामीनकी; दर्म्यानकी ( खरे १०।५२९६ ); मुजावरकी ( राजवाडे १५।२६ ); खानकी ( राजवाडे १२।१९२ ); शहाजादकी ∠ शाहझादगी ( ऐ॰ि ५१ ). हा प्रत्यय मराठींत चाङ्गलाच रूढ झाला आहे.

५ गिरीः-फार्शींत गर् हा कर्तृवाचक प्रत्यय आहे; याला ई लागून गरी हा संयुक्त प्रत्यय सिद्ध होतो. खझानूची-गरी गुमास्तगरी, मुतसद्दीगरी, बख्शीगरी, व सिपाहगरी अशा कांहीं थोड्या शब्दांत पदवीदर्शक अगर कार्यदर्शक म्हणून गरी या प्रत्ययाचा स्वतन्त्र उपयोग आढळतो. गीर् या धातूला ई लागून घेणें या अर्थाचा गिरी फक्त कचजूगिरी खबर्गीरी, दस्तगिरी व मुलूख गिरी या चार शब्दांत दिसतो. मराठींतील उदाहरणें.

( अ ) खजाञ्चीगिरी, कारेगिरी, गुमास्तेगिरी, मुत्सद्दीगिरी, बक्शी-गिरी, शिपायगिरी, सौदागिरी वगैरे.

( आ ) अस्तर्गिरी, खावन्दगिरी, गाफील-गिरी, गुलाम्गिरी, दखल्गिरी, दम्यान्गिरी, दिवाण्गिरी, दरज्-गिरी, दुस्मान्गिरी, नकास्-गिरी, प्यादेगिरी, पैवस्तगिरी, बिदा-गिरी, बेमान्गिरी, मर्दान्गिरी, माहीत्गिरी, मुद्दईगिरी, मुल्लागिरी, वस्तादगिरी, सर्दार्गिरी, इत्यादि.

६ गीः- हा प्रत्यय मूळांत अकारान्त शब्दासच लागतो, जसें बन्द-बन्दगी. इतर उदाहरणें अजुर्दगी; असुदगी, खफगी, गिर्वीदगी, जिन्दगी, ताज़गी, दारोगी, देहनगी, निवीसन्दगी, प्यादगी, पोक्तगी, बन्दगी, बे-मज़गी, मर्दानगी; मान्दगी, रवानगी, ज़गी, शर्मिन्दगी, हरामज़ादगी इत्यादि. मराठींत स्वतन्त्रपणें पुढील भाववाचक नामें सिद्ध झालेलीं आहेतः-

उमेदगी, कसीदगी, खुर्सन्दगी, ज़ुदागी, दुश्मनगी, ना-तवानगी, पटेलगी, फुर्सगा, बजीदगी, बिदागी, बेमानगी, मेजूवानगी, मेहमानगी, मेहेर्बानगी, लाचारगी राणगी, वगैरे.

७ आत्:-कित्येक अरबी भाववाचक नामाच्या अन्तीं अत् येतो. अरबींतील, ईयत् हा प्रत्यय कैफियत, खसूसीयत,जाहलीयत, मालकीयत, वाकफीयत, वाहदीयत, वगैरे ५-६ शब्दांत आढळतो. पुढील शब्द त लागून झालेले आहेत: खलीपत, नायबत, वजीरत, हेजियत वगैरे. इनामत, गुजारत कफारत, फर्जन्दानत वगैरे शब्दांतील अन्त्य तला मुळांत आधार नाही. मराठींत -आत् हा प्रत्यय परिणत झालेला दिसतोः जैसें, इद्बारात, कबुलायत, करामात, कावजात, ज़रुरात, जाहिरात, तहकीकात, ताबीनात, तालूकात, नबाबात, मालूमात, मुकामात, रुज़्वात, सुरवात, हुज़रात.

२ अल्पत्वदर्शक नामें-इचा ( बगिचा ∠ बाग़ ), - क ( जम्बूरक, बदक ∠ बत् ) व-चा ( गालीचा ) हे प्रत्यय लागून होतात.

३ स्थानदर्शक नामें पुढील प्रत्यय लागून सिद्ध होतात.

( १ ) आबादः- अहमदाबाद, हैद्राबाद वगैरे.

( २ ) खाना ( ∠ फा० खाना = गृह ) अद्ब्खाना, अजायब्खाना, घुसल्खाना, दारूखाना वगैरे.

( ३ ) गाह,-गाः- इद्गा, कम्बर्गा = सेनामध्य, किब्लेगाह= वन्दनस्थान, खाब्गा = निद्रागृह, जागा, दर्गा, पागा वगैरे.

( ४ ) दान्:- अङ्गुस्तान; कलम्दान, ज़ुज़्दान, गुल्दान, चिराग्दान, तावूदान, शामदान वगैरे.

५ दाणीः- ( हें दान् चेंच रूपान्तर आहे ) अत्तरदाणी, पिकदाणी, चहादाणी वगैरे.

६ स्तानः- कबरस्तान, तुर्कस्तान, हिन्दूस्तान वगैरे.

४ नामसाधित कर्तृवाचक शब्द पुढील प्रत्यय लागून होतात.

( १ ) चीः- खजानूची, तबलची, तास्ची, तोफची, नगारची, नशेक्ची, मर्फाची, मशाल्ची.

( २ ) जीः- खजानूजी, दिवाणजी, मशाल्जी, मियांजी.

( ३ ) गरः- कारीगर, जादूगर, जीनूगर, बाजीगर, सौदागर.

( ४ ) गारः- कमानूगार, कल्हईगार, कारीगार,किमयागार,खिदूमतूगार, गुन्हेगार, जादूगार, नकास्गार मदत्गार, माहीत्गार, शिकल्गार.

( ५ ) बान्:- पास्बान, मेहेर्बान.

( ६ ) वान्:- बाग्वान, दर्वान, सार्वान.

५ विशेषणें व नामें सिद्ध करण्याचे इतर प्रत्यय.

( १ ) ईः- अमली, अस्मानी, कबजी, कलमी, ज़बाबी, हौशी वगैरे.

( २ ) ईः- [ फार्शी द्रव्यदर्शक ईन् पासून ] आयनी, चर्मी, चोबी, ज़री, पश्मी, बिरंजी, रङ्गी, सङ्गी.

(८) दोन भिन्न क्रियापदांच्या भूतकाल रूपांच्या द्वन्द्वसमासानें:–आमद्रफ्त, खरेदी–फरोक्ती, सुदामत.

(९) एकाच क्रियापदाच्या धातूस व भूतकाल रूपास उ नें जोडून अगर त्या शिवाय:–गुफ्तगो, बन्दोबस्त.

७ धातुसाधित कर्तृवाचक शब्द पुढील प्रमाणें होतात– (अ)

(१) धातूस–इन्दा ( ∠ अन्दा ) लागून:–निशिन्दा, नवीसन्दा, परिन्दा, पोशिन्दा, फामिन्दा, बाजिन्दा, शार्मिन्दा, साजिन्दा.

(२) धातूस–आ लागून:–दाना, तवाना.

(३) धातूस–ना हा उपसर्ग लागून:– नातवान, नादान, नादार.

(४) भूतकाल रूपास–ना उपसर्ग लागून:–ना–बूद.

(आ) नामास पुढील धातू लागून:–

(१) अन्दाज़ (= फेंक ):–गोलन्दाज़, जालन्दाज़, तिरन्दाज़, बर्कन्दाज़; व त्याच धर्तीवर घरन्दाज़, कारन्दाज़, सरन्दाज़.

(२) आवर् ( = आण ):–ज़ोरावर, दिलावर.

(३) आवीज़ ( = धर ):–दस्तैवज.

( ४ ) कन्द ( = खोद ):–मोहर्–कन्द.

(५) कस (= ओढ):–अर्कस, तार्कस,बार्कस; त्याच धर्तीवर गान्जेकस ज़ोरकस.

(६) कून ( = कर ):–कार्कून.

(७) खाह ( =इच्छ ):–खातर्खाह, खैर्खाह, दिल्खा, तन्खा, दौलत्खाह.

(८) खोर ( = खा ):–कज्जेखोर, चुगल्खोर, जिद्दखोर, तकारखोर, तुफान्खोर, दगेखोर, दावेखोर, नशाखोर, फजीत्खोर, मिजास्खोर.

(९) गीर ( = धर ):–अब्दागीर, अस्मानगीर, जहांगीर, दस्तगीर, दामन्गीर, दिल्गीर; आणि त्याच धर्तीवर तमास्गीर, दुवागीर.

( १० ) गुज़ार ( = ठेव ):–गईगुज़ार, गिले–गुज़ार, गोशगुज़ार, नजर्गुज़ार, माल-गुज़ार, शुक्र–गुज़ार.

( ११ ) गो ( = बोल ) :– कानुगो; रास्तगो; गरज़्गो; सख्तगो.

(११ अ) तरास ( =काप )=ज़बां–तरास, कलम्तरास, सङ्ग–तरास, सुम्ब–तरास.

( १२ ) तलब ( = माग ) :– ज्यादा–तलब, मरामत–तलब, रज़ा–तलब.

( १३ ) दान ( = जाण ) :– कदर्दान, कार्दान.

( १४ ) दार (लेव, धारण कर ):– अज़ुर्दार; कबिलेदर, छान्दार, तन्हेदार, दम्दार, नोकदार वगैरे.

( १५ ) दोज़ ( = शिव ):– चर्मदोज़, ज़मीन्दोज़, हवादोज़.

( १६ ) **नवाज़** ( = पाळ; वाजीव ):- गरीब-नवाज़, चङ्ग-नवाज़, तासे-नवाज़.

( १७ ) **नवीस-नीस** ( = लिही ):- अख्बार-नवीस, नकल्-नवीस, चिट्णीस, वाक्नीस.

( १८ ) **निगार** ( = लिही ):- वकायेनिगार.

( १९ ) **नशीन** ( = बैस ):- किल्लेनशीन, जन्नत्नशीन, तख्त-नशीन, पड्दे-नशीन, मस्नद्नशीन, बेहेस्त नशीन; त्याच धर्तीवर खातर्नशीन, गादीनशीन, गोशेनशीन, दिल्नशीन, पालखीनशीन,

( २० ) **नुमा** ( = दाखव ):- किब्लेनुमा, खुश्नुमा, फलक्नुमा.

( २१ ) **पर्दाज़** ( = कर ):- कार्पर्दाज़.

( २२ ) **पर्वर** ( = पाळ ): गरीब-पर्वर.

( २३ ) **परस्त** ( = भज ):- बुत्परस्त, हक-परस्त.

( २४ ) **पाश** ( = शिम्पड ):- गुलाब-पाश.

( २५ ) **पिजीर** ( = स्वीकार ):- सूरत्पिजीर.

( २६ ) **पैवन्द** ( = जोड ): -अबद्-पैवन्द.

( २७ ) **पोस** ( = आच्छादन कर, परिधान कर ): - कुल्हापोश, खान्पोश, गर्द्पोस, पलङ्गपोस, पायपोस, बकरपोस, शिलेपोस.

( २८ ) **फराज़** ( = उञ्चाव ):- सर्फराज़.

( २९ ) **फरोश** ( = वीक ):- बुत्फरोश, मेवेफरोश.

( ३० ) **बन्द** ( बान्ध ):- नाल्बन्द, पगड्बन्द.

( ३१ ) **बर्दार** ( = उचल ):- खास-बर्दार, चौरी-बर्दार, निशाण-बर्दार, बन्दूक-बर्दार, हुक्के-बर्दार, हुकूम-बर्दार.

( ३२ ) **बर** ( = हरण कर, ने ):- दिल्भर; पैगम्बर.

( ३३ ) **बाज़** ( = खेळ ):- आतस्बाज़, इश्कबाज़, कत्तल्बाज़, कायदेबाज़, कुर्रेबाज़, जहाँबाज़, दगल्बाज़, दगेबाज़, दारूबाज़, नजर्बाज़, नफेबाज़, निशाणबाज़, निशाबाज़, मन्सुबेबाज़ वगैरे.

( ३३अ ) **बीन** ( = पहा ):-तमास्बीन, दुर्बीण, बारीक्-बीन.

( ३४ ) **बोस** ( = चुम्ब ):—कद्म्बोस.

( ३५ ) **माल** ( = चोळ ):-गोश्माल, दस्तमाल, रुमाल, पायमाल.

( ३६ ) **याब** ( = मिळव ):-काम्याब, बार्याब.

( ३७ ) **रुबा** ( = हरण कर ):—केरबा, दिल्रुबा.

( ३८ ) **रूब्** ( = झाड ):-झाडू ( ∠ जारूब् ).

( ३९ ) **रेज़** ( = ओत ):-रङ्गरेज़.

( ४० ) **शिकन** ( = फोड ):-बुत्शिकन.

८ कित्येकदां अशा रितीनें साधिलेल्या नामांचा अर्थ **कर्मणी** होतो; जसें गोश्गु‑ज़ार ( = कानावर घातलेलें ), नज़र्गुज़ार, किल्ले‑नशीन ( = किल्ल्यांत बस‑लेला ), दिल्नशनि ( = हृदयस्थद, माहीत ), खुश्नुमा (= दिसायला चाङ्गलें), अबद्‑पैंवन्द ( = शाश्वति‑युक्त ) वगैरे.

( इ ) नामास भूतकाल वाचक अव्ययें लागूनः-जहांदीदा ( = जग पाहिलेला ), कम्बर्चस्ता ( = कटिबद्ध ), अवसान‑खस्ता ( धैर्य‑भग्न ) वगैरे.

९ कम, खराब, खुप, खुश, बद् हीं विशेषणें पूर्वगामी होऊन बहुव्रीही सामासिक विशेषणें सिद्ध होतात.

( १ ) कमसल, कम्कुवत, कम्ज़ात, कम्ज़ोर, कम्तोल, कम्बख्त, कम्नशीब वगैरे.

( २ ) खराब्हाल.

( ३ ) खुप्सूरत.

( ३ ) खुश्बो, खुश्वक्त, खुशाल.

( ५ ) बद्‑दील, बद्‑नाम, बद्‑मस्त, बद्माश, बद्‑सूरत.

१० नामास पुढील पूर्वगामी शब्दयोगी अव्ययें लागून विशेषणें सिद्ध होतात,

१ **जेर** ( = खालीं ):-जेर्दस्त; जेर्ज़प्त; जेर्बार.

२ **ब** ( ८ बा‑दार या अर्थी ):-ब‑अब्रू, ब‑ज़मियत वगैरे.

३ **बा** :- बा‑ज़मियत, बा‑वक्त, बा‑वकूफ.

४ **बर** :- बर्ज़ोर, बर्पा, बर्तर्फ, बर्बाद् वगैरे.

५ **बे** ( निः या अर्थी ):- बे‑इतल्ला, बे‑इमान, बे‑कायदा, बेकार, बे‑कुसूर बे‑कैद, बे‑खबर, बे‑गुमान, बे‑चिराग, बे‑जा, बे‑ज़ाब, बे‑तकशीर, बे‑ताब, बे‑तालूक, बे‑दखल, बे‑दम, बे‑दर्द, बे‑दाणा, बेनिहायत, बे‑पर्वा, बे‑पाया, बे‑फाम, बे‑फिकीर, बे‑बन्द, बे‑बाक, बे‑मालूम, बे‑मव्लग वगैरे.

( ६ ) **ला** ( अरबी ):- लाइलाज, ला‑चार, लाजबाब, लावलद.
पुढील विशेषणें लागून तत्पुरुष समासाचीं विशेषणें होतात.

( १ ) **ज़मा**;- खज़ाने‑ज़मा, पोतेज़मा, सर्कारज़मा.

( २ ) **तरीक** ( = दाखल );- तोफातरीक, नज़राणातरीक, सलाहतरीक.

( ३ ) **दाखल**:- कैद‑दाखल, खज़ाने‑दाखल, खेमेदाखल, डेरे‑दाखल हवेली‑दाखल

( ४ ) (पूर ∠ पुर् = पूर्ण ):– अकलपूर, खज़ानेपूर, पैकेपूर.

( ५ ) बन्द:– कलम्बन्द, किल्लेबन्द, जीन-बन्द, दस्तबन्द वगैरे.

( ६ ) वज़ा ( = रितीची, तुल्य ) :– काडीवज़ा.

( ७ ) लायक :–इज्जत लायक, खात्रीलायक, तारीफलायक, तोफा-लायक.

११ गैर व ना हे उपसर्ग लागून नञ् तत्पुरुषाचीं सामासिक विशेषणें होतात–

( १ ) गैर्–अमली, गैर्–कबजी, गैर्–कौली, गैर्–चाकर, गैरज़म, गैर्–बर्दार, गैर्–मन्जूर, गैर्–माहीत, गैर्– माकूल, गैर्– मोसमी, गैर्–वाजवी, गैर्–सनदी, गैर्–हद्दगामी, गैर्–हज़र, गैर्–हिशेबी, गैर्–हुशार.

( २ ) ना–कबूल, ना– खूश, नादुरुस्त, नापसन्त, ना–पाक, ना–वालीक, नामुनासब वगैरे.

१२ सामासिक नामें पुढीलप्रमाणें सिद्ध होतात.

( १ ) द्विरुक्तीनें होणाऱ्या समाहार द्वन्द्वांचीं उदाहरणें:– अबरचबर, अलाबला, अवाई–तवाई, अमन–चमन, बाकी–साकी, बारीक–सारीक.

( २ ) ज्या समासांत दुसरें पद हें पहिल्या पदाचें अनेक वचनाचें रूप असतें अशा इतरेतर द्वन्द्वाचीं उदाहरणें:–अमीर–उमराव,कान–काननात, खत–खतूत, खबर–अख्बार, गरीब–गुरीब ∠ गरीब–गुरबा, जिन्नस–अज्नास, फकीर–फुकरा, सनद्–अस्नाद्,हद्द–हदूद, हाल–अहवाल,हाल–हवाल, हुकूम–अहकाम.

( ३ ) समानार्थक दोन शब्दांचा समास केल्याचीं उदाहरणें अगणित आहेत. त्याचे तीन वर्ग पडतात.

(अ) ज्यांत दोन्ही पदें फार्शी किंवा अरबी आहेत: अक्कल–हुशारी, आलम–दुनिया, कर्ज्–वाम, कस्त–मशागत, खलक–दुनिया, खुशी–रज़ामन्दी, गिल्ला–शिक्वा, जुलूम–ज़बरी, छान–छोक, डाव–पेच्, हिल्ला–हर्कत वगैरे.

(आ) ज्यांत दुसरें पद मराठी आहे:– अक्कल–बुद्धी, अम्मल–बजावणी, इमान–प्रमाण, कज्जा–कटकट, कागद्–पत्र, कोल–बोल, खबर–बात, खर्च–वेंच्, खेश–सोयरे, चीज्–वस्त, दारू–फुलसरा, बाज़ार–हाट, मामूल–वहिवाट, मेवा–मिठाई, रङ्ग–ढङ्ग वगैरे.

( इ ) ज्यांत पहिलें पद मराठी आहे:–कावा–दावा, चूक–गलत, जीव–जान, दङ्गा–मस्ती, दाब–रुबाब, दाम–दिरम, थट्टा–मस्करी, धन–दौलत, धरबन्द, न्याय–दाद्, न्याय–मन्सुबी, नांव–किताबती, पीळ–पेच्, बळ–ज़ोरी, मान–मरातब, रीत–रिवाज् वगैरे.

४ मूळ फार्शींत उ या उभयान्वयी अव्ययानें जोडले गेलेल्या शब्दांतून ते मराठींत येतांना मधील अव्यय गळतें; व या समासाचा अर्थ अधिक व्यापक असतो.

(अ) अहाली-मवाली, आब-हवा, आमद्रफ्त, कार्भार, खरेदी-फरोक्ती, छानछोक, जफ्त-रफ्त, जाब्साल, नान्-कुराण, रद्-बदल वगैरे.

(आ) याच धर्तीवर मराठींत पुढील सामासिक शब्द बनविले गेलेले आहेतः- अत्तर-गुलाब, अलङ्ग-नौबत, अस्मानी-सुल्तानी; उजू-तवाजू, गरिबी-हरिफी, गोर-कफन, जमा-खर्च, तवा-तोबा, तोक-जञ्जीर, रङ्ग-बहार, नाल्मेख, बाप-जादे, हाली माजी वगैरे.

५ नामाची द्विरुक्ती होऊन मध्यें आ येऊन झालेले समासः- सम्शेरा-सम्शेर पैगामा-पैगामी वगैरे.

६ गैर, ना, व बे हे उपसर्ग लागून नञ्तत्पुरुष सामासिक नामें सिद्ध होतात.

( अ ) गैर्-अब्रू, गैर्-इतबार, गैर्-किफायत, गैर्नफा, गैर्-फायदा, गैर्-मर्जी, गैर्-मेहनत, गैर्-मेहेर्बानी, गैर्-मोसम, गैर्-रहा, गैर्-राबता, गैर्-वाका, गैर्-हङ्गाम, गैर्-हजिरी, गैर्-हुर्मत.

(आ) ना-इत्त्यफाक, ना-इलाज, ना-उमेद, ना-कुवत, ना-तवानगी, ना-दौलत्खाई, ना-मर्दुमी, ना-माफकत, ना-मेहेर्बानी, ना-रजावन्ती.

( इ ) बे-अक्कल, बे-अब्रू, बे-आब, बे-इज्जत, बे-इतबार, बे-इलाज, बे-कानू, बे-किलाफ, बे-खातरी, बे-जाबता, बे-तर्तूद, बे-दस्तूर, बे-दाद, बे-दावा, बे-दुवा, बे-निगा, बे-बर्कत, बे-बाकी, बे-बुनियाद बे-मुन्सफी, बे-मोहर, बे-वक्त, बे-शिरस्ता, बे-शिस्त, बे-हङ्गाम, बे-हिक्मत, बे-हिम्मत, बे-हिशेब, बे-हुर्मत.

६ ऐन, नव, नेक, बद हीं विशेषणें लागून समास सिद्ध होतात.

( अ ) ऐन्-खर्च, ऐन्-जमा, ऐन्-ज्वानी, ऐन्-हङ्गाम इत्यादि.

(आ) नव्-कीर्द, नव्-खरीद, नव्-जवान, नव्-निघादास्त.

( इ ) नेक्-नजर, नेक्-नियत, नेक्-सल्ला.

( उ ) बद्-अमल, बद्-नक्श, बद्-नजर, बद्-नाम, बद्-नियत, बद्-फैल, बद्-मामला, बद्-रम्ता, बद्-रहा, बद्-वक्त, बद्-सलूक.

असो; इथें हें पाण्डित्य सम्पलें, आणि अगदीं खासगी विचार मनांत येऊं लागले आहेत. फार्शीचा मराठीवर काय संस्कार झाला याचा पुढें अभ्यास करावयाचा। असा हेतू मनांत धरून १९१५ सालीं फार्शीचा काळजीपूर्वक अभ्यास सुरू केला सुमारें ४॥-५ वर्षापूर्वीं कोशाचें काम सुरू होऊन आजमितीस कोश छापूनही झालेलाच आहे; आणि प्रस्तावनेचा शेवटील मज्कूर आज छापखान्यांत जाईल. दहा-

वर्षांपूर्वीचा हेतू सिद्धीस गेलेला पाहून आनन्द वाटतो तर इतकीं वर्षे ज्या कामाशीं निकट सम्बन्ध तें दूर होतें हें पाहून सुनेपणाही हृदयास व्यापीत आहे. दुसऱ्याकडून पुस्तकें आणून उतारे लिहून काढण्यापासून ते शेवटील छापीव खर्डे तपासून छापण्याचा हुकूम देण्यापर्यंत सर्व काम एकट्याच्या हातून झालें असल्यामुळें चुका राहून गेलेल्या आहेत. वाचक झाल्या कामगिरीचा स्वीकार, सहानुभूतिपूर्वक चुका दाखवून करितील अशी मला आशा आहे. भारतइतिहाससंशोधकमण्डळानें पुस्तक छापवून प्रसिद्ध करण्याची आर्थिक जबाबदारी घेतली नसती तर पुस्तक आणखी किती वर्षे पडून राहिलें असतें कुणास माहीत ! त्या मण्डळानें एक प्रकारें माझ्या कृतीचें चीज करून मला ऋणी करून ठेविलें आहे. त्यासाठीं मण्डळाचे व आस्थापूर्वक छपाईचें काम केल्याबद्दल आर्यभूषण छापखान्याचे आभार मानून व असेंच माझ्या हातून ईश्वरानें व महाराष्ट्रानें दुसरें कांहीं तरी काम करवून घ्यावें अशी ईश्वराची प्रार्थना करून ही प्रस्तावना मी सम्पवितों.

शुक्रवार ता० १२ जून १९२५
न्यू इङ्ग्लिश स्कूल छात्रालय, शनिवार पुणें

माधव त्रिं. पटवर्धन

# संक्षेपचिन्हांचें स्पष्टीकरण.

| | |
|---|---|
| अ० | अरबी |
| अ | अहवाल |
| आयाह | आङ्ग्रे यांची हकीगत |
| इम | इतिहास–मञ्जरी |
| इऐ | इतिहास व ऐतिहासिक |
| इपुस्त्रिपो | इतिहास प्रसिद्ध पुरुष व स्त्रिया यांचे पोवाडे |
| ऐकिप्र | ऐतिहासिक किरकोळ प्रकरणें |
| ऐच | ऐतिहासिक चर्चा |
| ऐटि | ऐतिहासिक टिपणें |
| ऐस्फुले | ऐतिहासिक स्फूट लेख |
| काप्रइसा | कायस्थ प्रभूंच्या इतिहासाचीं साधनें |
| खरे | ऐतिहासिक–लेख–सङ्ग्रह |
| खलप | खर्ड्यांच्या लढाईचा पत्र-व्यवहार |
| खस्वाब | खर्ड्यांच्या स्वारीची बखर |
| गांवगाडा | गांवगाडा |
| गोइसा | गोमांतकाच्या इतिहासाचीं साधनें. |
| गोखचिशाब | गो. खं. चिटणीस यांची शाहू महाराजांची बखर |
| चन्द्रचूड | चन्द्रचूड–दप्तर |
| चसवृ | चतुर्थ संमेलनवृत्त |
| चित्रगुप्त | चित्रगुप्ताची बखर |
| चिरा | चिनापट्टण येथील राजकारणें |
| जुऐगो | जुन्या ऐतिहासिक गोष्टी |
| जुले | जुने लेख |
| जोरा | जोधपूर येथील राजकारणें |
| तृसवृ | तृतीय सम्मेलन–वृत्त |
| तरा | तञ्जावरचें राजघराणें |
| तु० | तुर्की |
| द्विसवृ | द्वितीय सम्मेलन–वृत्त |
| दिमरा | दिल्ली येथील मराठ्यांचीं राजकारणें |
| न० | नपुंसकलिङ्गी |
| प्रसवृ | प्रथम सम्मेलन–वृत्त |
| पद्मव | परकीय दर्बारीं मराठ्यांचे वकील |
| पाब | पानपतची बखर |
| पु० | पुल्लिङ्गी |
| पेअ | पेश्वाईची अखेर |
| पेद्समा | पेश्वे दर्बारांतील सनदा माहिती |
| फा० | फार्शी |
| ब्रच | ब्रह्मेन्द्र स्वामीचें चरित्र |
| ब्रप | ब्रह्मेन्द्र स्वामी–पत्र व्यवहार |
| भाइसम | भारत–इतिहास–संशोधक मण्डळ |
| भाऐपयाव | भारतवर्ष–पत्रें यादी वगैरे |
| भाके | भाऊसाहेबांची कैफियत |
| भा–जुऐगो | भारतवर्ष–जुन्या ऐतिहासिक गोष्टी |
| भाब | भाऊसाहेबांची बखर |
| भोंकु | भोंसल्यांचे कुलाचार |
| मद्बा | महेश्वर दर्बारचीं बातमीपत्रें |
| मदरु | मराठी दप्तर रुमाल |
| मब | महिकावतीची बखर |
| ममब | महाराष्ट्रमण्डळाची बखर |
| मराआ | मराठ्यांची राजनीति-आज्ञा-पत्र |

| | | | |
|---|---|---|---|
| **मराचिथोरा** | म. रा. चिटणीसकृत थोरले राजाराम महाराज | वाड–मा | वाड–माधवराव |
| | | वाड–शाछ | वाड–शाहु छत्रपती |
| **मराचि थोशा** | ,, थोरले शाहू महाराज | वाड–समा | वाड–सवाई माधवराव |
| **मराचि धाशा** | ,, धाकटे शाहू महाराज | साशिच | सप्त प्रकरणात्मक शिवचरित्र |
| **मराचिरा** | ,, राजाराम महाराज | ससवृ | सप्तम– सम्मेलन–वृत्त |
| **मराचिस** | ,, सम्भाजी महाराज | सासइ | सांवतवाडी संस्थानचा इतिहास |
| **माप्र** | माझा प्रवास | | |
| **राजवाडे** | मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें | हब | हरिवंशाची बखर |
| | | हिब | हिम्मत बहाद्दर |
| | | | होळकरांची कैफियत |
| **रापुपो** | राजकीय पुरुषांचे पोवाडे | | |
| **वाड–बाबा** | वाड–बाळाजी बाजीराव | होपो | होळकरशाहींतील पोवाडे |

# फार्शी-मराठी कोश



## अ

**अईन; आईन** ( स्त्री० ) [ फा० आयीन् ] चाल, रीत, नियम. "आईने अक्बरी"= अक्बराचा कायदा; अबुल्फज़्लनें लिहिलेल्या पुस्तकाचें नांव.

**अक्दस** [ अ० अक्दस् ] अत्यन्त पवित्र व पुण्यशील ( राजवाडे १५।३६४ ).

**अक्कल; अकल** ( स्त्री० ) [ अ० अक्ल् ] बुद्धी; शहाणपणा. "अकलेचा कान्दा, अकलेचा खन्दक" = अती शाहणा.

**अक्कल-बुद्धी** ( स्त्री० ) "अक्कल-बुद्धीनें" = विचारपूर्वक, शहाणपणानें ( राजवाडे ८।२२४ ).

**अक्कल-हुशारी** ( स्त्री० ) "अक्कल-हुशारीनें" = सावधान चित्तानें.

**अकल्मन्द** [ फा० अक्ल्मन्द् ] बुद्धिमान्, शाहणा.

**अकस** ( पु० स्त्री० ) [ अ० अक्स् ] वैर, द्वेवा. "लटकाच वस्वसा सखारामपन्ताचा मानितां, तिळमात्र तो तुम्हांशीं अकस करणार नाहीं" (खरे ११४३). "त्याची व यांचीं अकस होती" ( दिमरा १।११८ ). "सर्व सराफ अकसीनें फिरोन कजिया करितात" ( राजवाडे ११।६९ ).

**अकारीब** [अ० अकारिब्] जवळचे लोक; नातलग. "हुजूरचे अकारीब" ( राजवाडे १५।२५ ). "तुम्ही सर्व त्या प्रान्तींचे अकारीब ( = जाणते, भुमे ), जावें न जावें" ( राजवाडे ११२८१ ).

**अकीन** ( पु० ) [ अ० यकीन् ] दृढमत; खात्री.

**अख्त्यार** ( पु० ); **अख्त्यारी** ( स्त्री० ) [ अ० इख्तियार् ] अधिकार; सत्ता.

**अख्त्यारी** अधिकारी, मुख्त्यार.

**अख्बार** ( स्त्री० ) [ अ० अख्बार्, अनेक व० खबर्चें ] वर्तमान; बातमीपत्र; वर्तमानपत्रिका. "छ २० जिल्हेजीची अख्बार सर्कारांत आली जे" ( खरे ८।४२२७). "त्याणीं तिकडील अख्बार आणिली आहे" (राजवाडे १०।२७३).

**अख्बार-नवीस** ( पु० ) [ फा० अख्बार्-नविस् ] बातमीपत्र पाठविणारा; बातमीदार.

**अखेर; अखेरी** ( स्त्री० ) [ अ० आखिर् ] अन्त, शेवट; अन्तीं. साल-अखेर = वर्षाच्या शेवटीं. अखेरी मारणें, साधणें = सन्धी साधून शेवटीं यश सम्पादणें.

**अगर** [ फा० अगर् ] जर; अथवा; किंवा. "हे मुलकाची आब-हवा आम्हास रास्त नाहीं; अगर हुकूम होईल तर विलायतेस येऊं" ( पद्मव १०९ ).

**अङ्गुस्तान** ( न० ) [ फा० अङ्गुश्त्-दान् ] ( शिम्प्याचें ) बोट-टोपण.

**अङ्गूर** ( न० ) [ फा० अङ्गूर् ] द्राक्ष.

**अङ्गेज़** ( पु० ) **अङ्गेजणी; अङ्गेजी**

( स्त्री० ) [ फा० अङ्गेझ् आज्ञार्थीरूप अङ्गेख्तन् ( = उठावणी करणें ) चें ] उठावणी; पराक्रम; अङ्गीकार (?). "त्यावरून तुम्ही अङ्गेज् करून ... आङ्ग्रियाच्या मुलकांत स्वारी केली आहे" ( राजवाडे ८।१७८ ). "जनरलांनीं अङ्गेज् केला आहे; त्याची काळजी त्यांसच असावी" ( राजवाडे १२।९७ ).

**अज़** [ फा० अझ् ] पासून, मुळें.

**अज़-कदीम** पूर्वीपासून. " अज् कदीम इनायत असें " ( वाडमा १।६५ ).

**अज़-तरफ** [ फा० अझ्-तरफ़् ) बाजूनें, कडून.

**अज़-बायेस** [ अ० बाइस्=कारण ] कारणानें. "अज-बायेस बिमारी" = आजारामुळें ( पद्मव ११४ ).

**अज़-सबब** [ फा० अझ्-सबब् ] कारणानें. "अज-सबब दूरी राह"= रस्त्याच्या लाम्बीमुळें ( पद्मव ११२ ).

**अज्रा; अज्राहे** [ फा० अझ्-राह् ] रस्त्यानें. मार्गें; पूर्वक.

**अज्रा एख्लास** = स्नेहपूर्वक. "पारचे पाठविले असे; अज्रा एख्लास घेतला पाहिजे" ( राजवाडे १०।११८ ).

**अज्राहे खानगी** = घरोब्याचे रीतीनें. " आम्हांकडे अज्राहे खानगी साङ्गून पाठविलें होतें" ( राजवाडे ५।८५ ).

**अज्राहे दोस्ती** = मैत्रीपूर्वक. "परन्तु अज्राहे दोस्ती तुम्हांस गोश्गुज़ार करून ठेवतों हें निमित्य उलट येईल" ( राजवाडे ५।१६४ ).

**अज्रा मऱ्हामत** [ अ० मर्हमत् = कृपा; देणगी ] कृपेनें; कृपादत्त; बक्षीस. "हे वतन... यांस अज्रा मऱ्हामत वतन करून दिलें असें" ( राजवाडे ८।४७ ).

**अज्राहे मेहेर-बानगी** = कृपापूर्वक. "दरींविला छ० ७ जिल्कादचें खत अज्राहे मेहेर-बानगी पाठविलें तें पोंहचून खुशी हासल जाहली" ( राजवाडे १०।२१२ ).

**अज्राहे हरामजादगी** = बेइमानीनें. "तुम्ही अज्राह हरामजादगी स्वामींच्या पारपत्यकारांसीं रुजू न होऊन मोरोपन्तासी रुजू होतां" ( राजवाडे ११।४१ ).

**अज़्बाब; अस्बाब** (पु०) [ अ० अस्बाब् अनेक व० सबब्चें ] सामुग्री; सामान; सरन्जाम; चीजवस्त.

**अज़्मावणें** [ फा० आझ्मा आज्ञार्थीरूप आझ्मूदन्चें ] पारख करणें, कसोटीस लावणें.

**अज़्मास; अझास** ( पु० )[ फा० आझ्माइश् ] परीक्षा; अन्दाज़; अन्दाजपत्रक; बजेट; गणती ( चित्रगुप्त ८८ ); सुमार; ठोकळमान.

**अजब** [ अ० अजब् ] आश्चर्य; आश्चर्यकारक.

**अज़म** ( न० )[ अ० अअझम् ] सर्व श्रेष्ठ.

**अज़म** ( पु० ) [ अ० अझ्म् ] निश्चय; मोठेपणा; अभिमान. "ऐशा समयास नबाब मौसूफ यांनीं अज़म केल्यास पातशाही दाब व बहुत कामें घडून येतील " ( दिमरा १।४९ ). " यांस तर्वारीचा व जम्यतीचा अज़म " ( होकै ६ ).

**अजाईब; अजायब** ( न० ) [ अ० अजाइब् अनेक व. अजीब् चें ] अजब ताजूब. " तुम्ही ऐशा गोष्टी करितां अज्याईब् आहे " ( राजवाडे १।५२ ).

**अज़ात** [ फा० आझाद् ] मुक्त. "त्यांचें देहावसान जालें ते समयीं तुम्हांस माथां तेल घालून अज़ात केलें असें " ( वाडशाछ २१३ ).

**अज़ात-पत्र** ( न० ) मुक्ति-पत्र.

**अज़ान** ( स्त्री० ) [ अ० अज़ान् ] प्रार्थनेच्या वेळीं निमंत्रणादाखल होणारा पुकारा.

**अजायब-खाना** ( पु० ) [ फा० अजाइब्-खाना ] विचित्रवस्तुसङ्ग्रहालय.

**अजीं** [ फा० अज़्-ईन् ] यापासून; यापुढें. "अजींपासून कुसूर न कीजे" ( राजवाडे १ ।२४८ ).

**अजींबाद; अजीबात** [ फा० अज़ींबाद् ] यापुढें; यानन्तर; अगदीं; बिल्कूल. "अजीबात चेनापट्टणाकडे जाण्यास दिवसगत न लागावी; अर्सा (=अवधी) बहुत कमी राहिला" ( राजवाडे १०।१६७ ). "अजीबाद होईल तें नमूदास येईल" ( राजवाडे १०।१९३ ).

**अर्जी बायस** [ फा० अज़ीं बाइस् ] यांकरितां; म्हणून; लिहाज़ा. "अर्जी बायेस अर्ज ऐसा जे, साहेबानें फैज्-बक्षी करून ऊवकर ज़ाब पाठवावयाविशीं अहल्कारास आज्ञा सादर जाली पाहिजे" ( पदमव ११२ ).

**अर्जीं वास्ते** [ फा० अज़ीं वासिता ] याकरितां; म्हणून ( इम ६६ ).

**अर्जीं सबब** [ फा० अज़ीं सबब् ] याकरितां; म्हणून.

**अजीज़** [ अ० आजिज़् ] दीन; लीन. "सर्दार याणीं जाऊन इङ्ग्रजांस अजीज़ व ब-तङ्ग केले" ( राजवाडे १९।१०५ ).

**अजिजी** ( स्त्री० ) [ फा० आजिज़ी ] दीनता; लीनता; गयावया.

**अज़ुर्दगी; ऑज़ुर्दगी** ( स्त्री० ) [ फा० आज़ुर्दगी ] रुष्टपणा; रुसवा; बेदिली; नाराजी. "श्रीमन्त दादासाहेब यांजकडून सर्वांकडे अनुसन्धानें येतात; त्यास, या दिवसांत कोणाची अज़ुर्दगी नसावी" ( राजवाडे १०।६८ ). "येविषयीं बहुत आज़ुर्दगीनें बोलले" ( ऐटि १।७३ ).

**अज़ुर्दा; ऑज़ुर्दा** [ फा० आज़ुर्दा ] दुक्खी; श्रमी; रुष्ट.

**अज़ुर्देपणा** ( पु० ) आज़ुर्दगी ( मराचिथोशा ७८ ).

**अज़ुर्दार** ( पु० ) [ अ० उज्रा = मजुरी ] अमुक मुदतींत पत्र पोंहचविल्यास अमुक रुपये मिळतील अशा शर्तीवर ठेवलेला काशीद.

**अज़ुऱ्या** ( पु० ) अज़ुर्दार.

**अज़ुरा** ( पु० ) [ अ० उज्रा ] उर्फ वेतन; वेतन. "कासीद पाठवावा त्यासी अज़ुरा पोंहोंचत नाहीं" ( राजवाडे ८।२१२ ).

**अजून** [ फा० हनूज़् ] अद्यापी.

**अञ्जाम** ( पु० ) [फा० अञ्जाम् ] परिणाम; शेवट. "मर्जी हज्रतीची खूश राहिली म्हणजे कृतकृत्य; अञ्जाम कसा आहे इकडे कोणी पहात नाहीं" ( राजवाडे ५।१०४ ).

**अञ्जीर** ( पु० ) [ फा० अञ्जीर ] उम्बरासारखें परन्तु मधुर व स्वादिष्ट असें फळ.

**अञ्जुमन** ( स्त्री० ) [ फा० अञ्जुमन् ] सभा.

**अत्तर** ( न० ) [ अ० इत्र् ] पुष्पगन्धार्क.

**अत्तर-गुलाब** ( पु० ) बैठक बर्खास्त होण्यापूर्वीं सभासदांस पान, अत्तर व गुलाबपाणी देण्याचा विधी.

**अत्तर-दाणी** ( स्त्री० ) [ फा० इत्र्-दान् ] अत्तर वांटण्याचे वेळीं तें ठेवण्याचा

एका तबकडीच्या मध्यभागीं बसविलेला चिमुकला पेला.

**अत्तारी** ( पु० ) सुगन्धी.

**अत्राफ** [ अ० अत्राफ् ] जवळचे नातलग. "वरकडही अत्राफ सिलेदार वगैरे लोकांस याचप्रमाणें ताकीद आहे" ( राजवाडे ७।५४ ).

**अत्लस** [ अ० अत्लस् ] काळसर लाल साटीण. "अत्लस हात चौदा" ( राजवाडे ३।१९ ).

**अदूना** [ अ० अदूना ] नीचतम; कनिष्ठ. "प्रस्तुतचा रङ्ग तर असा दिसतो जे आला व अदूना खाविन्दापाशीं बराबर" ( राजवाडे ५।९ ).

**अदब** ( स्त्री० ) [ अ० अदब् ] विनय; नम्रता; सन्मान; प्रतिष्ठा. अदब करणें, बजावणें = छातीवर हात एकावर एक आडवे ठेऊन नम्रतापूर्वक उभें राहणें,-ची अदब राखणें, चालविणें = सन्मान ठेवणें ( सभासद ३७; चित्रगुप्त ५७ ).

**अदब-शीर** अदब करून; नम्रतापूर्वक.

**अदा** [ अ० अदा ] फेड "आम्ही आपला आमील ठेऊन तुमचा पैका अदा करून देऊं" ( दिमरा १।२१४ ).

**अन्दाज** ( पु० ) [ फा० अन्दाझ ] प्रमाण कयास; तर्क; हेतू.-अन्दाज ( =टाकणारा )-प्रत्यय. उदाहरणार्थ तिरन्दाज, गोलन्दाज.

**अन्देशा** ( पु० ) [ फा० अन्देशा ] विचार; कल्पना; संशय; काळजी; भीती.

**अनात; अनाथ** ( स्त्री० ) [ अ० इनायत् ] कृपा; रयात; मेहेरबानी; खैर. अनाथ करणें=कृपा करणें ( सभासद १९,५० ). अनाथ ( =कृपापूर्वक ) (सभासद १९).

**अनामत** ( स्त्री० ) [ अ० अमानत् ] विश्वासानें दुसऱ्याजवळ सुरक्षित ठेवलेली ठेव.

**अनार** ( न० ) [ फा०अनार ] डाळींब. "विलायती अनारें या दिवसांत तेथवर गर्मीमुळें न पावतील" ( दिमरा १।३३ ).

**अनीन** ( स्त्री० ) [ अ० इनान् ] लगाम. "एकदांच घोड्यांच्या अनिना उठवून मोहळाच्या माशा उडतात त्याप्रमाणें सर्वत्रांनीं उडी घातली" ( पाब ४५ ).

**अप्तर** [ फा० अब्तर् ] दोषयुक्त; बिघडलेलें. "तितका बयान श्रीमन्तांस लिहिला असता तर बाजी अप्तर होती" ( राजवाडे ५।१६६ ). "श्रेष्ट स्थलचे नृपास पैत्य भ्रमाचा उपद्रव फार जाहला होता; सबब पांच महिने काम अप्तर जाहलें" ( राजवाडे १०।२८० ).

**अप्तरी** ( स्त्री० ) बिघाड; नुक्सान. "यांत कांहीं विपरीत दिसल्यानें, अधिक सावधगिरी जाली म्हणजे गोष्ट बहकण्यांत येऊन अफ्तरी होईल" ( राजवाडे ७ खलप २।३१६ ).

**अफ्ताब** ( पु० ) ( फा० आफताब् ] सूर्य. "अफ्ताब अस्तास कां जात नाहीं ?" ( मराचिधाशा ६१ ).

**अफ्लाद; अफ्वाद; अहफाद** [ अ० अह्फाद् ] मुलीची प्रजा. "अव्लाद-अफ्वाद ( =वंशपरम्परा ) देविले असे" ( राजवाडे १५।१५९ ). "ब-औलाद व अहफाद चालविजे" ( राजवाडे २०।१४१ ).

**अफ्सोस** ( पु० ) [ फा० अफ्सोस् ] शोक; हाय हाय ! "नवाबांनीं ऐकोन बहुत अफ्सोस केला" ( राजवाडे ७।१४२).

**अफ्वा; अफवा** ( स्त्री० ) [ अ० अफ्वाह्) कण्डी; भुमका; आवई.

**अफ्वाई; अफवाई** [ फा० अफ्वाही ] उडत उडत आलेली. " अफ्वाई गोष्टी-वर मदार नाही " (राजवाडे ५।२९ ).

**अफरा-तफ्रीक; अफरा-तफरा** [ अ० तफ्रीक्=फूट-फाट ] विकीर्ण; परागन्दा; बे-पत्ता; नष्ट. "हिन्दू माणूस होते ते ही अफरा-तफरा जाह्ले " ( राजवाडे १०।२९८ ). " असल तहनामे विठ्ठल सुन्दर यांचे गारतीचे वेळेस अफरा-तफ्रीक जाले " ( राजवाडे ७।२२३ ).

**अफरा-तफर** ( स्त्री० ) लबाडीनें केलेला अपहार. " किल्ल्यावर लोकांचा ऐवज नक्त वगैरे असेल त्याची अफरा-तफर होऊं न देता जप्त करून ठेवणें" ( वाड-समा ३।६५ ).

**अफीण; अफीम; अफू** ( स्त्री० ) [ फा० अफ्यून् ] खसखशीच्या बोण्डांतला वाळविलेला मादक चीक.

**अब्लक; अब्लख** [ अ० अब्लक् ] काळे व पाण्ढरे ठिपके असलेला ( घोडा ).

**अबर-चबर** ( न० ) [ ८ फा० चर्ब् ] रोजच्या जेवण्याव्यतिरिक्त तेलकट तळीव पदार्थ.

**अबद-पैवन्द** [ फा० अबद्-पैवन्द् ] शाश्वत. " दौलत अबद-पैवन्द " ( राजवाडे २०।२८६ ).

**अबाजा** ( पु० ) [ अ० इझाफा ] सम्बन्ध; तालूक. " नवी जिकीर करून मठा-नजीक माती खणावया तुमचे काय काय अबाजा आहे ? " ( राजवाडे १५।१५९ ).

**अबीर** ( पु० ) [ अ० अबीर् ] एक सुगन्धी मिश्रण.

**अम्बार; अम्बर** ( न० ) [ फा० अम्बार् ] सामुग्री; धान्यसामुग्री.

**अम्बार-खाना** ( पु० ) कोठार.

**अम्बारी** ( स्त्री० ) [ अ० इमारी ] हत्ती-वरचें सछत्र आसन.

**अम्बीर** ( पु० )[अ० अमीर्] थोर सर्दार.

**अम्मल; अमल** ( पु० ) [ अ० अमल् ] कार्य; गुङ्गी; वेळ. " पुढें अमलांत येईल ते मागाहून विनन्ती लिहूं " ( दिमरा ११३७ ). "साखरा वांटून दीड प्रहरचे अमलांत तोफांचे बार पांच करविले " ( खरे ११।५६९६ ).

**अमल-कलम** ( न० ) क्रिया-लेख. " बोलण्यांत गोष्टी आल्या असतील, परन्तु दस्तैवज अथवा वचनशपथ-क्रिया अमल-कलम असें कांहीं झालें नाहीं " ( राजवाडे ५।१५ ).

**अमला** [ अ० अमला अनेक व० आमिल् चें ] कार्कून. " तालुक्यांस अमला योजून बन्दोबस्त पक्का करावा " ( राजवाडे ७।४५ ).

**अमला-फैला** [ अ० अमला-फअला ] कार्कून-कामकरी; पाण्ढरपेशे व इतर लोक. अम्मल-फैल ; ताबा. " दिल्ली-तीलही अमला-फैला पळावयाचा इरादा करीत आहेत" ( राजवाडे १०।३४७). " अमला-फैला" (=ताबा ) (होके ६).

**अमली** कबजी; सर्कार-ताब्यांतील; कैफी; मादक. " हिन्दुस्थान गुजराथ-पर्यन्तचा मुलूख अगदीं अमली आहे; आम्ही वाटेनें काय खावें ? ( खरे ११७९)

**अम्मल्दार; अमल्दार** ( पु० ) [ फा० अमल्दार् ] अधिकारी; अमील.

**अम्मल्दारी; अमल्दारी** ( स्त्री० [ फा० अमल्दारी ] अधिकार; अमीली.

**अमदानी** ( स्त्री० ) [ फा० आमद्नी ] आवक; भरभराट.

**अमन-चैन; अमन-चमन** ( स्त्री० )

[ अ० अम्न्=शान्ती; सुरक्षितपणा ] शान्ति-समृद्धी; मौज.

**अम्मा; अमा** [ अ० अम्मा ] पण; लेकीन.

**अमानत** ( स्त्री० ) [ अ० अमानत् ] ठेव; जप्त; सर्कार-जमा: "कृष्णमाची अमानत-साहुकार वगैरे जेथें जेथें जसी त्याचाही शोध करून तगादा होत आहे" ( राजवाडे ७।१२९ ). "जयदेवरायास हरामखोरी लावून देशमुखी अमानत केली" ( इम ३३ ).

**अमानत-दार** (पु०) [ अमानत्दार् ] ठेव सुरक्षित ठेवणारा; ट्रस्टी; अमीन.

**अमानत-नामा** ( पु० ) ठेवपत्र.

**अमानी** ( स्त्री० ) [ अ० अमानी ] गैर-इजारा; गैर-मक्तेमिरी; रयत्वारी. "तालुक्यावर तादूद केलें तें मोडावें आणि अमानी करावी" ( राजवाडे ५।२३ ).

**अमारत-पन्हा** [ अ० इमारत्पनाह् ] अमीर; एक पद्वी ( राजवाडे ३।५५ ).

**अमा-सुस्त** [ फा० आम्-सुस्त् ] सर्वस्वी थण्ड; आळशी. "मोगलाई कार्भार-अमासुस्त" ( राजवाडे ११।४७ ).

**अमीन** ( पु० ) [ अ० अमीन् ] विश्वासूक ( मराआ २९ ); ट्रस्टी; अमानत-दार. "वारीस्दार समयीं हजर नसेल तर ती जिनगी अमीन याचे ताब्यांत देऊन त्या जिनगीचा तपशील हुजूर सर्कारांत कोत्वालानें करीत जावा" ( ऐस्फुले ५८ ).

**अमील; आमील** ( पु० ) [ अ० आमिल् ] कार्यकारी; अधिकारी. "अमिलानी हाल व इस्तक्बाल" = आजचे व भावी अधिकारी ( राजवाडे ८।६७ ). "आम्ही आपला आमील ठेऊन तुमचा पैका अदा करून देऊं" ( दिमरा १।२१४ ).

**अमिली** ( स्त्री० ) [ फा० आमिली ] अमिलाचें काम. "यांचे अमिलीचे कारस्तानाचा बयान केल्यावरून" ( राजवाडे ७।४५ ).

**अमीर** ( पु० ) [ अ० अमीर ] आज्ञा करणारा; अधिकारी; सर्दार.

**अमीर-उमराव** [ अ० उमरा अनेक व० अमीरचें ] सर्दार-वर्ग.

**अमीरुल्-उमराव** बडा सर्दार; एक पद्वी.

**अयब** ( पु० ) [ अ० ऐब् ] व्यङ्ग; न्यून; दोष. "नाहीतर शरकती ( = शरीक, मदत्नीस ) आहेत म्हणून कमती सरन्जामाची होती तर इङ्ग्रजांचे जवामर्दीस अयब लागता" ( खरे८।४३५४ ).

**अयश** ( पु० ) [ अ० ऐश् ] चैन. "पातशाहा बदस्तूर दिल्लींत अयश करून आहेत" ( दिमरा १।९१ ).

**अयाळ; आयाळ** ( स्त्री० ) [ फा० याल् ] मानेवरचे अगर मानेभोंवतीचे शोभिवन्त केस.

**अर्कानी दौलतानी** [ फा० अर्कानि दौलत् ] राज्याचे खांब ( इम २३६ )

**अर्ज** ( पु० ) **अर्जी** ( स्त्री० ) [ अ० अर्ज़् ] निवेदन; विज्ञप्तिपत्र.

**अर्ज-दार** ( पु० ) विज्ञप्ती करणारा; याचक.

**अर्जदास्त** ( स्त्री० ) [ फा० अर्ज़्-दाश्त् ] विज्ञप्ति पत्रिका; विनन्ती.

**अर्जबाब** ( स्त्री० ) "तैनाती शिवाय कारणपरत्वें श्राद्धपक्षास किंवा लग्नकार्यास वगैरे सर्कारांतून बक्षीस देत असत त्यास अर्जबाब असें म्हणत असत" ( ऐस्फुले ७३ ).

**अर्ज-बेगी** ( पु० ) [ तु० अर्ज़्-बेगी ] लोकांचे अर्ज हुजूरास सादर करणारा.

**अर्जी-इलतमास** ( स्त्री० ) [ अ० इल्तिमास् ] विनन्ती. "नबाब व राजेबहादुर

यांस माघारे फिरल्यावरी अर्जी-इल्तमास लिहावी कीं" ( खरे २।४७९ ).

**अर्ज़ेल** [ अ० अर्ज़ल् ] नीच, अप्रसिद्ध, गैर-नामी. "सत्तावीस सर्दार नामी मारिले; दीडशें सर्दार अर्ज़ेल जखमी केला" ( जोरा ९० ).

**अर्क** ( पु० ) [ अ० अरक् ] निष्कर्ष.

**अर्क** ( पु० ) [ फा० अर्ग् ] पोटकिल्ला. "याखेरीज येथें किल्ले अर्कांत तोफा पांच सात आहेत" ( राजवाडे ३।१८ ). "श्रीकाशीविश्वेश्वराचें दर्शन घेऊन अर्क किल्ल्यांत आले" ( हम १० ).

**अर्कस ; अर्कशी** ( स्त्री० ) [ फा० अर्राकश् कर्वतणारा < फा० अर्रा=कर्वत ] कर्वत.

**अर्कशी** ( पु० ) कर्वतीनें मोठ्या लाकडाच्या फळ्या करणारा.

**अर्ज़ानी** [ फा० अर्ज़ानी ] दत्त; प्राप्त. "हाली साहेबासी मुकासा अर्ज़ानी जाला आहे" ( इम ४४ ).

**अर्बा** [ अ० अर्बअ ] चार.

**अर्बा-अशर** [ अ० अर्बअ-अशर् ] चौदा.

**अर्बा-मय्या** [ अ० अर्बअ-मिआ ] चारशें.

**अर्बैन** [ अ० अर्बईन् ] चाळीस.

**अर्सा** ( पु० ) [ अ० अर्सा-मैदान, वाव ] अवधी. "अजीबात चेनापट्टणाकडे जाण्यास दिवस गत न लागावी; अर्सा बहुत कमी राहिला" ( राजवाडे १०। १६७ ). "लाड कारण वालीस सर्हद्देस दाखल होण्यास अर्सा फार थोडा ( खरे ८।४४३४ ). "तुम्हांस दोन तीन दिवसांचे अर्शांत रवाना करितों" ( राजवाडे ५।१८५ ).

**अराबा** ( पु० ) [ अ० अराबा, तोफेचा गाडा ] बातेरी; तोफांचा मारा. "इङ्ग्रजांचा अराबा पिऊन फौजा आंत-घुसल्या" ( राजवाडे १९।६३ ).

**अल्काब** ( पु० ) [ अ० अल्काब अनेक व० लकब् चें ] मायना; पद्व्यांची मालिका. "हलका अल्काब लिहिलिया मुळें विषम मानितात ( दिमरा ११७ ).

**अल्बत्; अल्बता** [ अ० अल्बत्ता ] बेशक; निश्चित; खास. "अल्बता येणें; कांहीं मुलाहिज़ा न करणें" ( राजवाडे १७।७ )

**अल्बिदा** [ अ० अल् विदाअ =पाठवणूक ] ताबूत बुडविल्यानन्तर या शब्दाचा उच्चार करितात. त्याचा अर्थ 'अखेरचा सलाम' असा होतो.

**अलफ; अलफ** [ अ० अल्फ् ] हजार.

**अल्ला** ( पु० ) [ अ० अल्लाह् ] ईश्वर; खुदा. अल्लाची गाय=अत्यन्त गरीब व निरुपद्रवी माणूस. अल्लाहो अक्बर! [ अ० अल्लाहु अक्बर् ] ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे.

**अलङ्ग** [ फा० अलङ्ग् ] संरक्षक भिन्त बाहेर कोट. "इकडील अलङ्ग फोडून पलीकडील सफेल फोडून गोळा फार झाला" ( होकें २० )

**अलङ्ग-नौबत** ( स्त्री० ) [ अ० अलम् = निशाण + अ० नौबत् =डङ्का ] पाहरा; डङ्का-निशाण; "ठाणाचे चाकरी अलङ्ग-नौबत करून असणें."

**अलल्-हिशेबी** [ अ० अलल्-हिसाब् ] हिशेबी. "अलल् हिशेबी वसूल" ( राजवाडे २२।७३ ).

**अला-बला; अलाय-बलाय** ( स्त्री० ) [ अ० बला=सङ्कट ] सङ्कट, इडा-पिडा; दृष्ट काढणें. "मातुश्रींनीं अलाय-बलाय घेऊन मस्तकीं विजयहस्त ठेवला" ( चित्रगुप्त ११ ).

**अलाहिदा; अलादा** [ अ० अलाहिद्दा ] पृथक्; विभक्त; निराळें; अप्रस्तुत.

" सदाशिव रड्डी याजपासून अलाहिदा होऊन पिम्पळनेरीं राहिला " ( राजवाडे ५।१९९ ). " वराता तीन अलादा अलादा सावकाराचे नांवें होत्या " ( मद्बा २।३४ ). " ते बाबत अलाहिदा- बि- अलाहिदा " = अगदींच निराळी ( राजवाडे ५।१७५ ).

***अलैकुम-सलाम*** [ *अ० अलैकुम्-अस्सलाम्* ] तुम्हांला सुखशान्ती लाभो ! भेटतांना वन्दन करीत म्हणावयाचा मन्त्र.

**अव्कात** औकात पहा.

**अव्ज़ार** औजार पहा.

**अव्वल-अवल** [ अ० अव्वल् ] प्रथम; प्रथमतः " अव्वली पासून जातीनें मन्सुब्यास धक्का कोठेंही बसला नव्हता " ( होकै ६ ).

**अव्लाद-औलाद** ( स्त्री० ) [ अ० अव्लाद् अनेक व० वलद् ( = पुत्र ) चें ] प्रजा; कुळी.

**अव्लाद-अफ्लाद** [ ८ अ० अहू फाद्=नातवण्डें ] वंशपरम्परा; पुस्तदर-पुस्त. " लेकराचे लेकरीं अव्लाद्-अफ्लाद् तुवां खाणें " ( राजवाडे ८।२६ ).

**अव्लिया-औलिया** ( पु० ) [ अ० अव्लिया अनेक व० वली चें ] साधू.

**अवाई-तवाई** ( स्त्री० )[ फा० तबाही= नाश ] सङ्कट. "अवाईतवाई शिपाई लोकांवरी येऊन पडतच आहे" ( खरे ७।३२४६ ).

**अश्रफ** [ अ० अश्रफ् ] अत्यन्त अभिजात.

**अश्रफी** ( स्त्री० ) [ फा० अश्रफी ] एक सोन्याचें नाणें.

**अश्राफ** [ अ० अश्राफ् अनेक व० शरीफ् चें ] अभिजात; सविनय; सभ्य; गरीब.

**अशर** [ अ० अशर् ] दहा.

**अशरीन** [ अ० इश्रीन् ] वीस.

**अशीर; असीर** [ अ० असीर् ] बन्दीवान्. " इङ्ग्रजाकडील हमीष्टवीन... असीर जाहले आहेत, त्यांस सोडून द्यावें " ( राजवाडे १०।१८२ ).

**अशील** [ अ० असील् ८ अ० अस्ल् ] अभिजात, खासा; *मानकरीण; दासी.* *" असीलास पाठऊन घटके घटकेचे* वर्तमान आणवितात " ( राजवाडे ७।११२ ). नबाबांनीं चम्पा असील नेहमीं मियापासीं जवळ बैसवून हकीमाकडून दवा देवितात " ( राजवाडे ७।१९१ ).

**अस्करा-अस्कारा** (पु०)[फा० आश्कारा] प्रसिद्धी; किर्ती; लौकीक; नक्ष; नक्षा. " सकळ सुरुप मण्डळींत माझ्या स्वरुपाचा अस्करा " ( प्रभाकर लावण्या १६१ )

**अस्तर** ( न० ) [ फा० आस्तर् ] अङ्गरख्याला आंतून लाविलेलें पातळ भरड कापड.

**अस्तर-गिरी** ( स्त्री० ) चुन्याचें लिम्पण. " शिखरास अस्तर्गिरी होत आहे " ( राजवाडे १०।५ ).

**अस्तनी** ( स्त्री० ) [ फा० आस्तीन् ] बाही; बाहीचा कोंपरापासून पुढील भाग. अस्तन्या वर सारणें = युद्धास सज्ज होणें. अस्तनींतील अग्नी=गृहकली गृहकलह.

**अस्पस्वार** [ फा० अस्प् = घोडा ] घोडेस्वार ( राजवाडे २०।१६२ ).

**अस्बाब** ( पु० ) [ अ० अस्बाब ] सामुग्री; सामान. " जो आम्हापाशीं अस्बाब आहे तो हज्तचे रुपेचा आहे. हा घेऊन फौजेचे खर्चांत आणावा ! " ( दिमरा १।२१२ ). " चायकापोरें

आणि अस्बाब कोठें ठेवावा ! " ( राजवाडे ७।१५३ ).

**अस्मत-पन्हा** [ अ० इस्मत् = शुद्धता ] शुद्ध; पवित्र.

**अस्मान** ( न० )[ फा० आस्मान् ] आकाश. " नजर अस्मानास गेली " ( खरे ६।२७६४ ) = महत्त्वाकाङ्क्षा आकाशास भिडली. " अस्मानीं फत्तेची ध्वजा लागली" ( चित्रगुप्त ३३ ).

**अस्मान-ज़मिनींची तफावत** = महद्न्तर. " त्या सुमारास व या लिहिण्यास पाहतां अस्मान-ज़मिनीची तफावत " ( खरे १२१५ ).

**अस्मान-गिरी** ( स्त्री० ) [ फा० आस्मान् -गीर् ] वळचण; माण्डव; छप्पर.

**अस्मानी** [ फा० आस्मानी ] आकाशी, निळा; दिव्य. " शिकन्दर ताले ! अस्मानी फत्ते ( = दिग्विजय ) होत चालली आहे " ( खरे ७।३२३६ ).

**अस्मानी-सुल्तानी** ( स्त्री० ) दैवी-राजकीय आपत्ती; क्रान्ती.

**अस्लूब** ( पु० ) [ अ० उस्लूब् ] व्यवस्था; पद्धत; तऱ्हा. " तेव्हां करारीं कोणे प्रकारच्या व कशा, याचा अस्लूबकाय तऱ्हेचा ! " ( राजवाडे ७।८२ ).

**अस्सल; असल** ( स्त्री० ) [ अ० अस्ल् = मूळ ] मूळचें; खरें; अकृत्रिम; गैरनकली; जातिवन्त. "नकला दाखविल्या त्याच्या असला दाखविणें" ( वाडसभा ३।६६ ).

**असली** [ फा० अस्ली ] अस्सल.

**असर** ( पु० ) [ अ० असर् ] परिणाम " कृष्ण रावजी यांचे प्राणानें असर केला असें वाटलें " ( राजवाडे ५।८३ ).

**असाम-दार** (पु०) वेतन घेणारा. " असाम-दारांचें घोडें पीरच्छिन्न लहान ज़मेस धरूं नये " ( खरे ११।५७०७ ).

**असामी** (स्त्री०) [ अ० असामी अनेक व० 'इस्म्' चें ] नांव; व्यक्ती; नेमणूक; वार्षिक वेतन. बितपशील असामी ( पाब ३ ) = नांवनिशीवार. " कृष्णाजीपन्त त्रिवर्ग बन्धूस विश्वासराव म्हणवून नांव किताब दिला; मातबर लोकांत असामी घातली" (सभासद्). " तुकोजी शिन्दे यांणीं मौजे मुल्खेडें येथें बटकी देखील पोरें असामी तीन येकूण रुपये दीडशांस विकत घेतली " ( वाडबाबा २।१९१ ).

**असामी-वार** = नेमणुकीप्रमाणें; हुद्द्याप्रमाणें. "वरकड पांच इसम यांस असामीवार शिर्पेच पान्दान देऊन वाटेस लाविलें" ( राजवाडे ५।१४१ ).

**अहूकाम** ( पु० ) [ अ० अहूकाम् अनेक व० हुक्म्चें] हुकुम; सत्ता; हुक्मत. "याप्रमाणें मुख्तारीचे अहूकाम आणून दिले " ( चिरा २४ ). " एक महिन्याचा येथून अहूकाम पाठवितों " ( राजवाडे २२।४७ ), " दोन अहूकाम कामाचे नाहींत " ( चिरा २४ ).

**अहूफाद अफ्लाद** पहा. "बादऊ अव्लाद व अहूफाद त्यांसी रवा ( = चालू ) करणें " ( राजवाडे १५।३६४ ).

**अहूवाल** ( पु० ) [ अ० अहूवाल् अनेक व० हाल्चें] वृत्तान्त, हकीगत; कैफीयत.

**अहद्-नामा** ( पु० )[ फा० अह्द्-नामा ] वचनपत्र; करारनामा.

**अहद्-पैमान** ( पु० )[ फा० पैमान्-करार ] दार-मदार; करार. "अहद्-पैमान व्हावे ते सर्व स्वामीपाशीं आल्यावर अर्ज़ करितों" ( राजवाडे १।१५९ ).

**अहद्-शर्त** ( स्त्री० ) तह; करार; कायम-मिजाजी. " यांस अहद्-शर्तीचे कागद्पत्र देऊन रवाना केले " ( राजवाडे

१९।८ ). "दौलतींत अहद्-शर्त आणि वचन हा नजाना" ( राजवाडे १९।४७).

**अहद्-तहद** [ फा० अज़्-हद्द ता-हद्द ] पासून-पर्यन्त. "अहद् रायगिरी तहद चजीचन्जावर" ( चित्रगुप्त १६१ ).

**अहल्कार** ( पु० ) [ फा० अह्ल्-इ-कार् ] कार्कून. "साहेबानें फैज्-बक्षी करून लष्कर जाब पाठवावयाविशीं अहल्कारास आज्ञा सादर जाली पाहिजे" ( पद्मव ११२ )

**अहूसन** [ अ० अह्सन् ] उत्कृष्ट.

**अहादी** ( पु० ) [ अ० अह्दी = एक ] माणूस; शिपायापेक्षां जरा वरच्या दर्जाचा लढाऊ स्वतन्त्र स्वार. "अहादीवर अहादी रवाना केले" ( मराचिथोशा ६४ ).

**अहिनी** [ फा० आहनीन् ] लोखण्डी. "अहिनी दगडी जिन्नस दारूचे अन्तरीं ठेवावे" ( मराआ ३५ ).

## आ

**आँ** [ फा० आँ ] तो-ती-तें. "आं साहेबीं" = त्या प्रभूंनीं.

**आँकी** [ फा० आँ कि ] तें कीं ( इम ६५ ).

**आखर** = अखेर. "आखर वक्र जाऊन काम कांहीं सज्ज होणें नाहीं" ( राजवाडे ३।३७२ ).

**आगाही** ( स्त्री० ) [ फा० आगाही ] ज्ञान; माहिती.

**आज्माईश** ( पु० ) [ फा० आज्माइश् ] परीक्षा; प्रत्यय. "एकवेळ आम्ही स्नेह म्हटला तेथें चाल कसी पडती याचा आज्माईश नबाब साहेब यांस अद्याप नाहीं" ( राजवाडे १९।१०१ ).

**आज़ाद** [ फा० आज़ाद् ] स्वतन्त्र; मुक्त. "यांच्या मुलांमाणसांचें चालवून ( त्यांस ) आज़ात करावें" ( ऐटि १।२२ ).

**आज़ादी** ( स्त्री० ) [ फा० आज़ादी ] स्वातन्त्र्य.

**आज़ार** ( पु० ) [ फा० आज़ार् ] उपद्रव; पीडा; व्याधी. "त्याणीं रयतेस काडीचा आज़ार द्यावया गरज़ नाहीं" ( राजवाडे ८।२४ ). "जेथें गनिमांचा आज़ार पहुंचेना ऐशा जागियासि त्यासी पाठवणें" ( इम ७३ ).

**आज़ारी** पीडित; बिमार; व्यथित; रोगी.

**आतश्कदा; आतश्बेहराम** ( न० ) [ फा० आतिश् = अग्नि ] पारशांचें अग्निमन्दिर.

**आतश्खाना** ( पु० ) [ फा० आतिश्खाना ] तोफखाना. "किल्ल्यांत अब्दुल अहद्खानाचे आतश्खान्यांत रहावें ( दिमरा १।८६ ).

**आतश्बाज़** ( पु० ) [ फा० आतिश्बाज़् ] प्रेक्षणीय दारूकाम करणारा ( ऐटि १।४३ ).

**आतश्बाजी; आतस्बाजी** ( स्त्री० ) [ फा० आतिश्बाज़ी ] अग्निक्रीडा; प्रेक्षणीय दारूकाम. "रात्रीं नाच रोशनी आतश्बाजी जाली" ( राजवाडे ७।१४५ ).

**आतार** ( पु० ) [ अ० अत्तार् ] सुगन्धी; अत्तरें तेलें तयार करणारा व विकणारा.

**आदत** ( स्त्री० ) [ अ० आदत् ] संवय; टेव.

**आदमी** ( पु० ) [ अ० आदमी ] मानव; मनुष्य; पुरुष.

**आदा; आदाय** ( पु० ) [ अ० आइदा ] आवक; उत्पन्न. "दुसालां मिळोन खर्च भारी झाला; आदा नाहीं" ( खरे ४।१८३३ ). "ऐवज़ दोन चार वर्षांनीं आदाय पाहून उगवणी करून घ्यावा" ( चित्रगुप्त ३९ ).

**आदाब** ( स्त्री० ) [ अ० आदाब् ] वन्दन;

मजरा. "सर्वांनीं आदाब बजाविली" (ऐंटि १।१२).

**आदाब** (पु०) भेटीचा दागिना. "नबाबांनीं मोत्याच्या कण्ठ्या तीन व जिगा, कलगी...वगैरे अकरा आदाब इनायत केले" (राजवाडे ५।१९१).

**आदाब-अर्ज** भेटीच्या वेळीं सलाम करतांना म्हणावयाचा मन्त्र.

**आदाब-बन्दगी** (स्त्री०) सवन्दन विज्ञप्ती. "आदाब बन्दगी ऐसी जे" (खरे ११।५९१८).

**आप-खुदी** (स्त्री०) [८ फा० खुद् = स्वतः] स्व-सामर्थ्य. "तो खावन्द त्या पाणियांतील आप-खुदीनें होऊन" (चित्रगुप्त ८३).

**आप्करा; आब्कारा; अप्करा** (पु०) [फा० आब्कारा] पेला.

**आफताबा** (पु०) [फा० आफ्ताबा] प्रवाशी पाणी ठेवण्याची झारी.

**आफ्रीन-तहशीन** [फा० आफ्रीन्-उ तह्सीन] स्तुती; अभिनन्दन. "निजामन्मुल्क यांनीं स्वहस्तें आफ्री-तहशीनचा शुका तुम्हांस पाठविला" (राजवाडे ६।६२७).

**आफत; आफती** (स्त्री०) [अ० आफत्] आपत्ती; आपदा. "पादशाहीवर आफत पडली ऐसें झालें" (चित्रगुप्त ३५). "अगोदर पर्जन्याची आफती-त्याजवर फौजाचे उपसर्ग जाले" (राजवाडे १०।८८).

**आफत-ऑस्मानी** (स्त्री०) दैवी आपत्ती; (अवर्षण, अतिवृष्टी अगर टोळधाडी मुळें पडलेला) दुष्काळ. "मुल्क जागिरा आहेत त्यांत आफत-आस्मानी जाली" (दिमरा १।१०५).

**आब** (पु० स्त्री०) [फा० आब्] तेज; प्रतिष्ठा. "यास्तव आब राखून सलूख करून निघावें कीं काय!" (इम २८१). "ब्राह्मणांची आब ठेविली नाहीं" (राजवाडे १०।४४९).

**ऑब-कारी** [फा० आब्कार् = मद्यपी; कलाल] दारू वगैरे कैफी पदार्थासम्बन्धी; कैफी पदार्थांच्या उपजेवर व विक्रीवर पट्टी बसवून आलेलें (उत्पन्न).

**आब-खुरा** (पु०) पेला. "आब-खुरे" (वाडबाबा २।१५४).

**आब-ताब** (पु० स्त्री०) [फा० आब्ताब्] तेज; प्रतिष्ठा; आब्रू. "पुढेंही आमची आब-ताब रक्षण करणार स्वामी समर्थ आहेत" (दिमरा २।१८३). "टिपू आला तर कांहींसें तोण्ड देऊन आपला आब-ताब राखोन मागें सरतात" (चिरा २५).

**ऑब्दागीर; अब्दागीर** (न०) [फा० आफ्ताब्-गीर] सूर्यपान; बहुमानाचें एक चिन्ह. "आफ्ताबगीर नवें" (ब्राड-समा १।१३).

**आब्दार-खाना** (पु०) [फा० आब्दा-खाना] पिण्याचें पाणी सांठविण्याचें टाकें.

**आब-हवा** (स्त्री०) [फा० आब्-उ-हवा] हवापाणी. "ठिकाणही मातबर नाहीं; परन्तु आब-हवा मात्र कांहींसी बरी" (राजवाडे ११।११५). "कुहीर जागा, पागपत्नी लाकूडफांटें चारा पुष्कळ; आब-हवाही चाङ्गली आहे" (राजवाडे ७।१०९). "हे मुलकाची आब-हवा आम्हांस रास्त नाहीं; अगर हुकूम होईल तर विलायतेस येऊं" (पद्मब १०९).

**आबाद** [फा० आबाद्] समृद्ध; सम्पन्न; सुरक्षित; स्वस्थ. "आपला जागा आबाद ठेवितों" (दिमरा २।३५७).

"तुम्ही खातर्जमा राखोन मौजे मज्कुरीं आबाद राहणें, फौजेचा उपसर्ग तुम्हांकडे कांहीं लागणार नाहीं" ( राजवाडे १०।४३३ ).

**आबादान** [ फा० आबादान् ] आबाद; सुरक्षित. "वरकडही जिन्नस सर्दी न लागे असे आबादान ठेवावे" ( मराआ ३५ ).

**आबादी** ( स्त्री० ) [ फा० आबादी ] समृद्धी; सुरक्षितपणा; लावणी-सन्चणी. "पुढें बारा वर्षांचा दुष्काळ सम्पून आबादी जाहली" ( २ ग्रामस ३७ ). "आबादी जालिया हा प्रान्त क्रोडीचा आहे" ( इम २६७ ).

**आबादानी** ( स्त्री० ) [ फा० आबादानी ] आबादी; भरभराट. "रयतेची आबादानी होण्यास व रयतेस तगाई देण्यांत आधीं बहुत यत्न करावा" ( ऐस्कुले ५० ).

**आम-खास** [ अ० आम्म्-उ-खास्स् सामान्य व असामान्य ] सरास. "सदर्हू प्रमाणें धारण छ २५ रजबीं आम-खास बाजारांत जाली" ( राजवाडे ७।१४७ ).

**आम-खास** ( पु० ) दर्बार; दर्बारास. "तैसेच आम-खासमध्यें कुल वजीर मुस्तेद करून उभे केले" ( सभासद ३८ ). "पादशाह आम-खास तीन दिवस आले नाहीत" ( सभासद ५९ ).

**आमद** ( स्त्री० ) [ फा० आमद् ] उत्पन्न; आवक. "दौलत आहे तेथें आमदही आहे व खिसाराही आहे" ( राजवाडे १०।१६६ ). "पैशाची आमद राहणार नाहीं" ( खरे ७।३५७५ ).

**आमदनी** ( स्त्री० ) [ फा० आमदनी ] आवक; येणें; वसूल. "चहूंकडील गल्ला येथें येण्याची आमदनी बन्द जाली" ( राजवाडे ५।४४ ). तालुक्याची आमदनी हङ्गाम्यामुळें येत नाहीं" ( राजवाडे ५।१०३ ).

**आमद्रफ्त; आमद्रफ्ती** ( स्त्री० ) [ फा० आमद्-रफ्त् ] ये-जा; दळणवळण; वाहतुकीची जकात; रहदारीचा पर्वाना; मुभा; मोकळीक. "हजारों मनुष्यांची आमद्रफ्त; त्यांत असा चोरून जो येणार तो कोणे स्वरूपानें व कसा येतो हें कशावरून समजावें ?" ( राजवाडे ७।१३५ ). "सुखरूप आमद्रफ्त होऊं देत नाहींत" ( राजवाडे ३।८८ ). "रसदेची वगैरे आमद्रफ्ती होऊं नये" ( राजवाडे १०।१९६ ). "मार्गीं येतां जातां आमद्रफ्तीचा उपसर्ग न लावणें" ( राजवाडे १५।२३० ). "तो किल्ला घेतला म्हणजे दर्यांतून जहाजें येण्यास आमद्रफ्ती जाली" ( खरे ८।४३५४ ).

**आयना; ऐना** ( पु० ) [ फा० आयिना ] आरसा.

**आयनी** [ फा० आहनीन ] लोखण्डी. "आयनी गोळे सांपडले" ( खरे ४।१५८४ ).

**आर्जी** ( स्त्री० ) **आर्जव** ( न० ) [ फा० आर्झू ] मनधरणी; प्रयोजन. "तेथील अमीर आमची आर्जी करितात" ( राजवाडे ३।४२८ ). "त्यास योगक्षेमाविषयीं कोणाचें आर्जव न पडे तें करावें" ( मराआ ११ ).

**आर्जू** ( स्त्री० ) [ फा० आर्झू ] इच्छा; इच्छू आर्जूमन्द. "बल्की मागील फडचे व पुढें स्वच्छता व्हावी ऐसी कल्याणराव यांची आर्जू" ( राजवाडे ७ खलप २।१८ ). "कर्नेल गाडर याची पुण्यास येण्याची आर्जू" ( राजवाडे १०।१६७ ). "गोहजवालाही फार आर्जू आहे कीं

ग्वाल्हेर घेऊन माझा मुलूख सोडून द्यावा " ( मद्बा १।१९० ).

**आर्जूमन्द** [ फा० आर्ज़ूमन्द् ] इच्छू; उत्सुक. " फराशीस सर्काराशी दोस्ती करण्यास वकील पाठवून बहुत ऑर्जूमन्द " ( खरे ७।३५६६ ). " अगोधर कांहीं आर्जूवन्द नव्हतो व पुढें ही आम्ही होत नाही " ( राजवाडे ६।६०५ ).

**आराम** ( पु० ) [ फा० आराम् ] शान्ती; समाधान; स्वास्थ; स्वस्थ. " दौलांनी तबियत आराम झाल्याची नवाबास नजर पाठविली " ( राजवाडे ७।१२० ).

**आराम–खुर्ची** ( स्त्री० ) आडवें पडून विश्रान्ती घेण्याची खुर्ची.

**आरामशीर** = सुखदायक; शान्ततेनें.

**आरास; आराईश** ( स्त्री० ) [ फा० आराइश् ] सुशोभित करणें; चित्ताकर्षक वस्तूंची माण्डणी. " आराईश " ( राजवाडे १।१९० ).

**आरीयत** ( स्त्री० ) [ फा० आर् ] शरम. " गुदस्तां दादासाहेब पुण्याजवळून आले; परन्तु पुणें पाहिलें नाहीं हे आरीयत मातुश्रीस फार आहे ( मद्बा १।६२ ).

**आरीफ** [ अ० आरिफ् ] जाणता; सूज्ञ. " विशेष लेहावें तरी महाराज साहेब आरीफ असेती " ( राजवाडे ८।७ ).

**आलम** [ अ० आलम् ] जग; लोक; काळ. " सम्पूर्ण आलमांत जालें कीं... यांची दोस्ती होऊन टोपीकरास सजा करावी ऐसा नक्षा ठरला; हा लौकिक " ( राजवाडे १९।९२ ). " आलमाच्या ज़बानीनें ऐकतों कीं इङ्ग्रेज़ बादशहाचे येथें इन्साफ आहे व करारांत तफावत कधीं होत नाहीं " ( ऐटि १।६० ). " करारप्रमाणें फडचे करावे; यास दिरङ्ग लावून तफावत होणें दोस्तीचे आलमांत दुरुस्त नाहीं " ( राजवाडे ५।३४ ). " औरङ्गाबादचे आलम तमाम हवेली धावे यावर चढून तमाशा पाहते " ( राजवाडे १।६४ ). " रघुनाथराव बिरादर असतां त्यांणीं दगा केला; आलमाशिवाय ( = दुनियेविरहित ) हे गोष्ट त्यांजकडून अमलांत आली " ( खरे ७।३५६६ ). " आलम जवानीचा. पुरतें मनन न होतां भलतेंच मनांत येईल " ( राजवाडे ७ खलप २।१०४ ).

**आलम्गीर; अलम्गीर** [फा० आलम्गीर्] जगज्जेता.

**आलम–दुनिया; अलम–दुनिया** (स्त्री०) सारी दुनिया.

**आलम्पन्हा** [फा० आलम्पनाह् ] जगाचा संरक्षक.

**आला** [ अ० अअला ] अत्युच्च; सर्वश्रेष्ठ. " प्रस्तुतचा रङ्ग तर असा दिसतो जे आला व अद्ना खाविन्दापाशीं बराबर " ( राजवाडे ५।९ ).

**आला–हज़्रत** सर्वश्रेष्ठ स्वामी.

**आलीजा; आलेजा** [ फा० आलीजाह् ] उच्च पद्वीचा. " आलीजा बहादूर शिन्दे "

**आली–शान** [ फा० आलीशान् ] उच्च मानाचा.

**आवर्जा** ( पु० ) [ फा० आवर्जा ] हिशेब–वही. " किर्दी, नांवनिशीवार पत्रकें, आवर्जे पहावे" ( खरे ४।१४३३ ).

**आवाई; ऑवई** ( स्त्री० ) [ फा० आवा ] भुमका; कण्डी; हुल्लड; भीती. " टिपूची बाज़ार आवाई येत होती ती लटकी; तो आहे " ( खरे ७।३६१६ ). " सोमवारीं रात्रीं मोर्च्यांवरी लोक गेले होते;

आवई केली, मोर्चे उधळले" ( खरे १।२३९ ). "आवईनें ठाणें सोडल्यास उत्तमच जालें" ( खरे ६।२९५६ ). "रातबेरात मिळोन न जाणों हुल्लड केल्यास आम्हास, आवई समीप असतां खाऊं देणें चाङ्गलें नव्हे" ( खरे १०।५४६४ ).

**आवाज़** ( पु० ) **आवाजी** ( स्त्री० ) [ फा० आवाज़् ] ध्वनी; कण्ठसूर; नग. "थोरली भाण्डीं, एकूण आवाज़ दीड हज़ार."

**आवारा** ( पु० ) [ फा० आवारा ] नासाडी; ताराजी. "त्याचे सेताचा आपण आवारा केला" ( राजवाडे १५।१४ ).

**आश्कारा; ऑस्कारा** ( पु० ) [ फा० आश्कारा ] प्रसिद्धी; किर्ती. "भवानीपन्ताचा आश्कारा मात्र; सोडूगें कांहीं चमत्कारिक नव्हतीं ( ऐ०टि० १।५८ ).

**आश्नाई** ( स्त्री० ) [ फा० आश्नाई ] स्नेह; सख्य. "रावपन्तप्रधान याजकडलि सर्दारांशीही रफ्त आश्नाईचा आहे" ( राजवाडे ५।१०१ ).

**आशक** ( पु० ) [ फा० आशिक् ] प्रणयी; अनुरक्त.

**आशक-माशूक** ( न० ) प्रणयी जोडपें.

**आशकी** ( स्त्री० ) [ फा० आशिकी ] प्रणयानुनय.

**आशूरा; आशोरा** ( पु० ) [ अ० आशूरा ] मोहरमचा नववा अगर दहावा दिवस; मोहरमचा सण. "साम्प्रत मोहरमचे आशुऱ्याचे दिवस" ( राजवाडे ५।९३ ). "आशोरा सरल्यावरी हल्ला करावी या प्रमाणें करार केला आहे" ( खरे ७।३४२४ ).

**आस्ते** [ फा० आहिस्ता ] हळू हळू.

## इ

**इक़ार** ( पु० ) [ अ० इक़ार् ] कबुली; सम्मती.

**इख्लास्** ( पु० ) [ अ० इख्लास् ] अन्तःशुद्धता; ; स्नेह.

**इज़्ज़त** ( स्त्री० ) [ अ० इज़्ज़त् ] थोरवी; अब्रू, प्रतिष्ठा; बहुमान ( मराचीथोशा ३ ) इज़्ज़त घेणें = दुर्लौकिक करणें.

**इज़्ज़त-आसार** [ फा० इज़्ज़त्-आसार ] सुप्रतिष्ठित ( राजवाडे १५। २७१ ). "इज़्ज़ती-असार" ( राजवाडे १८।५० ).

**इज़्ज़त-दार** प्रतिष्ठित.

**इज़्ज़ती-दस्तगाह** प्रतिष्ठा-निधी ( राजवाडे १८।५० ).

**इज़्ज़त-पन्हा** [ फा० इज़्ज़त्-पनाह् ] सुप्रतिष्ठित ( एक पदवी ).

**इज़्ज़त-महा** [ फा० इज़्ज़त्-मआब ] सुप्रतिष्ठित ( राजवाडे ३।४३ ).

**इज़्ज़त-लायक** = प्रतिष्ठेप्रमाणें; माफक-मरातीब. "सिरुपाउ इनामत देतात ते अवघ्या सर्दारांसही इज़्ज़त-लायख घेणें" ( राजवाडे ६।२१० ).

**इज़्ना** ( पु० ) [ ? अ० इज़्न् = पर्वानगी ] ताबा. 'इज़्न्यांत' = आधीन, लगामी "जो कोणी सवाईसिङ्गाचे इज़्न्यांत येईल त्यास राज्य द्यावें" ( जोरा १०७ ).

**इज़्हार** ( पु० ) [ अ० इज़्हार् ] जाहीरनामा; प्रसिद्धीकरण; जाहीर.

**इज़ा** ( स्त्री० ) [ अ० ईज़ा ] अपाय, पीडा. "तालुकियास इज़ा न लागे ऐसा बन्दोबस्त होऊन तेजवन्तास पत्रें यावीं" ( राजवाडे ७।११७ ).

**इज़ार; विज़ार** ( स्त्री० ) [ अ० इज़ार् ] सुर्वार; तुमान; पायजमा.

**इज़ारत** ( स्त्री० ) **इज़ारा** ( पु० ) [ अ० इजारत्–रा ] खण्डाची पद्धती; मक्तेगिरी; मक्ता. "सर्व इज़ारत ( = ज़बाबदारी ) मन्सब्याची तुझ्यावर आहे" ( चित्रगुप्त १२ ).

**इज़ार–दार** ( पु० ) [ फा० इजारा–दार् ] मक्तेदार.

**इज़ार–दारी** ( स्त्री० ) मक्तेदारी.

**इज़ाफा** ( पु० ) [ अ० इझाफा ] आधिक्य; वाढ; गांव इनाम; तनखा; नेमणूक. "दौलत इज़ाफा देऊन" ( सभासद १० ). "इज़ाफा पञ्च हज़ारीचा देणार" ( राजवाडे १।१७९ ). "बेचाळीस लक्षाचा अन्दाज़ ठरला. हल्लीं व्यङ्कटराव यांणीं दहा लक्ष इज़ाफा बोलण्यांत आणिला. बावन लक्षावर गोष्ट आली" ( राजवाडे ७।५० ).

**इत्लाख; इत्लाखी** [ अ० इत्लाक्= स्वातन्त्र्य ] स्वतन्त्र; पगारी; गैर–सरंन्जामी ( फौज ). "सात हजार फौज़ इत्लाख रोजमऱ्यावर ठेवावी" ( खरे ८।४३२२ ). "पांचशें रुपयांचा गांव व पांचशें रुपये इत्लाख" ( वाडसमा १।३६ ).

**इत्तदाय** ( पु० ) [ अ० इब्तिदा ] आरम्भ. "ज्येष्ठमास इत्तदायपासून तागायत पौष पर्यन्तचा मज़्कूर" ( जोरा ५८ ).

**इतलाखी** ( स्त्री० ) [ अ० इअतिलाक् ] सख्य; मैत्री. "रियासतींत मोठी गोष्ट कीं वचनाची कायमी; त्यांत तलवून–मिजाजी ( = लहरीपणा ) झाल्यास व इतलाखी बातल होऊं लागल्यास लाचार !" ( खरे ७।३५७४ ).

**इतफाक; इत्यफाक** ( पु० ) [ अ० इत्तिफाक् ] सहविचार; एक विचार; सल्ला; योग घडणें. "याचा बन्दोबस्त कळेल तसा आम्ही राजश्री पन्तप्रधान यांचे इतफाकानें करूं" ( राजवाडे १।२८१ ). "आमचे व आपले इत्तिफाकानें इङ्ग्रजांचें नांव व निशान् ( = खूण ) नाहींसारखे नेस्त–नाबूत होतील" ( राजवाडे १०।१८२ ). "मुलाकात घेऊन इतफा ( = एकत्र, एकविचारें ) कोणत्याचे मुलखांत चालणें जाहलें तर चालावें" ( राजवाडे १०।३०३ ). "यास्तव तर्फेन मुलाकातीचा इत्यफाक ठरण्यांत यावा" ( राजवाडे ५।१४५ ). "त्या गोष्टीचा इत्यफाक या शादीचे खुशीचे समारम्भांत घडावा हें फार चाङ्गलें" ( राजवाडे ७।५१ ).

**इतबार** ( पु० ) [ अ० इअतिबार् ] विश्वास; प्रतिष्ठा; पत. "आतां इतबार कोणाचा येत नाहीं" ( सभासद २९ ).

**इतबार–पण** ( न० ) इतबार ( राजवाडे १५।३७२ ).

**इतबारात** ( स्त्री ) मान–पान. "शिवाय स्वारीखर्च व इद्‌बारात पावती होती" ( पेद्‌समा ११० ).

**इतबारी** [ फा० इअतिबारी ] विश्वासू; अमीन.

**इतमाम** ( पु० ) [ अ० इह्‌तिमाम्=व्यवस्था, बन्दोबस्त ] लवाजमा; बडेजाव; सन्मान.

**इतमाम्या** ( पु० ) व्यवस्थापक; रखवालदार. "बाणकरी व इतमामे पुण्यास रखवालीस पाठविले ( खरे १।४३३ ).

**इतराज़** [ अ० इअतिराझ् = आक्षेप ] अप्रसन्न; रुष्ट. "यासि देशमूख न म्हणनें. कोण्ही म्हणीं म्हणतील त्यासि साहेब इतराज़ होतील" ( राजवाडे १५।१०६ ). "येथें उभयतां सर्दारही

त्याजवर इतराजच आहेत " ( राजवाडे ३।१६७ ).

**इतराजी** ( स्त्री० ) अप्रसन्नता, गेरमर्जी.

**इतला** ( पु० स्त्री० ) [ अ० इत्तिलाअ ] वार्ता; खबर; लक्ष्य; लोभ. " हरतऱ्हा करोन त्याचे ( = शिन्यांचे ) परिघांतून आपले पेठेंत येऊन राहिलों; त्यांचा इतला आह्मांकडे नाहीं " ( खरे १०। ५६०६ ).

**इत्तिहाद; इतेहाद** ( पु० ) [ अ० इत्तिहाद् ] ऐक्य; यगानगत; मैत्री. " आमची दोस्ती आणि इतेहाद पूर्वीपासून जो आहे त्यांत खलश न यावा " ( राजवाडे ५।३० ). " असें श्रीमन्तांचे मनांत येणें हें इत्तिहादास चाङ्गलें नाहीं " ( राजवाडे ५।१३७ ).

**इद्गा** ( पु० ) [ फा० ईद्-गाह् ] ईदचे समारम्भ करण्याची जागा.

**इदी** ( स्त्री० ) [ फा० ईदी ] सणावारीं दिलेली भेट.

**इन्कार** ( पु० ) [ अ० इन्कार् ] नाकबुली; निषेध.

**इन्तकाल** ( पु० ) [ अ० इन्तिकाल् ] मृत्यू. " महम्मदअलीखान वालाजाह यांचा इन्तकाल छ २७ माहे रबिलावलीं जाल्याचें वर्तमान आहे " ( राजवाडे ५।२०३. )

**इन्तजाम** ( पु० ) [ अ० इन्तिझाम् ] व्यवस्था; निकाल. " सर्कारचे कामाचा पक्का इन्तजाम " ( जोरा १२९ )

**इन्तजारी** ( स्त्री० ) [ अ० इन्तिझार् ] मार्गप्रतीक्षा; प्रतीक्षक. " कोणी मातबर सलुखास पाठवून द्यावा; इन्तजारी आहे " ( खरे ७।३५७३ ). " त्याचा जबाब केव्हां येईल याची इन्तजारी आहे " ( राजवाडे ५।१२८ ). " उत्तराविषयीं लवकर आज्ञा जाली पाहिजे' नबाब फार इन्तजारी आहेत " ( राजवाडे ५।१२४ ).

**इन्फिसाल** ( पु० ) [ अ० इन्फिसाल् ] निकाल; फैसला. " त्याचा हिसाबाचे रुईनें इन्फिसाल करावा " ( राजवाडे ७।६८ ). " दिगर गांवसुद्धां बाकी साल-मज्कूरचा इन्फिसाल करून द्यावा " ( राजवाडे २२।६६ ).

**इन्साफ** ( पु० ) [ अ० इन्साफ् ] न्याय; निर्णय.

**इन्साफ-गुजी** [ फा० इन्साफ्-गुझीन् ] न्यायग्राही; न्यायी ( खरे ७।३५७५ ).

**इन्साफी** न्यायी. " इङ्ग्रजी इन्साफी; त्यांचे येखत्यारी हेही मुन्सफ् (=न्यायी) असतील " ( खरे ७।३५७० ).

**इन्शाल्लाताला** [ अ० इन् शा अल्लाहु तआला ] सर्वश्रेष्ठ प्रभु इच्छील तर. " पृथ्वीपद ' इन् शा अल्लाहु तआला ' यार्णी अकबरासाहित औरङ्गजेबास करार करून बक्षिसी केली आहे " ( चित्रगुप्त ४१ ) या अवतरणांत वरील शब्दचय चुकीनें ' परमेश्वर ' या अर्थानें वापरला गेला आहे.

**इनाम** ( न० ) [ अ० इन्आम् ] देणगी; बक्षीस.

**इनाम-इक्राम** ( न० ) भेट-देणगी. ( वाडसमा २।१९६ ).

**इनाम-जमीन** ( स्त्री० ) एखाद्या मोठ्या कामगिरीबद्दल सर्कारांतून बक्षीस मिळालेली सारा-माफीची जमीन.

**इनाम-दार** [ फा० इन्आम्-दार् ] इनामी जमिनीचा मालक.

**इनामत** ( स्त्री० ) [ अ० इन्आमात् अनेक व० इन्आम चें ] बक्षीस. "कित्येकांस इनामत अजरामर गांवें भूमी करून दिधली" ( चित्रगुप्त १०६ ) "इना-

मती धर्मादाय वर्षासनें" ( वाडसमा ११९२ ).

**इनामी** इनाम मिळालेला.

**इनायत** ( स्त्री० ) [ अ० इनायत् ] कृपा; बक्षीस. इनायत होणें=बक्षीस मिळणें; इनायत करणें=बक्षीस देणें.

**इनायत–नामा** ( पु० ) कृपापत्र; शिफारस-पत्र; आज्ञापत्र. "यांस अर्ज करितां इनायत-नामा द्यावयासी विलम्ब करणार नाहीत" ( राजवाडे ८।२०२ ).

**इफाज़त** ( स्त्री० ) [ अ० हिफाझत् ] संरक्षण; आश्रय. "रघुनाथराऊ पेशवे ई जानबाचे इफाज़तेंत आहेत" ( राजवाडे १०।१०६ ).

**इब्लाग** [ अ० इब्लाग़् ] पाठवणूक. "हमेशा मोहबत–नामा इब्लाग करोन मसूर ( =आनन्दित ) करीत जाणें" ( राजवाडे १०।१६४ ).

**इब्लीस** ( पु० ) [ अ० इब्लीस् ] सैतान; दुष्ट; खोडसाळ.

**इबादत–व–इज़्लाल–दस्तगाह** = भक्ती व श्रेष्ठत्व यांचा निधी; एक अल्काब.

**इबादती** [ अ० इबादती ] धार्मिक. "हे घातेचा तरस मोहीबासारखे इबादती लोकांस कांहींच न ये हें अज्याईब आहे" ( राजवाडे ३।९० ).

**इबारत** ( स्त्री० ) [ अ० इबारत् ] भाषा; शब्दप्रयोग. "ह्या ग्रन्थाच्या बैता तीस हज़ार आहेत; तो पार्सी भाषेचे इबार-तींत आहे" ( ऐस्फुलें ४५ ). "याज़-करितां लाडाचे चौथे दफेची इबारत ब–हाल ठेवणें जरूर" (राजवाडे ७।९२).

**इभ्रत; इब्रारत** ( स्त्री० ) थोरवी; वळ; प्रतिष्ठा; विश्वास; वचक; दरारा; सला-बत. "त्याज़पाशीं तोफ–खान्याची ही इबारत नाहीं" ( राजवाडे १।२९७ ). "आपले मायेचे, बन्दोबस्ती यथास्थित नामी मनुष्य इभ्रतीचा असल्यास मन्सब्यास युक्त आहे" (खरे ५।२२१२). "तुमची इबारत गाईकवाडांवरी च-ढली" ( राजवाडे ६।३२१ ). "एक लढाई ज़ाली होती; इभ्रत चाङ्गलीच बसली होती" ( खरे ६।२६४९ ). "या देशीं यांची इभ्रत फार बाळगितात; चार कोसांवर मुक्काम आला असतां गांवांत वस्ती राहात नाहीं" ( खरे ११।६१५६ ). "तें ठाणें इभ्रतीनें घेतलें" ( खरे ६।२७२५ ). "तुमच्या नांवाचा धाक–इभ्रत ईश्वर–सत्तेनें भारी आहे" ( खरे १।२०४ ).

**इबीन** (पु०) [ अ० इब्न् ] पुत्र; बिन. "येलोजी बिन मावजी इबीन चान्दजी" ( पेद्समा १११ ).

**इमला** ( पु० ) [ अ० इम्ला = काम ] बान्धकाम; इमारत.

**इमान** ( न० ) [ अ० ईमान् = श्रद्धा ] वचन; एकनिष्ठा; सचोटी. "नबाबांनीं आपला इमान रक्षिला" (पद्बा १।८९).

**इमान** देणें = वचन देणें.

**इमान–इतबार** (पु०) एकनिष्ठा व सचोटी.

**इमानें–इतबारें** = एकनिष्ठेनें व प्रामा-णिकपणानें.

**इमान–प्रमाण** = करार मदार.

**इमान–भाक** = अहदपैमान; आणभाक ( राजवाडे १५।२७३ ).

**इमानत–दार; इमानी** = विश्वासू.

**इमाम** ( पु० ) [ अ० इमाम् ] धर्माध्यक्ष ( विशेषतः अलीच्या वंशजांपैकीं ).

**इमायत; इमाईत** ( स्त्री० ) [ अ० हिमा-यत् ] संरक्षण; आश्रय; इफाज़त ( राज-वाडे ८।१८५ ).

**इमारत** ( स्त्री० ) [ अ० इमारत् ] मन्दिर; हवेली; बान्धकाम; पायाच्या वरचें बान्धकाम ( चित्रगुप्त १३३ ); बान्धा. "गडाची इमारत मुस्तैद करावी" ( मराआ ३३ ). "घोडी पांच हज़ार रुपयेच्या किमतीची होती; इमारतीनेंही थोर होती" ( खरे ११।५७०६ ).

**इर्तिबात** ( स्त्री० ) [ अ० इर्तिबात् ] स्नेह. "पन्त साहेबांसी व आम्हांसी दोस्ती व इर्तिबात कदीम आहे" ( दिमरा १।४५ ).

**इर्शाद** ( पु० स्त्री० ) [ अ० इर्शाद् ] उपदेश; आज्ञा. "रामाजी महादेव यांस इर्शाद फर्मावून" ( खरे ७।३५६५ ). "तिकडील बातमी वरचेवर आणवीत जावी, याप्रमाणें इर्शाद करून खलिता वाचून बहुत श्रमी जाले" ( दिमरा २।१६६ ). "मला इर्शाद झाला तर गोविन्दराव कृष्ण यांजकडे जाईन" ( राजवाडे ५।७८ ).

**इर्साल** ( पु० ) [ अ० इर्साल् ] पाठवणूक; पाठविण्याचा पैका; वेचका; उत्तम; अस्सल; वेरकी; पक्का. "चित्तांत आल्यास माझें विनन्तीपत्र व-जिन्नस इर्साल करावें" ( राजवाडे ११।४७ ). "यावर तमाम लश्करास व वाणियांस ताकीद करून इर्साल पोहोंचवून दिल्हा" ( इम १९५ ).

**ईराण** ( पु० ) [ फा० ईरान् ] इराक व अफगाणिस्तान यांमधला प्रदेश.

**इराणी** इराणांतला. इराणी घोडा=गर्दभ.

**इरादा** ( पु० ) [ अ० इरादा ] विचार; हेतु; बेत.

**इल्ज़ाम** ( पु० ) [ अ० इल्ज़ाम् ] आळ; दोष; दोषाचा शाबिती; ठपका. "मजकडे कोण काय इल्ज़ाम साङ्गतील, त्याचे ज़ाबसाल मी सर्व पुरवून देईन" ( राजवाडे १०।३४४ ). "विना इल्ज़ाम कोणाच्या साङ्गितल्यावर ज़ाहाला अब्रूस खत्रा न व्हावा" ( राजवाडे १०।३४३ ). "चाकरी मग्दुराप्रमाणें करीत आहों; पसन्त करणार आपण आहेत; इल्ज़ाम येणार नाहीं" ( राजवाडे १०।७७ ). "उभय दौलतीस नेक आणि मजवर इल्ज़ाम नाहीं ऐसें समजोन आज्ञा होईल त्यास हज़र" (राजवाडे ५।२०६ ).

**इल्तिमास** ( स्त्री० ) [ अ० इल्तिमास् ] विनन्ती; अर्जी. "ये बाबें तुम्ही इल्तिमास लिहिली" ( इम ७५ ).

**इल्हाक** ( पु० ) [ अ० इल्हाक् ] जोडणी; सही. "अज़मखान यांचा इल्हाक, सर्बुलन्द्जङ्ग यांचे दस्खत." ( राजवाडे ७।४५ ).

**इलम** ( पु० स्त्री० ) [ अ० इल्म् ] शास्त्र; विद्या; कला.

**इलाखा; इलाका** ( पु० ) [ अ० इलाका ] अवलम्बन; ताबा; सम्बन्ध; प्रान्त; परिवार. "या देशांत इङ्ग्रज़ांची प्राबल्यता ज़ाहलिया अगोदरी नवाब मुहम्मद अली खानाचे इलाकेंत आम्ही होतों" ( तरा १०० ). "तुम्हांसी त्याचा इलाखा नाहीं" ( सभासद ४२ ). "रघुनाथराव यांस इलाखा राखणार नाहीं" ( खरे ७।३५७३ ). "सर्व रायगडावरी सम्भाजी राजे यांचा इलाखा ( =परिवार ) राहिला" ( मराचिथोशा २५ ).

**इलाकी; इलाखी** [ ८ अ० इराकी ] तैग्रीस व युफ्रातीस या दुआबांतील पैदाशीचा ( घोडा ) ( मराआ ६ ).

**इलाज़** ( पु० ) [ अ० इलाज़् ] उपाय; उपचार.

**इलाही** [अ० इलाही ∠अ० इलाह्=ईश्वर ] ईश्वरी. शुक्रे इलाही = मी ईश्वराचे आभार मानितों.

**इश्क; इशाक** ( पु० ) [ अ० इश्क् ] प्रणय; नाद; शृङ्गार; विलास. "श्रीमन्त राजश्री बाजीरावसाहेब व चिमाजी आपा यांसी घोड्यावर बसावयाचा इशक बहुत आहे" ( खरे ९।४८३३ ). "आम्ही तर दर्दी, इश्काचे भुकेले प्राणी" ( प्रभाकर लावण्या ).

**इश्क-बाज़** [ फा० इश्क्-बाज़् ] चैनी; विलासी.

**इश्क-बाजी** ( स्त्री० ) [ फा० इश्क-बाज़ी ] प्रेमलीला, प्रणयविलास. "आशकबाजी" ( चित्रगुप्त १६४ ).

**इशारत** ( स्त्री० ) **इशारा** ( पु० ) [ अ० इशारत्-रा ] खूण; सूचना. "इशारती" ( सभासद ४२ ).

**इस्काल; इस्कील; इस्कीलकी** ( स्त्री० ) [ अ० इश्काल् = अडचण ] हर्कत; तण्टा. "नवी जिकीर न कीजे व इस्काल न कीजे" ( राजवाडे १५। १६७ ). "चान्दजीराव इस्कील करील तर त्यासही माकूल करून ( =समजावून ) साङ्गणें" ( राजवाडे ८।९७ ). "ते विषयीं इस्कीलकी कथळा न करणें" ( राजवाडे ८।७९ ).

**इस्तक्लाल** ( पु० ) [ अ० इस्तिक्लाल् ] जोर; धर. "या फौज़ेचा इस्तक्लाल राहिला नाहीं; तेव्हां मुलूक आरम्भिला" ( राजवाडे ६।४४० ).

**इस्तक्बाल** [ अ० इस्तिक्बाल् ] सामोरें; पेशवा; भावी. "कोणाराव निघोन येथें हैदराबादेस आला; त्यास इस्तक्बाल राजाजीचे भाऊ आपाराव यांस पाठविलें होतें" ( राजवाडे ५।१४५ ). "कार्कुनानी हाल व इस्तक्बाल्"=हल्लींचे व भावी कार्कून.

**इस्तमालत; इस्तमाली** ( स्त्री० ) [ अ० इस्तिमालत् ] लावणी-सन्चणी; कीर्द-महामुरी; दिल-दिलासा. "आबादीस व इस्तमालतीस कोसीस करून" ( राजवाडे १५।११३ ).

**इस्तस्वाब** ( पु० ) [ अ० इस्तिस्वाब् ] पसन्ती; सल्ला. "त्यांचे इस्तस्वाबानें काम करावें" ( राजवाडे ७।५८ ).

**इस्ताद** ( स्त्री० ) [ अ० इस्तिअदाद् ] सिद्धता; तयारी; चुन्याचें पक्कें काम; सिद्ध; दृढ. "इस्तादेचीं घरें" ( मराआ ). "ऐशी पैमन इस्तेज़ाद आली" ( खरे ७।३५७३ ).

**इस्ताफा; इस्तीफा** ( पु० ) [ अ० इस्तिअफा ] नोकरीची सोडचिठ्ठी; राजीनामा. "आम्हांस दौलत नलगे; मक्केस जावें किंवा घरीं बसून राहावें या भावें आम्ही नबाबास इस्ताफाही लेहून पाठविला" ( राजवाडे ३।४११ ). "यांचा इरादा आहे कीं येथील कामाचा इस्तीफा द्यावा" ( दिमरा २।१८ ).

**इस्तावा** ( पु० ) [ अ० इस्तिवा ] नवीन ज़मीन कीर्द-मामुरीस देतेवेळीं कांहीं वर्षे पर्यन्त भर साऱ्यापेक्षां कमी परन्तु दरसाल वाढत्या साऱ्यानें ज़मीन देणें.

**इस्तियाक-मुस्ताकी** ( स्त्री० ) [ अ० इस्तियाक् = अ० मुश्ताकी] प्रेम-लोभ. "ज्या ज्या प्रसङ्गोचित इस्तियाक-मुस्ताकीच्या गोष्टी बोलावयाच्या त्या नबाब निजामुदौला बहादूर यांणीं बयाण केल्या" ( राजवाडे १।१८७ ).

**इस्दार** [ अ० इस्दार् ] बाहेर काढणें; प्रसिद्धीकरण. "दस्तक इस्दार करून पाठविलें आहे" ( राजवाडे ३।९१ ).

**इस्लाम** ( पु० ) [ अ० इस्लाम् ] मुहम्मद पैगम्बरानें स्थापिलेला धर्म.

**इस्लामी** [ अ० इस्लामी ] इस्लाम-धर्म-विषयक; मुसल्मानी.

**इसन्ने** [ अ० इस्ना ] दोन.

**इसन्ने अशर** [ अ० इस्ना-अशर् ] बारा.

**इसम** ( पु० ) [ अ० इस्म् = नांव ] मनुष्य; शख्स; आदमी.

**इसम-नविशी** ( स्त्री० ) [ फा० इस्म्-नवीसी ] नांवनिशी; नामावली. "इसम-नविशीची फर्द लिहून नवाबांस अर्ज केली" ( राजवाडे ५।१२७ ).

**इसम्वार** [ फा० इस्म्-वार् ] नामानुक्रमानें.

**इसम्वारी** ( स्त्री० ) [ फा० इस्म्-वारी ] नामानुक्रम.

**इसवी** [ अ० ईसवी ] ख्रिस्ती ( शक ).

**इहदे** [ अ० इह्दा ] एक.

**इहसान** ( न० ) [ अ० इह्सान् ] कृपा; मेहेरबानगी; उपकार. "दौलताबादेचें यश आम्हांस यावें म्हणूनच स्वामींनीं रुपये जहागीर दिली;सर्कार-किफायती-करितां न दिलें हेंहि मोठें इहसान सेवकावर" ( खरे १।३९ ). "एवढें इहसान सेवकावर असतां दहा पांच हजारां करितां उदासीन कशास असावें!" *( खरे १।३९ ).*

## ई

**ई** [ फा० ईन् ] हा-ही-हें. "ई जानब" = दर्बारी पत्रांत लेखक स्वतःस या शब्दानें सम्बोधितो.

**ईद** ( स्त्री० ) [ अ० ईद् ] मुसल्मानी सण दोन इदा मुख्यः ईदुद्दुहा किंवा ईदे कुर्बाणी म्हणजे बकर-ईद; आणि ईदुल्-फित्र् म्हणजे रमज़ान ईद-रोज़े-उपास सोडण्याचा सण. "नबाबांस इदेबद्दल वस्त्रें पावलीं नव्हतीं" ( दिमरा १।१६८ ).

## उ

**उज़म** ( पु० ) [ अ० उज़्म् ] थोरवी. "हे आपले सर्कारच्या गोष्टी उज़माच्या साङ्गतात ( दिमरा १।१७ ).

**उज़ू** [ अ० वुज़ू ] हस्तपादप्रक्षालन.

**उज़ू-तवाज़ू** [ अ० तवाज़ुअ = नम्रता ] प्रार्थना; नमाज़ ( भाव ).

**उज़ू-नमाज़** = प्रार्थना. "याजबद्दल पांच वख्त उज़ूनमाज़ करून इलाही नजीक ( ईश्वराजवळ ) रावसाहेबांचे हक्का-मध्यें (= सम्बधीं, बाबतींत ) दुवा याद करीत आहों" ( राजवाडे १।६३ ).

**उज़ूर** ( पु० ) [ अ० उज़्र्=बहाणा] तक्रार; आक्षेप. "उज़ूर असेल तरी हुज़ूर ऐणें" ( राजवाडे १५।१५९ ). "हुज़ूर बोलाविलें असतां उज़ूर न करितां येऊन पावावें" ( मराचिथोशा ३६ ). "सेवकास आज्ञा होईल त्या आज्ञेस उज़ूर नाहीं" ( राजवाडे १०।२२६ ).

**उन्फा; उल्फा** ( पु० ) [ अ० अलूफा-*अल्फा ] रोज़चा शिधा. "तितक्यांस* चार मास मिष्टान्न उन्फे चालविले" ( चित्रगुप्त ).

**उब्हत मान्झिलत** [ अ० उब्हत्=वैभव ] वैभव-सम्पन्न ( राजवाडे ७।१७२ ).

**उम्दगी** ( स्त्री० ) [ फा० उम्दगी ] थोरवी; मातब्बरी. "ही एक उम्दगीची ज़ात आहे; परन्तु क्षेत्र तसें नाहीं".

**उम्दा** [ अ० उम्दा ] विश्वसनीय; मातबर; थोर; गुणी; उत्तम. " दुन्याईंत उम्दा चीज़ येख्लासा खेरीज़ नाहीं " ( खरे ७।३५६४). "नबाबापासोन उम्दीं उम्दीं कामें करून घ्यावी हे उमेद आम्हांस फार आहे " ( राजवाडे ६।२८८ ). " आणि मुलाज़मत ज़ालिया मदत-खर्चही उम्दा देतील " ( राजवाडे ८।२१२ ).

**उमर; उम्बर** ( स्त्री० ) [ अ० उम्र् ] आयुष्य; वय.

**उमराव** ( पु० ) [ अ० उमरा अनेक व० अमीर्चें ] श्रेष्ठजन; सर्दार; खांसा.

**उमेद्** ( स्त्री० ) [ फा० उमीद्-उमेद् ] आशा; धीर; आकांक्षा; हिम्मत; आपलें-पण; वय. "अब्दालीचीं बोलावणीं बहुत उमेद् लाऊन गेलीं " ( खरे ११३४ ). " आबाजी आपले उमेदींत आलि-यावरी ता॥ म॥ देशमुखी करावयास आले " ( राजवाडे १७।५ ).

**उमेद्वार** [ फा० उमीद्वार ] आशावान्; इच्छू; पदान्वेषी; पसन्त पडल्यास कायम करूं अशा अटीवर ठेवलेला नोकर. " तुम्ही इकडील लक्ष्यांत राहून कल्या-णाचे उमेद्वार (=हितेच्छू ) असावें " ( राजवाडे ८।५ ).

**उमेद्वारी** ( स्त्री० ) आशाळूपणा; उमेद्वार असण्याची स्थिती; आशा; आशावाद. " त्यास स्वारी निघावयाचा मार्ग पहात आम्ही उमेद्वारीनें बैसलों आहों " (खरे ८।४६६० ). " कदाचित् पत्रोत्तर आलें तर आपला ओढा लिहून उमेद्वारी (=आशावाद) लिहितात (दिमरा १।१३ ).

**उमेदगी** ( स्त्री० ) उमेद्वारी. " हे उमेद्-गीची व रयासतीची कोण वजे (=तन्हा ) ते दर्यात करावी " ( खरे ७।३५७२ ).

**उर्फ** [ अ० उर्फ् ] म्हणजे. " रघुनाथ बाजी-राव उर्फ दादासाहेब ".

**उरूफ; उर्फ**. "अफज़ल्पूर महमूदशाही उरूफ करा बावधन " ( इम ४८ ). " नही-सादुर्ग उरूफ पन्हाळा " ( राज-वाडे ३।५४ ).

**उरूस** ( पु० ) [ अ० उर्स्=लग्नाची मेज-वानी ] पिराचा उत्सव.

**उरूबरू** [ फा० रूबरू ] समक्ष. " उरूबरू येऊन विनन्ती करीन " ( राज-वाडे ३।१२३ ).

**उश्टर-खाना** (पु०) [ फा० उश्तुर् उण्ट ] उण्टशाला.

**उस्तवारी** ( स्त्री० ) [ फा० उस्तुवारी ] व्यवस्था; शुश्रूषा; मज़्बुती. "ज़ुखमांची वगैरे पथ्यपाण्याची उस्तवारी बरीच आहे " ( खरे ११।६०१७ ). "लोकांचे क़र्ज़ाचा मार्ग होऊन आपली उस्तवारी होईल " ( राजवाडे १३।९१ ).

## ए

**एक्का** ( पु० ) [ फा० यक्का ] एक बैलाची अगर एक घोड्याची गाडी.

**एक्बार** ( स्त्री० ) अख्बार; बातमीपत्र. ( दिमरा १।१६४ ).

**एक्बाल-पन्हा** [ फा० इक्बाल्-पनाह् ] सुदैव-युक्त, दैववान्.

**एक्रार** ( पु० ) [ अ० इक्रार् ] इक्रार; कबुली. "ऐसें पष्टवादें पुसतां मुल्जीम होऊन एक्रार केला " ( राजवाडे-२०।६५ ).

**एक** [ फा० यक् ] एक.

**एक-ज़रा** [ फा० यक्-ज़र्रा ) अणु-मात्रही. " यास तफावत एक-ज़रा न करणें "( राजवाडे ८।१५९ ).

**एक-तर्फी** एक्या बाजूचा, पक्षपाताचा.

**एक-दम** [ फा० यक्-दम्=क्षणैक ] तत्क्षणीं; ताबडतोब; अकस्मात्.

**एक-दिली** ( स्त्री० ) [ फा० यक्-दिली ] एक-हृदय; ऐकमत्य; स्नेह. " सलूख-एक-दिली आहे" ( दिमरा १।१२३ ).

**एक-दिल** ( पु० ) [ फा० यक्-दिल् ] एक मताचा; ऐकमत्य; स्नेह; सन्तोष. " श्रीमन्त व नबाब एक-दील; तेव्हां हैदरखानाचा मज्कूर किती आहे ! " ( खरे ६।२८९८ )." फौजेचा एक-दील करून...पत्राचें उत्तर जरबेचें आलें असतां इकडूनही सरन्जाम जावयास दिवसगत लागणार नाहीं " ( खरे ११।२१०२ ).

**एक-ब-एक** [ फा० यकूबयक् ] एकूण एक; सर्व; एकाएकीं. " एक-ब एक हुजूर मालूम जाहालीं " ( राजवाडे १५।३१ ). " त्यांनीं मीर इमाम यास जठचरक येथें एक-ब-येक येऊन गांठलें " ( राजवाडे ५।११४ ).

**एक-रकमी** एका ठिकाणीं मिळालेला, पुष्कळ. " एक-रकमी पुष्कळ पैसा मिळण्यास देशान्तरीं फिरल्याशिवाय इलाज नाही " ( माप्र ९ ).

**एक-रङ्गी** ( स्त्री० ) **एक-रङ्ग** (न०) [ फा० यक्-रङ्गी ] निखालसता; सख्य. " यांची कदीमापासोन दोस्ती व एक-रङ्गी; जुदागी नाही " ( राजवाडे १९।८ ). " पुत्रपौत्रपर्यन्त एक-रङ्ग केलें " ( ऐटि २।८० ).

**एक-सर** [ फा० यक्-सर् ] एकाएकीं.

**एक्सान; एक्सा** [ फा० यक्सान् ] एक-निष्ठ; एकसारखा. " धण्याची एक्सान चाकरी केली हें सुरुत पदरीं आहे " ( खरे १।४०९ ). " आपण तों साहेबाचे खिज्मतीस एक्सान असों " ( इम ७५ ). "जमाना एक-सा नाही" ( राजवाडे ५।८५ ).

**एक्सू** [ फा० सू=बाजू ] एकनिष्ठ. "खाना-जाद नौकर एक्सू "

**एकाएकीं** [ फा० यकायक् ] एक्दम; अकस्मात्.

**एकी** ( स्त्री० ) [ फा० यकी ] ऐक्य.

**एकीन; यकीन** ( स्त्री० ) [ अ० यकीन् ] दृढमत; खात्री; नक्की. " ब-वाजिबी ताकीद होईल हे एकीन समजोन " ( राजवाडे १५।१५२ ).

**एखलास; एख्लासी** ( स्त्री० ) [ अ० इख्लास् ] मैत्री; यगानगत. " तरिका एकलासीचा" ( राजवाडे १०।१६५ ).

**एगानगत; यगानगत** ( स्त्री० ) [ फा० यगानगत् ] ऐक्य; स्नेह. " दुनियाईत दोंही दौलतीची एगानगत मश्हूर " ( राजवाडे ५।३१ ).

**एल्गार; येल्गार** ( पु० ) [ तु० ईल्घार् ] मोहीम; हल्ला; चढाई; उठाव.

**एल्ची** ( पु० )[ तु० ईल्ची ] वकील; हेजीब. " शाहमज्कुरास तोफा-तायफ देऊन एल्चीची रुख्सत करणार आहे " ( दिमरा २।५ ).

**एहसान** ( स्त्री० )[ अ० इह्सान् ] इह्सान; कृपा; उपकार. " इतके दिवस परभारें दौलतीवर एहसान होत गेली" (राजवाडे ५।३१ ).

**एहसान्मन्द** [ फा० इह्सान्मन्द् ] कृतज्ञ; आभारी. "पातशाहा आपला एहसान्मन्द होऊन पातशाहीचा बन्दोबस्त आपले हातून करून घेई ऐशी कारस्ती जी होईल, ती करावीच करावी " ( ऐच ११५ ).

## ऐ.

**ऐन; यैन** [ अ० ऐन् ] मूळचा ठरलेला शेतसारा; यैन; भर; मूळ; मुख्य. "साठ लाखांची बेरीज यैन व इजाफा मिळोन सिद्ध केली" ( राजवाडे ७।५३ ).

**ऐन-ज्वानी** ( स्त्री० ) भर-तारुण्य.

**ऐन-जिन्नस; ऐन-जिनसी** = खुद्द. "तरी ऐन-जिन्नस पदाजी यादवाचे दोघे बेटे एकोजी व कुसाजी गनिमाकडे आहेती" ( राजवाडे १५।१ ). "येविशीं तुम्हांस सर्कारचें पत्र आलें आहे तेंच ऐनजिन्नस पाठविलें आहे" ( खरे ६।२६३५ ). "त्याणींच तीं पत्रें ऐन-जिनसी भिवराव याजकडे पाठविलीं" ( खरे ६।२९५४ ).

**ऐना; आयना** ( पु० ) आरसा.

**ऐनाती** ( स्त्री० ) मूळ ठरविलेला शेतसाऱ्याचा आकार.

**ऐने-महाल** ( पु० ) आंतून सर्व बाजूंनीं ऐन्यांनीं मढविलेला दिवाणखाना; आरसे-महाल.

**ऐपत** ( स्त्री० ) [ अ० आफियत् ] सम्पन्नता; आर्थिक सामर्थ्य.

**ऐपत-दार** द्रव्यदृष्ट्या समर्थ.

**ऐब; अयब** ( पु० ) व्यङ्ग. "नाक लागलें तर फारसा ऐब दिसणार नाहीं" ( खरे ४।१५०५ ).

**ऐवज** ( पु० ) [ फा० इवज़् = बदला ] मत्ता; द्रव्य.

**ऐवजीं** [ फा० बि-इवज़ि ] बदली; जागीं.

**ऐशाराम** ( पु० ) [ अ० ऐश्+फा० आराम् ] चैन; सुखोपभोग.

## ओ.

**ओहदा** ( पु० ) [ अ० उह्दा ] कर्तव्य; ठराव; हक्क. "पातशाहाकडून वर्से घेऊन जावीं हा ओहोदा आमचा आहे" ( दिमरा १।१३१ ).

## औ.

**औकात; अव्कात** ( पु० स्त्री० ) [ अ० औकात् अनेक व० वक्त्चें ] गुज़ारा; चरितार्थ; निर्वाह साधन. "एणेंकरून आपला औकात चालत नाहीं" ( राजवाडे १८।४८ ). "तेणें करून आपली अव्कात चालत नाहीं" ( राजवाडे १५।२९३ ). "त्यांचा योगक्षेम चालावयासी कांहीं औकात नाहीं" ( राजवाडे १७।३९ ).

**औज़ार** ( न० ) [ फा० औज़ार् ] शीड.

**औरत** ( स्त्री० ) [ अ० औरत् ] स्त्री.

**औलाद** ( स्त्री० ) [ अ० औलाद् ] प्रजा.

**औसाफ** ( पु० ) [ अ० औसाफ् अनेक व० वस्फ् चें ] लौकिक; अस्करा; कीर्ती. "मोहिबांचा औसाफ होऊन येईल" ( राजवाडे ३।९१ ). "परशुरामपन्त यांस छत्रपतींनीं मारविले सबब विश्वासराव यास मारिले ही गोष्ट बे-हिशेबाची; आमचे घराण्याचे औसाफास योग्य न जालें" ( खरे ११।६१३५ ).

## क

**कङ्गाल** [ फा० कङ्गाला = चिक्कू ] भिकारी; दरिद्री.

**कङ्गोरा** ( पु० ) [ फा० कुङ्गुरा = कोट ] कड.

**कज्जा; कजिया** ( पु० ) [ अ० कज़ीया ] तण्टा; वाद; प्रकरण. "कज्या" ( सभासद ४८ ).

**कज्जे-दलाल** ( पु० ) भाण्डण उपस्थित करणारा; नारद; भाण्डखोर. "बाबले

पायाला हात लावून त्या हाताचें चुम्बन घेऊन वन्दन करण्याचा एक प्रकार.

**कद्र** ( स्त्री० ) [ अ० कद्र् ] किम्मत; पारख; चहा.

**कद्र्दान** [ फा० कद्र्-दान् ] गुणग्राहक; पारखी.

**कद्र्दानी** ( स्त्री० ) [फा० कद्र्दानी] गुणग्राहकता; मनुष्यपारख. " जें त्यांचे खावन्द्गिरीस व कद्र्दानीस उचित तेंच करितील " ( राजवाडे ३।१२० ).

**कद्र** ( स्त्री० ) [ अ० कद्र् ] शक्ती; प्रभाव; अधिकार; ठराव; करार. "आपणाकडे फौजेचे बेगमीस सरन्जाम कद्र करून दिला " ( वाडसमा १।१५५ ).

**कदिमी; कादिमाई** ( स्त्री० ) [ फा० कदीमी ] जुनेपणा; जुना लौकिक; जुना स्नेह. " सर्कारचें काम होऊन येईल; परन्तु तुमचे कदिमीस व निष्ठेस एकप्रकारें दिसेल " (राजवाडे १।३३५). " आपल्या कादिमाईस बोल न लागे तो विचार करणें " (राजवाडे ८।११९).

**कदीम** [ अ० कदीम् ] जुना; पुरातन; गैर-जदीद.

**कदीमिल्-अय्याम** [ अ० कदीमल्-अय्याम् ] पुरातन कालापासून. " कदीमल-अय्याम सेणवी मज्कूर याचे पिडी दर पिडी भोगवटा चालिला आहे " ( गोइसा १२ ).

**कन्दील** ( पु० ) [ अ० किन्दील् ] वारा लागून विझणार नाही अशी व्यवस्था ज्यांत आहे असा दिवा; फाणस.

**कनात; कनाथ** ( स्त्री० ) [ अ० कनात् ] कापडी भिन्त; ताडपत्रींची भिन्त.

**कपाप-चिनी** ( स्त्री० ) [ फा० कबाब्-चीनी ] एकप्रकारचें फळ.

**कफन; कफण** ( स्त्री० न० ) [ अ० कफन् ] मृताला गुण्डाळण्याचें वस्त्र; तिरडी. " त्याची कफन आणून त्यास माती दिल्ही " ( राजवाडे ६।११२ ).

**कफनी** ( स्त्री० ) [ फा० कफनी ∠ अ० कफन् ] फकिराचा पायघोळ सैल साधा सद्रा; जुभा.

**कफालत** ( स्त्री० ) [ अ० कफालत् ] जामीनकी; हमी. " हे दफा कफालतीचे अहद्-नाम्यांतील नाहीं " ( राजवाडे ७।९४ ).

**कफारत** ( स्त्री० ) [ ∠ अ० कुफ्र्; धर्तीवर वज़ारत, वकालत च्या ] तण्टा; तेढ. तुम्हांजवळ आम्हांविषयीं हरएक बाबेविशीं कफारत पडते, त्या गोष्टीवर न जावें " ( पाव ९ ).

**कबज़** ( न० ) [ अ० कब्ज़् ] पावती; पोंच. "ऐवज़ पावोन दीक्षितांची कबजें घेतलीं आहेत " ( राजवाडे १।२९४ ).

**कबाज़्गिरी** (स्त्री०) ताबा, अम्मल. "अलीकडे या राज्यांत कबज़्गिरी आधीं ज़ाली ते गांवीं ठाणें बैसवून तर्फा केलिया आहेत " ( राजवाडे १५।७८ ).

**कबज़; कब्जा** ( पु० ) [ अ० कब्ज़् ] ताबा; अम्मल; मूठ; पकड; स्वाधीन. " एकमूठ असते तर आपले हातीं कबज़ राहता " ( राजवाडे ६।६०० ). " शत्रूचे कब्जांत राहणें यापेक्षां जीव जाईल तर बहुत उत्तम " ( राजवाडे १२।९२ ). " साल-गुदस्त किल्ले रायगड मोगलास कबज़ जाला " ( राजवाडे १७।३८ ). कबज़् करणें= जिङ्कणें; ताब्यांत घेणें.

**कब्जी** ताब्यांतील; अमली. "लश्कर पावसाळे दिवसांत छावणीस आपले कब्जी देशांत यावें " ( चित्रगुप्त ३६ ).

**कबर** ( स्त्री० ) [ अ० क़ब्र् ] थडगें; समाधी; समाधिस्थ. " शेवटीं त्या प्रान्तींच कबर होऊन राहिले " ( मराचिथोशा ६ ).

**कबरस्तान; कबरस्थान** ( न० ) [ फा० कब्रिस्तान् ] मूठमाती देण्याची जागा.

**कबालत** ( स्त्री० ) **कबाला** ( पु० ) [ अ० कबालत्-ला ] सनदशीर विक्री. "देशमुखी आपली आपण खुश-रजावन्दीनें, कबालतीनें फरोख्त करून दिल्ही " ( राजवाडे १७।१ ).

**कबाला-पत्र** ( न० ) सनद; दस्तैवज् ( राजवाडे १२।१८० ).

**कबाहत** ( स्त्री० ) [ अ० कबाहत् ] दोष; गुन्हा; कुभाण्ड; तण्टा. " लटक्या कबाहती उठवितील " ( राजवाडे ५।७६ ). " खरें बोलावयासी जावें तर कबाहत उठेल; ती आटोपणें मुष्कील " ( राजवाडे ५।१६७ ). "आपआपल्यांत कबाहत लागल्यानें शत्रूस राजकारणें करावयास ज़ागा होती " ( राजवाडे १९।३५ ).

**कबिला** ( पु० ) [ अ० कबीला ] कुटुम्ब; बायकामुलें; परिवार.

**कबिलेदार**=कुटुम्बवत्सल; फटिङ्ग नाहीं असा.

**कबिले माही** [ फा० कबिल-माह् ] महिन्यापूर्वीं ( राजवाडे १०।१६४ ).

**कबुली** ( स्त्री० ) [ अ० कबूल् ] सम्मती; मन्ज़ुरी; स्वीकार.

**कबुलीजबाब** ( पु० ) [ फा० कबूलि-जवाब् ] वादीचें म्हणणें न्याय्य आहे असा प्रतिवादीनें न्यायसभेंत दिलेला लेख.

**कबुलायत; कबुलात** ( स्त्री० ) [ अ० कबूलीयत् ] सम्मतीपत्र; कबुलीनामा; करार नामा. " कबुलातीचा मज्कूर " ( खरे ४।१४५७ ).

**कबूल** = मान्य; पसन्त; अनुकूल.

**कबूल-कतबा** ( पु० ) कबुली-लेख. ( राजवाडे ३।४४ ).

**कबूल-कागद** ( पु० ) कबुली-लेख. " हा कबूल-कागद लिहून दिला " ( राजवाडे ६।१८० ).

**कबूतर; खबूतर** ( न० ) [ फा० कबूतर् ] कपोतपक्षी.

**कबूतर-खाना** ( पु० ) कपोतपक्ष्यालय.

**कम** [ फा० कम् ] अल्प. " ऐशीं मनुष्यें कम आहेत " ( राजवाडे ५।७६ ). " आपल्यास शिबन्दी कम पडे म्हणोन लिहिलें तें कळलें " ( राजवाडे ६।२२९ ).

**कम-अस्सल;कमसल**[फा०कम्-अस्सल्] हीनकुलांतला; नीच.

**कम-इज़्ज़त** ( स्त्री० ) अप्रतिष्ठा. " अमा गैरहिसाबी जाज़ती सोसून, कम इज़्तीने व गैर-मेहेरबानीने पेशजी ही खिद्मत केली नाहीं व पुढेंही न करूं " ( इम ६७ ).

**कम-कसर** [ अ० कस्र् =न्यून ] कमींत कमी. " मशार्निलेस ज़ाऊन कमकसर एक साल गुज़रलें ( राजवाडे १०।१६४ ).

**कम-कुवत** [ फा० कम्-कुवत् ] अशक्त; दुर्बळ.

**कम-ज़ात** [ फा० कम्-ज़ात् ] नीच; कमसल.

**कम-जादा** [ फा० कम्-ज़ियाद् ] कमी अधिक. " कमजादा होईल त्याप्रमाणें करार करून घेऊन लेहून पाठवितों " ( खरे १।४३८ ). " कम-ज़्वाद " ( वाडसमा २।२५४ ).

**कम-जास्त**=कमजादा; कमी जास्ती.

**कम-जोर** [ फा० कम्झोर् ] दुर्बळ.

**कम-तर** [ फा० कम्तर् ] अल्पतर; क्षुद्र; निःसत्व. "पातशाही कम्तर पडली असें समजून राजियानें विजापूरचे किल्ले तळ कोंकणांत होते ते सर्व घेतले" ( सभासद २०।२१ ).

**कम्तरता; कम्ताई; कमी** ( स्त्री० ) उणीव; उणें.

**कम्तरीन** [फा० कम्तरीन्] अत्यन्त क्षुद्र; अति नम्र; कमींत कमी. "बन्दे कम्तरीन" ( राजवाडे १५।९९ ). "या खेरीज् सिबन्दींचें कम्तरीन पन्नास साठ लक्ष देणें आहे" ( राजवाडे १२।८७ ).

**कम-तोल**= कमी तोलाचा; हलका.

**कम-नशीब** [ फा० कम्-नसीब् ] दुर्दैवी; कम्बक्त.

**कम-नशीब** ( न० ) **कम-नशिबी** (स्त्री०) [ फा० कम्-नसीबी ] दुर्दैव; कम्बक्ती.

**कम-बक्त; कम-बखत** [ फा० कम्बख्त् ] दुर्दैवी.

**कम्बक्ती** ( स्त्री० ) [ फा० कम्बख्ती ] दुर्दैव; मार खाण्याचा प्रसङ्ग.

**कम्बेश; कम्पेश** [ फा० कम्-व-बेश ] कमी अधिक; अदमासें. "कम्पेश चाळीस हजार फौज्" (खरे ७।३२८८). "त्याजपासून आम्ही पैके घेतो, तैसा कम्पेस घेणें तो द्यावा" ( इम १९५ ). "आहेरही कम्बेस दों हजारांचा आला" ( मद्बा ). "सला झाल्या प्रमाणें वर्तणूक कम्पेश ( तन्तोतन्त ) न केल्यास पारिपत्य होईल" ( खरे ५।२६०७ ). "सावकारी म्हणजे काचेचें बासन जरा कम्पेश जाहल्यास जन्मास मुकावयाचें काम" ( होळ्कै २२ ).

**कम्बेशी** ( स्त्री० ) न्यूनाधिक्य. "चाकरीच्या कम्बेसीचे इलाज्मास चिन्ता नाही, परन्तु हरामखोरीचे इलाज्मानें आमचे शिळास बट्टा आहे ( होळ्कै ३३ ).

**कम-हिम्मत** ( स्त्री० ) [ फा० कम्हिम्मत् ] भ्याडपणा; हलकटपणा. "याजवरून श्रीमन्तांस आपली कम-हिम्मत दिसेल" ( दिमरा १।२२ ).

**कमर; कम्बर** ( स्त्री० ) [ फा० कमर् ] कटी.

**कमर-गुर्दा** ( पु० ) कमरेस बान्धण्याची गदा ( इम १० ).

**कमर्गा; कम्बर्गा** ( पु० ) [ फा० कमर्गाह् ] कटिभाग; मध्य; सेनामध्य ( पाब २३ ). "भेटी घेऊन श्रीमन्तांस खालीं किल्ल्याच्या कमर्ग्यांत चौक्या आहेत तेथें घेऊन आले" ( खरे ६।३१९३ ). "कम्बर्ग्यांचे बुरूज्" (खरे ८।४११४).

**कमर्बन्द; कम्बर-बन्द** ( पु० ) [ फा० कमर्-बन्द् ] कमर-पट्टा; सिद्ध; तयार; मुस्तेद.

**कमर्-बन्दगी; कमर्बन्दी** ( स्त्री० ) [ फा० कमर्बन्द्गी; कमर्बन्दी ] सिद्धता; तयारी; मुस्तेदी. "तमाम खुश्कीतील सर्दारांनीं एक-दील होऊन इङ्ग्रजांचे तम्बीवरी कमर्बन्दी केली आहे" ( राजवाडे १०।१९९ ).

**कमर्बस्ता; कम्बरबस्ता** [फा० कमर्बस्ता ] बद्धकटी; सिद्ध; मुस्तेद ( सभासद ४० ).

**कमर्बस्ती; कम्बर्बस्ती** ( स्त्री० ) = कमर्बन्दी.

**कमान** ( स्त्री० ) [ फा० कमान् ] खण्ड-मण्डल; मेहेराप; धनुष्य; कमठा.

**कमान-गार** ( पु० ) [ फा० कमान्-गर् ] धनुष्यकरणारा; हाडवैद्य. "माण्डी जाया

ज़ाली; मग कमान-गार आणोन बांन्धिली" ( राजवाडे ६।११२ ).

**कमाणमारी** = धनुर्धारी ( चित्रगुप्त ३० ).

**कमाल** ( स्त्री० ) [ अ० कमाल् ] पूर्णता; पराकाष्ठा; पराकाष्ठेची; पूर्ण; कूल. "त्यांज़वरी दिवसें दिवस कमाल मेहेर-बानगी" ( चित्रगुप्त १११ ). "सान्या प्रान्तांत कमाल ( =कुल ) जमेवर रयत निस्वत दर सद्दे दहा रुपये ( खरे ५।२४७१ ).

**कयास; कियास** ( पु० )[ अ० कियास् ] तर्क; अनुमान;मत;विचार. "त्याज़वरून कियास करावा की" (राजवाडे ५।५२ ). "कयास पुरता करून आम्हांकडे किंमपि अन्तर नाहीं ऐसें समज़ोन" ( खरे ६।३१७२ ).

**कर्कशा** ( पु० ) [ अ० कर्कशा ] भाण्डण. "ते समयीं याणी भाऊपणियाचा कर्कशा केला नाही" (राजवाडे १६।१५).

**कर्ज़** ( न० ) [ अ० कर्ज़् ] ऋण.

**कर्ज़खत** ( न० ) ऋणपत्र.

**कर्ज़दार; कर्ज़दारी** ( पु० ) [ फा० कर्ज़्-दार् ] ऋणको; धनको. "सबब नादा-रीस आलों आणि लोकांचें कर्ज़दारी जाहलों" ( राजवाडे १३।९१ ). "तर्फ मज़्कूरची रयत कर्ज़दार ( ऋणको ) ज़ाली आहे; त्यास कर्ज़दाराची ( धनकोची) निकड होते आणि याव-यासी मवसर नाहीं" ( वाडसमा २।२२५). "आमचें अवलोकन त्यांज़ला कर्ज़दारांसारखें होतें" ( मदबा २।९१ )

**कर्ज़दारी** ( स्त्री० ) ऋणकोपणा.

**कर्ज़बाज़ारी** = अनेकांचें कर्ज़ काढलें आहे असा.

**कर्ज़रोखा** ( पु० ) कर्जखत.

**कर्ज़-वाम** (न०) [ फा० वाम्= ऋण] ऋण.

**कर्णा** ( पु० ) [ फा० कर्ना; कर्नाय् ] एक प्रकारचें वाजविण्याचें शिङ्ग.

**कर्यात** ( स्त्री० ) [ अ० कर्यत् = गांव ] तालुका; दहा-बारा गांवांचा पेटा.

**करम-फर्माय मुख्लिसान**= स्नेह्यांवर रुपा करणारा ( एक किताबत ) ( राजवाडे ३।४५१ ).

**करामत** ( स्त्री० )[ अ० करामत्] चमत्कार; चमत्कार करून दाखविण्याचें सामर्थ्य; कर्तृत्व; कौशल्य; खुबी.

**करामती** कुशल; हिकमती; हुन्नरमन्द.

**करामात** ( स्त्री० ) [ अ० करामात् अनेक व० करामत् चें ] महत्त्रुपा."जे ये समयीं आपलें येणें गोया ( =म्हणजे ) करामात ज़ालीं" ( राजवाडे ११९८ ).

**करार** ( पु० )[ अ० करार्] ठराव; निश्चय; निश्चित; मुक्रर; कायम. "मन्सबा करार केला" ( सभासद ३० ). "राजश्री नारायणराव घोरपडे यांस पाठवणार म्हणतात, करारांत (= निश्चित ) नाहीं" ( खरे ११।५६६६ ).

**करार-दाद** ( पु० ) [ फा० करार्दाद् ] ठराव.

**करार-नामा** ( पु० )ठराव-पत्र.

**करार-वाकई; करार-वाके** [ फा० करार् वाकिई ] घडल्याप्रमाणें; बरोबर; अचूक पणें. "करार वाकई हकीकत"( राजवाडे १८।५१ ). "त्यासी माली-मामल-तीचा इतला करार-वाकै देऊं" ( राज वाडे ( ६।६१२ ) "प॥ म॥ करार-वाके अमल होत नाहीं" (राजवाडे १८।५०).

**करारी** [ फा० करारी ] निश्चयी; बाणेदार.

**करिणा** ( पु० ) [ अ० करीना ] हकीगत; वर्तमान; कैफीयत; योग्यायोग्य विचार; सम्बन्ध; अनर्थ; प्रकार. "करिणा जाहीर केला" ( सभासद १४ ).

"करिणा कांहीं पातशाहास समजत नाहीं" ( सभासद ३९ ). "कांहीं करिणा जहाला" ( सभासद ३८ ). "आम्ही लोक कोणे करिणेयाचे व मोगल लोक कोणे करिणेयाचे हें राव साहेब बेहतर जाणत असतलि" ( राजवाडे ११५२ ).

**करोल; करोळ** ( पु० ) [ तु० करावुल. ] बन्दूकस्वार.

**करोळी** ( स्त्री० ) बन्दूकस्वारांचा मारा.

**कल्कल** ( स्त्री० ) [फा० कल्कल] वट-वट.

**कल्बी** [ अ० कल्ब्=मध्य ] मध्यें असलेला. "कल्बी काठी" (= मध्य डोलकाठी ) ( वाटमा ११२३६ ).

**कल्मा** ( पु० ) [ फा० कल्मा ∠ अ० कलिमा ] इस्लाम धर्मसूत्रः "ला इलाह इल्लल्ला-मुहम्मदुर्रसूलल्ला" (= अल्लाशिवाय दुसरा देव नाहीं-मुहम्मद अल्लाचा प्रेषित आहे ). कल्मा पढणें= मुसल्मानी धर्माची दीक्षा घेणें.

**कल्हई; कलई** ( स्त्री० ) [ अ० कल्ई ] कथिलाचा मुलामा; आरसा बनवण्यासाठीं काचेस एका बाजूनें लावावयाचें मिश्रण. "आरसे आहेत; ज्यांची कलई उडाली असेल व पालखीस लागू होत असे असतील ...ते हुजूर पाठविणें" ( राजवाडे १२।१४२) .

**कल्हईगार** ( पु० ) [ फा० कल्ईगर् ] कल्हई करणारा.

**कलन्दर** ( पु० ) [ फा० कलन्दर् ) भटक्या; दारुड्या; व्यसनी; लोकांतून उठलेला; बेपर्वा मनुष्य; दर्वेशांचा एक पन्थ; बन्धनांतील साधू.

**कलन्दरी** [ स्त्री० ] कलन्दराची वृत्ती अथवा अवस्था; आनन्दी बेपर्वाई.

**कलम** ( न० ) [ अ० कलम् ] बोरूची लेखणी; दुसऱ्या झाडांत बसवून एक जीव करण्यासाठीं तोडलेली पहिल्या झाडाची फान्दी; लिखिताचा भाग; प्यारा; बाब. कलम करणें=छाटणें, तोडणें.

**कलम-कसाई** ( पु० ) कार्कुनी डावपेचानें दुसऱ्याचे गळे कापणारा.

**कलम-जारी** ( स्त्री० ) विज्ञप्तिपत्रलेखन. "ते कलम-जारी करून फौज ठेवूं लागले" (मराचिथोशा ९).

**कलम-दान** ( न० ) [ फा० कलम्दान् ] लेखण्या ठेवण्याची लाम्ब पोकळ डबी.

**कलम-बन्द** [ फा. कलम्बन्द्] पत्रीं नमूद. "तेच मज्कूर येक जरा तफावत न करितां कलम्बन्द केले" ( राजवाडे ११४४ ).

**कलम-बन्दी** ( स्त्री० ) नोन्दणी, विषयवार नोन्दणी.

**कलम-बहाद्दर**=लेखणीशूर.

**कलम्वार**=विषयवार, तपशीलवार.

**कलमी** [ फा० कलमी ] लेखी; लिखित; पगारी. "जबानी बातमीस व कलमी बातमीस थोडेंबहुत अन्तर पडतच आहे" ( खरे ४।१४७० ). "या स्वारीस कलमी फौज ठेवावी असा इरादा" ( होळ्कर ५ ). कलमी करणें=लिहिणें. "मुम्बईकरांनीं आङ्ग्रे यांस कलमी केलें कीं" ( खरे ७।३५७१ ).

**कलाबतू** ( पु० ) [ तु० कलाबतून् ] रेशमी तन्तूभोंवतीं चान्दीची अगर सोन्याची तार गुण्डाळून केलेला जर.

**कलिशता** ( स्त्री० ) [ फा० खलिश् ] खळश; किल्मिश. "माझे मनांत आतां कलिशता नाही" ( राजवाडे ५।८४ ).

**कव्हा; कावा** ( पु० ) [ अ० कह्वा ]

बुन्द; कॉफी. " शहाजादे यासही कव्हा द्यावा " (राजवाडे ५।२२ ).

**कवायत; कवाईत** ( स्त्री० ) [ अ० कवाइद् अनेक व० काइदाचें ] युद्ध विषयक समुदायिक हालचाल; ड्रील; परेड; नियम; पद्धती; युक्ति; कारवाई. "लढाईचे समयीं कवातीनें चालावें" ( राजवाडे १०।६५ ). " सखारामपन्तांनीं कवाईत धरिली आहे जे " ( खरे ५। २६२५ ).

**कवायती; कवाइती; कवाइतीत**=कवायत शिकलेला; हिक्मती. " काळे कवाइतीत दहा पांच नित्य येतात " ( राजवाडे १०।१९१ ).

**कवाल** ( पु० ) [ अ० कव्वाल् ] गवई. " कवालाचें गायन ऐकून...बर्खास्त ज़ाले " ( राजवाडे ७।५०७ ).

**कवाला** ( पु० ) [अ० कबाला ] कबाला; सौदापत्र.

**कवाली** ( स्त्री० ) एक छटेल गानप्रकार.

**कवी-दील** [ अ० कवी-दिल् ] शक्त-हृदय.

**कवी-हाल** = ( ? ) बे-शक; बे-वस्वसा. " तुम्ही कवी-हाल होऊन आपल्या वतनावरी येणें " ( राजवाडे १७।३४ ).

**कशीश** ( स्त्री० ) [ फा० कशिश् ] ओढ; हट्ट. " नबाबाचे प्रकृतींत कशीश फार आहे " ( राजवाडे ५।१७१ )

**कस** [ फा० कस् ] व्यक्ती; जण. " कुणबीण कस एक ".

**कस्त; कसद** ( पु० स्त्री० ) [ अ० कस्द् ] हेतू; विचार; निश्चय; सनिश्चय मेहनत. " दुसरे रोजीं...ठाणें खाली देखोन कसद ठाणीं घेण्याचा केला " ( राजवाडे १५।२० ). " अब्दाली कोठें ? त्याचा कस्त कसा आहे ? " ( राजवाडे ११२४९ ). " पुण्यास यावें ही इङ्ग्रजाची मोठी कस्त आहे" ( खरे ७।३५८५ ). " आमचे कस्तीस चुकलों नाहीं " ( खरे ११।४२ ). " नाना जल्दीनें रवानगी होण्याची कस्त करीत आहेत " ( खरे ११।६१५४ ).

**कस्त-मशागत** ( स्त्री० ) [ अ० मशक्कत् ] श्रम-मेहनत ( समासद ३० ).

**कष्ट-मेहनत** ( स्त्री० ) परिश्रम ( सभासद ६४ ); खस्त-मेहनत ( चित्रगुप्त ७७ ).

**कस्बीण; कज़्बीण** ( स्त्री० ) वेश्या; कलावन्तीण; गुञ्जन-स्त्री.

**कस्रत** ( स्त्री० ) [ अ० कस्रत् ] बाहुल्य; व्यायाम; तालीम.

**कस्रती**-व्यायाम करून कमाविलेलें (शरीर).

**कस्रे-कम**=कम-कसर; कमींत कमी. " कस्रे कम हज़ार फिरङ्गी उतरले आहेत " ( चिरा १ ).

**कसब** ( न० ) [ अ० कस्ब् ] कौशल्य; कला; धन्दा; वेश्यावृत्ती. " शिपाईगिरीचें कसब जेथें तेथें लिहिण्याचें कसब मन्सब्याचें उणें असतें; येथें सारीं कसबें पूर्ण आहेत " ( खरे ६।२६५६ ). " या प्रान्तींचे तमाम मुसल्मान लोक प्यादगिरीचें कसब करून पोट भरतात " ( राजवाडे ५।६६ ).

**कसबाती**=कुशल कारागीर. " कसबाती लोक " ( वाडसमा २।७ ).

**कसबी; कस्बी**=कुशल; हुन्नरी; हुन्नर जाणणारा.

**कसम** ( स्त्री० ) [ अ० कसम् ] शपथ; सौगन्द. " यांहीं कसम खाऊन साङ्गून-पाठविलें कीं " ( राजवाडे १।४६ ).

**कसर** ( स्त्री ० ) [ अ० कस्र् ] उणीव;

खोट. " जमेंत कसर होऊन " ( राजवाडे १०।३४१ ).

**कसलमन्द** [फा० कसलमन्द् ∠अ० कसल् ] अस्वस्थ; आजारी; बिमार. "मीर-आलम याची तबियत कसलमन्द; येण्याची ताकद नाहीं " ( राजवाडे ५।१४३ ). " दौलाची तबियत कसलमन्द सबब मीर-आलम रात्रन्दिवस त्याचे समीप असतात ( राजवाडे ७।१०८ ).

**कसा** ( पु० ) [ फा० कीसा ] लाम्ब व अरुन्द अशी पिशवी; हमेणी.

**कसाब** ( पु० ) [ अ० कस्साब् ] खाटीक; कसाई.

**कसाबी** ( स्त्री० ) [ फा० कस्साबी ] खाटकाचा धन्दा; कौर्य; क्रूर. ' कसाबी करणी '.

**कसालत** ( स्त्री० ) **कसाला** ( पु० ) [ अ० कसालत्–ला ] पीडा; दुक्ख; सङ्कट; श्रम. " राजश्री गोविन्दपन्त मामा वृद्ध. त्यांनीं कसाला किती करावा " ( खरे ९।४६८४ ). " त्यांजला लिहिण्याचा कसाला होईना " ( राजवाडे ६।२५१ ).

**कसीद करणें.** [ ∠ फा० कशीदन् ] काढून घेणें.

**कसीदगी** ( स्त्री० ) कमी करणें. " जरूर एकवक्त पादशाही कामाबद्दल कांहीं कसीदगी केले तरी अवल–सवाईनें मुबादला देऊनु बाजद कसीद करावें" ( इम ६७ ).

**कसूर** ( स्त्री० ) [ अ० कुसूर् ] चूक; हयगय.

**कसोशी** ( स्त्री० ) [ फा० कोशिश् ] मेहनत; दक्षता. " कसोसींत आणणें " कष्टसाध्य करणें, जेर्दस्तींत आणणें ( पाब १६ ).

**कहर** ( पु० ) [ अ० कह्र् ] ईश्वरी क्षोभ; अनर्थ; गहजब.

**कहरी** [ अ० कह्री ] कडक; निष्ठुर. " पारिपत्यही कहरी होत असतें " ( खरे ८।४३९४ ).

**कहरी** [ फा० कारी ] प्राणहारक; मर्मभेदी. " जखमा शस्त्रांच्या कहरी लागून मृत्यू पावले " ( चित्रगुप्त ७० ).

**कहार** ( पु० ) कहर. कहार माण्डणें ( बायकी शब्द ) अतिशय त्रास देणें; उच्छेद माण्डणें

**कही** ( स्त्री० ) [ फा० कही ] दाणा–वैरण वगैरे मिळवून आणणारी लश्करी तुकडी; दाणा – वैरण. " मशार्निल्हेचे खेड्यांची कही शेतें कापून नेली " ( खरे ५।२३१२ ).

**काईल; कायल; कायर** [ अ० काहिर् जेता ] दण्डित; जित; कुण्ठित; निरुत्तर. " दोंहींकडून तुम्ही काईल व्हाल तेव्हां आम्हांवर शब्द " ( राजवाडे १।२२६ ). " पत्र कोठें आहे तें काढावें म्हणजे आम्ही त्यांस काईल करूं " ( खरे ५।२४७३ ). " याप्रमाणें बोलून कायल केलें" ( दिमरा १।३६ ).

**कागद** ( पु० ) [ अ० काघज़् ] चिन्ध्या वगैरेपासून रान्धा तयार करून लिहिण्यासाठीं केलेलें पत्र.

**कागद–पत्र** ( न० ) पत्र; चिट्ठी–चपाटी. "कागज-पत्र " ( राजवाडे १३।९३ ).

**कागदी** = कागदाचा; कागदाप्रमाणें पातळ सालीचें ( लिम्बू ). कागदी घोडे नाचविणें=कलम–बहाद्दुरी दाखविणें. कागदी जवान=काडी–पेहेलवान.

**काजी** ( पु० ) [ अ० काझी ] मुसल्मानी धर्मशास्त्राप्रमाणें निकाल देणारा मुसल्मान न्यायाधीश.

**काजी-शरा** [ अ० शर्अ = धर्मशास्त्र ] धर्मशास्त्रज्ञ ( वाडशाछ १८३ ).

**कानू** ( स्त्री० ) [ अ० कानून् ] कायदा; अट; पट्टी. " पूर्वापार यास माफ असतां हाली नवी कानू करावयास कायी गरज् ! " ( राजवाडे २०।३६० ). " त्यांनीं अशी कानू कधीं आपणावर चढवून घेतली नाही ते आतां कसें कबूल करितील ! " ( खरे २।६१४ ). " हल्ली सालोसाल नज़रेची कानू गांवगन्नास बसविली ते दूर करावी " ( ऐटि २।४१ ).

**कानू–काननात** ( स्त्री० ) [ अ० कानूनात् अनेक व० कानून्चें ] पट्टी. " वेढी, जेठा व बाजे कानू–काननातीचा उपसर्ग न देणें " ( राजवाडे २०।३६० ).

**कानूगो; कानुगो; कानगो** ( पु० ) [ फा० कानून्–गो ] जमिनींची, वहिवाटींची, व वसुलाची नोन्द ठेऊन माहिती पुरविणारा व केव्हां केव्हां मोजणी करण्यांत व धारा ठरविण्यांत मदत करणारा वतन्दार मुल्की अधिकारी.

**कानगोई; कानूगोई** ( स्त्री० ) कानुगोचें काम अगर वतन. " सर्कार मज़्कूर येथील कानगोईचें वतन " ( राजवाडे १२।१७४ ).

**कापूर** [ अ० काफ़ूर् ] एका वनस्पतीपासून निघणारें सुगन्धी हिमशुभ्र ज्वालाग्राही द्रव्य.

**काफर; काफीर** [ अ० काफिर् ] अश्रद्धधान; यहुदी, ख्रिस्ती अगर मुसल्मान धर्मग्रंथावर विश्वास न ठेवणारा; नास्तिक; लुच्चा; लबाड. " या कलीमध्यें मुसल्मान काफर जहाले यांचा संहार करावयाकरितां रहीमनें पैदा केला आहे " ( चित्रगुप्त ७० ).

**काफर–शाई** ( स्त्री० ) काफीर-राज्य. " यवनांचे मनांत कीं काफर–शाई जाहली " ( ऐटि १।१८ ).

**काफला** ( पु० ) [ अ० काफिला ] प्रवाशांचा अगर लमाणांचा ताण्डा; कार्वाण; समूह ( जहाजांचा ). " कितीयेक ते काफले लूटितातीं " ( इम २४ ).

**काबजात; काबीजाती** ( स्त्री० ) ताबा; अम्मल; सत्ता. " यानन्तर सिद्दीच्या किल्ल्याच्या काबजातीची मुबारखी औं शहामत–पन्हास दिली जाली " ( ऐटि २।९० ). " यावरी त्यांची काबीजाती बैसली " ( मेदसमा २१७ ).

**काबीज** [ अ० काबिज़् ] कब्जा घेणारा; सत्ताधीश; आधीन; हस्तगत. " पुन्हा पाटीलबावा सल्तनतींत काबीज होईल" ( दिमरा १।२५२ ).

**काबीज–मुतसरीफ** [ अ० काबिज़् = अ० मुतसर्रिफ़् ] कब्जा व वहिवाट उपभोगणारा. " हर्गाह की काबीज–मुतशरीफ बहात्तर वर्सें नाहीं; आणि सनद्–अस्नादही नाहीं, मर्द तुफानी आहे " ( राजवाडे २०।४७ ).

**काबील** [अ० काबिल्] कर्तृत्ववान्; कर्तबगार.

**काबुची** [ फा० काबूची ] लुच्च्या; धूर्त; फसव्या; मकरी. "मोगल लोक काबुची आहेत " ( राजवाडे १।५२ ).

**काबू** ( स्त्री० ) [ फा० काबू ] सन्धी; कब्जा; नियन्त्रण; बळकट; मज़्बूत. " आपली काबू ( सन्धी ) साधून तेथें न गुन्ततां महाराजांनीं स्वराज्यास यावें, पादशहा याचे कावेशींत न रहावें " ( चित्रगुप्त ५८ ). " तूर्त त्याची

काबू साधली आहे एवढें खरें" (खरे ७।३३१०). "मस्लत काबूस आली (=सन्धीस आली, जमली) त्यास आम्हास देणें प्राप्त झालें...राजनीती अशीच आहे" (खरे ११।१४४). "पातशाहाचे मनांत...स्वामींचे काबूंत राहावें" (दिमरा ।११). "ऐसें जाणून काबूपुर्ते (वेळ मारून नेण्यासाठीं) इङ्ग्रजासी बोलणें पैका घेतला" (दिमरा ११५२). (चेनराय दुर्ग) "इतका काबू (=मज़्बूत) किल्ला असून एकाएकीं फत्ते झाला" (खरे १२२४).

**काबू-वख्त** (पु०) सन्धी. "खाली मैदान देखून व काबू-वख्त पाहून" (खरे ७।३५६७). "हाच काबू-वख्त मुखालिफाचे पामल्लीचा आहे" (राजवाडे १०।१९१).

**काबूकार; काबूयार; काबूवर** [फा० काबूयार्] धूर्त; हिकमती. "जाटांत जीव आहे...मोठा काबूकार आहे" (राजवाडे ११।३९). "काबूवर फिरङ्गी खरा" (आयाह ३).

**कायदा** (पु०) [अ० काइदा] नियम; शिरस्ता; वहिवाट.

**कायदेबाज़** = कायदेपण्डित.

**कायदेशीर** = सशास्त्र; न्याय्य.

**काईम; यम** [अ. काईम्] उभा; स्थित; मज़्बूत; गैर्-रद्द; काबीज. "परन्तु आठपन्धरा दिवसांत सारीं स्थळें इङ्ग्रजांनीं काईम करितात" (खरे ११।६०७९).

**कायम-ज़बान** स्थितप्रतिज्ञ. "फरासीस कायम-ज़ुबान व बहाद्दर आहे" (चिरा २४).

**कायम-मकाम** (पु०) [अ० काइम्-मकाम्] "येक अधिकारी तगीर होऊन त्याचे कामावर दुसरा होणें त्यास कायम-मकाम असें म्हणावें" (राजवाडे ७।९५).

**काय -मिज़ाज़** [काइम्-मिझाज्] निश्चयी; अचञ्चल; (स्त्री०) कायम मिज़ाजी. "साम्प्रत तिकडे कायम मिज़ाज़ व मज़्बूत एक नबाब नजबखान आहेत" (दिमरा ११८). "तस्मात् काईम-मिजाज़ नाहीं (खरे ८।३९:२).

**कायम-मिज़ाजी** (स्त्री०) [फा० काइम-मिझाजी] करारीपणा; निश्चयीपणा. "यांचे कायम-मिज़ाजीचा प्रकार म्हणावा तरी मेणाचें नाक यांचा मिजाज़ आहे" (दिमरा ११२३८).

**कायमी; काईमी** (स्त्री०) [फा० काइमी] निश्चिती; स्थैर्य; मज़्बुती. "कलकत्तेकराचें लिहिणें रास्त, दुरुस्त व कायमीचें (खरे ७।३५६८). "सर्कारचे वचनाची कायमी कशी ते आइन्दे ज़हुरांत येईल" (राजवाडे १०।१६६). "स्नेहांत दुसरा प्रकार न घडला व घडावयाचा नाहीं; तिकडील मात्र कायमी असावी" (राजवाडे ५।१८८). "पहिल्या दिवशीं ज़ागा घेतली त्याचीच काईमी होते" (ऐकिप्र ८८).

**कायर** [? अ० काहिर्] लाचार. "रुपये शेर अन्न व रुपयाच्या पांच पेण्ढया चाऱ्याच्या झाल्या; ते कायर ज़ाले" (होके ६३).

**कार्किंद** (स्त्री०) [फा० कार्कर्द्] राजशासन; अम्मल; राज्यासनाचा काल.

**कार्किंर्दी-दर-कार्किंदा** = एकामागून एक राजाच्या अम्मलांत (राजवाडे ८।१६).

**कार्कुनी** ( स्त्री० ) [ फा० कार्कुनी ] कार्कुनाचें काम अगर हुद्दा.

**कार्कून** ( पु० ) [ फा० कार्कुन् ] कार्यकर्ता; मुत्सद्दी; हिशेब व पत्रलेखक; खर्डेघाश्या. " महालीचे कार्कुनानी इस्कील करून दुम्बाला करीत नाहींत " ( राजवाडे २०।१५२ ).

**कार्खाना** ( पु० ) [ फा० कार्खाना ] उद्योग-शाळा; काम करण्याची जागा.

**कार्खान-नीस** ( पु० ) = कार्खाना-कार्कून.

**कार्खान-दार** ( पु० ) कार्खान्याचा मालक.

**कार्खानदारी** ( स्त्री० ) कार्खान्याची मालकी; भाण्डवल-सत्ता.

**कार्खानेजात** [ फा० कार्खानजात् ] कार्खाने. " तमाम कार्खानेजात चराईस जाण्याचा हुकूम जाला " ( राजवाडे ७।१६६ ).

**कार्गर** [ फा० कार्गर् ] परिणाम-कारक; लागू; प्राणघातक.

**कार्गरी** ( स्त्री० ) परिणाम; यशस्विता. " परन्तु अडचण व पर्जन्य फार यास्तव कार्गरी जहाली नाहीं " ( राजवाडे १४।३५ ).

**कार्चोबी** [ फा० कार्चोबी ] वेलबुट्टीदार. " खिलत पाच पारचे कार्चोबी दिला " ( राजवाडे ७।७० ).

**कार्पर्दाज्** ( पु० ) [ फा० कार्पर्दाज़् ] कार्य कर्ता; मुत्सद्दी ( खरे ७।३५६६ ). "परन्तु कार्पर्दाज् यांचा अर्ज् आपल्यास मान्य पडून इरादा लढाईचा धरिला " ( राजवाडे ५।३० ).

**कार्भार** ( पु० ) [ फा० कार्-उ-बार् ] व्यवस्था; राजशासन; इन्तज़ाम; उद्योग.

**कार्भारी** ( पु० ) [ फा० कार्बारी ] व्यव-स्थापक; कार्यकर्ता; दिवाण; ( कुणबाऊ भाषेंत ) नवरा.

**कार्वाण** ( पु० ) [ फा० कार्वान् ] व्यापाऱ्यांचा अगर प्रवाशांचा ताण्डा; काफला.

**कारन्दाज** = कावील; कारस्थानी.

**कारन्दाजी** ( स्त्री० ) कारस्थानीपणा; कारस्तानी; शहाणपणा. " कारन्दाजीची मस्लत साङ्गितली ते न ऐकिली " ( जोरा ३६ ).

**कारस्तानी** ( स्त्री० ) [ फा० कारिस्तान् ] कार्य-कौशल्य. " तुम्ही आपले कारस्तानीनें नबाबांस सुख दाखवावें हेंच योग्य " ( राजवाडे ५।२७० ). " तुम्ही कारस्तानी व हिम्मत धरून काम केलें " ( ऐटि ५।१५ ).

**कारागिरी** ( स्त्री० ) कौशल्य; करामत; कसब.

**कारागीर** ( पु० ) [ फा० कार्गीर् ] कुशल कामकरी.

**कारीगर; कारीगार; कारेगर; कारेगार** ( पु० ) [ फा० कारीगर् ] कुशल कामकरी; कामकरी. "बहुत दिवस नगास लागले. त्यास दङ्गा इकडे; कारीगर नाभिळे" ( राजवाडे ३।१६८ ). "रेशीम पाठविलें हें कारेगरास देऊन धोतरजोडे...करवणें" ( मद्बा २।३६ ). "गाडे छकडे चारपांच भरून बहुन सिताबीनें कारीगार सुद्धां पाठवून देणें" ( राजवाडे ६।३८६ ).

**कार र; कारेगार; कारागीर** [ फा० कार्गर् ] परिणामकारक; लागू. "हल्ला जहाली होती परन्तु कारीगार जहाली नाहीं" ( राजवाडे १४।३५ ). "होळकर वगैरे यांची हल्ला झाली होती, परन्तु कारेगार झाली नाहीं" ( खरे ११।३९७ ). " बाहेरच्या तोफा अद्याप कारागीर नाहींत ( खरे ११।६१३८ ).

**कारेगिरी** ( स्त्री० ) [ ∠फा० कार्गर् ] परिणाम. " चेनराय दुर्गास तीन दिवस

तोफा लाविल्या आहेत......कारे गिरी होत आहे; परन्तु फारसें भिन्ताड पडत नाही " ( खरे १२११ ). " तुमच्यानें जे कारोगिरी होईल ते करणें " ( राजवाडे ६।३८५ ).

**काल्बूत** ( पु० ) [ फा० काल्बुद् ] पगडी, जोडा, कपडा वगैरे बेतण्याकरितां केलेली लाकडी आकृती.

**कावा; कव्हा** ( पु० ) [ अ० कह्वा ] बुन्द; कॉफी.

**कावा–दावा** ( पु० ) [ अ० द्अवा=भाण्डण ] भेद–दण्ड. "मूलख काव्यादाव्यानें सर करून" ( पाच १७ ).

**काशीद; कासद** ( पु० ) [ अ० कासिद् ] नेहमीचा पत्रें पाहोंचविणारा दूत. "कासद" ( राजवाडे ८।२०१ व दिमरा ११९० ).

**काहिली** ( स्त्री० ) [ फा० काहिली < अ० काहिल्=आळशी ] आळस; दिरङ्गाई. " सुस्ती या काहिली इत्यादि अन्याय " ( मराआ ३० ).

**काहील; काईल** निरुत्तर ( वाडमा १।१३८ ).

**किताब** ( स्त्री० ) [ अ० किताब् ] पुस्तक लेख.

**किताब्खाना** ( पु० ) पुस्तकालय, ग्रन्थसङ्ग्रहालय; ग्रन्थविक्रीचें दुकान.

**किताब** ( पु० ) [ अ० खिताब् ] सम्बोधन, पदवी. " बहादुरीचा खतबा दिला व काम दिवानीचें याजवर बहाल राखिलें " ( राजवाडे ३।३४९ ).

**किताबत; किताबती** ( स्त्री० ) [ < अ० किताबत् ] लेख; [ < अ० खिताब् ] पदवी. " त्यांस हम्बीरराव नांव–किताबती देऊन " ( सभासद ६२ ).

**कित्ता** ( पु० ) [ अ० किताब् लेखन; अ० कित्आ=चिठ्ठी ] आदर्शभूत म्हणून पुढें ठेवावयाचा वळदार अक्षरें काढलेला तक्ता; वळण; बाबत; चिठ्ठी.

**कितेब** ( पु० ) किताबत; लेख. " हिशेबकितेब " ( राजवाडे १५।२५४ ).

**किनूखाप** ( पु० ) [ फा० किम्खाब् ] बहुरङ्गी जर्तारी कापड.

**किन्खापी** किन्खापाचें.

**किन्तान** ( न० ) [ अ० कतान्–कत्तान् ] एक प्रकारचें कापड.

**किनार; किनारी** ( स्त्री० ) [ फा० किनार् ] कांठ; कोर; लेस.

**किनारा** ( पु० ) [ फा० किनारा ] तीर; कांठ.

**किफायत; किफाईत** ( स्त्री० ) [ अ० किफायत् ] नफा; फायदा; लाभ.

**किफायत–सर्फा** ( पु० ) फायदा.

**किफायत–तर्फेवार** फायदेशीर ( वाडमा १।८९ ).

**किफायती; किफायतशीर** [ फा० किफायती ] फायदेशीर.

**किब्लेगाह** [ फा० किब्लागाह = प्रार्थना करितांना ज्या दिशेकडे तोण्ड करावयाचें ती दिशा ] वन्दनीय. किब्लेगाह नारायणराव साहेब " ( खरे ७।३५६५ ).

**किम्मत** ( स्त्री० ) [ अ० कीमत् ] मोल; योग्यता.

**किमती** [ फा० कीमती ] मूल्यवान; बहुमोल.

**किमया** ( स्त्री० ) [ फा० कीमिया ] हीन धातूचें सुवर्ण बनविण्याची गूढ विद्या.

**किमयागार; किमयागर** ( पु० ) [ फा० कीमियागर् ] किमया करणारा.

**किर्द** ( स्त्री० ) [ फा० कर्द्=काम ] रोज़निशी; रोज़चा जमाखर्च नोन्दण्याची वही; लावणी. "पावसाळा, कौल देऊन

आज्ञा केली तर रयत उमेद धरून किर्दी करितील" ( राजवाडे ६।१४८ ).

**किर्द-आबादानी** (स्त्री०) लावणी-सन्चणी. "तरी बेशक होऊन आपले गांवचे गांवीं राहून वसाहत करून किर्द-आबादानी करणें" ( राजवाडे १६।५५ ).

**किर्द-महामुरी; किर्द-मामुरी** ( स्त्री० ) [ ∠अ० मअमूर्=आबाद् ] लावणी-सन्चणी; लागवड व वसाहत. " त्यांणीं तेथें किर्द-मामुरी केली " ( राजवाडे १५।२०२ ).

**किर्मिजी** [ अ० किर्मिझी ] एक प्रकारच्या चकाकणाऱ्या लाल रङ्गाचा; क्रमिज.

**किराया** ( स्त्री० ) [ अ० किराया ] भाडें. "दोन नांवा, तीनशें रुपयांची किराया करून पटण्यास आलों" ( पद्मव ७३ ).

**किल्ला** ( पु० ) [ अ० कल्आ ] गड; दुर्ग; कोट.

**किल्ली** ( स्त्री० ) [ फा० किलीद् ] चावी.

**किल्लेदार** ( पु० ) [ फा० कल्आ-दार् ] दुर्गाधिपती; किल्लेकरी.

**किल्लेज़ात** [ फा० कल्आ-जात् अनेक व० ] किल्ले. "किल्लेजातचा बन्दोबस्त" ( वाडसमा ३।१६ ).

**किल्लेनशीन**=किल्यावरील; किल्ल्यावर कैद. "मन्सबदार किल्लेनशीन वसन्तगड" ( राजवाडे १५।९५ ) "रघुपतराव नारायणाचा पक्ष केला; ते किल्लेनशीन केले" ( मद्बा १।७८ ).

**किल्लेबन्द** [ फा० कल्आबन्द् ] किल्ल्यास वेढा पडल्यामुळें अडकलेला. "एखादे किलियावर राहून किल्ला भाण्डवून दम खावा म्हणतांही किल्लेबन्द झालें असतां परिणाम नाहीं" ( मराचिथोशा ३७ ).

**किलाफ** ( पु० ) [ अ० खिलाफ ] वर; वैषम्य; संशय; कपट.

**किलावा** ( पु० ) [ फा० कलावा ] हत्तीचा गळपट्टा, ज्यांत माहूत पाय अडकवितो. "पायावरती चढोन किलाव्यांत बसले" ( आयाह ११ ).

**किस्त; किस्ती** ( स्त्री० ) [ अ० किस्त् ] कर्जफेडीचा हप्ता; निशा. "किस्तीस इतकी शर्त कशास पाहिजे ? " ( राजवाडे ५।३२). "बाकी बत्तीस लक्ष रुपये राहिले ते सावकारी खिस्ती करून द्यावी" ( खरे ४।१८६५ ).

**किस्त-बन्दी** ( स्त्री० ) [ फा० किस्त्-बन्दी ] हप्तेबन्दीनें देण्याची फेड; निशा. "किस्तबन्द्या करून" ( दिमरा १।१२४ ). "सदर्हू पन्धरा लाख रुपये दर्साल येक लक्षप्रमाणें पन्धरा वर्षांत अदा करावे या प्रमाणें किस्तबन्दीचा ठराव जाला" ( राजवाडे ७।३४ ).

**किस्ती** ( स्त्री० ) [ फा० कश्ती ] होडी; नौका. " येथून एक किस्ती भाड्यानें साठ रुपये करार करून निघालों " ( पद्मव ८० ).

**किस्मत** ( स्त्री० ) [ अ० किस्मत् ] प्रारब्ध; नशीब. " परन्तु दुनियादारी किस्मतींत थोडे दिवस होती " ( ऐटि ३।१७ ).

**किसा; किस्सा** ( पु० ) [ अ० किस्सा ] गोष्ट; तण्टा. " याप्रमाणें किसे किनई साङ्गतो " ( खरे ८।४३५४ ). " या प्रमाणें किस्सा निर्गत होऊन स्वारी माघारी फिरली " ( होकै ४ ).

**किसान** ( पु० ) [ फा० किसान् ∠फा० किर्शान् ] शेतक्या; कुणबट. " तेथें अफ्जल तूं किसान मजला दृष्टीपुढें दीसतें " ( चित्रगुप्त २६ ).

**कुडता; कुडती; कुडतें** [फा० कुर्ता] अङ्गरख्याच्या आंतील सैल सद्रा.

**कुती** ( स्त्री० ) [ तु० कूती ] पेटारी. "अङ्गुराची कुती" ( दिमरा १।१०१ ).

**कुद्वा** ( पु० ) [ अ० कुद्वा ] आदर्शभूत पुढारी. "कुद्वा उमराय नस्रत निशान" ( इम ६५ ) = यशस्वी अमिरांचा आदर्शभूत पुढारी.

**कुद्रत** ( स्त्री० ) [ अ० कुद्रत् ] सामर्थ्य; ईश्वरी शक्ती; निसर्ग.

**कुद्रती** [ फा० कुद्रती ] ईश्वरी; ईश्वरदत्त; नैसर्गिक.

**कुन्ज्** ( पु० ) [ फा० कुन्ज् ] कोंपरा. "कुन्जावरी" ( वाडमा २।१७२ ).

**कुन्हा** ( पु० ) [अ० कुन्ह् ] मर्म; खोंच; दोष; किल्मिष; दंश; वैर ( ? ८ फा० कीना ). "त्याचे कुन्हे ध्यानांत येण्याकरितां अलाहिदा पुरवणी तुम्ही लिहिली" ( राजवाडे ७ खलप २।२० ). "त्यांणीं तहाचे मज्कूर तुम्हांस सांङ्गितले त्यांतील दगाबाजीचे कुन्हे आहेत ते तुम्हांस समजले नसतील "( राजवाडे १२।८७). "हिशेबाची कुन्हा बाईस काय समजे !" ( मद्बा २।२४९ ). "आम्ही जिवादारम्य श्रम करून कामें करावीं त्यांत उगेच कुन्हे काढीत जावे हे भाव जाहले" ( ऐटि ). "मागील गुणदोष, चित्तांत कुन्हा न राहे अशीं श्रीमन्तांचीं ममतापुरस्कर पत्रें आणवावीं, नी मग रवानगी करावी" ( मद्बा १।११३ ). "नाहींतर फडणीस पन्त कुन्ह्यानें म्हणतात असें वाटत होतें" ( ऐटि १।३१ ). "परन्तु त्या शिलेदाराचे बायकोस नांव कळतांच कुन्हा धरून भोजनास चाङ्गलें करून घातलें आणि वाटेंत मारेकरी ठेऊन आपल्या दादल्याचा सूड घेऊन मारविलें" ( राजवाडे ४।२९ ).

**कुफ्राण; कुफ्राण्ड** ( न० ) **कुफ्राणा** ( पु० ) [ अ० कुफ्रान् ] काफरशाई; अधर्म; लबाडी; हरामखोरी. "पुढें धर्म उच्छिन्न होऊन तेरावे सद्धींत कुफ्राण माजेल" ( ऐस्फुले ६५ ). "कुफ्राणा तर खराच" (खरे २।९८५). "गांवांत हरिकीर्तन केल्यास कुफ्राणा करितात म्हणोन धोण्डेमार करावा" ( वाडसमा ३।१६९ ).

**कुफर** ( पु० ) [ अ० कुफ्र ] स्वामिद्रोह; निमकहरामी. "त्यांणीं सर्कारलक्षें कांहीं एक कुफर न करितां चालावयाचा तहनामा ठरविला" ( मराचिथोशा ६७ ).

**कुफार** ( पु० ) [ अ० कुफ्फार् अनेक व० काफिर्चें ] लुच्या; हरामखोर; बखेडेखोर. "जकार नामक म्हैसकर...हस्तगत करावा; सगळा कुफार तो आहे" ( खरे १०।५२०२ ). "एक दोन कुफार तोडले म्हणजे सर्वांवरी दाब बसेल" ( खरे १।९९ ). "आपण लिहिल्या अन्वयें कुफार तितके तिकडे नेमावेंसें ठरलें" ( खरे ६।२६७३ ).

**कुभाण्ड** ( न० ) कुफ्राण; बनावट पुराव्यांचा डोलारा; खोटा आळ.

**कुभे** ( स्त्री० ) [ अ० कुब्ह् ] दोष. "म्हणजे यांत हुस्न–कुभेह कोणती आहे ती ध्यानांत येईल" ( राजवाडे ५।८४ ).

**कुमक** ( स्त्री० ) [ तु० कुमक् मदत; उपराळा; उपराळा करणारी सैन्याची तुकडी.

**कुमेत; कुमैत; कुमाईत** [ अ० कुमैत् ] मानेचे केस व शेंपूट काळें असा ताम्बूस रङ्गाचा ( घोडा )." परन्तु ती ( =करवीरची जिजाबाई ) आटोकाट कुमैत ( ? =हुशार अगर संशयी ) )

तिजला कोणाचा विश्वास नाहीं ( खरे १।३१२ ).

**कुर्नीस; कुर्निसी;**(स्त्री०)**कुर्निसा; कुर्निसात** ( पु० ) [ तु० कोर्निश्; अनेक व० कोर्निशात् ] नम्रतापूर्वक वन्दन. " कुर्निसी " ( ऐस्फुले ७५ ).

**कुर्बाण; खुर्बाण** ( न० ) [ अ० कुर्बान् ] ईश्वरास दिलेला बळी; अर्पित.

**कुर्बाणी ईद** ( स्त्री० ) मुसल्मानांचा ' बली-दिन. '

**कुराण** ( न० ) [ अ० अल्–कुर्आन् ] मुसल्मानांचा प्रख्यात धर्मग्रन्थ.

**कुर्रे–बाज़** [ फा० कुर्आ–बाझ् ] सोङ्गट्या खेळणारा; बुद्धिबलाढ्य; काबील; ऐट-बाज़ " मनुष्य कुर्रेबाज़; हा येथें असल्यास मार्वाडचे सर्दार लगामी लावील " ( जोरा १० ).

**कुल; कूल** ( न० ) [ अ० कुल्ल् ] अखिल; तमाम; बेरीज.

**कुल–अख्त्यार** ( पु० ) सर्वाधिकार.

**कुल–अख्त्यारी** ( पु० ) सर्वाधिकारी.

**कुल्कुल्ला** ( पु० ) [ अ० कुल्कुल्लान् ] खानगी कार्भारी; सर्वाधिकारी ( मराचिंथोशा ८९ ).

**कुल्फी** ( स्त्री० ) [ अ० कुफ्ली ] तर्साळे वज़ा चिनीमातीचें भाण्डें. "कुल्फ्या–झांकणीसुद्धां" ( राजवाडे २२।११ ).

**कुल्बाब–कुल्कानू**=सर्व प्रकारच्या पस्त्या व नियम. हा शब्दचय सनदांत येतो.

**कुलाब** ( पु० ) [ अ० कुलाब्=ससाण्याची टोपी ] टोप; आच्छादन. "टोपीस हिरा-मोती मानीकाचे कुलाब घालोन " ( इम १३ ).

**कुलाबे–दार** [ अ० कुलाबा = बिजागरी, पकड ] दस्ती "वरती झांकणी कुलाबेदार कुल्फी मज्बूत " ( राजवाडे २२।३५ ).

**कुल्हापोश; कुलाहपोश** ( पु० ) [ फा० कुलाह्–पोश् ] टोपीवाला; इंग्रेज. " तरी आम्ही आपले दोस्तीवर नज़र देवून... कुलाह् पोशाची तर्म्हीचे कामावर नमूद जालों असो " ( राजवाडे १०।१८२ ). " हजुराहून ही इकडील कुल्हापोशाची सज़ा करणें मन्ज़ूर आहे" ( दिमरा १।७).

**कुलियात** [ अ० कुल्लीयात् ] तमाम; सर्व; सर्वथा. " दोंही दौलती कुलियात तुम्ही आम्ही मिळून सम्भाळावी " ( राजवाडे ५।२३ ).

**कुली; कुळी** [ अ० कुल्लि ] तमाम; सर्वस्वी. " कुली वजीर मुस्तेद करून उभे केले " ( चित्रगुप्त ६५ )."कुळी पाद्शाही वजीर बोलावून आणून " ( चित्रगुप्त ४० ). "त्याणें जें काय आपले स्वार्थामुळें महज़र सनदपत्र केलें असेल तें कुली बातील ( अगदीं खोटें ) आहेती " ( राजवाडे ८।४८ ). "कुली खुलासा ( =पूर्ण शुद्ध-भावाचा ) नेमस्त मुद्दा ( = नेमस्त मुद्दे घालणारा ) व इतबारी हेजीब बहुत सत्वर पुढें पाठवून देणें " ( इम ८९ ). " कुली कार्य भाग करणें " ( राजवाडे ६।२०७ ).

**कुली** ( पु० ) [ फा० कुली ] गुलाम; मज़ूर.

**कुलूप** ( न० ) [ अ० कुफ्ल् ] ताळें.

**कुवत** ( स्त्री० ) [ अ० कूवत ] शक्ती. " सर्दार... हुज़ुरात वगैरे असतां त्याची काय कुवत आहे !" ( खरे १।१३१ ).

**कुशाद** [ फा० कुशाद् ] मोकळें. " रान-मैदान जागा कुशाद पाहून तळें पाठीशीं

घेऊन मुक्काम करवितों" ( खरे ४।१८४३ ).

**कुस्ती** ( स्त्री० ) [ फा० कुस्ती ] झोम्बी; मल्लयुद्ध.

**कुसूम; कुशून** ( पु० ) [ तु० कुशून् ] टिपूचें कवायती पल्टण, एकन्दर १२०६ लोकांचें. "मापिल्यांनीं दोन कुशून व दोन रिसाले टिपूकडील लढाई करून गारत केले" ( राजवाडे ७।१२८ ).

**कुसूर** [ अ० कुसूर्=चुकी ] भाण्डण. "पाटलामध्यें व आम्हामध्यें कुसूर पडून" ( राजवाडे १५।३३ ). "त्यांसी जरी आपण कुसूर करावा तरी ते सबल" ( इम ४६ ). "देसपाण्डियानी कुसूर करून चालों देत नाही" ( राजवाडे २०।३०४ ).

**कुही** [ फा० कूही ] डोङ्गरी. "सर्कारांत कुही शेळिचें प्रयोजन आहे" ( वाडसमा १।९७ ).

**कूच** ( न० ) [ फा० कोच् ] प्रयाण; मज़ल. "हल्ली हैदराबादेहून नबाबाचीं चार कुचें टिपूच्या मोकाबल्यावर जाहलीं अशीं डांकेचीं पत्रें आलीं ( खरे ८।४३२५ ).

**कूच दर कूच**=सारख्या मज़ला मारीत.

**केरवा** ( पु० ) [ फा० कह्‌-रुबा ] तृणमणी; पिवळा दृष्टमणी.

**कै** [ फा० कै ] केव्हां.

**कैची** ( स्त्री० ) [ तु० कैची ] कात्री.

**कैद** ( स्त्री० ) [ अ० कैद् ] बन्दीकरण, नियन्त्रण; शिस्त.

**कैद-कानू** ( स्त्री० ) बंदोबस्त; अम्मल. "दिल्ली म्हणजे बादशाही तख्ताची ज़ागा; तेथील अमर्यादा करून फौज़ दरवर्षी पाठवून, कैदकानू तुम्ही आपली बसविली" ( पाब १५ ).

**कैद-खाना** ( पु० ) तुरुङ्ग; कारागृह.

**कैद-दगा** ( पु० ) [ अ० कैद्=फसवणूक ] फसवेगिरी. "तिकडे मिळाले; मग यास का कैद-दगा म्हणावा तरी इङ्ग्रज़ हठऊन तङ्ग करून बडोद्यास घालविले" ( राजवाडे १९।८४ ).

**कैद-वार** [ फा० कैद्-वार् ] नियन्त्रित; कह्यांत; हुकमांत ( सभासद ९ ).

**कैदी** ( पु० ) [ फा० कैदी ] बन्दीवान.

**कैफ** ( पु० ) [ अ० कैफ् ] धुन्दी; उन्माद.

**कैफी** [ फा० कैफी ] मादक; मादक पदार्थांचें सेवन करणारा.

**कैफियत्** ( स्त्री० ) [ अ० कैफीयत् ] वर्णन; हकीगत; कारिणा.

**कैली** [ अ० कैल्=माप ] मापी. "तान्दूळ कैली कोठीमापें पांच मण" ( राजवाडे १५।२२४ ).

**कैवज़ा** [ ∠अ० वज्ह् ] अनेक प्रकारें. "येथें आलियानें रुक्नुद्दौला यास वस्वास येईल म्हणोन कैवज़ा लिहिल" ( राजवाडे १।५३ ).

**कोका** ( पु० ) **कोकी** ( स्त्री० ) [ फा० कूका ] पागोट्याचा वरील चोंचीसारखा उन्चवटा.

**कोत्वाल** ( पु० ) [ फा० कोत्वाल् ] किल्लेदार; दारोगा.

**कोता** [ फा० कोताह् ] टुंका; आंखूड; सङ्कुचित; अपुरा.

**कोताई** ( स्त्री० ) [ फा० कोताही ] आंखूडपणा; कमीपणा; कमताई. "वसूल घेण्यास सख्ती करितां कोताही केली नाहीं" ( ऐटि ५।११ ).

**कोते-अन्देश** [ फा० कोताह्-अन्देश् ] अ-दूरदृष्टि; अविचारी.

"आमचे वकिलाशीं कोते-अन्देश ज़मान्याची हवा पाहून हरएकविशीं उपद्रव

देतात; त्यास आपण खाविन्द समीप असतां कोते-अन्देशांनीं उपद्रव द्यावा हें ठीक नाहीं" ( दिमरा १।२२७ ).

**कोम** [ अ० कौम् ] स्त्री. जिवा कोम दगडू=दगडूची पत्नी जिवा.

**कोल-बोल** ( पु० ) कौल. " मुलखास कोल-बोल देऊन बन्दोबस्त करणें" ( ऐच ८९).

**कोशीस** ( स्त्री० ) [ फा० कोशिश् ] मेहनत; प्रयत्न. "इकडील दौलती विषयीं कोशीस करीत जावी" ( राजवाडे ८।५ ).

**कौल** ( पु० ) [ अ० कौल् ] वचन; अभय-वचन; आश्वासन; ईश्वरी वचन. "तुम्हांस चि० रा० माधवराव नारायण याचा कौल" ( राजवाडे १२।१३७ ). कौलास येणें=शरण येऊन तहास प्रवर्तणें.

**कौल-अहद** ( पु० ) वचन. "त्यावरून म्यां त्याजऱ्हा कौल-अहद दिधला" ( राजवाडे ६।५७० ).

**कौल-करार** ( पु० ) ठराव; करारमदार.

**कौल-करार्दाद** ( पु० ) वचन. "हज़्रत साहेबाचा तरी कौल-करार-दाद आपल्यास आहे कीं तुमचे जागीरपैकीं एक चावर कसोदगी करणें नाहीं" ( इम ६७ ).

## ख

**ख्याल; खियाल** ( पु० ) [ अ० खियाल् ] विचार; एकप्रकारचें गीत. " तान्हाल हा ख्याल दिलांत न आणिला " ( खरे ७।३५७५ ). " दर्बारचे जाबसाल तटून राहतात आणि त्यांचे तगादेही लागत असतांना जाब मिळत नाहीं; याचा खियाल इतर दौलतदार काय करितील तो करोत" ( राजवाडे ७ खलप २।७१ ).

**ख्याल-तमाशा** ( पु० ) गाणें-नाचणें वगैरे चैन.

**ख्याली-खुशाली** ( स्त्री० ) चैन; सुखोपभोग.

**ख्वार** ( पु० ) [ फा० ख्वार्=हलका ] हलाखी. " लोक यांचा फार ख्वार जाहला " ( जोरा ४५ ).

**ख्वाहीश; ख्वाहिशी** ( स्त्री० ) [ फा० ख्वाहिश् ] इच्छा; मागणी.

**ख्वाहीश; दर्खास्त** ( स्त्री० ) मागणी. " ख्वाहिशी-दर्खास्ती प्रमाणें" ( राजवाडे १०।२५१ ).

**खच्ची** [ अ० खसी ] निर्वृषण; बडविलेला.

**खज़ानची; खज़ानजी** ( पु० ) [ तु० खझान्ची ] कोशाध्यक्ष; तिजोरी-कामदार. " धाकट्यास खज़ानचीचें काम साङ्गून " ( राजवाडे ५।४२ )

**खज़ानची-गिरी** ( स्त्री० ) कोशाध्यक्षाचें काम ( राजवाडे ३।३५३ ).

**खज़ाना** ( पु० ) [ अ० खिझाना ] तिजोरी; कोश. " खज़ानाही पूर्वंवत्प्रमाणें नाहीं " ( दिमरा १।१६५ ).

**खज़ान-पूर** [ ∠फा० पुर्=पूर्ण ] ज्याची गङ्गाजळी अखण्ड भरलेली आहे असा. " खजानपूर आहों, तें कळतच आहे " ( राजवाडे १२।७० ).

**खज़ाने-दाखल** = पोते-जमा. " ऐवज़ सत्वर खज़ाने-दाखल करणें " ( जोरा ७ ).

**खजिना** ( पु० ) [ अ० खझीना ] खज़ाना.

**खजिन्-दार; खजिनेदार** ( पु० ) [ फा० खझीना-दार् ] खज़ानची.

**खजील** [ अ० खाजिल् ] लज्जित; शरमलेला ; खटू.

**खडाजङ्गी** ( स्त्री० ) ठाण माण्डून केलेलें गैर-गनिमी युद्ध; सफेजङ्गी; भाण्डण; कडाक्याची बोलाचाली; निकराचें.

**खत्ता** [ अ० क़त्अ ] तोडणें; अपाय; भग्न; नष्ट. "त्याचे इज़्ज़तीस खता न करितां निरोप देऊं" ( राजवाडे ६।३६२ ). "अवसान खत्ता केलें" ( चित्रगुप्त ८४ ). "अवसान अगदीं खत्ता जाहलें" ( पाब ४१ ).

**खत्रा** ( पु० ) [ अ० ख़त्रा ] धोका; भीती; शङ्का; घोंटाळा. "मार्गाचे खत्र्यामुळें पाठविलीं नाहीं" ( दिमरा २।१९४ ). "आलीजाह यानें उठोन मजपाशीं यावें म्हणजे त्याचे जिवास खत्रा नाहीं" ( राजवाडे ५।१७३ ). "येविशीं या-उपरी तुम्ही खत्रा न करणें" ( मराचिस २७ ). "ज्याच्या वंशांत खत्रा असेल त्याचें कळेना; एक बाप असेल त्याज-कडून तरी दुसरी गोष्ट घडणार नाही" ( राजवाडे १०।५२ ).

**खत** ( न० ) [ ख़त् ] पत्र; रोखा; प्रमाण-पत्र.

**खत-खतूत** ( न० ) [ अ० ख़ुतूत् अनेक व० ख़त् चें ] कागदपत्र.

**खत-किताबत** ( स्त्री० ) पत्र. "खत-किताबतीनें खबर्गिरी करावयासही याद होत नाहीं" ( राजवाडे ३।९० ).

**खत-बेजा** [ फा० बजा ठिकाणीं, ऐवजी ] वचन-पत्र; प्रॉमिसरी नोट. "त्यापैकीं तुम्ही आपणांस खत-बेजा दोनशें दिधले; बाकी सेम्भर होन उरले" ( राजवाडे १५।५७ ).

**खतम** [ अ० ख़त्म् ] समाप्त. "लढाई खतम ज़ाली" ( होकै ८४ ).

**खता** [ अ० ख़ता ] दोष; लबाडी. "वतन्दार खरा; कोणे गोष्टीस खता नाहीं" ( राजवाडे ८।४४ ). "अतः-पर नबाब खता करितील, कदाचित् काळक्रम दुर्बुद्धी निर्माण ज़ाली तर केलें पावतील" ( इम १९६ ).

**खता-खानत** ( स्त्री० ) [ अ० ख़ियानत् ] लबाडी. "त्यास, कांहीं खता-खानत ज़ाली नाहीं; खामगांवकर खरे जाले" ( राजवाडे ६।१११ ).

**खञ्जीर; खञ्जर** ( पु० ) [ अ० ख़न्जर्; ख़न्जिर् ] कट्यार.

**खञ्जरी** = कट्यारीप्रमाणें तीक्ष्ण.

**खञ्जिरी** ( स्त्री० ) [ फा० ख़ञ्जरी ] घुङ्गूर लावलेला लहान डफ.

**खतीब** ( पु० ) [ अ० ख़तीब् ] मशिदींत खुत्बा पढणारा.

**खतिबी** ( स्त्री० ) खतिबाची वृत्ती.

**खतूत** ( न० ) [ अ० ख़ुतूत् अनेक व० 'ख़त्' चें ] पत्र. "सर्कारचे मदारूल महाम यांनीं खतूत मर्सूल केलें" ( = पाठविलें ) ( राजवाडे १०।१६४ ).

**खन्दक** ( पु० ) [ अ० ख़न्दक् ∠ फा० कन्दा = खणलेलें ] चर; परिखा.

**खन्दा** [ ? फा० कन्दा, कुन्दा ] ज्ञानी; शहाणा; शूर.

**खप्पा; खफा** [ फा० ख़फा ] गुदमरलेला; नाराज; रुष्ट. "याजमुळें नबाबाची मर्जी खपा" ( राजवाडे ५।२०४ ). "घासी मिया याजवर नबाब खफा आहेत" ( राजवाडे ५।१६ ).

**खप्पा-मर्जी** ( स्त्री० ) दिक-मर्जी; इतराजी.

**खपीप; खफीफ** [ अ० ख़फीफ् ] हलका; मानखण्डित; फजीत; श्रमी. "गोसावी अनुपगीर सर्वांसी दुश्मन जाले व खपीप जाले" ( दिमरा १।८५ ). "चेरीसाहेबांचें साल-ज़ाबमध्यें तोण्ड उतरून गेलें व खफीफ बहुत जाहले" ( पदमब १०५ ).

"आश्चर्य होऊन चित्त खफीफ होतें जे सर्कारचा अम्मल इकडेस कां नाही!" ( जोरा ९२ ).

**खफगी** ( स्त्री० ) [ फा० खफगी ] फजिती; नाराजी; दुक्ख. "नवाबाचे चित्तांत सर्दाराविषयीं रुष्टता व खफगी आहे" ( राजवाडे ५।१८१ ). "होळकरावर हे नौबत गुज़रली सबब खफगीस ज़ागा" ( राजवाडे ७ खलप १।२७ ).

**खबर** ( स्त्री० ) [ अ० खबर् ] वार्ता; माहिती; समाचार.—ची खबर घेणें: -ला शिक्षा करणें.

**खबर-अखबार** ( स्त्री० ) बातमीपत्र. "जयपुराकडील खबर-एक्बार पाद्शाहासीं आली कीं" ( दिमरा १।१८२ ).

**खबर्गीरी** ( स्त्री० ) [ फा० खबर्गीरी ] विचारपूस. "खत-किताबतीनें खबर्गीरी करावयासही याद होत नाहीं" ( राजवाडे ३।९० ). "आपण आमची खबर्गीरी व परामर्ष पूर्वीपरीस अधिक असा केला" ( ऐस्फुलें ४९ ).

**खबर-बखर** ( स्त्री० ) बातमी; समाचार. "बहुत सावधपणें खबर-बखर वरचेवर लष्करची आणावी" ( खरे १।३९० ). "आमची खबर-बखर घेत जावी" ( खरे २।८९७ ).

**खबबात** ( स्त्री० ) बातमी; वर्तमान.

**खबर्दार** [ फा० खबर्दार् ] सावध; हुशार; ( स्त्री० ) संरक्षण; याद ठेव! "तरी तुम्ही किल्ले झांशी वगैरे ज़ागांची खबर्दार मज्बुदीनें उत्तम प्रकारें करणें" ( राजवाडे ३।२१३ ).

**खबर्दारी** ( स्त्री० ) सावधानता; काळजी; बन्दोबस्त; सुरक्षितपणा. "पन्धरा हज़ार मावळे...किल्ल्याचे खबर्दारीस नेमून" ( मराचिस ५ ). "तुम्ही आज्ञा घेऊन निघाल तेव्हां खबर्दारीचे मार्गानें येणें" ( खरे २।५४३ ).

**खबूतर** ( न० ) कबूतर पहा.

**खमस; खम्मस** [ अ० खम्स् ] पांच.

**खमसैन** [ अ० खम्सीन् ] पन्नास.

**खमीर** ( न० ) [ अ० खमीर् ] आम्बवण; फुगवण; आम्बवलेलें पीठ.

**खर्कशा** ( पु० ) [ अ० कर्कशा ] तण्टा; गर्गशा. "तुकाजी आङ्ग्रे हमेश मुम्बईकरांशीं खर्कशा व मुखालिफत् (= वैर) करूं लागले" ( खरे ७।३५६५ )

**खर्खरा** ( पु० ) [ फा० खार्खार् ] खाज, अस्वास्थ्य, उत्कण्ठा. "मनीं खर्खरा नको धरुं कांई" ( होनाजी बाळ १७० ).

**खर्गोस** ( पु० ) [ फा० खर्गोश् ] ससा. "तेथें खर्गोस निघाला; त्याचे पाठीं कुत्रें लागलें" ( ऐस्फुले २१ ).

**खर्च** ( पु० ) [ फा० खर्च् ∠ अ० खर्ज् ] व्यय.

**खर्च-वेंच** ( पु० ) मालाची मूळ किम्मत व त्यावर इतर झालेला खर्च.

**खर्चणें; खरचणें** = व्यय करणें.

**खर्ची** ( स्त्री० ) [ फा० खर्ची ] खर्चासाठीं घेतलेली रक्कम. खर्ची पडणें = खर्च होणें.

**खर्चीक** [ फा० खर्ची ] उधळ्या.

**खर्बूज** ( न० ) [फा० खर्बूझा] काकडीच्या जातीचें मोठें स्वादिष्ट फळ.

**खराद** [ फा० खराद् ∠ अ० खर्रात् ] कातण्याचें यन्त्र.

**खरादी** ( पु० ) [ फा० खरादी ] कातणारा.

**खराब** [ अ० खराब् ] नष्ट; उध्वस्त; ओसाड; बिघडलेला; वाईट; दुराचरणी. "इकडे गुदस्तांच दुष्काळयामुळें खेडीं खराब होतीं" ( खरे २।८५० ).

**खराब-हाल** [ फा० खराब्हाल् ] दुर्दशा ग्रस्त; विपन्न. "येथें आम्ही खराब-हाल आहों" ( जोरा ४ )

**खराबा** ( पु० ) [ फा० खराबा=ओसाडी ] नाश. "फार दिवस लश्करास ताकीद केल्यानें खराबा होईल" ( राजवाडे ६।५९१ ).

**खराबी** ( स्त्री० ) [ फा० खराबी ] दुर्दशा; वैराणी; हलाकी. "तुमच्या लश्करची खराबी इराणीस कळली" (पाच ३२ ).

**खरीद** [ फा० खरीदा ] क्रीत; विकत घेतलेलें. खरीद करणें=विकत घेणें.

**खरीदी; खरेदी** ( स्त्री० ) [ फा० खरीदी ] क्रय.

"**खरेदी-फरोक्त**( पु० ) **खरीदी-फरोख्ती** ( स्त्री० ) क्रय-विक्रय. "खरेदी-फरोख्ती" ( राजवाडे २२।२ ). "तुम्ही खातर्जमेनें बे-वस्वास माल घेऊन यात्रेस येऊन खरीदी-फरोख्ती करणें" ( राजवाडे ७।१०६). "खरेदी-फरोकास समुद्रांत हिण्डतात" (वाडसमा २।६६).

**खरीद्-दार** ( पु० ) [ फा० खरीदार् ] विकत घेणारा. "परन्तु त्या घरास कोणी खरीद्दार होत नाहीं आणि माझ्यानें गहाण ठेविल्यास कोणी ठेवीत नाही" ( राजवाडे १२।१८२ ).

**खरीप; खरीफ** ( न० ) [ अ० खरीफ् ] कार्तिक-पीक. "आश्विन-मासीं गारा पडल्या; खरीफ बुडालें" ( राजवाडे ३।१६४). "खरिपें थोडीं बहुत आलीं" ( राजवाडे ३।३९० ).

**खल्वत; खिल्वत** ( न० ) [ अ० खल्वत् ] एकान्त; एकान्तीचें बोलणें; एकान्तांत. "दोन घडीपावेतों खल्वत केली" ( पदमव ७४). "त्यांस बोलावून आणून एकान्तीं महालांत खल्वत बैसले" ( सभासद् १२ ).

**खल्वत-खाना** ( पु० ) [ फा० खल्वत्खाना ] एकान्ताची खोली; घुसल्खाना.

**खलक** ( पु० ) [ अ० खल्क् ] लोक; नीच जातीय; गैर-मातबर्. "हे गोष्टी ऐकोन उदमी खळक कुल बारदेशाकडे जातील" ( राजवाडे ८।२२ ). "पाइचे खलक जे आणाल त्यासी चाकर ठेऊनु" ( राजवाडे १५।३६४ ). "ज्याचा गुन्हा होईल, बद्-नामी ज्यावर येईल, त्यास-मराठियाची तो इज़्ज़त वांचणार नाहीं, मग रोज़गार कैसा ?-खळक समजों ज्यास्ती (=शिक्षा ) केल्यावेगळ सोडणार नाही" ( राजवाडे ८।२५ ). "गोरगरीब खलक चीज़वस्त घेऊन सोडून दिले" ( मराचिथोशा ७२ ).

**खलक-दुनिया** ( स्त्री० ) आलम-दुनिया.

**खलद अय्याम दौलतहू**=त्याच्या राज्याचा काल चिरायु असो.

**खलश** ( पु० ) [ फा०खलिश् ] खण्ड; अन्तर; खिलाफ; किल्मिश. "आमची दोस्ती आणि इतेहाद पूर्वीपासून जो आहे त्यांत खलश न यावा" ( राजवाडे ५।३० ).

**खला-मला** ( पु० ) [ अ० खला मला ] खरा स्नेह ( जोरा ११९ ).

**खलाशी** ( पु० )[ अ० खलासी ] नावाडी; नाखवा; खारवा.

**खलास** [ अ० खलास् ] मुक्त; समाप्त; खतम. "बहुत खुश्वक्त जाले कीं जबर्दस्ताच्या चुगालांपासून गरिबाचें वतन खलास जालें ( राजवाडे २०।४९ ).

**खलिता; खरिता** ( पु० ) [ अ० खरीता ] थैली; पत्र; राजपत्र. "साखर खालते २

शेर" ( राजवाडे ३।३२८ ). " औं मुकद्दम्याविषयीं पार्शी पत्रें खरिता तयार झाला म्हणजे पाठवून देऊं " ( राजवाडे ५।३८ ).

**खलिपा; खलिफा** ( पु० ) [ अ० खलीफा ] मुहम्मद पैगम्बराच्या गादीवर आहे व धार्मिक व राजकीय सर्व अधिकार ज्याच्या हातीं आहेत असा मुस्लीम ( विशेषतः सुन्नी ) राजा.

**खलिपत** ( स्त्री० ) खिलाफत.

**खलेल; खलल** ( पु० ) [ अ० खलल् ] खण्ड; प्रतिरोध, व्यत्यय. " ते खलेल करून बिरुदें घेतील व ज़बर्दस्ती करितील " ( चित्रगुप्त ११७). " तुम्ही मुताबीक होऊन अमलास खलेल कराल तरी न करणें (राजवाडे ८।१८०).

**खवारी; ख्वारी** ( स्त्री० ) [ फा० ख्वारी ] अप्रतिष्ठा; अवकृपा. " मनस्वी लोकांच्या बुद्धी ऐकोन त्याचें निदर्शन जें, खवारी ज़ाली; दुराचरणाचें निदर्शन तुम्हांस आलें " ( राजवाडे ८।१२८ ).

**खवास** ( पु० ) [ अ० खवास् अनेक व० खास्सूचें ] उमराव; मानकरी; राजासन्निध असणारा थोर घराण्यांतला मनुष्य.

**खवास्खाना** ( पु० ) **खवाशी** ( स्त्री० ) [ अ० खवासी ] अम्बारींत खासे बसण्याच्या मागील मानकरी बसण्याची ज़ागा.

**खवास-निशस्त** = खवाशींत बसलेला. " तेव्हां खवास-निशस्त यांनीं जोड-गोळी मारली" (वाड-कैफियती २३).

**खस्खस** ( स्त्री० ) [ अ० खश्खाश् ] अफूचें बीं.

**खस्त** [ फा० खस्ता ] भग्न. " तुम्ही आम्ही मिळून इङ्ग्रजास खस्त करोन टाकूं " ( साने-पयाव १९८ ). " अवसान-खस्त " =अवसानभग्न.

**खसूसीयत-दस्तगाह्** [ अ० खुसूसीयत्= विशेष मैत्री ] स्नेहनिधी; स्नेहाङ्कित व विश्वासू. "खसूसीयत-दस्तगाह लक्ष्मण आप्पाजी " ( राजवाडे १२।११२ ).

**खाई-न-खाई** [ फा० खॉही-न-खॉही ] तुझी इच्छा असो, नसो; खामखा; जरूर; निश्चयें. " आम्ही श्रावणमासीं खाई-नखाई येतों " ( राजवाडे ३।१४१ ). " तुम्ही याजउपरी खायी न खायी जावयाचें न करावें " ( राजवाडे १।२२७).

**खाईश;खाहीश** (स्त्री० )[ फा० ख्वाहिश् ] इच्छा. " रघोजी येथें यावा हे खाईश आम्हांस नव्हती " ( राजवाडे १।२२ ).

**खाक** ( स्त्री० ) [ फा० खाक्=धूळ ] रक्षा; भस्मीभूत.

**खाकी** ( स्त्री० ) [ फा० खाकी ] हीनता. " आब्रूस खाकी यावी असा समय येऊन प्रातखाला आहे " ( राजवाडे ६। ५२१ ).

**खाज़्गत; खाज़्गी** पहा खास्गत वगैरे.

**खातर** ( स्त्री० ) [ अ० खातिर् ] मन; विचार; आस्था; साठीं. " मज़्कूर दर्याफ्त ज़ाला व खातरेस बिस्यार बिस्यार ( = पुष्कळ, पुष्कळ ) खुर्सन्दगी हशील जाली " ( भा. ऐप-याव ४६ ). " स्वामीची खातर ज़रूर ज़ाणून " ( राजवाडे १।१३२ ). " त्यांतही श्रीमन्तांचे सर्कारांत या संस्थानची यास खातर अधिक " ( राजवाडे ७।३७ ). " माझ्याखातर "= माझ्याठीं. खातरेस येणें=पसन्त पडणें. खातरेस आणणें=ध्यानास आणणें, पर्वा करणें.

**खातर्खा** ( स्त्री० ) [ फा० खातिर्ख्वाह् ] इच्छे प्रमाणें; यथास्थित; यशस्वी; समाधान. "इङ्ग्रेज पल्टणें पुण्यासमीप आलीं त्यांचें पारिपत्य खातर्खा न जालें" ( दिमरा १।१४० ). "बन्दोबस्तही खातर्खा आमचे स्वामी करितील" ( राजवाडे १।१३२ ). "कित्येक उम्दे उम्दे मन्सुबे खातीर-ख्वाह् होतील" ( राजवाडे १।५३ ). "मशार्निल्हेचे हातची सुरी घेतली व बहुत खातर्खा (=समाधान) केली" ( राजवाडे १०। २६५ ).

**खातर्जमा** ( स्त्री० ) [ फा० खातिर्जम्अ ] स्वास्थ्य; समाधान, संशय-निराकरण; खातरी; हिम्मत; आत्मविश्वास; हिंशेब; पर्वा; स्वस्थ. "खातर्जमई" ( राजवाडे ५।६८ ). "एक वेळ लढाई खातर्जमेची द्यावी; त्यांत यश-अपेश देणार भगवन्त" ( खरे ११।६०८४ ).-"अम्मळशी नजर वांकडी करून खावन्द् पाहूं लागल्यास क्षणांत मज्बुती अथवा खातर्जमा असेल ते नाहींशी होऊन डोळे उघडतील" ( मद्बा २।२८ ). "तुम्ही खातर्जमा असणें" ( राजवाडे १५।२१ ).

**खातर्तसल्ली** ( स्त्री० ) [ अ० तसल्ली=समाधान ] समजून-समाधान. "शीख वगैरे सर्वांची खातर-तसल्ली होऊन जमाव जालाच असेल" ( दिमरा १।३१ ).

**खातर्दारी** ( स्त्री० ) [ फा० खातिर्दारी ] समाधान.

**खातर्दास्त** ( स्त्री० ) [ फा० खातिर्दाश्त् ] खातर्जमा; समाधान, खात्री; इच्छा. "कितेक आपले खातर्दास्तीस्तव, सर्कारचे उपयोगास्तव रवाना केले असेती" ( राजवाडे १।३१० ). "हल्ली सर्व गोष्टी तुमच्या प्रत्ययास येऊन चुकल्या; एवढ्यानें तुमची खातर्दास्त झाली" ( खरे ७।३४१७ ). "मिराचीही खातर्दास्त जाहली जे सर्कारांतून हे गोष्ट जाहली नाहीं" ( खरे २।१२०३ ). "अथवा त्यांची खातर्दास्त पुरेल तेथें जावें" ( खरे ९। ४९६५ ).

**खातर्नशीन** [ फा० खातिर्नशीन् ] श्रुत ( खरे ७।३५६६ ).

**खातरा** ( पु० ) [ अ० खातिरा=विचार ] खातर्जमा. "त्यांत स्वारीसमागमें कार्यभागी यांचा खातरा श्रीमन्तांनीं पुरविला त्यामुळें ते प्रस्तुत स्वस्थचित्तें आहेत" ( खरे २।८१५ ).

**खातरी; खात्री** ( स्त्री० ) दिलासा; समाधान; दृढमत; विश्वास; प्रत्यय. "हरएकाची खातरी करून रुख्सत केले" ( दिमरा २।१७६ ).

**खातरी-लायक; खात्री-लायक**=विश्वसनीय.

**खातीर** ( स्त्री० ) [ अ० खातिर् ] दिलासा; खातर्जमा; समजूत. "मिर्झाची बहुत खातीर केली" ( दिमरा २।४० ). "जालीमसिङ्ग बेदील होऊन जाणार आहे; पाटील बावांनीं खातीर करून साम्प्रत ठेवून घेतलें आहे" ( दिमरा २।३७ )

**खान्का** ( पु० ) [ फा० खान्काह् ] मठ. "म्हणजे तेथें मुकबा, व मशीद व खान्का व बाग बान्धूं" (वाड-सनदा ९).

**खान्सामा** ( पु० ) [ फा० खान्सामान् ] भोजनव्यवस्थापक; बबर्ची; बट्लर.

**खान; खाना** ( पु० ) [ फा० ख्वान् ] ताट; थाळा. "मेजवानी मिठाईचे खाने" ( राजवाडे ७।२११ ).

**खानगी** ( स्त्री० ) [ फा० खानगी ] दासी; नायकीण; गृहसम्बन्धी. " नबाब सलाबतजङ्ग हाजी महम्मद्अली खानाच्या बागांत सहल करावयास दोन ज़नाने हत्ती व कांहीं खानग्या घेऊन गेले होते " ( राजवाडे १।१९७ ).

**खान्दान; खानदान** ( न० ) [ फा० खानदान् ] घराणें; थोर घराणें. " शाबास तुमचे खान्दानाची असे " ( राजवाडे १२।१२३ ).

**खान्दानी; खानदानी** ( स्त्री० ) आभिजात्य; उच्चघराणें. " पुरातन खानदानीतील मनुष्याचें बहुत प्रीतीनें पालन करति जावें " ( ऐस्फुले ५४ ).

**खान्पोश** ( पु० ) [ फा० ख्वान्पोश् ] तबकावरचें आच्छादन वस्त्र. " खान्पोश् ज़र्दोजी, ज़वाहर–ज़डीत, मोत्याची झालरचे आणून ठेविले " ( पद्मव ९७ ).

**खाना** ( पु० ) [ फा० खाना ] गृह; खातें.

**खाना–जङ्गगी; खाने–जङ्गगी** ( स्त्री० ) [ फा० खाना-जङ्गी ] गृहकलह; यादवी. " हे सर्व आपसची खाना–जङ्गगी करून " ( द्मिरा १।८८ ). " सादत–खान तर खानेजङ्गगींत ज़खमी होऊन दुसरे दिवशीं मृत्यू पावले " ( ऐच २२ ).

**खाना–जाद** ( पु० ) [ फा० खाना–ज़ाद् ] दासीपुत्र. " फुलाजीचा खाना–जाद तुलाजी " ( राजवाडे १७।४ ).

**खाने–तलाशी** ( स्त्री० ) [ फा० खाना–तलाशी ] झडती.

**खाने–सुमारी** ( स्त्री० ) [ फा० खाना–शुमारी ] घर–गणती; लोकांची गणती व वर्गवारी.

**खाब्गा** ( पु० ) [ फा० ख्वाब्गाह् ] शय्यागृह. " खाब्गामध्यें नबाब बरामद जाले " ( राजवाडे ७।८३ ).

**खाम–तमा** ( स्त्री० ) [ फा० खाम्–तमअ ] अपक्क आकाङ्क्षा; फाजील हांव ( चित्रगुप्त ८ ).

**खामखा** [ फा० ख्व्हाह्–मख्वाह् ] तुझी इच्छा असो नसो; खाई–न खाई; कांहीं झालें तरी; जरूर; निश्चयें. " जो स्नेहकार्य–मन्सुबा बन्धुत्व सम्पादणें तें कार्य खामखा करावेंच करावें " ( राजवाडे ८।१७५ ).

**खामी** ( स्त्री० ) [ फा० खामी ] कमीपणा; नुक्सान; खराब; अप्तर. " अतः–पर पादशाहीस खामी आली " ( चित्रगुप्त ३४ )." आज पन्धरा सोळा वर्षे खुदावन्त त्याची खामी करवितात तरी मोडत नाहींत " ( मराचिथोशा ७६). " या वेळेस न राहिले तरी सान्याच मन्सब्यास खामी बसेल " ( खरे ६।२९६६ ). " अमृतरावसाहेब यांचा विचार लोभी ! शम्भर रुपये दिले असतां सर्कारदौलतीमध्यें लाख रुपयांची खामी जाली असतां चिन्ता नाहीं; हे समज तेथें आहेत " ( खरे १०।५६०६). " सवाई सिङ्गाची बाजी खामी जाहली " ( जोरा ८५ )

**खामोश** [ फा० खामोश् ] स्तब्ध; अचल; चूप ! खामोश करणें = शान्त राहणें. " नबाब निजाम अल्लीखां व भोसले ताहाल ( अद्यापि ) खामोश याचा सबब काय नकळे " राजवाडे ( १०। १८२ ). " ते समयीं बाजीराव यांणीं खामोश करून आपले खाज़गत डेऱ्यांत गेले ( हाक ३ ).

**खारज़; खारीज़** [ अ० खारिज़ ] बाहेर; हद्दपार ( राजवाडे १२।२२ ).

**खारवा; खार्वा** ( पु० ) [ फा० खार्वा ] नावाडी.

**खालसा** [ फा० खालिसा ] जहागीर अगर इनाम नाहीं अशी ज़मीन; सर्कार-जप्त; इङ्ग्रजांचे अमलाखालील. " नैबानें कुल बिसादी लुटून खालसा केली " ( राजवाडे १५।१३ ).

**खाली** [ अ० खाली ] रिकामा; रिता; वृथा, वायां; निरुपयोगी. " शोहरत आम ज़ाली की ब्राह्मणांचीं घरें खाली करवितात " ( राजवाडे ७।१०६ ). " दोघे चौघे ठार. एक गोळा खाली न ज़ाय असा मारितो " ( खरे ६।२५१५ ). " खाली घरीं बसून बन्दोबस्त होणें ती गोष्ट निराळीच आहे " ( खरे ६।२०४६ ).

**खाली-बार** ( पु० ) वायबार.

**खावन्द, खाविन्द** ( पु० ) [ फा० खावन्द ] प्रभू; स्वामी; साहेब; मालक. "बाबजी पाटील निमे मोकदमीचा खावन्द" ( चन्द्रचूड-द. ११२० ).

**खावन्द-गिरी** ( स्त्री० ) स्वामित्व; साहेबी; धनीपणा. " श्रीमन्तांचे दौलत यांची (= अहल्याबाईची ) दौलत; ते आठवण न धरितां आपणच खावन्दगिरी महाला-विषयीं करून आहेत" (मद्बा २।३३ ). " इकडे सरन्ज़ामी यांस ... खावन्दगिरी कशी असते व सेवा कशी हें पुर्ते ठाऊक नाहीं ( राजवाडे १४।४३ ). " लौकिकांत तर त्यांचें खावन्द-गिरीचें स्वरूप वाढवून " ( खरे ११८८ ).

**खावन्दी; खाविन्दी** ( स्त्री० ) [ फा० खावन्दी ] साहेबी; खावन्दगिरी; प्रभुत्व. " तर बङ्गाला आदिकरून इङ्ग्रेज़ांचे दौलतीवर देखील मालकीयत व खाविन्दी राहील " ( दिमरा ११२०७ ).

**खाशी** [ ∠ अ० खास्सा ] उत्तम; वाहवा ! खाशी पङ्गत=खाशांची पङ्गत.

**खास** [ अ० खास्स् ] विशेष; विशिष्ट जनोद्दिष्ट; खात्रीनें; खरोखर; खुद्द; स्वतां.

**खास-खबर** ( स्त्री० ) खात्रीलायक बातमी.

**खासगत** स्वतांचें; स्वविषयक.

**खासगी** ( स्त्री० ) राजाची स्वतांची इस्टेट; खासगत.

**खास्नीस; खासगीवाले** राजाच्या खासगीचा अधिकारी.

**खास्दार** ( पु० ) नोकर; मोतद्दार.

**ख़ास्बन्दी** ( स्त्री० ) एखाद्या गांवच्या जमिनी एखाद्या घराण्यांत वांटून देणें आणि सारा उक्ता ठरविणें.

**खास्बर्दार** ( पु० ) [ फा० खास्बर्दार् ] खाशाची बन्दूक धरून बरोबर चालणारा नोकर.

**खास्बार्गीर** ( पु० ) हुज़ूरचा घोडेस्वार.

**खास्वाल** ( स्त्री० ) वाळू-मिश्रित ज़मीन जींत खत घातलें तरच बरें पीक येतें.

**खासा** ( पु० ) [ अ० खास्स् ] अभिजात, श्रेष्ठ, कुलीन सर्दार; जात्या शूर. " शिवाजी अङ्गाचा खासा आहे " ( सभासद ३० ).

**खिज़्मत; खिद्मत, खिस्मत** ( स्त्री० ) [ अ० खिद्मत् ] सेवा, नोकरी. " माझे आजास व बापास खिज़्मत होती ते मजकडे साङ्गावी " ( दिमरा ११९५ ).

**खिज़्मत-गार; खिद्मत्-गार** ( पु० ) [ फा० खिद्मत्गार् ] सेवक; परिचारक; हुजऱ्या.

**खिताब** ( पु० ) किताब ( दिमरा २।९९ ).

**खिपत** ( स्त्री० ) [ अ० खिफ्फत् ] अप्रतिष्ठा; फजीती. " नवाबास खड्यांवर खिपत बसली " ( राजवाडे ५।१८ ). " इङ्ग्रजास लढाई देऊन खिपत द्यावी इतका मज्बूत आहे " ( खरे ८।४३५६ ).

**खियाल** ( पु० ) ख्याल पहा.

**खिलत; खिलात** ( पु० ) [ अ० खिल्अत् ] सन्मानाचा पोशाख. " बक्षीगिरीचा खिलत " ( दिमरा १।८६ ).

**खिलत–फाखरा** ( पु० ) [फा० खिल्अति-फाखिरा] बहुमानाचा उंची पोशाख. " खलाअत–फाखरे मुम्ताज् होऊन " ( बाड-सनदा १४० ).

**खिलापत** ( स्त्री० ) [ अ० खिलाफत् ] खलिफाई; मुहुम्मद् पैगम्बराचें प्रतिनिधित्व. इस्लामी साम्राज्य.

**खिलाफ** [ अ० खिलाफ् ] विरुद्ध. " श्रीमन्तांची खिलाफ–मर्जी ( =मर्जी विरुद्ध ) करून नबाब खामखा शहरास जातील तर गोष्ट दुराग्रहास पडेल ( राजवाडे ३।४५६ ).

**खिस्मीस** ( स्त्री० ) [ किश्मिश् ] एक प्रकारचा बेदाणा; सुकीं द्राक्षें.

**खिस्त**– किस्त पहा.

**खिस्सा** ( पु० ) [ अ० किस्सा ] गोष्ट; बाबत; सबब. " उगाच खिसा लिहिला तो प्रमाण काय ? " ( वाडसमा ३।६९ ). " या उपरी दङ्ग्याचा वगैरे खिस्सा न लिहितां कुल् ऐवजाचा भरणा सत्वर करावा " ( खरे ५।२३९८ ). मोरोबादादा फडणीस यांची समजावीस होत होती. नवे नवेच खिस्से काढून बारामतीस गेले " ( खरे ६।३१६५ ).

**खिसारत** ( स्त्री० ), **खिसारा** ( पु० ) [ अ० खसारत्–रा ] नुक्सान; कारवाई; फसवणूक. " यांत तालकियाची खराबी फौजेचा खिसारा बे–मुब्लग होतो " ( राजवाडे ५।१९८ ). " याजकरितां " आपण पन्धरा सोळा लाखाचे खिसारतेंत आलों. " ( राजवाडे ११।९२ ). " दौलत आहे तेथें आमदही आहे व खिसाराही आहे " ( राजवाडे १०।१६६ ). " सर्कारच्या फौजेंत खिसारा ( =फितूर ) फार पडला आहे; सांवर बसत नाहीं " ( खरे ६।३१५० ). " असे नानप्रकारचे खेळ खिसारे आहेत, सोसवेल तोंवर सोशीतच आहों " ( खरे ७।३२५८ ).

**खुजस्ते** [ फा० खुजस्ता ] शुभ.

**खुजस्ते अख्तर** शुभ–ग्रहाचा; सुदैवी ( राजवाडे ८।७७ ).

**खुजस्ते फर्जाम** सद्गतीस पोंचलेला ( राजवाडे १५।२५३ ).

**खुजस्ते बुनियाद** शुभ पायाचा. औरङ्गाबाद शहराची पदवी.

**खुजा; कुजा** ( पु० ) [ फा० कूझा ] लाम्ब व निमुळत्या मानेचें पाणी ठेवण्याचें मातीचें भाण्डें; चम्बू.

**खुत्बा** ( पु० ) [ अ० खुत्बा ] शुक्रवारीं मशिदींत धर्माध्यक्षानें केलेलें प्रवचन.

**खुद–गर्जी** ( स्त्री० ) [ फा० खुद्–गरझी ] स्वार्थ. " इन्साफाची रवेश दर्किनारा ( =बाजूस ) ठेऊन, खुद्द–गर्जीवर नज़र देऊन " ( खरे ७।३५७० ).

**खुद; खुतूत** [ फा० खुद् ] स्वतां; आत्मीय. " आपण खुतूत गैर–माकूल सहसा वर्तणार नाहीं " ( राजवाडे ८।१० ). " आपण कार्भार करणें तो ऐसा करूं

कीं जैसा आपले घरींचा खुतूत कार्भार" ( राजवाडे ८।१० ).

**खुद्द-पसन्ती; खुद्द-पसन्दी** ( स्त्री० ) [ फा० खुद्-पसन्दी ] अहंमन्यता; अहंमन्य. "बाईचा प्रकार खुद्द-पसन्तीचा आहे; हिताहिताचा विचार तोड-मोड करून समजावी असा मनुष्यही कोणी नाहीं" ( मदबा १।१८८ ). "पाटील बा ांची मर्जी खुद्द-पसन्दी व खुशामत-ालबी बहुत" ( दिमरा १।२५९ ).

**खुद-अख्त्यार; खुद्द-यख्तियार** ( पु० ) [ फा० खुद्-इख्तियारी = आत्मसंयमन ] स्वेच्छा. "हें सल्लाहानें झालें; किंवा खुद्द-यख्तियारानें" ? ( राजवाडे ५।५ ).

**खुदा** ( पु० ) [ फा० खुदा ] प्रभु; ईश्वर.

**खुदाई** [ फा० खुदाई ] ईश्वरी. "खुदाई आज्ञेवर मनुष्य विचार करील ऐसें म्हणतां नये" ( ऐटि २।९१ ).

**खुदातर्सी** ( स्त्री० ) [ ∠फा० खुदा-तर्स् ईश्वरभीरु ] ईश्वरभीरुता. "खुदातर्सी-फकिरी तौरानें राहतात" ( राजवाडे १।६३ ).

**खुदावन्त; खुदावन्द** [ फा० खुदावन्द् ] प्रभू; खावन्द.

**खुदावन्त-न्यामत** [ फा० खुदावन्द्-इ-निअमत् ] श्री-मन्त ( राजवाडे १०।१६५ ).

**खुनी; खुन्या** ( पु० ) [ फा० खूनी ] वध करणारा; मारेकरी. "इचा खून हडपसरचे रानांत करून खुन्ये पळून गेले" ( वाडसमा ३।८८ ).

**खुप-सुरत** [ फा० खूब्सूरत् ] सु-वदन; सुन्दर.



**खुफिया; कुफिया** [ फा० खुफ्या ] गुप्त-पणें; अन्तस्थ. "नजब-कुलीखां जाहीर-दारी करून गोपाळ-गडास मोर्चे लाऊन होता; परन्तु खुफिया मुनिशा बेगास रसद पावती केली" ( दिमरा २।१५ ).

**खुबी** ( स्त्री० ) [ फा० खूबी ] चांगुलपले-पण; रहस्य; मर्म; चतुराई.

**खुबीदार** =मजेदार; सुन्दर.

**खुमारी** ( स्त्री० ) [ अ० खुमार्=कैफ ] स्वाद; लज्जत; मजा; खुबी; सौन्दर्य.

**खुमास** ( स्त्री० ) खुमारी.

**खुर्ची; खुर्शी** ( स्त्री० ) [ अ० कुर्सी ] उच्चासन; सिंहासन; एक प्रकारची बसायची चौ-पाई. "फिरङ्गी व आपण मिळून खुर्शीवर शहाजादेस बसवून तमाम सर्दारांनीं नजर-न्याज् केले" ( खरे ८।४२२५ ).

**खुर्निसा; खुर्निसात; खुर्नीस** ( स्त्री० ) कुर्नीस पहा.

**खुर्बाण** कुर्बाण पहा. "अहो मुशाफरा चातुरा मनीं खरा नको धरूं कांहीं; खुर्बाण प्राण मी करीत तुमच्या पाईं" ( होनाजी बाळ १७० ).

**खुर्सन्दगी** (स्त्री०) [∠फा० खुर्सन्द् = सन्तुष्ट] आनन्द. "मज्कूर दर्याफ्त जाला व खातरेस बिस्यार बिस्यार खुर्सन्दगी जाली" ( भा-ऐपयाव ४६ ).

**खुराक** ( पु० ) [ फा० खुराक् ] खाणें; आहार.

**खुल्द-मकान** [ फा० खुल्द्-मकान् ] स्वर्गस्थ; स्वर्गास जाण्यास योग्य.

**खुलास; खुलासा** ( पु० ) [ अ० खिलास् इख्लास् ] शुद्धभाव; स्नेह; निश्चिन्ती; आसुदा; पेच-मुक्त. "हर्येक सर्कारचा वकील दुसऱ्या सर्कारचे फौजेंत राहून

चित्तांतील खुलास व अहवाल जाहीर व्हावा " ( राजवाडे ७।९२ ). " मन-खुलाशानें " =दिल्सफाईनें ( चित्रगुप्त १२ ). " खुलासियानें असत जावें, चिन्ता तिळ-मात्र न करावी " ( खरे ११६९ ). " परन्तु वरकडांचा सरन्जाम खुलासा; यांचा सरन्ज़ाम सुटलाच नाहीं " ( खरे २।८४५ ). " देशीं मात्र दोन चार पर्गणे खुलासा; त्यांत दादा हेयांच्या स्वारीचा उपद्रव ( खरे २।९४३ ).

**खुलासा** ( पु० ) [ अ० खुलासा ] सार; निष्कर्ष; स्पष्टीकरण; सारांश. "नवाबांनीं एकान्तीं गांठोन कितेक शब्दारोप ठेविले; त्यांत खुलासा हाच कीं अन्तर्वेदींत मऱ्हाटे न आणावे" ( राजवाडे ६।३०८ ) " खुलासा, उद्याचे परवांचे दिवसांत कामकाज उरकून घांट चढून जाऊं" ( सानेपयाव ९० )

**खुलासेवार** =स्पष्ट; सविस्तर; बयान्वार.

**खुलिद अयाम दौलतहू** [ अ० खुलिद अय्याम दौलतहू ] त्याच्या दौलतीचें आयुष्य चिरायू असो ( राजवाडे १५।१३२ ).

**खुश्क** [ फा० खुश्क् ] सुका. " तर मेव्याचे व खुश्क मेव्याचे खोन " ( राजवाडे १०।२९६ ).

**खुश्क-साली** ( स्त्री० )[ फा० खुश्क्-साली] अवर्षण; दुष्काळ. " साल मज्कुरीं खुश्क-साली आहे " ( राजवाडे २२। ५२ ).

**खुश्की** ( स्त्री० ) [ फा० खुश्की ] ज़मीन; अवर्षण; दुष्काळ. " खुश्कीचे तमाम सर्दारांनीं इङ्ग्रेजांस तम्बी करून खुश्कींतून त्याज़ला खेरिज् करावें " ( राजवाडे १०।१८१ ). " कपर्दीक खुश्कीमुळें जागिरीपैकीं हातीं लागत नाहीं " ( दिमरा ११८३ ).

**खुश्-खरेदी**=योग्य किम्मत देऊन व्यापाऱ्यास प्रसन्न ठेऊन. " मुक्काम जेथें होईल तेथें खुश्खरेदी सर्व पदार्थ घ्यावे " ( चित्रगुप्त ११० ).

**खुश-खुर्मी** ( स्त्री० ) [ फा० खुर्रमी ] आनन्द; समाधान. "ते पोहोंचून खुश-खुर्मी हासल जाहली " ( राजवाडे १०। ११८ ).

**खुश्नमत**=आनन्द दायक. " खत खुश्नमत ( साने-पयाव ३८४ ).

**खुश्नुदी** ( स्त्री० ) [फा० खुश्नूदी ] आनन्द. " मुफावीजा ( = रूपापत्र ) मर्कूम ( =कलमी ) केला तो पोंहचून खुश्नुदी हासल जाली " ( राजवाडे १०।१२९ ). " आणि दर्कार नसेल तर खुस्नुदीन रज़ा दिधली पाहिजे " ( इम ६७ ).

**खुश्नुमा** [ फा० खुश्नुमा ] दिसण्यांत चाङ्गलें; उचित. " अखबार-नवीस तेथें जाणें जाहिराण्यांत खुश्नुमा दिसत नाहीं " ( राजवाडे ५।१०४ ).

**खुश्बो** [ फा० खुश्बो ] सुगन्धी; अत्तर. " पान-खुश्बो " ( ऐटि ३० )=अत्तर-पान.

**खुश्बोई; खुश्बई** ( स्त्री० ) सुगन्धी वस्तू ( इम ८८ ). "बोलणीं जाहलीं; त्यांतील खुश्बो ( मर्म ) श्रीमन्त माधवराव साहेब यांच्या समजण्यांत चौपट आली " ( होंके ४० ).

**खुश्बोई-दार** [ फा० खुश्बोदार ] सुगन्धी. " चिकणी सुपारी नुसती व खुश्बोईदार करून ठेवित जावी " ( साने-पयाव २८१ ).

**खुश्मर्जी** ( स्त्री० ) सन्तोष; सन्तुष्ट. " नबाब यांनीं खुशमर्जीनें आम्हांस बहुतां प्रकारें खातर्जमेचीं पत्रें पाठविलीं " ( खरे ७-३४५३ ). " खुश्मर्जी होऊन " ( वाड-सनदा ७ ).

**खुश्मस्करी** [ ∠ अ० मस्खर्= थट्टा ] थट्टा विनोद; टवाळी; गम्मत.

**खुश्मस्कऱ्या** विनोद करून हंसविणारा; विदूषक.

**खुश्वक्त** [ फा० खुश्वक्त् ] सन्तुष्ट; खूश. "नबाब बहुत खुश्वक्त होऊन यांचा आदर बहुमान केला " ( राजवाडे ११।५९ ). " स्वामींच्या नांवावर कुल अम्मलदार व मुत्सद्दी बहुत खुश्वक्त आहेत"( राज-वाडे ८।२१४ ).

**खुश्वक्ती** ( स्त्री० )[फा० खुश्वक्ती] आनन्द; खुशाली. " या खुश्वक्तीमध्यें स्वामींचें स्मरण जालें " ( राजवाडे ८।२१८ ).

**खुशाद; कुशाद** [ फा० कुशाद् ] मोकळा; सुटा. " गुदरान करावी. हात खुशाद होईल ते समयीं मागती लोक ठेवाव-वयास उशीर काय ? " ( खरे १४-६३ ).

**खुशामत; खुशामद** ( स्त्री० ) [ फा० खुश् आमद् ] प्रिय भाषण; चाटुस्तुती.

**खुशामत-तलबी** ( स्त्री० ) स्तुतिप्रियता. " पाटीलबाबांची मर्जी खुद्दपसन्दी व खुशामत-तलबी बहुत ( दिमरा १। २५९ ).

**खुशामत-दोस्त** =स्तुतिप्रिय." खुशामद-दोस्त असूं नये म्हणजे आत्मस्तवावर प्रीती नसावी " ( ऐस्फुले ४८ ).

**खुशामती; खुशामदी**=हांजी हांजी कर-णारा. " हिन्दुस्थानी माणूस ब्राम्हणा-पासोन अतिशूद्र व मुसल्मान् पावेतों दगाबाज् मात्रागमनी बेइमान खुशामदी व तत्काळच निर्दय प्राण घेणार पोटच्या सन्तांनां पावेतों " ( ऐस्फुले १०३. )

**खुशाल** [ फा० खुश्हाल् ] सुस्थितींत; सुखी; आनन्दित. " ह्या फौजा गेल्या म्हणोन इङ्ग्रज् व मोंगल फार खुशाल जाहले " ( खरे ९।४५२६ ).

**खुशाल-चन्द** ( पु० ) चैनी विलासी रिकाम टेकडा मनुष्य.

**खुशाली** ( स्त्री ) [ फा० खुश्हाली ] क्षेम-कुशल; सन्तोष; आनदी आनन्द. " त्याजवरून खुश्हाली केली" ( राज-वाडे १।५५ ).

**खुशाली-ब-खुशाली** विशेष आनन्द; खुशालीच खुशाली. "खुशाली-ब-खुशाली रूयदाद जाहली" (साने-पयाव ३८६).

**खुशी** ( स्त्री० ) [ फा० खुशी ] आनन्द; मर्जी; इच्छा; तयार. " त्यांत खुशीची खबर आहे " ( खरे ७।३५८६ ). खुशीचा सौदा=गैरजबर्दस्तीचा, मर्जीचा मामला.

**खुशी-रजावन्दी** ( स्त्री० ) [ फा० खुशी-रिज़ामन्दी ] सानन्दसम्मती.

**खुसूस** [ फा०बि-खुसूस् ] विशेषतः ( राजवाडे ५।५२ ).

**खून** ( पु० ) [ फा० खून्=रक्त ] हत्या, नरहत्या.

**खूप** [ फा० खुब् ] उत्तम; पुष्कळ; भले ! वाहवा !

**खूब-वजा** उत्तम रितीनें. " मुसा बुसी यास खूब वजा ताकीद करून रवाना करावें " ( राजवाडे १।५१ )

**खूम** [ ? अ० कौम् ] लोक. " तरी कसबे मजकुरीं कुल् खूम असतील त्यांजवर पट्टी करून रुपये देवविणें ( वाड याद्या २।२१ ). " उद्मी खुमाविना बाजा-रची अमदानी होत नाहीं " ( वाडसमा २।१४४ ).

**खूश** [ फा० खुश् ] आनन्दी; सुखी; सानन्द. "आपण खूश दिल्लींत असावें" ( दिमरा १।२१० ).

**खेमा** ( पु० ) [ अ० खैमा ] डेरा; तम्बू. "पातशाही खेम्याची वगैरे तयारीची *मात्र आज्ञा केली आहे" ( दिमरा १।१९ ).*

**खेमे दाखल** = डेरेदाखल ( राजवाडे १०।१६५ ). "तूं बाहेर खेमेदाखल होऊन फौजेची गिर्दावरी करावी" ( राजवाडे ५।७८ ).

**खेरीज्; खारीज्** [ अ० खारिज् ] बाहेर; वगळून; शिवाय. "खुश्कीचे तमाम सर्दारांनीं इङ्ग्रेजास तम्बी करून खुष्कींतून त्याजला खेरीज् करावें" ( राजवाडे १०।१८१ ). "इङ्ग्रेजी जमियत भोपाळचे जिल्ह्यांत राहिल्यानें पेण्ढारी यांचे खारीज् होणें या मुलखांतून व हिफाजत-मुलूख राजे साहेबांची वेखलश होईल" ( राजवाडे १०।२५२ ). "जातींखेरीज् ( ज्ञाति बाह्य ) करून" ( वाइसमा ३।२५१ ).

**खेरीज्-जमा** ( स्त्री० ) शेतसाऱ्याव्यतिरिक्त घेतलेली पट्टी.

**खेरीज्-मक्ता** ( पु० ) रयत्वारी.

**खेरीज्-मुशाहीरा** ( पु० ) भत्ता.

**खेल्खाना** ( पु० ) [ फा० खैल्खाना ] खान्दान.

**खेश-सोयरे** [ फा० खेश्=नातलग ] नातलग. "खेश-सोइरे" ( राजवाडे १८।८७ ).

**खैर** ( स्त्री० ) [ अ० खैर्=भलें ] कृपा; आबाद; खुशाल.

**खैर-आफीयत** ( स्त्री० ) क्षेम-कुशल; *खुशाली ( राजवाडे १०।११८ ).*

**खैर-खाह** [ फा० खैर्-ख्वाह् ] हितेच्छू ( राजवाडे १०।२५१ ).

**खैर-खाही** ( स्त्री० ) [ फा० खैर्-ख्वाही ] हितचिन्तन ( राजवाडे ८।६ ).

**खैर-खैरात** ( स्त्री० ) दानधर्म. "खैर-खैरात केली" ( मद्बा १।२०१ ).

***खैर-खुशी*** *( स्त्री० ) क्षेम-कुशल.*

**खैर-शादमानी** ( स्त्री० ) [ फा० शादमानी=आनन्द ] खुशाली. "एथील खैर-आफीयत जाणून आपली खैर-शादमानी हमेशा कलमी करावी" ( राजवाडे २२।८६ ).

**खैर-सला** ( स्त्री० ) खुशाली. "येथील खैर-सला जाणोन तुम्ही आपली खैर-सला दर्वक्त लिहीत जाणें" ( राजवाडे १५।२५० ).

**खैरत** ( स्त्री० ) [ अ० खैरत् ] चाङ्गली गोष्ट; भलाई. "एक जरा तस्वीस दिलिया खैरत नाहीं" ( राजवाडे १५।१३७ ). "जे गोष्ट करावी ते पातशाहाचे दौलत्खाहीसाठीं करावी; त्यांतच तुमची आमची सर्वांची खैरत असे" ( राजवाडे ६।६१८ ).

**खैरात** ( स्त्री० ) [ अ० खैरात् ] दानधर्म; देकार.

**खैराती** रद्दी; टाकाऊ. "तोफांचें सामान चाङ्गलें असावें; खैराती सामान मात्र नसावें" ( खरे ४।१६०९ ).

**खैरीयत** ( स्त्री० ) [ अ० खैरीयत् ] खुशाली; हित. "त्याचे लेकीचे खैरीयतीचें वर्तमान पुशिलें आहे" (राजवाडे १।१८१). "इङ्ग्रेजांचा कदम पातशाही मुलुकांत बहुत नादुरुस्त व त्यांची तम्बी होऊन खारीज् करावें यांतच *खैरीयत" ( राजवाडे १२।२२ ).*

**खोःखो** [ फा० कह्कह् ] मोठ्यानें हंसतांना होणारा आवाज्.

**खोगीर** ( न० ) [ फा० खोगीर् ] पलाण; जीन. खोगीर–भरती=सङ्ख्या पुरी करण्याकरितां नालायक लोकांचा केलेला भरणा.

**खोजा** ( पु० ) [ फा० खोजा ∠ खॉजा ] नपुंसक; निर्वृषण केलेला पुरुष; एका मुसल्मानसदृश जातीचें नांव.

## ग

**ग्वाही; गोही** ( स्त्री० ) [ फा० गुवाही ] साक्ष, शपथेवर सांगणें.

**गई–गुदर** [ ∠फा० गाह्=वेळ ] वेळ मारून नेणें; अळंटळम्; दिरङ्गाई. " वजीर पैका द्यावयाची गई–गुदर करितात " ( राजवाडे ६।६३२ ),

**गच्च** ( पु० ) [ फा० गच् ] चुना; चुनेगच्ची; ठासून भरलेला, रिकामी जागा न राहील असा भरलेला. " स्वल्पमात्र दरज् असेल तरी गच्च लाऊन पाझर न फुटे असें करावें...तळघरांत गच्च करावा " ( मराआ ३४ ).

**गच्ची** ( स्त्री० ) [ फा० गची ] चुन्याची जमीन; चुनेगच्ची धाबें; आगाशी.

**गज्** ( पु० ) [ फा० गज़ ] चोवीस तसू लाम्बीचें एक परिमाण; बन्दुकींत दारू ठासण्याची काम्ब; काम्ब; प्रमाण; सामर्थ्य. " त्यांस तट गजाप्रमाणें नेमून द्यावे " ( चित्रगुप्त ३५ ).

**गजब; गहजब** ( पु० ) [ अ० घज़ब् ] कहर; अनर्थ; जुलूम; हद्द; कमाल. " पर्वर्दिगार, मोठा गजब जहाला " ( चित्रगुप्त ४५ ).

**गज़ल; गजल** ( पु० स्त्री० ) [ अ० घज़ल् ] फार्शी वृत्तांत लिहिलेलें एकयमकी प्रेमगीत.

**गन्ज्** ( पु० ) [ फा० झङ्ग् ] कीट; जङ्ग.
**गन्जणें**=कीट चढणें.

**गन्ज्** ( पु० ) [ फा० गन्ज् ] सञ्चय; रास.

**गञ्जी** ( स्त्री० ) रास ( गवताची ).

**गञ्जिफा** ( स्त्री० ) [ फा० गञ्जीफा ] पत्ते, वाटोळे दशावतारी पत्ते.

**गडप** [ अ० घर्ब=गुप्त होणें ] अदृश्य; गैब. गडप करणें=स्वाहा करणें.

**गदर** ( स्त्री० ) [ अ० घद्र ] विश्वासघात; वैर; बण्ड. " महादजी पाटिलावरी आपण चालोन गदर केली " ( राजवाडे १५।३३ ).

**गदा** ( पु० ) [ फा० गदा ] भिकारी.

**गन्दकी** ( स्त्री ) [ फा० गन्दगी ] घाण. " एकदां मागील गन्दकी वारून टाकून पुढें ठीक करून घेणें आहे " ( राजवाडे ३।१४१ ).

**गनिमत** ( स्त्री० ) [ अ० घनीमत ] लूट.

**गनिमाई, गनिमी** ( स्त्री० ) गनिमी कावा; पळपुटी लढाई; कज़ाकी. " शत्रूचें सामान भारी आल्यास बुनगें एकीकडे लाऊन द्यावें, आणि खडी फौज् करून आज या ठाण्याजवळ, उद्यां दुसऱ्या ठाण्याजवळ, याप्रमाणें गनिमाई करावी " ( खरे ६।२७९६ ). " तुम्हीही उतावळी करूं नये. गनिमीनें असावें " ( खरे ६।२७९९ ). " उभयतां सर्दारांनीं त्यांचे फौजेभोंवतीं गनिमी करून अन्नपाणी हगमूत बन्द करून आठ रोजांत लुटून घेतलें ( होके १५ ).

**गनीम; गलीम** ( पु० ) [ अ० घनीम् ] लुटारू; शत्रू; बारगा; मराठ्यांस मुसल्मानांनीं दिलेलें नांव. " सेख निजाम

गनीम सङ्गमेश्वरास आला, धामधूम जाली " ( इऐ ५।५० ).

**गप्प** ( स्त्री० ) [ फा० गप् ] आवई; खोटी बनावट; कथा; स्तब्ध; चूप !

**गपूसप** ( स्त्री० ) [ फा० गपूशप् ] रिकामटेकड्या गप्पा; चकाट्या.

**गप्पीदास** ( पु० ) थापाड्या; बाताड्या.

**गफ्लत** ( स्त्री० ) [ अ० घफ्लत् ] असावधपणा; दुर्लक्ष्य; अविचार; चूक.

**गफ्लती** [ फा० घफ्लती ] निष्काळजी.

**गम्जा** ( पु० स्त्री० ) [ अ० घम्झा=कटाक्ष विभ्रम ] खेळ; चावटपणा; नखरा; ऐट.

**गम खाणें** [ फा० घम् खुर्दन्=अनुकम्पा दाखविणें ] शान्तपणानें सहन करणें.

**गमी** ( स्त्री० ) [ फा० घम् ] शोक; दुक्ख; दुखवटा. " गमी करून कोणासी न बोलतां दाखल जाले " ( राजवाडे ७।१४२ ). " शोर साहेबास गमींची खबर आली आहे " ( पद्मव ११५ ). " वस्त्रें गमीचीं " ( राजवाडे ७ खलप ११२ ).

**गईब; गयब; गैब** [ अ० घैब् ] अदृश्य; मृत. " राजा गईब जाहला ऐसें जाऊन साङ्गतांच " ( सभासद ४२ ).

**गर्क; गरक** [ अ० घर्क् ] निमग्न; मृत. " ज्या ठिकाणीं भाऊसाहेब गेले आणि गर्क जहाले तें ठिकाण आपण दृष्टीनें पाहूं नये " ( पाब ४७ ). " ( राजश्री कोन्हेरराव ) फौजेंत गरक जाहले " ( खरे ६।२७९४ ).

**गर्गशा** ( पु० ) [ फा० घर्घशा ] निष्कारण भाण्डण; गोन्धळ; दङ्गल. " यां उभयतांमध्यें कसबे मसूरचे पटेलगीचा गर्गशा देणियाबद्दल लागला होता " राजवाडे १५।३२ ). " तुरकाचे कांहीं गर्गशा जहाले नव्हते. " ( इम ६ ).

**गर्द** ( स्त्री० ) [ फा० गर्द् ] धूळ; दाट ( छाया ); धूलीभूत; नष्ट. " मनांत उगीच संशयाची गर्द आली असेल ती काढून टाकिली म्हणजे साफ कांहींच खत्रा रहात नाहीं " ( राजवाडे ५।१६६ ). " टिपूचें संस्थान गर्द झालें हें सर्कारचे दौलतीस चाङ्गलें नाहीं " ( खरे ११।६०५६ ). " खासे विश्वासराव साहेब अगर्दीच गर्दीत गर्द होऊन गेले " ( पाब ४० ). " झाडून बुणगेसुद्धां दौलत गर्द झाली " ( खरे ११।६०८६ ). " रोहिल्यांची फौज मारून गर्द केली " ( राजवाडे १४।११ ). गर्दीस मेळविणें=नाश करणें ( सभासद ९ ).

**गर्दन** ( स्त्री० ) [ फा० गर्दन् ] मान. गर्दन मारणें=ठार करणें.

**गर्दपोस** ( पु० ) [ फा० गिर्द्-पोश् ] पलङ्गपोस. " गर्दपोस काढून करूंचा निट तांकिये पलङ्गावरल " ( होनाजी बाळ ९५ ).

**गर्दी** ( स्त्री० ) [ ∠फा० गर्द् ] जनसंमर्द, दाटी.

**गर्दी** ( स्त्री० ) [ फा० गर्दी ] क्रान्ती; नाश. भाऊ–गर्दी=पानपत; भयङ्कर पराभव व नाश.

**गर्दीद** [ फा० गर्दीद् ] झालें; सूद. रोशन गर्दीद के=श्रुत झालें की ( राजवाडे १५।३६४ ).

**गर्दोगर्दी** [ फा० गिर्दागिर्द ] चोंहींबाजूंस; चौगिर्द.

**गर्मा** ( पु० ) [ फा० गर्मा ] उष्मा.

**गर्मिणा** ( पु० ) उकाडा; तल्खी. " दोनी मण्डप बुलन्दीस कमी; याजमुळें गार्मिणा भारी; हज़्मा ( =गर्दी ) भारी होता " ( खरे १०।५४४५ ).

**गर्मी** ( स्त्री० ) [ फा० गर्मी ] उष्णता; त्राण; गुर्मी; ज़रब; उपदंश " इकडील मोंगलाची गर्मी राहिलीच नाहीं " ( राजवाडे १।२६२ ). " परन्तु गाज़ुद्दी खानाची येण्याची गर्मी असती तर चित्तारूप हेहि आम्हांसी बोलते " ( खाने-पयाव ३२५ ). " गर्मी दाखवून जें मिळेल तें मेळवावें " ( खाने-पयाव ३२७ ).

**गरज़** ( स्त्री० ) [ अ० घरज़् ] आवश्यकता; जरुरी; इच्छा; हक्क; प्रयोजन. " सुन्दर तुकदेउ यास कथळा करावया गरज् काय ? " ( राजवाडे १५।७१ ).

**गरज़्-गो** [ ∠फा० गो=बोल ] स्वार्थानें प्रेरित होऊन बोलणारा; मतलबी. " ऐसें असतां गरज़्-गो लोकांनीं मनास येईल तसें नवाबांस समजाविलें ( राजवाडे ६।३५७ ).

**गरज़्-वन्त; गरज़ू** [ फा० घरज़्मन्द् ] ज्याला जरुरी आहे असा; अडलेला. " गरज़्-वन्तास अक्कल नाहीं असें म्हणतात. "

**गरजेची** काम-चलाऊ; कशीबशी. "गडाची इमारत गरज़ेची करूं नये ( मरा आ ३२ ).

**गरद** ( पु० ) [फा० गर्द ] धुरोळा. " गरद बहुत उठला " ( राजवाडे १।६४ ).

**गरम** [ फा० गर्म् ] उष्ण; कडक; रुष्ट; दाट. " डेरेदाखल होतात म्हणून आवई गरम होती "( राजवाडे १।५४ ). " परन्तु बेदरास हवेली दाखल होण्याचीच खबर गरम आहे " ( राजवाडे ७।१०८ ).

**गरम-नरम** ( न० ) कडक अगर सौम्य भाषण; कडक अगर सौम्य वर्तन.

**गरम-बाज़ारी** ( स्त्री० ) [ फा० गर्म्-बाज़ारी ] व्यापार-तेजी; श्रीमन्त होण्याची सन्धी साधणें. " मध्यस्थ लोकांनीं गरम-बाज़ारी करून " ( दिमरा २।२८२ ).

**गरिबी** [ फा० घरीबी ] दारिद्र्य; नम्रता.

**गरिबी-हरिफी** ( स्त्री० ) नरम- गरम वर्तन; अजिजी- कारवाई.

**गरीब** [ अ० घरीब् ] दरिद्री; दीन; अजीज़; निरुपद्रवी.

**गरीब-गुरबा; गरीब-गुरीब** ( पु० ) [ अ० घुरबा अनेक व० घरीबूचें ] गरीब लोक. " भवानीदास साहुकार...यात्रे उद्देशें जाणार; समागमें गरीब-गुरबेही चालतील " ( राजवाडे ६।५५३ ). " गरीब-गुरबांचीं घरें बहुतेक वाहून गेलीं " ( राजवाडे ७।७० ). " तें गरीब गुरिबां खेरिज् करून वसूल करणें " ( वाडबाबा२।३१ ).

**गरीब-नवाज़्** [ फा० घरीब्नवाज़् ] दीनांचा कनवाळू व पोशिन्दा.

**गरीब-पर्वर** [ फा० घरीब्पर्वर् ] गरीब-नवाज़्.

**गरूर** ( पु० ) **गरुरी** ( स्त्री० ) [ अ० घुरूर् ] गर्व, मग्रुरी "एकवेळ त्याचा गरूर उतरल्याखेरीज़् दक्षणचा दाब व बन्दोबस्त ही नाहीं" ( राजवाडे १९।३८ ). "टिपूची चाल बे-अहदीची व शरारत (=दुष्टपणा) व गुरुरीची, इतकी सज़ा झाली तथापी जात नाहीं ( राजवाडे ७।२० ). "टिपूही आतां मस्नद नसीन जाहला तो गरुरीच्या पहाडावर चढला " ( खरे ८।४३५५ ).

**गल्बत** ( न० ) [ फा० गल्बत् ] तारूं; जहाज्.

**गल्लत** ( स्त्री० ) [ ? फा० घल्त् ] फिरवा-*फिरव; पत्ते सर्व सुटे व विस्कळीत करून मग गोळा करणें; अव्यवस्था.*

**गल्ला** ( पु० ) [ अ० घल्ला ] धान्य; पीक; उत्पन्न; मजुरांस वांटण्याचा पैका.

**गलबा; गल्बा** ( पु० ) [ अ० घलबा ] हल्ला; जोर; धामधूम; गडबड. " गलबा उठेल" =हल्ला होईल ( खरे ८।४३५६ ). "शिखांचा गलबा भारी " ( दिंमरा ). " तयारीची गलबा दाखविली म्हणजे येणेंकडून श्रीमन्त सन्तोष मानितील " ( खरे २।१०८१ ).

**गलत** ( स्त्री० ) [ अ० घलत् ] चूक; चुकीचा; खोटा; रद्द. " चूक-गलत " ( राजवाडे १५।२६० ). " असद अलीखान यांनीं मीर-आलम यास धरिलें म्हणून वर्तमान उठलें होतें; परन्तु तें गलत " ( राजवाडे ५।१८३ ). " पेण्ढारी यांची आवई उठली होती परन्तु तें गलत वर्तमान " ( राजवाडे १०।३९९ ). " सर्देशमुखीचा पर्वाना पाहिले जाला होता तो गलत करून हल्ली नवा पर्वाना सिद्ध करविला " ( इम १७४ ).

**गलेफ** ( पु० ) [ अ० घिलाफ् ] अभ्रा; रजई.

**गस्त** ( स्त्री० ) [ फा० गश्त् ] फिरती; पोलिसांची रात-फिरती; रोण.

**गस्तकरी** ( पु० ) गस्त घालणारा; रोणकरी.

**गाजी** ( पु० ) [ अ० घाज़ी ] धर्मसंरक्षक योद्धा; जेता; महापराक्रमी.

**गाफल; गाफील** [ अ० घाफिल् ] असावध; निष्काळजी.

**गाफलाई** ( स्त्री० ) गाफील-गिरी. " स्वारी *वाड्यांत जाऊन बन्दोबस्त करावा तो* प्रकार, अन्तकालचा समय प्राप्त, याजमुळें न जाहला; गाफलाई जाहली. " *( मदरु २।९८ ).*

***गाफिली; गाफील-गिरी*** ( स्त्री० ) [ फा० घाफिली ] गैरसावधपणा; निष्काळजीपणा. " शिपाई लोकांचे व घोड्यांचे सामान-सरन्जाम कसे आहेत ते वरचेवर पहात जाऊन दुरुस्त ठेवण्यास कदापी गाफील-गिरी करीत जाऊं नये " ( ऐस्फुले ५४ ). " हे गाफिली कार्कुनापासून जाहली " ( वाडबाबा २।८६ ).

**गायबाना** [ अ० घाइबाना ] अपरोक्ष.

**गारत; गारती; गारद** ( स्त्री० ) [ अ० घारत्=लूट ] नाश; गर्दी; उध्वस्त; फस्त; नष्ट. " सदाशिवराव कायकर्ते; लेकीन गरूर मोठा या सबबानें गारती जाहली" ( ऐटि ३।१७ ).

**गालब; गालीब** [ अ० घालिब् ] जोरावर; वरचढ. " इङ्ग्रजावर टिपू गालब " ( खरे ८।४४०७ ). " इङ्ग्रज गालब पडेल " ( खरे ८।४३५१ ). " रात्रीचे ठायीं विषप्रयोग करून अखण्ड दण्डायमान व्हावें ही शरम गालीब जाली " ( इम २९२ ).

**गालीचा** ( पु० ) [ तु० गालीचा ] किमती नक्षीदार लोंकरी आस्तरण.

**गाशा** ( पु० ) [ अ० घाशिया ] खोगीरावरचें आच्छादन; पातळ गादी.

**गिर्द** ( स्त्री० ) [ फा० गिर्द ] परीघ; घेर; चौकी; भोंवतालचा प्रदेश; भोंवतीं. " नवशें रुपयांचे जमेचा गांव झांशी गिर्दींत तज्वीज करणें " ( ऐटि ३।५७ ). " अलिपिष्टन साहेब यांणीं शहराभोंवतीं *गिर्द बसवून* " ( राजवाडे १४।६४ ). " सर्व फौजा दिल्लीचे गिर्द जाऊन

रसद बन्द करावी" (दिमरा १।२६६).
चौ-गिर्द=चौयाजूस.

**गिर्द-नवाई; गिर्द-नवाही** (स्त्री०) [फा० गिर्द्-नवाही] शहर-कोट व भोंवतील प्रदेश; त्याचें संरक्षण करण्याचें काम. "गिर्द-नवाईचे गांव लुटून उध्वस्त केले" (राजवाडे १४।२०).

**गिर्द-ब-गिर्द**=चौंहीं बाजूंनीं (राजवाडे १५।२०).

**गिर्दावरी** (स्त्री०) [फा० गिर्दावरी; गिर्द्-वारी] जमवाजमव; बन्दोबस्त; जकात-वसुली; जकात-बन्दोबस्त (राजवाडे ८।२१). "तूं बाहेर खेमेदाखल होऊन फौजेची गिर्दावरी करावी" (राजवाडे ५।७८).

**गिर्दी** (स्त्री०) [फा० गिर्दा] वर्तुलाकार लहान उशी.

**गिर्वीदगी** (स्त्री०) [फा० गिर्वीदगी] निष्ठा; चहा; नवाजीस. "मर्द माणूस लोकांस गिर्वीदगी करून कित्येकांचें पारपत्यच केलिया उत्तम आहे" (ऐटि २।७१).

**गिरफ्तार; गिरफ्दार** [फा० गिरिफ्तार] बद्ध; बन्दी; निमग्न; विवञ्चना-मग्न; चिन्तातुर; हैराण. "तोंपर्यंत याच मन्सुबियांत गिरिफ्दार आहों" (राजवाडे १।९७). "वाटेनें पर्जन्यामुळें फार गिरिफ्तार जहाले" (साने-पयाव ४२८).

**गिरफ्तारी; गिरफ्दारी** (स्त्री०) [फा० गिरिफ्तारी] बन्धन; विवञ्चना; चिन्ता (साशिच ६३). "आम्हांसारखे आहेत ते गिरफ्दारींत मग्न असतात" (खरे १।३९).

**गिरव; गिरो** (न०) [फा० गिरव्] गहाण.

**गिराणी** (स्त्री०) [फा० गिरानी] दुक्ख; खफगी; रुष्टता; जेरी; महागाई; दुष्काळ. "लोकांस खर्चाची गिराणी फार आहे" (मदबा १।७०). "मर्जीस गिराणी येईल" (राजवाडे १०।२५२). "किल्लेवालेही गिराणीस आले आहेत" (मदबा १।२८७). "लश्करांत गिराणी फार, म्हणून लोक बहुत हैराण-परेशान आहेत" (दिमरा २।१०).

**गिरे** (स्त्री०) [फा० गिरेह्] तीन अङ्गुळांची लाम्बी. "तोफ लाम्बी दहा गज् दोन गिरे आली" (राजवाडे ७।२२६).

**गिलावा** (पु०) [फा० गिल्आबा] मातीचें लिम्पण; लिम्पण.

**गिल्ला; गिला** (पु०) [फा० गिला] तक्रार; फिर्याद; ओरडा-ओरड; ठपका; दोष. "भटजींनीं नानाप्रकारें इकडील गिला दर्यागंत लिहिला आहे" (खरे २।३२५). "या गोष्टीचा गिला आम्हांकडे नाहीं" (राजवाडे ७ खलप २।३३).

**गिल्ला-शिक्वा** (पु०) [अ० शक्वा] तक्रार; कागाळी; नालीस. "न जाणों, पूर्वी खोजीमकुली खानांहीं गिल्ला-शिक्वाही आमचा काय लिहिला असेल" (राजवाडे ६।६०२).

**गिले-गुज़ार** [फा० गिला-गुझार] तक्रारी; रुष्ट. "हें वृत्त शाहाजीस समजल्यावर बहुत गिले-गुज़ार आहेत" (दिमरा २।२३).

**गिले-गुज़ारी** (स्त्री०) [फा० गिला-गुझारी] तक्रार; रुष्टता. "भवानीकुंवर ही दर्बारास जाऊन खल्बत करितात म्हणून बहुत गिले-गुज़ारीनें लिहिलें होतें" (दिमरा २।२३).

**गुज़र** (स्त्री०) [फा० गुझर्] निर्वाह. "तीनशें-रुपये-रोजांत गुज़र होत नाहीं" (दिमरा १।३१३).

**गुज़रणें; गुदरणें** [ फा० गुझर् आज्ञार्थी रूप गुझश्तन्‌चें ] जाणें; लोटणें; ओढवणें; मरणें; प्रविष्ट करणें. " सहा चार महिने तिथ गुज़रले पुण्यास येऊनी " (सानेपयाव ५३ ).

***गुज़राण; गुदराण*** ( न० ) ***गुज़राणी; गुदराणी*** ( स्त्री० ) [ फा० गुझरान् ] *उपजीविका; निर्वाह; कालक्षेप; पाठवणूक; नज़र. " आमची गुज़राणी चालेल " ( राजवाडे ११।९४ ).* " आणखी मास-पक्ष गुदराण करावयाचें, तेव्हां आतां कां उतावळी करावी म्हणून कर्ज़-वाम करून गुदराणी करितों " ( खरे ७।३६१६ ). "यास्तव शहानशहानीं मेहेरबानगी करून श्रीमन्त प्रधामास ज़वाहीर घोडे हस्ती गुज़रान केले " ( राजवाडे ६।५०५ ).

**गुज़राणणें; गुज़रावणें** प्रविष्ट करणें. " अर्जी तज्वीज़ करोन गुज़राणिली आहे " ( राजवाडे ८।२०२ ). " त्या गुजराणून पातशाहाचे रसिदेचे शुके घेऊन पाठविले आहेत " ( दिमरा ११७८ ).

**गुज़स्त; गुदस्त** [ फा० गुझश्त् ] गत; झालेलें. " बरें; जाहली ती गुदस्त " ( खरे ७।३५२६ ). " दिगर चन्द मुदत गुज़स्त जाहली " ( राजवाडे ३।९० ). " असो; जें झालें तें गुज़श्त; पुढें काय तज्वीज़ सफाई करावी ! " ( राजवाडे ५।१६६ ).

**गुदस्ता** [ फा० गुझश्ता=गत ] गेल्या वर्षी.

**गुज़ार** [ फा० गुझार् ] अदा; देणें; सोंपवणूक. " तुम्ही आपले पञ्चसहस्त्रीचा जो ज़माव कराल तो मशारनिलेसी गुज़ार करीत जाणें " ( राजवाडे १५।३७५ ).

**गुज़ारत** (स्त्री० ) मध्यस्थी; मार्फत. "तेहीं निळो कृष्ण यांचे गुज़ारतीनें विदित केलें कीं " ( इम १३१ ).

**गुज़ारा** ( पु० ) [ फा० गुझारा ] कालक्षेप; निर्वाह.

***गुज़ास्त*** ( स्त्री० ) [ फा० गुझाश्त् ] सोंपवणूक ( खरे ७।३५७२ ).

***गुड्दा; गुर्दा*** ( पु० ) [ फा० गुर्झ ] गदा.

***गुन्ज़ाईस; गुन्ज़ाइशी*** ( स्त्री० ) [ फा० गुञ्जाइश् ] कूस; ऐपत; उत्पन्न; नफा; उपयोग; खोंच. " दिवाणानें गुन्ज़ाईस *अधिक साह्गितल्यानें भाण्डावयास* उभे राहतात " ( सभासद २५ ). " स्वारांची गुन्ज़ायश चहूं महिन्यांत ( बर्सातीच्या ) नाहीं " ( खरे ८।४३५४ ). " साम्प्रत बोलण्यांत कांहीं गुन्ज़ाविश ठेवीत नाहीं; व मोहराही कूरतेचा नाहीं " ( ऐच ७ ).

**गुन्हा** ( पु० ) [ फा० गुनाह् ] अपराध; दोष.

**गुन्हेगार** ( पु० ) [ फा० गुनाह्-गार् ] अपराधी.

**गुन्हे-गारी** ( स्त्री० ) [ फा० गुनाह्-गारी ] अपराध; दण्ड.

**गुन्हे-बे-गुन्हे**=गुन्हा असो नसो; हकनाहक; खात्रीनें. " ज़र हें काम न करितों तर गुन्हे-ब-गुन्हे हा पारिपत्य करील " ( जोरा १०७ ).

**गुना** ( पु० ) [ फा० गूना ] सूरत; शक्कल; भार. " सर्व मस्लतीचा गुना तुम्हांवर आला आहे " ( राजवाडे १२।७९ ).

**गुबार** ( पु० ) [ अ० घुबार् ] मल; गर्द; संशय; किलाफ. " निखालसतेची बोलणीं बोलले; इतक्यानें गुबार निघाला " ( खरे ९।४६६६ ). " निखा-

लशीच्या बोलण्याचा मज़्कूर, तर बोलण्यांत कोणत्या गोष्टीचा पड्दा व गुबार राहिला नाहीं" ( खरे ९।४८४२ ). " दिलांतील गुबार झाडून निघोन प्राञ्जळ व्हावें " ( राजवाडे ५।७५ ).

**गुम-शूद** [ फा० गुम्शुद्=नष्ट झाली ] नष्ट; गहाळ. " सनद गुम्शूद झाली म्हणोनु इस्कील न करणें " ( राजवाडे २०। ३५५).

**गुमज़; गुमट** (पु०) [ फा० गुम्बज़ ] घुमट; मुकबरा; रोज़ा. " नवाब सवार होऊन अमीनुद्दीन साहेबाचे गुमज़ाकडे गेले " ( राजवाडे ७।१६९ ). " नन्तर सर्वत्रांनीं जाऊन माती दिली आणि गुम्मज़ही बान्धिला " (साने-पयाव ४००). " गुमट विजापुरीं बान्धविला होता तेथें आणून गुमटांत माती दिली " ( साने-पयाव ४२१ ).

**गुमान** ( पु० ) [ फा० गुमान् ] विचार; मत; संशय; पर्वा; काळजी; ताठा; गर्व. " श्रीमन्ताकडील सूत्र आलीजाहाकडे असेल ऐसा गुमान येथें आहे " ( राजवाडे ५।५३ ). " दिलेलखानाचा गुमान धरितों कीं काय ? " ( सभासद ३५ ). " बहादूरखान पेण्डीचें गुरूं आहे; त्याचा गुमान काय आहे ? " ( सभासद ५९ ).

**गुमानी** ( स्त्री० ) संशय. " तेव्हां त्यांस सर्कारचा आश्रा असी गुमानी येऊन " ( मदरु २।१३७ ).

**गुमास्ता** ( पु० ) [ फा० गुमाश्ता ] पाठाविलेला; प्रतिनिधी; मुनीम; मुतालीक. " प्रधान यांचे गुमास्ते व अमात्यांचे वगैरे यांणीं काम तूर्त करावें " ( मराचिस ८ ).

**गुमास्तगिरी** ( स्त्री० ) [ फा० गुमाश्तगरी ] प्रतिनिधित्व; मुतालिकी ( इम ५६ ).

**गुर्ग्; गुर्गूज़** ( पु० ) [ ८ फा० गुर्ज़ ] गदा.

**गुर्दा** ( पु० ) गुड्दा.

**गुर्बत** ( स्त्री० ) [ अ० घुर्बत् ] नम्रता; अजिजी. " इङ्ग्रेज़ गुर्बत दाखवून काबू साधण्यास चुकणार नाहींत " ( दिमरा १।५४ ). " इङ्ग्रज़ मकर-फरेबी बहुत जाणतात. हरएक ज़ागा इतिफाकांत जुदाई आणोन आपली गुर्बत व रास्ती दाखवून खुष्कीचे दौलतींत दस्तगिरी करीत चालिले " ( साने-पयाव ४७८ ).

**गुर्मी** ( स्त्री० ) [ ? फा० गर्मी ] ज़ोर; रग; मग्रुरी.

**गुराब** ( स्त्री० ) [ अ० घुराब् ] एक प्रकारचें तारू.

**गुरूज़** ( पु० ) [ फा० गुर्ज़ ] गदा; लोखण्डी सोटा.

**गुल्कन्द** ( पु ) [ फा० गुल्कन्द् ] खडीसाखरेंत गुलाबाच्या पाकळ्या मुरवून केलेला पाक.

**गुल्छबू** ( पु० ) [ फा० गुल्-शब्बू ] निशिगन्ध; एक प्रकारचें फूल; गुल्जार.

**गुल्जार** [ फा० गुल्ज़ार्=पुष्पवाटिका ] पुष्पतुल्य; टवटवीत व प्रफुल्ल; आबाद. " बाच्छाई तक्त गुल्जार, दिसे रङ्गबहार, पुण्याची वस्ती " ( होनाजीबाळ १७८ ). " महाल उण्डणगांव वगैरे महाल गुल्जार (=आबाद) दिले " ( राजवाडे ८।२१२ ).

**गुल्दान** ( न० ) कात्रीनें काजळी काढून घेण्याचें पात्र. " गुल्दानें रुप्याची " ( साने-पयाव २८७ ). " गल्दानांनीं गूल काढावे " ( साने-पयाव २८७ ).

**गुल्नार; गुले-अनार** ( न० ) [ फा० गुल्नार्-गुलि अनार् ] डाळिम्बाचें फूल.

**गुल्नारी; गुल-अनारी** [ फा० गुल्नारी ] डाळिम्बाच्या फुलाच्या रङ्गाचा. "गुल-अनारी रङ्गाचा पोशाख गुज़रावून नज़र केली" ( राजवाडे ७।२१३ ).

**गुल्बदन** ( न० ) [ फा० गुल्बदन् ] एक प्रकारचें रेशमी कापड. "गुल्बदनें रेशमी" ( ऐटि ५।२३ ).

**गुल्बदनी** गुल्बदनाचें "वस्त्रपात्र रङ्गीत गुल्बदनी" ( भेंकु ८० ).

**गुल्बाङ्ग** ( पु० ) [ फा० गुल्बाङ्ग् ] भुमका; आवई; बोलगें. "बेद्रास येण्याचा गुल्बाङ्ग दाट होता" ( राजवाडे ७।११२ ). "दोन दिवस याजप्रमाणेंच गुल्बाङ्ग होता" ( राजवाडे ५।१८४ ).

**गुल्हौशी** =रसिक; विलासी; आम्बट-शौकी.

**गुलाब** ( पु० ) [ फा० गुल् ] एका कांटेरी झुडुपाला येणारें सुप्रसिद्ध ताम्बूस रङ्गाचें सुगन्धी फूल.

**गुलाब-दाणी** ( स्त्री० ) [ फा० गुलाब्दान् ] पाहुण्यांच्या अङ्गावर शिम्पडण्याचें गुलाबी वासाचें पाणी ठेवण्याची तुषार उडविणाऱ्या लाम्ब नळीची झारी.

**गुलाब-पाश** ( पु० ) [ फा० गुलाब्पाश ] *गुलाब-दाणी.*

**गुलाब-शकर** ( स्त्री० ) गुलाब-पाक. "गुलाब-शकरीच्या वड्या सुमार पन्नास पाठविल्या त्या पावल्या" ( खरे १२।६६३६ ).

**गुलाबी** गुलाबाच्या रङ्गाचें.

**गुलाबी झोंप**=पहांटची सुखकर झोंप.

**गुलाबी थण्डी**=सौम्य गारठा.

**गोडी-गुलाबी**=खेळीमेळी; सामोपचार.

**गुलाम** ( पु० ) [ अ० घुलाम् ] विकत घेतलेला नौकर. लबाड ( किञ्चित् कौतुकानें ). ( हैदरअलीस उद्देशून ) "गुलामानें दगाच केला होता" ( खरे ८७९ ).

**गुलाम-गिरी** ( स्त्री० ) दास्य; गुलामाचा व्यापार.

**गुलामी** ( स्त्री० ) [ फा० घुलामी ] दास्य.

**गुस्सा** ( पु० ) [ अ० घुस्सा ] राग; कोप.

**गू** ( पु० ) [ फा० गुह् ] विष्टा.

**गूम** [ फा० गुम् ] नष्ट; गहाळ. "इनामतीच्या सनदा अलाहिदा आपल्यापाशीं आल्या होत्या त्या फित्रतीकरितां गूम जालिया" ( वाड-सनदा १४० ).

**गूल** ( पु० ) [ फा० गुल् ] वातीच्या टोंकाला जमलेली राखेची गोळी; काजळी; तापलेल्या वस्तूनें दिलेला डाग; आगकाडीच्या टोंकाला असलेलें ज्वालाग्राही मिश्रणाचें लिम्पण.

**गूल** ( पु० ) [ अ० घूल् ] गर्दी; हूल; गल्बा "गोटांत गूल होऊन जीन-बन्दी देखील झाली होती" ( खरे ६।२८७५ ).

**गूल-गल्बा** ( पु० ) बखेडा; हङ्गामा. "खम्बायेतकर मोगल उगेच सर्कारचे महाल खाऊन गूलगुल्ब्याचे वेळेस हे शैत्य होतात" ( ऐटि १।८० ).

*गैब [ अ० घाइब् ] अदृश्य; गुप्त.*

**गैबी** [ फा० घैबी ] अदृश्य; अव्यक्त, स्वर्गीय. "गैबी मारा" =आडून होणारा मारा. "गैबी शब्दांची महाध्वनी ( =अश्रणी ) जहाली ( चित्रगुप्त १६७ ).

**गैर** [ अ० घैर=व्यतिरिक्त ] इतर; अन्यायाचा; अयोग्य; वाईट. "व आणखी

गैर पतकें येऊन मोर्चेबन्दी केली आहे" ( राजवाडे १२।१२५ ).

**गैर-अदबी** ( स्त्री० ) असभ्यता. "गैर-अदबी बोलला सबब पातशाहा यास राग येऊन डोळे काढिले" ( मदरु २।७० ).

**गैर-अदा** =रद्द; न पटलेलें. "शिन्देकडील वरात जाली तर मग गैर-अदाही व्हावयाची नाहीं" ( खरे १०।५२७९ ). "ताकत राहिली नाही; हे समयीं नानांनीं वरात गैर-अदा केल्यासच परिणाम लागेल" ( खरे १०।५६२९ ).

**गैर-अब्रू** ( स्त्री० ) अप्रतिष्ठा. "गैर-अब्रू फारशी न करणें" ( वाडबाबा २।७५ ).

**गैर-अमली** परस्वाधीन; गैर कबजी. "चार लक्षाचे भरतीस अमली महालांपैकीं बेरीज कमी आल्यास, गैर-अमली महाल आहेत त्यांपैकीं भरतीस कमाल आकाराचे बेरजेचा महाल लावून देणें" ( राजवाडे १०।३२१ ).

**गैर-आरामी** ( स्त्री० ) अस्वस्थता. "हज्रतांचे शरिरास दोन दिवस गैर-आरामी आहे" ( दिमरा २।३२ ).

**गैर-इतबार** ( पु० ) गैर-विश्वास ( भाव )

**गैर-इमानी** ( स्त्री० ) बेइमानी. "गैर इमानी नाहीं तुम्हां तिळभर माया" ( होनाजी बाळ १२८ ).

**गैर-कबजी** परस्वाधीन. "गैर-कबजी मुलूख" ( चित्रगुप्त ७८ ). "सरन्जाम गैर-कबजी; कांहीं सुटला त्यांत वस्ती नाहीं" ( खरे २।९४२ ).

**गैर-किफायत** ( स्त्री० ) तोटा; नुकसान. "किफायत-गैर-किफायत समयासमयास चित्तांत आणून किफायतीचीं कामें करीत आलां, पुढें त्याच प्रमाणें करावीं" ( राजवाडे ११।३४६ ).

**गैर-कौली** पर्वानगी, अभयवचन दिलें गेलें नाहीं असा ( मराआ ).

**गैर-चाकर** बतर्फ; माज़ूल. "जखमी-जहाले त्यांस गैर-चाकर करून जागिरा तगीर करविल्या" ( जोरा ७५ ).

**गैर-जप्त** गैर-कबजी; परस्वाधीन. "गैर-जप्त देश साधावें" ( चित्रगुप्त ११० ).

**गैर-नफा** ( पु० ) तोटा; नुकसान. "येणें कडून तुमचा गैर-नफा जाहला" ( जोरा १४ ). "त्यांस, ही गैर-नफियाची गोष्ट आहे" ( राजवाडे ११।३०६ ).

**गैर-फायदा** ( पु० ) तोटा; गैर-नफा. "अत्यन्त वोढ केल्यास पाटील बावांचा गैरफायदा आहे" ( जोरा ४७ ).

**गैर-बर्दार** फळहीन. "पोफळी गैर-बर्दार, शेण्डे वाळलेल्या आहेत" ( राजवाडे ११।७९ ).

**गैर-मन्ज़ूर** नामन्ज़ूर; रद्द. "अष्टणानीं आपले ज़ागा वाजबी असतां गैर-मन्ज़ूर करून एक पक्षी तह केला ( राजवाडे १२।१२२ ).

**गैर-मर्जी** ( स्त्री० ) बे-मर्जी; इनराजी.

**गैर-महसर्दार** [ ? ∠ अ० मआसिर्= थोरवी ] अप्रतिष्ठित ( राजवाडे ८।४३ ).

**गैर-महसूल** ( पु० ) सर्कारधान्याविरहित वसूल. "विजापुरहून एक हवालदार गैरमहसूल पैदागिरी कबूल करून आला ( इऐ ५।१०० ).

**गैर-माकूल**=मूर्ख; अजाण; गैर; मूर्खपणानें. "नवे कचाट करून कार्यारास खलेल करणें हे गैर-माकूल गोस्टी आहे" ( राजवाडे १८।३३ ). "परन्तु लोक गैरमाकूल आम्हांस न कळत वर्तले तरी

त्याची बद्-लामी आपणावरी न ठेवावी" (राजवाडे ८।१० ).

**गैर-माहीत** =अजाण; नेणता. "साठे आहेत ते गैर-माहीत" (खरे ७।३५ ५१).

***गैर-माहीत-गार*** *=अजाण.*

**गैर-मिराशी** वंशपरम्परा मालकी ज्याची नाही असा. "निवाडा केला जे रामरामे महाजन मिरासदार; मातकदीम मिरासी खरी जाहली. काणव मज्कूर गैर मिरासी मुतालीक ऐसे जाहले" (इऐ ५।१०२). "हे दोघेजण गैरमिरासी असोन दखल करितात" (वाड-सनदा १२२ ).

**गैर-मुजरा; गैर-मजुरा** (पु० ) गैरचाल (राजवाडे ८।२६ ).

**गैर-मेहनत** (स्त्री० ) निरुद्योग. "परन्तु मेहनत-गैर-मेहनत सर्व एक ईश्वरी क्षोभानें वायां गेल्या" ( ऐच ५ ).

**गैर-मेहेरबानी** ( स्त्री० ) अवकृपा; इतराजी. "साङ्गितल्यावरून मनांत गैर-मेहेरबानी न धरावी" ( राजवाडे ८।१० ). "कम इज़्ततीनं व गैर मेहरबानीनं पेशजीही खिद्मत केली नाही व पुढेंही न करूं" (इम ६७ ).

**गैर-मोसम** (पु० ) गैर-हङ्गाम; अ-वेळ. "गैर-मोसमांत ( =पौष वद्य १२ स ) आम्बे आले यावरून कौतुक वाटलें" राजवाडे २२।१५ ).

**गैर-मोसमी** अवेळीं येणारा.

**गैर-रहा** ( स्त्री० ) बद्-चाल; गैर-शिरस्ता; बदसलुकाचा; गैर-चालीचा. "गैर-रहाचे वर्तणुकीचीं कलमें" ( खरे-७।३५६६ ). "भुजङ्गराव याची वर्तणूक गैर-रहा दिसते" ( खरे ११। ५७७६ ).

**गैर-रज़ावन्द** नाराज़; नाकबूल. "तो क्रियेस गैर रज़ावन्द जाहला" ( वाड-शाछ १३२ ).

**गैर राजी** =नाराज़. "पाटसकर गैर-राजी जाले" ( राजवाडे ६।२६ ).

**गैर-राबता** ( पु० ) [ ∠ अ० राबिता *=सम्बन्ध] येण्याजाण्याची मनाई. "त्यावेळीं सर्वांस येण्यास मोकळीक असावी; गैर-राबता नसावा* " ( ऐस्कुले ३४ ). "नाना फडणीस लश्करांतून आल्यापासून गैर-राबता बहुत करूं लागले; कोणाचीच गांठ पडत नाहीं" ( खरे ८।४१५१ ).

**गैर-वाका** ( पु० ) [ फा० घैर्-वाकिअ ] न घडलेली, खोटी बनावट गोष्ट; लबाडीनें. "ऐसा गैरा-वाका साङ्गितला" ( राजवाडे ८।५२ ). "वाका अगर गैर-वाका समज़ाविल्यास ऐकावयाचा नाहीं; समज़ूनच करणें तें केलें जाईल" ( खरे ७।३५५० ).

**गैर-वाजवी** [ फा० घैर् वाजिबी ] अयोग्य; अन्यायाचा; फाजलि. "त्यांचा अभिमान गैर-वाजवी यांणीं नच धरावा" ( राजवाडे १२।७९ ).

**गैर-शिरस्त**=नियमबाह्य; असभ्य; अयोग्य.

**गैर-शेरा** [ अ० शर्अ=धर्मशास्त्र ] धर्मशास्त्रबाह्य. "एका पर्गण्याच्या काजीपासून गैर शेरा अमल होऊन आला" वाड-सनदा १५ ).

**गैर-सनदी** =बेकायदेशीर; बेसनदशीर. "गैर-सनदी कजिया कार्याचा नाही" ( खरे १।३११ ). "गैर-सनदी खर्च करावयाची सर्कारची आज्ञा नाही" ( खरे ५।२३५३ ).

**गैर-सलाह** (पु०) गैर-मस्लत. "हें कम्पणी *इङ्ग्रज़बहादूर यांचे सलाहानें अगर गैर सलाहानें?*" ( राजवाडे २२।१२५ ).

**गैर-साल** अनिश्चित वेळेचा. " गुणनवरे यांनीं कागद् एक काढिला; तो बहुतां दिवसांचा, गैर-साल " ( राजवाडे ६।८९ ).

**गैर-हङ्गाम** ( पु० ) गैर-मोसम; अकाल. " त्यास, गैर-हङ्गाम; हाली सर्बुजीं तयार मिळालीं ते आठ सेवेसीं पाठविलीं असेत " ( राजवाडे ३।३१२ ). " गैर-हङ्गाम व दूर पथ याज़मुळें विलम्ब लागला " ( इम २५६ ). " गैर-हङ्गामीं रयतांस पैके लावून मारामारी करूं लागला " ( राजवाडे १५।२४ ).

**गैर-हङ्गामी** गैर-मोसमी.

**गैर-हज़्र; गैर-हजीर** [फा० घैर-हाझिर्] हज़र नसलेला; अविद्यमान.

**गैर-हज़री; गैर-हाजिरी; गैर-हजेरी** ( स्त्री० ) अविद्यमानता.

**गैर-हिसाबी; गैर-हिशेबी** ( स्त्री० ) अन्याय; अन्यायानें; अव्यवस्थित. " आपले जागिरींत नाहक गैरहिसाबी पादशाह खलल करवितात. आमा गैर-हिसाबी जाज़ती सोसुनु कम इज़तीनें व गैर-मेहेरबानीने पेशजीही खिद्मत केली नाही व पुढेंही न करूं " (इम ६७).

**गैर-हुर्मत** ( स्त्री० ) अप्रतिष्ठा; बे-अब्रू.

**गैर-हुशार** =असावध; गाफल.

**गैरत** ( स्त्री० ) [ अ० घैरत् ] लज्जा; भीड. "हल्लीचे शिकस्तेची गैरत आणि शर्मन्दगी नवाबास फार जाली आहे " ( राजवाडे ५।१९ ). " याजकारितां सास्यांची गैरत मनास आणून " ( ऐटि ३।१२ ).

**गैराद** [ अ० घैरात् अनेक व० घैर्चे ) बरकड इतर लोक ( सभासद १४ ).

**गोता** ( पु० ) [ अ० घोता] बुडी; गचका; नुक्सान; सङ्कट.ला गोता बसणें=पैं नुक्सान होणें. गोता खाणें=अपेश घेणें. गोत्यांत येणें=सङ्कटांत सांपडणें.

**गोदी** ( स्त्री० ) [ फा० गोदी ] बन्दरांत जहाज़ उतरण्यासाठीं चाऱ्ही बाजूंनीं बन्द् परन्तु समुद्रांत जाण्या करितां एका बाजूनें बन्द् करितां येईल असें दार आहे अशी जागा.

**गोफ्त-गो** ( स्त्री० ) [ फा० गुफ्त्-गो ] सम्भाषण; बोलाचाली. " त्याउपर बहुत गुफ्त-गो जाली " ( राजवाडे २०।३८ ).

**गोया** [ फा० गोया ] जणूं; म्हणजे. " जे ये समयीं आपलें येणें गोया करामात ( =महत्कृपा ) जाली " ( राजवाडे ११।८८ ).

**गोर-गरीब** =दरिद्री-भिकारी.

**गोर-कफन** ( न० ) [ फा० गोर्-कफन् ∠ फा० गोर्=धडगें+अ० कफन्=प्रेताचें वस्त्र ] व्यवस्थित मूठ माती; उत्तर-क्रिया.

**गोलन्दाज़** ( पु० ) [ फा० गोलन्दाझ ] तोफ डागणारा; तोफची.

**गोश्गुज़ार** [ फा० गोश्गुझार् ] श्रुत. " अज्जाहे दोस्ती तुम्हांस गोश्गुज़ार करून ठेवितों हें निमित्य उलट येईल " ( राजवाडे ५। १६४ ).

**गोश्माल; गोश्माली** ( स्त्री० ) [ फा० गोश्माल् ] कान-पिळी; शिक्षा; नतिजा; शास्त. " गोश्माल " ( इम ६ ). " आम्ही हराम-खोर असें खचित यकीन जालें असल्यास आम्हांस परि-च्छिन्न गोश्माली करावी " ( ऐस्फुले ४९ ). " त्याचे गोश्मालीस सर्कारांतून गाडद रवाना जाली " ( राजवाडे १९।१०५ ).

**गोश्वारा** ( पु० ) [ फा० गोश्वारा ] सारांश; कर्णकुण्डल. " दोन गोश्वारे " ( दिमरा १।१०५ ).

**गोशा** ( पु० ) [ फा० गोशा =कोपरा; एकान्त ] पर पुरुषापुढें तोण्डावर बुर्खा घेतल्याशिवाय स्त्रीनें केंव्हांही येऊं नये अशी चाल; पड्दा; अन्तःपुर. ( स्त्री० ) प्रत्यञ्चा जिथें लावतात तें धनुष्याचें टोंक.

**गोशे-नशीन** [ फा० गोशा-निशीन्=एकान्तवासी ] गुप्तपणें; कुफिया. " गोवर्धन खीचीनें.... यांजला गोशेनशीन साङ्गून पाठविलें " ( जोरा ८ ). " अशीं पत्रें सवाईसिङ्गानीं राजास गोशेनसीन लिहिलीं " ( जोरा १०६ ).

**गोस्पेच** ( पु० ) [ फा० गोश्पेच् ] थण्डी लागूं नये म्हणून कानांवरून डोक्यास गुण्डाळलेलें वस्त्र; टापशी.

**गोस्त; गोस; घोस** ( न० ) [ फा० गोश्त् ] मांस.

**गोही** ( स्त्री० ) [ फा० गुवाही ] ग्वाही; साक्ष.

**गोही-दार** ( पु० ) साक्षीदार. " गोहीदाराचें जरी मोडूं तरी साहेबास गुन्हेगारी....देऊं " ( राजवाडे १८।३५ ).

**गौर** ( स्त्री० ) [ अ० घौर् ] खोल व पूर्ण विचार ( राजवाडे १०।२५२ ); काळजी. " यांची हरएकविशीं गौर करीत जाणें " ( राजवाडे ३। २०५ ). " परन्तु रयतेची गौर करून कमावीसदार यांची तहकीकात करीत नाहीं " ( मद्बा २।५७ ).

**गौरशी** ( स्त्री० [ फा० घौर्-रसी ] खोल चौकशी; परीक्षा; ( चुकीचा अर्थ ) सर्फराजी; उर्जित. " आमची गौरशी करून आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणुकेस हजीर आहों " (ऐस्फुले ५२). " आम्ही काम-काज केलें हें धनी दृष्टीनें पाहून गौरशी करील म्हणोन आस्था होती " ( साने-पयाव १०० ).

## घ

**घजन्फर-जङ्ग** [ अ० घझन्फर=सिंव्ह; रण=सिंव्ह. एक पद्वी ( मप ५८ ).

**घरन्दाज** मोठ्या घराण्यांतील; अभिजात; कबिलेदार.

**घुगी; गुगी** ( स्त्री० ) [ फा० कूकी ] मुखत्राण; शिरस्त्राण.

**घुमट** ( पु० ) [ फा० गुम्बद् ] डेऱ्याच्या-कलशाच्या आकाराचें छप्पर.

**घुसल्खाना** ( पु० [ फा० घुस्ल्-खाना ] स्नानगृह; खल्बत खाना; एकान्ताची जागा.

**घोगा** ( पु० ) [ फा० घूघा ] ओरड. "जलद् चला ऐसा घोगा करूं लागले " ( मदरु २।२७ ).

## च

**चक** ( पु० ) [ फा० चक् ] हुकूम-नामा ( काजीनें दिलेला ); फत्वा.

**चक्तियाची पादशाही** [ तु० चघ्ताय् एका तुर्की टोळीचें नांव ] दिल्लीची मोंगल बादशाही.

**चङ्ग** ( पु० ) [ फा० चङ्ग् ] एक तन्तुवाद्य.

**चन्द** [ फा० चन्द् ] कांहीं. " हें बन्द करण्यास चन्द मुश्कील नाहीं " ( खरे ७।३५७५ ).

**चन्द-दर-चन्द** [ मराठी प्रयोग] अधिकाधिक. " या मस्लहतीची पैरवीस कौल

टाकिली होती; परन्तु सबब चन्द दर चन्द मुस्किलीचें जालें आहे " ( राजवाडे १०।२५२ ).

**चन्द रोज़** [ फा० चन्द् रोज़् ] कांहीं दिवस. " महादजीराव शिन्दे ता–हाल रुख्सत जाले नाहींत....आणखी चन्द-रोज़ राहतील " ( पदमव १४४ ).

**चपाती** ( स्त्री० ) [ फा० चपाती ] पातळ पोळी.

**चबर–चबर; अबर–चबर** [ फा० ∠ चर्ब् =स्निग्ध, अस्खलित ( भाषण ) ] अस्खलित; अद्वातद्वा.

**चबुत्रा** पहा चोथरा.

**चम्चा** ( पु० ) [ फा० चम्चा ] पसरट लाम्बट तोंग्डाची पळी.

**चमन** ( पु० ) [ फा० चमन् ] तृणाङ्गण; फुलांचा ताटवा; बाग.

**चरक** ( पु० ) [ फा० चर्ख् ] चक्की; दाबून रस अगर तेल काढण्याचें यन्त्र.

**चर्खा** ( पु० ) [ फा० चर्खा ] सूत काढण्याचा रहाट.

**चर्खी** ( स्त्री० ) धारलावण्याचें चाक.

**चर्ब** [ फा० चर्ब् ] वरचढ; गालीब. "आपण सार्‍यांवर चर्ब असावें" (राजवाडे ५।२४ ). " मस्लहतीचे मार्गे आलीजाह चर्ब पडतील असें दिसत नाहीं " ( राजवाडे ५।१३७ ).

**चर्बी** (स्त्री० ) [ फा० चर्बी ] मेद; उन्माद; मस्ती; माज.

**चर्मी** [ फा० चर्मीन् ] कातड्याचा. " चर्मी सामान " ( खरे ११।५९१ ).

**चरिन्दा** ( पु० ) [ फा० चरन्द् ] चराई; चराईपैका. "यास्तव चरिन्दा तीनशें रुपये घेऊन घोडीं माणसें सोडून दिलीं " ( खरे ११।६०७३ ).

**चलाख** [ फा० चालाक् ] हुशार; तर्तरीत; चपल, द्रुतगती. "महागिर्‍या निघाल्कतीच्या चलाक ऐशा " ( वाड-समा २।७८ ).

**चलाखी** ( स्त्री० ) [ फा० चालाकी ] हुशारी; चापल्य; हात-चलाखी; हस्त-चापल्य.

**चश्म-पोशी** (स्त्री०) [फा० चश्म्–पोशी] डोळेझांक. " जरी तुम्ही हे गोष्टी चश्मपोशी करून दर्गुज़र कराल तरी जिकडे वाजवी तिकडे परमेश्वर आहे " ( ऐटि १।६० ).

**चश्मा** ( पु० ) [ फा० चश्मा ] उपनेत्र; आरशी.

**चहारूम** [फा० चहारुम्] चौथाई. "ऐवज़पैकीं चहारूम तहकूफ ठेवून बाकी ऐवज़ाचा फडचा करून घ्यावा" (राजवाडे २२।१३).

**चाऊस** ( पु० ) [ तु० चावूश् ] ज़मादार; पोलीस अधिकारी.

**चाक करणें** [ फा० चाक् कर्दन् ] फाडणें. " उभयतांचे पोट चाक करावें म्हणोन आज्ञा केली आहे " (दिमरा २।८२).

**चाकर** ( पु० ) [ फा० चाकर् ] नौकर; सेवक.

**चाकर-पेशा** ( पु० ) नौकरीचा धन्दा; नौकरी आहे धन्दा ज्यांचा अशांचा वर्ग.

**चाकरी** ( स्त्री० ) [ फा० चाकरी ] सेवा; नौकरी.

**चाकू** ( पु० ) [ तु० चाकू ] सुरा; सुरी.

**चादर** ( स्त्री० ) [ फा० चादर् ] वस्त्र; पलङ्गपोस.

**चापट** ( स्त्री० ) [ फा० चपात्–चप्पात्] थप्पड.

**चापणें** [ ∠फा० चापीदन् = मारणें ] रागें भरणें; खरडपट्टी काढणें.

**चापलोसी** ( स्त्री० ) [ फा० चापूलोसी ] *अवास्तव स्तुती; तोण्डपुजा; हांजी;* खुशामत. " त्यानें यांसी चापलोसीच्या गोष्टी साङ्गोन, नादीं लाऊन " ( दिमरा १।१९ ).

**चापी** चापाची, बिनतोड्याची. " बन्दुका चापी " ( वाडसमा १।२७ ).

**चाबूक** ( पु० ) [ फा० चाबुक् ] कोरडा; असूड. " प्रतापी चाबूक धरूनि हातीं नकुळ बोले राजयाप्रती " ( मुक्तेश्वर-विराटपर्व ११।०५ ).

**चाबूक-स्वार** (पु०) [फा० चाबुक्-सुवार्] घोडे शिकविणारा.

**चार** [ फा० चार्-चहार् ] चतुः

**चारकुबा** "एक अङ्गरखा असतो, त्यास बाह्या नाहींत, व हू पावेतों; आणि आगा-पिछा मात्र असतो; आणि आघाडीस व बाहूवर मोत्याची झालर लावली असते" ( दिमरा १।१३३ ).

**चिकाचा पडदा** [ फा० चीघ्-चीक् ] काम्बट्यांचा पडदा.

**चिटणीस; चिट्नवीस** पत्रव्यवहार कर-णारा. " चिटणीस यांणीं सर्व राज्यां-तील राजपत्रें ल्याहावीं. राजकारण पत्रें उत्तरें ल्याहावीं " (वाड-सनदा १२४).

**चिराख; चिराग** ( स्त्री० ) [ फा० चिराघ् ] दिवा; बत्ती. " तों शहरांत सर्कारचे वाड्यापासून भवानीपेठेपर्यंन्त दो बाजूनें चिराख तयार केल्या " ( खरे ९।४७४५ ). " सगळ्या शहरांत चिरागा लाऊन हवया मळे चन्द्रज्योती लाऊन स्वारी रस्त्यानें मिरवत चालली होती " ( खस्वाव २१ ).

**चिरागदान** ( न० ) [ फा० चिराघ्दान् ] रोषणाईचे वेळीं रस्त्यानें दिवे लावण्या-साठीं उभी केलेली बाम्बूची जाळी.

**चिराख-बत्ती** (स्त्री०) दिवाबत्ती. "दर्गा-हाचे चिराख-बत्तीस व ऊदफुलाबद्दल" ( पेद्समा २४२ ).

**चिलखत** ( न० ) [ फा० चिहिल्कद् ] अङ्गत्राण.

**चिल्ला** ( पु० ) [ फा० चिल्ला ] चाळीस दिवसांचें उपोषण व ध्यानमग्नता. "तुम्ही ( =ब्रह्मेन्द्रस्वामी ) चिल्ल्यांतून उठले याची खबर लिहिली, मालूम जाली " ( पारसनीस-ब्रप २३९ ).

**चीज्** ( स्त्री० ) [ फा० चीज़् ] वस्तु; गाणें; ( न० ) सार्थक.

**चीज्-वस्त** ( स्त्री० ) सामान; अस्बाब.

**चीण** ( स्त्री० ) [ फा० चीन् ] चूण; घडी.

**चुगलखोर** ( पु० ) [ फा० चुघुल्खुर् ] चहाडखोर.

**चुगली** ( स्त्री० ) [ फा० चुघुली; तु० चुघूली ] चहाडी. " तुम्ही घडी घडी राजपुरीस आमचे चुकल्या लिहून आम्हांस नशेद्-पत्रें आणावितां " (पारस-नीस-ब्रच ३० ).

**चुङ्गाल** ( पु० ) [ फा० चुङ्गाल् ] पन्ज़ा. " बहुत खुश्वक्त जाले कीं ज़ब-र्दस्ताच्या चुङ्गालापासून गरिबाचें वतन खुलास जालें " ( राजवाडे २०।४९ ).

**चुनांचे** [ फा० चुनान्चे ] ज्या अर्थीं. " चुनाँचे आँ मेहेर्बांहीं इङ्ग्रजांचीं मकाणें घेतलीं व तमाम तालुक्यांत दौड तारुत व ताराज़ करण्यास गेली आहे व कुम-केचे ज़मियतेस घेराघेरी करविली गेली आहे हें ऐकून न्यहायत खुशी जाली " ( साने-पयाव ४६४ ).

**चुनीदा** [ फा० चुनीदा ] निवडक. "त्याचे उपराळ्यास जन्रल मण्डोर याणें आपले

हमराहींपैकीं बेश चुनीदी ज़मियेत पाठविली " ( साने-पयाव ४८१ ).

**चेहरा** ( पु० ) [ फा० चिह्रा ] मुख; तोण्ड; मुद्रावर्णन.

**चेहरा-मोहरा** ( पु० ) मुद्रा; चर्या.

**चेहरे-पट्टी** ( स्त्री० ) चेहऱ्याची ठेवण.

**चोप** ( पु० ) [ फा० चोब् ] दण्ड; मार.

**चोपणें** =मारणें, ठोकणें.

**चोपदार** ( पु० ) [ फा० चोब्दार् ] वेत्रधारी; चान्दी-सोन्याची काठी हातीं धरून राजापुढें चालणारा व ललकारणारा.

**चोबी** [ फा० चोबी ] लाकडी. " नवाबाचे खेम व चोबी बङ्गला जाऊन उभा राहिला " ( राजवाडे ७।९८ ).

**चोबीना** ( पु० ) लाकूडकाम; लाकडें ( राजवाडे ७ खलप २।७६ ).

**चौगिर्द** [ ∠फा० गिर्द् ] चौतर्फा. " दुरूनच चौगिर्द घेरून भाण्डियांचा मार देत असावें " ( मराआ ३८ ). " अलीनवाजखानास चौगिर्दा केलें ( =वेढिलें ) ( खरे ९।३ ).

**चौतर्फा** [ फा० चार्-तरफ् ] चाऱ्ही बाजूंनीं.

**चौथरा; चबुत्रा** ( पु० ) [ फा० चोतरा ] उन्च चौकोनी ओटा; वेदी; जमिनीपासून घराच्या तळमजल्याची उञ्ची; जोतें.

**चौरी-बर्दार** ( पु० ) [ ∠फा० बर्दार्= उचल ] चवरी ढाळणारा.

# छ

**छबिना** ( पु० ) [ फा० शबीना ] रात पहारा; रातपहारेकरी; रातमिरवणूक; मिरवणूक. " रात्रीची दगाबाजी करील; यास्तव छबिन्याची बन्दोबस्ती चाङ्गली असावी " ( खरे ४।१५१० )

**छबी** ( स्त्री० ) [ अ० शबीह् ] प्रतिमा; तस्वीर.

**छान** [ अ० शान्=प्रतिष्ठा ] सुन्दर; उत्तम.

**छानछुकी** ( स्त्री० ) **छानछोक** ( पु० ) [ अ० शान्-उ-शौकत् ] झोंक; डामडौल; नखरा.

**छान्दार** [ फा० शान्दार्=प्रतिष्ठित ] सुन्दर; शोभिवन्त.

**छापखाना** ( पु० ) [ ∠फा० चाप्खाना ] मुद्रणालय.

**छापणें**=ठसा उमटविणें.

**छापा** (पु०)[∠फा० चापीदन् ∠तु० चापौल्-चपावल्=हल्ला ] हल्ला; एल्गार.

# ज

**जईफ; जयफ; जैफ** [ अ० ज़ईफ् ] वार्धक्यानें क्षीण; अशक्त. " आम्ही जईफ जालों आहों; बहुत दिवस वांचत नाहीं " ( राजवाडे १।२८ ). " तुकोजी होळकर बहुत जैफ जाले; शरिरांत ताकद नाहीं " ( खरे ९।४९२५ ). " पातशाहीची दौलत जेफ-म्हातारी जाली आहे " ( दिमरा १।२१३ ).

**ज्यान-फाइदा** ( पु० ) [ ∠फा० झियान् तोटा ] तोटा-नफा.

**ज्वहार** जवाहीर. "शिरीं पगडी कङ्गणीदार अङ्गावर ज्वहार, कुठिल रहाणार कोण पर्गणा जी " ( होनाजी बाळ १६९ ).

**ज्वान** [ फा० जुवान् ] तरुण.

**ज्वानी** [ फा० जुवानी ] तारुण्य. "अङ्गीं

तारुण्याचा बहर, ज्वानिचा कहर, मारिते लहर मदनतल्वार " (रामजोशी ११४).

**जक** ( स्त्री० ) [ अ० दक्क् पीठ करणें ] खिपत; पराभव; धक्का; सद्मा. "एकाशी गोड बोलून एकास जक द्यावी; फाडा-फोड करावी हे हुन्नर टोपीकर बहुत जाणतात " ( राजवाडे १०।१६७ ). "इङ्ग्रेजास जक त्यांनीं ( = हैदरअली खानांनीं ) फार दिली " ( दिमरा १। ३४ ). "याजकरितां शिखांचें पारिपत्य होऊन जख बसेल तो सुदिन " ( दिमरा १।३६ ). " एवढी जक खडर्यावर हज़रतीस बसली " ( राजवाडे ५।१६ ).

**जकात** ( स्त्री० )[अ० ज़कात् = ( मूलार्थ ) धर्मासाठीं बसविलेला प्रातीवरील कर ] मालाच्या आवक-जावकीवरील कर; दस्तुरी. "जकायत" ( राजवाडे ३।२९; ८।२२९ ).

**जकात-दार** (पु०) जकात वसूल करणारा.

**जकिरा** ( पु० ) [ अ० ज़खीरा ] कोठार; सांठा; सञ्चय; सामुग्री; सांठवणूक. " ठाण्यांत दारू व तोफेचे गोळे बाण वगैरे जकिरा पोक्ता आहे " ( खरे ९।४५०३ ). " या करितां तसे जागीं जखिरियाचें पाणी म्हणून दोन चार टाकीं तळीं बान्धावी, त्यांतील पाणी खर्च होऊं न द्यावें " ( मराआ ३३ ). ( दाणा ) "सर्व नेऊन पट्टणांत जकिरा केला " ( खरे ९।४५२५ ).

**जकिरी** = जकिऱ्याचें, विशेषतः ( दारू गोळ्याचें ). " *त्याजवर सामान जकिरी पूर्वीलप्रमाणें राखावें* " ( मराचिथोशा ३२ ).

**जखम** ( स्त्री० ) [ फा० ज़ख्म् ] घाव; घायटा.

**जखमी** [ फा० ज़ख्मी ] घायाळ.

**जखमाना; जख्मीना** ( पु० ) घायाळास दिलेला पैका. " जखमानेही दिले " ( राजवाडे ४।१०७ ). " ऐशी हज़ार रुपये जख्मीना लागला " ( होके २३ ).

**जङ्ग** ( पु० ) [ फा० ज़ङ्ग् ] गञ्ज; कीट.

**जङ्ग** ( स्त्री० ) [ फा० जङ्ग् ] युद्ध; लढाई; हातघाई. " या जङ्गींत पांच मोहरे त्याजकडील मृत्यू पावले " ( इम २९२ ). " पांच वर्षे जङ्ग व हङ्गामा शुरू आहे " (खरे ७।३५६६). " बागवान जङ्गीस येऊन बे-अदबी बोलला " ( राजवाडे १५।११३ ). सफेजङ्ग ( स्त्री० ) खडें व निकराचें युद्ध.

**जङ्ग जङ्ग** पछाडणें-अटोकाट प्रयत्न करणें.

**जङ्ग-जोड** ( स्त्री० ) युद्धाची व्यवस्था. "जङ्गजोड बसेल" (खरे १०।५३४५).

**जङ्गल** ( न० ) [ फा० जङ्गल् ] रान.

**जङ्गल-गर्क** रानवजा; जङ्गलांत लुप्त झालेली. " बागाईत जमीन जङ्गल - गर्क पाणी पाट सुद्धां जाहली आहे " ( वाड-समा २।२४४ ).

**जङ्गल-शाही** ( स्त्री० ) रान-राज्य. " त्यावेळीं जङ्गलशाहीच्या बाद-शहाची सिंहगर्जना सुरू होऊन वरच्या अस्मानी सवालाला जमिनीचा जबाब मिळतो ! " (गडकरी-राजसंन्यास ५)

**जङ्गली** [ फा० जङ्गली ] रानटी; *अनार्य; असंस्कृत.*

**जङ्गी** [ फा० जङ्गी ] युद्धविषयक; मोठा; मातबर. " या खेपेस रस्तेचा बैल भारी नव्हता; जङ्गी सामान भारी होतें " ( खरे ७।३६१४ ).

**ज़िया** ( पु० ) [ अ० जिझ्या ] मुसल्मानेतरावरील डोईपट्टी. " न्यायाचे मार्गानें पाहतां ज़िया पट्टीचा कायदा केवळ गैर.. याजवर हिन्दू लोकांस पीडा करण्यांतच धर्म आहे असें मना-मध्यें आलें असल्यास आधीं राजा राजसिङ्ग याजपासून ज़िया घ्यावा म्हणजे इकडून कठीण नाहीं " ( वाड-सनदा १५० ).

**ज़िरा; जञ्जिरा; जञ्जिरा** ( पु० ) [ अ० जझीरा=बेट ] दर्या-किल्ला; जलदुर्ग. " सर्कारचा ज़िरा सर्कारांत ताबीन होऊन " ( राजवाडे १०।२८० ).

**जञ्जीर; जञ्जिरी** ( स्त्री० ) [ फा० झञ्जीर् ] सांखळी. नग. "एक जञ्जीर फील " ( साने-पयाव ३८४ ).

**जड-जवाहीर; जर-जवाहीर** ( न० ) [ फा० झर्=सोनें; अ० जवाहिर्=रत्नें ] सोनें व रत्नें. " सर्व जिनस-अज्नास जर-जवाहेर, नागपुरास घेऊन जाऊन" ( राजवाडे ७ खलप १।३ ).

**जड-गीर**=लुटीच्या भारानें भारावलेलें ( चित्रगुप्त ११९ ).

**जदीद** [ अ० जदीद् ] नवीन. " जदीद करार झाला त्याची ही अहवाल तेव्हां रास्तरवी-कायमी कोठें राहिली ! ( खरे ७।३५७० ).

**जन्नत-नशीन** [ फा० जन्नत्-निशीन् ] स्वर्गवासी.

**जनान-खाना** ( पु० ) [ फा० झनान्=स्त्रिया ] जनाना; अन्तःपुर.

**जनाना** ( पु० ) [फा० झनाना ] अन्तः-पुर; स्त्रीपरिवार.

**जनानी** [ फा० झनानी ] स्त्रियांसम्बन्धी; बायकी; गैर-मर्दानी. जनानी आवाज बारीक, स्पष्ट व मधुर आवाज.

**जनाब** ( पु० ) [ अ० जनाब् ] प्रासादाङ्गण; उम्बरा; ' स्वारी' या शब्दाप्रमाणें याचा बहुमानदर्शक सम्बोधन म्हणून उपयोग होतो. " खावन्दाचे जनाबांत सेवक लोकांनीं हजर असावें हें तो लाजीम आहे" ( राजवाडे ३।७३ ). "जें मनांत होतें तें जनाब-इलाहींत (=ईश्वरास ) कबूल होऊन हे दिवस दृष्टीस पडले" ( राजवाडे ५।८६ ).

**जनाबे-आली** ( शब्दशः ) उच्च उम्बरा; बहुमानदर्शक सम्बोधन.

**जनावर** ( न० ) [ फा० जान्वर ] प्राणी; पशू ; सर्प. ( सापाचें नांव घेऊं नये म्हणतात कारण तें नांव घेतलेलें त्यानें ऐकिल्यास तो दंश धरितो ).

**ज़प्त** ( पु० ) [ अ० झब्त् ] हरण; नियन्त्रण; दबाव; सर्कारजमा. " ज़फ्त " ( इम २१२ ). " खुसूस तुमचे तालुक्यांतील लोक बेरोजगार बहुत त्याजकडे गेले याजवरून कियास करावा कीं असे लोकांवर ज़प्त कसा राहील ! " ( राजवाडे ५।५२ ). " रामाजीपन्त यांचा जफ्त टोपीकरांवर बरा आहे " ( राजवाडे ६।४०२ ).

**ज़प्तमुलूक** =प्रदेश-जेता; सन्ताजी घोरपडे यांचा किताब ( राजवाडे ८।४९ ).

**ज़प्त-रप्त; जफ्त-रफ्त** ( पु० ) [ फा० झब्त्-उ-रब्त् ] व्यवस्था; बन्दोबस्त. " करारवाके जफ्त-रफ्त करूं " ( राजवाडे ६।६१२ ). " वतन्दारांचीं वतनें वतन्दारांच्या दुमाला केल्या विरहित पोट-तिडीक लागोन मुलूक मामूर होत नाहीं व मुलुकाचा जफ्त-रफ्त

होत नाही असें कळों आलें " ( राजवाडे १६।४४ ).

**ज़प्ती** ( स्त्री० ) [ अ० ज़ब्त् ] हरण; नागावा; अम्मल; ताबा. " किल्ल्याची व बेगमात व पातशाह–जादे व सलातीन व नाज़र यांची ज़प्ती केली ! एकेक पाइ्गवरूण अङ्गावर मात्र सोडिलें " ( दिमरा १।२७२ ). "जालनापूर देशांत स्वारी करून ज़प्ती बैसविली " ( चित्रगुप्त ९५ ).

**ज़बर** [ फा० ज़बर् ] वरचढ; मोठा; बलाढ्य.

**ज़बर्दस्त** [फा० ज़बर्दस्त्] बलाढ्य; ज़ोरावर; ज़ुलमी.

**ज़बरदस्ती** ( स्त्री० ) [ फा० ज़बर्दस्ती ] बलात्कार; ज़ोरा; ज़ुलूम; गालबता. " इङ्ग्रजांनीं टिपूसारखा ज़बर्दस्त बुडविला आणि पट्टण घेतलें हें मोठें काम केलें; इङ्ग्रजांची ज़बर्दस्ती सर्वांवर पडली असें वाटतें " (खरे ११।६०३०).

**ज़बरी** ( स्त्री० ) [ फा० ज़बरी ] सामर्थ्य; ज़बर्दस्ती. " पादशाही ज़बरीनें घेईल" ( चित्रगुप्त ३४ ). " शिद्दीनीं ज़बरी पाहून सलूयाचें नातें लाविलें " ( चित्रगुप्त ८६ ). बळ–ज़बरी=सामर्थ्य, बलात्कार.

**ज़बान** ( स्त्री० ) [ फा० ज़बान् ] जीभ.

**ज़बानी** ( स्त्री० ) तोण्डी हकीकत; न्यायाधिशापुढें साङ्गितलेली हकीगत; साक्ष; ग्वाही; तोण्डी. " मुख–ज़बानी " = तोण्डानें. "ज़बानी बातमीस व कलमी बातमीस थोडेंबहुत अन्तर पडतच आहे " ( खरे ४।१४७० ). " त्यानें ज़बानी वर्तमान येणेंप्रमाणें साङ्गितलें" ( खरे ११।५६७८ ). " हें आज्ञेप्रमाणें ज़बानी साङ्गतां कळेल " ( राजवाडे ८।१३८ ).

**ज़बाब** ( पु० ) [ अ० जवाब् ] उत्तर. साफ–ज़बाब = रोकडें स्पष्ट उत्तर. *हाज़र–ज़बाबी = तावडतोब समर्पक उत्तरें देण्यांत कुशल.*

**ज़बाब्दार** [ फा० जवाब्दार् ] जिम्मेदार; जोखीम्दार; विश्वासू.

**ज़बाब्दारी** ( स्त्री० ) [ फा० जवाब्दारी ] जिम्मा; जोखीम; विश्वास.

**ज़बाबणें**–उत्तरणें; उत्तर देणें.

**ज़बाब–सवाल; ज़ाब–साल** ( पु० ) [ फा० जवाब्–उ–सुआल् ] बोलणें. " आम्ही ज़बाब–सवाल केला जे, हत्ती व घोडेकरितां आम्ही आलों नाहीं " ( तरा ८१ ).

**ज़बाबी** [ फा० जवाबी ] उत्तरविषयक; तासांची घण्टा वाजविणारें ( घड्याळ ). " एक घड्याळ ज़बाबी चाङ्गलें, ज़बाबी म्हणजे तास वाजतात तें " ( राजवाडे १२।६८ ).

**ज़बे; ज़ब** ( स्त्री० ) [ अ० ज़ब्ह् ] हत्या. " सर्कारांतून आज्ञा होऊन ज़बे करविली " ( खरे ११।५७७१ ).

**ज़बून** [ फा० ज़बून् ] गरीब; दरिद्री; गैर–मातबर. " वऱ्हाडचे महाल ज़बून म्हणतात; त्याच महालावर लक्ष्मणराव खण्डागळे आडचा–ती हजारा फौजेनसी चाकरी करीत होते " ( राजवाडे १।११७ ). " हाल ज़बून होता " ( भाइसम १८३४ पावृ १४१ ).

**ज़म्बिया** ( पु० ) [ फा० जम्बिया ] कट्यार.

**ज़म्बूरक** [ फा० ज़म्बूरक् ] लहान तोफ.

**ज़म्बुरा** ( पु० ) [ फा० ज़म्बूरा ] लहान तोफ.

**ज़म** (पु०) [अ० जम्अ] सन्च; जुळवा-जुळव; व्यवस्था.

**ज़म-खाना** (पु०) [?∠फा० जामा-खाना = वस्त्रागार] सत्रञ्जी. " ज़मखाने दोन जोडी व गालीचे करावे " (खरे ८। ४२२१).

**ज़मनीस** (पु०) एक वसुली अधिकारी; हिशेबतपासनीस.

**ज़मणें** [फा० जम्अ] एकत्र होणें.

**ज़मविणें** एकत्र करणें.

**ज़मरूद** [फा० ज़ुमुर्रुद् = पाच] पाच " ज़मरूद्-पाचेचा जोड एक " (राजवाडे ७ खलरा १।२१).

**ज़मा** (स्त्री०) [∠अ० जम्अ] एकीकरण; प्राप्ती; मिळकत; एकीकृत; एकत्र. ज़मा होणें = एकत्र होणें. ज़मा करणें = एकत्र करणें.

**ज़मा-खर्च** (पु०) [अ० जम्अ-खर्ज़] उत्पन्नव्यय; आवकजावकाचा हिशेब.

**ज़मात; ज़मायत** (स्त्री०) [अ० जमा-अत्] समुदाय; ज़माव; सङ्घ; ज्ञाति-सभा.

**ज़मात-खाना; ज़मायत-खाना** (पु०) " मशिदीचे तिन्ही बाजूस ज़मातीस बसण्यासाठीं बान्धलेला दुमज़ली अगर एक मज़ली सोपा " (ऐस्फुले २।३४).

**ज़मात-दार** (पु०) [फा० जमाअत्-दार्] टोळीचा नायक.

**ज़मादार** (पु०) [फा० जम्अदार्] सर्शिपाई.

**ज़मादिलावल** (पु०) अ० [जुमादीयुल् अव्वल्] अरबीवर्षाचा पांचवा महिना.

**ज़मादिलाखर** (पु०) [जुमादीयुल् आखिर्] अरबी वर्षाचा सहावा महिना.

**ज़मादिसानी** (पु०) [अ० जुमादिस्सानी] ज़मादिलाखर (चिरा ११).

**ज़मान** (पु०) [अ० ज़मान्] ज़बाब्दार हमीदार; ज़ामीन. " ऐसा तह करून ज़मान घेऊन " (राजवाडे १५।२४).

**ज़मान-कतबा** (पु०) मुचल्का (राजवाडे १५।४९); ज़ामीनपत्र.

**ज़मान-दार** (पु०) [फा० ज़मान्दार्] हमीदार.

**ज़मानात** (स्त्री०) [अ० ज़मानत्] ज़ामीनकी; जिम्मेदारी.

**ज़माना** (पु०) [अ० ज़माना] काळ; वक्त. " आजी ज़माना एक प्रकारचा आला आहे " (खरे १।१८३). " वसईस इङ्ग्रजांचा शह पडला आहे... आणि यांस (महादजी शिन्दे यांस) श्रीमन्तांच्या घरांत काय आहे तें आपण घेण्याची हांव सुटली आहे, असा ज़माना आला " (मद्बा ११६८)

**ज़माबन्दी** (स्त्री०) [फा० जम्अबन्दी] जमिनींची अगर घरांजी पाहणी करून सर्कारधारा ठरविणें; सन्चणी. "लोकांची ज़माबन्दी फारच ते ठिकाणीं केली आहे " (पद्मव २१).

**ज़माव** (पु०) [∠अ० जम्अ] समुदाय.

**ज़मीदार; ज़मीन्दार** (पु०) [फा० ज़मी-दार्—ज़मीन्दार] स्वतःसाठीं मेह्नताना म्हणून कांहीं टक्के वसूल कापून घेऊन बाकीचा वसूल उगवून सर्कारांत पाठविणारा; वतन्दार.

**ज़मी-दोज़** [फा० ज़मीन्दोज़्] भुईकोट. " ज़मीदोज़ किले इङ्ग्रजाचे लढाईत परीच्छिन्न रहावयाचे नाहींत " (राजवाडे ७।६१).

**ज़मीन** (स्त्री०) [फा० ज़मीन्] भूमी; भुई.

**जमीन-जुम्ला** ( पु० ) [ ८अ० जुम्ला=सर्व ] वतन-वाडी; सर्व इष्टेट. " त्यास वडिलांनी जमीन-जुम्ला किती, तन्खा काय, पर्गणा कोण, तें पत्र लिहून दिल्लीस रवाना करावें " ( साने-पयाव २२ ). " *सिवेचे नेम वही दाणे जमीन-जुम्ले कानगोहोच्या दफ्तरीं* असे " (भाइसम १८३५ वाइ ३७५).

**जमीन-दोस्त** [ मराठी समास ] चीत; पायमाल; गर्दीस मिळविलेला; जमिनी-बरोबर.

**जमे; जमीये** [फा० जम्अि-जमीइ ] सर्व; कूल ( राजवाडे १५।१७१ ). "खुदाये ताला हे फत्ते आँ मेहेरबाँस व जमीये दोस्तांस मुबारक लाये " ( साने-पयाव ४८२ ).

**जमेत; जमियत; जम्यत** ( स्त्री० ) [ अ० जम्इयत् ] जमाव. " ते व आपली जमेत चालून पुढें आले " ( मराचि-थोशा ३२ ). " जम्यत गारत केली " ( राजवाडे ५।६८ ). " नानाजवळ जमेतही भारी जमली म्हणतात " ( खरे ११।५६५७ ).

**जय्यत** [ अ० झाइद्=अतिशय ] पूर्ण; अगदीं; सिद्ध. "तयारी जय्यत आहे". "त्यांतील पल्टण जयद् बर्बाद् जाली" ( होळे ११६ ).

**जर** ( पु० ) [ फा० झर्=सोनें ] कलाबतू.

**जर्गा** ( पु० ) [ फा० जर्गा ] मण्डळ; वेढा. " यांतही सर्वांनीं जर्गा एकच केल्यास काम तमाम होऊन नफे फार होतील ( राजवाडे १९।३७ ).

**जर्गीर** ( पु० ) [फा० झर्गर् ] सोनार.

**जर्जरा; जराजरा** [ फा० झर्रा ] अणू अणू. "हर्कारे यांनीं जर्जरा तिलतिल खबर घेऊनु आपुले पादशाहासीं साङ्गितले ( इम ९ ).

**जर्तारी** [ फा० झर्तार् ] कलाबतूचें.

**जर्द** [ फा० झर्द् ] सोनेरी. " करून स्वारी तयार नबाब जर्दा अम्बारींत ( साने पयाव ५४ ). पिवळें जर्द=पिवळें धमक; *अतिशय पिवळें.*

**जर्दोजी** [ फा० झर्दोझ् ] जर्तारी. "खान-पोश जर्दोजी जवाहरजडित मोत्याची झालरचे आणून ठेविले " (पद्मव ९४).

**जर्ब; जरब** ( स्त्री० ) [ अ० झर्ब् ] प्रहार; तडाका; नाणें पाडणें; छाप; जोर; शिक्षा; मार; धाक; दरारा; ठार; नग; तोफ. " वीज शिरली...ब्राह्मणास पुरती जरब बसली " ( राजवाडे ६।१२५ ). " पूर्वी दोन तीन लढाया झाल्या परन्तु मोंग-लास या तर्‍हेची जरब कधींच बसली नव्हती " ( खरे ३।५७३). " ज्यांनीं मग्रुरी केली त्यांचे प्रान्तांस व त्यांस जरब दिली " ( मराचिथोशा ४७ ). " अली गोहराचा शिक्का दिल्लींत पडला, त्याची चिठी पाठविली आहे. त्याप्रमाणें लिहून पातशहाची जरब मोडून याचें नांवें करणें " ( राजवाडे १।३६३ ). " अशा सतरा जरबा बिडी राजश्री तात्यांनीं घेतल्या " ( खरे ९।४५७१ " सर्कारांतून दिवाळ-तोड जरबा रवाना व्हावयाचा बेत ठरत होता " ( खरे ९।४६८१ ). " पञ्चवीस जर्ब तोफा " (राजवाडे १।१६१). " शिन्देही बाणांचे रोख पाहून जरबा सुरू करितात " ( खरे ११।५६६१ ).

**जर्बाब** [ फा० झर्बाफ्त् ] जर्तारी विणेचें; भर्जरी वस्त्र ( मराआ २२ ).

**जर्बांबी** भर्जरी. " खुर्शा मखमल जर्बाबी

मढोन माण्डिल्या होत्या" (राजवाडे १।४२).

**ज़रब-वान**-दराऱ्याचा; कर्तृत्ववान्. "ज़रबवान् पुरुष आहे त्याचे तोण्डांत दौलत आहे" (होके १०९).

**ज़रा** [ अ० ज़र्रा=अणू ] तिळमात्र; किञ्चित्.

**ज़रा-बज़रा** =कण न कण. "इनामाचें ज़रा-बज़रा पावते कीजे" (राजवाडे १५।१६४). "मू-रगडांतील ऐवज़ व चीज़वस्त गेलेलें ज़राबाज़रासुद्धा गड स्वाधीन करावा" (खरे ११।५७०४).

**ज़रिदा** [ अ० ज[रि]दा ] सडा. "ज़रिदा होऊन बऱ्हाणपुरचे पारिपत्यास येणार" (राजवाडे १।२७).

**ज़री** [ फा० ज़रीन् ] सोनेरी; ज़र्तारी. "ज़री सामान" (सभासद ६८).

**ज़रीब-दार** (पु० ) [ अ० जरीब् ] ज़मिनीचें मापन करणारा.

**ज़रुरी** (स्त्री० ) [ फा० ज़रूरी ] अवश्यकता; गरज़; पर्वा.

**ज़रूर** (स्त्री० ) [ अ० ज़रूर् ] अवश्य; न चुकतां; ज़रूरी. "सत्वर भेटीचा विचार जाला म्हणजे यास फौ[जे]च ज़रूर म्हणोन ज़ागिरा चित्तानुरूप मिळतील" (राजवाडे ८।२०५).

**ज़रूरात** (स्त्री० ) [ अ० ज़रूरत् ] ज़रूरी; अवश्यक. "कोणास बक्षीस काय द्यावें याची ज़रूरात तुमचे विचारें असेल त्याची याद पाठविणें" (खरे ८।४२००). "ज़रूराती" (भाइसम १८३३ अहवाल १२१). "तेथील ज़रूरात जे कांहीं चीज़ वस्त होती ते घेऊन" (चिरा ४).

**ज़रुराती**-काम चलाऊ; हडगामी. "कांहीं लोक लागल्यास ज़रूराती ठेवणें व दङ्गा वारलियावर दूर करणें" (वाड-समा १।२०).

**जल्सा** (पु० ) [ अ० जल्सा ] बैठक; सम्मेलन; गाण्याबजावण्याची बैठक; मैफल. "जल्शांत जें ठरेल त्याची विनन्ती लिहिण्यांत येईल" (राजवाडे ५।१४४).

**जल** [अ० जल्]वैभव, झकाकी (राजवाडे ५।७६). खालीं जलील पहा.

**जलद** [ अ० जल्द ] चपळ; द्रुत; वेगानें; तांतडीनें; उशीर न करितां.

**जलदाई** (स्त्री० ) चपलता; घाई. "विठोबा भला मारिला तोबा, कम्बर मोडली। रखुमाई, भली केली जलदाई कम्बर शेकली" (मराठी भजन).

**जलदी; जल्दी** (स्त्री० ) [ फा० जल्दी ] घाई; त्वरा; वेग. "जलदीस आता किम्मत आहे" (राजवाडे १९।५२).

**जला-वतन** करणें [ अ० जला=हद्दपारी] स्वदेशहद्दपार करणें. "हाण्डे याचें पारपत्य जला-वतन करणें" (वाड-सनदा ७०).

**ज़लाद** (पु० ) [ अ० जल्लाद् ] फांशी देणारा; माङ्ग; निर्घृण. "अम्मलदार हमदानी ज़लाद" (ऐटी ५।१०).

**जलाल** (पु० ) [ अ० जलाल ] उग्रता; शक्ती; ज़ुलूम; ज़ोरावरी; कडक; उग्र. "जर रयतेवर हक्क करून दिधला तरी नूतन कानूमुळें रयतेवर जलाल होऊन रयत पीडा पावते, श्रमी होते" (मराआ २५).

**जलील** [ अ० जलील् ] प्रकाशमान्; वैभवसम्पन्न. "नवाबाची दौलत बहुत

जलील झालियास आणखी जल देणें अथवा रोनक आणणें हा यख्तियार तुम्हाकडे आहे " ( राजवाडे ५।७६ ).

**जलूस** ( पु० ) [ अ० जुलूस ] आरोहण; समारम्भ. " मोठा जलूस जाहला " ( ऐटि १।६५ ).

**जलूस-वाला**=श्रेष्ठांचें आरोहण ( राजवाडे १८।५६ ).

**जलूश** ( पु० ) कीर्ती; अस्करा. " माधवराव साहेब यांचे जरबेचा जलूश मोठा " ( होके ४२ ).

**जलुशी** [ अ० जुलूसी ] राज्यारोहणापासून मोजण्यांत आलेला ( शक ).

**जलोह-खाना** ( पु० ) जिलौ-खाना पहा.

**जव्हेरी; जोहरी** ( पु० ) [ फा० जव्हरी ] रत्नपारखी; जवाहिऱ्या.

**जव्हर** ( न० ) [ अ० जव्हर ] विशेष गुण. " यावरी मनुष्याचें जव्हर जाणणार असे शकस होणें दुर्लभ ( ऐटि ३१७ ).

**जव-जव** [ फा० जव्-जव् ] यवयव; तिळतिळ; कणकण; थोडें थोडें. " जव जव नूतन सम्पादावें व बळकट व्हावें " ( मराआ २३ ).

**जवादी** ( स्त्री० ) [ अ० झबाद् ] गन्धमार्जारापासून मिळणारा सुगन्धी पदार्थ. " जवाद्या मान्जराचा आण्ड... मिळाला तर...आम्हास पाठवून देणें " ( राजवाडे १७।५२ ). "जवादी प्रसवती विडाळी" (मुक्तेश्वर आदिपर्व ४९।८८ ). " जवादी-बिडाळाचे वृषण । मस्तकीं खोंविती श्रीमन्त जन । रासभाचे लम्बायमान कर्ण । कोणी हातें नातळे " ( मुक्तेश्वर, सभापर्व ५।६० ).

**जवान; ज्वान** [ फा० जवान् ] तरुण.

**जवाँ-मर्द** [ फा० जवान्मर्द ] तरुण; शूर; दिल्दार; उदार.

**जवाँ-मर्दी** ( स्त्री० ) [ फा० जवान्मर्दी ] पराक्रम; शौर्य; औदार्य. " कांहीं किल्ले ठाणीं पादशाहींत गेलीं तीं जवांमर्दीनें घेतलीं " (मराचिथोशा ७४ ). "इङ्ग्रजांच्या जुवांमर्दीची शर्त जाली " ( खरे ९।४४९७ ).

**जवानी; ज्वानी** ( स्त्री० ) [ फा० जवानी ] तारुण्य.

**जवाब-सवाल** ( पु० ) जाब-साल. " आपले मार्फतीचा जवाब-सवाल, याजकरितां करार गुजरून गेला असतां सबुरी करण्यांत आली " ( राजवाडे २२।६३ ).

**जवार** ( स्त्री० न० ) [ अ० जुवार् ] सामन्त; नवाई; आजूबाजूचा प्रदेश.

**जवाहीर; जव्हार** ( न० ) [ अ० जवाहिर् ] रत्नें मोत्यें.

**जवाहीर-खाना** ( पु० ) रत्नभाण्डार.

**जशन** ( पु० न० ) [ फा० जश्न् ] समारम्भ; उत्सव. " पातशाहानीं छ ११ माहे मज्कुरीं जशन केला " ( दिमरा २।६० ). " छ १७ तारखेस हज़रतांनीं कुर्सीची तयारी करून जशन केलें " ( दिमरा २।१७४ ).

**जहन-नशीन** [ फा० झहन्-निशीन्८ अ० झहन् =आकलन शक्ती ] श्रुत; माहीत. " कुलू कैफियत आं मेहेर्बानास जहन-नशीन व्हावी म्हणोन तपशिलें कलमी केलें असे " ( खरे ७।३५७४ ).

**जहमत** ( स्त्री० ) [ अ० झह्मत् ] श्रम; श्रमी; आजारी. " राजा जहमत जहाला आहे " ( सभासद ४२ ).

**ज़हर** ( न० ) [ फा० ज़हूर् ] वीष.

**ज़हरी** [ फा० ज़हूरी ] विषारी.

**जहागीर; जागीर** (स्त्री०) [फा० जागीर् ] राजाच्या सेवेसाठीं सर्दारानें जें सैन्य पदरीं ठेवावयाचें त्याच्या खर्चासाठीं तोडून दिलेला मुलूख; जायदाद्. इनाम-ज़मीन.

**ज़हाज़** ( न० ) [ जहाज़् ] तारू.

**जहांगीर** ( पु० ) [ फा० जहान्गीर् ] जगज्जेता.

**जहांदीद** [ फा० जहान्दीदा ] जग पाहिलेला; अनुभवीक. " थोर उम्दा सर्दार व जहांदीद होते" ( राजवाडे. २२।२५).

**जहांपन्हा** [ फा० जहान्पनाह् ] जगाचा रक्षणकर्ता; राजाचें एक सम्बोधन.

**जहांबाज़** [ फा० जान्बाज़् ] शूर; जिवावर उदार; धाडशी; पुरुषी; रुत्या.

**जहांबाजी** [ फा० जान्बाज़ी ] जिवावर उदार होऊन केलेला पराक्रम; शौर्य. " राघोपन्त सुभेदारास धरावें इतक्यांत त्याणें जहांबाजी करून किल्ल्यांत पळून गेले " ( खरे १।५२ ).

**जहाती** [ फा० ब-जिहत ] निमित्तें; कारणें. " जहाती भण्डारा " ( राजवाडे १५।१५३ ).

**ज़हालीम** जालीम; निकराचा. " याची त्याची सरमिसळ होऊन जाहालीम तर्वार चालिल्या सुल्ताना कडील सर्दार मातबर दाहावीस ज़ाया ज़खमी होऊन फौजेंचें तोण्ड करवटलें " ( मदरु २।३ ).

**ज़हूर** ( पु० ) [ अ० ज़ुहूर् ] जाहिरी. " सर्कारचे वचनाची कायमी कशी हें आइन्दे ज़हुरांत येईल " ( राजवाडे १०।१६६ ).

**ज़ागा** ( पु० स्त्री० ). [ फा० जाय्-गाह् स्थळ; स्थान; वसतिगृह; काम; मामला; वाव. " तो ज़ागा सुरुङ्गानें बुरूज़ उडवून घेतला " ( चित्रगुप्त ८७ ). " आतां मोंगलाचा मुलूख खावयास ज़ागा ज़ाहाला " ( चित्रगुप्त ८१ ).

**जागीर** ( स्त्री० ) जहागीर. " कांहीं मुलूक जागीर देऊन उत्तम प्रकारें ठेऊं " ( मराचिथोशा २७ ).

**जाज़ती; ज्यादती** ( स्त्री० ) [ अ० ज़िया-दत्+ई ] आधिक्य; बढती; ज़ुलूम, अधिक. " कामाचा माणूस पाहून तैनात जाज़तीनें हशमास करणें ती सर्कार्कुनांनीं करावी " ( सभासद ६० ). मिरासदार " जाज़तीनें पुढेंच होऊन देश आपले हातून गेला हा प्रकार " ( चित्रगुप्त ३९ ). " ठाणीं इकडील असतां ज्यादती करून टिपूनें घेतलीं " ( राजवाडे ७।२१ ).

**जाज़ती-आज़ार** ( पु० ) ज़ुलूम-पीडा ( वाड-बाबा २।१३५ ).

**जाज़ती-ज़लाल** ( पु० ) ज़ुलूम. " यात्रेकरू आले आहेत यांस कोणी कज्ज्या भाण्डण व जाज़ती ज़लाल करूं नये " ( खरे ७।३७८६ ).

**ज़ाज़म** ( न० ) [फा० जाजिम्] बिछाईत; ताम्बड्या खारव्यास अस्तर लाऊन केलेली बिछाईत.

**ज़ात** ( स्त्री० ) [ अ० ज़ात् ] स्वतः "भावाभावांत कटकट लाऊन दिली आपण तशाशबीनी करितात, असें ज़ातीकडे येतें " ( राजवाडे ५।१५९ ). "आतां मदार नाना यांचे ज़ातीवर आहे " ( ऐटि १।२५ ).

**ज़ात-इनाम** ( न० ) [ ∠ अ० ज़ात् ]

वंशपरम्परा नव्हे तर स्वतः पुरतें मिळालेलें इनाम.

**ज़ात-मुचल्का** ( पु० ) [ अ० ज़ात्; तु० मुच्लका-मुचल्का ] स्वतःच्या सुटकेसाठीं न्यायाधिशापुढें लिहून दिलेला करारनामा.

**ज़ात-मुबारक** ( स्त्री० ) "खुद्द श्रीमन्त. "सर्कारचे व जात-मुबारकेचें लक्ष सोडून जे असतील त्यांचा बन्दोबस्त मनोदया-नुरूप केला जाईल" (राजवाडे ७।२९).

**ज़ातीनें-खुद्द**; स्वतः; स्वाङ्गें.

**जादा**; **ज्यादा** ( पु० ) [ अ० ज़ियादा ] अधिक; पुरवणीपत्रक.

**जादा-तलबी** ( स्त्री० ) [ फा० ज़ियादा-तलबी ] हांव; फाजील तगादा. "स्वराज्याचा अम्मल वाजवी मामूलप्रमाणें देत जावा; ज्यादा-तलबी न करावी" ( राजवाडे ७ खलप २।११३ ).

**जादू** ( स्त्री० ) [ फा० जादू ] इन्द्रजाल; माया; चमत्कार; चेटूक.

**जादूगार**; **जादूगीर** (पु०) [फा० जादूकार-जादूगर्] जादू करणारा; चेटक्या; मोहनी टाकणारा.

**जादूगिरी** ( स्त्री० ) [ फा० जादूगरी ] चेटूक; मोहनी, चेटकी. "जादूगिरी नजर-बन्दीनें दृष्टी फसते पण कार्कुनी कलम्बन्दीनें सृष्टी फसते" ( गडकरी, राज-संन्यास १८ ).

**जान** ( पु० ) [ फा० जान् ] जीव; प्राण; त्राण. "वजीर खानासी बाण लागतां होयांत जान सोडिली" ( साने-पयाव ५५ ). "शेवटीं गाडर जान बचावून पळाला" ( दिमरा ११३८ ). "जान विकत नाहीं असें परम सङ्कट आहे" ( राजवाडे ३।१७० ). "त्यांचे ज्यानास व मालास व हुर्मतीस सबाद्य वांकडें होणार नाहीं" ( राजवाडे ७।८ ) "स्वामी सेवेवर जीव-जानाविशीं हज़र आहे." ( ऐटी ७३ ).

**जान-गिरी** ( स्त्री० ) प्राणहरण. "तेथें युद्ध प्रसङ्ग होऊन तुमची जान-गिरी होईल" ( वाड-शाछ ११४ ).

**जानी** [ फा० जानी ] जिवलग ( दोस्त ).

**जानीबैन**; **जानबैन** [ अ० जानिबैन् ] तर्फैन; दुतर्फा. "जानीबैन जुदागी नाहीं" ( साने-पयाव ४८४ ).

**जाफत**; **ज्याफत** ( स्त्री० ) [ अ० ज़ियाफत् ] आतिथ्य; मेजवानी; नज़र. "पांचशे रुपये नवाबानें जियाफत्-मेजवानी पाठविली ते सेवकास दिधली" (राजवाडे १।४३). "सदाशिव रड्डी यांनीं साहेबज्यादे यांस ज्याफत व नज़र केली" ( राजवाडे ५।४२ ).

**ज़ाफरा** ( पु० ) [ अ० ज़अफरान् ] केशर.

**जाँफिशानी** ( स्त्री० ) [ फा० जान्-फिशानी ] निदानींची मर्दुमकी; जराँ-बाजी; जिवावर उदार होऊन सेवा. "मुरारराव घोरपडे यांहीं...बहुत जहाँफिशानी केली" ( राजवाडे १।४५ ). "हे कदर आपण मनांत धरावी कीं सर्कार चाकरीवर जाँफिशानी करितात किंवा त्यांचें पोट भरत नाहीं म्हणून मेहनत करीत फिरतात" ( दिमरा ११६२ ). "नोकर खाविन्दाचे कामावर ज्यांफिशानी करून चाकरी करितो त्या नोकराचे मुलाची सर्फराजी खाविन्दानीं न केलियास मग खाविन्दी ती काय !" ( राजवाडे ७।१५७ ).

**ज़ाब** ( पु० ) [ अ० जवाब् ] उत्तर; म्हणणें.

**ज़ाब-साल** (पु०) [अ० जवाब्-सुआल्] प्रश्नोत्तर; सम्भाषण; साङ्गणी; तह. "तेव्हां प्रसङ्गास सख्त ज्वाब-स ल कोणी न करीत" (राजवाडे १३।१०).

**जा-बजा; ज्या-बज्या** [फा० जा-बजा] स्थळोस्थळीं; ठिकठिकाणीं "ऐशा ताकिदा जा-बजा पाठवाव्या" (खरे ७।३५७५). "नाकेबन्दी ज्याबज्या केली" (राजवाडे ५।३६).

**ज़ाबत; ज़ाबीत** (पु०) [अ० ज़ाबित्] अधिकारी, मुख्त्यार. "जोगेन्द्रगीर मानभाऊ ज़ाबती कमलनैन सेकीन सम्मत निम्च" (राजवाडे १५।१७२).

**ज़ाबता** (पु०) [अ० ज़ाबिता] नियम; बन्धन; यादी. "जाते समयीं कुल लश्करचे लहान थोर लोकांचे बिशादीचे ज़ाबते करावे" (सभासद २२).

**ज़ाम; ज़ाम्ब** (पु०) [फा० जाम्] पेला. "फक्त एक रुप्याचा ज़ाम्ब पद्राशीं बान्धून घेतला" (माप्र ११६).

**ज़ामगी** (स्त्री०) [फा० जामगी] बन्दूक डागण्याचा तोडा; बत्ती.

**ज़ामदार** (पु०) [फा० जामदार=परिधान करावयाचीं वस्त्रें धन्यापुढें करणारा] वस्त्रागार व रत्नागार यांवरील अधिकारी.

**ज़ामदार-खाना** (पु०) वस्त्रागार व रत्नागार. "रजईचा मज्कूर लिहिला तर प्रस्तुत ज़ामदारखान्यांत शाल नाहीं" (पारसनीस-ब्रप ८).

**ज़ामा** (पु०) [फा० जामा] अङ्गरखा.

**ज़ामा-निमा** (पु०) [फा० नीमा=आंतली बण्डी] सारा पोशाख.

**ज़ामीन; ज़ामन** (पु०) [अ० ज़ामिन्] जिम्मेदार; हमीदार. "स्नेह्यासाठीं पद्रमोड कर परन्तु ज़ामीन होऊं नको" (अनन्तफन्दी ६०).

**ज़ामीनकी** (स्त्री०) हमी; जबाब्दारी.

**ज़ामीन-तलब** (स्त्री०) ज़ामिनाची मागणी. "यांनिमित्तें साहेबाच्या स्वारांनीं ज़ामीन-तलब केली; त्याजवरून मशार्निल्हेस आपण हजीर-ज़ामन असूं" (राजवाडे १२।१६७).

**ज़ायदाद** (स्त्री०) [फा० जाय्-दाद्] सैन्याच्या खर्चास लाऊन दिलेली जागीर. "नबाब नजबखान यांनीं मिर्जा सफीखान यास मेरट वगैरे अकरा महाल ज़ायदाद दिली होती" (दिमरा १।१०१). "बारा पर्गणे तुम्हांस ज़ायदादी सरन्ज़ामांत दिले आहेत" (दिमरा १।२१२).

**ज़ायबन्दी** (<अ० ज़ाइअ) दुखावलेला; इजा झालेला; निरुपयोगी.

**ज़ाया** [अ० ज़ाइअ] नादुरुस्त; घायाळ; निरुपयोगी; बिघडलेला. "नळ पाण्याचा ज़ागा ज़ागा ज़ाया झाला आहे" (वाड-समा १।३४). "शेवटीं हिन्दूस हिन्दू मिळून काम ज़ाया करितील" (सभासद ३२).

**ज़ाया-ज़ख़मी** = घायाळ. "परन्तु कोणी ज़ाया-ज़खमी जालें नाहीं" (खरे ८।४३९०).

**ज़ारत; ज्यारत** (स्त्री०) [अ० ज़ियारत्] पवित्रस्थानास भेट. "दुर्गाहास ज़ारत करून" (दिमरा १।११८). "पिराची ज्यारत करून" (दिमरा १।२४७).

**जारी** [अ० जारी] चालू; सुरू; (स्त्री०) कसोशी. "हमेशा खत-किताबतीचा सिल्सिला जारी असावा" (खरे ७।३५

६४). " निगादास्त जारी केली आहे. " " त्याजकडे बोलणें चालणेंही जारी आहे " ( राजवाडे ५।१८९ ).

**जारीनें**–ज़ोरांत, वेगानें, कसोशीनें.

**जालन्दाज़** पाश टाकण्यांत कुशल; कपटी.

**जालमी** (स्त्री०) [ फा० झालिमी ] ज़ुलूम. " याप्रमाणें जालमी व ज़लालीची चाल अलफखानाची" ( राजवाडे ७।१५० ).

**जालीम; जालम** [ अ० झालिम् =क्रूर ] उग्र, प्रखर; जहाल; ज़लाल. " दोघेही कर्ते नामी सिपाई जालम असे निवडले " (भाइसम १८३४ अहवाल ९२).

**ज़ावर्दा–आवर्दा** (पु०) [ फा० आवर्दा =आणिलेला] निर्यात–आयातीचा माल.

**जास्त; जास्ती** [ अ० झियादा + ई ] अधिक; फाजील; जादा.

**जास्ती-ज़लाल** (पु०) ज़ुलूम, "जास्ती-ज़लाल." ( खरे ७।३७८८ ).

**ज़ासूद** (पु०) [ अ० जासूस् = हेर ] निरोप, टपाल पोहोंचविणारा; हर्कारा.

**ज़ासुदी** (स्त्री०) जासुदानें आणिलेली बातमी.

**जाहली** (स्त्री०) [ फा० जाहिली ] मूर्खपणा. " इतक्यानें दाब-सलाबत मोठी होती. ते मल्हारराव यांचे ज्याहेलीमुळें हे खराबी" ( राजवाडे ७ खलप २७ ).

**जाहलीयत** (स्त्री०) [अ० जाहिलीयत् ) मूर्खपणा. " सदासर्वदा अयशामध्यें शर्शाब ( ? सर्शार = तर्र ) असोन दर्बार न करितां जाहलीयत करावी हे वर्तणूक राजास युक्त नाहीं " ( जोरा १०६ ).

**जाहीर** [ अ० झाहिर् ] व्यक्त; प्रसिद्ध; सर्वश्रुत; माहीत. " ते खबर जाहिर हाऊनु " ( राजवाडे १५।२७४ ). " हे खबर च्यारो पादशाहासी जाहीर जाहाले' ( इम १३ ).

**जाहिराणा** जाहीररीतीनें; जाहिरी; ज़ूहर. "परन्तु जाहिराणा तर यादीप्रमाणेंच कबूल करावें म्हणतील " ( राजवाडे १२।१२४ ). " अब्दालीकडे साफ जाहिराना व अन्तःस्थें कळवावें कीं " ( राजवाडे ११२८१ ). " ही गोष्ट आपणास कळावी म्हणून लिहिलें आहे; जाहिराण्यांत आणूं नये " ( खरे ८।३९२५ ).

**जाहिरात** (स्त्री०) [ अ० झाहिरात् अनेक व० झाहिर्चें ] प्रसिद्धीपत्रक; प्रसिद्धपणें. " जाहिरात अगर अन्तरगती या गोष्टीस त्याचें अनुमत नसावें" ( राजवाडे १२।१२३ ).

**जाहिरी** (स्त्री०)[ फा० झाहेरी ] प्रसिद्धी, ज़हूर. " एक–सुखनीपणाची नेकी व खुबी सर्व टोपीकरांत जाहिरीस येईं तें करणें वाजीब व लाजीम आहे " ( राजवाडे १०।२८० ). " पत्रें येतात; मग जाहिरीचीं किंवा, खरें काय असेल तें असो" ( राजवाडे ५।१३३). " जाहिरींत ( =बाह्यतः ) बहुत स्नेह दाखवून" ( दिमरा २।९४ ).

**जाहीरणें** उघड होणें. " अथर्वण खोटा जाहीरला " ( राजवाडे ८।४३ ).

**जाहीर–खबर** (स्त्री०)[ मराठी समास ] जाहिरात.

**जाहीर–दारी** (स्त्री०) [ फा० झाहिदारी ] बाह्य देखावा; बाह्य सलोखा; जाहिरी. " जाहीर–दारीनें सफाई ठीक नाहीं; दिलापासून साफ व्हावें " ( राजवाडे ५।१६७ ). "सर्दारांशीं आपसांत चित्तशुद्धता नाहीं; जाहीदारी मात्र परस्परें आहे " ( दिमरा १।३१८ ). " अद्यापि मस्लतीचें वर्तमान जाहीदारींत आलें नाहीं "

( दिमरा १।२०९ ). "जाहीरदारी खातरी करून"=चाहृतः दिलासा करून ( दिमरा २।१७७ ).

**जाहीरनामा** ( पु० ) प्रसिद्धीपत्रक ( विशेषतः सर्कारी ).

**जिकीर** ( पु० स्त्री० ) [ अ० झिक्र्=स्मरण ) प्रश्न; गोष्ट; कटकट; घासाघीस. " लढाईची गोष्ट लढाईत राहिली त्याचा जिकीर आतां कशास पाहिजे" ( राजवाडे ५।१२ ). " हल्ली ज्या समयीं इङ्ग्रजांचा जिकीर निघतो " ( दिमरा १।९३ ). जिकीरीस येणें ( मराचिथोशा ६२ )=हैराण होणें, मेटाकुटीस येणें. जिकिरीचीं उत्तरें ( पाव ३२ )=नैराश्याचीं भाषणें. " झिकर " ( राजवाडे ७।१५३ ).

**जिक्क** [ अ० दिक्क ] त्रस्त; हैराण. "आमचेंही माणूस जिक जिक जाहलें" ( राजवाडे ६।४९७ ).

**जिग–जिग** ( स्त्री० ) [फा० जिक् जिक्=ओरड ] टकटक; किटकिट; त्रास.

**जिगर** ( पु० ) [ फा० जिगर् ] यकृत्; हृदय. " तुम्हाबराबर आम्ही आपला जिगरच दिला आहे " ( राजवाडे ६।३८२ ).

**जिद्द; जीद** ( स्त्री० ) [ अ० जिद्द ] कसोशी; निकड; निकर; हट्ट; आग्रह; भाण्डण. " दुर्गकर हिंमतीनें झुन्जत आहेत; परन्तु हैदरखान जिद्दीस आला आहे " (खरे ६।३०२९ ). "थोडक्यासाठीं जीद करावी तर मातबर काम तें पुढें नासेल " (खरे ६।३१२८ ).

**जिद्दखोर**=आग्रही; हट्टी; भाण्डणखोर.

**जिनगर** ( पु० ) [ फा० झीन्–गर् ] जीन, खोगीर तयार करणारा.

**जिन्हार** [ फा० झिन्हार् ] बिल्कूल; हर्गीज़. " करारास जिन्हार कसूर येणार नाहीं " ( साने–पयाव ४८४ ).

**जिनगी; जिन्दगी; जिनगानी; जिन्दगानी** ( स्त्री० ) [ फा० झिन्दगी–झिन्दगानी ] जीवित; जन्म; आयुष्य; संसार; निर्वाह; मिळकत; इस्टेट. " पादशहाची घर–जिनगानी ( = खासगी मत्ता ) समग्र लुटून " ( खरे ८।४२२४ ). " उपरी कोणत्या सुखें जिन्दगानी करावी " ( खरे १।१७८ ). " बहुत तज्विजेनें जिन्दगानी करीत आहों " ( खरे ७।३५७९ ).

**जिन्द** ( स्त्री० ) जिद्द. " जिन्द वाढविल्यास कामास येणार नाहीं " ( पाब १८ ).

**जिन्द** ( पु० ) [ अ० जिन्न्–अग्नीपासून उत्पन्न झालेला प्राणी ] मुसलमानाचें भूत.

**जिन्नस** ( पु० स्त्री० ) [ अ० जिन्स् ] जात; प्रकार; वस्तू; चीज़. एक जिन्सी =एकाच वस्तूचा, जातीचा.

**जिनस–अज्नास** ( स्त्री० )[अ० अज्नास्=अनेक व० जिन्सूचें ] माल; अस्बाब. " सर्व जिनस–अज्नास ज़र–ज़वाहेर ब्रिजलाल नागपुरास घेऊन जाऊन " ( राजवाडे ७ खलप १।३ ). "मशारनिल्हे या जिन्नस–अज्नाशिच्या तलाशांत शोधांत आहे " ( ऐति ३।६५ ).

**जिनसाना** (पु०) अस्बाब; ज़किरा माल. " तेथें सर्कारचा जिन्साना आहे त्याचीं मोजदाद त्यास देऊन पावती घेणें " (राजवाडे १२।१३९). " ज़वाहीर सिरोपाव वगैरे जिनसाना पाठविला " ( जोरा ८ ).

**जिनशी; जिन्नस-खाना** (स्त्री०) कोठार. "तीन तोफा व बारूदचे पेटारे बारा आणिले होते ते जिनशींत दाखल करविले" (राजवाडे ५।१९४). "जिन्नस-खाना" ( वाड-बाबा २।४२ ).

**जिना** ( पु० ) [ फा० ज़ीना ] सोपान; दादर.

**जिम्मा** ( पु० ) [ अ० ज़िम्मा ] भार; ज़बाब्दारी; पत्करलेलें काम. "मसलत ठरावी त्याप्रमाणें आपलाले जिम्म्यावर जावें" ( साने-पयाव २७५ ).

**जिमती** हमीदार. "माझें नांवें पत्र जिमती, खातर्जमेचें पाठवावें कीं माळव्यांतील महालास पुढें उपद्रव लागणार नाहीं" ( मद्बा २।३३ ).

**जिम्मेदार** ( पु० ) [ फा० ज़िम्मा-दार् ] ज़बाब्दार.

**जिम्मेदारी** ( स्त्री० ) [ फा० ज़िम्मादारी ] हमी; ज़बाब्दारी.

**जिमेनीस; ज़म्नीस.** " जिमेनीस याणीं पोते, ज़ामदारखाना, कोठी, बाज़ार वगैरे पैदास्ती कमावीस ज़मा याजवर दखल्गिरी करावी" (वाड-सनदा १२६).

**जियादा** [ अ० ज़ियादा ] अधिक; विशेष. " जियादा बजुज़्-शौक चे निगास्त आयद् अय्याम कामरानी दाम बाद् " =विशेष प्रेमाव्यतिरिक्त काय लिहिलें जाई ? सुखाचा काळ अक्षय असो ( साने-पयाव ३८७ ).

**जियारत** ( स्त्री० ) जारत पहा. "निजामुदौला शाह मुसाफर याचे दर्गांत जाऊन जियारत ( प्रार्थना ) केली" ( राजवाडे १।१८३ ).

**जिराईत; जिरायत; जिरात** ( स्त्री० ) [ अ० ज़िराअत् ] लागवड ( धान्याची पावसाच्या पाण्यावर होणारी ).

**जिरात-खाना** ( पु० ) [ फा० ज़िरिह्= चिल्खत ] शस्त्रागार. पहा ( वाडबाबा २।८२ ) जिरातखान्याच्या सदरांत शस्त्रांची नामावळी आहे.

**जिरे** ( न० ) **जिरी** ( स्त्री० ) [ फा० ज़िरिह् ] सांखळीचें चिल्खत. " ज़रीचे झगियाचे अन्तर्भागीं नर्वरी बारीक कडियाची लोखण्डी जिरे " ( चित्रगुप्त ११२ ).

**जिरे** ( न० ) [ फा० ज़ीरा ] मसाल्यांत घालण्याचा एक रुचिकर पदार्थ.

**जिरेगार** ( पु० ) [ फा० ज़िरिह्-गर् ] चिल्खत तयार करणारा.

**जिरे-टोप** ( पु० ) शिरस्त्राण.

**जिल्काद** ( पु० ) [ अ० ज़ील्क़अदा ] अरबी वर्षाचा अकरावा महिना.

**जिल्हई** ( स्त्री० ) [ फा० जला+ई ] तकाकी; उजळा; पदार्थ गुळगुळीत व चकचकीत करण्याची क्रिया.

**जिल्हा** ( पु० ) [ अ० ज़िलअ ] प्रान्ताचा भाग; पर्गणा.

**जिल्हे** ( स्त्री० ) [फा० जिल्वा] तेज. "देव ब्राह्मणाची मर्यादा नवाब बहादूर फार करितात, म्हणोनच दिवसें दिवस दौलतीस जिल्हे व रौनक आहे" ( राजवाडे १६।५३ ).

**जिल्हेज** ( पु० ) [ अ० ज़ील्हिज्जा ] अरबी वर्षाचा बारावा महिना.

**जिलीब** ( स्त्री० ) [ फा० जिलव् =शृङ्गारून शोभेसाठीं मिरवणुकींत चालविलेला घोडा; जिलवी = लवाज़मा ] स्वारी; मिरवणूक; लवाज़मा. जिलबीस=स्वारींत पुढें. जिलबीचा घोडा=कोतवाली घोडा.

**जिलोह** ( पु० ) [ अ० जिल्वा =भपका ] लवाज़मा; थाट; समारम्भ. "त्यास छत्राची व जिलोहाची तयारी जलदीनें

करून पाठवावी " ( दिमरा २।५५० ). "बहुत जिलोहानें" (दिमरा) = मोठ्या इतमामानें.

**जिलौखाना** ( पु० ) समारम्भाचें स्थान; दर्बार–दालन ( राजवाडे ५।३६ ). "नबाबांनीं हवेलीचे जलोह–खान्या-पुढें एक तोफ ठेविली" ( राजवाडे ५।३२० ).

**जीन** ( न० ) [ फा० झीन् ] खोगीर; पलाण. "जडित जीन तया पृष्ठीं" ( मुक्तेश्वर–सभापर्व १४।७८ ).

**जीन–बन्द** खोगीर वगैरे कसून तयार.

**जीन–बन्दी** ( स्त्री० ) खोगीरें चढवून तयारी; मुस्तेदी. "शिन्द्यांच्या लश्करांत आवई पडली त्याजवरून तेथें दोन प्रहरांच जीन–बन्दी जाहली" (खरे ७।३४९८ ). स्वारी "पश्चगङ्गेच्या पाण्यावर जीन–बन्दीनिशी राहिली" ( खरे ९।४६७० ).

**जील सुभानी** [ फा० झिलि–सुब्हानी = ईश्वराची छाया ] पादशहाची पदवी. "हज़रत जील–सुभानी याणीं आज्ञा केली जे" ( राजवाडे ६।६२७ ).

**जुज़्दान** ( न० ) [ फा० जुझ्दान् ] सुटे कागद ठेवण्याची वही. "जुज़्दान देखील आणिलें त्यांत दर्बार–खर्चाची यादी" ( खरे १०७१ ).

**जुज़्वियात** [ अ० जुझ्वीयात् ] किरकोळ गोष्टी, तपशील. "आम्हाकडील जुज़्वि-यातचे फडचे करून द्यावे" ( राजवाडे ५।११ ).

**जुज़्बी; जुज़्वी** [फा० जुझ्वी∠अ० जुझ्ई ] साधारण; किरकोळ; क्षुद्र. "यासि जुज़्वी पीक आलें" ( राजवाडे १८।३१ ).



**जुज़्रसी** ( स्त्री० ) [ फा० जुझ्रसी ] बारीक चौकशी. "शहरचे दर्वाजे तीन चार खुले; तेथें गाडदी ठेऊन येणा–जाणा त्याची जुज़्रसी बहुत आहे" ( राजवाडे ५।९९ ).

**जुदा** [ फा० जुदा ] निराळा; विभक्त.

**जुदाई; जुदागी** ( स्त्री० ) [ फा० जुदाई ] वेगळीक; निराळेपणा; अन्तर. "पण्डित प्रधान व नबाब निजाम यांचा तरिका ( = सलूक, वर्तनक्रम ) एकलासीचा कदिमापासोन चालत आला; हर्बाबें त्यासी जुदागी नाहीं" ( राजवाडे १०।१६५ ).

**जुब्दतुल्–अमासील वल् एक्रान** [ अ० झुब्दतुल् अमासिल् वल् अक्रान् ] थोरांत व समवयस्कांत श्रेष्ठ ( राजवाडे २०।२१४ ).

**जुब्दतुल् एक्रान्** [अ० झुब्दतुल् अक्रान्] समवयस्कांत, स्नेह्यांत श्रेष्ठ ( राजवाडे १५।११२; १५।२१७ ).

**जुबा** ( पु० ) [फा० जुबा ∠ अ० जुब्बा] सर्वांत वर घालण्याचा पायघोळ झगा. "जुबा मोठ्या पट्टीचे मश्रूचा" ( ऐटि ३।५० ).

**जुम्ला** ( पु० ) [ अ० जुम्ला ] सवाशें बार्गीर अथवा शम्भर दीडशें पायचे लोक यांची तुकडी; समाइकी एकंदर ज़मीन. "रुईखेड तो जुम्ल्यांत" ( राजवाडे १०।२५० ). "नाकिर्दी असेल जुम्ला पैकीं । ते किर्दी करावी निकी । इस्ता-वेनि चढेल कौतुकीं । जमा धरणें" ( मेस्तक–पुस्तक लेखकाधिकार ११५).

**जुम्लेदार** ( पु० ) जुम्ल्यावरील अधिकारी.

**जुमानणें** [ ∠ फा० गुमान् ] गुमान धरणें; पर्वा ठेवणें; गांठणें.

**जुर्माना** ( पु० ) [ फा० जर्माना = धनदण्ड ८ अ० जुर्म = दोष ] धनदण्ड; दण्ड; तावण.

**जुरत** ( स्त्री० ) [ अ० जुर्अत् ] धैर्य; चिशाद; शौर्य. "मुम्बईवाले यांची काय जुरत कीं कलकत्तेकर ठरावितील त्यास तफावत करितील!" ( खरे ७।३५६९ ). "बिद्नूर जुरतीनें घेऊन इङ्ग्रज हत्यारें ठेऊन कौल घेऊन बाहेर निघाले ते कैद केले" ( साने–पयाव २२४ ). "काय जुरत यमाच्या बाला, पुढें शिरळ!" ( रामजोशी १०५ ).

**जुरत–दार**; **जुरती** = धैर्यवान्; शूर.

**जुरत–मेहनत** ( स्त्री० ) धैर्याची कोशीस. "पूर्वी पासोन जो कोणी जुरत-मेहनत करांत आला आहे त्यास मुलखास व खज़ान्यास व फौजेस कमी नाहीं" ( दिमरा १।३४ ).

**जुरा** ( पु० ) [ अ० जुर्रा ] ससाणा; एक शिकारी पक्षी. "बाज़ व जुरे" ( बाड–समा १।११८ ).

**जुल्कद्र** [ अ० जुल्–कद्र ] प्रतिष्ठावन्त. "जुल्कद्र कृष्णराव नारायण" ( राजवाडे १९।१०५ ).

**जुलमी**; **जुल्मी** [ अ० ज़ुल्मी ] जुलूम करणारा; अन्यायी.

**जुलाब** ( पु० ) [ अ० जुल्लाब ] रेचक; रेच.

**जुलूम** ( पु० ) [ अ० ज़ुल्म ] परपीडा; बळज़बरी; बलात्कार; जाज़ती; कमाल.

**जुलूम–ज़बरी** ( स्त्री० ) बलात्कार; जुलूम.

**जुलूम–जास्ती** ( स्त्री० ) जुलूम ( राजवाडे २२।१२० ).

**जुलूस** ( पु० ) [ अ० जुलूस ] राज्यारोहण; समारम्भ; थाट; वैभव. "तिकडून दीडप्रहर रात्रीस मोठे जुलुसानें फिराङ्गियांसहवर्तमान शहरांत आले" ( राजवाडे १।२७ ).

**जुवांमर्दी**; **जुमामर्दी** ( स्त्री० ) जवाँमर्दी; शौर्य.

**जूज़** [ अ० जुज़्अ ] जुज़्वी; किरकोळ; क्षुद्र. "जूज़ कामाकरितां आपआपल्यांत नाखुसी राखणें ठीक नाहीं" ( राजवाडे १९।१० ). "जूज़ मुकद्मियावरून दीर्घ कलह प्राप्त होता" ( साने–पयाव ८९ ).

**जूद** [ फा० ज़ूद ] लौकर; त्वरेनें; जलद. "जूद चेनापट्टण तालुक्यांत जाणेंहोये तें करावें" ( राजवाडे १९।७३ ).

**जूदतर** [ फा० ज़ूदतर ] विशेष लौकर. "जूदतर सर्वांची मदत–इम्दाद पोक्ता ऐवज़ देऊन रवाना करून पाठवावें" ( साने–पयाव ३८७ ).

**जेगा** ( पु० ) [ फा० जीघा ] पागोट्यावर बान्धण्याचा एक रत्नालङ्कार. "वर्कड सर्कारचा सरन्ज़ाम आला होता त्याप्रमाणें जेगा व शिरपेंच दिला" ( खरे ८।४००० ).

**जेज़्या** ( पु० ) [ अ० जिझ्या ] गैरमुसल्मानांनीं द्यावयाची डोईपट्टी; जिज़्या पहा. "आलमगीराचे कार्किर्दीत यज्ञोपवीतास साडेतीन रुपये जेज़्या बसून, ओलें अन्न विकावें सर्वांनीं घ्यावें हे नौबत गुज़रली" ( ऐटी १।१८ )

**जेज़ालन्दाज़** ( पु० ) जेज़ाल्याचा मारा करणारा ( वाड-बाचा २।७५ ).

**जेनवी** ( ? ) जेनवा ( Genoa ) येथील. "जेनवी फिरङ्गी" (चित्रगुप्त १११).

**जेब** ( पु० ) [ फा० जेब ८अ० जैब् ] खिसा. "बडोद्यावर जाणें दोन दिवस तहकूब करावें; तें आपले जेबांत आहे" ( मदबा १।३० ). "लाखोटा फोडून पाहिला आणि आपले जेबांत ठेविला" ( राजवाडे १०।२६५ ).

**जेब–व–जीनत** ( स्त्री० ) [ फा० ज़ीब्–व–ज़ीनत् ] शोभा. "यांचे येण्यांत रौनक अधिक होईल; जेब व जीनत येईल" ( राजवाडे ७।१९४ ).

**जेर** [ फा० ज़ेर् ] चीत; पराभूत; हस्तगत; त्रस्त; हैराण. "तें स्थळ जेर करावें म्हणोन" ( सभासद ५३ ).

**जेर–जप्त** हस्तगत; स्वाधीन. "पाण्यांत गड वसविले म्हणजे दर्या जेर्जप्त आहे" ( चित्रगुप्त ८७ ).

**जेर–दस्त** [ फा० ज़ेर्दस्त ] काबीज; जेर्जप्त. "ममताइ देशपाण्डीण इणें तमाम प्रगणा जेर्दस्त केला" ( एकनाथी अर्जदास्त, राजवाडे ८ उपप्रस्तावना २६ ).

**जेर्बन्द** ( पु० ) [ फा० ज़ेर्–बन्द् ] जीन आंवळून धरणारा घोड्याच्या पोटाखालून जाणारा पट्टा; चाबूक; फटकारा. "ती राण्ड सुरळीत बोलत नाहीं, याजकरितां चार जेर्बन्द मारिले पाहिजेत" ( खरे ७।३७५३ ).

**जेर्बार** [ फा० ज़ेर्बार् ] त्रस्त; हैराण; खर्चाखालीं आलेला. "तेथें जाऊन व्यर्थ जेर्बार व्हावें; वरकड अर्थ नाहीं" ( दिमरा १।२८७ ). "इङ्ग्रेज़ श्रीमन्तास जेर्बार करितात व जङ्गलांत गुल्जार करून स्वस्थ आहेत" ( दिमरा १।४२ ).

**जेरी** ( स्त्री० ) दुर्बलता; पडती; हैराणी. "सारांश फिरङ्गी यांची जेरी, श्रीमन्तांची ज़बरी असें सोमवारचें वर्तमान आहे" ( राजवाडे ४।९८ ).

**जेहन–नशीन** [ फा० ज़िहन्–निशीन् ] श्रुत; मालूम. "अक्षरशः मज्कूर नबाब सम्सामुद्दौला बहादूर यांसी पत्रें वाचून दाखवून जेहन–नसीन केला" ( राजवाडे १।११४ ).

**जैफ; ज़यफ; ज़ईफ** [ अ० ज़ईफ् ] वार्धक्यानें क्षीण; अशक्त.

**जैफी; ज़यफी** ( स्त्री० ) [ फा० ज़ईफी ] वार्धक्य. "ज़यफी नबाबाची " ( राजवाडे ५।८२ ).

**जैल** [ अ० ज़ैल ] मायना; सद्र. बमुजीब जैल = पुढें लिहिल्याप्रमाणें ( इऐ ५।१७ ).

**ज़ोडा** ( पु० ) [ फा० जोराब् ८ अ० जौराब् ] पादत्राण; पायपोस.

**ज़ोर** ( पु० ) [ फा० ज़ोर ] शक्ती; सामर्थ्य; ज़ोर करणें = बळ खर्चून उठाव करणें. ज़ोर काढणें = सर्व शरीर ताठ पायाच्या व हाताच्या तळव्यावर तोलून वरखाली करणें. ज़ोर मारणें = अचाट प्रयत्न करणें.

**ज़ोर–बेज़ोर** ज़ोरावरीनें; ज़बर्दस्तीनें "इङ्ग्रज़ घांट चढोन येऊन ज़ोरबेज़ोर होसकट्याचें ठाणें घेतलें" ( खरे ९।४४५४ ). "प्रधानांच्या फौजेनें बदामीचा किल्ला ज़ोरबेज़ोर फत्ते केला" ( खरे ८।४०९९ ). "ज़ोर–बेज़ोर सल्ला करवावा; नच जाहलियासी प्रान्ताची बाकी ठेवीत नाहीं" ( खरे ११।५८९२ ).

**ज़ोर** ( पु० ) [ अ० जौर् ] जुलूम.

**ज़ोर-ज़बरी** ( स्त्री० ) जुलूम.

**ज़ोर-तलब** ( स्त्री० ) बलात्कार; ज़रब. " त्यापेक्षां अम्मल ज़ोरतलबीचा सुरू करावा " ( मराचिथोशा ७७ ). "ज़ोर-तलबेनें ऐवज़ शिन्दे यांनीं आणिला म्हणून वार्ता आहे " ( खरे ९।४९८४ ).

**ज़ोर-तलबी** मग्रूर; पुण्ड. " कोठें ज़ोर तलबा महाल असतील; हरामखोरांस तम्बी पोहोंचावून पैसा वसूल करून देणें " ( मद्‌या १।११८ ) " या प्रान्तीं कमाविसदार नाहींत; ज़ोर तलबी मुलूख " ( साने-पयाव ७४ ).

**ज़ोर-कस; ज़ोर-दार**=ऊर्जस्वल; सामर्थ्य-वान्.

**ज़ोरा** ( पु० ) ज़बरी, सत्ता.

**ज़ोरावणें** बळावणें.

**ज़ोरावर** [ फा० ज़ोरावर् ] समर्थ; बल-वान्. " ते ज़ोरावर आहेत ते ज़तन करितील " ( राजवाडे १६।१० ).

**ज़ोरावरी** ( स्त्री० ) **ज़ोरवा** ( पु० ) बळावणी; पाठबळ; जुलूम. " आपणा-वरी ज़ोरावरी करिताती " ( राजवाडे २०।४५ ).

**ज़ोरी** ( स्त्री० ) ज़बरी; पुण्डावा. " किले-करी ज़ोरी करितील तरी तुवां लोक मेळउनु सङ्गीनाती करूनु सर्तीसी ज़ाब देणें " ( राजवाडे १६।३४ ). बळ-ज़ोरी ( स्त्री० ) जुलूम. " बळ ज़ोरीनें आला तो शिपायी कार्याचा नाहीं " ( खरे १।१८० ).

**ज़ोहर; ज़ोहार** ( न० ) [ अ० जव्हर् ] रत्न. " अङ्गावर ज़ोहार फार खुललें। वनीं जणू पळसतरु फुलले" ( होनाजी-बाळ १३५ ).

**ज़ोहरी; ज़ोहारी** ( पु० ) [ फा० जव्हरी ] जव्हेरी, रत्नपारखी. "जैसा रत्नामाजी ज़ोहारी । रत्न पारखी आपुलें " ( मुक्ते श्वर आदिपर्व ४१।१०१ ).

**ज़ौजा** ( स्त्री० ) [ अ० ज़ौजा ] पत्नी. अ ज़ौजे ब म्हणजे बची पत्नी अ.

## झ

**झक** ( स्त्री० ) [ फा० दक् झदन् ] भीक. झक मारणें = भीक मागणें; अनाठायीं काम करणें; बोम्बलणें. " मागें ( = मेल्यावर ) दौलत...किल्ले स्वामींचे स्वामी घेतील. कर्ज़दार झक मारीत राहतील ! " ( खरे १।१७७ ).

**झगा; झबा** ( पु० ) [ ∠ फा० ज़ुबा ∠ अ० जुब्बा ] पायघोळ झगा.

**झबलें** ( न० ) लहान मुलांचा झगा.

**झान्ज़** (स्त्री०) [ फा० सञ्ज ] वाटोळा चपटा व खोलगट असा काशाचा वाजणारा पत्रा. दोन झान्ज़ा एकावर एक आपटून वाजवितात.

**झुलूप** ( न० ) [ फा० ज़ुल्फ़ ] कानशिला-वर अगर कानावर पडणारा केसगुच्छ.

**झोक; झौंक** ( पु० ) [ अ० ज़ौक़ ] डाम-डौल; दिमाख.

## ट

**टन्चाई** ( स्त्री० ) दुर्मिळता; महागाई; तङ्गचाई पहा.

**टप्पा-गुज़रा** ( पु० ) [ फा० तप्पा = उन्चवटा ] धम्धमा ( मराआ ३६ ).

**टर्बूज़** ( न० ) [ फा० तर्बुज़ ] एक प्रकारचें फळ.

## ड

**डफ** (पु० ) [ फा० दफ़् ] मोठी टिमकी.

**डबा** (पु० ) [ फा० दब्बा ] करण्डा.

**डबीर** (पु० ) [ फा० दबीर् ] लेखक; कार्कून; चिटणीस.

**डाग** (पु० ) [ फा० दाग़् ] भाजल्याची खूण; कलङ्क.

**डागणें, डाग देणें** = भाजणें; तापलेल्या-वस्तूनें चटका देणें; सर्वसी देणें.

**डागडुजी; दागदोजी** ( स्त्री० ) [ ! ∠फा० दोज़् = शिव, टाके मार ] दुरुस्ती; मरामत.

**डाव** (पु० ) [ फा० दाव् ] खेळांत पडलेलें दान; मोहऱ्यांची हालचाल; हेतू. डाव साधणें = सन्धी साधून प्रतिस्पर्ध्यास मारणें.

**डाव-पेच्** (पु० ) [ मराठी समास ] युक्ती-कल्पना.

**डेग** ( स्त्री० ) [ फा० देग् पदार्थ उकळविण्याचें भाण्डें ] हण्डा.

**डोल** (पु० ) [ फा० दोल् ] पोहरा; बकेट; बाल्डी.

**डौल** (पु० ) [ अ० दौल् ] स्थिती; ऐट; डौलत. "तुमच्या कुल डौलाची दिवाण-गिरी" ( वाडमा १।१४६ )

**डौल** ( न० ) सही-शिक्क्याचा कोरा कागद.

## ढ

**ढेलज्** ( स्त्री ) [ अ० दिह्लीज़् ] कमानी दर्वाज़ा; उम्बरा; देवडी.

**ढोल** (पु० ) [ फा० दुहुल् ] चर्मवाद्य.

## त

**तक्त; तख्त** ( न० ) [ फा० तख़्त् ] आसन; नृपासन; सिंहासन.

**तक्त-ताराज्** मार-लूट. ताक्तताराज् पहा.

**तक्त-नशीन; तख्त-नशीन** [ फा० तख़्त्-निशीन् ] सिंहासनारूढ; तक्तारूढ.

**तक्त-नशिनी** ( स्त्री० ) [ फा० तख़्त्-निशीनी ] राज्यारोहण. "तख्त-नशिनीची मुबारक-बाद" ( दिमरा २।६० ).

**तक्त-पोशी** ( स्त्री० ) [ फा० तख़्तपोश् फळ्यांची भुई ] फ़डीपाट; पटई.

**तख्त-रवा; तख्तरावा** (पु० ) [ फा० तख़्त्-इ-रवान् ] चल सिंहासन ( मरा-चिथोशा ५९ ); बैलाच्या गाडीवर अगर मनुष्याच्या डोक्यावर ठेवून चालवावयाचा तक्ता; त्यावर नृत्य व्हावयाचें.

**तक्ता** (पु० ) [ फा० तख़्ता ] फळी; कागदाचें लाम्बरुन्द पान; नकाशा; कोष्टक.

**तक्ती** ( स्त्री० ) लहानसा तक्ता; चकती.

**तक्द्दुम** ( अ० तक़द्दुम=भूत ) मागील; भूत; झालेलें.

**तक्दमा** (पु० ) [ अ० तक्दमा ] आगाऊ; आगाऊ पैका; अग्राधिकार. "तक्दमा वसूल घेतला" ( खरे ८५१ ).

**तकार** ( स्त्री० ) [ अ० तकार् ] पुनरुक्ती. आक्षेप; फिर्याद; ओरड; कुरकूर. "या प्रमाणें तकार करून साङ्गून पाठविलें ( राजवाडे ५।२०६ ).

**तकार-खोर; तकारी** [ फा० तकारी ] भाण्डखोर; हुज्जतखोर.

**तकीब** ( स्त्री० ) [ अ० तकीब् ] सम्बन्ध; बहाणा; सबब. " त्यास मशेल्याची तकीब् लावणें निस्बत नाहीं " ( राजवाडे ५।१५७ ).

**तकीर** ( स्त्री० ) [ अ० तकीर ] हकीगत; कैफियत; करिणा. " फितूर केला होता. त्याच्या तकीरा " ( वाडसमा ३।७१ )

**तकीर करें** निवेदित ( वाडशाछ १७४ ).

**तक्लादी** [ अ०तक्लीदी ] बनावट; नकली; न टिकणारें.

**तक्लीफ** ( स्त्री० ) [ अ० तक्लीफ् ] श्रम; तस्दी; त्रास.

**तक्लुबी; तग्लुपी** [ ? ८अ० तकल्लुब् ] दिखाऊ; बनावट; खोटा. " तग्लुफी शिक्के देखील करीत होता " ( राजवाडे ६।१२४). ( कागद ) " तक्लुबी असेल" ( राजवाडे ३।११७ ). " आपण तग्लुपी कागद करून दिल्हा. कागद शेण लाऊन भिजवून दाखविला कीं या-प्रमाणें केला " ( राजवाडे ६।८९ ).

**तक्वा; तकवा** ( पु० ) [ अ० तक्विया ] उत्तेजन; हुशारी; उत्साह; त्राण; शक्ती; कोशीस. " इतका तकवा त्यांस की दिल्हा येवढ्यावरच ते चढून जातील " ( राजवाडे ५।१७७ ). " दोन्हीकडील खण्डणीमुळें सस्थान नानवानीस पडलें... हैदर अलीखान याच्या उपद्रवामुळें कांहीं तकवा राहिला नाहीं " ( खरे ११३५ ). " मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा । येविषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती " ( रामदास ) तुमचे लिहिल्याचे तकव्यावरी पन्धरा दिवस लोकांस उमेद होती " ( राजवाडे १२।८३ )

**तक्वा-दिल्दारी** ( स्त्री० ) " समाधान-उत्तेजन. " सन्चणीचा वरून आहे, तक्वा-दिल्दारी पाठवणें ( राजवाडे १६।३३ ).

**तक्वेत** ( स्त्री० ) समाधानी, खातर्जमा. "साहेबीं तक्वेतीचें खुर्दखत सादर कलें" ( राजवाडे १६।३२ ).

**ताक्वियत-कौल; तक्वेत-कौल** ( पु० ) समाधानीचा कागद; मदनपत्र ( वाड-समा २।२४४ ).

**तक्शीर; तक्सीर** ( स्त्री० ) [ अ० तक्सीर ] कमीपणा; न्यून; दोष; चुकी. " तहमूल ( =सहन ) करावयास तक्सीर केली नाहीं " ( इम ६७ ).

**तक्सीराती** [ अ० तक्सीरात् अनेक व० तक्सीरचें ] चुका. " ऐशा तक्सिरानी तुझे निस्बत कितेक जालिया " ( इगे ५।४९ ).

**तकसुबी** ( स्त्री० ) [ अ० तकड्डुब् ] लबाडी. " गण्डेनें तकसुबी करून आली आहे " ( भाइसम १८३४ पावृ २११ ).

**तक्शीम; तक्सीम** ( स्त्री० ) [ अ० तक्सीम् ] वांटणी; हिस्सा; भाग.

**तक्शीम-दार; तक्सीम-दार** ( पु० ) वांटेकरी; हिस्सेदार.

**तक्क्या; तक्या; ताकिया** ( पु० ) [ अ० तक्या ] विश्रान्तिस्थान ( मराचियोशा ८२ ). पाठ टेंकण्यासाठीं भिन्तींशीं उभी ठेवावयाची मोठी उशी; मठ. "तक्यांत बसणारे फकिरांसही रोज्मरे द्यावे " ( ऐस्फुले २३१ )." अलीकडे धाम-धुमीचे सबबेनें मोहिचीं आपला कदीम तकिया सोडून उपर घाटावर जाऊन नवाच ताकिया बनाविला आहे " ( पार-सनीस-ब्रप ३३७ ").

**तकुबी; तकूब** तह्कुबी; तह्कूब पहा.

**तग्दीर** ( न० ) [ अ० तक्दीर् ] ईश्वरेच्छा; दैव; नशीब.

**तग्मा** ( पु० ) [ फा० तघमा ] नक्ष; अस्करा; लौकीक. "आम्ही आज पावेतों मुसल्मानीचा तग्मा जतन करून आहोंत" ( द्मिरा १।१५९ ).

**तगाई; तगावी** ( स्त्री० ) [ अ० तकावी ] शेतकऱ्याला मदतीखातर सर्काराकडून अगर जमीनदाराकडून मिळालेला कर्जाऊ पैका; दाणेपैका.

**तगादा** ( पु० ) [ अ० तकाझा ] मागणी; निकडीची मागणी. "सन मज़्कूरच्या स्वारीच्या हिशेबाचा तगादा तुम्हांसी कांहीं राहिला नाहीं" ( राजवाडे ६। १५४ ). "सावोत्रियाचा तकादा लागों न देणें" ( राजवाडे ३।५०२ ).

**तगाफली** ( स्त्री० ) [ अ० तघाफुल ] गाफिली. "श्रीमन्तांस मोहीम दर्पेश;- इतके तगाफलीचें कारण काय"! ( द्मिरा २।१०८ ). "तगाफली केलिया आपलें केलें पावाल" ( राजवाडे १८। ५० ).

**तगिरी; तगेरी** ( स्त्री० ) [ अ० तघयीर् ] बद्ली; बडूतर्फी.

**तगारी** ( स्त्री० ) [फा० तघारी] पीठ भिजवून मळण्याची परात.

**तगारें** ( न० ) लोखण्डी टोपलें.

**तगीर** करणें-होणें = बद्लणें. "न्याहार खानाचें वाईचें ठाणें तहगीर जहालें" ( इम ३६ ).

**तङ्ग** ( पु० ) [ फा० तङ्ग् ] जेर-बन्द; घट्ट; आंवळ.

**तङ्ग करणें** [ फा० तङ्ग कर्दन् ] आंवळणें; पेचांत धरणें. "प्रथमतां मुन्जीं त्यास तङ्ग केला तेव्हांच त्यास आंच बसली" ( खरे ८४७ ).

**तङ्ग-चाई** ( स्त्री० ) [ फा० तङ्ग्-चाय् ] टञ्चाई; दुर्मिळता; अडचण; तङ्गी. "परन्तु खर्चाची बहुत तङ्गचाई जाली" ( इम १३४ ). "आपले अशा तङ्गचाईत बहुत उपयोगी पडले" ( खरे ११।६००० ).

**तङ्ग-तोब्रा** ( पु० ) [ मराठी समास ] घोड्याला लागणाऱ्या अवश्य जिनसा.

**तङ्गबार करणें** [ फा० तङ्ग्बार=सामानाचें गाठोडें ] जीन-बन्दी करणें.

**तङ्गी** ( स्त्री० ) [ फा० तङ्गी ] टञ्चाई; चणचण; गरिबी.

**तज़्करा; तज़्किरा** ( पु० ) [ ! अ० ताज़्किरा ] सनद; दण्ड; पेशाच्या अफरातफरीमुळें निघालेलें येणें; चोरी. "दुमाला कीजे. तज़्करा उज़ूर नकीजे" ( राजवाडे १५।४७२ ). "तज़्करे घ्यावे, घरें बुडवावी, नागवावें" ( मराचिसं १९ ). "भानूस पन्धरा लक्ष तज़्करा व आठलक्ष खण्ड मागत होते" ( खरे १०।५३८५ ). "बाळाजी वामन दामले याजकडे परगणे अकोले येथील तज़्करा निघाला आहे. त्याची चौकशी करून त्याजकडे जे रुपये निघतील ते घेऊन त्यास इकडे पाठवून द्यावें" ( राजवाडे १४।५ ).

**तज़्करनीस** सनदा वगैरे लिहिणारा.

**तज़्वीज़** ( स्त्री० ) [ अ० तज्वीझ् ] व्यवस्था; तर्तूद; उपाय; सल्ला; विचार; काळजी. "राजा गईब जहाला ऐसें जाऊन साङ्गताच पाद्शहास आश्चर्य वाटून बहुत तज़्विजीत पडला" ( सभासद ४२ ). "येहीं तज़्वीज़ विचारली कीं" ( इऐ ५।५७ ).

**तज़ावज़** ( स्त्री० ) [ अ० तजावुझ् ] उल्लङ्घन; अतिक्रम; अन्तर; फासला. "महकूम अक्दसासी तफावत व तजा

वज न करूं "( राजवाडे १।२ ). "सात कोशीचे तज़ावजीनें पानगळ नजीक मुक्काम केला " ( राजवाडे ३।३५१ ). "हर एक बाबें चालवावें म्हणून कलमी केलें तर दोस्तीचे जागां तज़ावज़ आहेसें नसें " ( पारसनीस ब्रप २३६ ).

**तज़ावज़ा** गडबडलेले; परागन्दा; ( स्त्री० ). अफरातफर " मिरजेंतील थोर थोर मण्डळी कांहीं तज़ावज़ा जाली अशा प्रकारच्या अवया ऐकतों ( खरे १०।५३३७ ). " पुण्यांत लोक बहुत तज़ावज़ा जाहले आहेत " ( खरे १०।५३४१). ' दागिने यांची तज़ा-वज़ा होईल त्याची खबर्दारी वरचेवर करीत जाणें " ( वाड-मा १।११५ ).

**तजेला** ( पु० ) [ < फा० ताज़ा ] टवटवी.

**तणाव** ( स्त्री० ) [ अ० तनाब़ ] तम्बूची ताणून मेखांस बान्धलेली दोरी. " कार्भारी यांचे पेचामुळें आमचे दौल-तेच्या तणावा तुटत चालल्या " ( खरे १।१४६ ).

**तदूबीर; तत्बीर** ( स्त्री० ) [ अ० तदूबीर् ] योजना; विचार; युक्ती; व्यवस्था; उपाय. " तदनन्तर जे तदूबीर होईल ते विनन्ती केली जाईल " ( राजवाडे १।१४७ ). " मशार्निले येथें आलियावर तर्तूद व तत्बीर पाहून बहुत सन्तोष जहाला " ( साने-पयाव ५७ ). " टोपीकरांची जात मकरी व दगाबाज; शायद् भुलावा देऊन कांहीं एक शक्कल नमूद करावी या तद्बिरेंत असतील " ( साने-पयाव ४६३ ).

**तदारूक** ( पु० ) [ अ० तदारुक़ ] तयारी; इलाज; शिक्षा. " तुम्ही व राव पन्त-प्रधान यांनीं खातर्ज़मेनें दिल्हा तदारूक अमलांत आणावा " ( दिमरा १।७ ). " इङ्ग्रजाकडून जितकी जितकी बे-अदबी झाली तितका तदारूक सर्कारांतून अमलांत येत गेला " ( खरे ७।३५७५ ). " राव पन्तप्रधान यांचा आम्हांस मोठा उपद्रव; व एक वेळ यांस तदारूक चाङ्गले प्रकारें दिल्हा पाहिजे" ( राजवाडे ५।१५१ ).

**तन** ( न० ) [ फा० तन् ] शरीर. तन देणें [ < फा० तन् दादन् ] छाती पुढें करून स्वतःवर घेणें. " इङ्ग्रजांपाशीं तोफांचा मार फार; तेव्हां लोकांनीं तन न दिलें। निघाले." ( खरे १०२४ ). "फौज कमी; तेहि खर्चाचे अडचणी-मुळें तन देईना " ( होकें १६ ).

**तन्खा; तनखा** ( पु० ) [ फा० तन्खाह् ] पगार; वेतन; खर्ची; वरात; रक्कम देण्याचा हुकूम. " व तनखाही ( =वसूल ही ) हर्दू तपियाचा दिवाणांत देत नाहींस " ( राजवाडे १५।२७१ ). " तुम्हांकडे सर्दारुल्मुल्क बहादूर यांनीं पर्गणे पालीम एथील ऐवजीं तन्खा केली त्या बाबत ऐवज़ येणें " ( राजवाडे २२।१०१ ).

**तन्दुरुस्ती** ( स्त्री० ) [ फा० तन्दुरुस्ती ] आरोग्य.

**तनूहा; तनहा** [ फा० तन्हा ] एकटा. " मुज़ाका नाहीं; तनूहा यावयाचें करावें " ( राजवाडे ५।२५ ).

**तन्हाई; तनूहाई** ( स्त्री० ) [ फा० तन्हाई ] एकलेंपण; एकान्त. " तनूहाईंत बोला-वयाचें किंवा कसें" ( राजवाडे ५।२८ ).

**तनाखोरी** ( स्त्री० ) [ फा० तनाखोरी ] नावड; वीट. " तो यांस तनाखोरीस येऊन " ( जोरा ५४ ).

**तफ्शील** ( पु० ) [ अ० तफ्सील् ] सविस्तर माहिती; सबबींचा पाल्हाळ.

" तफ्शील सहसा न लावितां ...रुपये व रसदेची तर्तूद ज़रूर करणें " ( राजवाडे १।३३५ ). " राज्याचा बन्दोबस्त राखावा याअर्थीं लिहिलें असतां ताफ्शिलें लावून लिहितां; काय म्हणावें" ! ( राजवाडे ६।२५७ ).

**तफ्शील-वार; तफ्शीलाने** [ फा० तफ्सील्वार्-फा० तफ्सीलाना ] सविस्तर; प्रत्येक बाबीची स्वतन्त्र माहिती देऊन.

**तपास** ( पु० ) **तपासणी** ( स्त्री० ) [ अ० तफह्हुस् ] चौकशी; तलास; शोध.

**तपासणें**=परीक्षा करून चूक भूल पाहणें.

**तपास-नीस** ( पु० ) चौकशी करणारा अधिकारी.

**तफ्रका** ( पु० ) [ अ० तफ्रिका ] दाणादाण; परागन्दा; हैराण. " रोहिल्याचे अम्मलापासून वस्तीचे लोक तफ्रका जाले " ( दिमरा १।१६ ). " गोरगरीब आलम तफ्रका व परेशान आहे" ( राजवाडे ३।९० ).

**तफ्रीक** ( स्त्री० ) [ अ० तफ्रीक् ] वर्गगारी; वांटणी. " तरी कौलाप्रमाणें रयतीपासून तफ्रीक बहुकूम गुदस्ताप्रमाणें वसूल घ्यावा " ( राजवाडे ३।४९१). " चाळीस लाखांची तफ्रीक इसम-नवेसीवार करून होन देविले " ( राजवाडे ५।१४८ ).

**तफजूल** ( पु० ) [ अ० तफ़ज़्ज़ुल् ] कृपा; उपकार. " मगर .वजिरावर तफजूल होतो तो श्रीमन्तांचेच खातर्दास्त होतो" ( राजवाडे ६।६२० ).

**तफहूस** ( पु० ) तपास. " आह्मन्याच्या मार्फतीनें तफहूस करितां मोहिब्बांचीं गुरें यांमध्यें नसेत म्हणून आह्मन्यानें मालूम केलें " ( पारसनीस ब्रप २३६ ).

**तफावत-तज़ावज़्** (स्त्री०) अन्तर. " केव्हांही हर्दहाल मोहिब्बाचे कामामध्यें तफावत-तज़ावत करणार नाहीं " ( पारसनीस ब्रप २४० ).

**तफावत; तफावती** ( स्त्री० ) [अ० तफावुत् ] अन्तर; फासला; फरक; हरामखोरी; स्वामिद्रोह. " पुढें बाणांच्या खोचेचे तफावतीनें उभे राहिले " ( पाब ३७ ). " मग त्यामध्यें एक मुसल्मान होता त्यानें तफावती केली" ( राजवाडे १५।६ ). " गिल्च्याचा आमचा दोंकोसाचा तफावत होता " ( राजवाडे ६।४७० ).

**तब्दील** ( स्त्री० ) [ अ० तब्दील् ] बदली; तगिरी; तगीर. तब्दील होणें-करणें = बदलणें.

**तब्लख** ( न० ) [ अ० तब्लक् ] कागदांचें पुडकें.

**तब्ला** ( पु० ) [ अ० तब्ला ] एक चर्मवाद्य.

**तब्यत; तब्येत; तबियत** ( स्त्री० ) [ अ० तबीअत् ] प्रकृती, शरीरस्थिति; मर्जी.

**तबियत-मान्दगी** ( स्त्री० ) आजार. " तबियत-मान्दगीमुळें बसण्या उठण्याची शक्ती पहिल्याप्रमाणें नाहीं " ( राजवाडे ७।१२७ ).

**तबक** ( न० ) [ अ० तबक् ] नक्षीदार ताट; घेर. " ते दिवशीं हल्ला जाली तेव्हां एक तबक घेऊन दुसरे तबकास लोक लागले " ( खरे ४।१८२७).

**तबञ्चा; तमञ्चा** ( पु० ) [ फा० तबाञ्चा] थप्पड; पिस्तूल.

**तबरूक** ( पु० ) [ अ० तबर्रुक् ] प्रसाद ( चित्रगुप्त ४९ ). " त्यास पातशा-

ह्यांनीं तबलूस देवायाची आज्ञा केली " ( दिमरा १।१५२ ).

**तबलूची; तबलूजी** ( पु० ) तब्ला वाजविणारा.

**तबल्दार** ( पु० ) [ फा० तबर्दार् ] कुऱ्हाडवाला ( खरे ८।४३६५ ).

**तबाख** [ अ० तब्बाख् आचारी ] शिजलेलें अन्न विकणारा ( ऐस्फुले ३४ ).

**तबियती** = लहरी.

**तबीब** ( पु० ) [ अ० तबीब् ] वैद्य; शस्त्रवैद्य. "तबीब लावून जखमा बान्धविल्या " ( खरे ६।२८३२ ).

**तबेला** ( पु० ) [ अ० तवीला ] अश्वशाला.

**तम्बाकू–खू; तमाखू** ( पु० स्त्री ) [ फा० तम्बाकू ] एका वनस्पतीचें पान, तें चघळतात, अगर खातात अगर त्याचा धूर ओढतात.

**तम्बी; तम्बीह** ( स्त्री० ) [ अ० तम्बीह् ] धमकावणी, दटावणी; कानपिळा; शिक्षा.

तम्बी देणें अगर करणें=शिक्षा करणें.

**तम्बू** ( पु० ) [ फा० तम्बू ] कापडी घर; डेरा; खेमा.

**तम्बोरा; तम्बुरा; तम्बूर** ( पु० ) [ फा० तम्बूर् अ० तम्बूरा ] एक प्रकारचें तन्तुवाद्य.

**तम्बोरी** ( स्त्री० ) लहान तम्बोरा.

**तमसूक** ( पु० ) [ अ० तमस्सुक् ] लेखी करार; वचनपत्र; पावती. "शिन्द्याकडील तमसुकाप्रमाणें ऐवज् येणें " ( राजवाडे ५।११ ). "शिन्दे यास नवाबांनीं पैका दिला त्याचे तमसूक आहेत " ( राजवाडे ५।७० ).

**तमा** ( स्त्री० ) [ अ० तमअ ] इच्छा; आशा; गरज्; पर्वा; फिकीर; भीती. "इड्यज ब–जीद होऊन व तमा दाखवून राजकारण करूं लागल्यास तर्फैनच्या सल्लाह्–मस्लतीखेरीज् हर्गीज् मन्जूर होणार नाहीं " ( साने–पयाव ४६५ ). तमा धरणें = जुमानणें, भिणें. "*शिवाजीस कैद करून जिवन्त अणितों* त्याची तमा धरीत नाहीं " ( चित्रगुप्त ८ ).

**तमा–तवका** ( पु० ) [ अ० तवक्कुअ ] आशावाद. "तमा–तवके दाखऊन शोहरा करितील " ( साने–पयाव ४६६ ).

**तमानीयत** ( स्त्री० ) [ अ० तुमानीनत् ] खातर्जमा. "तेव्हां नवाब मौसूफ यांची मस्लतीविसीं तमानीयत कसी होईल ! " ( राजवाडे १९।१६ ).

**तमाम; तमामी** [ अ० तमाम्; तमामी–इ ] पूर्ण; सर्व; खलास; समाप्त. "यास जनेली तमामी फौजेची माफक–हुकूम –विलात मुकर जाली आहे " ( पद्मव ११५ ).

**तमामी** ( स्त्री० ) [ अ० तमामी ] पूर्णता; जर्तारी कापड.

**तमाशबिनी** ( स्त्री० ) [ फा० तमाशा–बीनी स्वैरविलासीपणा ] मौज पाहण्याची तटस्थवृत्ती. "या दिवसांत तमाशबिनी स्वामीकडून झालियास दौलतीस नवाबाचे धक्का बसेल" ( राजवाडे ५।५३ ).

**तमाशा** ( पु० ) [ फा० तमाशा ∠ अ० तमाशी ] दृश्य; प्रदर्शन; प्रेक्षणीय खेळ; हलक्या दर्जाचें ग्राम्य सङ्गीत नाटक; हलकट चेष्टा. "सरासरी बार–कवाइतीस प्रारम्भ जाल्यापासून पांच घटकापर्यन्त तमाशा जाला " ( खरे ९।४७१६ ) "आज उद्योग करून आम्हांसही तमासे दाखविणें " ( इम १०५ ).

**तमाशा-सैर** [ अ० तमाशा=निरीक्षणा-साठीं परिभ्रमण + अ० सैर्=सहलणें ] देश-निरीक्षण व पर्यटण. " इङ्ग्रजांचा पाय या प्रान्तीं फार शिरला आहे; तमाशा-सैर करण्याचे बहाण्यानें येऊन येथील नक्षे लिहून घेतले " ( दिमरा १।३०२ ).

**तमास-गीर** ( पु० ) तमाशा करणारा अगर दुरून मौज पहाणारा.

**तमास-बीन** [ फा० तमाशा-बीन] तटस्थ. " शहरांतील तमास-बीन शहराबाहेर उभे होते त्यांस कांहीं उपद्रव जाहला " ( खरे ११।५६६० ).

**तयार; तय्यार** [फा० तय्यार्] सिद्ध; सज्ज; मुस्तेद.

**तयारी** ( स्त्री० ) [ फा० तय्यारी ] सिद्धता; मुस्तेदी; सामुग्री.

**तर्कस; तर्कश** ( पु० ) [ फा० तर्कश् ∠फा० तीर्कश् ] बाणांचा भाता. " तिर्कश " ( चित्रगुप्त १३८ ).

**तर्कीब** ( स्त्री० ) [ अ० तर्कीब् ] रचना; योजना; गोष्ट. "तुम्हांशीं बोलण्यांत येईल त्या तर्कीबीनें लिहावें " ( राजवाडे ५। १५७). "कोणही रोजीं मैदानांत येऊन मोकाबिला केला आणि कायम राहिले हे तर्कीब नजरेस आली नाहीं " (साने-पयाव ४८२ ).

**तर्कीम** ( स्त्री० ) [ अ० तर्कीम् ] लेखन ( राजवाडे ३।७३ ).

**तर्जुमा** ( पु० ) [ अ० तर्जुमा ] लेख; अर्थ; भाषान्तर. " एकन्दर राज्याचा हिशेब पेशवे करीत होते तो" ( ऐस्फुले २।७३ )

**तर्तीब** ( स्त्री० ) [ अ० तर्तीब् ] व्यवस्था; तज्वीज.

**तर्दूद** ( स्त्री० ) [ अ० तरद्दुद् ] सबेरा; व्यवस्था; काळजी; कसोशी; युक्ती. " सतत चाङ्गले निगेनें कावडी येत असे तर्दुदेनें पाठवीत जाणें " ( राजवाडे १।३१५ ).

**तर्तुदी** [ मराठी प्रयोग ] काबील; दुरुस्तवस्त. " उभय कार्भारी शहाणे, मेहनती, तर्तुदी आहेत " ( खरे १।८० ).

**तर्दूद-कार** ( पु० ) व्यवस्थापक. " मिस्तर पार्कल...लढाई व तर्दूद-कार होता तो गोळीची जखम लागून जाया झाला " ( दिमरा १।३८ ).

**तर्फ; तरफ** ( स्त्री० ) [ अ० तर्फ्-तरफ् ] दिशा; बाजू, पक्ष; तालुका; पेटा.

**तर्फैन** [ अ० तर्फैन् = उभयपक्ष ] उभयपक्ष; उभयपक्षीं. " प्रसङ्गास जिकडील उणीव तिकडील पुरवणी करावी हा तर्फैनचा शिल्शिला चालत आला ( राजवाडे ५।२०२ ). " पेशजीचे करारा‌बमोजीब तर्फैन चालून " ( खरे ७।३५६४ ). " सर्कारचा व इङ्ग्रजांचा तर्फैन करारनामा ठरविला " ( खरे ७।३५६९ ).

**तर्बियत** ( स्त्री० ) [ अ० तर्बियत् ] शिक्षण; पोषण; सुशिक्षित. " पाटील बावांनीं येथें असावें आणि आम्ही मुलें याकरितां तार्बियेत राखावीं " ( ऐकिप्र २६ ). " चिरञ्जिवास घरीं बसऊन ठेविल्यानें तार्बियत होणार नाहीं तरी त्यास श्रवण करवीत असावें ( राजवाडे २२।४४ ).

**तर्बेज्** [ अ० तर्बियत ] शिक्षण; सुशिक्षित; पारङ्गत.

**तर्र; तर** [ फा० तर् ] ओलें; ताजें; रसपूर्ण, धुन्द. " तर मेव्याचे व खुश्क मेव्याचे खोन " ( राजवाडे १०।२९६ ).

**तऱ्हा** ( स्त्री० ) [ अ० तर्ह् ] रीत; प्रकार,

" आमची पल्याची तऱ्हे आपण कहा-इतील; ती कांहीं दिसोन आली नाहीं " ( राजवाडे १२।११५ ). " लढाई खूब तऱ्हेनें जाली " ( राजवाडे १०। १९२ ).

**तऱ्हातऱ्ही** [ मराठी प्रयोग ] निरनिराळ्या तऱ्हेचा. " वीस पञ्चवीस तोफानी तऱ्हातऱ्ही येणेंप्रमाणें नबाबानीं पाठवावें " ( खरे ८७५ ).

**तऱ्हेदार** [ फा० तर्हदार् ] नव्या प्रकारचें; सुन्दर. " दुसरें एक क्रोड वाड्गळें तऱ्हेदार " ( खरे १०।५२४६ ). " पान्दान चाड्गलें तऱ्हेदार आहे " ( राजवाडे ३।४८७ ).

**तऱ्हेवार, तऱ्हेवाईक**= चमत्कारिक.

**तरकी; तरक्की** ( स्त्री० ) [ अ० तरक्की ] उन्नती; प्रगती; सुधारणा; उत्कर्ष. " रावसाहेबांचे दौलतेची रोज़ ब रोज़ तरक्की होते, हे गोष्ट त्यांस खुश लागत नाहीं " ( राजवाडे १।५२ ).

**तरफदार** ( पु० ) [ फा० तरफ्दार् ] कैवारी; पक्षपाती; एक मुल्की अम्मलदार; पेटेदार.

**तरफदारी** ( स्त्री० ) [ फा० तरफ्दारी ] कैवार; पक्षपात; वकिली.

**तरफबन्दी** ( स्त्री० ) सीमाबन्धन.

**तरफ-सानी** [ फा० तरफि सानी = दुसरा पक्ष ] प्रतिपक्ष. "बद-अहदीची दर्याफ्त दोघां शरिकांनीं करून तरफ-सानीकडे नसीयत-पूर्वक साड्गून पाठवावें " ( राजवाडे ७।३ ).

**तरस** ( पु० ) [ फा० तर्स् ] भय. " हे बातेचा तरस मोहिबासारखे इबादती लोकांस ( = भक्तास ) न ये हें अज्याईब आहे " ( राजवाडे ३।९० ).

**तराजू** ( स्त्री० ) [ फा० तराज़ू ] तागडी; कांटा; ताज़वा.

**तराणा** ( पु० ) [ फा० तराना ] एक गीत प्रकार.

**तरिका** ( पु० ) [ अ० तरीका ] चाल; सलूक. " पण्डित प्रधान व नबाब निजाम यांचा तरिका एक्लासीचा कदिमीपासोन चालत आला, हर्बाबें त्यासी जुदागी नाहीं " ( राजवाडे १०।१६५ ).

**तरीक** ( पु० ) [ फा० बतरीक=मार्गें∠अ० तरीक ] मार्ग; प्रकारें; तुल्य; वज़ा " इकडील येकसू व एक-दिलीचा तरीक साबीक होता " ( साने-पयाव ४६८ ). पातशहास सर्कारची गरज् न दाखविर्ता सलाह तरीक ( = युक्तिवाद म्हणून ) समर्पक विनन्ती केली " ( दिमरा ११७ ). " आणखीही तोफा तरीक ( = नज़राण्यास योग्य ) जिनसांचा शोध करीत आहों " ( ऐकिप्र २।६१ ) " पांच लक्ष रुपये जास्ती नज़राणा-तरीख ठराऊन त्याचें काम त्याजवरीच बहाल ठेविलें आहे ( ऐटि २।७१ ).

**तलख; तलख** [ फा० तल्ख् ] तिखट; तेज; जहाल; चलाख.

**तलखी** ( स्त्री० ) [ फा० तल्खी ] आग; तापटपणा; काहिली; चलाखी. " तलखी सोडून शान्तता धरून वर्तावें " ( खरे २।४७९ ).

**तलफ** [ अ० तलफ् ] नाश; विध्वंस; उध्वस्त. " मुऱ्हारी जगदेवराव सुभा येऊन पुणें जाळून लुटून तलफ केलें " ( इम ५६ ). " मुलूख मारून तलफ केला " ( सभासद ५३ ). " तर्फ

मज्कुरास काबीजाती येतां आधीं घाली घालून तपे मज्कूर लुटून, नागऊन तलफ केलें" ( पेदसमा २१६ ).

**तलफ; तल्लुफ** ( स्त्री० ) [ अ० तलंब ] इच्छा; हुक्की; तीव्र इच्छा.

**तलफी** अमली; कैफी; शौकी; व्यसनी.

**तलब** ( स्त्री० ) [ अ० तलब् ] पगार; वतन; बोलावणें; समन्स. "हें जाणून त्यास तलब करून हुजूर आणिला" ( चित्रगुप्त ७८ ).

**तलब-तन्खा** ( स्त्री० ) पगार-खर्ची. "पांचशें गोऱ्यांची तलब-तन्खा वरचेवर तुम्हीं पाठवीत जावी (दिमरा २।१४६).

**तल्बाना** ( पु० ) [ फा० तल्बाना ] रोजी पगार. "सोळा रोज़ प्रत्यह तल्बाना गाडदी यांस द्यावा लागतो" ( खरे ११४५४ ).

**तलवून-मिज़ाजी** ( स्त्री० ) [ फा० तलव्वुन्-मिज़ाजी ] अनिश्चितपणा; लहरीपणा; हर्दम-ख्याली; गैर-कायम-मिज़ाजी. "रियासतींत मोठी गाष्ट का वचनाची कायमी. त्यांत तलवून-मिज़ाजी झाल्यास व इल्लाखी बातल होऊ लागल्यास लाचार !" ( खरे ७।३५७४ ).

**तलाख** ( स्त्री० ) [ फा० सौगन्द् इ तलाक्=घटस्फोटाची शपथ ∠अ० तलाक्=काडी मोड ] शपथ. "त्यास जो कोणी लिहिल्याप्रमाणें न ऐके त्याजला शपथ असे, त्याचे आईवर तलाख असे" ( पारसनीस-ब्रच १२४ ).

**तलाव** ( पु० ) [ फा० तालाब् ] तळें; सरोवर.

**तलावा** ( पु० ) [ फा० तलाया ∠अ० तलाइअ लढाऊ टेहेळणी करणारी तुकडी ] टेहेळणी. टेहेळणी करीत. "बारीपलीकडे तलाव्यास फौज़ रवाना केली" ( खरे ८।३९१९ ). "अलाहिदा लस्केर घेउनु तलावा फिरों लागले" ( इम ९ ).

**तलास** ( पु० ) [ फा० तलाश् ] शोध, तपास; चौकशी. "चाङ्गले मर्द झुन्ज़ाचे उपयोगी पडे याप्रमाणें तलाश करून ठेऊन पाठविणें" ( राजवाडे ११२७९ ).

**तवई, तवाई** ( स्त्री० ) [ फा० तबाही ] नाश; सङ्कट. "सदाशिव पन्तावर मोठा तवईचा वक्त गुज़रला" ( पाब १४ ). "स्वामीवर नवाई मोठी गुदरली आहे" ( खरे ११।५९१० ). "आम्ही किती दिवस तवाई सोसावी ! याउपर बाहेर पडोन मोर्चे उधळितों; नाहींतर त्यास पालवून शहरांत घेतों" ( खरे १२।६२७७ ).

**तवकल; तवकूल** ( स्त्री० ) [ अ० तवक्कुल् ] भरंवसा; ईश्वरावर भरंवसा. "आमची तवकल श्रीवरी ! कोणेही गोष्टीची फिकीर नाहीं" ( खरे १।२४२ ). "खुदावर तवकूल ठेवून रघुनाथराव यांचे तम्बीचा इरादा केला" ( राजवाडे ५।८६ ).

**तवका** ( पु० ) [ अ० तवक्कुअ ] आशा. "खुलास दुनियाईंचे आलमांत जितक्या तवक्याच्या शकला आहेत त्यातर्फेन दाखवून हर तद्बिरीनें निफाक ( = वैर ) पाडावयासी कसूर करणार नाहींत" ( साने-पयाव ४७८ ). "तमा तवके दाखऊन शोहरा करितील" ( साने-पयाव ४६६ ).

**तवकूफ** ( पु० ) [ अ० तवक्कुफ् ] खोळम्बा, अवकाश. "बिल्फैल आं मेहेरबानांकडून

ताण बसावा इतकाच तवकूफ "
( राजवाडे १९।७३ ).

**तवज्जेह** [ अ० तवज्जुह्=अवधान; मुतवज्जिह्=सावधान ] लक्ष्य; कृपा. " तर तवजेः करून या सोबत स्वारांचा दर्या ठिकाण लग देऊन तिकडून आराम-सीर हत्ती घेऊन येत ते बात केली पाहिजे " ( पारसनीस ब्रच २४ ).

**तवर** ( पु० ) [ अ० तहव्वुर् ] वीरश्री; आवेश; अङ्गेजी.

**तवलूद** ( पु० ) [ अ० तवल्लुद् ] जन्म. "आमची नियत ईश्वरास मान्य होऊन माधवराव पन्तप्रधान यांचा तवलूद झाला " ( राजवाडे ५।८६ ).

**तवा** ( पु० ) [ फा० ताबा ] भाकरी पोळी भाजण्यासाठीं केलेला वर्तुलाकार व किञ्चित् खोलगट लोखण्डी पत्रा.

**तवा–तोबरा** ( पु० ) [ मराठी समास ] निर्वाह; उपजीविका. " इकडे उत्पन्न झाल्यास तवा–तोबरा; न जाल्यास फाका " ( होकै १०५ ). " परन्तु फौजेचा तवा–तोबरा चालला पाहिजे " ( खरे ६।२९१३ ). " तवा–तोबरा चालल्यावर दुसरें सुचेल" ( होकै २५ ).

**तवाज़ा; तवाज़ू** [ अ० तवाज़ुअ ] बक्षास. " राणांनीं हाती–घोडा तवाज़ा केला " ( दिमरा २।३९८ ). " त्यांनीं दहा लक्षांची जहागीर तवाज़ा करून समजावीश केली " ( राजवाडे ५।२९ ). " मौजे तुळजापूर महम्मद दौलतखान बहादूर यांणीं आम्हास तवाज़ा केला आहे " ( राजवाडे २२।१०४ ), उज़ू–तवाज़ू=हस्तपाद प्रक्षालन व प्रार्थना.

**तवानणें**–हुशार होणें; तवाना होणें.

**तवाना** [ फा० तवाना ] सशक्त; हुशार; ताज़ा. " वाघानें चार रुपये सम्पादून तवाना जाहला आहे ( खरे १२।६३९९ ). " फौज तवानी राखून गनिमाचा बचाव होय तोच अर्थ करावा " ( खरे ५।२५०४ ).

**तवाफ** ( स्त्री० ) [ अ० तवाफ़् ] प्रदक्षिणा. " दर्ग्यांत जाऊन तवाफ करून " ( राजवाडे ५।६५ ).

**तवारीख** ( स्त्री० ) [ अ० तवारीख़् अनेक व० तारीख़् चें ] इतिहास.

**तवारीख–नामा** ( पु० ) इतिहास–ग्रन्थ. " अगर मुसल्मान कोणी असे तरी मोठेमोठे तवारीखनामे जाले असते " ( ऐटि १।१८ ).

**तवालीयत** ( स्त्री० ) [ अ० तव्लियत् ] जिम्मेदारी; कार्यवाहन. " दर्गा–मज्कूरची तवालीयत " ( वाड–सनदा ७७ )

**तवेल्दार** ( पु० ) [फा० तबर्दार्] कुऱ्हाड-वाला ( पारसनीस–ब्रच ५५ ).

**तश्रीफ** ( स्त्री० ) [ अ० तश्रीफ़् ] बहुमानाचा पोशाख. " बरोबरी लढाईच्या तश्रिफा देऊन रवाना केले " ( सभासद ३० ).

**तश्वीस; तश्वीश; तोशीस** ( स्त्री० ) [ अ० तश्वीश्] तोशीस;पीडा "त्यास एक ज़रेचे तश्वीश व आजार लागूं न देणें " ( राजवाडे १५।१५६). "रयतीस लायनी सिवीगाळी न करणें व तश्वीस न देणें" ( राजवाडे १६।२९ ).

**तशफ्फी** ( स्त्री० ) [ अ० तशफ्फी ] दिलासा; समाधान. " तुम्ही आमचे तर्फेनें यांची तशफ्फी व दिल्जोई करावी " ( राजवाडे २२।२५ ).

**तस्करा** ( पु० ) [ अ० तज़्करा ] आठवण; फिर्याद; तक्रार. "त्याजवर हुज़ूर कोणी तस्करा केला कीं" ( खरे ७।३६९० ).

**तस्त** ( न० ) [ फा० तश्त् ] हात तोण्ड धुतांना पाणी साण्डण्याचें रुन्द तोण्डाचें भाण्डें; पिकदाणी.

**तस्फिया** ( पु० ) [ अ० तस्फिया ] स्नेह; सह. " रफेशर केला व तस्फियाचा नक्षा ठराविला " ( वाड–कैफियती १०० ).

**तस्दी** ( स्त्री० ) [ अ० तस्दीअ ] त्रास; श्रम; मेहनत; तक्लीफ. " तज़्दी बहुत केली " ( राजवाडे ३।१७२ ). " येथें वैरणीची तस्दी फार जाली आहे " ( राजवाडे ६।३९२ ). तस्दी घेणें=श्रम-मेहनत करणें. तस्दी देणें=त्रास–तक्लीफ देणें.

**तस्दीक** [ अ० तसद्दुक् ] दान. " तमाम लोकांनीं सतके नगदी रुपये व खुर्दा व उडीद तेल तीळ वगैरे जिन्नस तस्दीक केले " ( राजवाडे ७।१२० ).

**तस्बीर; तज़्बीर** ( स्त्री० ) [ अ० तस्वीर् ] छबी; प्रतिमा; चित्र.

**तस्रीफ; तश्रीफ्** [ फा० तश्रीफ् फर्मूदन् ] आगमन. " ज़ूद आं यक्वाल–पन्हांनीं या जिल्ह्यास तस्रीफ फर्मावावी " ( साने–पयाव ३८७ ).

**तस्लीम** ( स्त्री० ) [ अ० तस्लीम् ] 'अस्सलामु अलैकुम्' ( =तुम्हाला शान्ती असो ) असें म्हणणें; वन्दन.

**तस्लीमात** ( स्त्री० ) [ अ० तस्लीमात अनेक व० तस्लीम् चें] वन्दन; देणगी; मोघम खर्ची; स्वाधीन. " समस्त लहान थोरीं तस्लीमात बज्या आणिली " ( ऐटि १६५ ). " ती ( जागा ) तानाजी येवला याचे तस्लमातीस दिली आहे " ( राजवाडे १२।१८३ ). " ज्याचे तस्लमातीस जे हत्यार असेल त्याची चौकशी ... राखति जावी ' ( मोंकु ४० ). " हैदर्यारखान यास पञ्चहजारीची तस्लीमात जाली " ( राजवाडे १।१७९ ). " बाळन्तविडा पाठविला तस्लमात (=समागमें) श्रीनिवास त्रिम्बक " (वाड–समा १।४० ).

**तसदूक** ( पु० ) [ अ० तसद्दुक् ] दान. " नज़रा व लोकांचे तसदूक–सत्के जाले " ( राजवाडे ७।१२३ ).

**तसरूफ** ( पु० ) [ अ० तर्सरुफ् ] अम्मल; ताबा; स्वाधीन. " मकर–फरेब करून आपला तसरूफ केला " ( दिमरा १। ५४ ). "मुलूखही तशरुफांत आणिला" ( खरे ७।३५६९ ). "त्यांच्या भरंवशावर येथील रयतेस उजाड करोन लाखो रुपये तसरूफ केले" (दिमरा २।१८५).

**तसरुफाती** ( स्त्री० ) [ तसर्रुफात् ] अधिकार; ताबा; भोगवटा. " भोगवटे तसरुफाती चालत आले आहे " (इम ४४). " फर्मान व भोगवटे याचे कागद होते ते जळाले; व आपण दुकालाकरितां कासीस गेलों होतों त्याकरितां तसरुफाती अजी तागाईत नाही " ( राजवाडे २०।३१८ ).

**तसल्ली** ( स्त्री० ) [ अ० तसल्ली ] समाधान, खातर्जमा. " परन्तु दुसरा सर्दार आल्याखेरीज पातशाहांची तसल्ली होत नाही " ( दिमरा १।२५९ ).

**तसू** [ फा० तसू ] दोन बोटांची लाम्बी.

**तह्कीक** ( स्त्री० ) [ अ० तह्कीक् ] सत्य; निश्चिती; निर्णय; निश्चित; खरें. " कांहीं कदीम सनद असेल ते हुजूर आणून दाखवावी त्याजवरून तहकीक होईल " ( राजवाडे १५।४ ).

**तहकीकात** ( स्त्री० ) [ अ० तह्कीकात् अनेक व० तह्कीक्चें ] चौकशी, सत्या-

न्वेषण. " धाकटे नाना व गोविन्द शिवराम तहकीकात करितां तो(=तोतया जनकोजी ) थोरात रघोजी असा ठराव झाला " ( खरे २।६३१ ). " सर्दहू गाष्टीची तहकीकात लाविली " ( राजवाडे १८।६० ). "शहरास कमवीसदार पाठऊन तहकीकात करावी " ( साने पयाव ११९).

**तहकुबी** ( स्त्री० ) [ अ० तवक्कुफ् ] थाम्बणूक; खण्ड.

**तहकूब; तकूब** ( पु० ) [ अ० तवक्कुफ् ] थाम्बवणूक; आडवणूक; थाम्बलेलें; ढकलणीवर टाकलेलें; तात्पुरतें बन्द; रहीत; रद्द. " ऐवजाची निकड लावली आहे; जर करितां रद्-बद्लीमुळें चार दिवस तकूब जालें तर उत्तम जालें " (राजवाडे ३।१६९ ). " हल्ला तकूब झाली " ( मराचिथोशा १६). "लढाई तहकूब करितों" (मराचिथोशा ५० ).

**तहखाना** ( पु० ) [ फा० तह्खाना ] तळघर. " कांहीं गोविन्दरायाचे तहखान्यांत लपाले " ( राजवाडे ६।६२९ ).

**तहागिरी** ( स्त्री० ) तगिरी पहा,

**तहत, तहद्** [ फ० ताहद्द ] सीमान्त; पर्यन्त. " पुढेंही श्री अहद् रामेश्वर तहद् दिल्ली यश देईल " ( पारसनीस –ब्रप २५३ ).

**तहनाळ** ( न० ) [ फा० तह्नाल् ] म्यान; म्यानाचें तोण्ड; म्यानाचे खालचे बाजूस बसविलेलें टोंपण.

**तहमूल** ( पु० ) **तहमुली** ( स्त्री० ) [ अ० तहम्मुल् ] सहन; सहिष्णुता; ढिलाई. "तुमचा वास्ता दर्म्यान आहे याजकरितां तामूल ( शामूल ! ) जाला नाहीतरी याचा तदारूक करणें लाजम आहे " ( राजवाडे २२।६१ ). " आपण सबुरी करून तहमूल करावयास तक्सीर केली नाहीं " ( इम ६७ ). " इतका प्रकार झाला तो...पाटीलबावाचे तहमुली धीमेपणा करिता जाला आहे" ( दिमरा १।१४५ ).

**तहवूर व जलादत-दस्तगाह** [ अ० तहव्वुर् धैर्य + अ० जलादत् = शौर्य ] धैर्य-शौर्य-न्धिी ( राजवाडे १२।१८८ ). "तहवर-दस्तगाह" (राजवाडे १८।५६ ).

**तहशील** ( स्त्री० ) [ अ० तह्सील् ] वसुली; मामलत; तालुका.

**तहशील-तलब** = जरूरी प्रमाणें पडेल तें (काम ) ( मराआ ३६ ).

**तहशील-दार** ( पु० ) [ फा० तह्सील्दार ] मामलेदार; एक मुल्की अधिकारी.

**तह-हयात** [ फा० ता-हयात् ] आयुष्य असें पर्यन्त; आजन्म.

**ताइफा** (पु०) [अ० ताइफा] जमाव; जात.

**ताइफेवार** जातवार. " मोहतर्फा बाब दुसरी । जाणोनि लिहिजे चतुरीं । ताइफेवार " ( मेस्तक-पुस्तकः जमेलेखन ६८ ).

**ताईत** ( पु० ) [ अ० तअवीझ ] दृष्ट लागूं नये म्हणून मन्तरलेला कागद आंत असलेली गळ्यांत बान्धण्याची सोन्याची डबी. गळ्यांतला ताईत = अत्यन्त प्रिय मनुष्य; नाकांतला बाल.

**ताकद; ताकत; ताकती** ( स्त्री० ) [ अ० ताकत् ] शक्ती; कुवत. "ताकती" ( इम ३३ ).

**ताकीद** ( स्त्री० ) [ अ० ताकीद् ] कडक हुकूम; बन्दोबस्त; मज्बुती; शिक्षा. " एक जरेचे आजार तुमचे तर्फेनें जाहलें ऐसे खबर मालूम जाहालिया

बवाजिबी ताकीद होईल " (राजवाडे १५।१५६ ).

**ताकीद्-दार** ( पु० ) रखवाली; संरक्षक. " सङ्गमनेरीं व कान्हेरीं रखवालीस कोणी बाणदार व ताकीद्दार पाठविले असले तर दोन्ही स्थलें मात्र जगतील" ( खरे १।३८८ ).

**ताकूब** ( पु० )[ अ० तअक्कुब्] पाठलाग. " आलीजाह बेदराहून निघोन गेले तेच समयीं इकडील सर्दारांनीं ताकूब करावयाचा तें न केलें " ( राजवाडे ५।१८१). " त्याचे ताकुबावर हरिपन्त फौजेसुद्धां घाटाखालें गेले " ( दिमरा १।३८ ).

**ताख्त** ( स्त्री० ) [ फा० ताख्त् ] मार-लूट; उध्वस्त. " फौज़ेनें एक दोन महाल ताख्त केले" ( दिमरा २।८३ ).

**ताख्त-ताराज़** ( पु० ) **ताख्त-ताराजी** ( स्त्री० ) [ फा० ताख्त्-ताराज् ] मार-लूट; नागावा; विध्वंस; उध्वस्त; फस्त. "गणेश पन्त बेहेरे...सुरतेकडे ताख्त -ताराजी करण्यास रवाना जाले " ( साने-पयाव ४७८ ). " बङ्गाल्याची ताख्त-ताराजी होणार नाहीं" ( दिमरा १।५२ ). "कित्येक ज़ागीं ठाणीं बसवून ताख्त-ताराजी माण्डली" ( राजवाडे ५।१८९ ). " या उपर बङ्गाला ताख्त-ताराज़ करण्यांत येईल" (दिमरा १।५० ). " तालुका लुटून ताख्त-ताराज़ झाला " ( राजवाडे ५।१९४ ).

**तागायत; तागाईत** [ फा० ता-घायत् ] पर्यन्त; पासून. " मिरजेहून निघाल्या-तागायत " ( खरे ८।३८५३ ).

**ताज़की** ( स्त्री० ) मोठेपणा. "तुम्ही व मन्सूरअली मिळोन इराणीस घेऊन येतां ही गोष्ट अनुचित; यांत कांहीं ताजकी होतां दिसत नाहीं" ( पाव ६ ).

**ताज़गी** ( स्त्री० ) [ फा० ताझगी ] ताजेपणा; टवटवी; उमेद; उत्साह. " दिवसेंदिवस येथील मनुष्य ताज़गी अधिक धरीत चाललें " ( खरे १।२३९ ).

**ताज़दी** ( स्त्री० )[ अ० तस्दीअ ] ज़ुलूम. "त्यानें जे जे गांव आबाद होते ते ताज़दीनें वैरान केले " ( राजवाडे २०।३८ ).

**ताज़-महाल** ( पु० ) [ फा० ताज् = मुगूट; अ० महल् = मन्दिर ] मुकुट-मन्दिर; आग्रा येथें शहाजहान बादशहानें बान्धलेली मुम्ताज़महाल बेगमेची समाधी.

**ताज़ा** [ फा० ताझा] नवा; न कोमेजलेला; हुशार.

**ताज़ा कलम** ( पु० )[ फा० ताझा कलम् ] पत्र सम्पल्यानन्तर खालीं जोडलेली पुस्ती.

**ताज़ा-तवाना** [ मराठी समास ] हृतश्रम; विश्रान्त; हुशार.

**ताजिया** ( पु० ) [ अ० तअझिया ] हसन-हुसेनांविषयीं शोकगीत; मर्शा; ताबूत, डोला.

**ताजी** [ अ० ताझी ] अरबी ( घोडा ).

**ताजीम** ( स्त्री० )[ अ० तअझीम् ] बहुमान; अभ्युत्थान; उत्थापन.

**ताजीम-तवाज़ू** ( स्त्री० )[ मराठी समास ] बहुमान व आदरसत्कार व वस्त्रें वगैरे अर्पण करणें. " त्यांस उभयतां रावसाहेबांनीं ताजीम-तवाज़ू देऊन मानपान केले होते " ( राजवाडे १०।२१३).

**ताज़ूब** ( पु० न० ) [ अ० तअज्जुब् ] आश्चर्य. "यावरून ताज़ूब होतो कीं(राजवाडे ७ खलप २८) "हुज़ूर वकील रवाना केला असतां सर्कार चाकर माने याचे

काबिले धरून नेऊन खलकास तस्दी देणें व भातें भरून नेणें हें ताज़ूब आहे" (राजवाडे १०।१२८). "लढाई करून प्रथम फत्ते जाली असतां येकायेकीं अशा तऱ्हेनें दगा जाला हें मोठें ताज़ूब" (राजवाडे ७।१३४).

**ताप्ता** [ फा० ताफ्ता ] एक प्रकारचें चमकणारें रेशमी वस्त्र.

**ताफा** (पु०) [ अ० ताइफा ] मण्डळी; टोळी. "रात्रीं कञ्चन्यांचे ताफे बोलाऊन नाच, रागरङ्ग, आतश्बाजी रोशनाई जाली" (राजवाडे ७।२२५).

**ताब** (स्त्री०) [ फा० ताब् ] बळ; शौर्य. "खानांनीं ताब लढाईची न आणितां (=हतवीर्य होऊन) माघारें हटून गढीचा आश्रा धरून आहे" (दिमरा १।२८८). "जेनराल मज्कूर ताब आणतां न सकतां राहेत (=वाटेंत) आपले हमराही सरन्जाम टाकीत ... गढीच्या आसरेस जाऊन पोहोंचला" (राजवाडे १०।१८७).

**ताबा** (पु०) [ अ० ताबिअ = अनुचर; परतन्त्र ] नियन्त्रण; कबजा; अम्मल.

**ताबीन** [ अ० ताबिईन् अनेकव० ताबिअ चें ] आज्ञेत; स्वाधीन; अङ्कित. "वगैरे मार निलेचे ताबिनांतील पथकें आहेत" (साने-पयाव ८३). "फौजेची पाहणी करून....त्याचे ताबीन लश्कर केलें" (चित्रगुप्त ९५). "तरी तुम्हीं त्याचे ताबैन असोन मस्लतीस मदती असणें" (राजवाडे १५।३६३). "तुम्हांस त्यांचे ताबीन करून पाठविलें आहे कांत ज्याप्रमाणें साङ्गतील त्या प्रमाणें करणें" (राजवाडे ६।६०३).

**ताबीनात** हुकमी; खर्डी. "ही नेहमी फौज् बरकराराची ताबीनात" (चित्रगुप्त १४).

**ताबूत** (पु०) [ अ० ताबूत् ] मृत ठेवण्याची पेटी; मोहरमांत मिरवावयाची इमाम् हुसैनच्या थडग्याची प्रतिमा; डोला; शवाची पेटी. "शहाजाद्याचा ताबूद व त्याचीं मुलें माणसें येथें पाठऊन देणें" (दिमरा १।२५१).

**ताबे** [ अ० ताबिअ ] आधीन. "याजवर जशी मर्जी. ताबे मर्जीच्या. विशेष काय लिहावें!" (राजवाडे ५।९१). "पादशाही बन्दोबस्त ज्याचे अख्त्यार त्याचे ताबे दक्षिण तालुका" (भा पयाव १८).

**ता-मग्दूर** = शक्य तोंवर; शक्त्यनुसार "आम्हीही सेवा चाकरी ता-मग्दूर करण्यास हाज़र" (राजवाडे ७।३७).

**तामील** (स्त्री०) [ अ० तामील ] अम्मल-बजावणी. "तुझ्या हुकमाची तामील करण्यांत माझ्याकडून समजून कसूर होणार नाहीं" (गडकरी राजसंन्यास ४५).

**तामूल** (पु०) [ अ० तअम्मुल ] विचार, दिरङ्ग. "तात्पर्य कीं शरिकांनीं फौज शामील करण्याविषईं तामुल करूं नये" (राजवाडे ७।९).

**तार-बतार** [ फा० तार्-तार् ] विकीर्ण, उध्वस्त. "फौजेवर हङ्गामा करून फौज तारबतार करावी" (राजवाडे ७।२१४).

**ताराज्** (पु०) [ फा० ताराज् ] मार-लूट उध्वस्त. "पुढें मुलूख राहिला, तोही ताराज़ करून मोगल अन्नास महाग होत ऐसेंच केलें जाईल" (इम २००). "मुलूख कुल् मारून ताराज् करितों" (इम २०१).

**ताराजी** (स्त्री०) [फा० ताराज्] मार-लूट; विध्वंस; खराबी. " त्या संस्थानची ताराजी केली " ( चित्रगुप्त ८ ). " रुद्र-वरम् येथें जमियत पोहोंचून ताराजी माण्डिली " ( राजवाडे ५।१२२ ).

**तारीख; तेरीख** ( स्त्री० ) [फा० तारीख्] मिती; इतिहास.

**तारस-खाना; तारत-खाना** [ ∠ अ० तहारत् शुद्धी ] पायखाना; सण्डास; शौचकूप.

**तारीफ** ( स्त्री० )[ अ० तअरीफ् ] वर्णन; बयान; प्रशंसा; परिचय करून देणें. " लढाई बहुत तारफेची झाली " ( मराचिथोशा २२. ) " अङ्ग्रेज़ मैत्रकीस बहुतच उत्तम; याची तारीफ काय लिहावी ! " ( राजवाडे १२।१२७ ).

**तारीफ-दार** = प्रशंसनीय. " तम्बुरे... बहुत चाङ्गले तारीफ-दार पाठवावे " ( ऐकिप्र २।६२ ).

**तारीफ-लायक**= प्रशंसनीय. " परन्तु तारीफ लायक चित्रें मेळवून पाठवावीं म्हणून पत्रीं आज्ञा " ( ऐटि १।१३ ).

**तारोतार** [ फा० तार् पासून तन्तोतन्त च्या धर्तीवर ] बरोबर. " वांई देशांतील गांव निम्मे निम्मे तारोतार व इमाफती व इनाम तारोतार निम्मे वांटून दिले असे " ( राजवाडे ३।६५ ).

**तालीक** ( स्त्री० ) [ अ० तअलीका=परिशिष्ट ] नक्कल; सम्बन्ध. " तुम्ही तालीक लेहून घेऊन अस्सली खुद खत मशार्निल्हेपासीं फिरावून देणें " ( राज-८।१६ ). " महादाजीस देशमुखीस मसुरीचे तालीक नाही " ( राजवाडे १५।१०० ). " त्याचीं उत्तरेंही आलीं; त्यांच्या तालका करून वडिलांकडे पाठविल्या आहेत " ( खरे ११। ६०४५ ).

**तालीकचा** ( पु० ) आज्ञापत्र. " लष्टोस अब्दाल्याचा तालीकचा आला " ( राजवाडे ६।४४५ ).

**तालीम** ( स्त्री० ) [ अ० तअलीम् ] अध्यापन; शिकवणूक; व्यायाम शिक्षण; व्यायाम; व्यायामशाला.

**तालीम-खाना** ( पु० ) व्यायामशाला.

**तालीम-बाज**=आखाड्यांत व्यायाम करणारा.

**तालीम-बाजी** ( स्त्री० ) आखाड्यांतील व्यायामाचा शोक.

**तालुका** ( पु० ) [ अ० तअल्लुका ] जिल्ह्याचा भाग, सम्बन्ध. " मुतालिकीचे वंशाचा वतनास तालोखा नाहीं " ( राजवाडे ३।११७ ).

**तालूक** ( पु० ) [ अ० तअल्लुक् ] सम्बन्ध. " या अहद्-नाम्यासीं या शब्दाचा तालूक काय आहे "(राजवाडे ७।९२).

**तालूक-दार** ( पु० ) [ फा० तअल्लुक्दार् ] तालुक्याचा अधिकारी; जमीनदार.

**तालूकात** ( स्त्री० ) [ अ० तअल्लुकात् ] सम्बन्ध. " दर्म्यान त्यांचे तालूकातीचें कलम तहनाम्यांत ल्यावयाचें कारण काय ? "( राजवाडे १९।३० ).

**ताले** ( पु० अनेक व० ) [ अ० तालिअ ) दैव; ग्रह. " रावसाहेबांचे ताळे बुलन्द ( = उच्च ) म्हणोनच ते बाजी सर केली " ( राजवाडे १।५२ ). त्यांचें थोरपण व दुरन्देशी बहुत व तालेही मोटे " ( ऐटि ३।१५ ). " दौलतराव बाबा यांचे ताले विचित्र आहेत " ( खरे १२।६८१७).

**तालेवार** [ फा० तालिअवर् ] दैववान्, भाग्यशाली. " सुगर दिसे त्यामधें थेट

जणूं रम्भा वंशाची तालिवार कुबेर पैशांची " ( प्रभाकर २३१ ).

**तालेवारी** ( स्त्री० ) [ फा० तालिअवरी ] सुदैव; उत्कर्ष; चढती कमान.

**ताव** ( पु० ) [ फा० ताब् ] दुक्ख; राग; पीळ. " दौलत खराबीस आली म्हणून तावाच्या गोष्टी बोलतो. " ( खरे ७।४७१ ). मिशांवर ताव देणें=मिशांना पीळ देणें; मर्दुमकीची प्रौढी मिरविणें.

**तावातावानें** = रागाच्या भरांत.

**तावण** ( स्त्री० ) [ फा० तावान् ] दण्ड; जुर्माना; भुर्दण्ड; नुक्सानभरपाई.

**तावणें** [ ∠फा० ताब्=उष्णता ] तापविणें; रागावणें

**ताब्दान** ( न० ) [ फा० ताब्दान् ] खिडकीच्या दाराची काच; काच-फळी. " तावदानें चाङ्गलीं साफ; ज्यांत मन्द दिसत असेल तीं न घेणें; साफ असतील तीं घेणें " ( राजवाडे १२।१३२ ).

**तास** ( पु० ) [ अ० तास् ] वाजविण्याचा पेला अगर काशाचा वाटोळा पत्रा; २॥ घटिकांचा अवधी.

**तासची** ( पु० ) तास वाजविणारा ( वाड समा २।३ ).

**तासा; ताशा** ( पु० ) [ अ० तासा ] लहान नगारा.

**ताशेकरी** ( पु० ) ताशा वाजविणारा.

**ता-हाल** [ फा० ता-हाल् ] आजपर्यन्त; अद्यापि. "लेकीन अहद-पैमानावर नज़र देऊन ताहाल हा ख्याल दिलांत न आणिला" ( खरे ७।३५७५ ). "नबाब निजामअल्लीखां व भोंसले ताहाल खामोश याचा सबब काय न कळे" ( राजवाडे १०।१८२ ).

**ताहूद** ( न० ) [ अ० तअह्हुद् ] ठराव; खण्ड; मक्ता. " कादरखान याजकडे तालुका काडोपली दहा लक्ष रुपये ताहूद ठरून साङ्गितला " ( राजवाडे ७।४० ). " तेथील ताहुदांपैकीं सर्व हसे-बन्दी आपण लिहून पाठविली " (राजवाडे ११।२६ ). " तालुक्यावर ताहूद केलें तें मोडावें आणि अमानी करावी" ( राजवाडे ५।२३ ).

**तिज़ारत** ( स्त्री० ) [ अ० तिजारत् ] व्यापार. " तीन ज़हाज़ आपले विला-यतेहून बराय तिज़ारत गेले होते " ( पद्मव ११३ ).

**तिरन्दाज़** ( पु० ) [ फा० तीर्-अन्दाज़् ] बाण मारणारा.

**तिरन्दाजी** ( स्त्री० ) [ फा० तीर्-अन्दाज़ी ] बाण मारण्याची विद्या; धनुर्वेद.

**तिस्सा** [ अ० तिस्अ ] नऊ.

**तिस्सैन** [ अ० तिस्ईन् ] नव्वद.

**तीर** ( पु० ) [ फा० तीर् ] बाण.

**तीर-कमठा** ( पु० ) धनुष्यबाण.

**तुक्का** ( पु० ) [ फा० तुक्का ] तोण्डाशी पात्याऐवजीं गोळा असलेला बोथट बाण.

**तुक्मा** ( पु० ) [ फा० तुक्मा ] बिरडें; गुण्डी; बटन.

**तुणतुणें** ( न० ) [ ? अ० तन्तना एक प्रकारचें गीत ] तुंई तुंई असा आवाज़ करणारें एक एकतारी तन्तु-वाद्य.

**तुती; तूत** ( स्त्री० ) [ अ० तूत् ] एकप्रकारचें झाड.

**तुन्द** [ फा० तुन्द् ] अभिमानी; ऐटदार. " गोरी तुन्द मान हिल्लाल गुलाबी गाल " ( प्रभाकर ११७ ).

**तुफान** ( न० ) [ अ० तूफान् ] समुद्र-क्षोभ; वादळ; त्रागा; बालण्ट; कुभाण्ड. "तुफान घेऊन कोणी बोलूं लागला तेंच मनावर घेणें असें होऊं लागलें तर भरंवसा काय मानावा ?" ( राजवाडे ५।१६ )." अशा तुफानाच्या गोष्टी अदावतीनें कोणी साङ्गितल्या " ( राजवाडे ५।७४ ). "त्यानें अदावतानें दर्म्यान तुफान रचून पत्रें तयार केलीं" ( राजवाडे ७।९९ ).

**तुफान-खोर** कुभाण्ड रचणारा. "तुफान-खोर मनुष्याचे सङ्गतीस लागूं नये" ( ऐस्फुले २।५३ ).

**तुफानी** [ अ० तूफानी ] कुभाण्डखोर; क्षुब्ध; दङ्गेखोर. " भिल्ल कोळी रामोशी वगैरे तुफानी जातीतले लोक" ( गांवगाडा ५६१ ).

**तुम्बा** ( पु० ) **तुमान** ( स्त्री० ) [ फा० तुम्बान् ] चोळणा; विजार; सैल पायजमा. "किनखापी तुम्बे" ( चित्रगुप्त १३२ )

**तुमार** ( पु० ) [ अ० तूमार् ] कागदाचें भेण्डोळें; लेखी कागद.

**तुर्बत, तुर्बती** ( स्त्री० ) [ अ० तुर्बत् ] थडगें; समाधी. "आणि त्यावरी तुर्बती बान्धली" ( राजवाडे १५।७ ).

**तुरन्ज़** ( न० ) [ फा० तुरञ्ज् ] नारिङ्ग.

**तुरा** ( पु० ) [ अ० तुर्रा =झिळमिळणारे पुढचे केस ] एक अलङ्कार.

**तुरुङ्ग** ( पु० ) [फा० तुरुङ्ग् ] कैदखाना.

**तुरूक** [ तु० तुर्क् ] तुर्क.

**तूत** ( न० ) [ अ०तूत् ] तुतीच्या झाडाचें फळ.

**तूल** [ अ० तूल् ] लाम्बवणूक. "थोडकियांत बन्दोबस्त असतां तूल करून खिसारा वाढवावा हें सलाह नाहीं" ( राजवाडे ५।१९८ ).

**तेगा** ( पु० ) [ फा० तेघा=तर्वारीची पात ] रुन्द पातीची तर्वार.

**तेज** [ फा० तेझ् ] तीक्ष्ण; तिखट; चलाख.

**तेजाब** ( पु० ) [ फा० तेझाब् ] एक दाहक आम्ल.

**तैन** [ अ० तअय्युन् ] नियुक्त; नामजाद. "वरघाट व पायाघाट कबज् करायाबद्दल पादशाही फौजा तैन जाहल्या ( वाड-सनदा ३१ ).

**तैनात** ( स्त्री० ) [ अ० तईनात अ० तअयीनात् ] नेमणूक; सेवा; नोकरी; पगार; स्वाधीन."चार पागा त्या बाईच्या तैनात केल्या आहेत" ( मद्बा १७७ ).

**तैनाळ** नहनाळ पहा.

**तैश** ( पु० ) [ अ० तैश् ] आवेश; त्वेष.

**तोक-ज़ञ्जीर** [ अ० तौक् गळ-सांखळी; फा० झञ्जीर् शृङ्खला ] शृङ्खलाबन्धन. " धरून नेऊन तोक-ज़ञ्जीर करून कैद केले" ( राजवाडे ५।१२४ ).

**तोदा** ( पु० ) [ फा० तोदा ] लक्ष्य; सन्धानबिन्दू; निशाण.

**तोफ** ( स्त्री० ) [ तु० तोप् ] अवजड बन्दूक.

**तोफची** ( पु० ) [ तु० तोप्ची ] तोफखान्यावरील अम्मलदार; गोलन्दाज़.

**तोफजी** ( स्त्री० ) गोलन्दाजी. " बर्कन्दाजी व तोफजी फिरङ्गी याची निस्सीम म्हणाशी तैसी" ( पारसनीस-ब्रप ७७ ).

**तोफ-खाना** ( पु० ) तोफांचा समुदाय; तोफा ठेवण्याची जागा.

**तोफा** ( पु० ) [ अ० तुह्फा ] उत्कृष्ट; फर्मास. "त्या प्रान्तीं चन्दन बहुत

तोफा व चाङ्गले उन्च मिळतात ( राजवाडे १९।९३ ). "कस्तुरीचे नाफे व बिलङ्गिचे तोफे पाठविले" ( पद्मव ९७ ).

**तोफा-तायफ** ( पु० ) [ अ० तुह्फा = भेट; नजर अनेक व० तहाइफ् ] नजर-नज़राणा. "तोफा-तायफ नज़र केला" ( दिमरा २।८० ). "तोफा-तायेफ" ( दिमरा १।२१६ ). "इङ्ग्रेज् शिवाय तोफा-ताहफ, सव्वीस लक्ष रुपये दर्साल देत होते" ( दिमरा १।१०४ ). "पातशाहांस कांहीं तोफा-ताहफ पेश्कस यावयाविसीं काय आज्ञा ?" ( दिमरा १।२१६ ).

**तोफीर** ( पु० ) [ अ० तव्फ़ीर् ] वाढावा.

**तोफे-ज़ात** ( न० ) [ अ० तुह्फ़ज़ात ] नज़राणा. "याचप्रमाणें तोफज़ात बरोबर नजर नबाब वजीरखान मोसूफचें स्वाधीन केले" ( पद्मव ११८ ).

**तोब्रा, तोबरा** ( पु० ) [ फा० तोब्रा ] घोड्यास चन्दी चारतांना ती ज्या कातडी पिशवींत घालून त्याच्या तोण्डास बान्धतात ती पिशवी.

**तोबा** ( पु० ) [ फा० तोबा अ० तौबा ] पश्चात्ताप; दुःख; ओरड; गर्दी; हाय ! हाय ! "त्याचे लश्करांत वैरणीचा व पाण्याचा तोबा बहुत" ( खरे ९।४७४१ ). "बहु हाय हाय ! म्हणती, प्राकृत बुध 'हन्त हा !' यवन तोबा !" ( मोरोपन्त )

**तोरा** ( पु० ) [ तु० तोरा ] हुकूम. "याजकरितां एक तोरा यावा म्हणजे त्याचे हुकुमांत क्रम चालेल" ( राजवाडे ५।१०२ ).

**तोश** ( स्त्री० ) [ फा० तोश् ] बळ. "शत्रू तोशीनें जोरीनें चालोन येत आहे" ( खरे ७।३५८९ ).

**तोशेखाना; तोशखाना** ( पु० ) [ फा० तोशा-खाना ] कोठार; अम्बारखाना; जामदारखाना. "तोशेखाना पाहिला त्यांत साडेसातशें रुपये नगद आणि कांहीं पोशाख होते" ( राजवाडे ५।१४० ).

**तोशक** ( स्त्री० ) [ फा० तूशक् ] बस्करणें; अन्थरूण.

**तोशीस** ( स्त्री० ) [ अ० तश्वीश् ] अस्वास्थ; त्रास; नुक्सान; झीज.

**तोस्तान** ( न० ) [ फा० तोशा-दान् ] सामुग्री ( दारूगोळी वगैरे ) ठेवण्याची पिशवी.

**तोल-दार** [ सं० तोल फा० दार् ] वज़न्दार; प्रतिष्ठित; बलाढ्य; मज़्बूत. "तोलदार" गड, "तोलदार फोज."

**तोल-दारी** ( स्त्री० ) वज़न्दारी; बळ; मज़्बुती; प्रतिष्ठा. "हे निजामशाही वजीर दौलता करून तोलदारीनें होते" ( सभासद ३ ). "पागांच्या तोलदारीखालीं शिलेदार ठेविले" ( सभासद २२ ).

**तोहमत** ( स्त्री० ) [ अ० तुह्मत् ] संशय; वहीम; आळ; आरोप; बालण्ट.

**तोहमती** संशयी; वहिमी; बालण्टखोर.

**तौर; तोर** ( पु० ) [ अ० तौर् ] रीत; राहणी. "गाडर इङ्ग्रेज् यांणीं हिन्दुस्थानांत जागां जागां लडाया केल्या त्याच तौरानें इकडे मर्दुमी दाखवावयास आला" ( साने-पयाव १०५ ). "खुदातर्सी फकिरी तौरानें राहतात" ( राजवाडे ७।६३ ). "श्रीमन्त उम्दे अमिराची तोर व रीतभात राखतात" ( साने-पयाव ११५ ).

## द्

**द्वा** ( पु० ) दुवा ( राजवाडे १५।१३९ ).

**द्वागीर** हितेच्छू; हिताস্तव ईश्वर प्रार्थना करणारा. "ऐसेच हरघडी खत–किताबत पाठवून फकिराचे खबर घेत असले पाहिजे; आम्ही द्वागीर असों" ( पारसनीस–ब्रप ३०७ ).

**द्वाही; दोही** (स्त्री०) शपथपूर्वक अडथळा. "बहिर्जीनें आपलें घर शेकारिलें त्यास मल्हारजीनें द्वाही दिली" ( राजवाडे ६।८ )."दोही दिली" (राजवाडे ६।११६)

**दखल** ( पु० ) [ अ० दख्ल् ] प्रवेश; ढवळाढवळ; ताबा; उत्पन्न; रुजू; ताब्यांत; समाविष्ट; श्रुत; माहीत. "लढाई न होतां किल्ल्यांत दखल झाला" (राजवाडे ८।६२). "एकदों रोजांत किल्लेदारीची दखल घेऊन" ( राजवाडे १०।३४२). "कुल राज्य आपलें; देखील कर्नाटकही आपणांस सर्व दखल आहे" ( चित्रगुप्त १२० ). "कोणी चोरून ठेविलिया आणि सर्दारास दखल जाहलिया त्यास शिक्षा करावी" ( चित्रगुप्त ३७ ). "राजबीज खरें हें राजश्री उपाध्याय व आपा प्रतिनिधी व चिम्णा महादेव आदिकरून सर्वांस दखल आहे" ( राजवाडे ८।१९८ ).

**दखल–बाज्**–दाखल केल्यानन्तर नमूद; दाखल. "त्या पैकीं मजुरा द्यावयाचे करार केले तें दखल–बाज् बार केले असेत" ( वाडसमा १।१७५ ).

**दखलिगिरी** ( स्त्री० ) ढवळाढवळ; माहिती; उत्पन्न. "बापाजी मुसलमान यासी दखलिगिरी करावयास गरज नाहीं" ( राजवाडे १५।२९ ). "याप्रमाणें वर्तमान कच्चें स्वामीस दखलिगिरी असावी म्हणोन लिहिलें असें" ( राजवाडे १।१२९ ). "तुम्हास कांहींच पर्गणे यांत दखलिगिरी न जाली" ( राजवाडे १।२३१ ).

**दग्दगा** ( पु० ) [ अ० दघ्दघा ] भीती; दङ्गा; आजार."याजमुळें इतर दौलतदार वगैरे पावून स्वस्थता; कोणाचा दग्दगा बाळगावयाचें कारण नाहीं" ( राजवाडे ५।१७० ). "मुल्ला हुसैन पेटेकर हर एक चावें गांवांत दग्दगा देतो म्हणून तर्त्तीले कलमी केलें तें अयां जाहलें" ( पारसनीस–ब्रप २३८ )

**दगलबाज्** [ फा० दघल्बाझ् ] फसव्या; कपटी; दगेखोर.

**दगलबाजी** ( स्त्री० ) [ फा० दघल्बाझी ] दगेखोरी; कपट; कापट्य.

**दगा** ( पु० ) [ फा० दघा ] फसवणूक; घात; धोका; अपाय. "तराण्डियांतले लोकांस सर्वथा दगा होऊं देऊं नये, आपणांस राखून गनीम घ्यावा" ( मराभ्रा ३८ ). दगा खाणें=फसणें. दगा देणें–करणें= फसविणें; घात करणें.

**दगाई** [ फा० दघाई ] दगेखोर. "पाचपन्नास दगाई होते ते काढून दिले" ( होके ११६ ).

**दगावणें** = धोक्यांत सांपडून मरण पावणें.

**दगेखोर** [ मराठी प्रयोग ] दगेबाज. "शिवाजी मोठा दगेखोर आहे" ( सभासद २९ ).

**दगेखोरी** ( स्त्री० ) दगलबाजी.

**दगेबाज्; दगाबाज्** [ फा० दघाबाझ् ] कपटी.

**दगेबाजी; दगाबाजी** ( स्त्री० ) [ फा० दघाबाझी ] कापट्य.

**दङ्ग** [ फा० दङ्ग् ] विस्मित; चकित; दिङ्मूढ; हतबुद्ध; निमग्न; गर्क. "तोण्डांत हाताची अङ्गुली घालून दङ्ग जहाला",

( चित्रगुप्त ४५ ). "घरच्याच कार्भारांत राजश्री स्वामी दङ्ग आहेत. त्यांहीं होऊन आम्हांस निरोप द्यावा तर आपले कार्भारांत गिरिफ्दार !" ( साने पयाव ६४ )

**दङ्गल** ( पु० स्त्री० ) [ फा० दङ्गल् ] जमाव; गर्दी; कल्होळ; कुस्त्यांचा फड.

**दप्तर** ( न० ) [ अ० दफ्तर् ] फडक्यांत बान्धलेला लेखी कागदांचा गठ्ठा; मुलांची पाटीबुकें ठेवण्याची पिशवी; कचेरी.

**दप्तर्दार** ( पु० ) [ फा० दफ्तर्दार् ] कागद्पत्रांची काळजी घेणारा अधिकारी.

**दप्तरी** ( पु० ) [ फा० दफ्तरी ] दप्तर्दार.

**दप्तर्बन्द** ( पु० ) [ फा० दफ्तर्बन्द् ] कागद् पत्रं जुळवून व्यवस्थेनें ठेवणारा; जुळवून व्यवस्थेनें ठेवलेलें.

**दफन** ( न० ) [ अ० दफन् ] पुरणी; मूठमाती; पुरलेलें.

**दफनणें** पुरणें. "दफनावयास" ( मराठी थोशा ६५ ). "अफझलखानाकडील मूडधे दफणाऊन टाकावे" ( ऐस्फुले ७२ ).

**दफा** ( स्त्री० ) [ अ० दफआ=वेळ ] कलम. "इङ्ग्रजानीं सात दफेची या(द)–दाश्त पाठविली" ( राजवाडे ७१३ ).

**दफातें** ( न० ) [ ∠अ० दफआत्] स्मरणवही; घडलेल्या गोष्टींचें टांचण ( पाच ४९ ).

**दफिना** ( पु० ) [ अ० दफीना ] कुणगा; पुरलेलें धन.

**दफे** [ अ० दफअ ] प्रतिकार; हटवणूक. "तोही वेढा राणोजी घोरपड्याचा मारून काढून दूर दफे केला" ( राजवाडे १५।१९ ).

**दफेदार** ( पु० ) [ फा० दफअ–दार् ] रिसाल्यांतला हलक्या दर्जाचा अधिकारी; सपेटेवाला.

**दफे–रफे** ( स्त्री० ) [ अ० दफअ–रफअ ] फडशा; व्यवस्था.

**दब्दबा** ( पु० ) [ अ० दब्दबा ] वैभव; दरारा. "या दब्दब्यानें मुकालेकाचे हावास ( हवस=महत्वाकांक्षा ) निघोन जावे" ( खरे ८।४३५४ ).

**दबीर** ( पु० ) [ अ० दबीर् ] राज–चिटणीस; डबीर.

**दम** ( पु० ) [ फा० दम् ] श्वास; जोर, ताकद्; विश्रान्ती; अवकाश. दम खाणें–धरणें–मारणें = विश्रान्ती घेणें; थाम्बणें. दम छाटणें = दम कोण्डणें, दम देणें–भरणें = फसविणें; धमकावणें. दम लागणें = थकल्यामुळें श्वासोच्छवास कठिण व जोरानें होणें.

**दमास येणें** =थकणें.

**दम–दिलासा** ( पु० ) धीर–समाधान ( वाडसमा २।२३० ).

**दमानें** सावकाश; आस्ते आस्ते.

**दम्दार** लवकर न थकणारा; जोर्दार, उत्साही.

**दम्दमा**: धम्धमा ( पु० ) [ फा० दम्दमा ] नौबत; नगारा; तोफा ज्या उच्चवट्यावर चढवितात तो; टप्पा–गुजरा.

**दम्सर्द** नामोहरम; थण्ड. "अमर्यादकांस शासनें करून, त्यांचा संहार करून दम–सर्द केलें; राज्य शर्थीनें राखिलें" ( राजवाडे ८।१२५ ).

**दमणें** थकणें.

**दमाविणें** थकविणें.

**दमा** ( पु० ) [ फा० दमा ] श्वासरोग.

**दमान** ( न० ) [ फा० दामन् ] शीड.

**दमामा** ( पु० ) [ फा० दमामा ] लहान नगारा.

**दमेकरी** श्वासरोगी.

**दर** [ फा० दर् = आंत, हर् = प्रत्येक ] प्रत्येक. " दर हर साल खुर्दखताचा उजूर न कीजे " ( राजवाडे २०१९ ).

**दर्कार** ( पु० स्त्री० ) [ फा० दर्कार्=उपयुक्त, जरूर ] जरूरी; गरज; प्रयोजन; सम्बन्ध. " पुस्तकाची जरूर दर्कार आहे " ( राजवाडे १।६८ ). " मखमलीचा दर्कार आहे (राजवाडे ३।२६९). उद्यां येथें रहावयास दर्कार नाहीं " ( पाब १९ ). " आम्हांस राजकारणांशी दर्कार नाहीं" ( राजवाडे ५।११६ ). " आम्हांस माणसें ठेवायाची प्रस्तुत दर्कार नाहीं " ( मद्बा १।४१ ). " अब्रूचा प्रामाणिकतेचा दर्कार त्यांनीं ( = अन्ताजी माणकेश्वर यांनीं ) टाकिलासें दिसतें " ( साने-पयाव ३१० ).

**दर्किनार** [ फा० दर्किनार् ] बाजूस; एकीकडे. " ते सर्व दर्किनार राहून मार्शन साहेबच बाजीगार होऊन बेअदबी करूं लागले" (खरे ७।३५६७).

**दर्कूच** कूच दर कूच; मजला मागीत मारीत. " त्याजउपरी दर्कूच महादेवपर्यन्त जातों" (चन्द्रचूड-दप्तर ५।१०७ ).

**दर्खास्त** ( स्त्री० ) [ फा० दर्खास्त् ] मागणी; मागणीअर्ज; फिर्याद.

**दर्गा** ( पु० ) [ फा० दर्गाह् ] राजसभामण्डप; दर्बार; मशीद; साधुसमाधिस्थान. " पेश अजी दर्गाह " ( इम ६५ ) = या दर्बारापुढें. " दर्गाह्-बन्दगीस " ( इम ६७ ) = हुजूरास; स्वामीस.

**दर्गाह** [ फा० हर्गाह् ] केव्हांही; हर्गिज्. "तुम्हीं मौजे मज्कूरचे वाटेस दर्गाह न जाणें " ( राजवाडे ११।३६ ). " त्याणें आमचे ( =ब्रह्मेन्द्रस्वामींचे ) दर्गास...तिनी गांव दरोबस्त देऊन चालवीत होते " ( पारसनीस-ब्रप २९६ ).

**दर्गुजर** ( स्त्री० ) [ फा० दर्गुज़र् आज्ञार्थी रूप दर्गुज़श्तन् ( = सोडणें, क्षमा करणें) याचें ] दुर्लक्ष्य; क्षमा. " जरी तुम्ही हे गोष्टी चश्म-पोशी करून दर्गुजर कराल तरी जिकडे वाजवी तिकडे परमेश्वर आहे" ( ऐटि ६० ). " दर्गुदर करावी तर शहर बे-बदल जहालें हें लोकिकांत, तेव्हां खावन्दगिरीस उचीत तें जालेंच पाहिजे " ( साने-पयाव १२० ).

**दर्जबाब** ( पु० ) [ फा० दर्जवाब् = उत्तरीं ] उत्तर. " त्याचा दर्जबाब-कलकत्तेकर यांनीं निगारश केला " ( राजवाडे १०।१६४ ). "श्रीमन्त यांचे दर्जबाब आले ते गद्रकर फडणीस यांजकड हजर आहेत" (खरे ८।४२०३).

**दर्जा** ( पु० ) [ अ० दरजा ] पायरी; पदवी; योग्यता; मुद्दा; गोष्ट. " येथें सर्व दर्जे बोलण्यांत येतील " ( राजवाडे ५।७७ ). " हे सर्व मरातब व दर्जे नवाब बहादुर यांचे ध्यानांत आहेत " ( राजवाडे १९।९१ ).

**दर्जाब** ( पु० ) दर्जबाब. " वकिलानें अर्जीचा दर्जाब व नजरची पावती व मेहेरबानगीचा खिलत द्यावा म्हणून सवाल केला आहे" ( दिमरा १।१७३).

**दर्जाब-नामा** ( पु० ) उत्तर-पत्र ( दिमरा २।९१ ).

**दर्जी** ( पु० ) [ फा० दर्ज़ी ] शिम्पी.

**दर्द; दरद** ( स्त्री० ) [ फा० दर्द् ] दुःख; खन्त; कींव; मर्म. " उजवे कुशीस पाठींत वायूचा दर्द भारी " ( राज-

वाडे ७।१०७ ). "आमची दर्द येणें तर त्यांस येईल; आम्हांस संसारानिर्वाहाचें सङ्कट प्राप्त जाहलें. ...या गोष्टीची दर्द श्रीमन्त रावसाहेबीं मनांत आणून ये गोष्टीचा विचार न केला तर ज्या गोष्टी मातबरीच्या आजपर्यंत चालल्या त्या तर सुटत नाहींत." ( खरे ८०८). "दर्म्यान दर्द जाणता" ( चित्रगुप्त ८ ). "पैक्यापुढें कोणाचा स्नेह भीड मुर्वत नाहीं; त्यांस दर्द कोणाची वाटत नाहीं" ( खरे ११।६१७२ ). "हाव भाव तुजमधें बहुत भरल्या इश्की दर्दा। विषयी पुरुषांचा तिथेंच मुर्दा" ( प्रभाकर २३० ).

**दर्दी** ( पु० ) [ ∠फा० दर्द् ] तज्ज्ञ; रहस्य जाणता. "आम्ही तर दर्दी इश्काचे भुकेले प्राणी। शेवट कर सखे तूं आहेस गुणाची खाणी" ( प्रभाकर १६४ ).

**दर्पेश** [ फा० दर्पेश् ] पुढें "मुलाजमतीचा मज्कूर दर्पेश केला" ( राजवाडे १। १८७ ).

**दर्बार** ( पु० ) [ फा० दर्बार् ] राजसभा.

**दर्बार-खर्च** ( पु० ) "गांवचे हिशेब सर्कारांत पटविण्यासाठीं तेथील हिशेबनिसाला लांच द्यावा लागे त्याला दर्बार-खर्च कार्कुनी किंवा अन्तस्थ म्हणत" ( गांवगाडा ५६ ).

**दर्बारी** राजसभासम्बन्धी; राजसभेचा घटक; वैभवसम्पन्न; विशेष शिष्टाचारास अनुसरून असें

**दर्मजल** कूच-दर-कूच; सारख्या मजला मारीत. "श्रीमन्त . सुरापुराची खण्डणी चुकऊन दर्मजल कर्नाटकांत जाणार" ( चन्द्रचूड-दप्तर १।१०८ ).

**दर्महा** ( पु० ) [ फा० दर्माह् =महिन्यांत ] प्रत्येक महिन्यास; माहीना; पगार. "दहा पल्टणें इङ्ग्रजी मुम्बईहून आणविलीं आहेत; त्यांत निमे पल्टणाचा दर्महा निजामअलीखान यांणीं द्यावा असें करारांत नबाबासी आहे" ( खरे ८। ४११९ ). "कांहीं दिवस दर्महा हलका करून देऊन" ( मराचिथोशा ५२ ).

**दर्म्यान** ( पु० ) [ फा० दर्मियान् ] मध्यें; मध्यस्थ; जबाबदार. "पादशाही बन्दा, त्यास पादशहा सर्फराजी करितील. तुम्ही त्याचे दर्म्यान नाहीं" ( सभासद ४२ ). "दर्म्यानांनीं प्रथम भेटी घेऊन नन्तर महाराजांनीं भेटावें" (चित्रगुप्त ११०). दर्म्यान येणें=मध्यस्थी करणें ( सभासद १० ).

**दर्म्यानकी** ( स्त्री० ) मध्यस्थी. "दर्म्यानकी बाळाजी शेटे वगैरे मण्डळी करीत आहेत" ( खरे १०।५२९६ ).

**दर्म्यान-गिरी** ( स्त्री० ) मध्यस्थी. "ते आमचे सेवक ... त्यांची दर्म्यानगिरी तुम्हांकडे नाहीं" ( चित्रगुप्त ६९ ).

**दर्म्यान्दार** ( पु० ) मध्यस्थ. "दर्म्यान्दाराकडील लबाडी असेल; विचारानें घ्यावें" ( खरे १०।५६१० ).

**दर्या; दरिया** ( पु० ) [ फा० दर्या ] समुद्र.

**दर्या-गर्क** समुद्रांत पाण्याखालीं गेलेली. "दर्यागर्क खाजणी जमिनीस बान्धबन्दिस्त करून नूतन शेत होय" ( वाड-समा २।२४३ ). "बहुत तराण्डीं दर्यागरक जालीं म्हणोन बातमी आली आहे" ( खरे १२। ६८४२ ).

**दर्याई** [ फा० दर्याई ] समुद्रावरील. "दर्याई व खुश्की फौजा."

**दर्याप्त; दर्याप्ती** ( स्त्री० ) [ फा० दर्याफ्त् ] समजणूक; आकलन. **दर्याप्त करणें= समजणें, आकलन करणें.**

**दर्यांवर्दी** ( पु० ) [ फा० दर्या–नवर्द+ई ] खलाशी; नावाडी; खारवा.

**दर्वक्त** [ फा० हर्वक्त् ] नेहमी. " मौजे केळगांव यास दर्वक मुजाहीम काय सबब होत असतां ? " ( राजवाडे ११।३६ ).

**दर्वाजा** ( पु० ) [ फा० दर्वाज़ा ] द्वार; महाद्वार.

**दर्वान; दर्वानकरी** ( पु० ) [फा० दर्वान्] द्वारपाल; द्वाररक्षक. " शहरचे दर्वानकरी यांनीं राजाजीस मनाई केली कीं नवाबाची परवानगी आल्याशिवाय जाऊं नये " ( राजवाडे ५।१४१ ). "दर्वाणकर " ( होके ४२ ).

**दर्वेश; दर्वेशी** ( पु० ) [ फा० दर्वेश् ] फकीर.

**दर्वेशी** ( स्त्री० ) [ फा० दर्वेशी ] फकिरी.

**दर्सदे** शम्भरीं; दर–शेंकडा. " येथें हुंड्यांवर दर्सदे रुपये ३॥ प्रमाणें पुण्याशिक्क्यास भाव आहे " ( मदबा २।५३ ).

**दरक** ( पु० ) [ अ० दर्क् ] विचार. " उगीच नादीं लाऊन ठेवावें असा इतर सर्दारांचा दरक " ( खरे ११७८ ).

**दरज; दरद** ( स्त्री० ) [फा० दर्ज़् ] शिवण; चीर; भेग; फूट; बान्धा. " घरांत कोठें उन्दीर, विन्चू, किडा, मुङ्गी राही अशी दरद न ठेवावी " ( मराआ३४). " उभयतांही फजीत पावून निखालस जाहले, तेव्हां दरज नाही असें वाटतें आणि दरजही राहिली नाहीं " ( खरे ७।३२९७ ). " तुम्हांकडील उगें पडावें असें बहुतांचे मतें आहे. याजकरितां कोणाचे बोलण्यास दरज न चालेसें करावें " ( खरे ५।२४४७ ). " नबाबसाहेब यांनीं स्वामींचे वचनाचे लायकीवर श्रीमन्तांशीं मनःपूर्वक स्नेह केला यांत किमपी दरज नाहीं " ( सानेपयाव २०२ ). " रतीइतकी दरज पडली असतां शत्रूस बळ किती येतें याचा विचार करितात कीं नाहीं ? " ( साने–पयाव २५२ ).

**दरज़िगरी** ( स्त्री० ) चुन्यानें विटांतल्या दरज़ा भरणें.

**दराज़** [ फा० दराज़् ] दीर्घ; दीर्घायू. " पादशाही दराज़ करावी " (इम९९). "दराज़ काय लिहिणें ? मुस्ताक (=प्रेमी) जाणिजे हे किताबती " ( राजवाडे ११।२९ ).

**दरीन्बाब** [ फा० दरीन्बाब् ] या बाबतीत ( इम ६७ ).

**दरीन्वख्त** [ फा० दरीन् वख्त् ] या वेळीं ( राजवाडे १५।१५२ ).

**दरीन्विला** [ फा० दरीन् विला ] या वेळीं.

**दरीन्सूरत** [ फा० दरीन् सूरत् ] या गोष्टींत; या स्थितींत (राजवाडे १९।८).

**दरिङ्ग** ( पु० ) दिरङ्ग ( राजवाडे ८। २१३ ).

**दरुणी महाल** ( पु० ) [ फा० दरूनी = आंतील ] अन्तःपूर; जनाना.

**दरोग** [ फा० दुरोग् ] खोटा. " त्यावर इन्साफ करितां दरोग–चातील दिसोन आलिया उपेरी दूर केला " ( राजवाडे २०।४७ ).

**दरोगा; दारोगा** ( पु० ) [ फा० दारूगा ] अधिकारी देखरेख ठेवणारा; पोलीस अधिकारी; मुकादम. "महमद–पन्हा दारोगा हर्कान्याचा यास हुकूम जाला" ( राजवाडे ७।१०० ).

**दरोबस्त** [ फा० दरोबस्त् ] सर्व, तमाम; बिल्कूल. " दरोबस्त दक्षण साध्य होऊन फत्ते जाली " ( मराचिस २४). " स्त्रीचें व चिरञ्जिवाचें दर्शन दरोबस्त

नाहीं" ( खरे ६।२६५४ ). "लश्करांत व हशमास व गडास एकन्दर मोकाशे महाल गांव दरोबस्त देणें नाहीं" ( सभासद २४ ).

**दल-बादल** [ फा० दिल्बादिल् = शहाजहानच्या डेऱ्याचें नांव ] भव्य व शृङ्गारलेला ( डेरा ).

**दलाल** ( पु० ) [ अ० दल्लाल् ] मध्यस्ती; अडत्या.

**दलाली** ( स्त्री० ) [ फा० दल्लाली ] अडत; अडतीचा धन्दा; अडतीची मिळकत.

**दवा** ( स्त्री० ) [ अ० दवाअ ] औषध.

**दवाखाना** ( पु० ) [ फा० दवाखाना ] औषधालय.

**दवादवी** ( पु० ) [ फा० दवादव् धांवाधाव ] जासूद; हर्कारा.

**दशा** ( स्त्री० ) [ फा० दसा ] वस्त्राच्या टोंकाचे उभे दोरे.

**दस्कत** ( न० ) [ फा० दस्खत् ∠ फा० दस्त्-खत् ] स्वहस्ताक्षरी पत्र; सही; निशाणी.

**दस्त** ( पु० ) [ फा० दस्त् ] अधिकार; अम्मल; सारा; पट्टी; हात; ढाळ; जुलाब. "डोळे झांक करून, कजिया सोडून तसेंच देशास यावें तर तमाम दस्त उठेल" ( राजवाडे ३।१४९ ). "नाकुवत, त्यांतून पांचसात दिवसांपासोन दस्तही दोन तीन होतात" ( राजवाडे ७।९९ ). दस्त करणें = जिवन्त धरणें.

**दस्त-अमल** ( पु० ) गांवचा वसूल; हिशेब. "दोन्ही चावर इनाम चालत होता कीं नाहीं हें दस्तामली रुजू पाहणें" ( राजवाडे १५।२०० ). "ये गोष्टीची बरी चौकशी करून दस्तामली वतन्दाराजवेळी दोन्ही चावर चालवणें" ( राजवाडे १५।२०१ ).

**दस्तक** ( पु० ) [ फा० दस्तक् ] पर्वाना; लायसेन्स. "ऐशास मार्गानें जकातीविशीं वगैरे हरएक विशीं उपसर्ग होऊं नये. ये विशीं दस्तक द्यावें" ( खरे ८।४२४९ ).

**दस्तागिरी** ( स्त्री० ) [ फा० दस्त्-गीरी ] मदत; साह्य; स्नेह; कृपा; बद्धता. "श्रीमन्त माझी दस्त-गिरी करितील तर चित्तानरूप सलूख करीन" ( राजवाडे १।१५७ ). "भीमसिङ्गाची दस्तगिरी राणासी करून दिली" ( दिनरा २।१९८). "मिर्जा इस्मालबेग दस्तगिरींत आला" ( = बद्ध, हस्तगत झाला ) ( दिमग २।२६ ).

**दस्तगीर** [फा० दस्त्-गीर्] बद्ध. "तो-तया ... राघोजी आङ्ग्रे यार्णा दस्तगीर करून आणिला" ( खरे ७।३५७१ ).

**दस्त-दराजी** ( स्त्री० ) [ फा० दस्त-दराझी ] जुलूम. "बाजे विलायत सिवा मलऊत नामें आपल्या दर्कबजेंत आणून दस्तदराजी करितो" ( राजवाडे १७।१६ ).

**दस्त-पन्जा** ( पु० ) दस्तक; पर्वाना; कौल; अभयपत्र.

**दस्त-रस** ( पु० ) जप्त-रस; बन्दोबस्त. "दस्त-रस सर्व आपला आहे तसाच असों द्यावा" ( एटि २।७२ ).

**दस्त-रुमाल** ( पु० ) [ ∠ फा० रूमाल् = तोण्ड पुसण्याचें फडकें ] हातरुमाल. "वैराग्याच्या वेगानें फडकणाऱ्या भगव्या झेण्ड्याला दारूबाजाचें तोण्ड पुसण्याचा दस्तरुमाल केला" ( गडकरी राजसंन्यास ७५ ).

**दस्ता** ( पु० ) [ फा० दस्ता ] चोवीस कागदांची गड्डी; बत्ता; मूठ; पकड; बन्दुकीची पकड; भाता.

**दस्ताना** ( पु० ) [ फा० दस्ताना ] लोखण्डी हातमोजा; हस्तत्राण.

**दस्तार** ( स्त्री० ) [ फा० दस्तार् ] पागोटें.

**दस्तार-बदल** ( स्त्री० ) परस्पर पगड्या बदलून स्नेह कायम करणें; पगडीभाई होणें. "इकडे गुलाम कादर व इस्माईल बेग यांसी परस्परें सख्य होऊन दस्तार-बदल जाली" ( दिमरा १।२०४ ).

**दस्तार-बन्द** [ फा० दस्तारबन्द् ] पगडीवाला. "पल्टणापैकीं दस्तारबन्द व छोल्दार ( =सोजीर ) व तुरूपस्वार" ( खरे ८।४४०८ ).

**दस्ती** ज्यांवर कर आहे असा. "बागायती दस्ती झाडें" ( वाड समा २।२५९ ).

**दस्तुरी** ( स्त्री० ) [ फा० दस्तूर्+ई ] रस्तापट्टी; रस्तापट्टीचें नाकें.

**दस्तूर** ( पु० ) [ फा० दस्तूर् ] पर्वानगी; कबुली-सही; नियम; वहिवाट; पार्शी धर्मगुरू. सही दस्तूर् खुद्द=सही स्वतःच्या हातची असे.

**दस्तूरुल्-अमल** ( पु० ) [ अ० दस्तूरुल् अमल ] वागण्याचा नियम; शिरस्ता. ( ऐस्फुले ४५ ).

**दस्तैवज** ( पु० ) [ फा० दस्त्-आवीझ् ] हक्कपत्र; प्रमाणपत्र.

**दस्तैवजी** प्रमाणभूत; विश्वसनीय.

**दहशत; धास्त** ( स्त्री० ) [ अ० दह्शत् ] भीती; धाक; धडकी. दह्शत घेणें-खाणें =भिऊन जाणें.

**दहा** [ फा० दह्-सं० दश ] दश.

**दाइमी; दायमी** ( स्त्री० ) [ <अ० दाइम्=सदाचें ] कायमची देणगी.

**दाइया** ( पु० ) [ अ० दाइया ] इच्छा. "इङ्ग्रज दक्षणचा दाइया ठेवून न होण्याचे मन्सबे बान्धितात व खूब मकर ही (=फसवणुकीची विद्या) जागतात" ( राजवाडे १०।१६७ ). "सर्व मुलूक कबजा केला, दक्षणचा दाइया राखितात" ( राजवाडे १९।३८ ).

**दाई** ( स्त्री० ) [ फा० दाया ] उपमाता; बाळन्तिणीची सुटका करणारी स्त्री; मुलाला पाजायला ठेविलेली स्त्री.

**दाई-मुदई** ( पु० ) [ अ० दाई=बोलावणारा; अ० मुद्दई=तण्टा करणारा ] वादी-प्रतिवादी. "हर्दो जन दाई-मुदई बोलाऊन आणून" ( राजवाडे २०।६० ).

**दाईम; दायम** [ अ० दाइम् ] कायमचा. "तूं दाईम हलालखोर आहेसी" ( राजवाडे १५।३१ ). "व त्याच पत्रांत दाईम सलूख आहे" ( ऐटि ४८ ).

**दाखल** [ अ० दाखिल् ] आगत; प्रविष्ट; नोन्दलेलें; नमूद; श्रुत; ज्ञात; सारखें. "कोणी चोरून ठेवील, आणि दाखल सर्दारास जहालियानें शासन करावें" ( सभासद २३ ). "चेऊल शहर दङ्ग्यानें मोडून उद्ध्वस्त होऊन जङ्गलादाखल जाहलें होतें" ( राजवाडे ३।५१७ ). "ऐशास पण्ढरपूर तूर्त शहरादाखलच ( = शहरवजाच ) आहे" ( खरे १०।५२०० ). "शिन्देही कैदे दाखल आहेत" ( खरे १०।५५१७). डेरे दाखल होणें = गोटांत रहावयास जाणें.

**दाखला** ( पु० ) [ अ० दाखिला ] पावती; नोन्द असल्याचें प्रमाणपत्र; सर्टिफिकेट; उदाहरण; अनुभव; पडताळा.

" आम्ही चाकरी करूं तेव्हां दाखला पडत जाईल " ( ऐस्फुले ६२ ). " तुमचे दाखल्यांनीं [ =पाहून ] लोकांनीं करावें तें दुरुरे अगोदर करितात आणि तुमचें कांहींच नाहीं " (खरे ५।२४७७).

**दाखलेशीर** विश्वसनीय; सप्रमाण. "आमचे दौलतींत हालीमाजी होत गेल्या मुळें कागद पत्र दाखलेशीर राहिला नाहीं " ( राजवाडे १।३१२ ).

**दाग–चेहरा** ( पु० ) शरीराच्या खाणाखुणांचें टांचण. " दाग-चेहरे करून रोजमरे कितेकांचे जारी जाले " ( राजवाडे ७।५४ ).

**दाग–दोजी** ( स्त्री० ) डागडुजी. " जुने ( जीन ) कामास येई जोगते असतील ते दाग–दोजी करवून नीट करावें " ( खरे ७।३३४७ ).

**दाणा** ( पु० ) [ फा० दाना ] धान्याचा कण; धान्य; गोळी; नग. " आम्बे मुरम्ब्यास दाणे शुमार पन्नास " (राजवाडे २२।१०५ ). " उतरण्डीला नसेना दाणा पण दादला असावा पाटील राणा " ( मराठी म्हण– गांवगाडा ).

**दाणादाण** ( स्त्री० ) [ फा० दाना–दाना ] विकीर्ण; फांकाफांक; पाङ्गणी.

**दाणेदार** [ फा० दानादार् ] कणीदार.

**दाणा; दाना** [ फा० दाना ] ज्ञानी; शाहणा; हुशार; गुणी. " दुस्मान दाणा गेला " ( मराचिथोशा ८५ ). " आपण दाणा व दुरन्देश आहेत " ( राजवाडे १०।२१३ ).

**दाणी** [ ८ फा० दान् ] हा प्रत्यय आलय या अर्थी वापरतात; उदाहरणार्थ अत्तर–दाणी.

**दाद** ( स्त्री० ) [ फा० दाद् ] न्याय. " हा चालवून तुमची किस्त अदा करावी तर न्याय–दाद नाहीं " ( राजवाडे ५।१३७ ). दाद घेणें = तक्रार ऐकून न्याय देणें

**दादी–फिर्यादी** न्याययाचक. " या उपरी कोणी दादी–फिर्यादी आल्यास हुजूर पाठवावें " ( राजवाडे ७।२९ ).

**दानत; यानत; यानती** ( स्त्री० ) [ अ० दियानत् ] धर्मबुद्धी; प्रामाणिकपणा; नेकी; सचोटी.

**दानत–दार** [ फा० दियानत्–दार् ] प्रामाणिक.

**दानत–दारी; यानत–दारी** ( स्त्री० ) प्रामाणिकपणा. " चाकरी स्वच्छतेनें घेतली तर सर्वही यानतदारीनें होईल " ( राजवाडे १४।५१ ). " रुपया यानतदारीचे रीतीनें साधून सर्कारच्या कर्जास हात लावावा " ( राजवाडे ३।१४६ ).

**दाना** [ फा० दाना ] जाणता; शाहणा. " त्यास आपण दाना दुरन्देशी आहेत" ( खरे ९।४०३३ ).

**दानाई** ( स्त्री० ) [ फा० दानाई ] शहाणपण. " ही दानाई ईश्वरानें ज्यास बक्षीस केली त्याचे सखुनाची पास ठेवणें लाजीम " ( राजवाडे ५।८६ ). " हे गोष्ट करणें दानाई व दूरन्देशीपासोन दूर आहे" ( राजवाडे २२।६१ ).

**दाम; दवाम** [ अ० दाम ] चिरायू असो.

**दाम इक्बालहू** [ अ० दाम इक्बालुहु ] त्याचें सुदैव दीर्घायू असो. " दवाम यक्बालहू व इज्लालहू " ( इम ६५ ) [ त्याचें सुदैव व वैभव हीं चिरायू असोत ].

**दाम एख्लास हू** [ अ० दाम इख्लासुहु ] त्याचा विश्वासूपणा, स्नेह चिरायू असो ( राजवाडे १५।२५२ ).

**दाम दौलत हू** [अ० दाम दौलतुहु] त्याचें राज्य चिरायू असो.

**दाम मुल्क हू** [अ० दाम मुल्कुहु] त्याचें राज्य चिरायू असो.

**दामन-गीर** (पु०) [फा० दामन्-गीर्] वस्त्र धरून ठेवणारा; दावेदार.

**दायरा** (स्त्री०) [अ० दाइरा] टिमकी.

**दार-नादार** ऐपतदार-गैरऐपतदार. "याकरितां दार-नादार पाहून घेणें तें घ्यावें" (साने-पयाव ५७).

**दार-मदार** (पु०) [फा० दार्-मदार्] ठराव; करार. "स्वामीसी कोणेही प्रकारें बिघाड न करावा व होऊं न द्यावा; दार-मदारानें चालावें" (राजवाडे ११।९).

**दारू** (स्त्री०) [फा० दारू] मद्य; औषध; बन्दुकींत टाकण्याची ज्वालाग्राही पूड; बारूत.

**दारूकाम** (न०) आतस्बाजी; आतस्बाजीची सामुग्री.

**दारू-खाना** (पु०) दारूचें कोठार; दारूकाम.

**दारू-गोळा** (पु०) अग्न्यस्त्र-सामुग्री.

**दारू-फुल्सरा** (पु०) शराब. "फिरङ्गी गोरे व किरस्ताव जर्दिद...यांस दारू-फुल्सरा नेहमी पाहिजे... आपलें खपापुरती भट्टी लाऊन दारू कारितील, त्यांस करूं देणें" (वाडसमा २।३००).

**दारू-बाज़** मद्यपी.

**दारोगगी; दारोगी** (स्त्री०) [फा० दारोघगी] दारोग्याचें काम; आधिपत्य. "नजीबखानास तोफखान्याची दारोगी साङ्गावी" (राजवाडे ६।४८३).

**दाल्चिनी** (स्त्री०) [फा० दार्चीनी] एक वनस्पती.

**दालन** (न०) [फा० दालान्] सभामण्डप; हॉल; सोपा.

**दावण** (स्त्री०) [फा० दामान्] घोळ; फेर; डोङ्गराची बाजू. "जिना उतरू लागले. श्रीमन्तांच्या झग्याची दावण मागले पायरीवर पडली" (ह्व २६).

**दावण-गीर** [फा० दामन्-गीर्] दावेदार. "तुमचा दावन-गीर होईल" (जोरा ८३).

**दावा** (पु०) [अ० दअ्वा] मागणी; फिर्याद; भाण्डण; वैर; हल्ला. "राजे आपलें इमान राखून ऐवज़ अदा करितील तरी व्याजाचा दावा करणार नाहीं" (साने पयाव ४००). "बळकट झालें म्हणजे...दावे दरवडे करावे" (मराआ २३). दावा लावणें=शत्रुत्व पुकारणें; भाण्डणें; फिर्याद गुदरणें. उभा दावा=खडें वैर. दुस्मान दावा=कट्टें वैर.

**दावेकरी; दावेखोर; दावेदार** (पु०) [फा० दअ्वा-दार्] मागणी करणार।; धनको; शत्रू. "चहूं पादशहाचे आपण दावेदार" (सभासद ४५).

**दावेखोरी; दावेदारी** (स्त्री०) [फा० दअ्वा-दारी] वैर.

**दास्त** (स्त्री०) [फा० दाश्त्] रक्षण; निगा; शुश्रूषा. "ज़खमांची दास्त लश्करांत न होय, म्हणून बङ्कापुरीं पाठविले आहेत" (खरे ६।२८३२).

**दास्तान** (न०) [? फा० तोश्दान् दाश्तन्] सांठा; कोठार; सांठवणूक. "सर्कारचे दास्तानापैकीं तूर्त गोळे काय फर्म्यास येतील हे द्यावयाची आज्ञा झाली पाहिजे" (खरे १२।६२४४). "नख्त नाणें व गल्लेचे दास्तान वगैरा जिन्नस (चित्रगुप्त ३५). "जिन्नस फरोक्त करणें, जर किमतीस फारच अज़मासें

तोटा येऊं लागल्यास दास्तान करून ठेवणें "( राजवाडे १२।१३३ ).

**दास्तान्दार** ( पु० ) कोठावळा; कोठारी.

**दिक; दिक्क** ( स्त्री० ) [ अ० दिक्क् ] क्षीण; त्रस्त; खप्पा; काळजी; पर्वा; भीड; अडथळा. " हगवणीनें दिक्क झाले आहेत " ( खरे १०।५२७३ ). "खुशीच्यातोफा सोडल्या; परन्तु अन्तर्यामीं नबाब बहुत दिक्क व विचारांत" ( राजवाडे ५।१६२ ). "वयनींची मर्जी खर्चाची वोढ पडल्यामुळें दिक्क आहे " ( खरे ११।६००९). " येथें दिक् कोठें आहे ! राज्य बुडते ही काळजी कोठें आहे !" ( खरे १०।५३४३ ). " आज शिन्दे बहुत वाढले आहेत, कांहीं दिक्क राहिली नाहीं. तर शिन्दे यांस ज़रब बसे असा मन्सबा योजिला आहे " ( खरे १०।५३४४ ).

**दिक-हर्कत** ( स्त्री० ) अडथळा. " हे करून दिले इनामती कोणी दिक-हर्कत करणें निस्बत नाहीं " ( राजवाडे ३।५०२ ).

**दिक्कत** ( स्त्री० ) [ अ० दिक्कत् ] सूक्ष्म दोष; शङ्का; अडचण; तङ्गगी; हर्कत; आक्षेप. " इङ्ग्रज् दोनी दौलतींत ( निजामाच्या व पेशव्याच्या ) पाय घालतात यांत दिक्कत नाहीं " ( खरे १२।६८३४ ). " नसती दिक्कत घेऊन कथळे करूं लागले " ( राजवाडे ३।१५५ ). " खज़ाना देतात परन्तु थोडकीसी दिकत आहे... येथें खजानियांत पैका नाहीं " ( राजवाडे १।२६ ). " [illegible] वे दिकतीनें आणि [illegible] ळ मारी म्हणून आठशें माणसें मृत्य पावलीं " ( दिमरा २।८७ ).

**दिगर** [ फा० दिगर् ] अन्य; आणखी; भलतें; उलटा. " मध्यें कोण्ही जो दिगर करील त्यास तम्बी करूं " ( राजवाडे १।४८ ). " बाद कर्नेल गाडर याचें बोलणें व नज़र पहिली राहिली नाहीं ! ज़बाब दिगर, सवाल दिगर ( = प्रश्न एक व उत्तर भलतें ) करूं लागले " ( खरे ७।३५७४ ). " तरी हे भाऊकडील सरन्जामी गांवाचा बन्दोबस्त करितील; आपणाकडून येविशीं दिगर जाबसाल नसावा ( खरे ११।५६५४ ).

**दिगर-जान** [ फा० जिगर् व जान् ] जिवश्चकण्ठश्च; जानी.

**दिगर-बाद** = अवान्तर. " दिगर बादे चौकी बादशहाचे अडीच तीनशें मेले " ( इम १९९ ).

**दिद्वान** ( पु० ) [ ∠ फा० दीद्वान् ] पहारेकरी. दिद्वानी हर्कारे = टेहेळणी करणारे जासूद ( इम १० ).

**दिदार** ( पु० ) [ फा० दीदार् ] चेहरा.

**दिम्मत; दिमत** ( स्त्री० ) [ अ० झिम्मत् ] जिम्मा; हवाला; तैनात; सेवा; स्वाधीन; निस्बत. "जे काय सालाबाद असेल ते निम्बकर गोसावी यास देविलेअसे, याचे दिमती करणें "( राजवाडे १५।१७९). " रघुनाथ यादव चित्रगुप्त दिमत राजमन्दिर " ( चित्रगुप्त १३० ). " देवाच्या तेहतीस कोटी तुझ्या देहाच्या दिमतीला जोडल्या हातीं उभ्या राहतील " ( गडकरी राजसंन्यास ५० )

**दिमती; दिम्मत-गार** सम्बधी; दिमतीचा ( वाडसमा १।९८ ).

**दिमाख** ( पु० ) [ अ० दिमाघ् ]; गर्व; तोरा; डौल.

**दिरङ्ग** ( पु० ) **दिरङ्गाई** ( स्त्री० ) [ फा० दिरङ्ग् ] उशीर; विलम्ब; रेङ्गाळणी. " उजूर व दिरङ्ग केलिया मुलाहिज़ा होणार नाहीं " ( राजवाडे १५।२२२ ), "याजउपरी दिरङ्गाई-खाली घातल्यास संस्थान राहणें कठिण ( पेद्समा १९५ ).

**दिरम** (पु०) [ फा० दिरम् ] दोन आणे किमतीचें चान्दीचें नाणें. " सर्कारचा दाम–दिरम तफावत न करणें ( राजवाडे २०।३०२ ).

**दिल्आरामी; दिलारामी** (स्त्री०) खुशाली; आनन्द; सन्तर्पण. " तुम्ही आपली खुश–खबर लिहून दिल- आरामी करीत जाणें " ( राजवाडे २२।६५ ).

**दिल्खा** [ फा० दिल्खाह् ] यथास्थित. " तुम्ही व रावपन्तप्रधान खातर्ज़मेनें दिल्खा तदारूक अमलांत आणावा " ( दिमरा ११७ ).

**दिल्खुलासा** ( पु० ) [ ८ अ० खिलास् शुद्धता ] शुद्धभाव; दिल्सफाई; मनमोकळेपणा; समाधान. "दिल्खुलाशानें ज़ाब दिला नाहीं. " ( सभासद् ३९ ). " मोगलाईचे लश्करांत गोपाळराव होते त्यांजकडे समजाविशी करितां मध्यस्त पाठवून त्यांचा दिल्खुलासा करून मङ्गळवेढेस आणिले " ( राजवाडे ११।५९ ).

**दिल्खुशी** ( स्त्री० ) [ फा० दिल्खुशी ] सन्तोष; आनन्द.

**दिल्गर्मी** ( स्त्री० ) [ फा० दिल्गर्मी ] प्रेम. " बहुत मेहेर्बानी व दिल्गर्मी करून...कुशल वर्तमान पुसिलें ( पद्मव ७८ ).

**दिल्गिरी** ( स्त्री० ) [ फा० दिल्गीरी ] दुक्ख; बेदिली; पराङ्मुखता.

**दिल्गीर** [ फा० दिल्गीर् ] दुःखी; असन्तुष्ट बेदील.

**दिल्ज़मई; दिल्ज़माई** ( स्त्री० ) खातर्ज़मा; हृदय–मीलन. " भाऊची मार्फत महादजी शिन्देची दिल्ज़माई केली " ( पद्मव ७७ ).

**दिल्ज़मीयत** ( स्त्री० ) [ अ० जम्ईयत् ] खातर्ज़मा; समाधान; निःसंशयता. " तर मोहीबीं दिल्ज़मीयतीनें आपले कदीम ठिकाणास यावयाचें...केलें पाहिजे " ( राजवाडे ३।९१ ).

**दिल्जोई** ( स्त्री० ) [ फा० दिल्जोई ] सान्त्वन. " तुम्ही आमचे तर्फेनें यांची तशफ्फी व दिल्जोई करावी " ( राजवाडे २२।२५ ).

**दिल्ताज़गी** ( स्त्री० ) [ मराठी समास ] हृदयानन्ददान. " आपली खैर–खुशी कलमी करून दिल्ताज़गी करीत असलें पाहिजे " ( राजवाडे १०।१६५ ). " हमेशा किताबत पाठऊन दिल्ताज़गी करणें दोस्तींचे ज़ागां लाज़म असे " ( साने–पयाव ४९१ ).

**दिल्दर्या** फा० [ दर्यादिल् ] उदारधी. "दिल्पाक दिल्दर्या इलाही मेहेर्बान खान" ( पारसनीस ब्रप ३०७ ).

**दिल्दार** [ फा० दिल्दार्=प्रणयी ] सहृदय; उदार.

**दिल्दारी** ( स्त्री० ) [ फा० दिल्दारी ] उत्तेजन; खातर्ज़मा. " सन्चणीचा वख्त आहे; तक्वा–दिल्दारी पाठवणें " ( राजवाडे १६।३३ ).

**दिल्दिलासा** ( पु० ) दिलासा. " दिल–दिलासा देऊन " ( चित्रगुप्त १३ ). "दिल–दिलासा होऊन" (चित्रगुप्त ४६).

**दिल्देही** ( स्त्री० ) [ फा० दिल्दिही ] उत्कटता. " कित्येक सर्दार कामका-

जाविषयीं दिल्देही करीत नाहींत" ( राजवाडे ५।१५७ ).

**दिल्नशीन** [ फा० दिलिनशीन् ] पसन्त; अवगत. "अज़्-राह-यगानगत दिलिनें-शीन जालें तें कलमी केलें असें ( साने-पयाव ४६३ )

**दिल्पाक** शुद्ध अन्तःकरणाचा ( पारसनीस-ब्रप ३०७ ).

**दिल्पाकी** (स्त्री०) [ फा० पाकी=शुद्धता ] दिल्खुलासा; निखालसता. " आम्ही दिल्पाखीनें मशागत करून " (इम ११).

**दिल्सफाई; दिल्साफी** ( स्त्री० ) निखा-लसता. "पुन्हां दिल्साफीचा फर्मान उभ-यतांनीं बादशहापासून सम्पादन केला" ( ग्रामस ३२ ).

**दिल्बर; दिल्भर** ( पु० ) [ फा० दिल्बर् ] मनोहारक; दयित. " सुन्दरा म्हणे दिल्भरा, राज-अम्बिरा हंसुनि मर्सि बोला जी " ( होनाजीबाळ १६९ ).

**दिल्भरी** ( स्त्री० ) [ फा० दिल्बरी ] समा-धान. " तमाम रयतेची दिल्भरी करून लावणी होय तें करणें " ( राजवाडे १।३४६ ).

**दिलावर** [ फा० दिलावर् ] धीर; शूर ( पदमव ८५ ).

**दिलासा** ( पु० ) [ फा० दिल्-आसा ] सान्त्वन; उत्तेजन; आश्वासन; धीर. " दिलासा करून बराबर घेऊन जाणें" ( सभासद १४ ). " लोकांस दिलासा देऊन किल्ला रक्षावा" ( खरे १।२२७).

**दिलेर** [ फा० दिलीर् ] धैर्यवान्; शूर.

**दिलेरी** ( स्त्री० ) [ फा० दिलीरी ∠ ] धैर्य; शौर्य.

**दिलेरी-रुस्तुमी** ( स्त्री० ) धैर्य; शौर्य. " शाबास तुमच्या हिमतीची व दिलेरी रुस्तुमीची ! " ( साने-पयाव १४० ).

**दिवाण** ( पु० )[ फा० दीवान् ∠ अ० दैवान् ] राजसभा; मुख्य कचेरी; वसूल-कचेरी; प्रधान. " थोर किम्म-तीची वस्तभाव असल्यास दिवाणांत यावी " ( सभासद ४३ ). " निपुत्रि-कांचें मिरास तें दिवाणाचें " ( राज-वाडे ८।४९ ).

**दिवाणजी** ( पु० ) [ तु० दीवान्-ची ] प्रधान; वजीर.

**दिवाण-खाना** ( पु० ) [ फा० दीवान्-खाना ] सभामण्डप; दालन.

**दिवाण-गिरी** ( स्त्री० ) प्रधानकी; वजि-रत; वज़ारत.

**दिवाणा** [ फा० देवाना-दीवाना ] भुताट-लेला; पिसा; वेडा; मूर्ख.

**दिवाणी** [ फा० दीवानी ] मुल्की; गैर फौज़दारी.

**दिवाल; दिवार** ( स्त्री० ) [ फा० दीवाल् -दीवार् ] भिन्त; टोपीची उञ्ची. " शहर पन्हाचे दिवाळनजीक मुक्काम केला " ( दिमरा २।९८ ).

**दिवाळ-तोडी**=भिन्ती, तट तोडून पाडील अशी ( तोफ ) ( खरे ९।४६८१ ).

**दिवाळ-शिकन्दर** ( स्त्री० ) शिकन्दरानें बान्धली असें समजतात अशी एक मोठी भक्कम भिन्त. "व स्नेहही (=नबा-बाचा ) कायम राहील जैशी शिक-न्दराची दिवाळ" ( खरे ८७७ ).

**दी-पेस्तर** [ फा० दी=काल ] उद्यां पुढें. " हें दीपेस्तर रोशन होईल" (इम ६८).

**दीन** ( पु० )[ अ० दीन् ] धर्म; इस्लाम-धर्म. " हज़रतांनीं दीनचा पक्ष सोडून मऱ्हाठियांचा पक्ष धरिला आहे हे गोष्ट मुसल्मानीस ठीक नाहीं " ( दिमरा १।२६७ ).

**दीन-दीन !** मुसल्मानांची युद्धगर्जना.

**दीन-इमान** ( पु० ) धर्म. "हिन्दूंचें राज्य झालें त्या दिवसापासून आमचा दीन-इमान सर्व बुडाला " (दिमरा २।७९). "दुहराऊन कौल-करार दीन-इमानची शपतपूर्वक लिहिलों कीं " ( राजवाडे १२।२५ ).

**दीन-दुनिया** ( स्त्री० ) [ फा० दीन्-उ-दुन्या=पारलौकिक व ऐहिक गोष्टी ] अलम-दुनिया; सारें जग. " आतां हिम्मत धरणें हें अगत्य; तुम्ही शाबूत ( =सुरक्षित ) तर दीन-दुनियेचें भय नाहीं" ( खरे १।१७० ).

**दील** ( पु० ) [ फा० दिल् ] हृदय. "एक-वेळ तुमचा दील कच्चा जाहला म्हणोन तुम्ही शिपाई नव्हेत कीं काय ? ( हृब २५ ). " दुसरें, नोकराचा दील साहेब-चाकरीस कसा वाढेल ? " ( राजवाडे ७।१५७ ).

**दुआब; दुवाब** ( पु० ) [ फा० दो-आब्] अन्तर्वेदी; कोणत्याहि दोन नद्यांच्या चिमट्यांतला प्रदेश.

**दुई; दुही** ( स्त्री० ) [ फा० दूई ] बेकी; द्वैत, यादवी ( सभासद ७३ ).

**दुकान** ( न० ) [ अ० दुक्कान् ] विक्रय-शाला; कारखाना; प्रदर्शन; पसारा.

**दुकान्दार** ( पु० ) [ फा० दुक्कान्दार् ] व्यापारी.

**दुकान्दारी** ( स्त्री० ) [ फा० दुक्कान्दारी] व्यापार.

**दुकित्ता** =दुहेरी. " तुम्ही साण्डणीस्वारा-बरोबर व खिज़्मतगाराबरोबर अशीं दुकित्ता पत्रें पाठविलीं ( खरे १०। ५५०८ ).

**दुज़ागी** ( स्त्री० ) ज़ुदागी. "सबब गुलाम-कादरासी तुम्ही दुज़ागी न करितां त्यास सामील असोन आमचे मस्ल-तींत यावें " ( जोरा १२६ ). " शिन्दे होळकर यांची दुज़ागी राजेरजवाड्यांत दाखवून होळकरांची कमती पाडिली ( होके ७३ ).

**दुतर्फा** [ फा० दोतरफ् ] दोन्ही बाजूंस.

**दुतर्फी** दोन्ही बाजूचा; दुटप्पी; दुलग.

**दुदिला; दुदील; दोदील** [ फा० दूदिला-दूदिल् ] दुलग; दोहींकडे सन्धान बान्धणारा; साशङ्क; चञ्चल. " व येथें जे दुदिले आहेत तिकडील दङ्गियामुळें उठोन येतील; त्यांची गूज मोडेल " ( राजवाडे १।३३९ ). दुदील ( इम २५४ ). "लटक्या कल्पना मनांत घालून दोदील करावे ऐसें करणार करितात " ( राजवाडे १९।८५ ).

**दुनिया** ( स्त्री० ) [ अ० दुन्या ] इहलोक; जग. " अलम-देश-दुनिया नज़रेच्या टापूंत आणून देण्याइतकी एकादी लाट उभी चढली" (गडकरी-राजसंन्यास ५).

**दुनियाई; दुन्याई** ( स्त्री० ) जग. "याची बदनामी दुनियाईत जाली " ( राजवाडे ५।२० ).

**दुनियादार** [ फा० दुन्यादार् ] पृथ्वीपती.

**दुनियादारी** ( स्त्री० ) [ फा० दुन्यादारी ] इहसुख; लोलङ्गता; राज्यभोग. "परन्तु दुनियादारी किस्मतींत थोडे दिवस होती" ( ऐटि ३।१७ ).

**दुबार** [ फा० दूबार् ] दोनदां.

**दुमची** ( स्त्री० ) [ फा० दुम्ची ] घोड्या-च्या शेंपटीखालून जाणारा बन्द; लेण्डी. दुमची सोडाविणें=नामोहरण करणें

**दुम्दारी** ( स्त्री० ) [ फा० दुम्दार्] पिछाडी; पिछाडीची फौज. " कडपेकरांचें पथक दुम्दारीस होतें "(खरे ४।१८३७)." पाठी-मागील दुम्दारी अस्तमानचे सुमारास जागा सोडून गेली " (खरे ८।४०२६)

**दुम्बाला**; दुमाला [फा० दुम्बाला ] मागें. पाठलाग; ताकूब. " एक ससा पैदा जाला त्यानें कुतरियाचा दुमाला घेऊन कुतरा मारिला " ( भाइसम १८३४पावृ २०८). दुम्बाला करणें (राजवाडे ८।१) = परत हवालीं करणें. दुमाल्यास ( मराचिथोशा ६९ ) = मागाहून. दुमाल्यावर (पाव १२ ) =पाठीशीं, मदतीस.

**दुयम** [ फा० दूयुम् ] दुसऱ्या दर्जाचा; हाताखालचा; गौण.

**दु-मुतवजे** [ ∠अ० मुतवज्जिह् ] दुरोख. " येविषयीं ?–मुतवजे करितात " ( साने-पयाव १२३ ).

**दुर्बीण** ( स्त्री० ) [ फा० दूर्बीन् ] दूरदर्शक यन्त्र.

**दुरन्देश**; दुरन्देशा; दुरन्देशी [ फा० दूर्-अन्देशा ] दूरदृष्टी; दूरवर विचार करणारा; धूर्त. " आपण दाणा व दुरन्देश आहेत " ( राजवाडे १०।२१३ ). " त्यास आपण दाना दुरन्देशी आहेत" ( खरे ९।४०३३ ). " बाळाजीराव काय दुरन्देश होते ! " ( राजवाडे ५।८६ ).

**दुरन्देशा** ( पु० ) **दुरन्देशी** ( स्त्री० ) दूरवर विचार करणें; धूर्तता. " परन्तु करणारांनीं मात्र बहुत दुरन्देशा पाहून चालत असावें " ( राजवाडे ८।२२४ ).

**दुरस्ता** = ( रस्त्याच्या ) दों बाजूंनीं ( पाव ५१ ).

**दुरी-दराज्** [ फा० दूर्-दराज़् = दूर दूर, कुठेंतरी ] परागन्दा होणें; पाङ्गणी; बेचिराखी. " रयेता बेदील होऊनु वाडी पडते; वाडी पडली म्हणजे दुरी दराज् लागेली " ( इम ४८ ).

**दुरुस्त** [ फा० दुरुस्त् ] व्यवस्थित; बराबर; निर्दोष; अचूक. " नेमिला ज़ागा दुरुस्त मारणार असे " ( मराआ ३५).

**दुरुस्ताई** ( स्त्री० ) दिल्सफाई. " परस्पर दुरुस्ताई होय तर उत्तम आहे " ( जोरा ५ ).

**दुरुस्ती** ( स्त्री० ) [फा० दुरुस्ती=सुस्थिती] दोष काढून पूर्ववत् करण्याची क्रिया; मरामत.

**दुरूक**; दुरोख = दुतर्फा. " दुरूक शह न सोसे " ( खरे १२१२ ) " इकडील मातबरांचीं लक्ष्यें दुरोख झालीं आहेत " ( मद्वा ११३१ ).

**दुरोज़ा** ( पु० ) दोन दिवसांचा खर्च. " चाळीस पन्नास हज़ाराचें जवाहीर व कापड यार्णे फौजेस दुरोज़ा पुरणार नाहीं " ( राजवाडे १२।९० ).

**दुवक्ता** [ फा० दू-वक्त् ] दुबार; दोन वेळा. " नित्य घरीं दुवक्ता पाणी भरावें, मग ज़ें होणार तें होतच आहे " ( राजवाडे ८।२०१ ).

**दुवस्वा** [ फा० दू-अस्त्वा ) दोन घोडे ठेवणारा. "दुवस्वा स्वार "(वाडमा १।३३३).

**दुवा** ( पु० ) [ अ० दुआ ] भलें होवो अशी ईश्वरास प्रार्थना; आशीर्वाद; विज्ञापना. " द्वा " ( राजवाडे १५। १३९ ). " दुवा आं की ( =ती कीं ) तुम्ही आपली खैर-खुशी कलमी करीत जाणें" (खरे ११।६०९८). "जर वजीर कबूल करितील तर दुनिया आपल्यास दुआ देईल " ( राजवाडे ६।६२१ ). " सिद्धी सूरूर उन्देरीस किल्लेदार होता तेव्हां आमची दुवा घेतली " ( पारसनीस-ब्रच २५ ).

**दुवा-गीर** [ फा० दुआगो ] हितेच्छू; निष्ठावन्त. "आम्ही हज़रतीचे दुवागीर" ( चित्रगुप्त ४६ ). " तुम्ही बादशाहीचे दुवागीर" (पाव ९). "फकीर दुवागीर" ( वाडसमा ३।१८६ ). " ऐसेच हरघडी

खत किताबत पाठवून फकिराचे खबर घेत असले पाहिजे; आम्ही द्वा-गीर असों" ( पारसनीस-ब्रप ३०७ )

**दुश्मन; दुस्मन; दुस्मान** ( पु० ) [ फा० दुश्मन् ] शत्रू.

**दुश्मनी** (स्त्री०) [फा० दुश्मनी ] वैर. "जों पावेतों इङ्ग्रेजांचें पारपत्य होत नाहीं तों पावेतों इङ्ग्रेजांसीं खुली दुश्मनी करावयास भितात" (राजवाडे १२।२३).

**दुश्मनगी; दुस्मान-गिरी** ( स्त्री० ) वैर; शत्रुत्व. "ज्या प्रमाणें पानिपताचे समयीं सर्व हिंदुस्थान मिळून दक्षण्यांसी दुश्मनगी केली तेच अवस्था आतां जाली आहे" (दिमरा १।२२६).

**दु-शोला** [ अ० शुअला=ज्योत ] जोडशामदान. "मोमबतीचे दुशोला, येकशोला याप्रमाणें जिन्नस" ( राजवाडे ७।१५६ ).

**दुहज़्बी** [अ० हस्ब् ] दोन कामास येणारा.

**दुही, दुई** ( स्त्री० ) [ फा० दूई ] द्वैत; यादवी.

**दूम** [फा० दुवुम् ] दुसरा ( राजवाडे ८।९५).

**दूर करणें** [ फा० व सं० दूर् ] काढून घेणें. "यांची पेशवाई दूर करून" ( सभासद ८ ).

**दूर्दस्त** [ फा० दूर्दस्त्=दूरस्थ ] दूर; दूरचा "लाहोर प्रान्त दूर्दस्त आहे" (इम२६७). "त्याहावें कीं आम्ही दूर्दस्त होतों" (राजवाडे १।४८ ). "मार्गी लाम्ब-दस्त मैदान पाहून" ( खरे ९।४८०६ ).

**देखील** [ फा० दाखिल ] समाविष्ट सुद्धा. "तुकोजी शिन्दे याणीं मौजे मुल्खेडें येथें बटीक देखील पोरें, असामी तीन येकूण रुपये दीडशांस विकत घेतली" ( वाड-बाबा २।१९१ ).

**देग** ( स्त्री० ) [ फा० देग् ] एक मोठें धातुपात्र.

**देणगी** ( स्त्री० ) देहन्दगी पहा.

**देणेंदार** [ फा० दैन्दार् ] ऋणको.

**देर; देरी** ( स्त्री० ) [ फा० देर् ] उशिरा; उशीर. "मार्ग लाम्ब व सर्कार थोर याजमुळें देरी जहाली" ( पद-मव ८० ). "एक घडीचे देर न करणें" ( राजवाडे १५।३६० ).

**देर-कशी** ( स्त्री० ) दिरङ्गाई. "असी देर-कशी होणें खुश्नुमा दिसण्यांत येते कीं काय?" ( राजवाडे ७।८१ ).

**देह** ( पु० ) [ फा० दिह् ] गांव.

**देह-ब-देह** गांवोगांव. "देहबदेह लावणी करील" ( राजवाडे १६।४२ ).

**देहनगी; देहन्दगी** ( स्त्री० ) [ फा० दिहन्दगी ] देणगी. "धर्मादाव देहनगी" ( राजवाडे ६।३१९ ). "मुद-बख्यास व्यर्थ देहनगी म्हणत होता; त्याणींही चाकरी करून देणें दिल्हे" ( राजवाडे ६।५०९ ). "बक्षिसें आणि देहन्दगी" (भाइसम १८३६ अ ५७).

**दो-दील** = दुदील पहा.

**दोस्त; दोस्त-दार** ( पु० ) [ फा० दोस्त्; दोस्त्-दार् ] मित्र; स्नेही.

**दोस्ती; दोस्तदारी** ( स्त्री० ) [फा० दोस्ती; दोस्त्-दारी ] मैत्री; स्नेह.

**दोही** ( स्त्री० ) [ ? अ० दुआ+ई ] द्वाही; जाहीर-खबर; दवण्डी; शपथ. "अब्दाली याणें तेमुरशा बसविला, त्याची दोही फिरविली" (राजवाडे १।२५५ ). "त्यानें कचेरीस येऊन दोही दिली आणि... स्वामीस अर्ज केला" ( राजवाडे १५।१०७ ). "बाईची व आमची चित्त शुद्ध नाहीं; यामुळें आम्ही दोही दिली" ( राजवाडे ६।११६ ).

**दौत** (स्त्री०) [अ० दवात्] शाईदाणी.

**दौलत; दव्लत** (स्त्री०) [अ० दौलत्] सम्पत्ती; जहागीर; राज्य; सैन्य; सल्तनत. "शहाजी राजे यांसी दौलतेमध्यें पुणें पर्गणा होता" (सभासद ५). "हे दौलत कर्जरोगानें निरन्तर ग्रस्त" (साने-पयाव ३४३). "झाडून बुणगेसुद्धां दौलत गर्द जाली" (खरे११।६०८६). "आपल्या आपल्यांत भाण्डून दौलत बुडविली हा लौकिक कशाला पाहिजे" (राजवाडे १३।६९). "निदान जें मागतील तें इङ्ग्रजांस देऊं. राहील तीच दौलत करूं; परन्तु नबाबसुद्धां फितुरियांचें पारपत्य घडे तेच गोष्ट करावी यांत श्रीमन्तही कबूल आहेत" (राजवाडे १२।७९). "व्यर्थ आपण इङ्ग्रज न आणितां आणल्याचें श्रेय येतें! श्रीमन्तांचें राज्यांत भीक बरी; परन्तु दुसरेयाचें दौलतींत सुख ही समान होणार नाहीं." (खरे १२। ६८३०). दौलत करणें=जहागीर चालविणें (सभासद ३).

**दौलत-काहीरा** (स्त्री०) विजयी राज्य. "दौलत-काहिरेमधें मुलूक आला" (राजवाडे १८।५५).

**दौलत्खा** [फा० दौलत्खाह्] दौलतीचा हितेच्छू; हितेच्छू; स्नेही. "महाराव जावोजी केवळ निखालस, सर्व प्रकारें दौलत्खा स्वामींचा आहे" (राजवाडे १।१४८).

**दौलत्खाई** (स्त्री०) [फा० दौलत्खाही] हितेच्छुता, हितेच्छा. "नजबखान सर्कारचे दौलत्खाई व इकडील दोस्ती ठेवितात" (दिमरा १।४७).

**दौलत-ज्यादा** (पु०) तमाशा आटोपल्यावर नाच्या पोराशीं अगर कलावन्तिणीशी भरसभेंत केलेली शृङ्गारचेष्टा.

**दौलत-दार; दौलतवन्त** श्रीमन्त, सत्ताधीश. "पाहने अर्थी दौलत्वन्तास कोणी एक गोष्टीनें सूख नाहीं" (खरे १२१५). "दौलत-दार यास योग्य नाहीं तो धर्म होत चालला" (राजवाडे ५।१४०).

**दौलती-खेरीज** [फा० खारिज् इ दौलत्] पदच्युत (खरे ७।३५६६).

## ध

**धड्पा** (पु०) [फा० दर्पा] वस्त्राचें फाडलेलें मोठें फडकें.

**धन-दौलत** (स्त्री०) सम्पत्ती.

**धम्धमा** (पु०) दम्दमा.

**धमामा** (पु०) दमामा.

**धर-बन्द** (पु०) नियम; प्रमाण.

**धिङ्गा-मस्ती** (स्त्री०) धुमाकूळ, दाण्डगाई.

**धास्त; धास्ती** (स्त्री०) [अ० दह्शत] भीती; दहशत. धास्त खाणें-घेणें= भिऊन जाणें.

## न

**न्यहायत; निहायत** [अ० निहायत्] अत्यन्त. "हें ऐकून न्यहायत खुशी जाली" (साने-पयाव४६४). "असी न्यहायत कम राहिला" (राजवाडे १९।८).

**न्यहाल** (स्त्री०) [फा० निहाल्] गादी. "म्हणून अशा महालीं होतां काहली पराच्या न्यहालीवर खेळले" (प्रभाकर २२९). "न्यहाली अत्लसी" (वाडसमा २५५). "हंसिणी कधिंग करिशील न्यहाल हंसाशी !" (प्रभाकर २०८).

**न्याबत** ( स्त्री० ) [ अ० नियाबत् ] मुतालिकी. "न्याबतचा खिलत" ( दिमरा २।१०७ ).

**न्याय–मन्सुबी** ( स्त्री० ) [ अ० मन्सूबा =ठराव; अ० मुन्सिफी=न्याय ] न्यायनिवाडा.

**न्यारगीर; न्याहारगीर** मिश्रपदार्थातून शुद्ध धातू काढणारा.

**न्याहारी** ( स्त्री० ) [ फा० नाहारी ] सकाळचें बेताचें खाणें.

**नईस** [ अ० नअश् ] तिरडी. "नईस न्यावयास ब्राह्मण तेलङ्ग केले" ( राजवाडे ६।५ ).

**नक्कल; नकल** ( स्त्री० ) [ अ० नक्कल् ] प्रत; प्रतिकृती.

**नक्कल; नकल** ( न० ) निर्वंश. "त्याचे पोटीं कोणी सन्तान नाहीं; अगर त्यास कोणी दाईज–गोत्रज नाहीं; नकल जाहालें" (राजवाडे ८।७४). "कित्येकांचीं घरें बसलीं; कित्येकांच्या नकला जाहाल्या" ( पाब ४९ ).

**नक्कल–नवीस** ( पु० ) [ फा० नक्ल्–नवीस् ] प्रत काढणारा.

**नक्श** ( पु० ) [ अ० नक्श् ] प्रतिष्ठा; लौकीक, कीर्ती, वजन. "आपला नक्श राहून योजिला मन्सुबा सिद्धीस पावे ते गोष्ट करणें" ( इम २०२ ). "व नक्श सर्वांवर बैसोन अवघ्या हिंदुस्थानाचा बन्दोबस्त होऊन येईल" ( इम २७४ ). "नरगुन्दचा मोठा नक्श जाहला" ( खरे ८।३९२४ ).

**नक्शा** ( पु० ) [ अ० नक्श्–नक्शा ] नकाशा; कार्यक्रम; विचार; प्रतिष्ठा; व्यूह. "इङ्ग्रेजांचा पाय या प्रान्तीं फार शिरला आहे. तमाशा–सैर करण्याचे बहाण्यानें येऊन येथील नक्शे लिहून घेतले" ( दिमरा १।३०२ ) "जखणवाडीचे मैदानांत भेटीचा नक्शा ठरविला" ( मराचिथोशा ६३ ). "फौज जरब खाऊन होती तथापि त्याणें नक्शा बान्धून उभे राहिले" ( होकै ५६ ). नक्शा उतरविणें=मानखण्डना करणें.

**नक्शी** ( स्त्री० ) [ ∠अ० नक्श् ] वेलबुट्टी; कलाकुसरीचें काम.

**नक्शीदार** चित्रित; वेलबुट्टीचें काम ज्यावर आहे असें.

**नकस्गिरी** ( स्त्री० ) नक्षी काम करण्याची कला.

**नकसणें** कोरून नक्शी काढणें.

**नक्की** [ अ० यकीन् ] निश्चित; निःसंशय; खात्रीपूर्वक.

**नकली** [ फा० नक्ली ] बनावट; कृत्रिम, गैर–अस्सल; तक्लुबी.

**नकल्या** ( पु० ) दुसऱ्याचें हास्योत्पादक अनुकरण करणारा

**नकाल** ( पु० ) [ अ० नक्काल् ] नकल्या.

**नकाशा** ( पु० ) [ अ० नक्शा ] रेषाचित्र.

**नकास–काम** ( न० ) [ अ० नक्काश् ] कोरीव कलाकुसरीचें काम.

**नकासणें** कोरीव नक्षी काढणें.

**नकास्गार** ( पु० ) [ अ० नक्काश्=चित्रकार ] कोरीव नक्षीकाम करणारा.

**नकाहत** ( स्त्री० ) [ अ० नकाहत् ] अशक्तपणा. "आमचे प्रकृतीस आतां कांहीं येक आराम आहे परन्तु नकाहत फार" ( राजवाडे २२।२१ ).

**नकीब** ( पु० ) [ अ० नकीब् ] राजबिरुदें ल्लकारणारा; भालदार.

**नगद; नक्त; नख्त** ( स्त्री० ) [ अ० नक्द ] रोकड. "म्हातारीची तोड नक्तीवरच काढावयास आज्ञा व्हावी" ( खरे

११।५६६६ ). "जागीर व नगदी देणें करार करून" ( राजवाडे ६।५७६ ).

**नगार-खाना** ( पु० ) [ फा० नकारा-खाना ] नगारा ठेवण्याची जागा; नौबत्खाना.

**नगारची** ( पु० ) [ फा० नक़ारची ] दुन्दुभी वाजविणारा.

**नगारा** ( पु० ) [ अ० नकारा ] डङ्का; नौबत.

**नगिना** ( पु० ) [ फा० निगीना ] अङ्-गठींतला खडा.

**नङ्ग** ( पु० ) [ फा० नङ्ग ] प्रतिष्ठा; कीर्ती; दरारा. "धण्यासी निष्ठेनें वर्तोन, आपले नङ्गानें राहोन कीर्ती सम्पादोन घेतल्या" (राजवाडे ८।१२७). "नङ्ग राखिला" ( इम १८८ ). "आधींच तुमचा नङ्ग त्या रानीं. धास्ती मुळेंच त्यास ज़रब" ( खरे ८४१ ).

**नङ्ग-नामोश** [ फा० नङ्ग + अ० नामूस] कीर्ती; ख्यात; पराक्रम. "तुमचे नङ्ग-नामोश तुमचे वडिलाप्रमाणें व्हावे, हेंच स्वामीस अगत्य" ( राज-वाडे ८।१३६ ). "त्याप्रमाणें आमचे बापांनीं राजश्री राणबा साहेब नेणते होते त्यास हातीं घेऊन भाऊपणें चालोन नङ्गनामोश करून सेवा केली" ( इम १८८ ).

**नज़्दीक** [ फा० नज़्दीक् ] जवळ. "मोह-रमचा आशुरा नज़्दीक पोंहचला" ( साने-पयाव ३८५ ).

**नज़्राणा** ( पु० ) [ अ० नज़्राना ] उपा-यन; खण्डणी.

**नज़र** ( स्त्री० ) [अ० नज़्र] उपायन; भेट.

**नज़र-तौफेज़ात** ( स्त्री० ) नज़राणा. "इङ्-ग्रेज़ नज़र-तोहफेज़ातशिवाय सव्वीस लक्ष रुपये दर्साल हुज़ुरांत देत होतें" ( ऐटि १८ ).

**नज़र-नज़राणा** ( पु० ) कनिष्ठांनीं वरि-ष्ठास भेट द्यावयाच्या मौल्यवान् वस्तू.

**नज़र-नियाज़** ( स्त्री० ) [∠फा० नियाज़्] नज़राणा. "खुर्शीवर शहाजादेस बस-वून तमाम सर्दारांनीं नज़र-न्याज़ केले" ( खरे ८।४२२५ ). "त्याणीं नज़र-नयाज़ केली" ( दिमरा १।२७३ ). "हल्लीं तुम्हाशी भेटीचा पैगाम करि-तील व नज़र-नियाज़ कबूल करि-तील" ( साने-पयाव ८१ ).

**नज़र-मुबारक** ( स्त्री० ) मङ्गल अभि-नन्दनपर भेट. "ह्यांजपासून नज़र-मुबारखी घेऊन पुढें मुलुकास कौल सादर केला" (इस १ चान्दबिबी१०).

**नज़र; नदर** ( स्त्री० ) [ अ० नज़र् ] दृष्टी; इच्छा; हांव; आनुकूल्य; निगा. "अव-रङ्गजेबास ठायीं ठेवावें ही नज़र शिवाजीची". "नज़र भारी ! होनाचें नाणें ! लकाराशिवाय बोलीच नाहीं असा प्रकार" ( खरे ७।३२५९ ). "विचारास त्या लोकांची नज़र पावली नसली तर...अवहेलना न करितां...गुणदोष बोलावे" ( मराआ १६ ). नज़र करणें=निगा ठेवणें. "सङ्ग्रह करावा. याची बरी नज़र करावी" ( मराआ १२). नज़र धरणें= इच्छा करणें. "कदाचित् त्याचे वंश जांनीं त्यामार्गें हराम-खोरीची नज़र धरली तर त्यास त्याच वृत्तीचें बल होणार ..." ( मराआ २५ ). नज़रेंत धरणें=पर्वा करणें. "हम्बीरराव याणीं दिलेलखान नज़रेंत धरिला नाहीं" ( सभासद ६४ ). नज़रेस येणें = पसन्त पडणें.

**नज़र-एनायत** (स्त्री० ) कृपादृष्टी. " नज़र एनायत फर्माऊन " ( राजवाडे १५। १३८ ).

**नज़र-कैद** ( स्त्री० ) साधी अटक; नज़र --बन्दी.

**नज़र-गुज़ार** ( स्त्री० ) [ ∠ फा० गुज़ार् आज्ञार्थीरूप गुज़ाश्तन् चें ] परीक्षा. " आपण राजियांनीं नज़र-गुज़र करून एक एक माणूस पाहून ठेवावें " ( सभासद २१ ). " तसेंच तट-नोबत जे ठेवणें ते बरे मर्दानें कबिलेदार विश्वासू असे पाहून नज़र-गुज़ार करून ठेवीत जावे " ( मराआ २९ ).

**नज़र-बन्द** [ फा० नज़र्बन्द् ] साध्या अटकेंत; हालचालीवर सक्त नज़र आहे अशा स्थितींत. " बादशहानें नज़र्बन्द केलें " ( मराचिथोशा ३ ).

**नज़र-बन्दी** ( स्त्री० ) [ फा० नज़र्बन्दी ] साधी अटक; दृष्टिवञ्चना; जादू.

**नज़र-बाज़** [ फा० नज़र्बाज़् ] हेर; टेहेळणी करणारा ( ऐटि ११४ ).

**नज़र-बुलन्द** उच्चदृष्टी; कृपादृष्टी. " गरिबांवर नज़र-बुलन्द झाल्यानें आपलेंच गांव आहे " ( पदमव १७ ).

**नज़र-भेट** ( स्त्री० ) उपायन " अधिकाऱ्यांना नज़र-भेटी " (गांवगाडा ५५).

**नज़र-मुबारक; नज़र-मुबारकी** ( स्त्री० ) शुभदृष्टी; कृपादृष्टी.

**नज़र-मोज़वा** ( पु० ) चौकशी; पाहणी ( वाड समा २।२३५ ).

**नज़रानज़र** ( स्त्री० ) दृष्टादृष्ट.

**नज़ाफत** ( स्त्री० )[ अ० नज़ाफत् ] सुबकपणा. " नज़ाफत व कारागिरी व चाङ्गली वस्त पूर्वीं आपण पाहिली आहे तशी आतां कांहीं दृष्टीस पडत नाहीं " ( ऐटि २९६ ).

**नजीक; नज़्दीक** [ फा० नज़्दीक् ] जवळ, सन्निध. " नजीक नदी " ( राजवाडे १५।२५२ ). " नजीक समाधी " (=समाधी जवळ) ( राजवाडे १५। १५४ ). " आजी तागाईत दूर कर्नाटकांत होतों. हाली नज़्दीक आलों असों " ( राजवाडे १५।२१ ) " ते तर्फेस मैसूरकराचीही सर्हद नज़्दीक आहे " ( इम ६६ ).

**नजुमी** ( पु० ) [ फा० नुजूमी] ज्योतिषी. " नज़ुमियास बोलावून साअत पांच घटका रात्रीची ठरली " ( राजवाडे ५।२७ ).

**नज़ूम** ( पु० ) [ अ० नुजूम् ] ज्योतिष; ग्रहस्थिती. " आमचें येथें नजूम विशेष करून जाचून पाहण्याचा साम्प्रदाय नाहीं " ( राजवाडे ७।१९३ ).

**नतिजा** ( पु० ) [ अ० नतीजा ] परिणाम; फळ; शिक्षा. " त्याणीं बिघाडाचा डौल धरिल्यास नतिजा द्यावा, मुकाबल्यास जावें " ( खरे १।२७२ ). " सांवतास तुम्ही आम्ही मिळोन नतिज्या द्यावा " ( राजवाडे ८।१३० ).

**नदर** ( स्त्री० )[ अ० नज़र् ] नज़र; सन्धान, सन्धी. " नबाब तर्वारीस हात घालावयासि गेला, ती नदर राजियानें धरून वार केला " ( सभासद २८ ).

**नदारद** ( स्त्री० ) [ फा० नदारद्=त्याच्या जवळ नाहीं ] कुलफडशा. " नदारदची याद दप्तरची भरण्याची सर्कारचे मोर्तबानसी होती ते मशार्निल्हेनीं दाखविली " ( राजवाडे ६।५१८ ).

**नफर** ( पु० ) [ अ० नफर् ] व्यक्ती, जण; इसम; हलका शिपाई. " नफर

मज़्कूर हुजूर आल्यावर जें द्यावयाचें तें पावेल " ( राजवाडे ३।३८७ ). " हिलालखोर साहेबाचा । नफर आहे इतबाराचा । मज रातीं जागावयाचा । हुद्दा दिधला जी" (समर्थकृत-द्विदट ३). " उण्ट नफर पञ्चवीस" ( साने पयाव ३ ).

**नफरी** ( स्त्री० ) हलकी सेवा; मोलाची; भाडोत्री. " लश्कर चाकरी नफरी; काम मनाजोगें होणार नाहीं. याज करितां जावें तरी खांसा लश्कर घेऊन जावें " " साहेबीं आपणास हातीं धरून, पाण्ढरीवरी बैसवून आपल्या हातें नफरी घेतली पाहिजे " (वाड-सनदा १८४).

**नफा** ( पु० ) [ अ० नफ्अ ] फायदा; लाभ.

**नफी** ( स्त्री ) [ अ० नफी ] रद्द; बडतर्फी. "यामुळें शङ्करराव यांजवर दौलाची मर्जी खफा होऊन नालुकियांची नफी करविली " ( राजवाडे ७।७२ ).

**नफेबाज़** कुशलतेनें शक्य तेवढा नफा उकळणारा.

**नफेबाजी** ( स्त्री० ) नफेबाज़पणा.

**नफेशीर** फायदेशीर.

**नफेरी** ( स्त्री० ) [ फा० नफीर् ] एक प्रकारची तुतारी. "सनया नफेरिया बुरङ्गें" ( मुक्तेश्वर–वनपर्व १२।५९ ).

**नबाव; नवाब** ( पु० ) [ अ० नूवाब–नव्वाब् ] सर्वाधिकारी; संस्थानिक; बडा उमराव.

**नबाबात** ( स्त्री० ) वजिरी. "सादत कुलीखानास नबाबात साङ्गितली" (पारसनीस–ब्रप ६६ ).

**नम्दा** ( पु० ) [ फा० नमद् ] लोंकरीचा राम्धा करून दाबून लाटून तयार केलेलें जाड कापड; फेल्ट; जाड बुर्णूस. " हत्तीचे गाशे व नम्दे व भार्कस वगैरे आहे नाहीं पाहोन नवें तयार करावें " ( खरे ७।३३४७ ).

**नमक** निमक पहा.

**नमाज़; निमाज़** ( पु० ) [ फा० नमाज़् ] मुसल्मानांची ईश्वरप्रार्थना.

**नमुदी** ( स्त्री० ) रोख. " ज्याजवर नमुदी असेल त्यास शामील होऊन त्याचा बचाव करावा " ( राजवाडे ७।९ ).

**नमुना** ( पु० ) [ फा० नमूना ] आदर्श; मासला.

**नमूद** ( पु० स्त्री० ) [ फा० नमूद् ] निर्दिष्ट नोन्दलेली; प्रसिद्ध; प्रसिद्धी; जाहिराणा. " दौलतीस धक्का बसलियावर प्रस्तुत दुन्याईत नमूद तुम्ही व्हाल " ( राजवाडे ५।१९ ). " स्वामी ज्यास हातीं धरितील त्यास नमुदांत आणितील " ( राजवाडे ११।५४ ). " एक कार्भारी व हिमतीचा मनुष्य नमुदास येत नाहीं " ( दिमरा १।६७ ). " आतां निश्चयच जाहला कीं इङ्ग्रजांचे नमुदीस बाकी राहिली नाही " ( खरे ८।४३५३ ). " बाकी तुम्ही विचक्षण, रजाचा गज करून दौलत नमुदास आणाल हा मज भरंवसा " ( होके ७ ).

**नर्माई; नर्मी** ( स्त्री० ) [ फा० नर्मी ] सौम्यता; मऊपणा; लीनता. " साम्प्रत तुमचें पत्र बहुत नर्माईचें राजे जैसिङ्ग यांचे भेटीबद्दल कळलें " ( राजवाडे ८। २ ). " कांहींक नर्माई रावतजीनीं धरिली आहे " ( जोरा ६ ).

**नर्मीना** ( पु० ) [ ८ फा० नर्म् पश्मीनाचे धर्तीवर ] मऊ तलम उञ्ची रेशमी कापड.

**नर** ( पु० ) [ फा० नर् ] जनावरांतील पुंसक.

**नरद** ( स्त्री० ) [ फा० नर्द् ] सोङ्गटी.

**नरम** [ फा० नर्म् ] मृदू; मऊ; सौम्य; लीन. काम नरम करणें ( इम २५३ )= काम फत्ते करणें

**नरमणें** मऊ होणें; लीन होणें.

**नर-मादी** ( स्त्री० ) [ फा० नर्मादा ] पुरुष व स्त्री ( जनावरांतील ); मोठें व लहान ( युग्मांतील ); बिजागरी; एक प्रकारचें कुलूप.

**नरी** ( स्त्री० ) [ फा० नरी ] बकऱ्याचें कमाविलेलें कातडें.

**नव-कीर्द; नौकीर्द** ( स्त्री० ) प्रथम लागवड. " नव कीर्दीस रान कोठें कोठें नाङ्गरीत होते तें काम सोडून या धन्यास लागले " ( खरे ९५९ ).

**नव-खरीद** नव्यानें विकत घेतलेलें.

**नव-जवान; नौजवान** [ फा० नव् जवान्] तरुण; अनभिज्ञ; नेणते. "बहुत करून सर्व नवूंजवान आहेत " ( राजवाडे ५।५४ ).

**नव-जवानी; नौजवानी** ( स्त्री० ) [फा० नव्जवानी] तारुण्य; नेणतेपण. "तत्रापि नव-जवानी आहे. कोणे समयीं काय करील कळत नाहीं " (खरे ८।३९२६).

**नव-दिगर; नौदिगर** ( न० ) भलेतसलतें; विरोध. " कांहीं नौदिगर करून बिघाड करूं म्हणाल तर आम्ही तुमचे रफीक नाहीं " ( राजवाडे १।५२ ). " करार जाहला असतां त्यास नव्-दिगर करावें म्हणावें हें कसें ठीक पडेल ?" ( राजवाडे ३।२०६ ).

**नव-निगादास्त; नौनिगादास्त** ( स्त्री० ) नवी फौज़्बन्दी; नवीन ठेवलेली फौज्. " परन्तू प्रस्तुत नौनिगादास्त करीत आहेत " ( राजवाडे १।५६ ).

**नव-रोज; नौरोज़** ( पु० ) [फा० नव्रोझ्] पारशांचा पाडवा.

**नवाज़्खानी** तीक्ष्ण धारेचें.

**नवाज़णें** [ ८फा० नवाझ् ] लालन पालन करणें; परामर्श घेणें; स्तुती करणें; पारितोषिकें देणें. " निन्दी तयातें निवेद् नवाजे । तो एक मूर्ख जाणावा" ( मुक्तेश्वर-मूर्खलक्षणें १८ ). " त्याणीं ऐसा सिष्टाचार केल्यानन्तर याणीं त्यासच नवाजिलें " ( राजवाडे ६। ३१४ ).

**नवाज़णी** ( स्त्री० ) **नवाज़णूक** ( स्त्री० ) वाखाणणी; परामर्श.

**नवाज़स; नवाजीस** ( स्त्री० ) [ फा० नवाझिश् ] वाखाणणी; परामर्श.

**नवाज़श-नामा** ( पु० ) कृपापत्र.

**नवाजी** ( स्त्री० ) [ फा० नवाझी ] नवाजीस.

**नवाजीस** गौरविलेला; आश्रित ( राजवाडे ८।२२१ ). " सन्ताजी घोरपडे पूर्वी महाराजांचे नवाजीस " ( मराचिथोरा ४६ ).

**नवाब** ( पु० ) नबाब पहा.

**नवार; नुवार** ( स्त्री० ) [ फा० नवार्-नुवार् ] पलङ्ग विणण्याची जाड सुती पट्टी.

**नविस्ता** ( पु० ) [ फा० नविश्ता] लिखित; पत्र. " याचा नविस्ता आला असेल " ( साने-पयाव ४८८ ).

**नवीसन्दा** ( पु० ) [ फा० नवीसन्दा ] लेखक; कार्कून. " एक नवीसन्दा ... दिनचर्यची अखबार लिहिण्याकरितां रवाना करून " ( राजवाडे ५।१०५ ). " नवीसिन्दा " ( राजवाडे २०।३०५ ).

**नश्यत; नशियत** ( स्त्री० ) [ अ० नसीहत् ] उपदेश; शिक्षा. " रीतीच्या गोष्टी साङ्गून नशियत करावी; ऐकिल्यास उत्तम ! " ( राजवाडे ५।८७ ).

**नशा; निशा** ( स्त्री० ) [ अ० नशात् ] कैफ; गुङ्गी. नशा करणें=अमली पदार्थांचें सेवन करणें.

**नशा-खोर** ( पु० ) [ फा० नशा-खुर् ] कैफी; अमली.

**नशीन** [ ∠ फा० निशीन्=बैस ] आरूढ. तक्त-नशीन=सिंहासनारूढ; गादी नशीन, जहन् नशीन वगैरे.

**नशीब** ( न० ) [ अ० नसीब् ] नेमणूक; वांटा; दैव.

**नशीब्वान** सुदैवी, ताळेवार.

**नशीहत-पूर्वक** निकडीचा, निक्षून. "म्हणोन नशीहत-पूर्वक आज्ञा केली" ( साने-पयाव ६६ ).

**नशेकची** ( पु० ) [ अ० निशाक्=व्यवस्था ] व्यवस्थापक. " नशेकची येऊन लोथ परतोन नेले " ( राजवाडे ६।४७२ ).

**नस्तर** ( न० ) [ फा० निश्तर् ] शस्त्रक्रियेचा लहान चाकू. नस्तर मारणें=नस्तरानें लहान काप काढणें.

**नस्राणी** [ अ० नस्रानी ] ख्रिस्ती; लुच्चा; काफर.

**नसल** ( न० ) [ अ० नस्ल् ] प्रजा; बीज. " राजाचें नसल नाहीं म्हणोन आईसाहेबांनीं साफच साङ्गितलें " ( राजवाडे ६।३४९ ). " पादशाही नसल यांसी व खांसा यांस नशियत केली " ( मराचि धाशा ५५ ).

**नसीहत; नशेत** ( स्त्री० ) [ अ० नसीहत् ] उपदेश; समजावणी; शिक्षा. " सामें साङ्गतां नायकत; तेव्हां दण्डें साङ्गावें ...यास्तव सबुरीच केली आहे; पुढें राजदर्शन जाल्यावरी जे नसीहत करणें तें हुजुरून करूं " ( राजवाडे ३।३३३ ). " दुर्गकर राजे यांनी परशुरामपन्तांस बहुत नशेत करून लिहिलें आहे " ( खरे ४।१५६७ ). " हाली तो दुष्ट त्या प्रान्ते गेला आहे. त्या बरीशी नशेद्च करणें " ( राजवाडे ३।२९५ ). " फते पावलों व नौकर लोकांस धरून नसेती केल्या " ( राजवाडे १५।२९८ ).

**नहर** ( पु० ) [ अ० नह्र् ] पाट; नळ; कालवा. " दिल्लीचा नहर दरोबस्त तयार करवून पुन्हा नहर जारी करावा " ( दिमरा २।३९ ). " नहर शुष्क जाहले ते जारी जाले नाहींत " ( राजवाडे ५।१११ ).

**ना-इत्यफाक** ( पु० ) असख्य; वैर; लढाई. "ना इत्यफाकामुळें वऱ्हाडांत गेलों" ( ऐटि ३।१७ ). " कुम्पणीशी व भोंसल्याशीं ना-इतेफाकी येऊन अजण्ठ्याचे घांटावर लढाई झाली " ( वाड-कैफियती ११६ ).

**ना-इलाज्** ( पु० ) [ अ० ला-इलाज् ] निरुपाय; लाचार.

**ना-उमेद** ( स्त्री० ) निरुत्साह; उत्साहभङ्ग; उत्साहभग्न. " फौजांस पाटीलबावांस यावयास दिरङ्ग यास्तव ना-उमेद लोकांस होते" ( दिमरा १।८९ ). " याजमुळें सावकार व इतर लोकांस ना-उमेद जाली; पेस्तर आबादी होतां दिसत नाहीं " ( साने-पयाव ३३ ).

**ना-कबूल** [ फा० ना-कबूल् ] नाखूश; नापसन्त; प्रतिकूल. नाकबूल जाणें=नाकबूल करणें.

**ना-काबली** ( स्त्री० ) कर्तृत्वशून्यता ( होकै १६ ).

**ना-कारा** ( पु० ) [ फा० ना-कारा ] निरुपयोगी. "ऐसा नाकारा कशास पाहिजे म्हणून दिला" ( राजवाडे ५।२० ). " वरून जुडी चाङ्गली

दिसते; परन्तु आंत बहुत नाकारी" (खरे ११।६०११).

**नाकारेपण** (न०) कुचकामीपण. "त्याजकडे नाकारेपण यावें अशा खोट्या चाली दिसून येतात" (मद्या २।४९).

**ना-कुवत** (स्त्री०) अशक्तता; जैफी; अशक्त. "नाकुवत, त्यांतून पांच सात दिवसां पासोन दुस्तही दोन तीन होतात" (राजवाडे ७।९९). "फिरङ्गी तरी लबाड व नाकुवत" (राजवाडे १२।१२१).

**ना-खुश** [ फा० ना-ख़ुश् ] नाराज; असन्तुष्ट; रुष्ट. "ये गोष्टीस उजूर कराल तरी स्वामी नाखूश होतील" (वाडशाछ २०).

**नाचार** [ फा० ना-चार् ] लाचार; असमर्थ.

**नाचीज़** [ फा० नाचीज़् ] व्यर्थ. "रिकामें बैसोन लोकांहातीं नाचीज़ खावबून काल व्यर्थ न गमावणें" (इम १०५). "अतःपर गनिमावरी सलाबत चढवून केळवें माहीम हीं स्थळें ज़बर्दस्तीनें घेतली, तरीच त्या लोकांची व सर्दारांची शाबास; नाही तरी पैका खाऊन नाचीज़ होतो" (पारसनीस-ब्रच ७७).

**ना-तवान** [ फा० नातवान् ] असमर्थ, "रयत नातवान असालिया दाणेपैके यावे" (चित्रगुप्त ३९). "ये गोष्टीस गड किल्ले तूर्त ना-तवान पडिले आहेत; त्यांचे बेगमीस दहा हज़ार रुपये यावे" (राजवाडे ८।८९).

**ना-तवानगी** ( स्त्री० ) असमर्थपणा. "नातवानगीचा वक्त आपला; व मुलखाचा ऐवज़ कोठें दिसों नये" (राजवाडे ३।५७).

**ना-तवानी** (स्त्री०) [ फा० नातवानी ] दुबळेपणा; गरिबी. "परन्तू ते आपली नातवानी बहुत साङ्गतात. त्यांची पांचशें रुपयांची रद्बदल आहे" (खरे ७।३५१५).

**ना-दान** [ फा० नादान् ] नेणता; कुचकामाचा; नाकारा. "मुख्य धणी तो लहान ना-दान" (दिमरा १।५९).

**ना-दानी** ( स्त्री० ) [ फा० नादानी ] मूर्खपणा. "कांहीं नादानी आम्हांपासून न जाली" (राजवाडे ३।१२३).

**ना-दार** [ फा० ना-दार् ] कङ्गाल; दिवाळखोर.

**ना-दारी** ( स्त्री० ) [ फा० ना-दारी ] निर्धनता; शाळेंतील फीची माफी. "राज्याचे हालीमाजीचे विज्यरामुळें शिरस्ता मोडत आला आणि हक्क रुसूमही झाडून उगवेना सबब नादारीस आलों आणि लोकांचे कर्ज़बाज़ारी जाहलों" (राजवाडे १३।९१).

**ना-दुरुस्त** [ फा० ना-दुरुस्त् ] भग्न; बिघडलेलें; अनुचित; अनिष्ट. "हें हिन्दूंच्या महज़बांत बहुत नादुरुस्त" (खरे ७।३५६६). "इङ्ग्रेज़ांचा कदम पातशाही मुलुकांत बहुत नादुरुस्त व त्यांची तम्बी होऊन खारीज़ करावें यांतच खैरीयत" (राजवाडे १२।२२).

**ना-दौलत्खाही** ( स्त्री० ) अनहिताची इच्छा; अहितेच्छुता ( राजवाडे ५।८ ).

**ना-पसन्त** [ फा० नापसन्द् ] अप्रिय.

**ना-पाक** [ फा० ना-पाक् ] अस्वच्छ; अपवित्र.

**ना-पैवस्ता** न पोंचलेला; अप्रविष्ट. "त्यापैकीं ना पैवस्ता रुपये दोन" (राजवाडे ६।२३३).

**ना-बालीक** [ फा० नाबालिग् ] वयांत न आलेला

**ना-बूत; ना-बूद** [ फा० न-बूद् ] नव्हता असा; नष्टप्राय; अविद्यमान. " नजीबखानास नाबूद करावें हे मस्लत त्यांनीं केली " ( मद्बा १।६९ ). " खरीफ नाबूद जालें व रबीचे बाड जाले " ( राजवाडे २०।२८ ). " तोफांच्या आवाजानें पाणी किल्यांतील नाबूद जालें " ( मद्बा १।२०५ ). " रयत शाबूद तर त्यांत आमचें कल्याण ती नाबूद झाल्यास आमची हक्कदारी आम्ही कोठें पहावी ? " ( भा-जुऐगो २५ ). " पळती फौज; पाणी पन्धरा वीस कोस नाबूद " ( होकै ६४ ).

**ना-मर्द** [ फा० नामर्द् ] बाइला; भ्याड.

**ना-मर्दी** ( स्त्री० ) [ फा० ना-मर्दी ] भ्याडपणा; नामर्दुमी. " मिरज आम्ही सोडली; कांहीं नामर्दी केली नाहीं " ( खरे १।२६५ ).

**ना-मर्दुमी** ( स्त्री० ) [ फा० नामर्दुमी ] नामर्दी.

**ना-माकूल** [ फा० ना + अ० मअकूल् ] मूर्ख; बेवकूब ( मराआ ३५ ).

**ना-माफकत** ( स्त्री० ) [ ∠अ० मुवाफकत् = ऐक्य] बेदिली; बेदील. "यासी व त्यासी ना-माफकत पडली " (चिरा २४). " मुत्सद्दी हे सर्व नामाफकत; कोणाचीही चित्तशुद्धता नाहीं" (दि-रा १।२०५ ). " नबाब मौसूफ व नबाब बहादुर यांची तर्फेन ना-माफकत " ( राजवाडे १९।१६ ).

**ना-मुनासब** [फा० ना-मुनासिब्]अयोग्य; अनुचित. " ही गोष्ट हिन्दूंचे महज्बांत बहुत ना-मुनासब " (खरे ७।३५६७). " ही शकल ना-मुनासब जाणून " ( राजवाडे १९।८ ).

**ना-मेहेरबानी** ( स्त्री० ) [ फा० ना-मिह्र्बानी ] अवकृपा; इतराजी. " बाजी खुसी करितां नेमस्त खुतूत तया आढळली तरी मग जे ना-मेहेरबानी करणें ते करावी " ( राजवाडे ८।१० ).

**ना-मोहरम** [फा० महूरूम्=निराश] निराश; अपेशी; अयशस्वी; पराभूत. "सोबतीच्या लघु पुरुषाच्या बुद्धीस लागोन नसती कल्पना वाढवोन धण्याचा मन्सबा ना-मोहरम केला" ( राजवाडे ८।१२६ ).

**ना-रजावन्दी** ( स्त्री० ) इतराजी; गैरमर्जी ( राजवाडे १०।२५२ ).

**ना-राज** [ फा० नाराझ्-नाराझी ] असन्तुष्ट.

**ना-राजी** ( स्त्री० ) असन्तुष्टता.

**नालस्ती** ( स्त्री० ) [ फा० नारास्त्+ई ] गैरवाका समजावणी; निन्दा; तक्रार.

**ना-लायक** अपात्र.

**ना-लायकी** ( स्त्री० ) अपात्रता.

**ना-वाकब** [ फा० नावाकिफ् ] अजाण; गैर-माहीत. "माझे चालीस व कामास वाकब या मुलखांत जे साहेब लोक आहेत तेच मजवर वहीम धरूं लागल्यास पुढें नावाकब सर्दार येतील तेव्हां मुश्कल पडेल असें मनांत आणून मी लिहिलें आहे " ( भाइसंम १८३८ अहवाल ९ ).

**ना-हक** [ फा० ना-हक्क ] हक्कावांचून; विनाकारण; अन्यायानें.

**ना-हिम्मत** (स्त्री०) गैर-हिम्मत. "सारांश अमिरांनीं व पातशानीं नाहिम्मतीनें फजिती करून घेतली " ( पारसनीस-ब्रच ११७ ).

**नाखुदा** ( पु० ) [ फा० नाखुदा ) जहाजावरचा अधिकारी, ताण्डेल.

**नाज़र; नाजीर** ( पु० ) [ अ० नाज़िर् ] न्यायाधिशाचा चिटणीस.

**नाज़रीबाज़ार** (पु०) मिनाबाज़ार. "तमाम पुरुषांनीं घरांत रहावें व बायकांनीं दुकानावर माल विकावा, बायकांनींच जाऊन खरेदी करावी; पुरुष मिळून एक - पातशहा निगाहबाजी त्या बाजा-रांत घोडीवर बसून, मोतद्वार खिस्म-तगार सुद्धा बरोबर कोणी नाहीं, नसावें-त्याचें नांव नाज़री-बाज़ार" (गोख-चिशाच ६ ).

**नाज़ल** [ अ० नाज़िल् ] अवतीर्ण. "त्यासही कुराण शरीफ कलामुल्ला किताब नाज़ल आली; त्यांत दाखला कीं आतां पैग-म्बर होणार नाहींत व किताबही येणार नाहीं" ( ऐस्फुले ६५ ).

**नाज़ुकाई** ( स्त्री० ) नाज़ूकपणा.

**नाज़ूक** [ फा० नाज़ुक् ] कोमल; सुकुमार; भेद्य; कमकुवत; काळजी पूर्वक करा-यला हवी, नाहीं तर द्रव्याला अब्रूला अगर जिवाला अपाय होईल अशी ( गोष्ट ); महत्त्वाची. "तूं तर केवळ देवाघरची मुखराणिमध्यें श्रेष्ठपर्णा ! नाज़ुक साजुक कळी प्रफुल्लित पातळ पुतळी ठेङ्गणी" ( अनन्तफन्दी ७८ ).

**नादर** [ अ० नादिर् ] दुर्मीळ; अजब; सुरळा; अमोल. "गुळगुळीत अशी नादर-विरञा" ( प्रभाकर ९३ ) "साता लक्षांचा तोफा ताफ...बहुत नादर तयार करवून" (दिमरा १।७९). "तनु नादर नाज़ुक कोम, अङ्गामधें जोम, नूतन कवळी" (प्रभाकर १८६ ).

**नान्-पर्वेशी** (जन-पर्वेशी?) (स्त्री०) [फा० पर्वरिश् सङ्गोपन, पालन; फा० ज़न्= स्त्री० ] लढाईत कामास आलेल्यांच्या बायकांस करून दिलेली नेमणूक.

**नान-कुराण; नानोकुराण** ( न० ) [ फा० नान् = भाकर + उ आणि + कुर्आन् = कुराण ] इमान, प्रमाण; बेलभण्डार. "नवाबांनीं निखालसपणें नान-कुराण द्यावें" ( राजवाडे ६।३५८ ). "अहद -पैमान व नान-कुरान घेऊन पाठवावें" ( दिमरा १।३१). "जे जे अर्ज आम्ही मध्यस्थाबराबर साङ्गून पाठविले आहेत ते आयकून सर्व प्रकारें आपलें नानो-कुरान करून देतील तेव्हां आम्हीही किल्ल्याविसीं इमान देणें तें देऊं" ( राजवाडे ६।३५६ ).

**नाफा** ( पु० ) [ फा० ] कस्तूरि-पेशी. "कस्तुरीचे नाफे व विलाईतचे तोफे पाठविले ( पद्मव ९७ ).

**नाम-जा** ( स्त्री० ) [ फा० नाम् नांव, प्रतिष्ठा + फा० जाह्=हुद्दा ] मान महत्व; ख्यात. "वडील वडीलापासून स्वामीकार्य प्रसङ्गें धण्यास सन्तोषी करून आपली नाम-जा सम्पादीत आलेस" ( राजवाडे ८।१३९ ).

**नाम-ज़ाद; नामज़ात; नामज़ादी** ( स्त्री०) [ फा० नाम्ज़द् ] नियुक्त; नियोजित; अधिकारी; नेमणूक; जागीर; स्वारी. "ते लोक किल्ल्यावर ठेवावयाचे उपयोगी नसल्यास त्यांस दुसरे जागां नामज़ाद पाठविणें" ( वाडसमा १।२७८). "तेव्हां त्यांनीं शिक्र्यांवरी नामज़ात रवाना केली" ( राजवाडे १५।६). "पुढें लखम सांव-तावरी राजियांनी नामज़ादी केली" ( सभासद ५४). "किल्ले मज़्कुरी हुज़ूर हशमांकडील लोक नामज़ादीस आहेत" ( वाडसमा १।२७९ ). "कांहीं नामज़ादा

चार पांच लक्ष रुपये मिळतील ऐसें आहे" (साने-पयाव ९४).

**नाम-दार** [ फा० नाम्‌दार्‌ ] नामाङ्किकत; प्रसिद्ध.

**नाम्वर** [ फा० नाम्वर्‌ ] प्रसिद्ध ( हिच २६१ ).

**नाबद्-चूर्ण** ( न० ) पिठीसाखर. "अरुवार सोजिया फेणिया । नाबद्-चूर्णे कोंदलिया" ( मुक्तेश्वर-विराटपर्व ८। ७१ ).

**नाबदी** ( स्त्री० ) [ अ० नबात्=ऊंस ] खडीसाखर; साखर. "व्यासवचन इक्षुदण्डु गाळूनि सुरस सारांश गोडु देश-भाषा वळिले लाडु नाबदेचे आवडी" ( मुक्तेश्वर-सभापर्व १।१९ ).

**नामा** ( पु० ) [ फा० नामा ] पत्र; खलिता. "तैमूरशहानीं पातशहास नामा स्नेह-वृद्धीचा पाठविला आहे" ( दिमरा १। २१८ ).

**नामी** [ फा० नामी ] नामाङ्किकत; उत्तम; उत्कृष्ट.

**ना-मुराद** [ फा० ना-मुराद्‌ ] अनिष्ट (?) "जयाजी तर मुल्लख ना-मुराद्‌ आहे" ( राजवाडे ६।६१७ ).

**नामुश्की; नामोशी** ( स्त्री० ) [ अ० नामूस्‌ ] कीर्ती; बेअब्रू.

**नामोश** ( पु० ) **नामोशी** ( स्त्री० ) [अ० नामूस्‌] कीर्ती; अपकीर्ती. "नामोशाचे सर्दार" ( सभासद ४९ ) = अस्कऱ्याचे सर्दार. "गड आले तरि बरें...नाहीं तर नामोश जाईल" (सभासद ३३ ). "तुमची सम्शेर गाजली, तिचा नामोश त्रैलोक्यांत जाला; यापरीस थोर तें काय!" ( इम २०९ ). "मागें हटली फौज़ तर नामोश आपला" ( खरे १२। ६४०० ).

**नामोसी** कीर्तिवन्त. "तुम्ही लोक कामाचे नामोसी असां" ( राजवाडे १७।३१ ).

**नायब; नैब** (पु०) [ अ० नाइब्‌ ] बदली काम करणारा; दुय्यम अधिकारी; नैब ( इम ३३ ).

**नायब-मुनायब** ( पु० ) [ अ० नाइब्‌-मुनाइब्‌ ] नायब; प्रतिनिधी; मुतालीक.

**नायब-मुनायबी** ( स्त्री० ) प्रतिनिधित्व. "नायब-मुनायबी म्हणजे वकील-मुल्लकीची गुमास्तगिरी" (ऐटि२।८९).

**नायबत** ( स्त्री० ) [ अ० नियाबत्‌ ] मुतालिकी. "त्यांची नायबत आम्हीं तुम्हांस देतों" ( दिमरा १।१०९ ).

**नारिङ्ग** ( न० ) [फा० नारङ्ग्‌ ] साखर-लिम्बू.

**नाल** ( पु० ) [ अ० नअल्‌ ] जोड्याच्या अगर जनावराच्या टांचेला बसविलेली पोलादी अर्धचन्द्राकार पट्टी.

**नाल्बन्द** ( पु० ) [ फा० नअल्बन्द्‌ ] नाल ठोकणारा.

**नालबन्दी** ( स्त्री० ) [ फा० नअलबन्दी ] नालठोकणी; मोहिमेवर जातांना शिपायांस देण्यांत येणारी आगाऊ खर्ची.

**नाल्मेख** ( स्त्री० ) नाल-बन्दी. "रोख दोन हजार रुपये नाल्मेखचे पाठविले" ( ऐस्फुले ६५ ).

**नालीश; नालिशी; नालीस** ( स्त्री० ) [ फा० नालिश्‌ ] रड; आक्रोश; ओरड; तक्रार; निन्दा. "एक वेळ नालीश केली त्याची शिफारस करूं लागल्यास ठीक बसत नाहीं" (राजवाडे ५।१७). "परन्तु ते मनास येईल त्याप्रमाणें नालिशी लिहितात; उलटी आमची बद्-नाम नालीश होते" ( राजवाडे ३।१४४ ). "कोणाची नालीस हुजूर येऊं देणार नाहीं" (राजवाडे ६।६१३).

" सर्कारचे मुतसद्दी रात्रन्दिवस नालिशी करितात " ( राजवाडे २२।१०४ ).

**नांवाज़णें; नवाज़णें** [ ∠ फा० नवाझ् ] लालन पालन करणें; परामर्श घेणें; स्तुती करणें; पारितोषिकें देणें.

**नांवाजिशी; नावाजीस** ( स्त्री० ) [ फा० नवाझिश् + ई ] स्तुती; तारीफ. " तुमचे मर्दुमीची नांवाजिशी करून " ( चित्रगुप्त ९ ).

**नांवाजीक** मर्जीतला, थोर.

**नासूर** ( पु० ) [ अ० नासूर ] नेहमी वाहणारा व भरून न येणारा व्रण.

**नाहबी** ( स्त्री० ) [ अ० नाहिब्=लूट नाश करणारा ] लूट; जाळपोळ.

**निका** [ फा० नेक् ] चाङ्गला, सुन्दर; उत्कृष्ट.

**निका** ( पु० ) [ अ० निकाह् ] विवाह ( मुसलमानाचा ). " निकाह " ( दिमरा २।९५ ).

**निकीब–दार** ( पु० ) [ अ० नकीब् ] नकीब ( खरे ९।४८२३ ).

**निखालस** [ नि + अ० खालिस् ] शुद्ध; निष्ठावन्त; खात्रीनें; स्पष्ट. " शिवाजी निखालस आपले पदरींचा गेला. " " देशस्थ ब्राम्हण निखालस, महाराजांचे स्वराज्याभिवृद्धीस जिवाची तमा न धरितां झटले " ( चित्रगुप्त १२३ ).

**निखालसता; निखालसी** ( स्त्री० ) शुद्धभाव; संशयनिवारण; खात्री; खातर्जमा; स्नेह. " निखालसी " ( खरे ९।४८-४२ ). " हरतऱ्हा होऊन निखालसीचा प्रकार घडेल या अन्देशावर मी बोलतों " ( साने–पयाब २३६ ).

**निखालस–पत्र** ( न० ) यजीदपत्र ( राजवाडे २०।४१९ ).

**निगा; निघा** ( स्त्री० ) [ फा० निगाह् ] दृष्टी; संरक्षण; जतन; माफजत; काळजी. " त्याजवर नेक–निगा मेहरबानगीची ठेऊन " ( मदरु २।७५ ). निगा करणें ठेवणें = काळजी घेणें.

**निगाबानी; निगेबानी; निगावानी; निगेवानी** ( स्त्री० ) [ फा० निगह्–बानी ] संरक्षण; बन्दोबस्त. " शहरची निगाबानी मात्र करितात " ( दिमरा २।१५० ). " निगेवानी शहाणा कोणी योजून ठेऊन बन्दोबस्त असावा " ( खरे १०।५५०६ ). " हली चहूंकडे चौकी पहारा निगाबानी लश्करांत आहे " ( दिमरा २।१६४ ). " वाड्याची व देवाची व वरलचे बागाची तितक्यातच निगेवानी करणें ( राजवाडे १२।१३६ ).

**निगादास्त; निघादास्त** ( स्त्री० ) [ फा० निगाह्–दाश्त् ] शुश्रूषा; फौजभरती; फौजबन्दी. " तूं त्याची निगादास्त करणें " ( पेद्समा ४ ). " फौजेची निगादास्त जारी केली आहे " ( दिमरा २।९ ).

**निगारश** [ फा० निगारिश् ] लेखन. " त्याचा दुर्जबाब... कलकत्तेकर यांनीं निगारश केला " ( राजवाडे १०।१६४ ).

**निगाह–बाजी** पाहणारा ( गाखचि शाच ६ ).

**निगेबान; निगेवान** ( पु० ) [ निगह्बान् ] पहारेकरी.

**निगेबानी; निगेबन्दी** ( स्त्री० ) निगेबानी; संरक्षण. " आपलियासी दोन कामें जरूर: एक आपली हद्द कायम राखणें आणि वजिराची निगेबन्दी करणें " ( राजवाडे ६।३८३ ).

"मालाची निगेबानी" (वाडसमा २।६६).

**निघाल्कत** (स्त्री०) [फा० निगाह् = दृष्टी अ० हर्कत्=हालचाल] टेहेळणी. "महागिऱ्या निघाल्कतीच्या चलाक ऐशा" (वाडसमा २।७८).

**निजाम** [अ० निझाम्] व्यवस्था; व्यवस्थापक; दक्षिण हैद्राबादचे अधिपती.

**निफाक** (पु०) [अ० निफाक्] खलश; वैर. "नवाब व श्रीमन्त उभयतांत निफाक येणें ठीक नाहीं" (साने-पयाव १०९). "खुलास दुनियाईचे आलमांत जितक्या तवक्याच्या शकला आहेत त्या तर्फेत दाखवून हर तद्बिरीनें निफाक पाडावयासी कसूर करणार नाहींत" (साने-पयाव ४७८).

**निमक** (न०) [फा० निमक्-नमक्] मीठ.

**निमक-हराम** [फा० निमक्-हराम्] कृतघ्न; स्वामीद्रोही; हरामखोर.

**निमक-हरामी** (स्त्री०) [फा० निमक्-हरामी] कृतघ्नता; स्वामिद्रोह; हराम्खोरी.

**निमक-हलाल** [फा० निमक्-हलाल्] कृतज्ञ; प्रामाणिक, स्वामिनिष्ठ. "सरनाइगोंडा मज्कूर पाद्शाही नमक-हलाल" (वाड-सनदा ३२).

**निमक-हलाली** (स्त्री०) [फा० निमक्-हलाली] कृतज्ञता; प्रामाणिकपणा; स्वामिनिष्ठा. "ईश्वरें त्यांचें नमक-हलाली वर नज़र करून मनोदयानुरूप केलें" (राजवाडे ५।८६).

**निम्चा** (पु०) [फा० निम्चा] लहान तर्वार. "तोफखाना फोडून निम्चाची लढाई झाली" (राजवाडे ६।२२८).

**निमा** (पु०) [फा० नीम्] अर्धा.

**निमा** (पु०) [फा० निमा] आंतून घालावयाचा अर्धा अङ्गरखा.

**निमाज़** (पु०) नमाज़.

**निमाज़मत** (स्त्री०) [मराठी प्रयोग] प्रार्थना. "शहरांत ज़ुमियाची (=शुक्रवारची) निमाज़मत यास आले होते" (राजवाडे १।१९५).

**नियत** (स्त्री०) [अ० नीयत्] हेतू; बुद्धी; दानत; विचार; वृत्ती; मोईन. "जशी नियेत तशी त्यास बर्कत" (वाड-सनदा १५०). "शहाजीची नियत साम्प्रतकाळीं ठीक नाहीं" (दिमरा २।५). "भण्डारा व नन्दादीप चालवावा ऐसा नियेत करून" (राजवाडे १५।१९५). "(श्रीज्ञानेश्वराच्या) या समाधिस्थळीं पूजा पुनस्कार चालिला पाहिजे म्हणून, कैलासवासी महाराज व कैलासवासी मातुश्री जिजाऊ व कैलासवासी राजेसाहेब या त्रिवर्गांनीं आपलाले वेळेस नियत करून दिल्ही" (वाड-सनदा १६८).

**नियत-शाबुदी** (स्त्री०) अढळ सद्बुद्धी. (होकै १३).

**नियाज़्मन्द** [फा० नियाझ्मन्द्] विनन्ती करणारा, अर्ज़्दार. "नियाज़्मन्द बाळाजी नारायण नातू" (भाइसंम १८३८ अहवाल ८).

**नियाबत; न्याबत** (स्त्री०) [फा० नियाबत्] नायबी; मुतालिकी; प्रतिनिधित्व. "न्याबतचा खिलत" (दिमरा २।१७).

**निरख** (पु०) [फा० निर्ख्] किम्मत; भाव. "शेळीचें दूध एकवीस शेर याप्रमाणें लष्करांत निरख आहे" (खरे ८।३९७६).

**निरख-बन्द** ( पु० ) [ फा० निर्ख़्-बन्दी ] भावाचा तक्ता ( खरे ७।३७९१ ).

**निवारशी** [ ∠अ० वारिस् ] बेवारशी.

**निविश्तन** [ फा० निविश्तन् ] लेखन. "आं शहामत-पन्हा यांहीं किताबत निविश्तन केली; पोहोंचून त्यामधील मज़्मून जाहीर जाहला" ( पदमव ३४ ).

**निविस्ता** (पु०)[फा० निविश्ता] लेख; पत्र. "निविस्ताही मर्सूल जाहला होता; अम्मा जवाब येऊन पोहोंचला नाहीं" ( राजवाडे ३।९० ).

**निवीसिन्दगी** ( स्त्री० ) [ फा० नवीसन्दगी ] लेखकाची वृत्ती. "हुद्दे-निवीसिन्दगी" ( राजवाडे २०।३०४ ).

**निश्प** [ अ० निस्फ् ] अर्धे. "याशीं त्याशीं लढाई होऊन निश्प जमियेत मारून घेतली" ( साने-पयाव ४८१ ).

**निशस्त** ( स्त्री० ) [ फा० निशस्त् ] बैठक. "दीड प्रहर पावेतों निशस्त राहिली" ( राजवाडे ५।१४१ ).

**निशा** ( स्त्री० ) [ ! अ० निस्आ-नसिया उधारीची पत; वचन ] "सावकाराचा ऐवज पोचता करून देण्याची जामीनकी;" खातर्जमा.

**निशा** ( पु० ) [ अ० निशात् ] आनन्द; कैफ. "पत्रें पाठविलीं प्रविष्ट होऊन आमचे चित्ताचा निशा जाहला" ( पारसनीस-ब्रप ३०१ ).

**निशाण** ( न० ) [ फा० निशान् ] चिन्ह; खूण; ज्या ठिकाणीं नेम मारावयाचा ती जागा; झेण्डा. "आमचे व आपले इत्तिफाकानें ( =ऐकमत्यानें ) इङ्ग्रजांचें नांव व निशाण नाहीं सारखे नेस्तनाबूत होतील" ( राजवाडे १०।१८२ ).

**निशाण-दार** ( पु० ) निशाण धरणारा. "हत्तीवरल्या निशाण-दारास पायास गोळी लागली ( राजवाडे ६।१२५ ).

**निशाण-बर्दार** ( पु० ) [ फा० निशान्-बर्दार् ] निशाण धरणारा.

**निशाण-बाज़** ( पु० ) उत्तम नेम मारणारा.

**निशाण-बाजी** ( स्त्री० ) नेम मारणें; वेध.

**निशाणी** ( स्त्री० ) निशाण; खूण.

**निशाबाज़** ( पु० ) [∠अ० नशात् ] कैफी.

**निशेदार** पतदार; साख-दार.

**निस्बत; निस्पत; निस्बती** ( स्त्री० ) [ अ० निस्बत् ] सम्बन्ध; तर्फ; पक्ष; शिफारस; योग्य. "हिंगुलगिरी मानभाव येऊनु हर्कती करूनु यास बाहीर घालावयास त्यास काय निस्बती आहे" ! ( राजवाडे १५।१४० ). "तुम्हांस निस्बत नाहीं" ( इम १३० ). "तसाच सदर-सर्नोबत म्हणजे निस्पृह, कोणाचे निस्पतीचे अथवा एकाचे आर्जवामुळें ठेवावे असें नाहीं" ( मराआ २९ ); "कोणी दिक-हर्कत करणें निस्बत नाहीं" ( राजवाडे ३।५०२ ). "फन्द-फितुरी केल्यास आपण हज़र करूं, न करूं तर त्याचे निस्बतीचा जाब करूं" ( भाइसम-तृसवृ ६५ ).

**निस्बत** ( पूर्वगामी अव्यय ) = च्या तर्फेचे; दिमत.

**निस्बती** [ फा० निस्बती ] सम्बन्धी. "जे कोणी हमदार्नीचे निस्बती लोक असतील त्यांस कैद करावें" ( दिमरा १।२०८ ).

**निसिन्दा** ( पु० ) [ फा० नवीसन्दा ] लेखक. "बाळाजी निसिन्दा पूर्वी सर्कार तर्फेनें होता" ( राजवाडे २०।३०५ ). "नविसिन्दा" ( राजवाडे २०।३०५ ).

**निसिन्दगी** (स्त्री०) निवीसिन्दगी. "पेसजी निसिन्दगी सर्कारांतून मुशाहिरा देऊन चालवीत असत " ( राजवाडे २०। ३०४ ).

**निहायत; न्यहायत** ( स्त्री० ) [अ० निहायत्] सीमा; पराकाष्ठा; निःसीम. "महाराजांनीं अङ्ग्रेजीची व जानी-निशी मर्दुमीची निहायत केली" ( चित्रगुप्त ३३ ).

**नीम** [ फा० नीम् ] अर्ध.

**नीम-रजावन्द** =अर्ध प्रसन्न. "सफ्दर जङ्ग यास नीम-रजावन्द करून आपले लगामी लावावयाचा विचार केला असे" ( साने-पयाव ७५ )

**नुक्ता** ( पु० ) [ अ० नुक्ता ] खुबीदार वाक्य; सुभाषित. "पत्रें लिहिलीं त्यांतील नुक्ते व चुटके उत्तरें यावयाजोगे, बहुत लिहिण्यांत आलीं" ( राजवाडे ७ खलप २।२६ ).

**नुक्ता** ( पु० ) [ अ० नुक्ता ] टिम्ब.

**नुक्सान** ( न० ) **नुक्सानी** ( स्त्री० ) [ अ० नुक्सान् ] तोटा; नाश; हानी.

**नूर** ( पु० ) [ अ० ] तेज; तजेला; प्रसन्नता. नूर-जहान=जगत् द्युती; जहांगीर बादशहाच्या बेगमचें नांव. "कोहि-नूर" द्युतिगिरी; एका जगप्रसिद्ध रत्नाचें नांव.

**नेक** [ फा० नेक् ] चाङ्गला; प्रामाणिक; सुन्दर.

**नेक-खाही** ( स्त्री० ) [ फा० नेक्-खाही ] हितेच्छा. "नेकखोई जाहीर करणें" ( राजवाडे १७।३१ ).

**नेक-जात** [ फा० नेक्ज़ात् ] सुशील; अभिजात.

**नेक-दार**. प्रामाणिक, प्रामाणिकपणें. "तो पुरुष चाकरीस नेक्दार आहे" ( गोखचिशाव ३७ ). "असे कामदार नेक्दार वागले म्हणून राज्य चाललें" ( राजवाडे ६।५११ ).

**नेक-नज़र** ( स्त्री० ) [ फा० नेक्नज़र् ] कृपादृष्टी. "साहेबाचे नेक नज़र करून सेरी कराची खबेर सलामत असे" ( राजवाडे १५।७६ ).

**नेक-नाम** [ फा० नेक्-नाम् ] सुकीर्तिमान्. "आणि सर्वांत नेक-नामही असावें" ( राजवाडे ६।३७७ ).

**नेक-नाम्दार** प्रामाणिक व नामाङ्कित; एक पद्वी.

**नेक-नाम्वरी** ( स्त्री० ) सुकीर्ती ( जोरा १२९ ).

**नेक-नियत** ( स्त्री० ) [ फा० नेक्-नीयत् ] सद्बुद्धी; सद्बुद्धीचा. "टोपीवाल्यांत इङ्ग्रजी बादशहा बहुत नेक-नियत" ( खरे ७।३५६४ ).

**नेक-राह** ( स्त्री० ) चाङ्गली चाल. "नेक-राह चाल दाखवून आमच्या राज्याचा आसरा पुरता केला" ( ऐटि ५७ ).

**नेक-सल्ला** ( स्त्री० ) चाङ्गला विचार ( इम २९६ ). "टोपीकराचे वकिलास रुक्सत दिली हे फार नेक सलाह केले ( दिमरा ११३७ ). "ऐशास विचार आचार कर्तव्याकर्तव्य राजश्री मुरारराव घोरपडे यांचे विचार करितां बहुत उत्तम आहे; ते साङ्गतील ते नेक-सल्लाच साङ्गतील" ( साने-पयाव ८१ ).

**नेकी** ( स्त्री० ) [ फा० नेकी ] चाङ्गुलपणा; प्रामाणिकपणा; सचोटी;

**नेकी-बदी** ( स्त्री० ) हलाली-हरामी. "नेकी बदीचा अन्देशा दोहींकडून सेवकाकडे नसावा" (साने-पयाव २५६).

**नेत** ( स्त्री० ) [ अ० नीयत् ] नियत; बुद्धी; निष्ठा. "ज्याची जसी नेत तसी त्यास बर्कत" ( इम १०७ ). "दौलतराव बाबा यांची नेत धन्याजवळ तसीच असेल" ( खरे १२।६८१७ ).

**नेफा** ( पु० ) [ फा० नेफा ] विजारींत नाडी घालण्यासाठीं दुमडून केलेली माया.

**नेब–गैबत** ( पु० ) वरिष्ठाच्या गैरहजिरींत त्याचें काम करणारा दुय्यम अधिकारी ( इऐ ५।१०१ ).

**नेस्त–नाबूत** ( स्त्री० ) [फा० नीस्त्–नबूद् =नाहीं, नव्हता ] नाश; नष्ट. "रामसिङ्गाचे नेस्तनाबूद करून दक्षिणियांहीं पुढें शोखीच्या गोष्टी साङ्गितल्या तर सन्मुखही व्हावें ऐसें ज्यांचें मानस ते जाट कशी मामलत आपल्याशीं करितील !" ( राजवाडे ६।५७० ).

**नै–शकर** [ फा० नै–शकर् ] ऊंस ( भाइसम–द्विसवृ १११२ ).

**नोक** ( स्त्री० ) [फा० नोक्] टोंक; अणी. "सखे तूं पातळ पुतळी फोक । नको मारूं नयनाची नोक" ( होनाजीबाळ १७८ ).

**नोक–झोक** (स्त्री०) नरमी–गरमी. "अशीं भाषणें नोके–झोकेचीं जाटांनींही भाऊसाहेबांकडे साङ्गून पाठविलीं" ( पाब ७ ).

**नोक–दार** [ फा० नोक्दार् ] अणकुचीदार; कोंपरेदार. "द्रोण केळीचे चाङ्गले दोहीं काड्याचे नोक–दार लावावे" ( साने–पयाव २९१ ).

**नोकर; नौकर** ( पु० ) [ फा० नौकर् ] सेवक; चाकर. "नौकरचे अर्थ नई-कर. त्यासी आपण नित्य नई करीत जावी" ( राजवाडे ६।६३० ).

**नोकर–शाही** ( स्त्री० ) अधिकारी सेवकवर्गाचें बेजबाब्दार प्राबल्य; प्रबल अधिकारी सेवकवर्ग.

**नौ–मुस्लीम** नव–मुहम्मदीय; नव–मुसल्मान. "इतबारराव कोळी हुजूर पाठविला तो तेथें जाऊन नौमुस्लीम जाला" ( जशि६ १ ).

**नौबत; नौबद** ( स्त्री० ) [ अ० नौबत् ] घटिका; काळ; डङ्का; प्रसङ्ग; स्थिती. "वडिलांनागायत श्रीमन्तांची सेवा केली येथपावेतों. आतां नौबत असी उमटली" (खरे ६।३१६४). "साम्प्रत घरांतील फूट पडल्यामुळें या थरास नौबत पोंहचली" ( राजवाडे ७।५० ). "होळकरावर हे नौबत गुजरली सबब खफगीस जागा" ( राजवाडे ७ खलप ११२७ ).

**नौरोज** ( पु० ) [ फा० नव्–रोझ् ] पारशांचा पाडवा.

**प्याजी** [ फा० पियाझी ] कान्द्याप्रमाणें गुलाबी रङ्गाचा; कन्दर्पकान्ति.

**प्यादगान** ( न० ) [ फा० पियादगान् अनेक व० पियादाचें ] पायदळ. "पाटीलबावापासीं वीस पञ्चवीस हजार स्वार प्यादगान मिळून आहे" ( दिमरा १।२७३ ). "प्यादगानाची लढाई समोर लाऊन आपण सडीस्वारीनशी कम्वर्गा मारून फौजेचा मोड केला" ( दिमरा १।२५३ )

**प्यादगी** ( स्त्री० ) पाय–शिपाईपण; पायशिपायाचें वेतन. "यांचा रोजमुरा कजा

( = काजीपणा ) व नेब-कज़ा ( = दुय्यमकाजीपणा ) व प्यादगी टक्के तीनशें साडे सात यास जागा जकात कसबे मज़्कूर देविले असेत " ( वाड-सनदा ११४ ).

**प्यादा** ( पु० ) [ फा० पियादा ] पाय-शिपाई; पायचा माणूस. " ज्या ज्या वाटा पळून जावयाच्या आहेत तेथें चौक्या ठेऊन, पळतील त्यांस धरून परिच्छिन्न डोचकीं मारणें; सर्दार अगर प्यादा न म्हणणें " ( पारसनीस ब्रच ७७ ).

**प्यादें** ( न० ) [ फा० पियादा ] बुद्धिबळाच्या डावांतील सर्वांत हलकी सोङ्गटी.

**प्यायाचा फर्जी** = शिपायाचा राजा; रङ्काचा राव, बुद्धिबळाच्या खेळांत प्याद्याची अमुक एक घरापर्यन्त प्रगती झाली म्हणजे वजीर मेला असल्यास त्यास उठवितां येतें, या गोष्टीस उद्देशून वरील म्हण आहे.

**प्यादी** ( स्त्री० ) प्यादें पुढें सरकवून राजाचा केलेला कोण्डमारा.

**प्यादे-गिरी** ( स्त्री० ) पाय-शिपाईगिरी. " या प्रान्तांचे तमाम मुसल्मान लोक प्यादगिरीचें कसब ( = धन्दा ) करून पोट भरतात " ( राजवाडे ५।६६ ).

**प्यादे-मात** ( स्त्री० ) प्यादी.

**प्याला; पेला** ( पु० ) [ फा० पियाला ] चषक; अप्करा. " परनार विषाचा प्याला जी जी " ( होनाजीबाळ १७० ). " च्याहा द्यावयासी प्याले सङ्गी ( = दगडी ) उत्तम, दडस, लवकर न तापेत ऐसे दोन व अगर अदूसेर पाठवून देणें " ( राजवाडे ६।३९२ ).

**पन्जा** ( पु० ) [ फा० पन्ज़ा ] पांच बोटें व तळहात; हज़्रत अलीचा हात दर्शविणारा मिरवणुकींत काठीच्या टोंकाला लाऊन मिरवावयाचा पन्ज़ा; चपेटा.

**पञ्जाब** ( पु० ) [ फा० पञ्ज = पांच व आब् = पाणी ] उत्तर हिंदुस्थानांतील अटकेपासून दिल्लीपर्यन्तचा पांच नद्यांचा प्रदेश.

**पड्दा** ( पु० ) [ फा० पर्दा ] आडवस्त्र; यवनिका; गोशा; मर्यादा; शरम; भीती; स्वर; सतारीचा स्वर-विभाग; आड-पडदा; दुजाभाव. " कोणतेंही एक पडलें अन्तर धन्यास कळलें नाहीं, इतका पड्दा आहे तोंच बरें, इतक्यानें माणूस मर्यादवन्त असतें " ( मराआ १६ ). आपल्याशी पड्दा स्वप्नींहि नाहीं" ( साने - पयाव ३०९ ).

**पड्दे-नशीन** [ फा० पर्दा- निशीन् ] परपुरुषास आपलें मुख न दाखविणारी; गुल्दस्त; गुप्त.

**पडद्-पोशी; पड्देपोशी** ( स्त्री० ) [ फा० पर्दा पोशी ] छपवणूक; आडोसा.

**पदर** ( पु० ) [ फा० पदर्-पिदर् ] पिता. " किल्लेगाह रघुनाथराव यांनीं आमचे पदर किल्लगाह नारायणराव यांसी दगा केला " ( ऐटि ५८ ). " विठोजी नाईक देशमूख यांजमध्यें व बयाजीराव आपले पदर यांमध्यें निफाक ( = लढा, वैर ) होता " ( वाड-सनदा १४० ).

**पन्हा** ( पु० ) [ फा० पह्ना = रुन्द ] रुन्दी ( विशेषतः वस्त्राची ).

**पन्हा; पन्हाई** ( स्त्री० ) [ फा० पनाह् ] छाया; आश्रय. " प्यार मोहबत-मेहेरचा पन्हा फकिरावर असों दिला पाहिजे " ( पारसनीस- ब्रप ३०८ ). " अखेर जमीन्दारांचा जोर पाहून पुन्हा किल्ल्यांत पनाह घेतली " ( दिमरा २।१९४ ). " सर्कारच्या

दुश्मनास पन्हा न द्यावी " ( खरे ७। ३५६७ ). " जीं इङ्ग्रजांच्या पन्हाईत असतील " ( वाडसमा २। ६५ ).

**पनीर, पनेर; पनेरी** ( स्त्री० ) [ फा० पनीर् ] दुधापासून तयार केलेला एक पदार्थ.

**पर्गणा** ( पु० ) [ फा० पर्गना ] जिल्हा; प्रान्त.

**पर्गरी** ( स्त्री० ) [ फा० पर्गर् ] कण्ठी ( दिमरा १।७५ ).

**पर्बीन** ( न० ) शीड ज्यास लांवेलेलें असतें तो वांसा (वाड–मा १।२३६ ).

**पर्मानगी** ( स्त्री० ) [ फा० पर्वानगी ] भेट करून देण्याबद्दल बक्षीस. " नाना जवळ उभे राहावयाचे प्यायांचे नाईक आहेत ते पर्मानगी लावितात. पर्मानगी खेरीज़ पालखी पद्स्थांची देखील गांठ पडत नाहीं " ( खरे ११।६०५९ ).

**पर्वर्दा** [ फा० पर्वर्दा ] पाळलेला; वयांत आलेला; पालन. " त्यावर सोनाजीपन्त पर्वर्दा जाले परन्तु वतनावर गेले नाहींत" ( राजवाडे ८।३३ ). " स्वामी कृपादृष्टीनें पालन करून पर्वर्दा करीत आहेत" ( राजवाडे १।३२ ).

**पर्वर्दिगार** ( पु० ) [ फा० पर्वर्दगार् ] पोषण करणारा; ईश्वर.

**पर्वर्श; पर्वरीस; पर्वरिशी** ( स्त्री० ) [फा० पर्वरिश् ] पोषण; निभावणी. " आमची पर्वर्श करणार धनी समर्थ आहेत " ( पद्मव ७४ ). " माझी पर्वर्श आपणास मन्जूर आहे कीं नाहीं ? ( राजवाडे ५।७१ ). " भावाबन्दांची परिवरीश करीत असावी " ( साने–पयाव ४३८ ).

**पर्वा; परवा** ( स्त्री० ) [ फा० पर्वा ] आस्था; काळजी; गुमान; भीती.

**पर्वानगी; पर्मानगी** ( स्त्री० ) [फा० पर्वानगी ] अनुज्ञा; मोकळीक; हुकूम. " पर्माणगी होत नाहीं ( खरे ११।५७७१ ).

**पर्वानगी–रसानगी** ( स्त्री० ) बन्दोबस्त. " पर्वानगी–रसानगी दर्वाज्यास गाडद्यांची नाहीं " ( खरे ४।१९९० ). " पर्मानगी–रसानगी " ( खरे ४। १९८९ ).

**पर्वाना** ( पु० ) [ फा० पर्वाना ] आज्ञापत्र; अनुज्ञापत्र; पास.

**पर्वाना–अल्तम्गा** (पु०) [ तु० आल्तम्घा =सनद, हुकूम] राजानें दिलेली जमीनबक्षिसाची सनद. " पर्वाना–अल्तम्गा करून घेतले आहेत " ( साने–पयाव २३ ).

**पर्वेशी** ( स्त्री० ) पर्वरिशी; पोषण; पेन्शन.

**पर** ( नि० ) [ फा० पर् ] पङ्ख; पीस.

**परन्द; परिन्द** ( पु० ) [ फा० परन्दा ] पक्षी. " पांच परिन्दांची शिकार करून आम्बराईतून आले " ( राजवाडे ७। १०४ ).

**परागन्दा** [ फा० परागन्दा ] विकीर्ण; घरदार सोडून वाट फुटेल तिकडे गेलेला.

**परी** ( स्त्री० ) [ फा० परी ] पङ्ख असलेली काल्पनिक वनसुन्दरी; अप्सरा; वनसुन्दरी.

**परेशान** [ फा० परेशान् ] चिन्तातुर व हतबुद्ध; हैराण.

**परेशानी** ( स्त्री० ) [ फा० परेशानी ] सङ्कट; काळजी. " दाण्याची महर्गता याजमुळें बहुत परेशानींत आहे " ( पद्मव ७० ).

**पलङ्ग** (पु०) [फा० पलङ्ग्] पर्यङ्क; मञ्चक; उच्चप्रतीची चार-पाई.

**पलङ्ग-पोस** (पु०) [फा० पलङ्ग्-पोश्] आच्छादन; चादर; गर्द-पोस.

**पलाण; पालाण** (न०) [फा० पालान्] खोगीर. "दर्यास पलाण (शिवाजी) राजियांनीं घातलें" (सभासद ५१).

**पलाणणें** सज्ज करणें.

**पलिता** (पु०) [अ० फतीला] पेटलेली वात; बत्ती; तोडा; काकडा.

**पश्मी; मस्मी** [फा० पश्मीन्] लोंकरी. "आज्ञेप्रमाणें पश्मी दुलई, अस्तर ताफ्त्याचें, सञ्जाब ताफ्त्याचा सोमाजीचे गुजारतीनें तयार करून सेवेसी पाठविली आहे" (पारनीस-ब्रप १७). "पश्मी रुमाल एक ताम्बडा... पाठविला आहे" (खरे ११।५७०१).

**पश्मीना** (पु०) [फा० पश्मीना] लोंकरी वस्त्र.

**पशम** (न०) [फा० पश्म्] गुह्यभागावरील केस; शष्प; कःपदार्थ. "ते आमचे स्नेही असतां त्यांणीं तेथें पत्र पाठविलें तर काय पशमं उखडलीं?" (राजवाडे ६।६१९). "कोल्हापूर मिरजेच्या किल्ल्यापुढें पशम आहे" (खरे १२।६२९६).

**पशेमान** [फा० पशेमान्] पस्तावलेला; दुःखी.

**पशेमानी** (स्त्री०) [फा० पशेमानी] पस्तावा; दुःख.

**पस्त; फस्त** [फा० पस्त् = ज़मीन्दोस्त] उध्वस्त; निःशेष; साफ. "सफेजङ्ग लढाई करून कृष्णराव खटावकर यास मोडून पस्त केलें" (राजवाडे ४।३२). "वरकड त्याचें लश्कर अवघें लुटून पस्त केलें" (खरे ५।२४०६).

**पस्पा** [फा० पस्पा] पिच्छेहाट; हटता. "तेव्हां पल्टणें फौजेच्या मुकाबल्यास ठरूं न सकतां झाडींत पस्पा झालीं" (साने-पयाव ४७९).

**पसन्त** [फा० पसन्द्] सम्मत; प्रिय; निवडलेला.

**पसन्ती; पसन्दी** (स्त्री०) [फा० पसन्दी] सम्मती; आवड. "तुम्ही वरचेवरी लिहितां; परन्तु ज्यांत गोष्ट पसन्दीस पडे, शाहाण्याची निशा होये ऐसें करण्यांत येत नाहीं" (राजवाडे ६।३९४). "पाहिल्या नन्तर पसन्दीस येतील त्या कन्या" (राजवाडे-ऐकिप्र ६२).

**पसोपेश** [फा० पस्-उ-पेश्] हर्कत; अडचण. "मुलाकातही होण्यास काय पसोपेश आहे?" (राजवाडे १।१४५). "त्यापक्षीं सर्कारची खातर्जमा होय ऐसें अहद्-पैमान द्यावयास पसोपेश करणार नाहींत" (राजवाडे १२।२२).

**पहारा** (पु०) [फा० पहरा] रखवाली; रक्षण; संरक्षकांची तुकडी; चौकी.

**पहीलवान; पैलवान** (पु०) [फा० पहलवान्] वीर; मल्ल; कुस्तीबाज़.

**पाईक; पायक** (पु०) [फा० पैक्] जासूद; हल्कारा; सेवक.

**पाइकी; पायकी** (स्त्री०) सेवा.

**पाग्या** (पु०) रिसाल्याचा अधिकारी. "आधीं होता वाघ्या दैवयोगें झाला पाग्या" (तुकाराम).

**पाग-नीस** (पु०) रिसाल्याकडील कार्कून.

**पागा** (स्त्री) [फा० पाय्-गाह्] अश्वशाला; रिसाला.

**पाच्छा; पाच्छाय; पातशाहा; पादशाहा** (पु०) [फा० पादशाह्] सम्राट्.

**पाच्छाई; पातशाही; पादशाही; पातशाहत** (स्त्री०) [फा० पादशाही] अधिराज्य; सम्राट्-वैभव (वि०) सम्राटाचा; सम्राटास शोभेल असा.

**पाच् पेच्** (पु०) [∠ फा० पेच्] डाव-पेच. "ईश्वरच आमच्या बऱ्यावर असल्यास त्याणीं वाईट इच्छून होणें काय व वरकडांनीं पाच्-पेच् करून होणें काय!" (साने–पयाव २).

**पाजी** [फा० पाजी] हलकट; पागल. "झक मारितात पाजी! आपल्या आपण फजीत पावतील" (खरे १।११८). "चाकराचा आच व चुगलखोरी या प्रकारची; व आपली त्या पाजीकरितां आम्हांवर इतराजी!" (राजवाडे ६। ६०५).

**पाय-खाना; पै-खाना** (पु०) [फा० पायखाना] शौचकूप; सण्डास.

**पाय-ज़मा; पै-ज़मा** (पु०) [फा० पायजामा] सुर्वार; विज़ार; तुमान.

**पाय-दामा** (पु०) [फा० पायदाम्] पक्षी धरण्याचें जाळें; फुसलावेगारा पक्षी (मराचिथोशा ३३).

**पाय-पोस** (पु०) [फा० पायपोश्] पादत्राण. "सालाबादप्रमाणें ऐन जिन्नस पायपोसाचे जोडच यापासून नेन जाणें" (राजवाडे २०।१२). "एका महारुद्राची सामग्री राधाबाई काय लागेल ती पुण्याहून माळशिरसास पाठवील पाठविणें, न पाठवील तरी आमचा पायपोस गेला! तीन महारुद्र करून आम्हीच श्रेय घेऊं" (पारसनीस–ब्रप २७३).

**पाय-बन्द** (पु०) [फा० पायबन्द्] घोड्याचे मागचे पाय बान्धण्याची दोरी; मागून पायओढ; शृङ्खलाबद्ध. "रायगडास वेढा पडला, आपण पायबन्द लावावा म्हणजे ओढ पडेल. रायगडचा वेढा उठेल" (मराचिथोशा ३४).

**पाय-माल; पामाल** [फा० पायमाल्] तुडवला गेलेला; उध्वस्त; नष्ट.

**पायमाली; पायमल्ली** (स्त्री०) [फा० पायमाली] तुडवणूक; नाश; नुक्सान; नुक्सानभरपाई. "आपले सर्कारची फौज् मलक महम्मद्खान वगैरे गेले आहेत त्यांनीं पायमाली केली आहे" (दिमरा १।१५०). "महाराजी गदाधर यांनीं दर्याराची जुनी रहाटी राखली नाहीं, याजमुळें पायमाली आहे" (राजवाडे ८।२०१). "कामाची पायमल्ली होते" (पारसनीस–ब्रप २१२). "सर्व आमचें कर्ज् सर्कारांतून कार्भारी देतील तेव्हां काय पायमल्ली दहा पांच लक्ष रुपये (वज़ा) घालणें ती घालावी" (खरे ९।४८५४).

**पाय-रव** (स्त्री०) [फा० रव् = चाल] प्रवेश "प्रथम चाकरीस येतों म्हणून नम्रतेनें पाय-रव करून घेतली... आणि आतां सर्व दौलतेचे धनी जाले आहेत" (ऐटि १।२९).

**पाय-रवा** (पु०) शिरस्ता. "याप्रमाणें पाय-रवा घालून ते हळू हळू वतन्दार बनतात" (गांवगाडा १५).

**पाया** (पु०) [फा० पाया] ज्यावर घराच्या भिन्तींचो उभारणी करितात तें ज़मिनींतलें बान्धकाम; शिरस्ता.

**पायाब** (पु०) [फा० पायाब्] उतार. "उभयतां यमुना पायाब पाहून बोगाडीजवळ उतरले" (दिमरा १।२५७).

**पार्चा** (पु०) [फा० पार्चा] वस्त्र; पोशाख.

**पार्शी; पारशी** [फा० पार्सी] पार्स प्रान्तांतील; झर्थुश्त्राचे अनुयायी.

**पारस्नीस** फार्शी पत्रव्यवहार करणारा; मुन्शी.

**पालखी** ( स्त्री० ) [ फा० पाल्की ] विशेष प्रकारची सम्भावित डोली.

**पालखी-नशीन** पालखीचा ज्याला मान आहे असा बडा सर्दार. " त्यांचे पुस्त-पन्हाईस आणखी दोन पल्टणें व एक इङ्ग्रज़ मातबर पालखी-निसीन ऐसे गेले " ( मद्बा १।६७ ).

**पालाण** ( न० ) [ फा० पालान् खोगीर.

**पालाणणें** जोडणें; सज्ज करणें. " पालाणिले रथकुञ्जर " ( मुक्तेश्वर-आदिपर्व २९।६५ ). " पालाणारे सकल सैन्य " (मुक्तेश्वर-आदिपर्व ४७।१११ ). "रत्नमणींचीं बाळलेणीं । पालाणिलीं अरुवार " ( मुक्तेश्वर-सभापर्व ४।१ ७ ).

**पास** ( स्त्री० ) [ फा० पास् ] काळजी; आस्था. " मदारुल-महाम दुरन्देश आहेत, नबाबाची पास त्यांस सर्वोपरी आहे " ( राजवाडे ५।७९ ). " ही दानाई ईश्वरानीं ज्यास बक्षीस केली त्यांचे सखुनाची पास ठेवणें लाजीम " ( राजवाडे ५।८६ ).

**पासङ्ग** ( न० ) [ फा० पा-सङ्ग् ] तराजूंतला विषमपणा काढून टाकण्याकरितां एका पारड्यांत घातलेलें वज़न; धडा. " मयसभा उपमे तुळितां गगनांत स्वर्ग पारडें वरुतें. विश्वकर्म्यानें धरूनि मुष्टीं । पासङ्गा घातले तेतीस कोटी । तरी न बैसे तळवटीं । हळुवटपणें अद्यापी " ( मुक्तेश्वर-सभापर्व २।७० ). -त्या पासङ्गास न येणें, न पुरणें=त्या मानानें अगदींच कमी योग्यतेचें असणें.

**पिजिरा** [ फा० पिज़ीरा ] मन्जूर. "त्याचे योगक्षेमाविसी तुम्ही हुज़ूर अर्ज़ कराल त्याप्रमाणें पिजिरा होईल " ( राजवाडे २२।६२ ).

**पिरी** ( स्त्री० ) [ फा० पीरी ] वार्धक्य. "त्यावरी (अब्दुल-सलाम ऊर्फ विसाजी राम यानें ) नियत धरिली जे आपला पिरी-वक्त जाला, आतां मक्केस जावें" ( भाइसम १८३४ पावृ १४४ ).

**पिस्ता** ( पु० ) [ फा० पिस्ता] एकप्रकारचें फळ.

**पीर** ( पु० ) [ फा० पीर ] वृद्ध; साधू; समाधी; खुळा. वेडा-पीर=खुळा; भ्रमिष्ट.

**पीर-ज़ादा** ( पु० ) [फा० पीर्ज़ादा] साधुपुत्र. " त्या ठिकाणीं हुसेनीस हेच म्हणून मशायख पीर-ज़ादा आहे " ( राजवाडे ५।११२ ).

**पील** ( पु० ) [ फा० पील् ] हत्ती.

**पील-खाना; फील-खाना** ( पु० ) [फा० पील्खाना ] हत्तीशाला. " पील-खाना व अस्तबालास व उण्टांस दाणा नाहीं; फाके गुज़रतात " ( राजवाडे ११५४ ).

**पील-बाला** [ फा० बाला=उञ्ची. बान्धा] हत्तीमारखा उञ्च व लठ्ठ बान्ध्याचा ( घोडा ).

**पुख्त; पोक्त** [ फा० पुख्ता ] पक्क. " जो विचार करणें तो पुख्तच कराल " ( जोरा १२३ ).

**पुदिना** ( पु० ) [ फा० पूदिना ] एक सुगन्धी भोज्य व औषधी वनस्पती; हि .ी चटणी करितात.

**पुर्कस** ( पु० ) [ फा० पुर्खाश् ] लढाई; तण्टा. " तरी पुर्कस-बखेडा पडल्यास खावन्द प्रतापी आहेत" ( ऐटि ३।४२ ).

**पुर्शिंदा; पुर्सिंदा** ( स्त्री० ) [ फा० पुर्सीदा =पृष्ट ] चौकशी; विचारणा. " साम्प्रत पुन्हां सर्कारांत पुर्सिंदा जाली " (दिमरा २।१८२ ).

**पुर्शीस** ( स्त्री० ) [ फा० पुर्सिश् ] विचारणा; विचारपूस. " हल्ली चिन्तोपन्त, बाळाजीपन्त, जयरामपन्त यांस पुर्सिसा सर्कारांतून होत आहेत " ( खरे १०। ५०२९ ).

**पुरेज़ात** [ कार्खानेज़ात, किल्लेज़ात याप्रमाणें अनेक व० पुग या शब्दाचें ] पुरे; पेठा. " राजश्रींनीं परलोकसाधन करितांच समाम पुरेज़ात व कार्खाने व राजमन्दिरीं चौक्या ठेऊन बन्दोबस्त केला " ( ऐटि १।६५ ).

**पुलावा** ( पु० ) [ फा० पिलव् ] मांस घातलेला मसाले-भात; बिर्याणी.

**पुसणें** [ फा० पुर्स्-सं०पृश् ] विचारणें.

**पुस्त; पुश्त** ( न० ) [ फा० पुश्त् ] पिढी. " एथील कुळकर्ण ..यांचे सात पुस्तांपासोन चालत आलें आहे " ( राजवाडे २२।७५ ). " याजप्रमाणें भोगोटा तीन पुस्त करीत आलों " ( वाड-कैफियती १०४ ).

**पुस्तङ्ग** ( न० ) [ फा० पुश्तङ्क् ] घोड्याच्या पोटाखालून जाणारा जिनाचा पट्टा; तङ्ग ( राजवाडे ६।११६ )

**पुस्त-गर्मी** ( स्त्री० ) [ फा० पुश्त्-गर्मी ] मनःपूर्वक साह्य; उपराळा; पाठराखणी " राव पन्तप्रधान यांच्या फौजा कुम्पनीचे जमीयतीचे पुस्तगर्मीवर पेश-कदमी करून जाणें जरूर " ( खरे ४४३४ ). " तुम्ही मागें पुस्तगर्मीवर राहून फौजेस इङ्ग्रजाकडे रवाना व मामूर ( =स-साहित्य ) करावें " ( राजवाडे १०।२७८ ).

**पुस्त-दर-पुस्त** [ फा० पुश्त्-दर्-पुश्त् ] पिढ्यानपिढ्या; वंशपरम्परा. " सालाबाद पुस्त-दर-पुस्त खाऊन हमशा इज्जत जील-सुभानी यास दुवा करीत जाणें " ( राजवाडे १५।४८३ ).

**पुस्त-पन्हा; पुस्त-पन्हाई** ( स्त्री० ) [फा० पुश्त्-पनाह् ] पाठ-राखण; पाठ-पुरावा; उपराळा; साहाय्यक फौज. " त्यांची पुस्त-पन्हा आपणाकडूनही वरचेवर व्हावी " ( खरे ८।४११९ ). " फौज व आङ्ग्रे यांनीं वसईची पुस्त-पन्हाई करावी " ( मदबा १।६७ ). " त्यांचे पुस्तपन्हाईस आणखी दोन पल्टणें व एक इङ्ग्रज मातबर पालखी-निशीन ऐसे गेले " ( मदबा १।६७ ).

**पुस्तैन** दोन पिढ्या. " दोन्ही रियासती पुस्तैनपासोन येक; जुदाई नाहीं " ( राजवाडे ७।१५१ ).

**पूर** [ ∠फा० पुर् ] पूर्ण. "खजानपूर आह्मी तें कळतच आहे " ( राजवाडे १२। ७० ). " पैकेपूर होऊन पार उतरोन गेला" (दिमरा १।२७३) "सर्व गाष्टीनें तुम्ही पढे फाज़ल आहां व सर्व किताब जाणून अकल-पूर" (राजवाडे ३।१८६).

**पूल** ( पु० ) [ फा० पुल् ] नदीचें पात्र ओलाण्डणारा उन्चावरून बान्धलेला रस्ता.

**पूस-गवस** ( स्त्री० ) [ ∠ अ० घौस् ] खोल-चौकशी. "येथें आल्यावरी शत्रूस पूस-गवस करून पारिपत्य करितील " ( दिमरा १।२९७ ).

**पेच** ( पु० ) [ फा० पेच् ] पीळ; स्क्रू; मळसूत्र; अडचण; सङ्कट; मल्लयुद्धांतील बन्दीस. पीळ-पेच = वक्रता; कुटिलता. " ज्या राजकारणांत पीळ-पेच असेल त्या कामांत मी येणार नाहीं " ( राजवाडे १।१४८ ).

**पेच-पाच** ( पु० ) सङ्कट; अडचण. "एकाएकी भलती गोष्ट आम्ही करीत नाहीं; कां कीं मागील पेच-पाच बहुत आहेत" ( साने-पयाव ).

**पेचणें** पेचांत धरणें. "त्यासी हर्एक जाब-सालीं पेचून माकूल करीत नाही हें अपूर्व आहे" ( राजवाडे १३।१९ ).

**पेदा** ( पु० ) [ फा० पियादा ] प्यादा; पाईक ( इम ७ ).

**पेरोज़** ( पु० ) [ फा० फिरूझा ] रत्न-विशेष. "पुष्कराज, पेरोज़, हिरे" ( मुक्तेश्वर-आदिपर्व ३१।१८ ).

**पेला** ( पु० ) प्याला.

**पेश** [ फा० पेश् ] पुढें; उन्नत; वजन्दार; यशस्वी. ( स्त्री० ) वग; वजन. "इराणीस पेश होऊं न देतां ... अगदीं नेस्त-नाबूद करावा" ( पाब ६ ). "जुगुल्किशोर पठाणापाशीं पेश आहे" ( राजवाडे ११।११ ). "घाटगे यांणीं आपली कन्या शिन्दे यांस दिली, त्याजमुळें बहुत पेश आहेत" ( खरे १०।५३६१ ). "मग यांचेपुढें कोठून बाजी पेश होईल ?" ( राजवाडे ३६।३३१ ). "राजाजी यांची पेश नबाबाजवळ विशेष आहे" ( राजवाडे ५।२४ ).

**पेश-कदमी** ( स्त्री० ) [ फा० पेश्कदमी ] पुढें पाऊल टाकणें; प्रगती; पहिली हाल-चाल; युद्धाची हाल-चाल; आगळीक. "दिवसेंदिवस त्याचे फौजेची पेश-कदमी आहे" ( राजवाडे ६।४३७ ). "जितका मुलूख आपले काबूंत येईल तितका पुर्तेपणें बन्दोबस्त करून, मग पुढें पेश-कदमी करणें ठीक आहे." ( दिमरा ३।१८० ). "आम्हांकडून अन्तर नसतां तिकडून पेश-कदमी झाली तेव्हां इकडून पेश-कदमीची तर्तूद करणें प्राप्त झालें" ( खरे ८।४०२८ ) "सर्कारच्या फौजेनें पेश-कदमी केल्यास ठीक दिसत नाहीं" ( खरे ९।४४६७ ).

**पेश-कबज़** ( न० ) [ फा० पेश्क़ब्ज़ ] कट्यार "तिणें पेश-कबज़ चालविलें तें मांडीवर लागूं जाहलें" ( ऐटे १।१६ ) "हमदानीनें पेश-कबज़ पोटांत चालवून मीर्झा सफीखानास मारून टाकिलें" ( दिमरा ११९४ ).

**पेश्कस; पेश्कशी** ( स्त्री० ) [ फा० पेश्कश् ] उपायन; नजराणा; खण्डणी. "त्या फर्दैवर पातशाहानीं दस्कत केलें कीं माकूल पेश्कस सर्कारांत दिधलिया देऊं" ( दिमरा २।२४० ).

**पेश्कशात** ( स्त्री० ) पेश्कशी. "कित्तूरकर यांजकडील पेश्कशातचा जाब-साल जाला" ( राजवाडे १९।१०२ ).

**पेश्कार** ( पु० ) [ फा० पेश्कार् ] मदतनीस; नायब; मुतालीक.

**पेश्कारी** ( स्त्री० ) [ फा० पेश्कारी ] नायबी; मुतालिकी. "यास्तव कालिकादासास सफ्शिकन्-खानाची पेश्कारी सांङ्गितली" ( राजवाडे १।५४ ).

**पेश्खाना** ( पु० ) [ फा० पेश्खाना ] प्रवासांत अगोदर पुढें पाठवावयाचें डेरे वगैरे सामान.

**पेश्खेमा** ( पु० ) [ फा० पेश्खेमा ] पेश्खाना; पुढें पाठवावयाचें मुक्कामाचें व बिन्हाडाचें सामान. "नेरल्याहून पांच कोस तेथें पेश्खेमा पाठविला आहे" ( दिमरा ११८६ ).

**पेश्गी; पेशगी; पेसकी** ( स्त्री० ) [ फा० पेश्गी ] आगाऊ दिलेली खर्ची; इजाऱ्यापैकीं आगाऊ द्यावयाची रक्कम. "स्वारास एकेक महिन्याची पेशगी

बिलाकसूर देणें " ( राजवाडे ११३७ ). " नवाब निजाम अली खान संस्थानच्या पेसकीचा ऐवज़ वसूल करितात " ( खरे ४।१५८३ ).

**पेश्दस्ती** (स्त्री०)[फा पेश्दस्ती]व्यवस्था, पैरवी. " मोहिबांकडून असें अमलांत येत असतां सर्कारतर्फेनें पेश्दस्ती होत नाहीं " ( राजवाडे १०।१२८ ).

**पेश्मान** [ फा० पेश्मान् ] पस्तावलेला; दुक्खी; पशेमान. " खान...खामींची खन्त चित्तात आणून पेश्मान जाहला " ( चित्रगुप्त ४५ ).

**पेश्मानी** ( स्त्री० ) [ फा० पेश्मानी ] पस्तावा; दुक्ख. " सर्वांनीं तीर्थरूपाचे आज्ञेचे तावीन व्हावें हें ज्यास अमान्य त्याजकडेच पेश्मानी, बुद्धिदोष, दूषण " ( चन्द्रचूड-दप्तर ११३९ ).

**पेश्रफ्त** [ फा० पेश्रफ्त् ] यशस्वी. " यांची गोष्ट पेश्रफ्त जाली नाही " ( राजवाडे ५।६५ ).

**पेश्वा; पेशवा** [ फा० पेश्वा ] सामोरें; इस्तकबाल; ( पु० ) पुढारी; पन्तप्रधान. " पाटील बावा तीन चार कोस पेश्वा जाऊन परस्परें भेटी जाल्या " ( दिमरा १।२८३ ).

**पेश्वाई** ( स्त्री० ) [ फा० पेश्वाई ] सामोरें जाणें; प्रधानकी; भट-शाही. " दीक्षित महाराजांस दिल्ली शहरांत आणण्याकरितां लवाजम्यासह पेश्वाईस जाऊन आणणेबद्दल बादशहाचा मला हुकूम जाला होता " ( राजवाडे ११।७२ ).

**पेश्वागिरी** ( स्त्री० ) प्रधानकी " पेश्वायगिरीचीं वस्त्रें तुम्हांस देतों " ( भाइसम तृसवृ ९० ).

**पेश्वाज़** ( पु० ) [ फा० पेश्वाज़् ] पुढें खुला असलेला झगा ( विशेषतः स्त्रियांचा ). " बायकांवर नगनगोटे होते ते आणविले; दोन दोन पेश्वाज़ मात्र ठेविले " ( राजवाडे ५।१४० ).

**पेशजी** [ फा० पेश्-अज़ी॰ ] पूर्वीं; मागें. " पेशजी बिस्त रोजा " = वीस रोज़ांपूर्वीं ( इम ६६ ) " पेशजी आपलीं पत्रें आलीं व हालींही तुमचीं पत्रें आलीं " ( राजवाडे ८।१२४ ).

**पेशन्देश; पेशन्देशा** ( पु० ) **पेशन्देशी** ( स्त्री० ) [ फा० पेश्-अन्देशी ] पूर्व विचार; दूरदृष्टी; पूर्ण विचार " तम्ही त्यास साङ्गोन कोते अन्देशानें न वर्ततां पेश्-अन्देश पाहून वर्तत ऐसें करणें " ( खरे १।१७६ ). " तीं मनुष्यें अल्पबुद्धी, पेश्-अन्देशीनें पाहून पुढील कर्तव्यार्थ ध्यानांत येत नाहीं " ( खरे १।४०५ ). " चित्तीं पुरता पेश्-अन्देशा आणून ठराव करणें तो करावा " ( खरे १२।६४०० ).

**पेशा** ( पु० ) [ फा० पेशा ] धन्दा; वृत्ती, पाण्ढर पेशा=गैर मज़ुरांचा व गैर-शेतकऱ्यांचा वर्ग. शागिर्द-पेशा=सेवकवर्ग.

**पेशामद** ( स्त्री० ) [ फा० पेश्-आमद् ] प्रगती; बढती. " काम मोठें, हौसला थोडा; कसेंही करून पेशामद करावी म्हणून बोलावयास जातात " ( राजवाडे ५।११ ). " आपले जातीचे पेश्-आमदीवर दृष्टी दिलियास खावन्दाचे दौलतीस धक्का बसेल " ( राजवाडे ५।७६ ).

**पेशीन** [ फा० पेशीन् ] पूर्वील ( वाड-मा १।३५ ).

**पेस्तर** [ फा० पेश्तर् ] पुढें; पुढील. " आपण उज्जनीस साल-मज़्कुरीं छावण्या कराव्या, पेस्तर सालीं शत्रूं आपण पहातच आहों " ( पाब ४४ ).

**पेहरण; पैरण** ( न० ) [ फा० पैरहन् ] सद्रा; सैल कुडतें.

**पेहरणें; पेहेरणें** परिधान करणें.

**पेहराव** (पु० ) पोशाख. "कलावन्तीण... उंच्च पेराव करून साबाजी अनन्ताच्या घराप्रती जाण्यास तयार जहाली" ( भाइसम १८३४ पावृ २११ )

**पैगम्बर** ( पु० ) [ फा० पैघाम्बर् ] प्रेषित; इस्लाम-संस्थापक मुहम्मद्.

**पैगाम** ( पु० ) [ फा० पैघाम् ] सन्देश; सन्धान; बोलणें. "श्रीमन्ताकडून पृथक् पृथक् पैगाम येतात" ( राजवाडे १। २३ ). "मुम्बईकर जन्राल याणीं कैलासवासी बाजीरावसाहेब यांसी दोस्तीचा पैगाम केला" ( खरे ७। ३५६४ ).

**पैगामा-पैगामी** ( स्त्री० ) बोलाबोली; जाबसाल; प्रश्नोत्तर. "दोन चार रोज पैगामा पैगामी जाली" ( राजवाडे २०।३८ ).

**पैगामा** ( पु० ) ढवळाढवळ; धुमाकूळ. "अशी ताकीद देवावी कीं तुमचे फौजेपैकीं कोणी पादशाही मुलखांत पैगामा करूं नये" ( राजवाडे ८।२७ ).

**पैजार** ( स्त्री० ) [ फा० पैझार् ] पायताण. "तुका म्हणे ऐशा नरा । मोजून माराव्या पैजारा".

**पैदर्पै** [ फा० पै-दर्-पै ] एकामागून एक; लागोपाठ. "पैदर्पै विनन्तिपत्रें सेवेसी पाटवितों" ( दिमरा १।८ ). "तुम्हीही मिरापूरचे फौजेची बातमी पैदर्पै आणून ठाणियांत बहुत सावधपणें असत जाणें" ( राजवाडे ६।५५२ ).

**पैदा** [ फा० पैदा ] व्यक्त; उत्पन्न; सम्पादित. "काणवानी मस्ती पैदा करून" ( इऐ ५।१०० ).

**पैदा-गिरी** ( स्त्री० ) उकळणूक; वसूल. "दरीं वरून पनालेस विजापुराहून एक हवाल्दार गैरमहसूल पैदागिरी कबूल करून आला" ( इ ऐ ५।१०० ).

**पैदास ; पैदास्त** ( स्त्री० ) [ फा० पैदाइश् ] उत्पन्न; फायदा; उपज; निपज. "आरमारास तन्खा मुलखांत नेमून द्यावा; पैदास्तीवरील नेमणुकीमुळें साहुकारांस उपद्रव होऊन साहुकारी बुडेल" ( मराआ ३६ ).

**पैबन्दी** ( स्त्री० ) [ फा० पैवन्द्= सम्बन्ध ] बन्धन; व्यवस्था. "स्नेहाचे वृद्धीची पैब-न्दी करीतच आहों" ( दिमरा १।३९ ).

**पैमास ; पैमाशी** ( स्त्री० ) [ फा० पैमाइश् ] मोज़णी; ज़मीन मोजणी व नोन्दणी.

**पैरवी** ( स्त्री० ) [ फा० पैरवी ] अनुयय; पाठलाग; व्यवस्था; विचार; ढवळाढवळ. "कितेक हुजूर येणार ते ना-उमेद होऊन केलेली पैरवी सोडतील" ( राजवाडे १२।६७ ). "तदुत्तर महाराजानीं राज्याचा बन्दोबस्त करावयाची हिम्मत धरिली आणि पैरवीस लागले" ( चित्रगुप्त ७५ ). "हें वृत्त बादशहा यास श्रुत होतांच पैरवी केली जे सम्भाजी राजे यांचा गौरव केलियानें पातशाही बुडते" ( चित्रगुप्त १३८ ). "पुढें ते कागद हस्तगत करून घ्यावेत या पैरवींत आहेत" ( खरे ९।५०४२ ). "चहूंकडून तङ्ग करून खुश्कींत पुन्हां पैरवी न करीत ऐसें केलें असतां पातशाहींत नक्श" ( दिमरा १।६३ ).

**पैलवान** ( पु० ) पहीलवान पहा.

**पैलू ; पाहिलू** ( पु० ) [ फा० पहूलू ] बाजू ( विशेषतः रत्नाची ).

**पैलूदार** घासून पैलू पाडलेलें ( रत्न ).

**पैवस्त होणें** पोहोंचणें.

**पैवस्तागिरी** ( स्त्री० ) पोहोंचणूक; "पैवस्त -गिरीपासून" ( वाड-बाबा २।७४ ).

**पैवस्ती** ( स्त्री० ) [ ८ फा० पैवस्त् ] पोहोंचणूक; येणें; दाखल झाल्याची नोन्द; दाखला "पुन्हां खुश्कींत त्यांची पैवस्ती न होय ऐसें जालें असता सर्वांस चाङ्गलें" ( दिमरा १।४४ ).

**पैहम; पैहाम** [ फा० पैहम् ] वारंवार; पैर्पै. "याचे बयान मुफसल पैहम आं साहेबास कलमी करण्यांत आले" ( साने-पयाव ४७८ ). "चुनाचे पैहाम आं साहेबीं अन्देशा दिलांत आणोन कलमी करावें ऐसें नाहीं" ( साने-पयाव ४६५ ). "तेथील वर्तमान पैहाम रवाना करीत जावें" (राजवाडे५।१०५).

**पोक्त; पोख्त** [ फा० पुख्ता ] पक्क; प्रौढ; थोर; अनुभवीक; सज्ज; मज़्बूत; पक्का. "ज़माव पोख्ता केला" ( चित्रगुप्त ७९ ). "जो मन्सबा करणें तो पोक्ताच करावा" ( राजवाडे ८।१६२ ). "तुम्ही पोख्त, बहुत पाहिलेले असे असोन अशा गोष्टी कशा होऊं दिल्या ?" ( ऐकिप्र ६६ ). "इकडून आम्ही फौज़-सामान पोख्त करून निघतों" ( मराचिथोशा ५४ ). "मनुष्यें पोक्त्या ठिकाणीं ठेऊन स्वस्थ रहावें आणि पुढें उद्योग करावा" ( खरे १।१९१ ).

**पोक्तगी; पोख्तगी** (स्त्री०) [फा० पुख्तगी] पक्कता; मज़्बुती; कायमी. "आपले स्नेहाची पोक्तगी करावी" ( दिमरा ११३ ).

**पोत** ( न० ) [ फा० पूद् ] वीण; विणाई.

**पोतदार; पोतेदार** ( पु० ) नाणेपारखी. "पोतदार यांणीं पारख करावी" ( वाड-सनदा १२५ ).

**पोतदारी; पोतेदारी** ( स्त्री० ) पोतदाराचें काम.

**पोतनीस** ( पु० ) "पोतनीस यांणीं पोते-ज़मा-खर्च लिहिणें करावें; नज़र-पेश्कशी ज़मा करावी" ( वाड-सनदा १२५ ).

**पोते** ( न० ) [ फा० पोता ] तिजोरी; कोथळा "जें देणें तें वरातीनें द्यावें अगर पोत्याहून रोख ऐवज़ द्यावा" ( सभासद २४ ). "हज़ार रुपये ज़मा-पोता जाले" ( राजवाडे ६।१५९ ).

**पोफळ** ( न० ) [ फा० पूपल्-अ० फौफल् ] सुपारीचें फळ.

**पोलाद** ( न० ) [ फा० पूलाद् ] तिखें.

**पोलादी** पोलादाचा.

**पोशाख; पोशाक** ( पु० ) [फा० पोशाक्] पेहराव.

**पोशाखी** पोशाखाचा; दिखाऊ; डामडौली. "पोशागी सनगें" ( सभासद २६ ).

**पोशिन्दा** ( पु० ) पोसणारा; पालनकर्ता. "लाख मरोत पण लाखांचा पाशिन्दा न मरो" ( राजसंन्यास ७३ ).

**पोशीदा** [ फा० पोशीदा ] आच्छादित; गुप्त; गैर-माहीत. "पंतप्रधान यांसी घरोब्याचा प्रकार पोशीदा नाहीं" ( राजवाडे ५।१४५ ).

**पोशीस** [ फा० पोशिश्=आच्छादन ] गुप्त. "कित्येक पोशिश मस्लतीच्या मज़्मुनावास्ते अज़म राघो विठ्ठल यास फिरस्ताद केले असत" ( साने-पयाव ३८७ ).

## फ

**फक्त; फकस्त** [ अ० फकत् ] मात्र;

**फकिराणा** ( पु० ) [ फा० फकीराना ] दानधर्म; फकिराच्या चारितार्थासाठीं दिलेलें ज़मीन-इनाम. " कार्किर्दी-दर-कार्किर्दी फकिराणा चालला असे; सदर्हूप्रमाणें चालवणें " ( राजवाडे १५। १३१ ).

**फकिरी** ( स्त्री० ) [ फा० फकीरी ] दारिद्र्य; भिक्षावृत्ती; भीक; फकिरासम्बन्धी. " गारपीरचे लष्करांतील शिपाई व गङ्गाधर शास्त्री याजकडील माणसें मोहरमची फकिरी मागावयास आले; सबब मशारनिल्हेनीं लष्करवाले यांस रुपये दहा व शास्त्री यांजकडील माणसास पांच एकूण पन्धरा रुपये दिल्हे " ( साने-पयाव १२६ ).

**फकीर** [ अ० फकीर् ] दरिद्री; भिक्षु; भणङ्ग.

**फकीर-फुकरा** [ अ० फुकरा अनेक व० फकीर चें ] गरीब लोक.

**फजर** ( स्त्री० ) [ अ० फज्र् ] सकाळ.

**फज़ल** ( स्त्री० ) [ अ० फज़्ल् ] कृपा. " खुदाचे फज़लनें इतकियावर इङ्ग्रजांची तम्बी होईल " ( राजवाडे १९। १०५). " खुदाच्या फज़लेकडून त्याचीही तम्बी अन्-करीब ( =लौकरच ) होईल " ( राजवाडे १०।१८७ ). " फज़ल-इलाही, घरचाही बन्दोबस्त खातरखा " ( राजवाडे ७।१५२ ).

**फजीत** ( स्त्री० ) [ अ० फज़ीहत् ] अपमान; मानखण्डना; मानखण्डित, फजीत पावणें, होणें =मानखण्डत होणें.

**फजिता; फज्जा** ( पु० ) **फजिती** ( स्त्री० ) [ अ० फज़ीहा; फज़ीहत् ] अप्रतिष्ठा.

**फजीत-खोर** नेहमी हंसें करून घेणारा. " छी म्हणतां येसिल चोरा फजीत-खोरा दारापाशीं । मत्पती हा मोठा वाट, करूं नको थाट, मारला जाशीं " ( रामजोशी ८२ ).

**फत्ते** ( स्त्री० ) [ अ० फत्ह् ] विजय; यश; यशस्वी; सही. " ईश्वरें अशा तर्‍हेनें आमची फत्ते करविली " ( राजवाडे ८।५ ). " स्वामींचे पुण्येंकरून जागा फत्ते जाहली " ( खरे ५।३ ). " दीन प्रतिदीन फत्ते-वर्तमान लिहीत जाणें " ( वाड-शाछ १६ ).

**फत्ते-जङ्ग बहादूर** एक पदवी ( मराचिथोशा ५२ ).

**फत्ते-नशीब** [ फा० फत्ह्-नसीब् ] विजयशाली. " फत्ते-नसीब व साहेब-हिम्मत आहेत; करितां हरएक प्रकारें फिरङ्गियाचे फौजेस तङ्ग करितील " ( चिरा १९ ).

**फत्ते-नस्रत** ( स्त्री० ) [ अ० नुस्रत् ] यश; विजय. " मोहिमांच्या फत्ते-नस्रतीच्या कित्येक खबरा कलमी केल्या त्या मालूम होऊन खुश्वक्त जालों " (ऐटि २।६५ ).

**फत्ते-बाजी** ( स्त्री० ) यश; विजय. "शिन्दे यांजकडील फत्तेबाजीचें वर्तमान तुम्ही लिहिलें " ( खरे ८।४३७३ ).

**फन्द** ( पु० ) [ फा० फन्द् ] फसवणूक; कौटिल्य; वाईट नाद; बण्डाळी. "फसाद लाम्बविणें मुनासब नाहीं; ज्याप्रकारें फन्द मोडेल तें करावें ( राजवाडे ५।१७७ ).

**फन्द-फरेब** ( पु )[ फा० फरेब" = फा० फन्द् ] कौटिल्य. "ब-फज़ल-इलाहि आँ

मेहेर्बा दूरन्देश व कुलाहूपोश याचे फन्द--फरेबास खूब वाकीफ " ( साने-पयाव ४६३ ).

**फन्द-फरेबी** कुटिल; धूर्त; लबाड; मकरी.

**फन्द-फितूर** ( पु० ) कट; स्वामिद्रोहाचें कारस्थान; दगा.

**फन्दी** कुटिल; कुनादी. "दोघेही फन्दी व मकरी; त्यांची उपेक्षा करणें सलाह दौलत नाही" ( राजवाडे १९।१०० ).

**फना** [ अ० फना = नाश ] नष्ट; उध्वस्त; फस्त.

**फना-बाजी** ( स्त्री० ) नाशकारक खेळ.

**फर्गोल** ( पु० ) [ फा० फर्घूल् ] रूदार अङ्गरखा; पायघोळ वर-झगा. "सकलाद् न मिळे यास्तव स्वामीचा फर्गोल पाङ्घरता पाठविला असे" ( राजवाडे ८।१२० ).

**फर्ज़न्द** ( पु० ) [ फा० फर्ज़न्द् ] मूल; पुत्र; दासी-पुत्र. "लेंकरा-फर्ज़न्दासुद्धां" ( राजवाडे १५।२७९ ).

**फर्जी** ( पु० ) [ फा० फर्ज़ी ] बुद्धिबळांतील वजीर.

**फर्द; फरद** ( स्त्री० ) [ अ० फर्द् ] एकेरी वस्त्र; शालीचें पान; एकेरी पत्र. "येथें जागिरीची फर्द लिहून घ्यावी तरी आपणापाशीं मोहरही नाही आणि तुमचाहि कांहीं आश्रय दिसोन येत नाही" ( राजवाडे ८।२१७ ). "फार्सी वकायाच्या फर्दा दररोज़च्या पाठविल्या" ( दिमरा १।१२४ ).

**फर्मान** ( पु० ) [ फा० फर्मान् ] आज्ञा; राजाज्ञा; आज्ञापत्र. "यांसही फर्मान आला आहे" ( राजवाडे ८।२१७ ).

**फर्मान-बाडी** ( स्त्री० ) दर्बार-डेरा; वस्त्राचा दर्बार. "त्यानें बलमगडसान्निध येऊन फर्मान-बाडी उभी करून फर्मान खिलत घेतला" ( राजवाडे ६।५९२ ).

**फर्मावणें** [ ∠फा० फर्मा ] हुकूम करणें; करणें. "रविवारीं कूच करून पेडापुरावर मुकाम फर्मावणार" (राजवाडे ११५६).

**फर्माशी** [ फा० फर्माइशी ] मागणी; एक पट्टी; मुद्दाम तयार करविलेला; चाङ्गला; इर्साल. "गांवगन्ना स्वार वसुलास गेले त्यांचा खर्च रोज़ व खुराकी किरकोळी फर्मासी वगैरे पांच हज़ार" ( खरे ११५९१४). "वेठ-बेगारी फर्मायसी देखील ठाणपट्टी" (राजवाडे १५।१३५ ). फर्मासी चोप= खर्पूस मार.

**फर्मास** ( स्त्री० ) [ फा० फर्माइश् ] हुकमी; हुकमी वस्तू; इर्साल; उत्तम. "श्रीमन्त स्वामीची फर्मास दिल्लीहून आणिली... पांच पोरी उत्तम आणविली" ( राजवाडे ३।१५० ). "काशीचा गुलाब साखरकन्दाची गैर-ज़रुराती; उत्तम फर्मास ज़रूर रवाना करणें" ( राजवाडे १।२४८ ).

**फर्श; फरस** ( पु० ) **फर्शी; फरस-बन्दी** ( स्त्री० ) [ अ० फर्श् ] लाद्यांची ज़मीन; बैठक. "चबुऱ्यावर फर्श केला होता तेथें बसलों" ( राजवाडे ५।७ ). "रोशन महालाचें सहजामध्यें चान्दणीचा फर्श होऊन ( नबाव ) बरामद झाले" ( राजवाडे ५।२०० ). "सभामण्डप व भोंवतालचा फरस" ( राजवाडे १४।५६ ).

**फर्सावा** ( पु० ) [ ∠अ० फर्श्= बिछायत] फरासखान्याचें सामान ( खरे ५।२६२८ ).

**फर्हत** (स्त्री०)[अ० फर्हत्] आनन्द. "हमेशा खत-किताबत फर्हत जादा करीत जावी" ( साने-पयाव ४६७ ).

**फर्हत-नमत** [फा० फर्हत्-नमत्] आनन्द-दायक. "आँ साहेबांकडून खत फर्हत-नमत आलें" ( राजवाडे १०५ ).

**फरागत** ( स्त्री० ) [अ० फराघत्] मुक्तता; स्वास्थ्य; आराम; स्वस्थ; स्वस्थपणानें. "किस्तीचा मुकद्दमा, तर अलीजाह यांचा मशेला. या पासोन फरागत होऊन त्याचाही फैसला करण्यांत येईल" ( राजवाडे ५।१३० ).

**फरामोश** [ फा० फरामोश् ] विसरलेला. "या दोन्ही बाबती फरामोश करून आमची मुखालीफत कबूल कराल तरी बाद या मोहिमेचे आम्हांस कर्नाटक पायां घाट जवळ असे" ( चिरा२३ ).

**फरामोशी** ( स्त्री० ) [ फा० फरामोशी ] विसर. "यास फरामोसी केली न पाहिजे" ( पारसनीस-ब्रप २३४ ).

**फरास** ( पु० ) [ अ० फर्राश् ] बिछायत घालणारा.

**फरास-खाना** ( पु० ) [ फा० फर्राश्खाना] राहुट्या, शामियाने, ज़ाज़मे खुर्च्या वगैरे सामान अगर तें सामान ठेवण्याची ज़ागा.

**फरीद** [अ० फरीद् ] एकटा; सडा; जरिंदा; फटिङ्ग.

**फरेब** ( पु० ) [ फा० फरेब् ] कौटिल्य. "तऱ्हेतऱ्हेचे मकर व फरेब दाखऊन" ( साने-पयाव ४६५ ).

**फरेबी** लबाड; कुटिल. "टोपीकरांची ज़ात बेइमान व फरेबी" ( साने-पयाव ४६६ ).

**फरोक्त; फरोक्ती** ( स्त्री० ) [फा० फरोख्त्] विक्रय; विक्रीत. "निमे तक्सीम दरोबस्त फ्रोख्त दिली" ( चन्द्रचूड दप्तर १।१९ ). "फरोख्ती केली असे" ( राजवाडे १३।९२ ).

**फलाखी** ( स्त्री० ) [फा० फराखी] समृद्धी; विपुलता. "पातशाहास अर्जी श्रीमन्ताची पोटगी-फलाखी याची मान्य केली" ( राजवाडे ६।५५९ ).

**फलाणा** ( पु० ) [ फा० फलान्-अ० फुलान् ] अमुक. "स्वामी तो परमहंस! सुखदुःखातीत स्वामी असतां क्षणक्षणां फलाण्यानें फलाणें जाहलें, हत्तीमुळें फलाणें गेलें याप्रकारें लिहून पाठवितात याचा विचार काय!" ( पारसनीस-ब्रच ३२ ).

**फवारा** ( पु० ) [ अ० फव्वारा ] जलोत्क्षेप; कारन्जें; हज़ाऱ्याचें तोण्ड. "फवारे रुप्याचे व ताम्ब्याचे मजालस पाहून लावीत जावें" ( साने-पयाव २८६ ).

**फस्त** ( स्त्री० ) [ अ० फस्द् ] शीर तोडून रक्त काढणें. "हकिमांनीं फस्त सोडविली, तत्क्षणीं प्राण निघोन गेला" ( दिमरा १।२५१ ).

फस्त उध्वस्त. परस्त पहा.

**फस्ली** [ फा० फस्ली ] हङ्गामी; मोसमी; अक्बरानें सुरू केलेला (शक); फस्लींत ६४९ मिळविले कीं विक्रम संवत् मिळतो. शहाजहाननें दक्षिणेंत सुरू केलेल्या फस्लींत ५९० मिळविले कीं इसवी सन मिळतो.

**फस्ली साल** ( न० ) [ फा० फस्ली साल्] पिकाचें, उत्पन्नाचें वर्ष.

**फस्सल; फसल** ( स्त्री० ) [ अ० फस्ल् ] मोसम; हङ्गाम. "अम्ब्याची फसल बारमाही चालती करितों" ( राजवाडे ७।२१० ). "स्वराज्याचा अम्मल फसलीचे फसलीस...फडच्या करीत जाण्याविषयीं जागिरदार व आमील ज़मीदा-

रांस इनायत–नामे व्हावे " ( राजवाडे ५।१९५ ).

**फहमिन्दा; फामिन्दा** [ फा० फह्‌मन्दा ] जाणता; तर्बेज़. " कोणी ज़मीदारीचे कसबांत फहमिन्दा न जाहला " (राजवाडे १९।१०५ ).

**फाका** ( पु० ) [ अ० फाका ] उपास. " दिवसेंदिवस अन्न मिळेनासें जाहलें; चार चार फाके पडूं लागले " ( पाव ३० ). " पील–खाना, व अस्तबालास व उण्टांस दाणा नाही, फाके गुज़रतात " ( राजवाडे १।५४ ). " इकडे उत्पन्न झाल्यास तवा–तोबरा; न जाल्यास फाका " ( होके १०५ ).

**फाके–कशी** ( स्त्री० ) [फा० फाका–कशी] उपासमारी. " पातशाहा कांहीं आपलें वर्तमान त्यांस फाकेकसीचें साङ्गतील " ( दिमरा ११९४ ). " जोतसिङ्ग खन्दारकर यास फाकेकसी होत आहे " ( राजवाडे ५।११८ ).

**फाकेशीर** उपाशी ( ऐच ११९ ).

**फाज़ल** [ अ० फाझिल् ] विद्वान्; शहाणा. " सर्व गोष्टीनें तुम्ही पढे फाज़ल आहां व सर्व किताब जाणून अकल–पूर " ( राजवाडे ३।१८६ ).

**फाजील** ( न० ) [ अ० फाझिल्] अधिक; वाजवीहून अधिक; चावट; उत्पन्नांतील वाढावा. " त्याजकडे फाजील होतें तें माफ करून आणखी बक्षिसें उद्‌ण्ड दिधलीं " ( चित्रगुप्त ११९ ).

**फाणस** ( पु० ) [ अ० फानूस ] कन्दील. " फाणूस लावावे त्यांत मेणबत्त्या लावाव्या " ( साने–पयाव २८५ ). " फाणसें झाडें फिरङ्गाणी काम बिलोरी " ( प्रभाकर–लावण्या ९२ ).

**फात्या** ( स्त्री० ) [ अ० अल्फातिहा ] कुराणांतील पहिला सुरा; तो पढणें; प्रार्थना. " फात्या करावी " ( मराचिथोशा ९ ). "मार्गीतच इदीच्या फात्या देऊन नज़रा झाल्या " ( राजवाडे ५।४१ ). " मुलानानें फात्या न दिला तर बकरें मुर्दाड रहातें म्हणजे ते हलाल ( = विहित व ग्राह्य ) होत नाही " ( गांवगाडा ११३ ).

**फाम** ( स्त्री० ) [ अ० फह्‌म् ] **समजूत,** अक्कल; चित्तस्थिरता.

**फामिन्दा** अक्कलवन्त; फहमिन्दा पहा.

**फार्कत; फारखती** ( स्त्री० ) [ अ० फिराघत्=सुटका; फा० फारिग्–खत्=सोड-चिठ्ठी ] मुक्तता; मुक्तिपत्र; विभक्तता-पत्र. " अलीजाह याचे मसेल्यापासून फारकत झाली; यानन्तर याचा मार्ग होईल " ( राजवाडे ५।१३६ ). "फारीखत " ( राजवाडे ३।३२ ). " दाजीपन्तापासून फारखती लेहून घेतली " ( राजवाडे ६।८ ).

**फार्शी; फार्सी** [फा० फार्सी] पार्स प्रान्तांतील व आतां इराण देशांतील ( भाषा ).

**फायश** [ फा० फाश् ] जाहीर; जाहिराणा; प्रसिद्धी. "हें पत्र एकान्तीं वाचून ठेवावें; फायश जाल्यानें येथें सेवकाची पत राहणार नाहीं " (मद्‌बा १।१९९). " ऐसें असतां आपण बजाजीपन्त यांजकडे फायश केली याचा दोष ठेवितात हें मलाच आश्चर्य जालें " ( राजवाडे ७ खलप ३१ ). " जर गोष्ट फायशांत आली, ज्यास त्यास समजेल तो फुटला तर पथच गेली " ( राजवाडे ७ खलप २।११० ).

**फारीक** [ अ० फारिग् ] मुक्त; अदा; पावता; चुकता. " **खण्ड फारीक** *

*झाल्यावर थोडीबहुत त्यांची मेहमानी* करून बहुमानें त्यांस त्यांचे स्थळास पाठवून यावे " ( मराआ २३ ). " उत्सव प्रसङ्गीं कर्ज-वाम होईल तर श्रीरुपेनें फारीक होईल " ( राजवाडे ८।१२० ). " तुम्ही सारे हुडपणा न करितां जीव राखोन एक वेळ कर्जा-पासोन पारीख जाहलां तर लक्ष जोडी मिळाली " ( खरे ८६२ ).

**फासला** ( पु० ) [ अ० फासिला ] अन्तर. " नवलूर म्हणोन गांव धारवाडापासून एक कोसाच्या फासल्यानें आहे " ( खरे ८।४३८९ ). " तासगांवास मिरजेस फासला किती ? " ( खरे ११।५६६३ ).

**फिक्रा** ( पु० ) [ अ० फिक्रा ] मज्कूर ( राजवाडे १०।१६४ ).

**फिकीर; फिकर** ( स्त्री० ) [ अ० फिक्र ] विचार; चिन्ता; काळजी.

**फिकीर-मन्द** [ फा० फिक्र-मन्द ] चिन्ता क्रान्त. " बडेसाहेबांनीं ही खबर ऐकून बहुत फिकीरमन्द जाले " ( पदमब ६९ ). " त्यांणीं दफ्तर व वहिवाटी केल्या त्यांचें रक्षण करण्यास अलम्गीर फिकीर-वन्द जाहले " ( वाड-सनदा १५० ).

**फित्ना-फिसाद** ( पु० ) [ अ० फित्ना अ० फसाद ] खळ-दङ्गा. " मज्बूत होऊन फित्ना-फिसाद बर्पा करितील " ( साने पयाव ४८२ ).

**फित्ने-अङ्गेजी** ( स्त्री० ) [ फा० फित्ना-अङ्गेज़ी ] द्रोह-चिथावणी; बखेडा. " फित्ने-अङ्गेजीनें तुम्हास सामील होऊन निमक-हरामी पदरीं ध्यावी हें युक्त नाही " ( जोरा ५७ ).

**फित्रत; फित्रीत** ( स्त्री० ) [ अ० फत्रत् ] *अनायकी; क्रान्ती; बखेडा. " फित्रत "* ( *राजवाडे १८।४४ व २०।३६७* ). " ते वेळे शहाजीचे फित्रीत जाली " ( राजवाडे १८।३४ ). " फित्रीता-करितां रोडी दुबळिया प्रजा होत्या त्या परागन्दा हाऊन एक एक जागा गेलिया ( राजवाडे १८।३४ ).

**फितणें** स्वामिद्रोहास प्रवर्तणें.

**फितवा-फितूर** ( पु० ) [ अ० फुतूर् शैथिल्य ] स्वामिद्रोह; दगाबाजी; कार-स्थान; फन्द-फितूर. "फितवा-फान्दा" ( सभासद २२ ). " फितवा-फान्दड़ा " ( चित्रगुप्त ३६ ). " डोहगा-फितूर " ( राजवाडे ८:२२२ ).

**फितूर** ( पु० ) [ अ० फुतूर् ] शैथिल्य; शिस्तीचा अभाव; दगाबाजी.

**फितुरी** स्वामिद्रोही; हरामखोर.

**फिदवी** ( पु० ) [ अ० फिद्वी ] एकनिष्ठ सेवक. " श्रीमन्त राव पन्तप्रधान हुजू-रचे फिदवी " ( दिमरा १।३६ ).

**फिदा** [ अ० फिदा ] कुर्वण्डी, अत्यन्त अनुरक्त; ( मुर्खपणानें ) अनुरक्त. " जीव प्राण तुझ्यावर फिदा। माग सख्या कांहीं प्रसन्न झालें काय हवी सम्पदा " ( प्रभा-कर लावण्या १९७ ). "सम्भाजी मजवर फिदा होऊन मला न पाहतां आशक जाहला " ( गोखाचिशाब ११ ).

**फिदाई** [ फा० फिदाई ] एखाद्या तत्वासाठीं जिवावर उदार झालेला. ( स्त्री० ) अनुरक्ती.

**फिर्याद** ( स्त्री० ) [ अ० फर्याद् ) नक्कार; कागाळी; न्याय-याचना.

**फिरङ्गाण** ( पु० ) [ ∠ फा० फिरङ्गी ] फिरङ्ग्यांचा देश.

**फिरङ्गाणी** फिरङ्गी. " दोन कम्पू फि-रङ्गाणी "( *साने-पयाव ५५* ).

**फिरङ्गी** [ फा० फिरङ्गी ∠ फ्रयाङ्क ] युरोपीय; पोर्चुगीज.

**फिरस्ताद्** [ ∠ फा० फिरिस्तादन् = पाठवणें ] पाठवणूक. "राघो विठ्ठल यांस फिरस्ताद् केले असत" ( साने–पयाव ३८७ ).

**फिराद्; फिर्याद्** न्याय–याचक. "मूर्या कुम्भार हुजूर जाऊन फिर्याद जाला" ( राजवाडे ६।१८ ). "रामोजी व दयाजी बादूर पादशाहापासीं फिराद् जहाले" ( राजवाडे १५।१३ ).

**फिल्फौर** [ फा० फिल्फ़ौर् ] त्वरेनें ; अविलम्बें ( ऐटि १।५९ ).

**फिल्वाके** [ अ० फिल्वाकिअ ] खरोखर; वस्तुतः

**फिल्हाल** [ अ० फिल्हाल् ] सध्यां. "फिल्हाल इतका मज्कूर समजण्यांत आला" ( पद्मव ११८ ).

**फिसाद्; फसाद्** ( स्त्री० ) [ अ० फसाद् ] फितूर ( पाब ७ ); बण्डाळी; तण्टा; दङ्गा; मझेला. "फसाद् लाम्बविणें मुनासब नाहीं; ज्याप्रकारें फन्द् मोडेल तें करावें" ( राजवाडे ५।१७७ ). "तों एक–ब–एक ( = अचानक ) घरांतील फिसाद उभा राहीला" ( राजवाडे ५।१४५)."फिसाईत"(पाब८)."फिसाहत" (इम १२१). "परन्तु कधीं कधीं फिसादीच्या गोष्टी बोलतात ( वाड–बाबा २।३३ ). "तण्टा–फिसाद् ( पु० )= तण्टा–बखेडा; दङ्गा–धोपा.

**फिसादी** [ फा० फसादी ] बण्डखोर. "फिसादी सहा हज़ार लोकांनिशीं पळून गेला" ( ऐटि १।५९ ).

**फिसालत** ( स्त्री० ) फिसाद्; कारस्थान. "शिन्दे यांचें व बायांचें हरएक विशीं मिटों देऊं नये या प्रमाणें आंतून फिसालती होत्या" ( खरे ११।५७७२ ).

**फील** ( पु ) [ अ० फील् ∠ फा० पील् ] हत्ती. "एक ज़ञ्जीर फील" ( साने–पयाव ३८४ ).

**फील–खाना** ( पु० ) हत्तीखाना.

**फील–नाळ** ( स्त्री० ) हत्ती वरील तोफ.

**फुर्सत; फुर्सती** ( स्त्री० ) [ अ० फुर्सत ] सन्धी; काबू; रिकामा वेळ; सवड; अवधी. "त्यासि सारा तपा आकार तुम्हास करावयासी आजीपासून फुर्सत पुढील साल पावेतों दिली आहे" ( राजवाडे १५।३६९ ). "फुर्सती" ( राजवाडे ३।५७ ).

**फुर्सद्गी** ( स्त्री० )! भरपगारी रजा.

**फेर–बदल** ( पु० ) फरक.

**फेरिस्त** ( स्त्री० ) [ फा० फिहरिस्त् ] सूची; अनुक्रमणिका; यादी.

**फेरिस्ता** ( पु० ) [ फा० फिरिस्ता ] प्रभु–प्रेषित; पैगम्बर; देवदूत; एक सुप्रसिद्ध फार्शी इतिहास–कार.

**फेरोजी–निशान** [ फा० फीरूज़ी–निशान् ] विजयचिन्हाङ्कित; विजयशाली.

**फेज़–बक्षी** ( स्त्री० ) [ फा० फैज़्बख्शी ] कृपादान. "साहेबानें फैज़–बक्षी करून लवकर जाब पाठवावयाविशीं अहल्कारास आज्ञा सादर जाली पाहिजे" ( पद्मव ११२ ).

**फैल** ( पु० ) [ अ० फिअल् ] कार्य; अम्मल; सत्ता. "हरामखोरास फैला–बमोजीब सजा होईल" ( साने–पयाव ४९३ ). "यांत जो फैल मज़्बुदीनें कर्तव्य तो करणें" ( ऐच ११५ ). "करवीरकरांची मस्लत म्हणजे थोडी असा समज हुजूर आहे परंतु यांचा फैल उत्कृष्ट" ( खरे ११।

५७६४) "कोठी सिद्ध जाऱ्यावर फैल करावा ऐशी यांचीं चाल" (ऐटि ३।१५).
—स फैलावर घेणें = — ला कठिण कामाला जुम्पणें; शिक्षा करणें; कान उघाडणी करणें.

**फैल-ज़ामीन** ( पु० ) [ फा० फिअल् इ-ज़ामिनी ] जात्मुचल्का; सरळवर्तनाबद्दल हमी घेणारा ( वाड-समा २।१७४ ).

**फैसल करणें** [ फा० फैसल् कर्दन् ] निवाडा करणें; निकाल देणें; पुरें करणें. "हें काम फैसल एका दिवसांत करून" ( खरे ८७५ ). "तुमचे कामास अर्ज करून फैसल देऊं " ( राजवाडे १५।२१ ).

**फैसला; फैसल्ला** ( पु० ) [ अ० फैसला ] निवाडा; निर्णय; निकाल.

**फौज़** ( स्त्री० ) [ अ० फौज् ] सेना. " समुद्रतीरा वानर फौज़ू आजी पातली पाहिजे " ( मुक्तेश्वर वनपर्व १५।१६२ ).

**फौज़्दार** ( पु० ) [ फा० फौज्दार् ] एक पोलीस अधिकारी.

**फौज़्दारी** गैरमुल्की गुन्ह्यासम्बंधी; (स्त्री०) गैर-मुल्की गुन्ह्याचा खटला.

**फौज़-नशीन** ससैन्य. " परंतु राजाराम तिकडे जाऊन पुन्हा पूर्ववत् फौज़-नशीन जाले " ( मराचिथोशा ४२ ).

**फौज़-बन्द** ससैन्य.

**फौज़-फाटा** ( पु० ) [ अ० ताइफा = जमियत ] सैन्य-जमाव.

**फौज़-सल्तलत** ( स्त्री० ) फौज़. "बे-ज़रब घोडी चालवून हैदर-खान याची फौज़-सल्तनत सर्वत्र बुडवून गारत केली " ( खरे ४।१७९८ ).

**फौत होणें** [ फा० ८ फौत् शुदन् ] मरणें. " एक रोजीचें खावयास नाहींसें जालें; अर्जी सचव आपला भर्तार रानोजी राव फौत जाहला " ( राजवाडे १७।१ ).

**फौत** ( स्त्री० ) मृत्यू. वाका-फौत= मृत्यू. " २७ जिल्कादीं पादशाची वाका-फौत जाली " ( राजवाडे ११।५५ ).

## ब

**ब्यहस्त-नसीब; बेहेस्त-नशीन** स्वर्गवासी. "हैदरअलीखां...ब्यहस्त-नसीब जाले हें ऐकून दिलास बहुत गम्गीनी व खपगी जाली " ( साने-पयाव ४६७ ).

**ब** फा० पूर्वगामी अव्यय ब, व अ० पूर्वगामी अव्यय बि याचा अर्थ-ला,-एं, सह अगर-नें असा होतो व फा० पूर्वगामी अव्यय बा याचा अर्थ सह असा होतो.

**ब-अब्रू** [ फा० बा-आब्रू ] प्रतिष्ठेनें. " मिर्ज़ा इस्माईल बेगास ब-आब्रू ठेवावें " ( दिमरा २।२६ ).

**ब-अमल** रितीप्रमणें. " तरी ब-अमल दिवाणचे बन्द्गीस मालूम करून फर्मान लिहविला" ( राजवाडे १६।३२ ).

**बइज़्ज़त व हुर्मत** = सन्मानानें ( खरे-७।३५६७ ).

**ब-ई-सबब** = या कारणास्तव ( साने-पयाव ३८४ ).

**ब-एक** एकदम. " मग ब-एक अशी कस्त करावी कीं फुर्सत घेऊं न द्यावी " ( खरे ८।४३५६ ).

**बक्तर; बख्तर** ( न० ) [ फा० बग्तर् ] चिल्खत.

**बक्तर-पोस** चिल्खती. " बाबीं दहा हज़ार स्वार बख्तर-पोस पाखरिया-

निशीं मोकाबल्यास आला " ( दासेह १४ ).

**बक्रीद; बकरीद** ( स्त्री० ) [ फा० बक्र्-ईद् ] जिल्हेजची दहावी तारीख; बली-दान-सण.

**बक्शी; बख्शी** ( पु० ) [ फा० बख्शी ] उमेदवारांची शिफारस करून मन्सब देवविणारा; सैन्यांत पगार वाटणारा; सेनापती.

**बक्शी-गिरी** ( स्त्री० ) [ फा० बख्शीगरी ] सेनाधिपत्य. " बक्षीगरी " ( राजवाडे ६।४८३ ).

**बक्शीस** ( न० ); **बक्षिसी** ( स्त्री० ) [ फा० बख्शिश् ] देणगी; इनाम; माफी; माफ. " तिचे पायावर डोई ठेऊन झाले अन्याय बक्षीस करून घेणें " ( पारसनीस-ब्रप २८७ ).

**बकाय-उमर-दराज्** [फा० बका-इ-उम्र्-इ-दराझ् ] दीर्घायुष्याची शाश्वती. " तेथील बन्दोबस्त जाल्यास बहुत दाब व लौकिक व बकायामूर-दराज़ " ( साने-पयाव ४७६ ).

**बकाल** ( पु० ) [ अ० बक्काल = भाजी-विक्या ] उदमी. " वाणी बकाल मिळोन दोनशें पालें असतील " ( खरे ४।१४७५ ).

**बकाली** असंस्कृत; व्यापारपेशा.

**बख्त-दार** सुदैवी ( ऐस्फुले १।२२ ).

**बख्त-वार** [ फा० बख्त्-यार् ] सुदैवी. " याकूब हा कऱ्हाडचा बागवान बख्त्-वार असे " ( राजवाडे १५।२४ ).

**बख्त-वारी** ( स्त्री० ) [ फा० बख्त्यारी ] सुदैव; सम्पन्नता. " ऐसे सख्तीनें बख्त-वारीच्याबळें ज़ोरावारी केली " ( राज-वाडे १५।२४ ).

**बखर** ( स्त्री० ) [ अ० खबर ] बातमी; हकीगत; इतिहास. " बखेर पादशाहास लेहून " ( राजवाडे १५।१३ ) " बखर पाठविली मालूम जाली" ( ऐटि २।३७ ).

**ब-खैरीयत** सुखरूप; सुरक्षितपणें. " छ ११ रोजीं कही गेली ते बखैरी यतीनें येऊन पावली ( चिरा २६ ).

**बगल** ( स्त्री० ) [ फा० बघल् ] खाक; बाजू. बगलेंतील गोष्ट = स्वकपोल-कल्पित गोष्ट.

**बगल-बच्चा** ( पु० ) जोहुकूम हस्तकया; बगल्या.

**बागिचा** ( पु० ) [ फा० बाघीचा ] लहान बाग.

**बगैर** [ अ० बि-घैर् ] शिवाय; वाचून. " बगैर-जागीर लोकांची समजावीस होत नाहीं " ( इम ६६ ). " बगैर सङ्गीनात मुराई ( ! ) दफे होऊनु पातशाही नामोश राहात नाहीं " ( इम ६६ ).

**बच्चा** ( पु० ) [ फा० बचा; बच्चा ] लहान मूल. कच्चीं-बच्चीं = लहानमुलें.

**बच्याजी** ; **बचाराम** राजश्री ( लहानास रागाचें सम्बोधन ).

**ब-ज़मियत** सैन्यासह. " ब ज़मेयत आठ हज़ार स्वारांनिशी " ( दिमरा २।५७ ). " तिकडे वाघ ब-ज़मियत आहे " ( खरे १२।६३९९ ).

**ब-जया** ; **बजा** [ फा० ब-जाय् ] ठिकाणीं; वस्तुतः " मादण्णापन्त व अकण्णापन्त म्हणजे ब-जया पादशाही " ( सभासद ६८ ). " श्रीमन्त ब-ज्या स्वामीच " ( राजवाडे ६।५६९ ).

**बजा** [ फा० ब-जा ] रास्त; योग्य; मुकर. " त्यास हे गोष्ट ब-ज्या आहे " (दिमरा

१।७). "दोन्ही दौलती एक; जुदाई रती-बराबर नाही हें एकीन व बजा" (राजवाडे ५।१४५). "बहुत बेहतर व बजा जालें" ( साने-पयाव ४७६ ). " बजा आणिली " = केली ( इम २३६ ).

**बज़ाज़** ( पु० ) [ अ० बज़्ज़ाज़ ] कापडाचा व्यापारी.

**बज़ाजी** ( स्त्री० ) [फा० बज़्ज़ाज़ी] कापडाचा व्यापार.

**ब-जावणें** [ ∠फा० ब-जा आवर्दन् वर बजा आणणें पहा ] करणें; अमलांत आणणें; निक्षून फर्मावणें. " सुज्याय-द्दौला यांनीं खुर्नेशात बजावून " ( राजवाडे ३।१८६ ).

**बजावणी** ( स्त्री० ) कार्यपूर्ती; तामील; अम्मल-बजावणी.

**ब-जानब** [ फा० ब-जानिब् ] कडे; बाजूस. " ब-जानीब कार्कुनानी हाल व इस्त-क्बाल " = विद्यमान व भावी कार्कून यांप्रती.

**ब-जिद्द ; ब-जीद** [ फा० ब-जिद्द ] निकड लावणार; आग्रही; अजीज; दीन; श्रमी; रुष्ट. " सेवक खानाजवळ या गोष्टी-करितां नित्य बजीद आहेत " ( राज-वाडे १।३७ ). " कळम्यचे मुक्कामीं उभयतांस बजीद झालों कीं चलावें; कबूल न करीत " ( राजवाडे ५।१७ ). " त्याजवर त्याणें यास ब-जीन फार येऊन ( = घासाघीस घालून ) दिली " ( राजवाडे १।२५७ ). " वेढा पडला म्हणोन घाबरेपणें गळां पडोन बजीद व्हाल तर यांणीं किल्ल्याचें कांहींच करणें नाही " ( खरे १।२१० ). " सर्का-रचे फौजेची व तोफखान्याची सलाबत भोंसले यांनीं खाऊन ब-जीद होऊन शरण आले असतां निष्ठुरता न करावी-सबब रूपाकरणें प्राप्त झालें " ( खरे १०३२ ). " विठुर यांस वर्तमान खोटेंसें समजल्यावर आपले जागां फार बजीद होऊन नाङ्गरस यास धरावयासी स्वार पाठविले " ( खरे १०।५३२० ).

**बजिदगी** ( स्त्री० ) अजिजी; आर्जव. " लाटसाहेब बहादुरानें तमाम बजि-दगीनें लिहिलें आहे कीं राजेसाहेबांचे खिज़्मतींत अर्ज़ करावा हें इकडील चित्तांत " ( राजवाडे १०।२५२ ).

**बजिदी** (स्त्री०) बजिदगी; अजिजी; आर्जव. " ठाणें घेतल्यानन्तर त्याशीं गांठ घालावी इतक्यांत त्यांनीं वकील पाठवून बहुत बजिदी केली " ( खरे १००६ ). " कुम-शेलवाले आले ते काबूची; बहुतां प्रकारें बजिदी करितील; लालूच दाखवितील; जात मकरी ! " ( राजवाडे १९।६० ).

**ब-जिन्नस** [ फा० ब-जिन्स् ] वस्तुतः; हुबेहुब; खुद्द. " लिहिलें आलें त्याची ब-जिन्नस नक्कल करून पाठविली आहे " ( खरे ५।२२९८ ). " त्यासी, बजिन्नस नज़रबेगखांजी यांणींहि पत्र सेवेसी लिहिलें आहे " ( राजवाडे ८। २११ ).

**ब-ज़ोरमर्दी** शौर्य-बळानें. " बख्तसिङ्ग-गजीनीं जोधपूर घेतलें तें ब-ज़ोरम-र्दीनें घेतलें " ( राजवाडे १०।२१९ ).

**बङ्तर्फ** [ फा० बर्तरफ़् ] पदच्युत; माजूल.

**बङ्तर्फी** ( स्त्री० ) [ फा० बर्तरफ़ी ] पद-च्युतता.

**बत्ता** ( पु० ) [ फा० बत्ता ] दस्ता; कुट-ण्याचें अगर खलण्याचें साधन.

**ब-तङ्ग** [ फा० ब-तङ्ग् ] जेर; लाचार. " चौफेर फौजा ठेऊन तीन चार दिवस बतङ्ग केला " ( राजवाडे ४।५२ ).

"रोहिलेही आपली जागां बतङ्ग जाले" (राजवाडे १।२२५).

**ब-तरीक** [फा० ब-तरीक़्] म्हणून; दाखल; प्रमाणें. "त्यास ब-तरीक नज़र्बन्द ठेविले आहेत" (दिमरा १।१२२). "ब-तरीक मेजवानी म्हणून हत्ती एक घोडा दिल्हे" (दिमरा १।११४). "हे चिठी ब-तरीक हुण्डी आहे" (राजवाडे ७ खलप २।९०).

**ब-तारीख** = तारखेस. "ब-तारीख छ० २" (राजवाडे १६।५९).

**ब-दस्तूर** प्रमाणें; पूर्ववत्. "किल्ल्याचा बन्दोबस्त ब-दस्तूरी चालत आहे त्याअन्वयें करून" (राजवाडे १०। ३४२).

**ब-दस्तूर-साबिका** पूर्व वहिवाटीप्रमाणें (राजवाडे ८।२१८).

**बद्** [फा० बद्] वाईट.

**बद्-अमल** (पु०) **बद्-अमली** (स्त्री०) कुकर्म; हरामखोरी; बे-बन्द्-शाई. "सन्तु जाधवीण; तिनें बद्-अमल केला" (खरे ८।४२१३). "ज्याणें बद्-अम्मल केला त्यास भाण्ड्याचे तोण्डीं देऊन उडविणें अगर कडेलोट करणें" (वाड-शाछ १९३). "बद्-अमली करून बसल्यास रुपये श्रीमन्तांचे सुटतात असें नाहीं" (खरे ७।३७५५). "मुलकांत बद्-अमली जाली आहे" (दिमरा १।२२४).

**बद्-अहदी** (स्त्री०) [फा० बद्-अह्दी] वचनभ्रष्टता; वचनभङ्ग; गैर-सलूक. "टिपू बहादूर यांनीं बद्-अहदी केल्यास तिन्हीं सर्कारांनीं येक होऊन त्याची तम्बी करावी" (राजवाडे ७।२).

**बद्-कौली** (स्त्री०) वचनभ्रंश (खरे ७। ३५७६).

**बद्-ख्याली** कुविचारी; दुराचरणी; बाहेर ख्याली.

**बद्-गोई** (स्त्री०) [फा० बद्गोई] अप-भाषण; निन्दा. "लाइणी-बद्-गोई केली" (राजवाडे २८।२२०).

**बद्-दील** [फा० बद्दिल्] भ्याड; संशयी; वहीमखोर (हिच २६१).

**बद्-दिली** (स्त्री०) [फा० बाद्दिली] भ्याडपणा; वहीमखोरी.

**बद्-नक्ष; बद्-नक्षा** (पु०); **बदनक्षी** (स्त्री०) पाणउतारा; मानखण्डना; दुर्लौकिक; अप्रतिष्ठा. "लोकांत बद्-नक्ष होय तें न कीजे" (राजवाडे ८।२१३). "सर्कारचा बद्-नक्षा होतो" (मराचियोशा ४९). "मोठी बद्-नक्षी जाली" (राजवाडे १।२३२). "लोकांत आपलेच लोकांचें भय आपल्यास जालेंसें जालियानें बद्-नक्षी आहे" (राजवाडे ६।२३१).

**बद्-नज़र** (स्त्री०) वाईट दृष्टी; कुवासना (पाब५;७); वैर (खरे ७।३५६६). "दर्यामध्यें टोपीकरांची बद्-नज़र" (वाडमा १।३४०).

**बद्-नाम** [फा० बद्-नाम्] मान-खण्डित; कुप्रतिष्ठित; कुप्रसिद्ध. "पुढें ऐसी बदरहा वर्तणूक करून बद्-नाम न होणें" (राजवाडे १५।३८१). "अम्मा नाहक आपल्याला बद्-नाम केलें न पाहिजे" (इम ६७). "तुझ्या नांवासाठी चारचौघांत बद्-नाम झालें" (गडकरी-राजसंन्यास ५५).

**बद्-नाम** (न०) **बद्-नामी** (स्त्री०) [फा० बद्-नामी] मानखण्डना; दुर्लौकिक. "आम्हांस कांहीं तुमचे आशीर्वादें करून बद्नाम आलें नाहीं." "उलटी

आमची बद्-नाम-नालीस होते " ( राजवाडे ३।१४४ ).

**बद्-नियत** (स्त्री०), **बद्-नेत** (पु०) स्वामिद्रोह; हरामखोरी. "बद्-नियत" ( दिमरा २।९७ ). " महाराजांचे पायाशीं सेनापतीनें बद्-नेत धरिला " ( मराचिथोशा ४९ ).

**बद्-नियती** दुष्टहेतूचा; स्वामिद्रोही. "परन्तु जैपूरवाला प्रतापसिङ्ग बद्-नियती " ( जोरा ९ ).

**बद्-नेक** (स्त्री०) [फा० बद्=वाईट; नेक्=चाङ्गलें ] हरामखोरी. "स्वामीसी त्यानें बद्नेक केली त्याचें फल ईश्वरें दिलें " ( खरे १०।५२३० ). " मी बद्-नेक बाळासाहेबांपाशीं केलीच नाहीं " ( खरे १०।५२३७ ).

**बद्-फैल** ( पु० ) [ अ० फिअल् = कर्म ] कुकर्म; स्वामिद्रोह. " नाहीतर बद्फैल करून फन्द् कराल तर जावली मारून तुम्हांस कैद् करून ठेऊं " ( ऐस्फुले १।२४ ).

**बद्-फैली** कु-कर्मी; पापाचरणी; व्यभिचारी.

**बद्-बख्त** [ फा० बद्-बख्त् ] दुर्दैवी.

**बद्-मस्त** [ फा० बद्-मस्त् ] धुन्द; तर्र; मग्रूर; चण्डखोर. " गलीम बहुत बद्-मस्त जोरावर जाहला " ( पाच १२ ).

**बद्-मस्ती** ( स्त्री० ) [ फा० बद्-मस्ती ] मग्रुरी; चण्डखोरी; बण्ड ( पाच ६ ).

**बद्-मामला** ( पु० ) **बद्-मामली** ( स्त्री० ) अव्यवस्था; अन्याय; हरामखोरी

**बद्-मामली** लुच्चा; हरामखोर. " इङ्ग्रज़ फार बद्-मामली आहेत; प्रथम गरिबीनें गोष्ट बोलून आपला कब्जा करावा हे चाल त्यांची आहे " ( राजवाडे १२।६ ).

**बद्-मास**; **बद्-माश** [ फा० बद्-मआश् ] दुराचारी; गुण्ड; पुण्ड.

**बद्-लाम**; **बद्-नाम**. " आम्हांस बद्-लाम करूं नये " ( खरे १०।५६२९ ).

**बद्-लामी** ( स्त्री० ) बद्-नामी; आरोप ( मराआ ३१ ); ठपका; दोष. " परंतु लोक गैर-माकूल आम्हांस नकळत वर्तले तरी त्याची बद्-लामी आपणावरी न ठेवावी " ( राजवाडे ८।१० ).

**बद्-रस्ता** ( पु० ) वाईट चाल; अन्याय. " अन्यथा हे मोईन न कळतां । वसूल भोळेपणें घेतां । खोत करूनिया बद्-रस्ता । पाय पसारिती " ( मेस्तक-पुस्तक; जमेलेखन २९ ).

**बद्-रहा** ( स्त्री० ) गैर-चाल. " हे बद्-रहाची कैफियत " ( खरे ७।३५७० ).

**बद्-राह** [ फा० बद्-राह् ] कुमार्गी; कुमार्गानें. "तरी ऐसी बद्-राह वर्तणूक करावयास गरज़ काय ? " ( राजवाडे ३।२३७ ) "कोणी बद्-राह वर्तेतील वर तुम्हीं लोकांनीं बुद्धिवाद साङ्गावा " ( राजवाडे ८।१२६ ).

**बद्-वक्र** ( पु० ); **बद्-वक्री** ( स्त्री० ) अप्रतिष्ठा. " नबाब बुद्धिवन्त होत्साता हे बुद्धी वृद्धापकाळीं करून बद्-वक्र करून घेतला " ( पारसनीस ब्रप ४५). " आतां पादशाई बद्-वक्रीची, खजिना नाहीं, मुलूख नाहीं अशी जाली ( साने-पयाव ३३० ).

**बद्-सलूक** ( पु० ); **बद्-सलुकी** ( स्त्री०) गैर-वर्तणूक; अन्याय. " चाकरीचे रवेशीनें आपल्या वडिलांसी वर्तन

असतां रयतेसी बद्-सलूक केला " ( इम ५६ ). " बद्-सलुकी " ( दिमरा १।५४ ).

**बद्-सूरत** [ फा० बद्-सूरत् ] कुरूप.

**बद्-हवई** विशेष खोटी; अगदींच वाऱ्यावरची. " अशा बद्-हवई आवया उठवितील त्यांत जीव नाहीं " ( खरे ११।६३ ).

**बद्दल** [ अ० बदल् = ऐवजीं ] ऐवजी; मुळें; करितां; साठीं. " पाउसाबद्दल हत्ती घोडे उण्टें बहुत मेलीं " ( मराचिथोशा ६२ ). " बदल नन्दादीप व भण्डारा " ( राजवाडे १५।१५८ ).

**बद्रका** ( पु० ) [ फा० बद्रका ] सशस्त्र संरक्षक; वाट-सोबती. " मीरखानाचें दस्तक घेऊन बद्रका मागोन खजाना रवाना करावा तें त्यांच्यानें न झालें" ( राजवाडे १।३६ ). "दुसरी बद्रका प्रयोजन नाहीं. " ( चिरा ४५ ).

**बद्रा** ( पु० ) [ अ० बद्रा ] कोथळा; पिशवी. " सद्रहू दारूस बद्रे सुमार एकशें तीन आहेत." ( खरे ५।३४८२ ).

**बदक** ( न० ) [ फा० बतक् ] कलहंस; एक पक्षी.

**बदल** ( पु० ) [ अ० बदल् ] फरक; स्थित्यन्तर; उलट; भलतें. " इकडून ऐवज् पावला असतां बदल गोष्ट साङ्गितल्यास ऐवज् माघारा घ्यावा. " ( खरे ११।५६७० ).

**बदलणें** फिरणें; एक सोडून दुसरें घेणें; स्थित्यन्तरित होणें.

**बदला** ( पु० ) फेड; मुशारा.

**बदली** ( स्त्री० ) फिरवणूक; ऐवजी काम करणारा.

**बदाम** ( पु० ) [ फा० बादाम् ] कठिण कवचीचें एक पौष्टिक फळ.

**ब-दिमाख** ऐटीनें; ऐटदार; छान्दार. "पांच हजार खासा ब-दिमाख पोशाख करून बसले." ( होकै १०४ ).

**ब-दील-खातर** समाधानासाठीं. "ब-दील-खातर हुज्जतीचे एवढ्यावर ठराव झाला" ( राजवाडे ५।३१ ).

**ब-दील-माहीद** [ अ० मुवह्हिद् ] अनन्य भावानें; अनन्य भाव ठेवणारा ( इम ६५ ).

**बन्द** ( पु० ) [ फा० बन्द् ] गांठ मारण्याच्या दोराचा तुकडा; गांठ; पुडकें; अर्धा कागद; ताव; कुस्तींतील डाव; बन्देस; नियन्त्रण; कैद; शिस्त; कैदी; सान्धा; अवयव; गेर-चालू; खण्डित; तहकूब; लाविलेलें. " राज्यांतील पागा व हशम यांचा बन्द अगदीं ढासळून गेला होता " ( मराआ ६ ). " मशानिल्हेचे बन्द बन्द वेगळे करून जिवें मारिला " ( दिमरा १।३१० ). " तहांत ठरलें कीं झाडून बन्द सोडावे" ( खरे ७।३५२२ ). बन्द आणणें=कैद करणें ( मराचिथोशा ७३ ).

**बन्द-खलासी** ( स्त्री० ) [ ∠अ० खलास् =सुटका ] बन्धनमुक्तता. " अगोदर ...गुलामाची बन्द-खलासी करून करार-मदार ठरल्यावर मग उमेद्वारी ठेवावे " ( दिमरा १।३०७ ).

**बन्द-खाना** ( पु० ) तुरुङ्ग. " आपला बाप तीन वरसें बन्द-खानीं होता " ( राजवाडे १५।२५ ).

**बन्दगी** ( स्त्री० ) [ फा० बन्दगी ] दास्य; सेवा; सलाम ! "आपला धाकटा भाऊ याद्-गार बेग रावसाहेबांचे बन्दगीस गेला आहे " ( राजवाडे १।६३ ). " बन्दगीस अर्ज् रोशण होय " ( राजवाडे ६।१५७ ).

**बन्दगी; बङ्गी** (स्त्री०) [?∠फा० बुन्गा =सामान किंवा ∠फा० बन्द्=बद्ध] गांठोडें. "दोन बन्दग्या दालिम्बें गुज़रली" (राजवाडे ७।१३३).

**बन्दर** (न०) [फा० बन्दर्] नौकाशय. "द्वीपें द्रोणाख्य संहानें । जीं बन्दरें बोलतीं" (मुक्तेश्वर-सभापर्व १४। १४१).

**बन्दा** [फा० बन्दा] बद्ध; अङ्कित; गुलाम.

**बन्दी** (पु०) [फा० बन्दी] कैदी.

**बन्दी-खाना** (पु०) [फा० बन्दी-खाना] तुरुङ्ग; कैदखाना.

**बन्दूक** (स्त्री०) [फा० बुन्दूक्] गोळी मारण्याचें आग-हत्यार.

**बन्देस; बन्देज़** (पु०) [फा० बन्दिश्] बन्ध; बन्दोबस्त; पेच. "राज्याचा खर्च-वेच बन्देज़ बान्धून" (गोबुकै २३).

**बन्दोबस्त** (पु०); **बन्दोबस्ती** (स्त्री०) [फा० बन्दुबस्त्] व्यवस्था; तज्वीज़; शिकस्त; कैद. "येथें तुमच्या खर्चाची व ज़ायदादीची बन्दोबस्त करून देऊं" (दिमरा १।२८०). "रात्रीची दगा-बाजी करील; यास्तव छबिन्याची बन्दोबस्ती चाङ्गली असावी" (खरे ४। १५१०).

**ब-नाम** [फा० ब-नाम्] नांवानें; बेस्मी. "याची लेक ब-नाम जाती" (वाड-शाछ २१८).

**ब-पोशाख** पोशाखी; पोशाख केलेला. "मजालसींतून फरास फिरणें ते ब-पोशाख असावे" (साने-पयाव २९६).

**ब-फज़ल-इलाही** [फा० ब-फज़्लि-इलाही] ईश्वरी रुपेनें. "ब-फज़ल-इलाही ऑमेदेरवाँ दूरन्देश व कुलाह-पोश याचे फन्द-फरेबास खूब वाकीफ" (साने-पयाव ४६३).

**ब-फर्ज़न्दानत** वंशपरंपरेनें (पेदसमा १६).

**बबर्जी** (पु०) [फा० बावर्ची] आचारी; (विशेषतः) मांसाचे पदार्थ रान्धणारा; बट्लर.

**बबर्जी-खाना** (पु०) सैंपाक-घर.

**ब-मज़्कूर** म्हटल्याप्रमाणें; पूर्ववत्. "बक्षी मज़्कुराची नियत ब-मज़्कूर कायम असल्यास तुम्ही एकत्र राहणें" (दिमरा २।९७).

**ब-मय** [अ० मअ=सह] सह. "ब-मय सामान" =सामानासह. "बमय कुटुम्बासुद्धां" (राजवाडे १०।२६५).

**ब-मिनत** मिनत्वारीनें; आर्जवानें. "अगर ब-मिनत आपणाशी राजकारण लाऊन तमा व तवक्का दाखवितील" (साने-पयाव ४८३).

**ब-मुजीब; ब-मोजीब** [फा० ब-मूजब्] प्रमाणें. "हक्क-बमोजीब" =हक्का-प्रमाणें (राजवाडे १५।२७३). "बिमो-र्जीब बर्हुकूम फर्मान व खुर्द-खत" (राजवाडे १५।१४४).

**ब-मुरूवत** [∠अ० मुरूवत् = माणुसकी] माणुसकीस अनुसरून. "ब-मुरूवत हज़्रतीची भीड त्यास गालब" (राजवाडे ५।७२).

**बयान; बयाण** (पु०) [अ० बयान्] वर्णन; तारीफ; विस्तार. "तुमचे योग्य-तेची वृद्धी असावी याचा आम्हांस किती सन्तोष याचा बयान नलगे" (राज-वाडे ५।११). "रावजी शेवटचे ऐसे जे जाले त्यांचा बयान काय लिहूं!" (राजवाडे १०।१३९).

**बयान-अर्ज़** (पु०) साङ्गणी. बयान-अर्ज़ करणें=साङ्गणें. "हेजीब जाऊन

राजभुवरासी हे हकीकती बयाण-अर्ज केले" (इम १०).

**बयान्वार; बयान्वरा** [ फा० बयान्वार् ] व-तपशील; तपशील-वार; सविस्तर. "खबर बहुत बयान्वार लिहिली" (राजवाडे १५।३१). "पेस्तर अहवाल नज़रे पडलिया बयान्वरा बखेर पाठऊन देऊं" (इम १३).

**बयाना; बयाणा** (पु० , [ अ० बेआना ] विसार; आगाऊ दिलेला पैसा.

**बर्कत** [ अ० बरकत् ] लाभ, यश; भरभराट. "नियत तशी बर्कत" = बुद्धी तशी समृद्धी.

**बर्कन्दाज़** (पु०) [ फा० बर्कन्दाज़् ] बन्दूक-शिपाई.

**बर्कन्दाजी** ( स्त्री० ) [ फा० बर्कन्दाज़ी ] गोळीमार. "बर्कन्दाजी व तोफजी फिरङ्गी याची निःसीम म्हणावी तैसी" (पारसनीस ब्रप ७७).

**बर्करार** (पु०) **बर्करारी** (स्त्री०) [फा० बर्करार्=स्थित ] निश्चिती; कायमी. "ही नेहमी फौज बर्कराराची ताबीनात" (चित्रगुप्त १४). "असा मनोभाव दाखवून बर्करारीचीं वचनें शिवाजीमहाराजांस साङ्गावीं" (चित्रगुप्त ९).

**बर्कशी** (स्त्री०) [ < फा० बर्-अक्स् ] द्वेष; भाण्डण; चुरस. "त्यांतही उभयतांचा एकविचार नाहीं; भवानीपन्तासी व त्यासी बर्कशीच आहे" (ऐटि ३७). "बरी आज लाविलीस बर्कशी" (प्रभाकर-लावण्या १०२).

**बर्खास** खास; मुद्दाम; स्वतःची. "साहेबीं चित्त घालून खामखाई बर्खास चिठ्ठी घेऊन पाठविली पाहिजे" ( राजवाडे १०।४२२).

**बर्खास्त; बर्खास** [ फा० बर्खास्त् ] विसर्जित. "कचेरी बर्खास व्हावी" (राजवाडे ६।५१०). "दोन प्रहरास बर्खास जाली" (राजवाडे ७।८३).

**बर्खुर्दार** [ फा० बर्खुर्दार् ] फळ खाणारा; उपभोगणारा.

**बर्खुर्दारी** ( स्त्री० ) [ फा० बर्खुर्दारी ] उपभोग.

**बर्गुज़र** (स्त्री०) दिरङ्ग; निष्काळजीपणा. "दिल्लीचे नजीक आणि जागा मेवातची; यास्तव बर्गुज़र न करणें" (राजवाडे १०।३६३).

**बर्ची** (स्त्री०) [फा० बर्ची] लहान भाला.

**बर्जा** [ फा० बर्जा ] योग्य; बजा. "दुतर्फा दोस्ती चालावी हें बर्जा" (राजवाडे १०।१२८).

**बर्ज़ोर** [ फा० बर्ज़ोर् ] बलाढ्य; सक्त. "बर्ज़ोर नतिजा देऊन कार्यसिद्धी करावी" (पारसनीस-ब्रच ५७).

**बर्तख्त** तख्तावर. "दिल्लींत पातशाहा बर्तख्त बसवावा" (दिमरा १।२६९).

**बर्तर्फ** [ फा० बर्तरफ् ] बाजूस; पदच्युत; बडतर्फ. "मुरादखान याची फौज अगदी बर्तर्फ केली" (खरे १।२४४).

**बर्तर्फी** ( स्त्री० ) [ फा० बर्तरफी ] कामावरून दूर करणें, होणें. "जर्नैल इष्टवारिष्ट यास हिंदुस्थानचे फौजेचा बहाली-बर्तर्फीचा मुख्त्यार केला आहे" (दिमरा १।१२८).

**बर्तर** [ फा० बर्तर् ] श्रेष्ठ; उच्चतर. "त्याणींहि पादशाही हुकूम बर्तर म्हणोन" (चित्रगुप्त ७०).

**बर्दास्त** ( स्त्री० ) [ फा० बर्दाश्त् ] पाहूणचार; मेहमानी; व्यवस्था; शुश्रूषा; सहन. "तूर्त जखमांची वगैरे बर्दास्त

होत आहे" (खरे ११।६०१२). "भाऊसाहेबांस हें बर्दास्त न होतां जाब दिल्हा कीं स्वाऱ्याशिकाऱ्या करून देणें घरास आणावें ही चाल कोठील !" (होके २७).

**बर्निस्बती** [ अ० निस्बत् = सम्बन्ध ] प्रमाणें. "तें बर्निस्बती साल मज़्कूर दुमाला कीजे" (राजवाडे १५।१३८).

**बर्पा** [ फा० बर्पा ] उभा; सुरू. "हङ्गामा बर्पा केला" ( खरे ७।३५६७ ). "प्रस्तुत जो हङ्गामा बर्पा झाला याचे बन्दोबस्ताची शक्ल कशी श्रीमन्त करितात ते बोलावी" (राजवाडे ५।७६ ).

**बर्फ; बरफ** ( पु० ) [ फा० बर्फ ] घनीकृत हिम.

**बर्फ–दाणी** ( स्त्री० ) बर्फ ठेवण्याची पेटी.

**बर्फी** ( स्त्री० ) [ फा० बर्फी ] एक प्रकारची खाण्याची मिठाई.

**बर्बाद** [ फा० बर्बाद् ] वाताहत; नष्ट; रद्द. "गढी खोदून बर्बाद केली" ( होके १४). "दिल्ली महास्थळ, पादशहा बर्बात जालियांत फायदा नाहीं" ( पारसनीस–ब्रप २५ ). "पुढील तहनामा झाल्यानन्तर मागील तहनामा बर्बाद होतो" ( राजवाडे ७।३ ). "मुम्बईकरांनीं अहद्–पैमान सर्व बर्बाद करून" ( खरे ७।३५६६ ).

**बर्मा** ( पु० ) [ फा० बर्मा ] गिर्मीट; भोंक पाडणें. "आतां तोफेचे कानास बर्मे करावयास लाविले आहेत (राजवाडे ५।६९ ).

**बर्मदान** भोंक पाडण्यांत कुशल. "भण्डारी चाङ्गले बर्मदान" ( वाड–समा २१९ ).

**बर्वक्त** वक्तशीर. "इङ्ग्रजांचे तम्बीची मस्लहत उम्दी बर्वख्त तद्बीर होऊन नमूदांत यावी हे सल्लाह नेक" ( साने–पयाव ४६९ ).

**बर्हक** [ फा० बर्हक्क् ] न्यायानें; प्रमाणें. "बर्हक्क–धर्म मन्सुफी करून विल्हे लाविले पाहिजे" ( राजवाडे ३।११० ). "बर्हक मुन्सफी केली" ( राजवाडे १५।३३ ).

**बर्हम** [ फा० बर्हम् ] दिक्क; भग्न. "मर्जी बर्हम होते" ( राजवाडे ५।८ ).

**बर्हुकूम** [ फा० बर्–हुक्म् ] प्रमाणें. "बर्हुकूम याद" (वाड–बाबा २।६६.)

**बराबर; बरोबर** [ फा० बराबर् ] समान; अचूक; न्याय; समागमें. "बराबरी माणकोजी हुके–बर्दार ऐवज़ पाठविला असे" (राजवाडे ६।१३० ).

**बराबरी; बरोबरी** ( स्त्री० ) [ फा० बराबरी ] समता; सारखाई; तुलना; स्पर्धा.

**बरामद** ( स्त्री. ) [ फा० बरामद् ] व्यवस्था; निकाल; आगत; अधिष्ठित. "येविशीं, राजश्री कृष्णरावजी कडून लिहावें; म्हणजे कामाची बरामद होईल" (राजवाडे १०।१८३ ). "मागती नबाब बरामद होऊन इङ्ग्रजी सहा सर्दार यांची मुलाज़मत झाली" ( राजवाडे ५।१४१ ). "कुर्सीवर नबाब बरामद जाले" ( राजवाडे ७।८४ ).

**बराय; बराई** [ फा० बराइ ] साठीं; खुद्द. "बराय तिजारत" ( पद्मव ११३ ). "बराय मातम्पुर्सी कोणी यावें ऐसी रीत इङ्ग्रजांची नाहीं" ( पद्मव ११४ ). "गफूरखां बराय मस्लत ठेवून गेले" ( होके ११० ). "बराई अर्ज़ खातरेसी आणून"

( राजवाडे १५।३० ). " इन्साफ बराई खुद ( शब्दशः स्वतःच्या विचारानें ) ज़ातीनें पहावी " ( राजवाडे १५। २९८ ). " बरायखुद पादशहा याजवर मी छापा घालितों " ( मराचिथोशा ३४ ).

**बराय-खुद खास**=स्वतः; जातीनिशी. " गोपाळराव गोविन्द यांनीं फौजेचे तर्फेस बराये-खुद-खास उभे राहून श्रीमन्तांचे हवेलीचें रक्षण केलें " ( राजवाडे ११।५९ ).

**बल्के** [ फा० बल्कि ] किम्बहुना. " नित्य दहापांच बल्के वीस पर्यन्त माणूस आपोआप पळून जातें " ( खरे ८।४३ ७५ ). " तें तेथेंच रहात बल्की माघारे फिरत ऐसें करवणें " ( राजवाडे ११३१२ ).

**बल्वा; बळवा** ( पु० ) [ फा० बल्वा ] दङ्गा; बखेडा; हङ्गामा. " ज्यांणीं बल्वा केला, त्यांत शामील जाले असतील त्यांचेहि पारिपत्य करणें " ( राजवाडे ७।४१ ).

**बला; बलाय** ( स्त्री० ) [ अ० बला ] सङ्कट. " त्याचें येणें जालियावर आम्ही अधिक बलायेंत पडल्यास आम्हांस काय सूख ! " ( राजवाडे ६।५९८ ).

**बला-दुरी** ( स्त्री० ) सङ्कट दूर व्हावें म्हणून ओंवाळून टाकिलेला पदार्थ. " बायकांनीं ... पुष्पें मस्तकीं महाराजाचें उडवून बला-दुरी व सतगे करून ओंवाळिलें ( चित्रगुप्त ११४ ).

**ब-वकूफ** [ फा० बा-वुकूफ ] शाहणा दिमरा १।४८ ).

**ब-वक्त-नेक** शुभकालीं. " आं साहेबीं खत मसर्रत-नमत पाठविलें तें ब-वक्त-नेक पोंहचलें " ( साने-पयाव ४८० ).

**ब-वजूद** [ फा० बा-वुजूद् ] असूनही. " ब-वजूद टॉमस मोष्टीन ... पुण्यांत आला असतां एकाएकीं जाऊन गवर्नर मज़्कूर यांनीं आमचा आब व आनश (!) पाहून वतनाची जागा साष्टीस मोर्चे लाविले " ( ऐटि १।५८ ).

**ब-वजे-अहसन** उत्कृष्ट रितीनें ( राजवाडे १५।११३ ).

**ब-वाजवी** योग्यतेनुरूप. " एक जरेचे आज़ार तुमचे तर्फेनें जाहले ऐसें खबर मालूम जाहालिया ब-वाजिबी ताकीद होईल " (राजवाडे १५।१५६).

**ब-शर्त** [ फा० ब-शर्त् ] अटीप्रमाणें; अटीवर; ( स्त्री० ) अट. " तुमचें काम ब-शर्थ झालें " ( हच ५६ ). " तेव्हां ब-शर्तीप्रमाणें ... तालुका ... हवाली करावा " ( राजवाडे १९।१०८ ). " परन्तु ब-शर्थ मशार्निल्हेचीं कुटुम्बें शहरांत दाखल व्हावी तेव्हां ऐवज़ सावकारानें द्यावा ऐसा करार आहे " ( राजवाडे १०।२६५ ). " इङ्ग्रेजाचे पारपत्यास तुम्ही आम्हास मिळाल्यावर अशी ब-शर्त घालून याद दिली असतांहीं आले नाहींत तेव्हां हरामखोर कीं हिन्दू हें समजावें " ( साने-पयाव २५० ). " ब-शर्तीची याद " ( साने पयाव २५१ ).

**ब-शर्ती** शर्तीवरील. " ब शर्ती हुण्डया" ( राजवाडे १९।३२ ).

**बशारत** ( स्त्री० ) [ अ० बशारत् ] शुभवार्ता; खुशखबर. " अशी आम्हांस बशारत जाली आहे " ( राजवाडे १।६३ ).

**बस्ता** ( पु० ) [ फा० बस्ता ] गांठोडें; थैली; बद्रा; बद्ध. " त्यांत माच घालून त्यावर दारूचे बस्ते, मडकीं ठेवावीं " ( मराआ ३४ ). " कम्बर् बस्ता " = कटिबद्ध; सिद्ध.

**बस्स; बस** [ फा० बस् ] पुरे.

**ब-सरन्जाम** सरन्जामासहित. " तिकडून येतां ब-सरन्जाम आले " ( राजवाडे ११।४९ ).

**ब-सवाब** सौचित्य; उचित. " त्याचा जबाब ब-सवाबच येईल " ( राजवाडे ५।८५ ).

**ब-साअत-नेक** शुभ घटिकेला ( साने-पयाव ४७७ ).

**बसालत** ( स्त्री० ) [ अ० विसाल् ] सन्धी; स्नेह.

**बसालती** स्नेहाचा. " खान मज्कूर सर्कार कुम्पनीचे बसालती सिल्सिल्यांत दाखल जाला आहे " ( राजवाडे १०।२५१ ).

**ब-सिका-खास** = खास-शिक्यानिशी. " फर्मान ब-सिका-खास " ( राजवाडे २०।३६५ ).

**ब-हर्गीज्** कधींहि; बिल्कूल. " हा मज़्मून ब-हर्गीज् मौकूफ करूं नये " ( राजवाडे ७।२३ ).

**बहर** ( पु० ) [ फा० बहार् वसन्त ऋतू ] हङ्गाम; विपुलता; भर; तारुण्याचा तजेला. " रुन्द छातिवर बुन्द गेन्द जणु गुलाब बहरामधिं फुलती " ( प्रभाकर लावण्या ).

**बहरामन्द** [ फा० बहूरामन्द ] सुखी; सम्पन्न. " हकीमजीस साहेबजादियाचे मुलाज़मतीचे बहारमन्द केलें " ( राजवाडे ११।८१ ).

**बहाणा** ( पु० ) [ फा० बहाना ] निमित्त; ढोङ्ग; उज़ूर. " राजश्री भाऊंचे पत्राचा बहाना लावतील या करितां भाऊस पत्र लिहिलें होतें " ( खरे ५।२४७६ ). " आपले घरचें खूळ, दादा येणार नाही; बहाणे हज़ार लावितील " ( साने-पयाव १५५ ).

**बहाद्दर; बहादूर** [ फा० बहादुर् ] शूर.

**बहाद्दरी; बहादुरी** ( स्त्री० ) [ फा० बहादुरी ] शौर्य. " प्रस्तुत ते सर्दारीचे व बहादुरीचें कामास हिम्मत करणार " ( साने-पयाव ३२५ ).

**बहार** ( स्त्री० ) [ फा० बहार् ] मौज़; सौन्दर्य; कमनयिता; ( पु० ) वसन्त ऋतू.

**बहारम** बर्हम; दिक्क; खपा. " राजे मज्कूर बाहेर जाऊन राहिल्यामुळें मर्जी बहारम " ( राजवाडे ५।१८० ).

**बहारी** [ फा० बहारी ] वासन्तिक.

**बहाल; ब-हाल** [ फा० ब-हाल् ] पूर्ववत्; दत्त; खूश. बहाल करणें = देणें. "याजकरितां लाडाचे चौथे दफेची इबारत ब-हाल ठेवणें ज़रूर " ( राजवाडे ७।९२ ). " तुझा गड तुला भाल ठेवितों व तुझी मुलाज़मत करवितों " ( राजवाडे ६।६०३ ). " मुलूख हैदर नाइकाचे पुत्रानें घेतला आहे तो त्याजकडे ब-दस्तूर ब-हाल असावा " ( दिमरा १।११५ ). " कसबे मज़्कूरची मोकदमी तुम्हास बहाल करून " ( राजवाडे १५।२७८ ). " तबियत ब-हाल होत पर्यन्त नवाबाची मुलाज़मत करीत नाही " ( राजवाडे १।२४ ).

**ब-हाल मर्जी** ( स्त्री० ) खुश्मर्जी.

**बहाली** ( स्त्री० ) नेमणूक; कृपा. " जर्नेल इश्वरिष्ट यास हिन्दुस्थानचे फौजेचा

बहाली-बर्तर्फीचा मुख्त्यार केला आहे" ( दिमरा १।१२८ ). "मशार्निल्हेस बहालीचीं पत्रें पाठविलीं" ( दिमरा १।१२० ).

**बहाली-मेहेरबानगी** ( स्त्री० ) दया-लोभ.

**ब-हुज़ूर-पुर्नूर** [ फा० ब हुझूरि पुर्नूर् ] प्रकाशमान् दर्बारास. "ब-हज़ूर-पुर्नूर-दर्गाहास हजीर होऊन" ( राजवाडे १८।५३ ).

**बळवाय आम** ( पु० ) [ अ० आम्=सार्वत्रिक ] सार्वत्रिक दङ्गा. "याकरितां शहरानींच प्राणाचे गिऱ्हाईक भेटलियावरी बळवाय आम जाला" ( राजवाडे ६।३७७ ).

**बाकी** ( स्त्री० ) [ अ० बाकी ] राहिलेलें; शेष; शिल्लक; एरव्ही. "कांहीं बाकी न ठेवणें"=सर्व कांहीं करून चुकणें.

**बाकी-साकी** =बाकी. "आतां बाकी-साकी राहिली आहे ते वसूल करून" ( पारसनीस-ब्रप २९ ).

**बाग** ( पु० ) [ फा० बाघ् ] उद्यान; उपवन.

**बाग-बगिचा** ( पु० ) फुल-झाडांचा समुदाय.

**बाग-वान** ( पु० ) [ फा० बाघ्वान् ] माळी; फुलारी; "फळफळावळ विकणारा" ( ऐस्फुले ३४ ).

**बागाईत; बागायत** ( स्त्री० ) [ अ० बाघात् अनेक व० बाघ् चें ] विहिरीच्या अगर पाटाच्या पाण्यावर केलेली फूलझाडांची, अगर फळझाडांची अगर भाजीपाल्याची लागवड; गैर-जिरायत.

**बागी** [ अ० बाघी ] बण्डखोर; स्वामीद्रोही. "शहानवाज़ खान बागी होऊन दौलताबाद बळाऊन बसला आहे" ( राजवाडे १।१५० ), "बागी ज़ालियास तम्बी करून" ( दिमरा १।४७ ). "पारपत्य बागी वगैरेचें मनोदयानुरूप करूं" ( राजवाडे ६।३०१ ).

**बाङ्ग** ( स्त्री० ) [ फा० बाङ्ग् ], पुकारा; ओरड; प्रार्थनेला बोलावण्याचा पुकारा. "कोठें महजीद् ( = मशीद् ) आहे तेथें त्याचें स्मरण करून बाङ्ग देतात व कोठें देवालय आहे तेथें घण्टा वाजवितात" ( गाड-सनदा १५० ).

**बाङ्ग-सलवात** [ ∠ अ० सलात् = प्रार्थना ] प्राथनला बोलावण्यासाठीं मुअझ्झिन् मशिदींतून जो पुकारा करितो तो. "दक्षिणेंत बिल्कूल गोवध न करावा. मुसल्मानीचा धर्म निमाज़ रोज़ा, बाङ्ग-सलवात, इकरानें खुदा-परस्ती (= देवपूजा ) करावी" ( भा-ऐपयाव १८ ).

**बाज़** [ फा० बाझ् ] ससाणा; श्येन.

**बाज़** [ फा० बाझ् ] उलट; उलटपक्षीं. "बाज़ गुन्हाई ( = अन्यायानें ) माझें वतन घेऊन माझे तीन खून केले आहेत" ( राजवाडे १५।१६ ).

**बाज़** [ अ० बाद् ] नन्तर. "बाज़् -बरसात याचें पारिपत्य करूं" ( होकै १२ ).

**बाज़त; बाजद** नन्तर; बादज़् पहा.

**बा-ज़मियत** स-सैन्य. "गुलाम बाज़मियत हज़र होता" ( राजवाडे ५। १३२ ).

**बाज़ार** ( पु० ) [ फा० बाझार् ] पेठ; हाट; गोन्धळ; अव्यवस्था; खरेदी.

**बाज़ार-हाट** ( स्त्री० ) बाज़ार-पेठ; बाज़ार-खरेदी.

**बाज़ार-गप्प** ( स्त्री० ) चिल्लमी खबर; वदन्ता.

**बाज़ार-बुणगें** ( न० ) [ फा० बुन्गाह् ] सैन्याबरोबरचें उदमी वगैरे गैर-लढाऊ लोक; कार्खाना, सामुग्री वगैरे.

**बाज़ारी** [ फा० बाझ़ारी ] पेठेंतील; ऐकीव. "कागदी पत्रींचें वर्तमान नव्हे; बाज़ारी आहे" ( खरे ८।३९७६ ).

**बाजिन्दा** ( पु० ) [ फा० बाझ़न्दा ] खेळाडू; बजवय्या; फसवणूक करणारा. "नट-चञ्चळ मैना तूं दिसती बाजिन्दी जी जी" ( होनाजी बाळ १७७ ).

**बाजी** ( स्त्री० ) [ फा० बाझी ] खेळ; क्रीडा; डाव; सरशी. "एकवेळ बाजी विस्कटली म्हणून पराक्रमी पुरुष स्वस्थ बसत नाहीत" ( खरे ११।६१०० ) अङ्गावर बाजी येणें = हरणें.-वर बाजी देणें = हरविणें.

**बाजीकार** उत्पादक; कर्ता. "सर्वांचे सम्मते या करण्याचे बाजीकार रघुनाथ बिडवई व रुस्तुम कलाल" ( राजवाडे ७।३९ ).

**बाजीगर; बाजीगार** (पु०) [फा० बाझीगर् ] खेळ खेळणारा; कोल्हाटी; गारुडी; उलटणारा. "ते सर्व दर्किनार राहून माष्टीन मज्कूरच बाजीगार होऊन बे-अदबी करूं लागले" ( खरे ७।३५६७ ).

**बाजीगरी; बाजीगिरी** ( स्त्री० ) [ फा० बाझीगरी ] गारूड; चेटूक.

**बाज़ू** ( स्त्री० ) [ फा० बाझू ] बाहू; पक्ष; तर्फ; कड; पैलू. "प्रधान हेच राजेलोकांची बाजू" ( मराआ १९ ). "प्रतापराव पडले...आज एक बाजू पडली" ( सभासद ६२ ). "बाज़ूंत कुवत आहे तर सर्व ज़ाब-साल दुरुस्तीनें होतील" ( राजवाडे ५।६ ). "पिकल्या पट्या बाज़ूच्या (= पैलूदार ) सात पानांच्या, सुपारीचे पानांची गुण्डी उभी घालून भर्दार चाङ्गल्या बान्धाव्या" ( साने-पयाव २८१ ).

**बाज़ूबन्द** ( पु० ) [ फा० बाझूबन्द् ] दण्डाला बान्धण्याचा स्त्रियांचा दागिना.

**बाज़े** [ फा० बअझि ] कांहीं; अवान्तर; इतर; वरकड. "बाज़े मरातब कृष्णराव यास कलमी केले त्यावरून बाज़े (=स्पष्ट) होईल" ( राजवाडे १०।१६७ ).

**बाड** ( न० ) [ अ० बयाझ़् ] वही; कनाथ; तम्बू. "विठोबाचे देवळीं बाड होतें तेथें गेले" ( होके ८९ ).

**बाड-बिशात** ( स्त्री० ) डेरे, राहुट्या वगैरे सामान. "बाड-बिशात त्याचे हातास लागली" ( खरे ७।३६१५ ).

**बाडा** ( पु० ) कनाथीचा परिघ. "बाडा बारा तेरा कोसांचा येकेहल्ली चरकपल्लीपर्यन्त बसला" (राजवाडे७।१०८).

**बातन** [ अ० बातिन् = अन्तस्थ ] गुप्तपणें; कफिया. बातन निजाम अल्लींचें राजकारण लाविलें यास्तव आपाजी पन्तास बरोबर घेऊन येतो." ( राजवाडे ११।६० ).

**बातमी; बातनी** ( स्त्री० ) वार्ता; हकीगत. "आपण बातनी चाङ्गली राखावी" ( खरे ८।३९२६ ). "सर्कारचे ज़ासूद बातनीस पाठविले होते त्यांनीं वर्तमान साङ्गितलें" ( खरे ८।४३४८ ).

**बातमीदार** बातमी लिहून पाठविणारा; अख्बारनवीस.

**बातनी-नीस; बातमीनीस** ( पु० ) अख्बरनवीस. "स्वामीकडील बातनी-

निसांचीं पत्रें विकल्पयुक्त येऊन बे-मर्जी होती " ( राजवाडे १०।१९७ ).

**बातल; बातील** [ अ० बातिल् ] खोटें; व्यर्थ; रद्द. " काल कुमक गांवांत गेली म्हणोन ऐकतों हें खरें किंवा बातील ? " ( खरे ७।३४८२ ).

**बाद** [ अ० बअद् ] नन्तर; वज़ा. बाद घालणें = वज़ा करणें. " आम्ही ताकीद केलियाबाद...मुम्बईकर पन्हा देणार नाहींत " ( खरे ७।३५७० ). " आमच्या फौज़ा जाऊन ही गोष्ट बाद दुसरा होती तर ते मज़ा " ( खरे ८।४३ ५२ ). " बाद्-ऊ ( = त्याच्यामागून ) अव्लाद् व अह्फाद् त्यांसी रवा करणें " ( राजवाडे १५। ३६४ ).

**बादज; बाज़त** [ फा० बादज़ ] नन्तर; पुन्हा; यापुढें. " बादज़ ईद पेशावरास येणार " ( दिमरा २।३७ ). " दादा साहेब बादज़ बरसात येतील " ( इम २६० ). " बाकी बादज़ फत्ते मागाहून पाठवावें " ( राजवाडे १२।१२५ ). " बादज़ फिर्याद येऊं न दीजे " ( राजवाडे १५।१६९ ). " बाज़द " ( राजवाडे १५।३७; ३८ ).

**बादशहा; बाच्छा** ( पु० ) [ फा० बाद्-शाह् ] पातशहा.

**बादशाही; बाच्छाई** पातशाही पहा.

**बाप-ज़ादा** [ फा० बाब्=पिता; अ० जद्द= आजा ] वाडवडील, पूर्वज. " दिल्ली याचे बाप-ज़ायाची नाहीं, जो सामर्थ्यवान् होईल त्याची दौलत असें आहे " ( गोखचिशाब १२ )

**बाब; बाबत** ( स्त्री० ) [ अ० बाब् ] रकम; कलम; गोष्ट. त्याबाबत=त्यासम्बन्धी.

**बाबस्वार** कलम्वार.

**बा-यक्-दिगर** एकमेकांशीं. " बा-यक -दिगर मन्सबा करूं लागले कीं " ( साने-पयाव ४७३ ).

**बार्कस** ( न० ) [ फा० बार्कश् ] व्यापारी मालाचें जहाज़.

**बार्कशी** मालाची वाहतूक करणारा

**बार्गीर** ( पु० ) [ फा० बार्गीर् ∠ फा० बारा=घोडा ] धन्यानें दिलेला घोडा ठेवणारा स्वार शिपाई.

**बार्दान** ( न० ) [ फा० बार्दान् ] गांठोडें; पोतें. अक्कलेचें बार्दान=मूर्ख.

**बार्निशी** ( स्त्री० ) बार्निसाचें काम; सर्कार दप्तरीं नोन्दणूक.

**बार्नीस** ( पु० ) सर्कारदप्तरीं नोन्द झाल्याची खूण म्हणून सनदांवर बार अशीं अक्षरें लिहिणारा.

**बार्बर्दारी** ( स्त्री० ) [ फा० बार-बर्दारी ] भार-वाहणूक. " बार्बर्दारीचे उण्ट " ( चित्रगुप्त १४ ).

**बार्याब** [ फा० बार्याब् ] दर्बारीं हजर. " गुलाम जंमियत सुद्धां हुजूर बार्याब होतो " ( राजवाडे ५।१५० ).

**बार्हा** [ फा० बार्हा ] वारंवार. " आम्ही हुजूरांत बार्हा अर्ज़ मारूज़ करितों कीं राजे बहेरी बहादूर हज़रतीचे कदमा. खेरीज़ दुसरा अर्थ जाणत नाहींत " ( राजवाडे २२।६२ ).

**बार** [ फा० बार् ] पर्वानगी. " तुमचें मन बार देत नसिले तरी कौळ-बोल घेऊनु पुत्रा बराबरी लोक देउनु पाठविजे " ( राजवाडे १५।३६७ ).

**बारकाई** ( स्त्री० ) [ ∠ फा० बारीक् ] सूक्ष्मपणा.

**बारीक** [ फा० बारीक् ] सूक्ष्म; कृश. " श्रीमन्त स्वामींची बहुतच मर्जी

बारीक ( =खप्पा ) जाली आहे" ( राजवाडे ११२२८ ).

**बारीक-राव** काडी पहील्वान.

**बारीश** ( स्त्री० ) [ फा० बारिश् ] वृष्टी; पाऊस. "बारशीच्या जोरामुळें माघारी कूच करून गेलों" (साने-पयाव३८४). "बारिशेचा शदत"=पाउसाची झोड ( राजवाडे १०।१८२ ).

**बारूत; बारूद** ( स्त्री० ) [ फा० बारूत् ] ज्वालाग्राही दारू. "बारू." ( इम ८ ). "बारूद सरली; दररोज़ चार मण कच्चे होती तेवढी खर्च होते" ( खरे १२। ६३३९ ).

**बारूद-खाना** ( पु० ) दारूखाना ( खरे ७। ३६०२ ).

**बाल-पर्वर्शी** ( स्त्री० ) लढाईत कामास आलेल्यांच्या मुलाच्या सङ्गोपनासाठीं केलेली नेमणूक.

**बालायेश** ( स्त्री० ) [ फा० बालाइश् ] उन्चावणी; सर्फराजी. "फितुरियास जागा देऊन त्याची बालायेश करणें हे कोणते रियासतींतील चाल आहे" ( खरे ७।३५७१ ).

**बालिस्त; बालीस** ( स्त्री० ) [ फा० बालिश्त् बालिश् ] उशी; तक्या.

**बाले-किल्ला** ( पु० ) [ फा० बाला=उन्च ] पहाडी किल्ल्याचा उन्च पोट-किल्ला; उपर-कोट.

**बाले-घाट** घाटमाथा; घाटावरील प्रदेश.

**बा-वक्र; बा-वकर** [ फा० बा-वकार् ] प्रतिष्ठावन्त; कीर्तिमान्. "राजेसाहेबांची रियासत दुसरियाचे रियासतीनें निस्बती-पेक्षां सर-सब्ज़ ( =सुसम्पन्न ) व मज़्बूत रहावी" ( राजवाडे १०।२५२ ).

**बा-वकूफ** [ फा० बा-वुकूफ् ] शाहणा. "एक सर्दार बा-वुकूफ" ( राजवाडे १२।२७ ).

**बा-वजूद; ब-वजूद** [ फा० बा-वुजूद् ] असें असूनही. "बा-वजूद अब्दा-लीची गडबड दिवसेंदिवस अधिक ऐकत असतां मुलूक आपला खाली टाकून श्रीरङ्गपट्टणास ..गेलेत" ( राजवाडे १।१२४ ).

**बि-कलम** कलम्वार; तफ्शील्वार.

**बि-कलम-जुलूम** जुलमानें लिहिलेलें. "आपणांस नेऊन रज़ावन्द नसतां लेहून घेतलें मग आपण बि-कलम-जुलूम म्हणून दहशत खाऊन गैरहजीर होऊन तमचे भेटीस आलों" ( राजवाडे २०।४२० ).

**बि-तफ्शील** [ फा० बि तफ्सील् ] तफ्शी-ल्वार; सविस्तर.

**बिचारा** [ फा० बी-चारा ] क्षीणोपाय; गरीब; बापडा; निरुपद्रवी.

**बिचोबा** ( पु० ) [ फा० बीचोबा ] लहान बिन-खाम्बी तम्बू.

**बिछाईत; बिछायत** ( स्त्री० ) [ अ० बिसात् ] ज़ाज़म; बैठक; मालमत्ता ( सभासद ५८ ).

**बिछाइती** गैर-दुकान्दार. "बिछाइती वाणी" ( वाड-समा ३।१३५ ).

**बिछावणें** अन्थरणें.

**बिजन** [ फा० बी-जान् ] निष्प्राण. ( न० ) कत्तल; कतलाम. "आपल्या साठ बायकांस एक एकीस खोलींत बोला-वून आणून, तर्वारीनें छाटून बिजन केल्या" ( ऐस्फुले ६४ ).

**बिझाईत** ( स्त्री० ) [ अ० बिझाअत्; बिसात् ] मालमत्ता ( सभासद २२ ).

**बि-तर्जुमा**=नियमानुसार ( राजवाडे १५। २७१ ).

**बिदा** ( स्त्री० ) [ अ० विदाअ ] रवानगी; पाठवणूक; निरोप, रवाना. " तेथील सर्व भाव पाहून बिदा घेतली " ( ऐति ७८ ). "येल्ची मज्कुराची बिदा विलायतेस करणार " ( दिमरा २।७९ ). "तुम्हासही बेकैदी चालल्यान इजा द्यावी सबब आमच्या खावन्दांनीं आम्हास रूमशामहून बिदा करून पाठविलें " ( पाब १६ ). " त्याजवर आणीक फौज् बिदा केली" ( दिमरा १।१८० ). "भेटी घेऊन बिदा होऊन येतों " ( राजवाडे ११।४१ ).

**बिदाई** बोळवणूक ( वाड-समा ३।३०० ).

**बिदागिरी; बिदागी; बिदाकी** ( स्त्री० ) बोळवणी; निरोप देतांना सम्भावना करण्यासाठीं दिलेलें पारितोषिक. " नारू बरे झाले म्हणजे तुम्ही बिदागी करूं " ( पेद्समा ४ ). " बिदाकी " ( होकै १२९ ). " नन्तर विडे देऊन बिदागिरी केली " (राजवाडे १२।१९५).

**बिदाती** [ ? बिद्अती ] नवीन ( वाड-मा २।१०६ ).

**बिदानन्द** [ फा० बि-दानन्द् ] जाणोत; जाणावें.

**बिन** [ फा० बिन् ∠ अ० इब्न् ] पुत्र; वल्लद. अ बिन् ब = बचा पुत्र अ.

**बिन-तकार** निमूटपणें.

**बिन-मोज्बी** बिन-हिशेबी; बे-जबाब्दार.

**बिनावर** [ फा० बिनावर् ] साठीं. " बिनावर मुलाजिमत शोर साहेब आले " ( पद्मव ११६ ).

**बिनावरान** म्हणून; प्रमाणें. "तरी बिनावरां मालूमात मनास आणून तम्हास कौल मर्हमत केला आहे " ( राजवाडे १७।३३ ).

**बिनी; बिन्दी** ( स्त्री० ) [ फा० बीनी = नाक ] म्होरप; सैन्याची आघाडी.

**बिनीवाला** ( पु० ) बिनीतील माणूस; बिनीचा अधिकारी.

**बिबी, बिब्बी** ( स्त्री० ) [ फा० बीबी ] कुलीन मुसलमान स्त्री.

**बिमार** [ फा० बीमार् ] आजारी; व्यथित. " बघुन कामिना तुम्हा नगरच्या व्हतील बीमार " ( देवल-मृच्छकटिक ).

**बिमारी** ( स्त्री० ) [ फा० बीमारी ] आजार.

**बिरञ्जी** [ फा० बिरञ्जीन् ] पितळी ( दिमरा २।१५५ ).

**बिरादर** ( पु० ) [ फा० बिरादर् ] भाऊ; भ्राता.

**बिरादरी** ( स्त्री० ) [ फा० बिरादरी ] भाऊपण; बन्धुसमाज; जमात. " बिरादरी सारखी चाल उभय दौलतींची आहे " ( राजवाडे ५।८६ ). "जमादार जाग्यावरच पडला होता; नन्तर त्याचे बिरादरीची जप्ती करविली; तों लोक कांहीं पळून गेले" ( खरे ११।५६६८ ). " आम्ही त्या बिरादरींतील आहोंत " ( ऐति ३।४८ ).

**बिल्-एक-रुई** [ ∠ फा० यक्रूई = एकनिष्ठा ] एकनिष्ठपणें. " तरी बिल्-एक-रुई दृढतर चित्तारूढ करितील " ( राजवाडे ६।६०२ ).

**बिल्कूल** [ अ० बिल्कुल्लू ] सर्वस्वी; मुळींच. " बिल्कूल एख्त्यारी व मुख्त्यारी मज्कूर एक साहेब जनेलाची असावी " ( पद्मव ८५ ).

**बिल्फैल** [ अ० बिल्फिअल् ] वस्तुतः; अगदीं. " बिल्फैल नातवान " ( राजवाडे १५।२४८ ).

**बिल्मक्ता** मक्त्याप्रमाणें. " बिलमख्ता खण्डणी केली ते कबूल असोन " ( राजवाडे १८।५३ ).

**बिल्वर; बिलोर** ( पु० ) [ अ० बिल्लौर् ] एक उच्च प्रकारची काच; एक बाङ्गडीचा प्रकार.

**बिल्वरी; बिलोरी** [ फा० बिल्लौरी ] बिलोराचा.

**बिलन्द** [ फा० बलन्द्; बुलन्द् ] उन्च; दुर्गम; बेलाग. " अशीरगड किल्ला, मातबर बिलन्द आहे " ( पारसनीस–ब्रप ६४ ). "या जागीं बिलन्द किल्ला बान्धून वसवावा " ( साने–पयाव ३७६ ). " कोट बिलन्द गच्ची रुन्द " ( साने–पयाव ४३१ ).

**बिलन्दर** बिलन्द; बेलाग; अथाङ्ग; धूर्त; लफङ्गा. " पहाडी किल्ला असा एका दिवसांत यावा असें कांहीं नाहीं; किल्ला फार बिलन्दर " आहे ( चन्द्रचूड–दप्तर १।१११ ).

**बिला–उजूर** हर्कत न घेतां. " बिला उजूर व बिलाकुसूर दुम्बाला करून चालूं देणें " ( गोइसा १५ ). " बिला उजूर केरूरचें तालुका बमय ठाणें हवालीं करितील " ( राजवाडे १९। ११५ ).

**बिला–कसूर** [ अ० बिला कुसूर् ] चूक इयगय न करितां.

**बिला–महसूल** ज़कात–माफीनें. "सामान जङ्गी सर्कारांत मल्लूब जाल्यास (=हवें असल्यास ) ... वेपारी यांज पासोन बिला महसूल खरीदी करण्याची पर्वानगी असावी " (राजवाडे ७।९४).

**बिलाशक** [ अ० बिलाशक् ] निःसन्देह; बेलाशक. " तुम्ही फौज़सुद्धा बिलाशक जाऊन सर्खेलीस सामील होणें " ( साने पयाव ४८६ ).

**बिला हुज्जत** बिनतक्रार " बिला हुज्जत वर्तावें" ( ऐटि २।७४ ).

**बिशात; बिसात; बिशाद** ( स्त्री० ) [ अ० बिसात् ] माल; सामान. " नाहीतरी माल–बिसातीची तमा न धरितां भाण्डियाचे माराखालीं तराण्डें फोडून टाकून सलाबत पाडावी " ( मराआ ३८ ). "बिशात" ( सभासद ५१ ). "बिशाद" ( सभासद ४८ ) " बिछाईत " ( सभासद ५८ ).

**बिशाद** ( स्त्री० ) [ अ० बिसात्] सामर्थ्य; ताकद; मजाल; प्राज्ञा.

**बिस्मिल्ला** ( पु० ) [ अ० बिस्मिल्लाहिर्रह्मानिर्रहीम् = दयाळू व कनवाळू अल्लाच्या नांवानें] मुसल्मानांत मुलाच्या अगर मुलीच्या पांचव्या वर्षी घोड्यावरून मिरवणूक काढून मशिदींत नेऊन ' बिस्मिल्ला ' दि कुराणाचे कल्मे पढवितात तो उपयनसदृश विधी; मन्त्र म्हणून विधिपूर्वक हत्या करणें. "याचे कन्येची बिस्मिल्लाची शादी साठीं ( उत्सवासाठीं ) रविवारीं रात्रीं मेहदी निघाली" ( राजवाडे ५।५७ ). "मुर्गीस बिस्मिल्ला तो कशास ! " ( होकै ११ ).

**बिस्यार; बिश्यार** [ फा० बिस्यार् ] फार; पुष्कळ. " बिस्यार खुश्वक्ती हांशील जहाली " ( साने–पयाव ३८४ ). " बिस्यार सालें गुजरलीं " ( साने –पयाव ४०० ) "खुश्वक्ती बिशियार जाहली " ( पारसनीस–ब्रच २३ ).

**बुज़ुर्ग** [ फा० बुज़ुर्ग् ] थोर; वृद्ध. " अज़ कदीम मोहीमांचा व ईं आनेवांचे

बुजुर्गांचा येख्लास कमाल चालोन आला आहे" (राजवाडे ३।९०) "हें सर्व खुर्द-बुज़ूरुख यांस माहीत आहे" (वाड-कैफियती १००).

**बुजुर्गी** (स्त्री०) [फा० बुज़ुर्गी] थोरवी; मोठेपणा. "नबाबांनीं तर बुजुर्गीस लाजीम तो मार्ग सोडला" (राजवाडे ५।३१). "परन्तु आम्हां लोकांची बुजुर्गी काय आहे!" (चिरा ३६). "ज़मियतच्या सर्दारास दोंना सर्कारच्या बुजुर्गीवर व उम्दगीवर प्रनेष्ठतेचे व इज़तीचे रस्म अमलांत येतील" (पेअ ५८).

**बुटा** (पु०) **बुटी** (स्त्री०) [फा० बोता] कापडावर रङ्गविलेलें अगर विणून काढलेलें फूल; नक्षी.

**बुट्टेदार** बुटे असलेला.

**बुणगें** (न०) [फा० बुन्गाह्] सैन्याच्या सामग्रीचा तळ; सैन्याबरोबरचे उद्मी वगैरे गैरलढाऊ लोक. "बहिर-बुलगे" (साने-पयाव ९०).

**बुत्परस्त** [फा० बुत्परस्त्] मूर्ति-पूजक.

**बुत्परस्ती** (स्त्री०) [फा० बुत्परस्ती] मूर्तिपूजा. "मुसल्मान होऊन जो बुत्परस्ती करील त्या सज़ा तो खिताबमोजीब (=धर्मग्रन्थान्वयें) आणखीच आहे" (पारसनीस-ब्रप २३५).

**बुत्फरोश** [फा० बुत्फरोश्] मूर्तीचा विक्रय करणारा; धर्माचा सौदा करणारा.

**बुत्फरोशी** (स्त्री०) [फा० बुत्फरोशी] मूर्तीचा विक्रय; धर्माचा व्यापार.

**बुत्शिकन** [फा० बुत्शिकन्] मूर्ति-भञ्जक.

**बुत्शिकनी** (स्त्री०) [फा० बुत्शिकनी] मूर्ति-भञ्जन.

**बुद्रुक; बुद्रुख; बुज़रूग** [फा० बुज़ुर्ग] वृद्ध, थोर "सर्कारीहून बुज़रुगांपासून... बाजीराव पण्डित प्रधान यासी परगणे मज़्कूरची वतन देशमुखी अज़ कदीम इनायत असे" (वाड-मा १।६५). "तोतयाचे चौकशीसाठीं बुद्रुख जमा करितात" (खरे ६।२७१२). "एकाएकी लढाई बिघडोन बुद्रुख भाऊसाहेब सर्कार-कामास येऊन कैलासवासी जाले" (खरे ११।६०९८).

**बुनियाद; बुनाद** (स्त्री०) [फा० बुन्याद्] पाया, ज़ोर; आरम्भ; स्वभाव; शील. "याची बुनियाद् श्रीरङ्गपटनाचा तहनामा" (राजवाडे ७।९२). "हलक्या गोष्टी आम्हांकडील नबाब व रुक्नुद्दौला हैदरखांच्या वकिलाशी बोलत असल्यास त्याचा प्रकार, बुनियाद् कशी आहे तें कळतच आहे" (खरे १०७४). "त्यास आपण बुनादीपासून आपले वतनाचें वर्तमान व कागद्-पत्र तमाम दाखविले" (राजवाडे ८।४४).

**बुनियादी; बुनादी** मूळापासूनची, मूळापासून सर्व हकीकत. "गांव-कुळकर्ण बुन्यादी विठ्ठल माद् शेणवी याचें होतें" (राजवाडे ८।७४). "याची देशमुखी अव्लादी-बुनादी होती ऐसें आपणांस ठावकें आहे" (राजवाडे १५।७५). "आपले वडिलांनींही कुल बुनादी साङ्गितली होती" (राजवाडे १५।७५).

**बुर्खा** (पु०) [अ० बुर्कअ] अवगुण्ठन; पडदा.

**बुर्जी** (स्त्री०) [फा० बुर्द्] राजाखेरीज सर्व मोहरी मरणें.

**बुरूज़** (पु०) [अ० बुर्ज़] बुडा; कोटाच्या तटबन्दींत मज़्बुतीसाठीं,

बचावासाठीं व मान्यासाठीं जागोजाग केलेली वर्तुलाकार बन्दिस्त.

**बुरूज-बन्दी** ( स्त्री० ) बन्दूके-शिपायांच्या तुकड्याची रचना. " बुरूज बन्दी चोंहोकडे केली आणि रेज-गण भरून तोफा ठेविल्या होत्या त्या त्या-समयीं सोडिल्या " ( खरे ८०६ ).

**बुल्दा** ( पु० ) [ फा० बुल्दा ] शहर; प्रान्त. "औरङ्गाबादचे बुल्याचे सुभेदारीचें काम " ( राजवाडे ७।२२१ ).

**बुल्बूल** ( पु० ) [ फा० बुल्बुल् ] एक प्रसिद्ध गाणारा पक्षी.

**बुलन्द** [ फा० बुलन्द् ] उच्च; दुर्गम; बेलाग. " वसई जागा बका बुलन्द, सुरुङ्गाचा उपाय नाही " ( पारसनीस ब्रप ७८ ).

**बुलन्दी** ( स्त्री० ) [ फा० बुलन्दी ] उच्ची. "दोनी मण्डप बुलन्दीस कमी याजमुळें गर्मिणा भारी; हज्मा भारी होता " ( खरे १०।५४४५ ).

**बुलाक** ( पु० ) [ फा० बुलाक् ] नाकपुड्यांमधील पडद्यास भोंक पाडून त्यांत घालावयाचा मोत्याचा लोम्बता अलङ्कार.

**बे-** [ फा० बी ] वांचून; अभाव दाखविणारा उपसर्ग.

**बे-अकली** [ फा० बी-अक्ल् ] मूर्ख;

**बे-अदब; बे-अदबी** ( स्त्री० ) [ फा० बी-अदबी ] असभ्यता; अपमान; अनिष्ठा ; हरामखोरी. " टोपीवाल्यांनीं बे-अदब केली ते हाल्खुद्द राहून सौदागिरीचे मार्गें वर्तणूक करितील " ( राजवाडे १२।५ ). " जातीनें सुजायत दौला याचे डेऱ्यास आलियाची बे-अदब माफ करून " ( राजवाडे ३।१८६ ). " जाजती बे-अदबी व बे-अदाई न करावी " ( खरे ७।३५७६ ).

**बे-अदाई** ( स्त्री० ) विरोध; स्वामिद्रोह. " सर्कारचे अमलास बे-अदाई करावी " ( दिमरा १।५१ ).

**बे-अब्रू** ( स्त्री० ) [ फा० बी-आब्रू ] फजिती, दुर्लौकिक; फजीत. " स्त्री सती गेली नाही तर तिची बे-अब्रू आहे व बे दस्तूर होतो असेंहि नाहीं ( ऐटि २।३३ ). " कोत्वालास बे-अब्रू करून माघारें पाठविलें " ( चिरा १३ ).

**बे-आब** ( पु० ) [ फा० बी-आब् ] बे-अब्रू. " मग स्वामी म्हणतील कीं आमचे माणसाचा बे-आब केला" ( खरे ९।५०२८ ).

**बे-आराम** ( पु० ) **बे-आरामी** ( स्त्री० ) [ फा० बी-आराम् ] अस्वास्थ्य; अस्वस्थ. " मातुश्री हैदराबादेंत बे-आराम होती तिचा वाका जाल्याचें वर्तमान आलें " ( राजवाडे ७।८३ ). " महालांत बे-आराम शरीर नेहमीच विकल जाहे " ( होके ६ ) " तुमचेही तबियतीस दोन तीन दिवस बे-आरामी " ( राजवाडे ५।१५७ ).

**बे-इज्जत** ( स्त्री० ) अप्रतिष्ठा.

**बे-इतबार** गैर-भरंवसा. " यांत श्रीमन्तांस आमचा बे-इतबार भासेल " ( मद्या १।१११ ).

**बे-इतबारी** अविश्वसनीय. " परन्तु ते बे-इतबारी; याजकरितां भडोच सुरतेस राहूं " ( राजवाडे १२।१०६ ).

**बे-इतल्ला** गैर-माहित; बे-दखल; बद्-तर्फ. " त्याचे कार्कून बे-इतल्ला केले" ( राजवाडे १०।११० ).

**बे-इमान; बे-मान** [ फा० बी-ईमान्= अधर्मी ] कृतघ्न; अविश्वसनीय; भग्न-प्रतिज्ञ. "परन्तु शीख बे-मान आहेत" ( दिमरा १।१३५ ).

**बे-इलाज्** ( पु० ) निरुपाय.

**बे-उजूर** बिनतक्रार; कांहीं सबब न साङ्गतां. "या दिवसांत पोटास न मिळे तेव्हां लोक चाकरी बे-उजूर कैसी करितील ! " ( राजवाडे १०।५७ ).

**बे-कदर** निर्धास्तपणें. " दिलाचा दर्या बे-कदर नाचायला लागतो" ( गडकरी-राजसंन्यास ५ ).

**बे-कम-व-कास्त** [ फा० बी-कम्-उ-कास्त्] कांहीं कमी न करितां; साद्यन्त. "सदहू कलमें सुमार बे-कम-व-कास्त कलमी केलीं आहेत" ( खरे ७। ३५७५ ).

**बे-करारी** ( स्त्री० ) अनिश्चिती; तहमोड. "तहनाम्यास कांहीं बहुत दिवस जाले ऐसें नाही, इतक्यांत त्याजकडून बे-करारीच्या चाली सुरू होतात" (राजवाडे ७।१९ ).

**बे-कानू** ( स्त्री० ) अन्याय; जुलूम.

**बे-कायदा; बे-कायदेशीर** [ फा० बी-काइदा ] नियमबाह्य; गैर-कायदेशीर; जुलमी.

**बे-कार** [ फा० बीकार् ] निरुद्योगी; बे-रोजगारी.

**बे-कारी** ( स्त्री० ) [फा० बी-कारी] बे-रोज़गारपणा.

**बे-किलाफ** ( पु० ) [ ८अ० खिलाफ्= वैर ] सख्य; संशयनिवारण. " श्रीमन्त दादांचें मानस...आपला बे-किलाफ मातुश्रीच्या विद्यमानें करून त्रिम्बकास जावें" ( खरे २।६०८ ). "असें मनःपूर्वक आपले चित्तीं बे-किलाफानें सन्देह न धरितां चित्तीं असेल तरी" ( राजवाडे ८।१२८ ).

**बे-कुसूर** [ फा० बी-कुसूर् ] न चुकतां; बिला-कसूर; पूर्णपणें (राजवाडे ८।१२). "दर्म्यान कांहीं इस्कील जाली नाहीं; बे-कुसूर चालत आलें आहे" ( राजवाडे २०।२२० ).

**बे-कैद; बे-कैदी** ( स्त्री० ) [ फा० बी-कैदी ] शिस्तीचा अभाव; स्वैरवर्तन; स्वैर; स्वैरपणें. "गुलाम कादर यानें दिल्लींत बे-कैद बहुत केली" ( राजवाडे १०।२४५ ). "होळकरांच्या फौजेंत बे-कैदी फार" ( खरे ९।४७९६ ). "सर्व बादशाही तुम्ही मराठ्यांनीं बे-कैदी करून बुडाविली" ( पाब १७ ). "ज्यास मोकासे द्यावे तो व ज़मीदार एक जहालियानें बे-कैद होतील" ( सभासद २४ ). "बे-कैद वर्तणूक" ( सभासद २३ ). "ब्राह्मणी फौज़ बे-कैदी" (इब २७). "बे-कैदी चालणें" ( पाब १६ ).

**बे-कौली** बिगर कौलाचा. "बे-कौली तराण्डीं" ( वाड-समा २।१९५ ).

**बे-खत्रे** निःशङ्कपणें. "बे-खत्रे हुज़ूर यावें" ( जोरा १०५ ).

**बे-खबर** [ फा० बी-खबर् ] असावध; गाफील. "ते बे-खबर होते" ( खरे ४।१६६३ ).

**बे-खबर्दार** गैरसावध ( मराचिस १४ ).

**बे-खर्च; बे-खर्ची** [ फा० बी-खर्च् ] खर्ची जवळ नाही असा; निर्धन. "बे-खर्च आहों; निरोप देणें" ( खरे २।५४४ ). "वजीर बे-खर्च; त्यास

खर्चास आम्ही पैका दिला " ( राजवाडे ६।४४८ ). " कृपाळू होऊन आज्ञा केली तर हुजूर येईल; बे-खर्ची आहे; माणूस माकूल दिसतो " ( राजवाडे १।६४ ).

**बे-खातरी** ( स्त्री० ) अविचार. " चार कोटींची मालियत जवळ असतां कञ्जूषपणानें सर्दारास बे-खातरीनें निरोप दिल्हा " ( जोरा १०९ ).

**बेगम** ( स्त्री० ) [ तु० बेगम् = सर्दारकन्या; सर्दारपत्नी ] राणी; वयांत आलेली कुंवारीण.

**बेगमात** अनेक व० बेगमचें. " किल्ल्याची व बेगमात व पातशाह-ज़ादे व सलातीन व नाज़र यांची ज़प्ती केली " ( दिमरा १।२७२ ).

**बेगमी; बेज़मी** ( स्त्री० ) निश्चिन्ती; पुरवठा; सङ्ग्रह. "समाधान करून बेगमी-शेगमी करणें तें करून रवानगी केली" ( राजवाडे ३।२३९ ). "पोटाची वस्त्राची बेज़मी करून दिली " ( राजवाडे १५। ११६ ). " गडोगडीं गल्ला असेल तो देववून जेसी तेसी पागेची बेगमी केली आहे " ( राजवाडे ८।२३ ).

**बेगर्द** [ फा० ब-गिर्द् ] भोंवतीं. " मुलूख अगदी वीस पञ्चवीस कोसपर्यन्त बे-गर्द, बे-चिराख जाहला " ( पाव १४ ).

**बेगार** ( पु० ) [ फा० बेगार् ] वेतन न देतां वेठीस धरिलेला मनुष्य.

**बेगारी** ( स्त्री० ) [ फा० बेगारी ] वेठीची पद्धत.

**बे-गुन्हा** गुन्हा नसतांना. " बक्षीस बे-*गुन्हा कैद केलें " ( जोरा १०५ ).*

**बे-गुमान** [ फा० बे-गुमान् = निःशङ्क ] बेपर्वा; गर्विष्ठ; उन्मत्त.

**बे-चिराख; बे-चिराग** [ फा० बी-चिराघ् ] दीपहीन; ओसाड; उध्वस्त. " पेण्ढारी जयपूरवाल्याचे प्रान्तांत कज़ाकी करून मुलूख बे-चिराग करितात " ( दिमरा २।१५६ ).

**बे-चोबा** ( पु० ) बिचोबा पहा.

**बे-ज़बाब्दार** जोखीम न ओळखून स्वैर वागणारा.

**बे-ज़बाबी** [ फा० बी-जवाब्=निरुत्तर ] उद्धट; उर्मट; तासाचे ठोके न देणारें ( घड्याळ ).

**बे-ज़रब** ज़ोरानें; उठाव करून; निःशङ्कपणें; बे-धडक. " घोड्याची लात बे-ज़रब बसली; दोन घटिका मूर्छित चौधरी पडला " ( राजवाडे ७।७४ ) " तेव्हां डावी टोळी विश्वासराव स हेबांचा होती ती बे-ज़रब उठली " ( पाव ४० ). " त्यानन्तर कित्तूरकर नीट चालून आमच्या तोफांकडे येऊं लागला तेव्हां आमच्या भले लोकांनीं बे-ज़रब घोडीं घालून कित्तूरकरास मोडून वोढ्यापर्यन्त नेऊन घातला " ( खरे ५।२३८८ ). " दक्षिणची फौज़ मऊ लागलें म्हणजे बे-ज़रब घेणार; कठिण लागलें म्हणजे फिरोन पाहणें नाही " ( इम २०८ ).

**बे-जा; बे-जहा** [ फा० बी-जा ] अनाठायीं; फाजील; अनुचित; रुष्ट. "अब्दुल खैरखान याणीं... बे-जा केलें " (राजवाडे १।१५ ). " पूर्ववत्प्रमाणें बे-जहा वर्तणूक व्हावयास लागली " ( खरे १२। ६५४९ ). " कशीही ताबियत बे-जाह *असल्यास बाईसाहेबांचा निरोप गेला* असतां त्याप्रमाणें व्हावयाचें " ( होके ६६ ).

**बेज़ार** [ फा० बीज़ार् ] त्रस्त; हैराण.

**बेज़ारी** ( स्त्री० ) [ फा० बीज़ारी ] त्रास; हैराणी.

**बे-जान** [ फा० बी-जान् ] निर्जीव; ठार.

**बे-ज़ाब** बे-गुमान; बे-मुलाज़ा; बे-जबाब्दारपणें. "मुलाकडे बाक नाहीं; मुलाची दाण्ड, बे-ज़ाब आहे" ( गोखचिशाब १५ ). "माणूस बे-ज़ाब मारिलें" ( खरे १।४४१ ).

**बे-ज़ाबता** ( पु० ) अन्याय (सशिच८४).

**बे-ज़ोर** [ फा० बि-ज़ोर् ] ज़ोरानें; ज़ोगावरीनें. "बे-ज़ोर लढाई देऊन... तराण्डें पाडाव करून आणिलें" ( खरे ८।४१९९ ).

**बे-तक्शीर** [ फा० बी-तक्सीर् ] निरपराधी; अपराध नसतां; नाहक. "हे बे-तक्षीर आहेत" ( राजवाडे५।६५ ). "बे-तक्सीर त्याजवर इतराजीचें कारण काय!" ( दिमरा २।१२० )

**बे-तकवी** [ फा० बे-तक्विया ] असमर्थ; नातवान ( राजवाडे ८।४२ ).

**बे-तर्तूद** ( स्त्री० ) तज्विजीचा अभाव; अव्यवस्था. "बे-तर्तूद असतां काम शिरा ( = उत्तम ) जालें" ( खरे ९।४६७२ ). "कोणेविशीं बे-तर्तूद जाली असें होऊं नये" ( खरे ९।४९६८ ). "त्यांनीं बे-तर्तुदीनें लढाई केली म्हणोन यश प्राप्त जाहलें" ( खरे २।५९६ ).

**बे-तऱ्हा** [ फा० बी-तरह् ] विलक्षण; भारी. "याउपर उपेक्षा करून कालहरण केलियास नवाबाचे दौलतीस बे-तऱ्हा धक्का बसेल" (राजवाडे ५।१६६). "आजपासून जाण्याचा पुकारा आणि शोहरत बेतऱ्हा होणें खुश्नुमा नाहीं" ( राजवाडे ७।१९२ ). "बे-तऱ्हा इङ्ग्रजी लोकांस मार दिल्हा" ( राजवाडे १९।९३ ). "मर्जी बे-तऱ्हा जाली आहे; बहुतांच्या अब्रू क्षणक्षणां जातात" ( साने-पयाव ४० ). "बाणांचीही मार-गिरी बे-तऱ्हा केली" ( साने-पयाव ४८० ).

**बे-ताब** [फा० बी-ताब्] असमर्थ; क्षीण; हतधैर्य. "मातुश्री अहल्याबाई यांस शैत्य-उपद्रव होऊन पांच सात दिवस बे-ताब होती" ( मद्‌बा १।२१८ ). "ज्वर शरीरीं चढला तो अद्भुत... केवळ बे-ताब ( असह्य )" "रसद बिल्कूल पोहोंचेना तेव्हां बे-ताब होऊन ( गाडर ) रात्रौ घांट उतरून पळोन गेला" ( दिमरा १।३८ ).

**बे-तालूक** [ फा० बे-तअल्लुक ] गैर-सम्बन्धी; भलता. "हाली तुवां कोण्हता बे-तालूक अन्देसा न करितां बे-शक होऊन कसबामध्यें येऊनु" ( राजवाडे १५।३१ ).

**बे-दखल** [ फा० बी-दख्ल् ] बे-इतल्ला; अधिकारच्युत. "आपला गुमास्ता असोन आपणास बे-दखल वतनास करून सोडलें आहे" ( राजवाडे २०।४६ ). "इङ्ग्रजांनीं कोणाची दौलत घेतली, त्यास बे-दखल केलें हा बट्टा बद्‌मामलीचा; नाहीं तो लावून घेऊं नका" ( खरे ८।४४३२ ).

**बे-दम** [ फा० बी-दम् ] निपचीत; निपचीत पडे पावेतों दिलेला ( मार ). "उभयतांस कमच्या मारून बे-दम केलें" ( वाड-समा ३।१०७ ).

**बे-दर्द** [ फा० बी-दर्द् ] निघृण; बे-फिकीर, बेगुमान.

**बे-दस्तूर** ( पु० ) गैर-शिरस्ता; अन्याय. " स्त्री सती गेली नाहीं तर तिची बे-अब्रू आहे व बे-दस्तूर होतो असेंही नाहीं " ( ऐटि २।३३ ).

**बे-दाणा** ( पु० ) [ फा० बी-दाना ] आंत बी नाहीं असें द्राक्ष.

**बे-दाद** (स्त्री०) [फा० बी-दाद् ] अन्याय; जुलूम; बे-बन्दशाही.

**बेदार** [ फा० बीदार् ] जागृत. " नबाब बेदार जाले " ( राजवाडे ७।८३ ).

**बे-दावा** ( पु० ) [ फा० बी-दावा ] ना-मागणी; सोडचिठ्ठी. " चौथी तक्शीम घेणें आणि बेदावा लिहून देणें " ( वाड-बाबा २।२३ ).

**बे-दावा-फारखती** ( स्त्री० ) सोडचिठ्ठी ( वाड-क्षमा ३।६९ ).

**बे-दिक्कत** ( स्त्री० ) निःशङ्कता; बे-उजूर, बिनतक्रार. "बे-दिक्कत जाणोन पल्टणेंसुद्धा घांट चढोन या रोखें येणें " ( खरे ११।६०९८ ). " त्याजवरून हल्ली निषेधून बे-दिकत लिहिलें आहे" (खरे ६।२९०५). " ऐवज़ बे-दिक्कत पावता करून " ( राजवाडे २२।१४ ).

**बे-दिली** [ फा० बी-दिली ] औदासिन्य; असन्तुष्टता; रुष्टता.

**-दील** [ फा० बी-दिल् ] उदासीन; असन्तुष्ट; श्रमी.

**बे-दुवा** ( पु० ) शाप; अवकृपा. " हे लोक कोणाचा बे-दुवा घ्यावयाचे नव्हेत" ( खरे २।४७९ ). " पीर-औलियाची बेदुवा जाहली " ( इस १ चान्द-बिबी १० ).

**बे-नवा** [ फा० बी-नवा ] निर्धन, अ-सहाय; अधीर. " पादशहा बे-नवा होऊन खानास लिहीत, अद्याप मराठी मोडत नाहीं " ( मराचिथोरा ५३ ). " खान बे-नवा बुद्धिभ्रंशें क्रोधें नेत्र वटारून " ( चित्रगुप्त २४). "जे बेनवा फन्दी वागतील त्यांचें पारिपत्य करावें" ( चित्रगुप्त ३७ ).

**बे-निगा** अपरक्षण; दुर्लक्ष्य. " फौज़ जिकडील तिकडे; बे-निगेनें बुडाले " ( मराचिस २१ ).

**बे-निहायत; बे-न्याहत** [फा० बी-निहायत् ] निःसीम; अपार; पराकाष्ठेचा. "परन्तु टिपू सुल्तान याजकडील पेश्कसीचा तगादा बे-निहायत आहे " ( राजवाडे ७।३७ ). " जङ्गी सामान बे-निहात " ( राजवाडे १९।५१ ). " इङ्ग्रजांची मार-गिरी, तोफांची व गाड्यांची सलख होत होती ती बे-न्याहत मारगिरी होत होती " ( खरे ७।३६१८ ). " सर्कारचे सर्दार व लोक व गाडदी व हशमी लोकांनीं...इङ्ग्रेजांचा जङ्गी मार होत असतां, खातरेस न आणितां लढाई सुरू करून मोठ्या तारफेनें बे-न्याहत मर्दुमी करून युद्ध केलें"(साने-पयाव १०४).

**बे-पड्दा** गैर-पड्दे नशीन; मानखण्डित. " त्यासमयींच पड्यांतील कबेला बे-पड्दा करून तोफेवर बान्धण्यास माण॰ सांनीं हातीं धरून न्यावयास लागतां " ( गोखचि शाब ३३ ).

**बे-पर्वा** [ फा० बी-पर्वा ] निष्काळजी; बे-गुमान.

**बे-पर्वाई** ( स्त्री० ) [ फा० बी-पर्वाई ] निष्काळजीपणा; बे-गुमानी.

**बे-पाया** गैर-कायदेशीर. " बापूजी महादेव यांनीं पाया सोडून बे-पायाच वर्तणूक केली " ( राजवाडे ६।४५२ ).

**बे-फाम** [ फा० बी-फह्म् ] बे-शुद्ध; निश्चिन्त; गाफल; असावध; अनावर; मस्त. " तुम्ही बे-फाम असणें म्हणून क्रिया देऊन एक होऊन काम काढणें " ( खरे ५।२०४७ ). " शत्रू माघारा गेला म्हणून बेफाम नाही, सावधच आहों " ( खरे ७।३३१० ). " लोक बे-फाम पाहून शहर मारिलें " ( चित्रगुप्त ८८ ).

**बे-फामी** (स्त्री०) [फा० बी-फह्मी] गैर-सावधपणा; गाफली; निश्चिन्ती; खातर्जमा. " या विश्वासावर बेफामी जाली याजमुळें दगाबाजीनें निघोन गेला " ( दिमरा १।२५२ ). " तुम्ही जलद ज्याप्रमाणें आपल्या धन्यास जें जें लिहिणें असेल तें बेफामीनें लिहिणें " ( खरे ५।२०४५ ).

**बे-फायदा** गैरफायदेशीर. " माझेंही राहणें बेफायदा आहे " ( पेअ ७८ ).

**बे-फिकिरी** ( स्त्री० ) निष्काळजीपणा; गाफली.

**बे-फिकीर** [ फा० बी- फिक्र् ] अविचारी; निष्काळजी; निश्चिन्त; सन्तुष्ट; बे-पर्वा; निःशङ्कपणें; ( स्त्री० ) निष्काळजीपणा. " तुम्हां करितां आम्ही बे-फिकीर आहो" (राजवाडे ६।२७९). "तुम्ही तिकडील ठाणीं बे-फिकीर घेणें" ( खरे ४।१४७४ ). " इकडील बे-फिकीर झाली " ( खरे १६०७ ).

**बे-बदल** बदललेला; बण्डखोर. " खान मज्कुराचे नेत्र आरक्त, बे-बदल पाहून खान मज्कुरास दबून " ( दिमरा १।१९६ ). " गुलाम कादरखान पादशाहासी बे-बदल होऊन " ( दिमरा १।२०० ).

**बे-बन्द** [ फा० बे-बन्द् ] मुक्त; ( पु० ) शिस्तीचा अभाव. " भयभीत नवा आनन्द। पदर बे-बन्द। कम्प कटिबन्धा ॥ जिव झाला अर्धा अर्धा ॥ ( गडकरी-राजसंन्यास ३१ ). " हुज़रातीमध्यें बे-बन्द सर्वथा होऊं देऊं नये" (मराआ १४ ).

**बे-बन्दशाही; बे-बन्दशाई** ( स्त्री० ) अनायकी, अव्यवस्था, गोन्धळ.

**बे-बन्दी** ( स्त्री० ) बेबन्दशाई; ज़ुलूम. " साङ्गुं किती दुनियेवर बेबन्दी ! हा मस्लत सन्दी " ( रामजोशी १०६ ).

**बे-बर्कत** ( स्त्री० ) अवनती; हलाखी. "दिसन्दीस बे-बर्कत जाली, सुखोत्पत्ति नाही रयतेला " ( प्रभाकर ८० )

**बे-बाक** [ फा० बी-बाक् ] निर्भीड बे-डर.

**बे-बाकी** ( स्त्री० ) अशेष फडशा. " अखेर पौष मास पावेतों बे-बाकी करून द्यावी सा करार ठराऊन " ( दिमरा १।१४ ).

**बे-बारत** ( स्त्री० ) (?) बे-इतबार; अविश्वास ( राजवाडे १०।२५१ ).

**बे-बुनियाद** [ फा० बुनियाद्=पाया ] नाश; अन्याय ( राजवाडे १५।२६ ). " आतांही मदारुल महाम यानीं कायमी राखिली तरी आम्ही, मदारुल-महाम व फरांसीस तिघे मिळून इङ्ग्रेजांची बे-बुनियाद करूं " ( राजवाडे १०।१९९ ).

**बे-बुदी; बे-बूद** ( स्त्री० ) नाश; खराबी. " मनस्वी उपसर्ग गांवास लागोन गांवची बेबुदी जाहली " ( खरे ९६६ ).

**बे-मजगी** ( स्त्री० ) [ फा० बी-मज़गी ) अरुची; वितुष्ट, बे-बनाव. " पादशाहांची व गुलामकादर यांची बे-

मजगी होऊन " ( दिमरा ११९९ ).

**बे-मन्सबा** ( पु० ) अविचार. " नाहीतर बे-मन्सबा करून दुनियांत नाराज़ राहे तें करणें कांहीं काम नाहीं " ( राजवाडे ६।५७१ ).

**बे-मर्जी** ( स्त्री० ) इतराजी; मर्जी विरुद्ध वर्तन. " कैलासवासी भवानराव याजवर बे-मर्जी झाली होती " ( राजवाडे ११३१२ ). " पर्वानगी आलिया शिवाय जात नाही ऐसें म्हणावें तर बे-मर्जी होते " ( राजवाडे ५।२०६ ). " कोणी हुजुराशी बेहुकुमी व बे-मर्जी करील त्यास ईश्वर मध्यें साक्ष आहे " ( राजवाडे ६।३०१ ).

**बे-मरामत** ( स्त्री० ) नादुरुस्ती. " आरमारची बे-मरामत जाली येणें करून सर्कार नुक्सानी फार होते " ( वाडसमा २।१९५ ).

**बे-मलामत** [ अ० मलामत्=दूषण ] कीर्तिमान्. " ईश्वर आपल्यास सलामत, बे-मलामत, राखो ( दिमरा १।८२ ).

**बे-मस्लत** ( स्त्री० ) अविचार; विचार केल्या शिवाय. " स्त्री-नायक, बाल-नायक आणि बे-मस्लत, तीन गोष्टी येके ठिकाणीं; चौथा अहङ्कार; तेव्हां ईश्वर त्या सर्दारीची अब्रू ठेवील तर ठेवो " ( राजवाडे ७ खलप २।७० ). " मार्ते लिहिणें हें एकपक्षी बे-मस्लहत करावें असें नाहीं" (राजवाडे ५।१५४).

**बेमान**; **बेइमान** अविश्वसनीय.

**बेमान-गिरी** ( स्त्री० ) बेइमानी; हरामखोरी ( इम ४२ ).

**बेमानगी** ( स्त्री० ) बेइमानी ( राजवाडे १५।२७१ ).

**बे-मामूल** वहिवाट सोडून. " हा ऐवज़ बे-मामूल घ्यावयाची सबब काय ! " ( राजवाडे २२।३३ ).

**बेमार**; **बिमार** आज़ारी.

**बेमारी**; **बिमारी** (स्त्री०) आज़ार; आज़ार-पण.

**बे-मालूम** कळून उघडकीस न येण्या जोगें.

**बे-मुन्सफी** ( स्त्री० ) अन्याय. " हिन्दू मुसल्मान, ईश्वराचे घरचे दोन्ही धर्म चालत असतां मुसल्मानानें हिन्दूचे जाग्यास उपद्रव करावा हे बे-मुन्सफी " ( भाऐ-पयाव १० ).

**बे-मब्लग**; **बे-मुब्लक**; **बे-मोब्लक** [ ∠ अ० मब्लग़् ] असङ्ख्य; अपरिमित. " येणेंकरून तोटे बे-मब्लग आले " ( ऐटि १।८० ). "लश्कर बेमुब्लक " ( चित्रगुप्त ४१ ). " व्याजाचा हिशेब करितां बे-मोब्लग पैका होतो " ( खरे ९३१ ).

**बे-मुर्वत** [ फा० बी-मुरुवत् ∠ मुरुव्वत् =माणूसकी ] कठोर; निर्दय; निर्भीड; निर्भय; बे-मुलाज़ा. "पुत्रांसी बे-मुर्वत होऊन दौलतीस ज्या गोष्टी राखण्याच्या त्या करवत नाहींत " ( होहिव २७). "जेथें जेथें त्याचे लोक असतील त्यांचा काडा काढून बे-मुर्वत पारिपत्य करणें " ( खरे ६।२६७९). " कौल सादर असे; सुखें किर्दीमामूर बे-मुर्वत होऊन करणें" ( राजवाडे २०।३ ).

**बे-मुलाज़ा**; **बे-मुलाहिज़ा** कांहीं न पाहतां; दयामाया न करितां; भीड न धरितां; निष्ठुरपणें. " लश्कर लाम्चलें म्हणजे बे-मुलाज़ा रुपये घेतों " ( खरे ९५४ ). "त्यांचें पारिपत्य बे-मुला-

हिज़ा करणें; मारून टाकणें; काकळूत सर्वथा न करणें " ( खरे ६।२३८० ).

**बे-मोताद** [ अ० मुअत्तद्द सङ्ख्या परिमित ] बे-सुमार; अपरिमित. "सर्वत्ती दोहोंकडील बे-मोताद जाहली" ( खरे ९।४९२२ ).

**बे-मोहर** ( स्त्री० ) गैर-मोहरबन्दी. "कित्येक दफ्तरें सर्वमोहर; व कितेक बे-मोहरेचीं" ( राजवाडे ७ खलप २।९ ).

**बे-मोहीन; बे-मोईन; बे-मोइनी** [ फा० बी-मुअय्यन् ] ठराव-बाह्य; अनियामेत; अपरिमित. " तुमच्या हकाची मोईन असतां बे-मोइनी हक घ्यावयास गरज काय ! " ( राजवाडे १७।४८ ) " अलीकडे पेण्ढा बे-मोईन घेतात" ( वाड-समा २।२३२). " बिछाईत, खजिना व कापड बे-मोहीन सापडलें " ( सभासद २४ ). " तैसाच बरोबरी खजिना बे-मोहीन" ( सभासद २६ ).

**बे-रङ्ग** ( पु० ) विरस; खराबी.

**बे-राजी** असन्तुष्ट. " सुज्यातदौला याचे ज़मातदार व भाऊबन्द बे-राजी आहेत " ( राजवाडे १।३३२ ). "लोक बेराजी " ( जोरा ४१ ).

**बेरीज़** ( स्त्री० ) [ फा० बरीज़् ] मिळवणूक; ज़मा.

**बे-रुख्सत** पर्वानगीवांचून. " आद्लशा बे-रुख्सत येथून निघोन आपणाकडे आला आहे " ( दिमरा २।५७ ).

**बे-रूख** विन्मुख; अप्रसन्न; उदासीन. "पुढेंही मर्जी बे-रूख पाहिली" ( राजवाडे ५।९६ ). " यां सर्वांसी बे-रूख होत्साते " ( राजवाडे ६।३१२ ).

**बे-रोज़गार; बे-रोज़गारी** [ फा० बी-रोज़्गार् ] बे-कार; निरुद्योगी. "माधवराव आपले घरीं बे-रोज़गार बसून आहेत " ( दिमरा ११९७८ ). " दहा हज़ार फौज बे-रोज़गारी झाली " ( खरे ५।२४३५ ).

**बेल्दार** ( पु० ) [ फा० बेल्दार् ] खणत्या.

**बे-लगाम; बे-लगामी** [ फा० बी-लिगाम् ] अनियन्त्रित; स्वैर; मोकाट. " म्हणजे माणूस खबर्दार असतें; बे-लगाम होत नाहीं; साङ्गितली चाकरी दुरुस्त होते " ( मराआ १६ ).

**बे-वक्र; बे-वकर** [ फा० बी-वकार् ] फजीत; मानखण्डना. " नसर कुलीखानास बे-वकर केलें " ( राजवाडे १।३१ ). " तुम्हाकडे पुष्कळ फौज जमा होईल असें असोन मन्सब्यावरी घातल्यानें फितवा होऊन बे-वक्र होऊं सके " ( खरे १।१२८ ).

**बे-वकरी** ( स्त्री० ) [ फा० बी-वकरी ] मानखण्डना; अप्रतिष्ठा. " आतां त्यांचे देण्यामुळें फार बे-वकिरी झाली " ( राजवाडे ५।२० ).

**बे-वजे** विलक्षण; बेतऱ्हा. " चहूंकडोन इङ्ग्रेजांस तान बेवजे बसेल " ( राजवाडे १२।२२ ).

**बे-वतन** [ फा० बी-वतन् ] हद्दपार; जलावतन.

**बे-वस्वास; बे-वस्वसा** [ फा० बी-वस्वसा ] निश्चिन्त; निर्भयपणें. " बे-वस्वसा महाराज फौजेसह येऊन शहर मारील कीं काय ! " ( चित्रगुप्त ३४ ). " तुम्ही लेहून नसीरजङ्गाशी रावसाहेब बे-वस्वास राहात ते गोष्ट करावी " ( राजवाडे १।४६ ). " त्याच्या वचना-

वर आपण बे-वस्वास होतों" (राजवाडे ६।६५).

**बे-वाजवी** वाजवी रीतीनें. "बे-वाजवी कृष्णभट मज़्कुरास हुजूर आणोन तागीद करून" (गोइसा १३).

**बे-वारीस; बे-वारशी** निवारशी. "बे-वारीस वतन असलें तर तहकीक करून देणें" (वाड-सनदा १९६).

**बे-शक** [फा० बी-शक्क्] निर्धास्त; निःशङ्क; निःशङ्कपणें. "तुम्ही बेशक होऊन आमचे भेटीस येणें" (राजवाडे १७।३४).

**बे-शर्त** विनशर्त; अट न ठेवितां. (स्त्री०) बिनशर्तपणा. "बे-शर्त काम इमानें-इतबारें केल्यावर रुपावन्त होऊन तुम्हांस सर्फराज़ केलें जाईल" (वाड-समा ११।३४).

**बे-शरम; बेश्रम** [फा० बे-शर्म] निर्लज्ज; पाजी.

**बे-शरमी; बेश्रमी** (स्त्री०) [फा० बेशर्मी] निर्लज्जपणा; पाजीपणा.

**बे-शिरस्ता** (पु०) गैर-वहिवाट. "सध्यां शिरस्त्याशिवाय बेशिरस्ता चित्तांत आल्यावरून कौल दिल्हा नसे" (राजवाडे ३।२४९).

**बे-शिस्त** (स्त्री०) अव्यवस्था.

**बे-शुभह** निःसंशय. "बे-शुभह शिकस्त खाऊन फरारी होतील" (साने-पयाव ४८३).

**बे-शौर** [अ० शुऊर् = अक़ल] बे-अकली. "अम्मा तो खपती (= हलकट), दिवाणा व बे-शौर जाहला असे" (पारसनीस-ब्रप २३८).

**बेस्मी; बेशमी** [फा० बिस्मि] नांवें. "बेस्मी अ पावती लिहून दिली जाते कीं...".

**बेस; बेश्** [फा० बेश्] चाङ्गलें; उत्तम.

**बे-सतर** [अ० सित्र्=पडदा] अप्रतिष्ठित; मानखण्डित. "खाशा बेगमांस बे-सतर केलें" (मद्बा २।१४९).

**बे-सनद; बे-सनदी** बे-कायदेशीर. "श्रीमन्त दादासाहेब येऊन त्या उभयतांसी सलूक करणार नाहींत व बे-सनद पैसाही मागणार नाहींत" (राजवाडे ६।३८२).

**बे-सरन्जाम** सामुग्री-शिबन्दी-विहीन. "किल्ले बे-सरन्जाम झाले" (मराचिरा २८).

**बेसुमार** [फा० बी-शुमार्] अपरिमित.

**बे-सुमारी** (स्त्री०) [फा० बी-शुमारी] अपरिमितता.

**बे-हङ्गाम** (पु०) अवेळ; भलता काळ.

**बे-हद्द** [फा० बी-हद्द] निःसीम; (स्त्री०) पराकाष्ठा.

**बेहबूद; बेहबुदी** (स्त्री०) [फा० बिहबूद्] सुस्थिती; भरभराट; मज़्बुती. "दौलतीची बेहबूद कशांत हें पुरतें समजून आम्हांशीं बोलावें" (राजवाडे ५।७५). "बेहबुदी" (राजवाडे १०।२५१). "ठाण्याची बेबूध करणें" (चन्द्रचूड-दप्तर १।५५). "त्याणीं धारावीची बेहबुदी करून ठाण्यास आले; येथीलही मज़्बुती करणें ते करितात" (राजवाडे ६।२२९).

**बेहरम** [फा० बर्हम्] साशङ्क; रुष्ट. "तेथील सारी मण्डळी बोलतां बोलतां चित्त बेहरम होऊन गेलें असेल" (साने-पयाव २५६).

**बेहतन्माल** ( पु० ) [फा० बी-तन्-माल्] बेवारशी सम्पत्ती; सर्कारजमा इष्टेट.

**बेहतर; बेहेत्तर** [ फा० बिहतर् ] अधिक चाङ्गलें; श्रेयस्कर. " तुम्ही त्यांचे कराराप्रमाणें रावप्रधान यांसी मुलूख राखाल तर बेहतर बात आहे " (राजवाडे १।५२ ). " बे-अब्रूला बेहेत्तर करील (=पत्करील), पण यावेळीं तुला असा पाहिला तर साबाजी आपली अल्लाद नाकबूल करील " ( गडकरी-राजसंन्यास ६ ).

**बेहतरी; बेहेत्तरी** (स्त्री०) बरेंपण. "त्यांनीं साङ्गितल्याप्रमाणें वर्तणुकेंत आलिया कामाची बेहतरी असे " ( भा-ऐपयाव ४५ ).

**बे-हाल** [ फा० बी-हाल् ] दुर्दशाग्रस्त; दुक्खार्त. " चिमट्यानें मांस तोडून बेहाल करून मारिला " ( जोरा ८५ ).

**बे-हिक्मत** ( स्त्री० ) मूर्खपणा. " गुरुमकोण्डेचे बाबुराव भास्कर यांणीं बे-हिक्मतीनें जाबसालाचा डौल घडविला " ( खरे ५।२१९८ ).

**बे-हिम्मत** ( स्त्री० ) भ्याडपणा. " अशा बेहिमतीनें रायगडच्या रियासतीची अब्रू तुम्ही कशी साम्भाळणार ! " ( गडकरी-राजसंन्यास ४ ).

**बे-हिम्मत; बे-हिमती** हतधैर्य; भ्याड. " किल्ल्यावर लोक होते त्यांचीं अवसानें जाऊन राजकारण लाऊन किल्ला दिला " ( खरे १।३१ ). " फिरङ्गी धर्मभ्रष्टे बेहिमत होऊन" ( इम २९४ ). " बे-हिम्मत होऊन फुलचरीचे आश्रयास गेला " ( दिमरा १।५१ ).

**बे-हिशेब** ( पु० ) अनौचित्य. " परशुरामपन्त यांस छत्रपती याणीं माराविलें सबब विश्वासराव यास मारिलें ही गोष्ट बे-हिशेबाची " ( खरे ११।६१३२ ). बे-हिसाब=अगणित; अयोग्य ( मराचिथोरा ६१ ).

**बे-हुकुमी** ( स्त्री० ) अवज्ञा; बण्डखोरी. " कोणी हुजुराशी बे-हुकुमी व बेमर्जी करील त्यास ईश्वर मध्यें साक्ष आहे " ( राजवाडे ६।३०१ ). " विदेशांत बे-हुकूमी होऊं लागली असतां परिणाम काय ! " ( होके ३ ).

**बे-हुर्मत; बेहुर्मती** ( स्त्री० ) [ फा० बी-हुर्मत् ] अप्रतिष्ठा; मानखण्डन. " सेवकाची बे-हुर्मत करितात " ( दिमरा १।८३ ). " बहिरोपन्त महेन्द्रळे सांपडले त्यांची बेहुर्मत केली " ( राजवाडे ७।६ ). " त्याणीं आमची बे-हुर्मती; अब्रू व वस्त्र हरण केलें " ( ऐस्फुले ४९ ). " बहादुरमिङ्गास पन्नास गाडदी पाठवून बे-हुर्मत करून नेलें " ( राजवाडे १।१७९ ).

**बे-हुशार** गाफील; गैर-सावध. " पठाणांची फौज व श्रीमन्त बेहुशार होते " ( खरे ११।५६५९ ).

**बे-हुशारी** ( स्त्री० ) गाफील-गिरी. " प्रातःकाळीं तोण्ड धूत डेऱ्यापुढें बसले म्हणोन बेहुशारीमुळें ऐशी गोष्ट गुदरली " ( खरे १०।५२५९ ).

**बे-होश** [ फा० बी-होश् ] बेशुद्ध; धुन्द; तर्र.

**बे-होशी** ( स्त्री० ) [ फा० बी-होशी ] बेशुद्धी. " वैद्यानीं अर्क प्याला भरून दिला तो बेहोशीमुळें हातांतून खालें पडला " ( राजवाडे ७।१०७ ).

**बेहेस्त** ( पु० ) [ फा० बिहिश्त् ] स्वर्ग.

**बेहेस्त-मकान** स्वर्गस्थ. " खाने वाला-

शान बेहस्त-मकान साहेब याणीं इनाम देऊन चालवीत होते " ( पारसनीस-ब्रच १०७ ).

**बैत** ( स्त्री० ) [ अ० बैत् ] सयमक द्विदल. " या ग्रन्थाच्या बैता तीस हज़ार आहेत " ( ऐस्फुले २।७५ ).

**बैतन** [ फा० बीतन् ] बे-वारशी. "जयपुरासारखें राज्य बैतन हातीं लागलें असतां " ( होके १३ ).

**बैतल्माल** ( पु० ) [ अ० बैतुल्माल् ] सर्कारी खजिना; सर्कारजप्त होणारा बेवारशी माल. " बैतल्माल दीक्षितांसी सोडविला आहे " ( राजवाडे ३।४७३).

**बैरक** ( स्त्री० ) [ अ० बैरक् ] निशाण; झेण्डा; सैन्य.

**बोक्चा** ( पु० ) [ तु० बुक्चा ] बोचकें; गांठोडें. " बापूनें खुर्द खताचा बोक्चा आपल्या घरास नेला " ( राजवाडे २०।१३८ ).

**बोगदा** ( पु० ) [ फा० बुघाझ्-तु० बोघाझ् = चिन्चोळी समुद्रपट्टी ] डोङ्गराच्या पोटांतून आरपार नेलेला रस्ता.

**बोचकें** ( न० ) [ तु० बुक्चा ] गांठोडें; बोक्चा पहा.

**बोय** ( स्त्री० ) [ फा० बोय् ] वास; गन्ध. " इङ्ग्रजांचे मगज़ांतील बोय येती कीं तुम्ही कुमकेस न आला तरी काय गेलें " ( खरे ८।४३५२ ).

**बोर** [ फा० बोर् ] काळसर ताम्बूस रङ्गाचा ( घोडा ).

**बोरीया** ( पु० ) [ फा० बूरिया ] चटई; लोंकरी राठ बैठक.

## भ

**भक्कम** [ ? अ० मुह्कम् ] दृढ; मज़्बूत.

**भर्ज़री** [ ८फा० झरीन् ] पूर्ण ज़र्तारी; ज़र्तारी.

**भर-ज्वानी** ( स्त्री० ) ऐन तारुण्य.

**भार्कस** ( न० ) [ फा० बार्कश् ] पाठीवर सामान बान्धतांना जनावराच्या पोटाखालून घेतलेला तङ्ग; मालवाहतुकीचें जहाज़.

**भार-बर्दारी** ( स्त्री० ) [ फा० बार्-बर्दारी ] वाहतूक; वाहतुकीचीं साधनें. " तेथून बेद्रास आणावयाची तज़्वीज़ वन्जरेनें अथवा भारबर्दारी पाठवून; खुश्कीतून जशी सोय तशी करितां येईल. " ( राजवाडे ७ खलप २।७७ ).

**भिस्त** [ फा० बिस्त् ] वीस. " पेशजी भिस्त रोजीं " ( इम ६६ ).

**भिस्ती** [ फा० बिहिश्ती ] पखालीनें पाणी भरणारा; सक्का.

**म्यान** ( न० ) [ फा० मियान् ] कोष; मेण.

**म्याना** ( पु० ) [ फा० मियाना ] मेणा; पेटीवजा पालखी.

**म्हासरा** ( पु० ) [ अ० मुहासरा ] वेढा; महासरा. " अहमदखा पठाण बङ्गस प्रयागास म्हासरा करून होता " ( साने-पयाव १३९ ).

**मक्ता; मख्ता** ( पु० ) [ अ० मक्तअ ] खण्ड; उत्पन्नाचा ठराविक अंश; विशिष्ट अटींवर काम करण्याचा हक्क व ज़बाब्दारी; इजारा.

**मक्तेकरी; मक्तेदार** ( पु० ) मक्ता घेणारा.

**मक्तेदारी** ( स्त्री० ) इज़ारा; इज़ाऱ्याची पद्धत.

**मक्तूब** [ अ० मख्तूब् ] सम्बोधित; मज़्कूर. "सर्कार मक्तुबाचे कार्पर्दाजाच्या दर्खास्ती प्रमाणें अमलांत येईल" ( पेअ ५७ ).

**मक्रबी** [ अ० मघ्रबी ] पाश्चात्य; उत्तर आफ्रिकेतील.

**मक्मूर** [ अ० मख्मूर् ] निशेंत तर्र. "आजी तोफांचे आवाज़ दहावीस केले; लोक बोलत होते कीं लेक जालियाचे खुसीचे किंवा मलमूर ( ? ) होय म्हणून याचा संशय कांहीं नाहीं " ( राजवाडे ११।१८१ ).

**मक्सूद** ( पु० ) [ अ० मक्सूद् ] हेतू; मत्लब. "तुझा काय मक्सूद ( ? ) तो साङ्गणें " ( राजवाडे १५।३७ ).

**मकर** ( पु० ) [ अ० मक्र् ] कुटिलपणा; फसवणूक; फन्द ( राजवाडे १०।१६७ ). "त्यांच्या हरामज़ाद्या व मकर सर्व नवाब बहादूर यांचे ध्यानांत" ( राजवाडे १९।५९ ). "इङ्ग्रज़ नज़्दीक, त्यांची चाल बहुरङ्गी, तऱ्हे-तऱ्हेचे मकर व फरेब दाखवून तर्फैन दिलांत खलश यावयाविशीं खियाल नमूद करितील" ( साने-पयाव ४६५ ).

**मकर-फरेब** ( पु० ) कुटिलपणा. "मकर-फरेब करून आपला तसरूफ केला" ( दिमरा १।५४ ).

**मकरी** कुटिल; फन्दी. "कुम्शेलवाले आले ते काबूची; बहुतां प्रकारें बजिदी करितील, लालूच दाखवितील, जात मकरी ! " ( राजवाडे १९।६० ).

**मकान; मकाण;** ( न० ) [ अ० मकान् ] वस्तीची ज़ागा; घर; स्थान. "चुनांचे आं मेहेर्बांहीं इङ्ग्रजांचीं मकाणें घेतलीं ... हें ऐकून न्यहायत खुशी जाली" ( साने-पयाव ४६४ ).

**मकातीब** [ अ० मकातीब् अनेक व० मक्तूब् चें ] पत्रें. "हमेशा मकातीब पाठवून दोस्ती-येकजहती दीन-ब-दीन ज्यादा होय" ( राजवाडे १०।३१२ ).

**मख्तसर** "हक्कदार किंवा कामदार नव्हत असें कांहीं गांवात जुने वतन्दार 'मख्तसर' या हुद्यानें मोडत असत" ( काशिनाथ बा० साने ). "विल्हेस राजश्री शिवाजीपन्त कार्कून मख्तसर आहेत" ( राजवाडे ८।१६४ ). "तुम्हांस मख्तसर करून कार्भार देतों." "येतांच बारा मावळें काबीज़ करून देशमुखीबद्धल जेथें मख्तसर होते त्यांस दस्त करून जिवें मारिलें" ( चित्रगुप्त ३ ).

**मख्दूम** [ अ० मख्दूम् ] सेव्य; धनी. "निम्बाजी मख्दूम कुकटोळीकर" ( खरे ७।३७२३ ). "सत्यापा मग्दूम मलगरेकर याची स्त्री" ( खरे ७।३७२१ ).

**मख्फी** [ अ० मख्फी ] गुप्त; कुफिया. "आपला दार-मदार मख्फी करून घेऊन" ( साने-पयाव ४८३ ).

**मख्मल** ( स्त्री० ) [ फा० मख्मल् ] एका बाजूस अगदीं नरम अशी दाट लव आहे असें उश्री वस्त्र.

**मख्मली** मख्मलीचा; मख्मली सारखा. "मेण मख्मली" ( वाड-समा १।२४६ ). "सोनेरि पलङ्गावर गाद्या

मख्मली पसरल्या चादरा त्यावरल्या मख्मली " ( प्रभाकर २२९ ).

**मख्मूल** [ अ० मख्मूर् ] तर्र; टवटवीत; तजेल. " मख्मूल फूल गुलगुलित ऐन रङ्गांत " ( प्रभाकर २३८ ). " मी नार पिवळी मख्मूल " ( प्रभाकर ९३ ).

**मख्लशी** ( स्त्री० ) [ अ० मुख़्लस्=शुद्ध; बिनचूक ] निर्णय; बरोबर आहे असा शेरा. " याची मख्लशी करून खग होईल त्याचे स्वाधीन करावी " ( वाड-बाबा २।७१ ).

**मख्लाशी** ( स्त्री० ) साफसुफी; सारवा-सारव; मल्लिनाथी.

**मग्जी; मगजी** ( स्त्री० ) [ फा० मघ्ज़ी ] किनार; कांठ; फीत; झालर.

**मग्दूर** ( पु० ) [ अ०मक्दूर ] सामर्थ्य; ताकद; ज़ोर. " मक्दूर " ( दिमरा ११९६ ).

**मग्रब** ( पु० ) **मग्रबाई** ( स्त्री० ) [ अ० मघ्रब् = पश्चिम; मावळत ] सूर्यास्त. " मग्रबाचे समई नवाब येकामुद्दौलाचे घरास गेले " ( राजवाडे ७।१४६ ). " मग्रबाईचे समई चबुत्र्यावर चान्द-णीचा फरश करवून नवाब बरामद जाले " ( राजवाडे ७।२०२ ).

**मग्रुरी** ( स्त्री० ) [ फा० मघ्रूरी ] गर्व; चढेलपणा. " शेवटीं दादासाहेबांस द्यावें, साक्षी द्यावी हें कांहीं त्यांच्या मनांत नाहीं व गोष्टीही मग्रुरीच्या; बाहेर गोड बोलावें, आंतून लढाईचें सामान करावें, तेव्हां पारपत्य करणें ज़रूर " ( भा-ऐपयाव १० ).

**मगज़** ( पु० ) [ फा० मघ्ज़् ] गीर; सार; मेन्दू; प्रतिष्ठा; बोज़. " इङ्ग्रजाचे मग-ज़ांतील बोय येती कीं तुम्ही कुमकेस न आला तरी काय गेलें? ( खरे ८।४३५२ ). " आपला मगज़ राखणें । कांहीं तरी " ( दासबोध ११।१०।२३).

**मगर** [ फा० मगर् ] परन्तु. " करार होणें राहिला; मगर बोलण्यांत शफतपूर्वक आलें आहे " ( राजवाडे ५।६ )

**मगर–मस्त** [ ? फा० गर्म; मस्त् ] अति-शय मस्त; तुन्द.

**मज़्कूर** ( पु० ) [ अ० मज़्कूर् ] निवेदित; लिखित; बोलणें; माहिती; गोष्ट; हकीकत; उपाय; विचार; हिशेब. "नबाब शास्ता-खान याची रवानगी करावी असा मज़्कूर करून " ( सभासद २६ ). " इराणीचा मज़्कूर किती मारून धुडकावून देऊं! " ( [illegible] ३२ ). " श्रीमन्त व नबाब एक–दील; तेव्हां हैदरखानाचा मज़्कूर किती आहे?" ( खरे ६।२८९८ ).

**मज़्बुती; मज़्बुदी** ( स्त्री० ) [ फा० मज़्बूती ] बळकटी, बन्दोबस्त. " ज़ागां ज़ागां गडकोट यांसि ताकीद करून मज़्बुदी करविली " ( सभासद ३२ ). " त्यांस आपलीं पत्रें, मज़्बुदीनें राहून टिपूकडील मुलूख घेऊन पारिपत्य करीत येविशीं जातच असतील " ( खरे ८।४११९ ). " मोदी यास हस्तगत करून इकडे मज़्बुतीनें पाठवून द्यावा " ( दिमरा ११३०० ).

**मज़्बूत** [ अ० मज़्बूत् ] कायम; दृढ; बळकट.

**मज़्बूत–मिज़ाज़** स्थितप्रतिज्ञ. " आं साहेब दूरन्देश व मज़्बूत–मिज़ाज़ " ( साने–पयाव ४६५ ).

**मज़्बूर** [ अ० मज़्बूर् ] लाचार.

**मज़्मू; मुज़मू** ( स्त्री० ) [ अ० मज़्मूअ = वसूल ] वसुली; वसुलीचें काम.

**मज़्मूदार; मुज़म्‌-दार** ( पु० ) [ फा० मज्मूअदार् ] वसुलाचा हिशेब तपासनीस; वसुली कार्कून.

**मज़्मूदारी; मुज़ूम्दारी** ( स्त्री० ) मज़्मू.

**मज़्मून** ( पु० ) [ अ० मज़्मून्; ] मज़्कूर; सारांश. " तेरावे व दहावे दफेतील जो मज़्मून त्याचा मत्लब या फर्दैत आला " ( राजवाडे ७।३ ).

**मज़्लस** ( स्त्री० ) [ अ० मज्लिस् ] सभा; बैठक; ज़ल्सा; गाण्याबजावण्याची बैठक; मैफल. " महोत्सहामध्यें आपण बसतेजागीं नृत्य गायनादि न करवितां बाहेरल्या बाहेर मज़्लसींत करवावें " ( मराअ: ११ ).

**मज़्हला; मझेला** ( पु० ) [ अ० मज़्हला ] सङ्कट, पेच; हङ्गामा; बखेडा. " मज़्हला तमाशाचाच दिसतो " ( राजवाडे ६।५९३ ). " मज़्हलियांत मज़्हला मोठाच पाडला " ( राजवाडे ६।३३१ ).

**मज़ल** ( स्त्री० ) [ अ० मन्ज़िल् ] उतरण्याची व विसाव्याची ज़ागा; टप्पा; न थाम्बतां आक्रमिलेलें अन्तर. " त्यावरून राजे मज़लीस जात तेथें फौज़दार भेटून दाणापाणी जो खर्च लागेल तो द्यावा " ( सभासद ३७ ). " मज़लीस येतांच गञ्जीफा खेळत बसले " ( खरे ११।५९८० ).

**मज़ल-दर मज़ल** = कूच-दर-कूच; सारख्या मज़ला मारीत.

**मज़ा; मजा** ( पु० स्त्री० ) [ फा० मझा ] स्वाद; गोडी; खुमारी; मौज.

**मजाल** ( स्त्री० ) [ अ० मजाल् ] सामर्थ्य; ताकद; बिशाद.

**मज़ालस; मज़ालीस** ( स्त्री० ) [ अ० मजालिस् अनेक व० मज्लिस्‌चें ] दर्बार; सभा; बैठक. " गोमेदाचिया मज़ालसा " ( मुक्तेश्वर-सभापर्व २।३१ ). " वरतीं फिरङ्गियांची मज़ालीस केली होती " ( राजवाडे १।४२ ). " दाद-फिर्याद मज़ालसींत ऐकून घेऊन " ( मराचिथोशा ३३ ).

**मजीद** [ अ० मजीद् ] उच्च. " सनगें मजीद " ( वाड-समा १।१४८ ).

**मजुरी** ( स्त्री० ) [ फा० मझ्दूरी ] मोलानें केलेली अङ्ग-मेहनत; मुशारा; मजूर-पण.

**मज़ूर** ( पु० ) [ फा० मझ्दूर् ] मोलानें हलक्या दर्जाची अङ्गमेहनत करणारा; कुली; मोलारी.

**मज़ूर्दार** ( पु० ) मज़ूर; भाडोत्री. " तों पर्यन्त केवळ मज़ूर्दाराप्रमाणें करूं नये " ( खरे ८६३ ). " कामाठी, बेल्दार, मज़ूर्दार लाऊन ज़ाग्याची मरमत करविली " ( राजवाडे ७।९८ ).

**मज़ेदार** [ फा० मझा-दार् ] रुचकर; लज़्ज़त्दार; मौज़ेचा.

**मझेला** ( पु० ) [ अ० मज़्हला ] घोळ; पेच; सङ्कट; हङ्गामा. " पागेकडील कार्भाराचा येक महिना कम-कसर मोठा मझेला पडला होतां; साम्प्रत अशा तऱ्हेनें बन्दोबस्त जाला " ( राजवाडे ५।६९ ) ' किस्तीचा मुकदमा तर अलीजाह यांचा मझेला. यापासोन फरागत होऊन त्याचाही फैसला करण्यांत येईल " ( राजवाडे ५।१८० ).

**मत्ता** ( स्त्री० ) [ अ० मताअ ] मिळकत; सम्पत्ती; मजाल.

**मल्लई** [ ∠अ० मत्लअ = उगवत ] पूर्वेकडून वाहणारा ( वारा )

**मल्लब** ( पु० ) [ अ० मत्लब् ] हेतू; इच्छा; आशय; सारांश; तात्पर्य. " बहुतेक कामें आपले मत्लब-मवाफीक ( = इच्छेनुरूप ) जहालीं " ( साने-पयाव ३५३ ). " मुन्शी बोलावून पत्र लिहावयाचा मत्लब साङ्गितला " ( राजवाडे ५। १७९ ).

**मल्लबी** स्वार्थी; स्वार्थसाधू.

**मल्लूब** [ अ० मत्लूब् ] ज़रूर; हवा. " सामान जङ्गी सर्कारांत मत्लूब जाल्यास...बेपारी यांजपासोन बिला महसूल खरेदी करण्याची पर्वानगी असावी " ( राजवाडे ७।९४ ).

**मतालब; मतालीब** ( पु० ) [ अ० मतालीब् ] अनेक वचन मत्लबचें. " कलमी केला मतालीब मुफशील जाहिरीस पोहोंचला " ( साने-पयाव ३८४ ). " जे मतालब स्वामींचे असतील ते सर्व होऊन येतील ( राजवाडे ८।२०३ ). " ऐवज़ देऊन सर्व मतालीबचा बन्दोबस्त करून घ्यावा " ( दिमरा २।११ ). " तुमचे मतालीब सर्व अमलांत येतील " ( दिमरा २।६३ ).

**मदत** ( स्त्री० ) [ अ० मदद् ] साहाय्य.

**मदत-इम्दाद** ( स्त्री० ) [ अ० इम्दाद् = मदत ] साहाय्य. " ज़ूद-तर खर्चाची मदत-इम्दाद पोक्ता ऐवज़ देऊन रवाना करून पाठवावें " ( साने-पयाव ३८७ ).

**मदत-खर्च** ( पु० ) खर्ची; मदत करण्याबद्दल दिलेला पैका. " आणि मुलाज़मत जालिया मदत-खर्चही उम्दा देतील " ( राजवाडे ८।२१२ ).

**मदत-गार** ( पु० ) [ फा० मदद्गार् ] सहायक; दुय्यम.

**मदत-गारी** ( स्त्री० ) [ फा० मदद्गारी ] मदत. " नाईक यांस गुप्तरूपें तुम्ही मदत्गारी करून " ( राजवाडे २२। ६३ ). " ते चाकरीस येतात त्यांचा बन्दोबस्त राखून त्यांस खर्चाची मदत्गारी करणें " ( मद्बा ११८९ ).

**मदतनीस** ( पु० ) मदत्गार.

**मदत-माश** ( स्त्री० ) [ अ० मआश् = जीवन ] निर्वाहास मदत. " मदत-माश म्हणजे निर्वाहा करितां " ( वाडसनदा ८३ ).

**मदती** मदत्गार. " मस्लतीस मदती असणें " ( राजवाडे १५।३६३ ).

**मद-नज़र** [ फा० मद्द-इ-नज़र् ] लक्ष्य; ध्यानांत. " याज करितां मस्लहतीस मद-नज़र राखून " ( साने-पयाव ४६९ ). " मस्लहतीस मद-नज़र राहून " ( राजवाडे १६।७३ ).

**मदार** ( स्त्री० पु० ) [ अ० मदार् ] आंस; भाग; इतबार. " इब्राहीम आदीलशानें पादशाही कार्माराचा मदार महाराजाचे ( = शहाजीचे ) सिरीं टाकिला " ( इम ९७ ). " अफवाई गोष्टीवर मदार नाहीं " ( राजवाडे ५।२९ ). " त्या फौजेंत अवघा मदार तुमचाच आहे " ( साने-पयाव १४९ ).

**मदार** ( पु० ) [ ∠ फा० दार्-मदार् ] ठराव. " तेव्हां मदार झाला कीं अक्षत तृतियेस निरोप द्यावा " ( खरे ५।२५ ९३ ).

**मदारी** ( पु० ) [ अ० मुदारी = ढोङ्गी ] हातचलाखीचे व नज़रबन्दीचे खेळ करणारा; गारुडी.

**मदारुल्महाम** [ अ० मदारुल्महाम्म् ] महनीय राजकारणांचा आंस; कार्भारी; नाना फडणविसांचा किताब.

**मन्ज़ुरी** ( स्त्री० ) पसन्ती; सम्मती; पर्वानगी.

**मन्ज़ूर** [ अ० मन्ज़ूर् ] इष्ट; वाञ्छित; सम्मत; मान्य. " टिपूचा आमचा स्नेह आहे परन्तु राव पन्त प्रधान यांचा स्नेह आम्हांस अधिक मन्ज़ूर " ( खरे ८। ४११६ ). " जर तफावत आणावयाचें मन्ज़ूर असतें तरी हमराही फौजेची बर्तर्फी व इङ्ग्रजी पल्टणांची रुख्सत हें अमलांत कशास येतें ? " ( राजवाडे ५।१२९ ).

**मन-मुराद्** [ अ० मुराद् = इच्छित ] यथेच्छ; मनसोक.

**मन्सब** ( स्त्री० ) [ अ० मन्सब् ] अधिकाराची जागा; अमुक इतके लोक नौकरीस ठेवण्याचा अधिकार.

**मन्सब्दार** ( पु० ) [ फा० मन्सब्दार् ] अधिकारी; हुद्देदार.

**मन्सबा** ( पु० ) मन्सुबा पहा.

**मन्सुफी; मन्सुबी; मन्सोबी** ( स्त्री० ) [ फा० मुन्सिफी ] न्याय; न्याय-निवाडा. " इन्साफ-मन्सुफी " ( चित्रगुप्त १०५). " मन्सुबी जाली नाहीं; लांच दर्म्यान शास्त्री याणीं खाऊन कागद लेहून दिले आहेत " ( खरे ८८२ ). " मन्सोबीची तर्वार. "

**मन्सुबा; मन्सोबा; मन्सबा** ( पु० ) [ अ० मन्सूबा ] विचार; ठराव; युक्ती; ध्यान; अङ्गीकृत कार्य; मोहीम.

**मन्सुबे-बाज़** [ फा० मन्सूबा-बाज़् ] युक्तिवान्; अक्कल लढविणारा; मुत्सद्दी. " शिपाईगिरीची व मन्सुबेबाज़पणाची शर्त करून यशास पात्र व्हावें ऐसेच आह्मां " ( साने-पयाव ३३३ ).

**मन्सूर** ( स्त्री० ) [ अ० मन्शूर् ] राजाज्ञा पत्रिका.

**मना** ( स्त्री० ) [ अ० मन्अ ] निषेध; प्रतिबन्ध; निषिद्ध; प्रतिबद्ध; ज़प्त. " कोणी कोठडींत जाऊं लागेल त्यास मना करणें " ( सभासद् ४२ ). " दौलता मना ( = ज़प्त ) केल्या " ( सभासद् २९ ). " तोफा मना केल्या " ( इम २०४ ).

**मनाई** ( स्त्री० ) मना; प्रतिबन्ध.

**मनाई-पत्र** ( न० ) प्रतिबन्धक हुकूम ( राजवाडे ८।१५७; ३।३३ ).

**मना-रोखा** ( पु० ) मनाई-हुकूम.

**मनुका** ( स्त्री० अनेकवचन; मागाहून एक व० मनूक ) [ अ० मुनक्का ] वाळलेलीं काळीं द्राक्षें.

**मनेवार** [ ? ∠ अ० मन्अ ] बण्डखोर. " आपण हरामखोर मनेवार चन्जाउरकरास पोशमाल देउनु सोडउनु घेउनु " ( इम ६६ ).

**मनोरा** ( पु० ) [ अ० मनारा ] दीपस्तम्भ; दीपमाळ; उन्च पोकळ बान्धीव स्तम्भ.

**मबादा** [ फा० म-बादा ] न होवो; कदाचित्. " मबादा त्याजवळोन कांहीं तफावत नज़रेस आला तर आम्हास साङ्गावें " ( राजवाडे १।४६ ).

**मम्नुनी** (स्त्री०) [ अ० मम्नूनी ] अजिजी; मनधरणी. " त्यांची मम्नुनी करून आपली तक्सीर माफ करून घेऊन " ( दिमरा १।७५ ).

**मम्लकत-मदार** [ फा० मम्लुकत्-मदार् ] राज्याधार; एक किताब.

**मय्या; मया** [ अ० मिआ ] शम्भर. "मिया" ( राजवाडे ६।२०१ ).

**मय्यातैन** [ अ० मिअतैन् ] दोनशें.

**मयत** [ अ० मय्यित् ] मृत.

**मये** [ फा० मइ ] सह; बरोबर; मै; ब–मय. "शामजपिन्त टकले मये लक्ष्मणपन्त गेले होते" ( राजवाडे ११।८४ ). "चिखली वगैरे मुलूख मये वसूल दुसाला सर्कारचे अम्मल्दाराचे सुपूर्द करावा" ( राजवाडे १०।१६४ ). "ते समयीं आम्ही सर्व सर्दार मये ज़मियत मुका-बिल्यास सिद्ध होऊन प्रथम तर्वारेची लढाई झाली" ( राजवाडे ५।१४२ ).

**मर्कूम** [ अ० मर्कूम् ] लिखित. "आं साहेबांनीं मुफसल मर्कूम केलें तें जाहीर आलें" ( साने–पयाव ४८४ ).

**मर्जी** ( स्त्री० ) [ अ० मर्ज़ी ] खुशी; स्वभाव; तबियत; इच्छा; लोभ. "श्रीमन्त स्वामींची बहुतच मर्जी बारीक जाली आहे" ( राजवाडे १।२२८ ). मर्जी खप्पा–दिक्–बारीक होणें; मर्जी जात राहणें=इतराजी होणें.–च्या मर्जीतून जाणें–उतरणें=च्या रोषास पात्र होणें. –वर मर्जी बसणें=–वर लोभ जडणें.

**मर्जी–अज़ूर; मर्जी–आर्ज़ू** ( स्त्री० ) इच्छा ( दिमरा १।२२२ ).

**मर्जी–खेरीज़**=आज्ञेबाहेर; इच्छेबाहेर. "आम्ही आज तागायत तुमच्या मर्जी खेरीज़ नाहीं" ( दिमरा २।१३४ ).

**मर्जी–मिज़ाज़** ( स्त्री० ) प्रकृती; तब्यत. "नवाबाची मर्जी–मिज़ाज़ विलक्षण जाली" ( राजवाडे ३।४११ ).

**मर्जी–मुबारक** ( स्त्री० ) शुभेच्छा. "स्वामींचे मर्जी–मुबारकेंत आल्यास मी विजयदुर्गाहून पुण्यास येइन ( ऐटि ११६७ ).

**मर्तबान** ( न० ) [ अ० मर्तबान् ] चिनी मातीचें भाण्डें; बरणी. "तीन जोड्या मर्तबानाच्या चिनीच्या, वरतीं झांकणी कुलाबेदार कुल्फी मज़्बूत" ( राजवाडे २२।३५ ).

**मर्द; मरद** ( पु० ) [ फा० मर्द् ] पुरुष; नवरा; शूर. "पैका नामर्दाचा; इज़्जत व यश मर्दाचें" ( पारसनीस–ब्रच ८८ ). अ मर्द ब=जिचा नवरा ब अशी स्त्री नांवें अ.

**मर्दानगी** ( स्त्री० ) [ फा० मर्दानगी ] पौरुष; शौर्य. "साम्प्रत तुमचें मर्दानगीचें वर्तमान राजश्री सोनजी फर्ज़न्द याणीं लिहिलें" ( राजवाडे १७।४० ). "परन्तु टिपूची मर्दानगी व दिलेरी पाहून हे आपले चित्तांत फार भय मानून आहेत ( पदमव १०८ ).

**मर्दान–गिरी** ( स्त्री० ) मर्दानगी. "हे ज़ागा मर्दानगिरीची आहे" ( ऐस्फुले १।२१ ).

**मर्दाना; मर्दानी** [ फा० मर्दाना ] पुरुषी; शूर; धैर्यवान् ( मराआ ३६ ).

**मर्दाना** ( पु० ) [ फा० मर्दाना ] पुरुषांची बैठक. "फार करून ज़नान्यांत असतात; येकादों दिवसां आंत दोन तीन घटिका मर्दाना करून मीर आलम... वगैरे कोणी कोणी येतात त्यांस बोलावून घेऊन कांहीं ज़ाब–साल होतो" ( राजवाडे ७।११९ ).

**मर्दामर्दी** ( स्त्री० ) मर्दुमी. "हशमाच्या लोकांनीं कोटासच मर्दामर्दी शिडी टेंकून चढले" ( पारसनीस–ब्रप ७४ ).

**मर्दी** ( स्त्री० ) [ फा० मर्दी ] शौर्य.

**मर्दुमकी** (स्त्री०) शौर्य. "मर्दुमकी शाबा-सकीचा मालक" (गोखचिशाब ६५).

**मर्दुमी** (स्त्री०) [फा० मर्दुमी] शौर्य; साहस. "परशुराम रामचन्द्र यांणीं करवीरकर महाराजांशीं मोठे मर्दुमीनें लढाई दिली" (खरे ११।६१०४). "तडीस येतां रेवदण्डकरांनीं मर्दुमी करून कोण्डून दस्त केली" (साने-पयाव ६८).

**मर्फा** (पु०) [फा० मर्फा] एक प्रकारचा नगारा.

**मर्फाची; मर्फेकरी** (पु०) [फा० मर्फाची] मर्फा वाजविणारा. "मर्फाची" (वाड-समा २।३).

**मर्मर** (पु०) [फा० मर्मर्] सङ्गम्-रवर; आरस्पान.

**मर्मरी** आरस्पानी.

**मर्वारिद्** [फा० मर्वारीद्] मौक्तिक. "माळा मर्वारिद्" (ऐटि १।११).

**मर्शा** (पु०) [अ० मार्सीया] शोक-गीत; विलापिका.

**मर्सूल** [अ० मुर्सल्] प्रेषित; रवाना.

**मर्हूम** [अ० मर्हूम्] स्वर्गस्थ; गत.

**मर्हमत; मऱ्हामत** (स्त्री०) [अ० मर्ह-मत्] कृपाप्रदान; दान; दत्त. "ज़मीन मऱ्हामत केली असे" (राजवाडे ८।६८). "त्यास कौल मर्हमत जालियानें रयत कीर्द-मशागतीस लागतील" (पारसनीस-ब्रप २३७). "त्याचा मुबादला आपल्यास मऱ्हमत जाला." (इम ६५). "बङ्गालयाची सनद मुबारक-जङ्ग यास मर्हमत जाली" (ऐटि १८).

**मरातब; मरातिब** (पु०) [अ० मरा-तिब् अनेक व० मर्तबा चें] पदवी; दर्जा; बहुमान; (अनेकवचनी) गोष्टी; मज़्कूर. "राजे असा मरातीब मेळ-विला" (राजवाडे ४।२३). "त्यांचा मरातब दादासाहेबांनीं मोठा वाढविला" (हब ५०). "परन्तु त्यांणीं सर्वोपरी बर्दास्त करून या मरातबास आणिलें" (होकै १९). "तालूकदारांनीं आडवें होऊन महासरा करावा हे मरातब तुम्हास लिहावयास साङ्गितले" (राजवाडे ५।२०२). "लिहावयाचे मरातब बोलण्यांत येतील त्याप्रमाणें तुम्ही लिहावें" (राजवाडे ५।१५६). "हे सर्व मरातब व दर्जे नबाब बहा-दूर यांचे ध्यानांत आहेत" (राजवाडे १९।९१). "मुख्लिसानें ... दोस्तीचे मरातीब ... सर्कारांत जाहीर करण्यांत आणिले आहे" (राजवाडे १०।२५१). "राजेसाहेबांनीं आमचे चित्तांतील मरातीब मन्ज़ूर न फर्माविले" (राज-वाडे १०।२५२). मान-मरातब (पु०) बहुमान.

**मरादबा** (पु०) [अ० मुराबता] स्नेह-सम्बन्ध. "मला पत्र दोस्तीचें मराद्-बाचें आहे" (राजवाडे ५।१५०).

**मरामत; मरम्मत** (स्त्री०) [अ० मरम्मत्] डागडुजी; दुरुस्ती. "कामाठी, बेल्दार मजूर्दार लाऊन जाग्याची मरमत करविली" (राजवाडे ७।९८). "येथें हवेलीचे मरामतेस दीडशें रुपये लागले; हवेलीची ज्या ठिकाणीं ज़रूर मरमत करणें होतें तेथें केली आहे" (राज-वाडे ६।५९२).

**मरमत-तलब** मरामत मागणारा. "जागा मरमत-तलब आहे सबब दुरुस्ती करा-वयास माणसें लाऊन" (राजवाडे ७।२१९).

**मलई** ( स्त्री० ) [ ∠ अ० मला = जमाव ] दङ्गा; बखेडा; बण्ड. " मालोजी ... हे त्या मलईंत नाहीत; आम्हांकडे होते" ( खरे १।२५४ ). " त्यांनीं लबाडी करून मलई केली " ( खरे ६।२८८४). " बक्षिमुळें बहुत मलई जाहली आहे; कोणत्या थरास जातें, पहावें " ( खरे १०।५३६२ ).

**मलऊन** [ अ० मल्ऊन् ] शापित; शापार्ह. " ज़मियत शायस्ता पैदा करून सिवा मलऊनानें मुलूक काबीज केला आहे तो द्‌र्‌कबज़ पाद्‌शाहजीच्या आणील" ( राजवाडे १७।१६ ).

**मल्फूफ** [ अ० मल्फूफ् ] गुण्डाळलेलें. "पत्र बाबासाहेबांचे पत्रांत मल्फूक (?) करून पाठविलें " (राजवाडे १।१९० ).

**मल्बूस** [ अ० मल्बूस ] पेहेरलेला; कापड. " रज़ाई शाल नामी मल्बूस-खास इनायत जाली " ( दिमरा २।१३७ ).

**मलम** ( न० ) [ फा० मल्हम् ∠ अ० मर्हम् ] चोळण्याचें स्निग्ध औषध; अञ्जन.

**मलिका** ( स्त्री० ) [ अ० मलिका ] राणी, " मलिका मुअज़्ज़मा " थोर राणी; महाराणी.

**मलिदा** ( पु० ) [ फा० मालीदा ] दूध, लोणी, पीठ व साखर यांचें पक्वान्न.

**मलीक** ( पु० ) [ अ० मलिक् ] राजा " मलीक-मैदान " = रणराजा; विजापूर येथील सुप्रसिद्ध तोफेचें नांव.

**मलीक-नवीस** ( पु० ) राज-चिटणीस.

**मलूल** [ अ०मलूल् ] क्लान्त; निस्तेज; खिन्न; कोमेजलेला. " साबाजी अनन्त हांसोन...तिचा हात धरून तिची मदनाची सिरकला दाबिली ...वासना भोगार्चा राहिली; मलूल होऊन शर्मिन्दी जाहली" ( भाइसम १८३४ षावृ २१२ ).

**मव्जूद** मौजूद पहा.

**मव्सर** ( पु० ) [ अ० मुवस्सल् ] प्राप्त; समर्थ. सामर्थ्य. "तालुक्यांची तमाम ताखत व ताराजी होऊन कोठील पैसा या दिवसांत मव्सर नाही " ( राजवाडे ५।१४५ ). " त्यास हे नादार; द्यावयास मव्सर नाहीत " ( वाड-बाबा २।२४). " कर्ज-वाम जालें तें वारायास मव्सर नाहीं " ( वाड-शाछ ८३ ).

**मव्सर-हाल** ऐपती प्रमाणें. " मव्सर-हाल गुन्हेगारी " ( इऐ ५।४९ ).

**मवाखज़ा** ( पु० ) [ अ० मुवाखज़ा ] भाण्डण. "कांहीं मवाखज़ा मध्यें नसावा" ( दिमरा १।४५ ).

**मवाज़न; मवाजीन** ( पु० ) [ अ० मुअज़्ज़िन् ] मशिदींची बाङ्ग पुकारणारा; मोआजीन.

**मवाज़नी** ( स्त्री० ) मवाज़नाची वृत्ती. " शेख अब्दुल् समद् यास खिज़्मत मवाज़नीची मशीद् मज़्कूरची चालवीत आहों " ( वाड-सनदा २८ ).

**मवाज़ने-नवीस** ( पु० ) [ ∠ अ० मुवाज़ना=तुलना ] ताडून पाहून नक्कल दुसरीं नमूद करणारा. " मवाज़ने-नवसि त्याचे दफ्तरीं नक्कल विल्हे लाविली " ( राजवाडे २०।१८ ).

**मवाजा** ( पु० ) [ अ० मुवाज़आ ] चर्चा; ऊहापोह. " हर्जत बर्खास्त झालियावर तुम्ही आम्ही बसून तहनाम्याचा मवाज्या करूं " ( राजवाडे ५।७ ).

**मवाफीक** [ अ० मुवाफिक् ] प्रमाणें; माफक. " ताकीद असे त्या मवाफीक चालविजे " ( राजवाडे १५।१६७ ).

**मवाली-पन्हा** [ ∠ अ० मआली ] उच्चगुणांनीं युक्त ( राजवाडे १५।५६ ).

**मवाशी; मवास** [ अ० मुआसी ] चण्ड-खोर; लुटारू; पुण्ड.

**मवेशी** ( स्त्री० ) [ अ० मवेशी ] गुरें ढोरें; माल-मत्ता. " आपण मवेशी नेली असेल ती देवावी " ( राजवाडे २२।३९ ).

**मश्ग़ूल** [ अ० मश्ग़ूल् ] मग्न; निमग्न ( राजवाडे २०।२८६ ).

**मश्रू** [ अ० मश्रूअ ] निमाज़ पढतांना निषिद्ध गणलें जात नाहीं असें गर्भरेशमी कापड.

**मश्वरा** (पु० ) [ अ० मश्वरा ] सल्लामसलत; ज़ाब-साल. " ( जनरेल कोट ) कांहीं मश्वरा करावयास आला आहे" (दिमरा ११९१ ).

**मश्हूद** [ अ० मश्हूद् ] दृष्ट; श्रुत. " मश्हूद आं के " = श्रुत ( व्हावें ) तें कीं ( साने-पयाव ३८३ ).

**मश्हूर** [ अ० मश्हूर् ] प्रसिद्ध; मशहूर. " दुनियाईत दोही दौलतींची एगानगत मश्हूर " ( राजवाडे ५।३१ ).

**मशक** ( न० ) [ अ० मश्क् ] पाणी ठेवण्याची चर्मी पिशवी; एक वाद्य.

**मशाएख; मशायख** ( पु०) [ अ० मशाइख् ] धर्मात्मा. " अलीजाह यांनीं कोणी मशाएख पीर-ज़ादा आहे त्याचे लेकीशी निका लाविला " (राजवाडे ५। १०७ ). " त्या ठिकाणीं हुसेनी साहेब म्हणून मशायख पीर-ज़ादा आहे " ( राजवाडे ५।११२ ).

**मशागत** ( स्त्री० ) [ अ० मशक्कत् ] श्रम; परिश्रम; सेवा. " तैसेच अण्णाजीपन्त यांणीं मोठी मशागत केली... यास्तव यथारीती सन्मान केला " ( चित्रगुप्त ५ ). " कष्टमशागत केलिया लोकांस सरन्जाम करून द्यावा" (सभासद २३).

**मशार्निले; मशार्निल्हे** [ अ० मशारुन्-इलैह् ] उपरिनिर्दिष्ट; मज़्कूर. " मशारून्-इलै " ( साने-पयाव ३८४ ).

**मशाल** ( स्त्री० ) [अ० मश्अल् ] दिवटी; हिलाल.

**मशालची; मशालजी** ( पु० ) [ फा० मश्अल्ची ] दिवटी धरणारा. " मशाल्ची याची तैनात सर्कारांतून पावत आहे " ( राजवाडे ७ खलप २।२५ ).

**मशीद** ( स्त्री० ) [ अ० मस्जिद् ] मुसल्मानांचें प्रार्थनामन्दिर.

**मस्करी** ( स्त्री० ) [ अ० मस्खरा=गमत्या ] विनोद; टवाळी; कुचाळी.

**मस्कऱ्या** ( पु० ) [ अ० मस्खरा ] विदूषक; गमत्या.

**मस्त** [ फा० मस्त्=तर्र ] उन्मत्त; धष्टपुष्ट.

**मस्त-खोर** मस्तीखोर; उन्मत्त. " आला अफ्ज़ल मस्तखोर कपटी ग्रासावयाला झणीं " ( चित्रगुप्त ११ ).

**मस्तवाल** मस्त; उन्मत्त; उर्मट.

**मस्ती** ( स्त्री० ) [ फा० मस्ती] मद; गुर्मी; माज़.

**मस्ती-खोर** मस्त.

**मस्नद** ( स्त्री० ) [ अ० मस्नद् ] गादी; सिंहासन. " फिरोन फत्तेच्या मस्नदीवर बसविला " ( इम २४० ). " वस्त्रें व सिकेकटार आणिली ती मस्लदीवर ठेऊन मुजरे करून घेतली" (पे अ १६).

**मस्नद्-नशीन** [ फा० मस्नद्-निशीन् ] गादी-नशीन; तक्त-नशीन.

**मस्नद्-नशी** ( स्त्री० ) [ फा० मस्नद्-निशीनी ] सिंहासनारोहण; राजधानी.

" अर्काट् मकाण नामी मस्नदनशीचें ( साने–पयाव ४७५ ).

**मस्रूर** [ अ० मस्रूर्] आनन्दित. "हमेशा मोहब्बद्–नामा इब्लाग करोन ( =पाठवून ) मस्रूर करीत जाणें " ( राजवाडे १०।१६४ ).

**मस्लत; मस्लहत्** (स्त्री०) [अ० मस्लहत्] सल्ला; योग्य विचार; उपदेश; अङ्गीकृत कार्य; मोहीम; योग्य. " करवीरकरांची मस्लत ( ? =फौज़ ) म्हणजे थोडी असा समज हुजूर आहे; परन्तु यांचा फैल उत्कृष्ट " ( खरे ११। ५७६४ ). मोंगलाई मस्लत=कपटव्यवहार. " याउपर इकडे येणें मस्लत नाही; माळःयांत रहावें " ( ऐच १७ ).

**मस्लत–गार; मस्लत–दार** ( पु० ) सल्लागार; मन्त्री.

**मस्लतशीर** सल्लागार; मोहीमशीर; मोहिमेवर. " निखालस तुम्हीच मस्लत–शीर; सोबतीस दुसरें कोणही नाहीं " ( खरे ८४५ ). " खावन्द मस्लत–शीर असल्यास तुम्हीं एक दोन सालचा अगाऊ ऐवज् सर्कारांत द्यावा; पुढें महालांत उगवून घ्यावा " ( राजवाडे ३।३३६ ).

**मस्विदा** ( पु० ) [अ० मुसव्वदा] मसुदा. " पत्राचे मस्विदे मशार्निल्हे याजपाशीं दिले " ( राजवाडे १०।१६६ ).

**मसर्रत–नमत** [ फा० मसर्रत् नमत् ∠ अ० मसर्रत् = आनन्द ] आनन्दायक. " खत मसर्रत्–नमत् पाठविलें तें नेक वक्तीं पोहोंचलें" ( साने–पयाव ४६४ ).

**मसादा** ( पु० ) [ अ० मुसाअदा ] मदत; मदत–पैका. "लोकांस जामियत आणावयाकरितां मसादा दिला आहे " ( राजवाडे ५।१०० ). " घोडेस्वार यांची हजेरी, गणती, मिसल, दाग, चेहरे पाहून खर्चास व मसादा देणें हें करावें. " ?

**मसाला** ( पु० ) [ अ० मसालिह अनेक व० मस्लहत् चें ] सामान; सामुग्री; रुचिकर पदार्थांचें मिश्रण. " ढालाईत वगैरे ताकीद्–दारास द्यावयाची ते मागतील ती शिध्याची अगर चैनीची तम्बाकू वगैरे वस्तू"; दण्ड.

**मसाले–दार** मसालायुक्त .

**मसीहा** [ अ० मसीहा ] इसवी. " सन १७९६ मसीहा " ( पद्मव ८५ ).

**मसुदा; मसोदा** ( पु० ) [ अ० मुसव्वदा ] कच्चा खर्डा; पहिलें लिखाण; मस्विदा. " मसोदेही पाठवून, तेथून ठरून खचित आज्ञा आल्यावर इनायत–नामे त्याप्रमाणें द्यावे " ( राजवाड५।१९५ ).

**मसुद्दी** [ ? ∠मुतसद्दी ] धोरणी; तार्किक. " नाना फडणीस एक मसुद्दी, तर्क त्यानें काढिला " ( साने–पयाव ५४ ).

**मसुरुल्–अनाम** [ ∠अ० मश्हूर्=प्रसिद्ध; अनाम्=लोक ] लोक–मान्य.

**मसुरुल्–दौलत** राजमान्य.

**मसुरुल्–हज़रत** राजमान्य.

**महकुबी** ( स्त्री० ) [ फा० मौकूफी ] तात्पुरती थाम्बणूक; तहकुबी. " आज प्रतिनिधी पन्त जाणार होते; परन्तु तूर्त महकुबी जाली " ( खरे ११। ६०७४ ).

**महकूब; महकूफ** [ अ० मौकूफ् ] रहीत; तहकूब. " त्याजवरून मार महकूब केला " ( इम २०५ ). " असें ठरून लढाई महकूब झाली " ( इम १९४ ). " मबब एव्हां नबाबाची भेट महकूब करून जलद तुम्ही आम्ही मिळोन

कामास जावें" ( साने-पयाव ३५० ).

**महज़ब** (पु०) [अ० मझ्हब्] धर्मपन्थ; धर्म. "हिन्दू अगर मुसल्मान होऊन इस्कील करील त्यास आपले महज़बाची सौगन्द् असे" (राजवाडे १५। १५६). "महज़बें"=धर्मशास्त्रान्वयें (राजवाडे ८।६६).

**महज़द; महजीद** (स्त्री०) मशीद्. "दर्वाज्यापाशीं जुम्मा महज़द आहे" (दिमरा १।२४२). "महेज़तींत यवन लोक बाङ्ग देतात" (इम १०७). "कोठें महजीद् आहे तेथें त्याचें स्मरण करून बाङ्ग देतात" (वाड-सनदा १५०)

**महज़र** (पु०) [अ० मह्ज़र्] तुमार; करारनामा; निकाल; हुकूम-नामा.

**महज़ूद** [अ० मौजूद्] जिवन्त; विद्यमान. "आम्ही तो महज़ूद आहों" (राजवाडे ११।९५).

**मइ-तकद्दम** [अ० मा तकद्दुम् ] पूर्वी. "या वतनास हक्क लवाजिमा मह-तकद्दम चालला असेल त्याप्रमाणें तुम्हास करार केला असे" (राजवाडे ८।५२). "अज़ महतकद्दम" (राजवाडे १५।१६१)=पूर्वीपासून.

**महताबी** (स्त्री०) [फा० मह्ताबी] माण्डव (खरे १०।५४२०).

**महताब** (स्त्री०) [फा० मह्ताब्] चन्द्रज्योत; हिलाल. "महताबा लावून रात्रीं परस्परें गोळागोळी जाली" (खरे ८।४१३०).

**महदूद** [अ० मह्दूद्] मर्यादित. हद्द-महदूद्=निश्चित सीमा.

**महब्बत्-अज्ञाम**=सप्रेम. सलाम्-इ-महब्बत अज्ञाम्=प्रेमपूर्वक वन्दन.

**महशूर** [अ० मश्हूर्] सुप्रसिद्ध; माहीत.

**महसूफ** [अ० मौसूफ् ] उपरिनिर्दिष्ट; मज़्कूर. "राजे महसूफ" (राजवाडे ८।१०५). "ज्या अर्थी खान महसूफ यांनींही खातर्जमेचें पत्र लिहिलें असे" (खरे ९।५०२२).

**महसूल** (पु०) [अ० मह्सूल] वसूल; उत्पन्न; धारा; ज़कात.

**महल्ला; मोहल्ला** (पु०) [अ० मह्ल्ला] पेठ; पुरा.

**महा; माह** [फा० माह्] महिना. दर-महा=प्रत्येक महिन्यास.

**महामुरी** (स्त्री०) [फा० मअमूरी] विपुलता. "द्रव्याची लश्करांत महामुरी झाली" (पाच ११). कीर्द-महामुरी =लावणी-सञ्चणी.

**महामूर** [अ० मअमूर् ] भरपूर; विपुल. महामूर पीक.

**महामूर** [अ० मामूर्=हुकूम-बद्ध] ताकीद्-बन्द्. "दर्वाजे किल्ल्याचे रायगड याचे महामूर राखावे; दिण्डया मात्र उघड्या असाव्यात" (मराचिस २). "दिण्डया महामूर" (खरे ४।१४ ७१).

**महाल** (पु०) [अ० मह्ल्ल् ] मन्दिर; जिल्हा; खातें; राजस्त्री (कारण मुसल्मानी बेगमांचीं नांवें नूर-महाल्, ज़ीनत्-महाल अशीं असत). "पाकाशय, जलस्थान, फलस्थान वसनागार आदिकरून हे नाजूक महाल" (मरा-आ १०). "सारांश उभयतां महालचें अती प्राबल्य जहालें आहे" (साने-पयाव ६१). "श्रीच्या दर्शनास महालसहवर्तमान गेले" (पारसनीस-ब्रच ९४).

**महालकरी** ( पु० ) महालाधिकारी.

**महाल्दार** ( पु० ) [ फा० महल्दार् ] रक्षक; पहारेकरी ( चित्रगुप्त ११३ ).

**महाल-मवेशी** ( स्त्री० ) [ माल-मवेशी; चीज़ वस्त-गुरें ढोरें. " महाल-मवेसी मागों लागले " ( इऐ ५।१०० ).

**महासरा** ( पु० ) [ अ० मुहासरा ] वेढा; परिघ. " कुमक करून महासरा उठविला " ( राजवाडे १०।३३१ ). महासरा देणें=वेढणें.

**महिनत** ( स्त्री० ) मेहनत. " महिनतीचें सार्थक करणार खाविन्द् समर्थ आहेत " ( राजवाडे ६।५९४ ).

**महिना** ( पु० ) [ फा० माहीना ] मासिक; मासिक वेतन; मास; साधारणपणें तीस दिवसांचा काल.

**माहिमान** ( पु० ) पाहुणा; मेहमान पहा.

**महिरप; माहिराप** ( स्त्री० ) कमान; मेहराप पहा.

**माकूळ** [ अ० मअकूल् ] जाणता; शाहणा ( पाच १८; चित्रगुप्त ४६ ); मुब्लक. " सरन्जामही माकूल दिधला जाईल " ( राजवाडे ८।२०७ ). " त्या फर्देवर पातशाहांनीं दस्कत केलें कीं माकूल पेश्कस सर्कारांत दिधलिया देऊं " ( दिमरा १।२४० ). " इङ्ग्रजांस माकूल तम्बी करावी ऐसें मुकर केलें आहे " ( साने-पयाव ४६६ ).

**माजी** [ अ० माझी ] गत; भूतकालीन; पूर्वील; पेशीन.

**माजूम** ( स्त्री० ) [ अ० मअजून् ] एक कैफी पदार्थ.

**मात** ( स्त्री० ) [ अ० मात् ] राजाचा कोण्डमारा ( बुद्धिबळांत ).-वर मात करणें = - वर पूर्ण विजय मिळविणें.

**मातकद्दम -इस्तक्बील पासून** [ अ० मातकद्दम् = भूतकाल ] फार पूर्वीपासून.

**मातबर; मातब्बर** [ अ० मुअतबर् ] विश्वसनीय; थोर; श्रीमन्त; प्रतिष्ठित.

**मातबरी; मातब्बरी** ( स्त्री० ) [ फा० मुअतबरी ] पत; प्रतिष्ठा; महत्त्व; थोरवी. " जें कर्तव्य तें सलाबतीनें मातबरीनें आपली इभ्रत शह याजवरी पडोन नक्ष होय तें करावें " ( खरे ११२४० )

**मातम** ( न० ) **मातमी** ( स्त्री० ) [ फा० मातम् ∠ अ० मअतम् ] शोक; दुखवटा. " पातशाहानीं दोन दिवस बहुत मातम केलें " ( दिमरा २।८४ ). " सुल्तान खान ज़मात-दार यास मातमीचे खलअत जाले " ( राजवाडे ११।१८६ ).

**मातम्पुर्शी** ( स्त्री० ) [ फा० मातम्पुर्सी ] दुखवट्याची विचारपूस. " हमसिरा बेगमेस एक दुशाला पल्लेदार मातम्पुर्सीचा " ( दिमरा ). " मातङ्ग-पूर्शी " ( होके ).

**मातल** ( न० ) [ अ० मुअत्तल् ] बेतबदली; उशीर. " अमा साहेबांचें यावयास मातल जालें " ( इम ६८ ).

**मादर्चोद** [ ∠ फा० मादर् = आई ] मात्रागमनी. " परन्तु हा मादर्चोद कश्मिरी असा हरामज़ादा कीं बोलणेंही टाकिलें " ( राजवाडे ६।५९१ ).

**मादवान** ( स्त्री० ) [ फा० मादियान् ] घोडी. " घोडे व मादवाना आल्या, त्या पहात होते " ( राजवाडे ७।१३८ ).

**मान्दगी** ( स्त्री० ) [ फा० मान्दगी ] आज़ार; थकवा. " तिसरा मुक्काम बैलांची मान्दगी - निवृत्यर्थ " ( खरे ९।४५७१ ).

**मान्दा** ( पु० ) [ फा० मान्दा ] श्रान्त;

बिमार. " परन्तु लाम्बून गेलों ( त्यामुळें ) घोडीं माणसें मान्दीं झालीं होती " ( खरे ५।२१३६ ) " मीर आलम यांची तबियत मान्दीच होती " ( राजवाडे ५। १४३ ).

**मानत** ( स्त्री० ) [ अ० मआनत् ] नवस. " पाटलानें पुत्राकरितां नवाबांस मानत केली होती; त्यास पुत्र झाला " ( राजवाडे ७।१३९ ).

**माना; मायना** ( स्त्री० ) [ अ० माना ] गोष्ट; अर्थ; हकीगत. " चोरांनीं कलावन्तिणीवरील घाला घालून गळ्याचा नवरत्नाचा हार घेऊन गेले म्हणून फिर्याद करिती हे काय माना ते मना आणून तलास करून देवणें " ( भाइसम १८३४ पावृ २१० ). " हे मायना आहे; तूंच चोर आहेस " ( भाइसम १८३४ पावृ २११ ).

**माने–मुज़ाहीम** [ ∠अ० मानिअ ] प्रतिबन्ध करणारा. " कोणेविशीं माने–मुज़ाईम न होणें " ( वाड–मा १।६५ ).

**माफ** [ अ० मुआफ् ] क्षान्त; सूट.

**माफक; मवाफीक** [ अ० मुवाफिक् ] योग्य; मध्यम; नेमस्त; प्रमाणें. "ताकीद असे त्या मवाफीक चालविजे " (राजवाडे १५।१६७ ). " माफक–मरातब नज़रा देऊन विनन्ती केली कीं " ( दिमरा १।७५ ). " नज़रा माफक–मामूल गुज़राणल्या" (दिमरा २।९६). "यांस जन्रेली तमामी फौजेची माफक–हुकूम–विलायत मुक़र जाली आहे " ( पदमव ११५ ).

**माफकत** ( स्त्री० ) [ अ० मुवाफकत् ] पसन्ती; सोय; पसन्त; माफक. "यांची अधर्माची वर्तणूक आमचे राजास माफकत पडत नाहीं" (दिमरा १।२३६). "येथील आब–हवाही माफिकत नाहीं" ( राजवाडे ७।१२० ). " याकरितां मशार्निल्हेस यावयास माफगत होत नसे " ( ऐटि २।६५ ).

**माफज़त** ( स्त्री० ) [ अ० मुहाफज़त् ] संरक्षण; साम्भाळणी; बन्दोबस्त. ( डचीचे घडयाळ ) " माफज़तीनें पाठवावें " ( खरे ९।४४५१ ). " दक्षिणावर्त शङ्ख आज्ञा झाल्यास माफज़तीनें पाठवून देणें " ( खरे ४।१८३२ ). " पांचशें लोक किल्याचे माफज़तीस व दोन तोफा आणीक पाठविल्या " ( दिमरा २।९५ ).

**माफलात** ( स्त्री० ) [ अ० मुफाअलत् ] कार्य; बजावणी; तामील. " आज्ञेप्रमाणें माफलात करून " ( दिमरा १। ६७ ).

**माफी** ( स्त्री० ) [ फा० मुआफी ] क्षमा; सूट.

**मामलत; मामलीयत** ( स्त्री० ) **मामला** ( पु० ) [ अ० मुआमलत; मुआमला ] कार्य; गोष्ट; महत्वाचें कार्य; तालुक्याच्या वसुलाचें काम; ज़ाब–साल. " हालीं श्रीकृपेनें राज्याचा मामला थाटत चालला " ( राजवाडे १६।४३ ). "सल्ला–मामला होत आहे; बोली–चाली आहे " ( राजवाडे १०।३३ ). " सोन्धेकरांचीही मामलीयत चुकवून बिदनूरकरांकडे जावें " ( साने–पयाव ६९ ).

**मामलत्दार; मामलेदार** ( पु० ) तालुक्याचा अधिकारी.

**मामुरी** ( स्त्री० ) [ फा० मअमूरी ]

आबादी; सम्पन्नता. "रयत-मामुरीवर नदर देऊन" ( इम ७५ ).

**मामुली** [ ∠अ० मअमूल ] दैनिक व्यवहारांतील; सामान्य; किरकोळ; ज़ुज़बी.

**मामूर; महामूर** [ ∠अ० मअमूर् ] महामूर; आबाद; सुसम्पन्न. "वतन्दारांचीं वतनें वतन्दारांच्या दुमाला केल्या विरहित पोट-तिडीक लागोन मुलूक मामूर होत नाही व मुलुकाचा ज़फ्त-रफ्त होत नाही ऐसें कळों आलें" ( राजवाडे १६।४४ ).

**मामूल** ( स्त्री० ) [ अ० मअमूल् ) वहिवाट; चाल. "नज़रा माफक-मामूल गुज़राणल्य." ( दिमरा २।९६ ).

**मामूल-वहिवाट** ( स्त्री० ) चाल-रूढी.

**मामूल** [ अ० मअमूल् ] उमेद्वार. "मोकदमांस कौलु-बोल देऊन मामूल करून लावणी उगवणी करणें" ( राजवाडे १५।३१ ).

**मायना** ( पु० ) [ अ० मअना ] ज्याला पत्र लिहावयाचें असेल त्याच्या योग्यतेप्रमाणें वापरावयाचा सम्बोधन समुच्चय; अल्काब; दर्ज़ा. "आपण महाराज छत्रपती यांचे सेनापती; आणि श्रीमन्त हे पन्तप्रधान, उभयतांचा बरोबरीचा मायना" ( हब ४९ ).

**माया** ( स्त्री० ) [ फा० माया ] द्रव्य; निधि; पुञ्जी.

**मारका** ( पु० ) [ अ० मआरिका ] युद्ध; मुकाबला. "लढाईचा मारका रूबकार आहे" ( साने-पयाव ४८२ ).

**मार-गिरी** ( स्त्री० ) मारा.

**मार्फत; मारफत** ( स्त्री० ) [ अ० मुआरफत् ] ओळख; मध्यस्थी; गुज़ारत; **करून.** "भिडे यांचे मारिफत कांहीं बाणदार सर्कारांत चाकर आहेत" ( राजवाडे १।३० ). "शिवाजी आपले मार्फतीनें आला होता" ( सभासद ४२ ).

**मारूज़** [ अ० मअरूज़् ] प्रविष्ट; श्रुत; ( पु० ) अर्ज़. "खावन्दाशी प्रतरणा करून तुमची दौलतखाही करावी हें मजकडून घडावयाचें नाहीं; खावन्दास अर्ज़ मारूज़ करून मर्जी खूश करून पाहीन" ( राजवाडे ५।७३ ). "हुज़ूर मारूज़ पोंहचला" ( वाड-मा १।६६ ).

**माल** ( पु० ) [ अ० माल् ] जिन्नस; सम्पत्ती.

**माल-अस्बाब** ( पु० ) चीज़वस्त वगैरे सम्पत्ती ( दिमरा १।२७१ ).

**माल-बिसात** ( स्त्री० ) माल-मत्ता.

**माल-मत्ता** ( स्त्री० ) [ ∠अ० मताअ ] जिन्दगी; इष्टेट.

**माल-मवेश; माल-मवेशी** ( स्त्री० ) [ ∠अ० मवेशी ] चीज़-वस्त-गुरें ढोरें.

**माल-मालीयत** ( स्त्री० ) माल-मत्ता.

*माल-मिळकत ( स्त्री० ) = माल-मत्ता.*

**माल-अन्देशी** ( स्त्री० ) [ अ० मआल् परिणाम ] परिणामाचा अगोदर विचार करणें. "माल-अन्देसी" (पेअ ६०).

**मालक; मालीक** (पु०) [ अ० मालिक् ] धनी.

**मालकी** ( स्त्री० ) [ फा० मालिकी ] धनीपणा; हक्क.

**मालकीयत** ( स्त्री० ) [ अ० मालिकीयत् ] स्वामित्व. "मालकीयत व साविन्दी" ( दिमरा १।२०७ ).

**माल्गुज़ार** ( पु० ) [ फा० माल्गुज़ार् ] ज़मीदार; सर्कारचा वसूल ज़मा करून देणारा.

**मालयत; मालीयत; मालत** ( स्त्री० ) [ अ० मालियत् ] जिन्दगी; मालमत्ता. " त्यांची मालयत फारच गेली " ( खरे ११।५९५५ ). " माणसास न मारावें; मालत घेऊन सोडून द्यावें " ( भाके २६ ). " तालुके ताडपत्री येथील पेठ मारून लाखोंची मालीयेत लुटून नेली " ( राजवाडे २२।६१ ).

**माल्ज़ादी** ( स्त्री० ) [ ∠ फा० माल्ज़ादा रण्डीपुत्र ] वेश्याकन्या.

**माल-ज़ामीन** ( पु० ) अमुक रक्कम अमुक वेळीं देईल अशी हमी घेणारा ( राजवाडे १६।५० ).

**माल-मसाला** ( पु० ) उपयुक्त वस्तु-सामग्री.

**माली** [ फा० माली ] वसुला सम्बन्धी. " माली व मुल्की " ( वाड-समा ३।२४ ).

**मालीम** ( पु० ) [ अ० मुअल्लिम् ] शिक्षक; सुकाणू धरणारा; ज़हाज़ाधिकारी.

**मालीयात** ( स्त्री० ) [ अ० मालयात् ] उत्पन्न; वसूल; जिन्दगी.

**मालीस; मालिस्त** ( स्त्री० ) [ फा० मालिश् ] मर्दन; चम्पी.

**मालूम** [ अ० मअलूम् ] ज्ञात; ठाऊक. " मालूम करणें = कळविणें ( राजवाडे १५।३१ ).

**मालूमात; मालूमाती** ( स्त्री० ) [ अ० मअलूमात् ] माहिती. " नबाबांनीं मला पुरावण्या लिहावयास साङ्गितल्या त्यांची मालूमात ज़मा धरून उत्तर द्यावें " ( राजवाडे ५।८९ ). " म्हणून मालमाती केली " ( राजवाडे १६।४९ ). " मालूमाती-कागद " ( राजवाडे ८।१६४ ) = माहितीचा कागद.

**माविज़ा** [ अ० मुआवज़ा = बदली भरपाई ] ऐवजी. " त्यांत सर्कारचे तालुक्यापैकीं धरदापूर वगैरे वकीलातीचे माविज़ा तालुका द्यावा " ( राजवाडे ५।१९५ ).

**माशूक** [ अ० मअशूक् ] प्रिय; कमनीय; रमणीय; सुन्दर. " माशूक मऊ मुखचन्द्र सुकुमार पुष्पाहून अरवा " ( प्रभाकर २३० ).

**मासला** ( पु० ) नमुना; तऱ्हा; रुची.

**मासलेदार; मासलेवाईक** नमुनेदार, तऱ्हेदार; तऱ्हेवाईक.

**माह** ( पु० ) [ फा० माह् ] महिना. " यांचें देणें चालते माहापासोन मागील गेला महिना देखील धरिलें असें " ( राजवाडे ६।१९८ ). " माहे जून " जूनचा महिना.

**माहतानी** [ ∠ अ० मा-तहतानी ] ताब्यांत; खालीं. " मौजे उझार्डे किले वन्दन हा गांव पूर्वीपासून किलेचे माहताजीच ( ? ) चालत आहे " ( राजवाडे ८।१ ).

**माहदत-असारी** [ फा० मवद्दत्-आसार् ] स्नेहाङ्कित ( राजवाडे १५।२५० ).

**माह-ब-माह** [ फा० माह्-ब-माह् ] महिन्याच्या महिन्यास. " माह-ब-माह दर्माह देत जावा" ( राजवाडे ६।४७५ ). " यांस नेमाप्रमाणें माहेवारी माह-ब-माह देत जावी ( राजवाडे ७।४५ ).

**माहवल-मक्सूद** [फा० मुहव्वालि मक्सूद्] विनन्ती ( पारसनीस-ब्रप २३९ ).

**माहवल-मराम** [ फा० मुहव्वलि मराम् ] विनन्ती ( पारसनीस-ग्रप २३१ ).

**माहवारी; माहेवारी** ( स्त्री० ) [ फा० माहवारी ] मासिक पगार. " साठ हज़ाराचा वसुली तालुका देतील, अगर पांच हज़ार रुपये माहवारी द्यावी " ( राजवाडे ७।३६ ). " एक माहेवारी बादशहास तीन लाख रुपये पाठविले " ( खरे ८।४२२३ ).

**माहिती** ( स्त्री० ) ज्ञान.

**माहीत** ( स्त्री० ) [ अ० माहीयत् ] ज्ञान; जाणता; माहीतगार; ज्ञात; ठाऊक. " या प्रान्तांतील कारक वगैरे माहीत यांस वाटेची व मुक्कामाची माहीत पुसत होते " ( खरे ११।५७१२ ). " तेथील लश्करची माहीयेत खरी कळावी म्हणून दोघे हर्कारे पाठविले होते " ( चिरा ४४ ). " श्रीमन्त गैर-माहीत व नानाप्रमाणें दुसरा कार्भारी कुणी माहीत नाही" ( खरे १०।५५५० ). " परन्तु माहीत व मातबर असा ये गोष्टीस वाकब असावा; म्हणजे हे चहातील ( राजवाडे १२।१११ ).

**माहीतगार** ज्ञानी; जाणता; अनुभवीक.

**माहीत-गिरी** ( स्त्री० ) माहिती. " मी ही वर्तणूक कशी करतों हे सर्व श्रीमन्तांस माहीतागिरी आहे " ( खरे ११२३८ ). " त्यांतील माहीत-गिरी सर्वांनीं समक्ष भाऊसाहेबांस निवेदन केली " ( खरे ११।५६७३ ).

**माहीना; माहाना** ( पु० ) [ फा० माहाना; माहीना ] मासिक पगार; दर्महा.

**माही-मरातब** ( पु० ) [ फा० माही-मरातिब् ] मत्स्य व दोन गोल सोन्याचे मिळून होणारें व हत्तीवरून मिरवावयाचें बहुमानाचें चिन्ह. हा मान फक्त राजांना व मातबर सर्दारांना मिळालेला असतो.

**माहे गुदस्त** [ फा० माहि गुज़श्ता ] गेला महिना.

**माहे-दर-माहे** माह-ब-माह.

**मिजान** ( न० ) [ अ० मीज़ान् ] तुला; प्रमाण.

**मिज़ाज़** ( स्त्री० ) [ अ० मिज़ाज् ] प्रकृती; तब्यत; बुद्धी. " तस्मात् याची मिज़ाज़ कायम नाही " ( खरे ८।३९१५ ).

**मिज़ाज़-खुशी** ( स्त्री० ) खुशाली. " खैर-आफियत् मिज़ाज़-खुशीचें वर्तमान पुसिलें " (राजवाडे १०।२७१).

**मिज़ाज़-मान्दगी** ( स्त्री० ) प्रकृतीचें अस्वास्थ्य. " राजाजी व रघोत्तमराव यांचेंही मिज़ाज़-मान्दगी करिता राहिलें " ( राजवाडे ५।१५७ ).

**मिजास** ( स्त्री० ) [ अ० मिज़ाज् ] तब्येत; अभिमान; ऐट; दिमाख. " घूत्कार धुन्द फुन्द्रांत मिजाशिंत टाकी " ( प्रभाकर २३८ ). मिजास राखणें = तब्येत साम्भाळणें. मिजास जाणें = इतराजी होणें.

**मिजास्दार** [ फा० मिज़ाज्दार् ] लहरी;

**मिजाशी; मिजासी** [ फा० मिज़ाजी ] लहरी; डामडौलाचें व नाज़ूक. " निजामअली ... मोठ्या अराब्यानें चालले; त्याचें चालणें मिजाशी बहुत; दिवसांतून चार कोस चालले म्हणजे भारी " ( खस्वाब १० ).

**मिन्हू** [ अ० मिन्हुव ] त्यापैकीं; त्याच महिन्याच्या. " स्वामींचें आज्ञापत्र सादर जहालें, छ० २१ जिल्हेज पै॥

छ० २९ मिन्हू. तेथें आज्ञा कीं" (राजवाडे १५।७९). "नवे जमा दिलावलचीं पत्रें बेविसावे मिन्हूस सादर झालीं" (साने-पयाव २१०).

**मिन्नत; मिनत** (स्त्री०) [अ० मिन्नत् = कृपा, उपकार] मनधरणी; कष्ट. "जायतेखानानीं मिन्नत करावयास वकील पाठविला आहे" (दिमरा १।२७). "साम्प्रत हैदरचा वकील चिरञ्जीव राजश्री राव यांजपाशीं आला आहे; मिनत करीत आहे; परन्तु आमचे मनांत पुरतेंच पारिपत्य करावें असें आहे" (खरे ८७७). "दौलतराव यांची भेट घ्यावी हें मोठे मिनतीनें करारांत आणिलें आहे" (खरे ११।६०६८). "काम होय तोंवर कोरडी मिनत करितात ... जागीर कपर्दिकेची न देत" (राजवाडे ६।३३१).

**मिनत्वारी** (स्त्री०) मिनत; मनधरणी. "यावरी आपण तुमची मिनत्वारी केली कीं हें वतन देसपाण्डपण तुम्हीं घेणें आणि आपणांस सोडविणें" (भाइसम १८३४ षावृ १४१).

**मिनतीनें; मिनत्वारीनें** = मनांत नसतां अजिजीस व भिडेस बळी पडून व केवळ मेहेरबानगी म्हणून.

**मिना** (पु०) [फा० मीना] एकप्रकारचा हिरवा दगड; त्याचा पातळ रान्धा करून चान्दीच्या दागिन्यावर बसविणें.

**मिनेगार** (पु०) [फा० मीना-कार्] मिन्याचें काम करणारा (ऐटि २।९५).

**मिनेगारी** (स्त्री०) [फा० मीना कारी] मिन्याचें काम.

**मियादी** [अ० मीआद् = वायद्याचें स्थळ अगर वेळ] मुदतीची; कांहीं शर्तीवर दिलेली.

**मिर्धा** (पु०) [फा० मीर्दह् ] दहा शिपायांचा नाईक; सचोपदार.

**मिरास; मिराशी** (स्त्री०) [अ० मीरास्] वडिलोपार्जित; दायभाग; "तन्ख्यानें कुणब्याकडे किंवा गांवाकडे असलेल्या जमिनीस मिरासी व तिचा भोगवटा घेणारास मिरास्दार थळकरी, वतन्दार म्हणत" (गांवगाडा १०); वंशपरम्परा. "हे माझे मिरासी। ठाव तुझ्या पायापासीं" (तुकाराम). "निपुत्रिकांचें मिरास तें दिवाणाचें" (राजवाडे ८।४९). "सदर्हू सातां गांवीचीं कुळकर्णें तुम्हांसि मिरासी करून देतों" (राजवाडे १५।२७५).

**मिरास्दार; मिराशी** (पु०) [फा० मीरासीदार्] मिराशीचा उपभोग घेणारा. "वडगांवीची मोकदमीस कोन्ही मिरास्दार नाहीं" (राजवाडे १७।३२).

**मिलक** (स्त्री०) [अ० मिल्क्] जिन्दगी; माल-मत्ता. "बाग मिलक, हवेली वगैरे" (दिमरा २।१३५).

**मिश्री; मिस्री** (स्त्री०) [अ० मिस्री] मिसर देशांतलि साखर.

**मिस्कील** [अ० मिस्कीन् = गरीब] दिसण्यांत गाय परन्तु अन्तर्यामीं महाधूर्त; चेरकी.

**मिस्त्री** (पु०) [फा० मिस्तरी] रेषालेखनपटू; मुकादम; कुशल कारागीर (विशेषत: सुतार).

**मिसल; मिसळ** (स्त्री०) [अ० मिसाल्] हुकूम; व्यवस्था; दर्ज्याप्रमाणें कोणी कोणत्या ठिकाणीं असावयाचें ही व्यव-

स्था; दर्जेबन्दी; प्रकार. "घोडेस्वार यांची हजरी, गणती, मिसल दाग चेहेरे पाहून खर्चास व मसादा देणें हें करावें "

मिसल्दारी ( स्त्री० ) दर्जेबन्दी. "कोरबन्दीनें उभे मानकरी थटून मिसल्दारींत " ( प्रभाकर २२६ ).

मिसल्बन्दी; मिसळ–बन्दी ( स्त्री० ) कामवांटणी व व्यवस्था; दर्जेबन्दी. "कमठाण्यास आपआपले डेरे दाण्डे पाठवून मिसल्बन्दीनें उतरणें " ( राजवाडे ७।१८० ). "असा बेत ठरून मिसल्बन्दी झाली " ( खरे ८।४४०३ ).

मिसाल ( स्त्री० ) [ अ० मिसाल् ] हुकूम–नामा; आज्ञापत्र. "तालीक लिहून घेऊन असल मिसाल परतून दीजे " ( राजवाडे १५।१३६ ). "ठाणेची मिसेली सादीर करणें " ( राजवाडे १५। १३६ ).

मिल्कत; मिळखत् ( स्त्री० ) [ अ० मिल्कत् ] मालमत्ता; इस्टेट.

मीर ( पु० ) [ फा० मीर् ∠ अ० अमीर् ] सर्दार.

मीर–अदल ( पु० ) [ फा० मीर्–इ–अदूल् ] न्यायाधीश. "मशार्निल्हे यास व मोहोतसीब सदर्हू महालाचा मज्बूद जाणून " ( वाड–सनदा ८२ ).

मीर–पीर ( पु० ) थोर अनुभवीक स्वतंत्र अधिकारी; बडा. "सारांश फौजेंत ताळ नाहीं. सारेच मीर–पीर आहेत " ( खरे ५।२३८० ).

मीर–शिकार ( पु० ) [ फा० मीर्–इ–शिकार् ] शिकार–अम्मलदार. "मीरशिकार पांखरें धरून आणावयास पाठविले असेत " ( पारसनीस–ब्रप ११८ ).

मी–रसानद [ फा० मीरसानद् ] तो प्रविष्ट करितो. "अर्ज़ मी रसानद की " = तो अर्ज़ प्रविष्ट करितो कीं.

मुकब्बरा; मुकरबा ( पु० ) [ अ० मुकब्बरा ] समाधिमन्दिर. "खानखानाचा मुकबा सङ्गम्–खरी होता तो फिरङ्ग्यास विकला " ( दिमरा १।१०५ ).

मुक्रर [ अ० मुकर्रर् ] निश्चित; नक्की; नियोजित. "यास जनेली तमामी फौजेची माफक–हुकूम–विलायत मुक्रर जाली आहे " ( पद्मव ११५ ).

मुक्रर [ अ० मुकर्रर् ] पुनः पुन्हा. "मुक्रर ल्याहावें याची हाजत नाहीं " ( सानेपयाव ४७६ ).

मुक्ररा ( पु० ) [ अ० मुकर्ररा ] ठराविक रक्कम; सारा. "बाकी आबाद देह मुक्ररा रु. १८० " ( राजवाडे १५। ९३ ).

मुक्काम ( पु० ) [ अ० मुकाम् ] राहण्याचें ठिकाण; बिऱ्हाड; वस्ती.

मुक्कामात; मुकामात ( स्त्री० ) [ अ० मुकामत् ] वस्ती; राहणूक "शहरच्या पूर्वेस चारा आहे तेथेंच मुकामात करावी " ( राजवाडे १।१५६ ) "तेथेंच मुक्कामात करून असावें असें साङ्गून पाठविलें " ( राजवाडे ५।२०१ ).

मुक्सूद ( न० ) [ अ० मक्सूद् ] विनन्ती–अर्ज़ ( राजवाडे ८।१२९ ).

मुकद्दम; मुकादम; मोकदम ( पु० ) [ अ० मुकद्दम् ] पुढारी; मजुरांवर देखरेख करणारा.

मुकद्दमा; मोकदमा ( पु० ) [ अ० मुकद्दमा ] प्रकरण; खटला. "नबाब गुरगुटे यांचा मोकदमा फैसल करून " ( खरे ११९४ ).

**मुकद्दर** [अ० मुकद्दर = ईश्वर–नियोजित] नामजाद; नियोजित; कायम. "श्रीमन्तांकडील तालकूदार व आबाजी कृष्ण या कामावर मुकद्दर असोन कोणीही मुज़ाहीमत त्यास न जाले" (राजवाडे ५।१९७).

**मुकय्यद** [अ० मुकय्यद्] कायम. "या कामावर मुकय्यद राहून" (साने–पयाव ४६८).

**मुकाबिले; मुकाबील** [फा० मुकाबिली] समोर. "या लढाईंत याचा दम बरा जिरला जे पुन्हा नबाब बहादुराचे मुकाबिले उभे न रहात" (चिरा १९) "तेव्हां त्याशी मुकाबील होऊन... मारगिरी केली" (साने–पयाव ४८०).

**मुकाबला; मोकाबला** (पु०) [अ० मुकाबला] गांठ; सामना; लढाई; रोख; शोध; तुलना; रुजवात. "धोंशा व भोंसले यांसही दूर आहेत तोंच मुकाबला देऊन मागें सारावें" (खरे ५। २०९५) "हल्ली हैदराबादेहून नबाबाचीं चार कुचें टिपूच्या मोकाबल्यावर जाहलीं अशीं डाकेचीं पत्रें आलीं" (खरे ८।४३२५). "राजश्री गोपाळराव यांस श्रीमन्तांनीं साङ्गितलें कीं हैदर नाईक कोठें आहे त्याचा मुकाबला मात्र घेणें" (खरे ८०४). "तो मस्विदा लाडाकडून साता दफेची याद आली त्यासी यांनीं मुकाबिला करून कम–ज्याद निवडुन काढिलें" (राजवाडे ७।९५). "हें लटकें तुफान, तर तुम्ही मुकाबला करून याल?" (मदबा २।३२).

**मुकेस** (पु०) [अ० मुकय्यस्] ज़र्तारी; भर्जरी.

**मुख्तसर** [अ० मुख्तसर्] संक्षिप्त. "मुख्तसर फर्द ठरावयाची सबब काय?" (राजवाडे ७।३).

**मुख्तार; मुख्त्यार** (पु०) [अ० मुख्तार्] नियोजित; अधिकृत; सर्वाधिकारी; प्रतिनिधी. "मुख्तार" (दिमरा १।७१). "मुख्तारी" (दिमरा २।५४).

**मुख्त्यार–नामा** (पु०) अधिकार पत्र.

**मुख्तारी** (स्त्री०) [फा० मुख्तारी] अख्त्यार; अधिकार. "या प्रमाणें मुख्तारीचें अहकाम आणून दिले" (चिरा २४).

**मुखालीफ** (पु०) [अ० मुखालिफ्] वैरी; शत्रू; विरुद्ध. "बाज़े फौज़ाही मुखालिफाचे मोकाविल्यास नमूद होतील" (साने–पयाव ४६४). "मुखालीफ पक्षे शहास गुन्तता" (खरे ८।४३५१). "समुद्रांतील टोपीवाले तुम्हांसी मुखालीफ होऊन आम्हांसी स्नेह करावयास येतील त्यांसी आम्ही सलूख करणार नाही" (ऐटि २।७४).

**मुखालिफत** (स्त्री०) [अ० मुखालफत्] वैर; दावा. "सर्कशा व मुखालिफत" (खरे ७।३५६५). "या दोन्ही बाबती फरामोश करून आमची मुखालिफत कबूल कराल तरी बाद या मोहिमेचे आम्हांस कर्नाटक पायां घाट जवळ असे" (चिरा २३).

**मुचल्का; मुचलका** (पु०) [तु० मुचल्का] वचनपत्र; हमीपत्र; करार–नामा; कतबा. "गोळेजवळून मुचल्का श्रीपतराव यांची बस्तवानी आपले जवळ असल्यास गुन्हेगार असा घेतला" (खरे९। ५०२०). "म्हणोन धनजीचा भाऊ रयतास धरून मुचल्के घेताती" (राजवाडे १५।४).

**मुज़्कर** [ अ० मुझ्किर् ] आठवण करून देणारा. "श्रीमन्तांकडून आठ फर्दा मुज़्कर होऊन आल्या" ( राजवाडे ७। १८३ ).

**मुज़्मला** [ अ० मुज्मलन् ] संक्षेपानें; संक्षिप्त; मुख्तसर. "येक वेळ मुज़्मिला फर्द आली" ( राजवाडे ७।८२ ).

**मुज़्रत; मुज़्रद** [ अ० मुजर्रद् ] प्रसङ्ग-विशेषीं नियोजित; मुद्दाम नेमलेला; स्पेशल; खास. "तुम्हांकडील अलीकडे वर्तमान कळत नाही याजकरितां मुज़्रद मुतर–स्वार पाठविला आहे" ( खरे ८। ३८४५ ). "आज्ञेचा अर्थ निकडीचा जाणोन येथोन मुज़्रद महागिरी...पाठविली आहे त्वरेनें यावें म्हणोन लिहिलें असे" ( साने–पयाव ६७ ).

**मुज़्रा मुजरा;** ( पु० ) [ अ० मुज्रा=रूढ ] सलाम; वन्दन.

**मुजय्यन** [ अ० मुझय्यन् ] अलङ्कृत ( पेअ ६१ ).

**मुज़ाईक** [ अ० मुझाइक् ] प्रतिबन्ध करणारा; मुज़ाहीम. "आपले वतनास मुज़ाईक होऊन" ( वाड–बाबा २। ६४ ).

**मुज़ाका** ( स्त्री० ) [ अ०मुझायका ] अडचण; हर्कत; पर्वा; प्रतिष्ठा. "मुज़ाका नाहीं, तन्हा यावयाचें करावें" ( राजवाडे ५।२५ ). "हिशेबीं जें जिकडे अधिक उणें निघेल तें घ्यावें; मुज़ाका नाहीं" ( राजवाडे ५।३२ ). "हे फौज् आलियाची काय मुज़ाका आहे !" ( मराचिस २२ ). "त्यांची मुज़ाका न धरितां" ( इम ३९ ).

**मुज़ारत; मुदारत** ( स्त्री० ) [ अ० मुदारत् ] आर्जव; मनधरणी; सम्भावना. "गङ्गा-विष्णूची मुज़ारद करावी; ज्या तऱ्हेनें तो मन घालून औषधी उपाय करून बरें करी ती करावी" ( खरे ४।१९८४ ). "भाऊसाहेबीं बहुतांशीं मुज़ारत करून बोली उत्तम प्रकारें केली" ( भाकै ४ ).

**मुज़ारियान** [ फा० मुझारिआन् ∠ अ० मुझारिअ ] शेतकरी; खेडूत. "रिआया व मुज़ारियान पर्गणे चाकण" ( राजवाडे ६।१५३ ).

**मुज़ावर** ( पु० ) [ अ० मुजाविर् ] मशिदीचा नोकर.

**मुज़ावरकी** ( स्त्री० ) मुज़ावराची वृत्ती ( राजवाडे १५।२६ ).

**मुज़ाहीम** [ अ० मुझाहिम् ] प्रतिबन्ध करणारा; हर्कत करणारा. "नरसोजी आपला मुद्दाई दावा करून मारून काढील त्यास मुज़ाहीम तुम्ही न होणें" ( राजवाडे १५।११७ ). "सर्कारचे गृहस्थ महायात्रेस आले आहेत; तर यांसी कोणी मुज़ाहेम न होणें" ( खरे ७।३६९९ ).

**मुज़ाहिमत** ( स्त्री० ) [ अ० मुझाहमत् ] प्रतिबन्ध; हर्कत; अडथळा; मुज़ाहीम. "टिपू सुल्तान कर्नूलकरास पेश्कशीचा तगादा करितील त्यास मुज़ाहिमत नव्हती" ( राजवाडे ७।३५ ). "श्रीमन्तांकडील तालूकदार व आबाजीकृष्ण या कामावर मुकद्दर असोन कोणीही मुज़ाहिमत त्यास न जाले" ( राजवाडे ५।१९७ ).

**मुज़ूम्दार** ( पु० ) मज्मूदार पहा.

**मुज़ेरी** [ ∠ अ० मुझारिअ=शेतकरी ] खेडूत; कुणबी. "समस्त मुज़ेरी प्रजा" ( राजवाडे १५।१२८ ).

**मुड्दा; मुर्दा** (पु०) [फा० मुर्दा=मृत] प्रेत. – चा मुड्दा पाडणें=ला ठार मारणें.

**मुड्दे-फरास** (पु०)[फा० मुर्दा-फरोश्= प्रेतवाहकांची एक ज़ात] प्रेतवाहक.

**मुत्खसर** मुख्तसर; संक्षिप्त. "माझे नांवें दोन वेळां दोन आज्ञापत्रें मुत्खसर सादर जालींत" (राजवाडे १।२२५).

**मुत्पाक; मुत्बख; मुद्पाक-खाना** (पु०) [अ० मत्बख्] सैंपाकघर. "भात मुद्पाख कोठीकडे केली मापें ८१" (राजवाडे ६।३९४).

**मुत्लक** [अ० मुत्लक्] कुल-अख्त्यारी; सर्वथैव. "मुत्लक वकील" (चित्रगुप्त ४०). "शाह नवाज़खान याची मुत्लक-वकिली तगीर करून बसालतजङ्गास साङ्गितली" (राजवाडे ३। २०९). "जयाजी तर मुत्लख नामुराद् आहे" (राजवाडे ६।६१७).

**मुत्सद्दी; मुत्सदी** (पु०) [अ० मुतसद्दी= कार्यकारी] राजकारणी; राजकार्य धुरन्धर; धोरणी; धूर्त; कारस्थानी. "सर्कारचे मुतसदी रात्रन्दिवस नालिशी करितात" (राजवाडे २२।१०४).

**मुत्सद्दी-गिरी** (स्त्री०) [फा० मुतसद्दीगरी] राजकारणपटुता; धूर्तता.

**मुतआकीब** [अ० मुतआकिब्] पाठलागास; पाठोपाठ; लागोपाठ. "सर्दार जङ्गी सामान घेऊन मुतआकीब येत आहे" (राजवाडे १०।१९१) "अव्वल कांहीं फौज़-रवानगी त्या रुखें करून मुतआकीब आपणही इड्न्यजी पल्टणीचे मुकाबल्यास गेले आहेत" (राजवाडे १०।१९२).

**मुतफर्कात** [अ० मुतफर्रिकात्] वरकड; बाजे; किरकोळ. "मुतफर्कात जागीर्दार" (राजवाडे ७।७७).

**मुतफीक** [अ० मुत्तफिक्] सामील; शरीक (राजवाडे १०।१०६).

**मुतबन्ना** [अ० मुतबन्ना] दत्तक. "सो ला-वलद् लेकीन् हिले-हयात असतां मुतबन्ना पुत्र घेतला" (राजवाडे २२। १०३).

**मुतमरीद** [अ० मुतमर्रिद्] बण्डखोर (पे अ ५९).

**मुतवज़्ज़े; मुतवज़े** [अ० मुतज्जिह्] जाता; गमनकर्ता; वळलेला; उद्युक्त. "होळकर मातबर सर्दार ...फौज़सुद्धां मस्लतीवर मुतवज़े केले पाहिजेत" (सानेपयाव २२५). "साल मज़्कुरींही तिकडेच मुतवज़े झाले" (राजवाडे१। ६१). "तदनन्तर आणखी कामास मुतवजे व्हावें" (राजवाडे ११५६). "अशा कार्यावर मुतवज़ेह व्हावें" (राजवाडे ५।७६). "पातशाहाची मर्जी सर्व प्रकारें पाटील बावाकडे मुतवज़े आहे" (राजवाडे १२।३३).

**मुतवातीर** [अ०मुतवातिर्] पुनःपुन्हा; पैदर्पै. "मुतवातीर लढाया अमलांत येतात" (साने-पयाव ४७९).

**मुतसील** [अ० मुत्तसिल्] जोडलेला; ताब्यांतील; कबजा; ताबा. "तर्फेंन मुतसील महालचे वतन्दारी वगैरे इन्साफ सुदामत प्रमाणें होत जावे" (वाड-मा १।२२३). "जन्जिरे याचे मुतसिलांत चालोन" (वाड-मा १।२२३).

**मुताबत** (स्त्री०) [अ० मुताबअत्] अनुयय; बजावणी. "तेथून जो अहकाम पोहोंचेल त्याची मुताबत असावी" (भा-ऐपयाव १८).

**मुताबीक** [अ० मुताबिक़्] प्रमाणें. 'सन ११०५ फस्ली मुताबीक सन ३९ जलूस वाला "

**मुतालकी** (स्त्री०) नायबत; मुतालिकाचें काम.

**मुतालीक** [अ० मुतअल्लिक़्] सम्बन्धी; उपमन्त्री; नायब.

**मुतैन-रवा** [अ० मुतआय्यिन=निश्चित+फा० रवान् चालू ] नेमलेलें व चालू. "आपणास इनाम ..कार्किर्दी दर कार्किर्दी मोकासियानी माजी मुतैन-रवा अस्त (आहे)" (राजवाडे १५। १४५)

**मुद्दई** (पु०) [अ० मुद्दई] हक्कसाङ्गणारा; दावेदार. "मुद्दई यांसी हातीं धरून गोतामध्यें उभे रहा म्हणत असतां गोतामध्यें उभे न राहिले" (भाइसम १८३५ वाइ ३४७).

**मुद्दई-इलै** [अ० मुद्दआ-इलैह्] आरोपी. "हर्दो मुद्दई व मुद्दई-ईल" (वाड-सनदा ३२).

**मुद्दई-गिरी** (स्त्री०) हक्कसाङ्गणी; दावेदारी. "मौजे शिरगांव येथें भाऊसाहेबांकडील तोफा दोन होत्या त्यांची मुद्दईगिरी गदल्गेकरांनीं केली" (खरे ११।६१४०).

**मुद्दा** (पु०) [अ० मुद्दआ] मत्लब; हेतु; अट; आरोप. "जे काय दीलचे मुद्दा असेल ते कबूल" (भाइसम-द्विसवृ १७९). "याजकडे खुनाचा मुद्दा लागला" (वाड-बावा २।५०).

**मुद्दा-मक्सूद** (पु०) हेतू; विनन्ती. "यांनीं कागद लेहून आपला मुद्दा-मक्सूद पाठविला जे" (राजवाडे १७। ३३).

**मुद्दाम** [अ० अम्दन्] बुध्द्या; जाणून बुजुन; हट्टाणें; खास.

**मुद्दे-नज़र** (स्त्री०) [फा० मद्द्-नज़र: दृष्टि-कक्षा] लक्ष्य. "त्याजवर मुद्दे नज़र देऊन" (खरे ७।३५६४). मद्-नज़र पहा.

**मुद्दे-माफक** इच्छेनुसार. "सत्वर फौजे सहवर्तमान येऊन मुलाज़मत करीत त्यांचे मुद्द माफीक सर्व होऊन जाईल" (राजवाडे ८।२०७). "तुमच्या मुद्द्यामाफक करूं" (समासद ३९).

**मुद्दे-वार** मागणीवर "चाकर असतां रोज़-मुरे न घेतां गैरशिस्त मुद्देवार ज़ाब घालू लागले" (होकै १३).

**मुद्देसूद** प्रमाणशुद्ध, मुध्यास धरून.

**मुद्बख्या**(पु०) सैंपाकी; आचारी. "त्यांत परकी माणूस बातमी पोहोंचविण्यासारसें याचे बातमीदारांत मुद्बख्याशिवाय दुसरें कोणी नव्हतें" (राजवाडे ६। ५०९).

**मुदत** (स्त्री०) [अ० मुद्दत्] वेळ.

**मुदाई** (पु०) [अ० मुदाई] दावेदार; शत्रू (राजवाडे १५।११७).

**मुदाम** [अ० मुदाम्] सतत. "मुदाम चौदा रोज़ शहरामधें सोदासोदी केले" (इम)

**मुदामी** नेहमीचा; जुना (दिमरा १।२९).

**मुदारात; मुदारत; मुज़ारत** (स्त्री०) [अ० मुदारात्] सम्भावना; बर्दास्त. "भाऊसाहेबीं बहुतांशी मुज़ारत करून बोली उत्तम प्रकारें केली" (भाकै ४). "त्यास मोगली पोशाग मये दुशला व सिर्पेच या प्रमाणें मुदारात केली (राजवाडे ७।३७). "केवळ साङ्गण्यावरूनच मुदारत फलाण्याचा

नातू म्हणोन करावयाची नाहीं " ( खरे ९।४७६६ ).

**मुन्कीर** ( पु० ) [ अ० मुन्किर् ] इन्कार करणारा; नाकबूल करणारा ( राजवाडे २०।६५ ).

**मुन्शी** ( पु० ) [ अ० मुन्शी ] फार्शी पत्रव्यवहार करणारा; पारसनीस.

**मुन्शीगिरी** ( स्त्री० ) पारसनिशी.

**मुन्सफ** [ अ० मुन्सिफ् ] न्यायी, न्याय-धीश. " इङ्ग्रजी इन्साफी, त्यांचे येरव्यारी हेही मुन्सफ असतील " ( खरे ७।३५७० ).

**मुन्सफी; मुन्सिफी** ( स्त्री० ) न्यायनिवाडा. " काय गैर-माकूल कार्भार होईल त्याची मुन्सिफी साहेबीं करावी " ( राजवाडे ८।१० ).

**मुनका** ( पु० ) [ अ० मुनक्का ] साफ; फैसला. " एक महिन्याचा करार कीं ज़ाब-सालाचा मुनका करून यावें " ( राजवाडे २२।६३ ). " बहालीच्या सनदा होतील ते समयीं नज़राणा वगैरे ज़ाब-साल अवल मुनका करून मग सनदा द्यावयाच्या " ( राजवाडे ७।७३ ).

**मुना** ( पु० ) [ अ० मुआयना ] नज़रानज़र; मुकाबला. " ऐन लढाईच्या मुन्यास सर्कारकामावर नीळकंठराव दिवङ्गत झाले " ( खरे ४।१७९८ ).

**मुनादी** ( स्त्री० ) [ अ० मुनादी ] दवण्डी. " आपले शहरांत सलुखाची मुनादी देऊन " ( खरे ७।३५६९ ).

**मुनाफा** ( पु० ) [ अ० मुनाफआ-मन्फआ ] नफा; फायदा.

**मुनासब** [ अ० मुनासिब् ] उचित; योग्य; रास्त.

**मुनीम** ( पु ) [ अ० मुनीब् ] गुमास्ता; व्यापाऱ्याचा प्रतिनिधी.

**मुफ्ती** ( पु० ) [ अ० मुफ्ती ] फत्वा देणारा; बडा काजी.

**मुफ्ती-गिरी** ( स्त्री० ) न्यायाधिशी ( वाङ्मा २।१०६ ).

**मुफसद** ( पु० ) [ अ० मुफ्सिद् ] पुण्ड; बखेडेखोर. " असा बन्दोबस्त राखावा कीं कोणीही मुफसद बादशाही मुलखांत बण्ड न करूं शके " ( राजवाडे ८।१०९ ).

**मुफसल; मुफशील** [ अ० मुफस्सल् ] सविस्तर. " आं साहेबांनीं मुफसल मर्कूम केलें तें जाहीर जालें " ( साने-पयाव ४८४ ). " कलमी केला मतालीब मुफशील जाहिरीस पोहोंचला " ( साने-पयाव ३८४ ).

**मुफाइज़ा** ( पु० ) [ अ० मुफावज़ा ] कृपापत्र; इनायत-नामा. " मुफाइज़ा इब्लाग केला तो उसूल जाहला " ( राजवाडे १०।१२७ ).

**मुफासला** ( पु० ) [ अ० मुफासला ] अन्तर; तफावत. " आपले फौजेसी व राजाच्या फौजेसी सोळां कोसांचा मुफासला आहे " ( दिमरा २।१६३ ). " चाळीस कोसांचा मुफासला आहे" (चिरा ५०).

**मुफीद** [ अ० मुफीद ] हितकर; फायदेशीर. " ती सला दोन्ही उभ्या दौलतींच्या तक्वियतेस नेक व मुफीद आहे " ( राजवाडे १०।२७८ ).

**मुब्लक; मब्लग** [ अ० मब्लघ् मोठी रक्कम ] पुष्कळ; विपुल. " मब्लग मत्ता पाडाव केले " ( सभासद १९ ).

**मुबा** [ अ० मुबाह्=विहित ] बक्षीस; दत्त. " तरी तुमची वस्तभाव सुतळीचा तोडा आदिकरून जी स्वामींनीं दिली आहे, ती मुबा केली असे " ( पारसनीस-ब्रच १२५ ).

**मुबादला; मोबादला** [ अ० मुबादला=बदला ] ऐवजी, बदली. " हाली महाराज कृपाळू होऊन मोबादला मुर्तजाबादचें वतन तुम्हांस देऊन चालविलें " ( राजवाडे ६।१३१ ). " किनवीचे मुबादला दुसरा येणार तो अद्याप आला नाहीं. " ( राजवाडे ७।१२९ ).

**मुबारक** [ अ० मुबारक् ] शुभ; मङ्गलदायी. मुबारक करणें=इनाम देणें. " शिर्के यांशी गांव व महाल मुबारक करून त्यांची कन्या महाराजांनीं आपले पुत्रास केली " ( चित्रगुप्त ५ ).

**मुबारक-बाद; मुबरक्-बादी** ( स्त्री० ) [ फा० मुबारक् बाद्=मङ्गलदायक असो ] अभिनन्दन. " सलाबत्-जङ्गास मुबारकबाद दिली " ( राजवाडे ३।३४६ ). " किल्ले मज्कूर फत्ते केलियावर मुबारक्-बन्दीची ( ! ) पत्रें पाठविलीं " ( राजवाडे ११।३१ ). " माधवराव साहेब यांची शादी झाली; आमचे तर्फेनें मुबारख-बाजी करावी म्हणोन मुसा मुन्तीण यांस लिहिलें आहे " ( साने पयाव १९८ ).

**मुबारकी** ( स्त्री० ) [ फा० मुबारकी ] अभिनन्दन; खुशाली. " चार घटका मुबारकीच्या नज़रा जाल्या " ( खरे ९। ४६२५ ).

**मुभा** ( स्त्री० ) [ अ० मुबाह् = विहित ] कायदेशीर; माफ; परवानगी. " पठाणास कोणे फिराविले, हे इन्साफ करितील तर आमचाच मुभा होईल " ( राजवाडे ६।६१९ ). " मुलूख घेतला आहे तो तुम्हांस मुभा आहे " ( भाकै ६ ).

**मुर्गी** ( स्त्री० ) [ फा० मुर्ग़ =पक्षी ] कोम्बडी. " मुर्गीस बिस्मिल्ला तो कशास ? " ( होकै ११ ).

**मुर्चा** ( पु० ) मोर्चा. " राजश्री पन्तप्रधान व चिरञ्जीव पिलाजी व मोंगल भाऊ ऐसें हिङ्गणगांवावरी येऊन मुर्चे लाविले आहेत " ( पारसनीस-ब्रप १९२ ).

**मुर्दा** ( पु० ) [ फा० मुर्दा ] मृत; प्रेत शव. " तुरकां दहा हज़ार माणूस मुर्दा जहालें " ( सभासद ५८ ).

**मुर्दाड; मुर्दार** [ फा० मुर्दार् ] मृतवत्; भ्याड; कवडीमोल; विधिपूर्वक न मारलेलें. " देण्यानें परिछिन्न झुन्जावें हेच हिम्मत देऊन कार्भारी यास मुर्दाड केलें " ( खरे २।४८२ ). " परन्तु खालीं उतरतांच राजा पळून जाईल, अगर आम्ही मागती राजास हातीं धरून आणल्यास मुर्दाड करितील हा संशय मानून सङ्कटांत आहेत " ( साने पयाव ३२२ ). " मुलानानें फात्या न दिला तर बकरें मुर्दाड रहातें म्हणजे तें हलाल होत नाहीं " ( गांवगाडा १०३ ).

**मुर्देफरास** प्रेतवाहक; मुड्देफरास पहा.

**मुर्वत** ( स्त्री० ) [ अ० मुरूवत् ] माणूसकी, सभ्यता, भीड, पर्वा, अब्रू. " पुढील आशा दाखविली असतां लोक मुर्वतीवरून राहतात " ( खरे १०। ५६०७ ). " दर्बारीं कोणाची मुर्वत -अब्रू तिळमात्र राहिली नाहीं " ( राजवाडे १।२२८ ).

**मुर्वत-शारी** [ फा० मुरूवत्-शिआर् ] माणूसकीनें युक्त ( राजवाडे १५। २५० ).

**मुरक्का** ( पु० ) [ अ० मुरक्कअ ] चित्रपुस्तक; आल्बम. " तस्बिरांचे मुरक्के दोन चार आले " ( ऐटि ३। ५९ ). शिवाय ( ऐटि १।१३ ).

**मुरब्बा; मुरम्बा; मोरम्बा** ( पु० ) [ अ० मुरब्बा ] पाक; आम्रपाक.

**मुरब्बी** ( पु० ) [ अ० मुरब्बी ] कैवारी; आश्रयदाता, अनुभवीक; वस्ताद; मुरलेला; कारबील. " तुम्ही मुरब्बी होऊन आलपेष्टग यासी बोलावें " ( मदरू २।३१ ). " आपण आमचे मुरब्बी दोस्त, आमचें जेणें करून चाङ्गलें तें इच्छिणारे " ( भाइसम १८३८ अहवाल ५). " दौलतींत मुरबी अमीर कोणी राहिला नाही " ( पाब ८ ). " ऐसेंही असतां मुरबी मातबर पाहिजे" ( राजवाडे ८।२०२ ). " ते मुरब्बी आहेत " ( राजवाडे ८।२०५ ) "

**मुरणें** [ ∠अ० मुरब्बा ] ( रसांत ) पक्क होणें; पाकणें.

**मुरस्सा** [ अ० मुरस्सा ] रत्नजडीत. " शिर्पेच मुरसा " ( राजवाडे १। १८८ ).

**मुराद** [ अ० मुराद् ] इच्छा; इच्छेप्रमाणें. " हस्तनापूरचा बन्दोबस्त हातास आला म्हणजे मुराद सर्व गोष्टी व मन्सबा हासल होईल ऐसें आहे " ( राजवाडे ८।२०३ ). मनमुराद = यथेच्छ.

**मुरीद** [ अ० मुरीद्] चेला; शिष्य. " गोविन्दगीर मुरीद कमलनयन " ( राजवाडे १५।१३४ ).

**मुल्कात** ( स्त्री० ) प्रान्त; विलायत. " हे कर्दीम मुल्कात देणें " ( इम ६६ ).

**मुल्की** [ फा० मुल्की ] वसुलासम्बन्धी, गैर-फौजदारी.

**मुल्कीर** [ फा० मुन्किर् ] नाकबूल; मुन्कीर. " तो मुल्कीर जाला कीं इतला नाहीं. " ( राजवाडे १।१९९ ).

**मुल्जीम** [ अ० मुल्ज़म् ] लाचार; मज़्बूर. " ऐसें पष्टवादें पुसतां मुल्जीम होऊन आपल्या मुखें एकार केला " ( राजवाडे २०।६५ ).

**मुल्तवी** [ अ० मुल्तवी ] तहकूब; पुढें ढकलला गेलेला. " हा ज़ाब-साल मुल्तवी राहिला " ( राजवाडे ७।३५ ).

**मुल्ला** ( पु० ) [ फा० मुल्ला ] मुसल्मानांचा गुरू.

**मुल्ला-गिरी** ( स्त्री० ) मुलाण्याला मिळणारें वेतन.

**मुलाणा; मुलाना** [ अ० मौलाना ] धर्मगुरूची पदवी. " मुसल्मानाचे पाऊल हिन्दुस्तानांस पडण्या पूर्वी गुरें मारण्याचें काम हिन्दू खाटीक करीत. मुसल्मान दृष्टीस पडल्याबरोबर त्यांनीं तें सोडिलें; आणि मुसल्मान खाटिकांना मुलाना हा किताब देऊन बकरें लावण्याचें काम त्यांच्या गळ्यांत अडकविलें " ( गांवगाडा २४ ).

**मुलाखत; मुलाकत; मुलाकात** ( स्त्री० ) [ अ० मुलाकात् ] भेट; गांठ; मुलाज़मत.

**मुलाज़मत** ( स्त्री० ) [ अ० मुलाज़मत् ] भेट; हुज़ूर-नौकरी; नौकरी.

**मुलाज़ा; मुलाइज़ा; मुलाहिज़ा** ( पु० ) [ अ० मुलाहज़ा ] पर्वा; विचार; मान; दुर्लक्ष्य; उपेक्षा. " मुलाइज़ा न

करावा म्हणजे माणूस खबर्दार असतें " ( मराआ १६ ).

**मुलाम-गिरी** मुलाम्याची कृती; मुलाम्याचा. " सेवकास मुलामगिरी हत्यारें यांची आवड फार आहे " ( पेद्समा ५२ ).

**मुलामा** ( पु० ) [ अ० मुलम्मअ ] धातूच्या रसाचा पातळ थर दुसऱ्या धातूच्या पत्र्यावर बसविणें " मुलाम्याचें नाणें । तुका म्हणे नव्हें सोनें ".

**मुलायम; मूलाईम** [ अ० मुलायिम् ] अनुरूप; रम्य; नाज़ुक, सुकुमार. " साजणी तुझा किति नेत्र मुलायम हलतो " ( प्रभाकर २०८ ). " मुलायम उटी देऊन नटवितों " ( प्रभाकर २१४ ). " पातळ नखरेदार मुलायम फूल चौकडीचें " ( प्रभाकर ९६ ).

**मुलूख** ( पु० ) [ अ० मुल्क् ] राज्य; देश; स्वदेश. " मुसल्मानी रियासतींत ज़मिनीची पूर्ण मालकी राजानें आपल्याकडे ओढली असावी; कारण " खलक खुदाका, मुलूख पादशहाका "-याप्रमाणें लोक बोलूं लागले " ( गांवगाडा ९ ).

**मुलूख-गिरी** ( स्त्री० ) [ फा० मुल्कगीरी ] देशपादाक्रमण; मोहीम.

**मुलूखदार** [ फा० मुल्क्-दार् ] दौलत्वन्त. " पातशाहाचे घरची मुख्त्यारी व मुलूकदार करून असावें " ( दिमरा ११२२६ ).

**मुलूखदारी** ( स्त्री० ) [ फा० मुल्कदारी ] राज्यव्यवस्था.

**मुलूख-मैदान; मलिक-मैदान** ( स्त्री० ) रण-राज; विजापूर येथील सुप्रसिद्ध तोफ, जिच्या तोण्डाचा व्यास ४ फूट ८ इन्च आहे व पोकळीचा व्यास २ फूट ४ इन्च आहे; कर्दनकाळ भाण्डखोर स्त्री.

**मुश्क** ( पु० ) [ फा० मुश्क् ] कस्तूरी.

**मुश्कस** [ अ० मुशख्खस् ] निश्चित. " एक तह मुश्कस करून...दिला पाहिजे " ( राजवाडे १५।३६९ ). " जमाबेरजी मुश्कस करणें म्हणून रजा फर्माविली " ( राजवाडे १८।४९ ).

**मुश्किली** ( स्त्री० ) [ फा० मुश्किली ] अडचण; सङ्कट. " तब्दिरीच्या मुश्किलींत येऊन मन्सब्याकरितां मम्मईस आले " ( साने-पयाव ४७३ ). " पल्टणें...बहुत मुश्किलीनें गाडर याजपासीं जाऊन पोहचलों " ( दिमरा ११३८ ).

**मुश्कील** [ अ० मुश्किल् ] कठिण; दुर्घट; ( स्त्री० ), सङ्कट. " लश्करांत फिरावयाची मोठी मुश्कील; जागां जागां चौकी पहारे वाज़्पूस होते " ( ऐटि ३।५० ).

**मुश्फक; मुश्फीक** [ अ० मुश्फिक् ] कृपाळू, मेहेरबान.

**मुशज़र** [ मुशज्जर ] वेलबुट्टीचें काम केलेलं रेशमी कापड.

**मुशाफर** ( पु० ) [ अ० मुसाफिर् ] प्रवासी; सफर करणारा; फिरस्ता.

**मुशाफरी** ( स्त्री० ) [ फा० मुसाफिरी ] प्रवास; प्रवासीपण. " मुशाफरींत वय न्यावें; नित्य नवें उदक व नवें स्थळ व डेरियाची सावली अनुभवावी " ( साने-पयाव ४३७ ).

**मुशारा; मुशाहिरा** ( पु० ) [ अ० मुशाहरा ] मासिक ( पगार ); दर्माह. " कार्कुनाचें मुशारे देतां थकलों " ( दिमरा १।१३ ).

मुस्तक्बील [ अ० मुस्तक्बिल् ] भावी; भविष्यकाळीं मिळणारी ( रक्कम ).

मुस्तकिमी (स्त्री०) [ ८ अ० मुस्तकीम् ] मज़्बुती. " वरकड दर्वाज़े बन्द करून आपले मुस्तकिमींत आहेत " ( मद्या १।७९ ).

मुस्तकीम [ अ० मुस्तकीम् ] कायम; निश्चित; भक्कम. " याचा नकशा मुस्तकीम ठरून मग जावें " ( राजवाडे ७।१२ ). "कोणी आंब टाकिला नाहीं; मुस्तकीम आहे" ( राजवाडे १०।७४ ). " चौकी मुस्तकीम करून राहिले " ( खरे १७९७ ). " यांची इङ्गग्रज़ावर ज़ाण्याची सर्व तयारी मुस्तकीम " ( राजवाडे १९।५१ ).

मुस्तेद [ अ० मुस्तइद्द् ] सिद्ध; तयार; भक्कम. " गडाची इमारत मुस्तेद करावी" (मराआ ३३). " चुना मुस्तेद करावया ... धोण्डे ... मुस्तेद केले " ( चित्रगुप्त १३३ ).

मुस्तेदी (स्त्री०) तयारी; सिद्धता; मज़्बुती.

मुस्लीम [ अ० मुस्लिम् ] मुसल्मान.

मुसन्ना [ अ० मुसन्ना ] दुहेरी नक्कल. " पेशजी पत्र दिल्हें होतें तें गैरविल्हे लागलें सबब हाली मुसन्ना सनद हे दिली आहे " ( राजवाडे १३।१६५ ). " एक मज़्कुराचे दोन कागद त्यास मुसन्ना म्हणतात " ( पदमव १०० ).

मुसल्मान [ फा० मुसुल्मान् ] इस्लाम धर्मानुयायी.

मुसल्मानी ( स्त्री० ) [ फा० मुसुल्मानी ] इस्लाम धर्म; इस्लाम–सत्ता. " हज़रतानीं दीनचा पक्ष सोडून मऱ्हाठियांचा पक्ष धरिला आहे हे गोष्ट मुसल्मानीस ठीक नाहीं " ( दिमरा १।२६७ ).

मुसव्वर [ अ० मुसव्विर् ] चितारी " तेथें मालिटाकडून मुसव्वर आला होता " ( खरे ९।४७१८ ).

मुसव्वरी ( स्त्री० ) [ फा० मुसव्विरी ] चित्रकाम. " एक कांहींसी मुसव्वरी करितो" (ऐटि १।१४ ).

मुसाहेब (पु०) [ अ० मुसाहिब् ] सोबती; स्नेही. "बाजद्–अलीखां दिवाण निजाम अलीचा फार मुसाहेब " ( राजवाडे १।१६५ ).

मुहीम ( स्त्री० ) मोहीम. " जेव्हां स्वामी लाहोरचे मुहिमेवर होते " ( चन्द्रचूड–दप्तर १।८९ ).

मेख ( स्त्री० ) [ फा० मेख् ] खुण्टी; रहस्य.

मेज़ ( न० ) [ फा० मेज़् ] टेबल.

मेज़्वानी ( स्त्री० ) [ फा० मेज़्बानी ] थोर मनुष्यास दिलेलें थाटाचें जेवण; जाफत; मेहमानी; नज़राणा. " अद्वानीकराकडील वकील मेज़्वानी व वस्त्रें घेऊन आले आहेत " ( खरे ६ ३०९६ ). " मेज्मानी " ( दिमरा १।२८४ ).

मेज़्वानगी ( स्त्री० ) मेजवानी. " पांच हज़ार रुपये सर्कारांतून मेज़्वानगी पाठविली " ( खरे ९।४७४३ ). " या प्रमाणें चौतीस मेज़्वानग्या घेतल्या " ( गोखाचिशाव २५ ).

मेण ( न० ) [ फा० मोम् ] मधाच्या पोळ्यांतून निघणारा चिकट घट्ट चरबीसारखा पदार्थ.

मेण; म्यान ( न० ) [ फा० मियान् ] तर्वारीचा कोष. मेण करणें=म्यानांत घालणें; कोषित करणें. " मेण कर

आरसा सख्यांनो, गुलाल भाडूगीं नका भरूं " ( प्रभाकर १३६ ).

**मेणा** ( पु० ) [ फा० मियाना ] डोली सारखें परन्तु चारी बाजूंनीं बन्द करितां येईल असें पेटीवजा खान्यावर वाहून न्यावयाचें वाहन.

**मे बायदकी** [ फा० मी बायद् कि ] झालें पाहिजे कीं. " मे बायद् के गोविन्दगीर मशार्निल्हेसी...कालवापाणी कैसे अलाहिदा चालत होते त्याणेप्रमाणें चालविजे " ( राजवाडे १५।१४६ ).

**मेवा** ( पु० ) [ फा० मेवा ] फळ, फळफळावळ. " दुसरे दिवशीं नाना जिन्नस ( = अनेक प्रकारचा ) मेवा खरेदी करून आणविला " ( सभासद ४० ). "जङ्गी नवे नित येती मेवे बागांत " ( प्रभाकर २२९ ).

**मेवेजात** [ फा० मेवजात् अनेक व० मेवाचें ] फळफळावळ. " त्यांचे समागमें मेवेज़ातच्या बहङ्ग्या वगैरे सरन्ज़ामही रवाना करावयास तयार झाला आहे " ( राजवाडे ५।४४ ).

**मेवे-फरोश** ( पु० ) [ फा० मेवा-फरोश् ] फळविक्या. " एक्या महिन्याचे मुदतीनें मेवा न पोहंचे; मार्गांतच सडून जाईल म्हणून विलायतचे मेवेफरोशांहीं साङ्गितलें " ( ऐटि २१९५ ).

**मेहतर** [ फा० मिह्तर् ] श्रेष्ठ; झाडू; भङ्गी. " नाशीककडील भिल्लांच्या ज़ात-पाटलाला, पुण्याचे सुताराला मेहतर म्हणतात " ( गांवगाडा २९ ).

**मेहतर-पण** ( न० ) साफसुफीचें काम. " न्हावीपणाचे मेहेत्रेपण "( वाड-बाबा २१९ ).

**मेहनत; मेहनती** ( स्त्री० ) [ अ० मिह्नत् ] कष्ट; श्रम. " अन्तोजीनें मेहनती केली "( पारसनीस-ब्रच १०५ ).

**मेहनताना** ( पु० ) श्रमाचा मोबदला, मजुरी; पगार.

**मेहनती** कष्टाळू; उपयोगी.

**मेहमान** ( पु० ) [ फा० मिह्मान् ] अतिथी; पाहुणा.

**मेहमानगी** ( स्त्री० ) मेहमानी. " अलीयेदल शहानें चारी पादशाहासी मेहमानगी केली " ( इम १३ ).

**मेहमानी** ( स्त्री० ) [ फा० मिह्मानी ] मेज़्वानी, आतिथ्य; नज़राणा.

**मेहर; मेहेर** ( पु० ) [ फा० मिह्र् ] सूर्य ( देवनाथ २५५ ).

**मेहर; मेहेर** ( स्त्री० ) [ फा० मिह्र् ] कृपा; दया; कींव ( चित्रगुप्त ३४ ). " इलाहीचे हुकुमें व बडेखान यांचे मेहेर आमचे ज़ागां होती " ( पारसनीस-ब्रप ३०८ ).

**मेहेर्बान; मेहरबान** [ फ़ा० मिह्र्बान् ] कृपावन्त. " मेहेर्वान " ( राजवाडे १५।१६ ). " मेर्वान " ( वाड-शाळें १९९ ).

**मेहेर्बानगी** ( स्त्री० ) मेहेरबानी; कृपा. " आपणही हुज़ुरीहून मेहेर्बानगीचा खिलत पाठवावा " ( दिमरा ११९९ ).

**मेहेर्बानी; मेहर्बानी** ( स्त्री० ) [ फा० मिह्र्बानी ] कृपा; " मेहेरवानी " ( राजवाडे १५।१४ ).

**मेहराप; मेहरप** ( स्त्री० ) [ अ० मिह्राब् ] कमान; मशिर्दीत पश्चिम दिशेस असणारी पवित्र देवळी; हिच्याच शेजारीं मिम्बर म्हणजे व्यासपीठ असतें.

**मै** [ अ० मइ ] सह; समय.

**मै-ज़मीयत** ज़मातीसह ( साने-पयाव ४९३ ).

**मै-फर्ज़न्दान** लेंकरासह; वंशपरंपरा "इनाम मै फर्ज़न्दा मुकर असे" ( वाड-सनदा ८७ ).

**मै-फौज़** फौज़ेसह ( साने-पयाव ४९४ ).

**मैदा** ( पु० ) [ फा० मैदा ] बारीक पीठ.

**मैदान** ( न० ) [ अ० मैदान् ] उघडी, सपाट व विस्तीर्ण अशी जागा. घांडे-मैदान=मर्दुमकी, कर्तबगारी दाखविण्याची जागा.

**मैया** [ अ० मिआ ] शम्भर.

**मैयातैन** [ अ० मिअतीन ] दोनशें.

**मोआजीन; मवाजीन** ( पु० ) [ अ० मुअझ्झिन् ] मशिदीची बाङ्ग पुकारणारा. "इमामलोक व मोआजीन लोक यांची चौकशी करणें" ( वाड-सनदा ७९ ).

**मोईन** ( स्त्री० ) [ अ० मुअय्यन् ] नेमणूक, ठरावे; नियम; पगार; तैनात. "इसाकियावर मोईनप्रमाणें चौकी-पहारा न राखेच तर परिच्छिन्न दूर करावा" ( मराआ १४ ). "यांस साडी-चोळीची मोईन सालीना होन प॥ १०० एकसे रास केले असेत" ( राजवाडे १७। ४२ ).

**मोकदमा** ( पु० ) मुकद्दमा.

**मोकल** [ अ० मुवक्कल् ] स्वाधीन; ( पु० ) संरक्षक; चद्रका. "आपली कुलकर्णाची गोही घाल तरी सदर्हू पैकीयाची सोडी मोकल करीन" ( राजवाडे १८।६६ ). "आम्हांस पन्नास तोपूची मोकल देऊन गडावरी नेऊन" ( राजवाडे १८।६४ ).

**मोका** ( पु० ) [ अ० मौकअ ] सन्धी.

**मोकाबला** ( पु० ) मुकाबला.

**मोकासा** ( पु० ) [ देशज मुकासा ] मुशाफर लोकांची मालमत्ता सुरक्षित राखण्याच्या अटीवर दिलेलें गांव-इनाम.

**मोख्लीसान** [ फा० मुख्लिसान् ] स्नेही ( अनेकवचन ).

**मोगल; मोंगल** ( पु० ) [ फा० मुघोल् ] मध्य अशियांतून हिंदुस्थानांत आलेली एक ज़ात.

**मोगलाई** ( स्त्री० ) मोगल-राज्य; बेबन्दशाही; अन्धार नगरी.

**मोगली** कपटी. " ऐशियास मोगली मन्सबा; इमान देऊन आपला मत्लब साधितील " ( इम २०१ ).

**मोघम; मोहगम** [ अ० मुव्हम् ] सान्दिग्ध; अस्पष्ट. " किस्तीची शकल ठरावी ऐसें मोहगम हज़रत म्हणतात यांत काय समजावें ? " ( राजवाडे ५।१४५ ).

**मोज़बा** ( पु० ) [ अ० मुहासबा ] हिशेब.

**मोज़ा** ( पु० ) [ फा० मूज़ा ] विणीव हस्तत्राण अगर पायत्राण.

**मोजीब** [ अ० मूजिब् ] प्रमाणें.

**मोझ्या** ( पु० ) [ अ० मुवाझआ ] खलं; चर्चा; सारांश. " हा कागद साहेबीं जतण करून ठेविला पाहिजे; याचा मोझ्या होईल " ( राजवाडे १६।४६ ). " जुनीं नवीं पत्रें दाखविलीं होतीं त्यांचा मोझ्या मनास आणून " ( वाड-मा ११३४ ).

**मोत** ( न० ) [ अ० मौत् ] मरण; मोठें सङ्कट.

**मोतद्दार; मोताद्-दार** ( पु० ) [ अ० मुतअद्दिहद्=काळजी घेणारा ] घोड्याचा नोकर; साईस. " ती घोडी मोताद्-दार सुद्धां...येथें पाठविणें " ( खरे ९।५०२५ ).

**मोताद** [ अ० मुह्ताज् ] ना--दार; दरिद्री. अन्नाला मोताद=खायला नसण्या इतके दरिद्री.

**मोतादी** ( स्त्री० )[ ∠ म० मोज० + अ० त अदाद् सङ्ख्या, गणना ] मर्यादितपणा. " जवळ माणसें ठेवणें तीं मोतादीची ठेवावी; त्यांची सावधता करावी " ( मदबा २।३० ).

**मोतादी; मोहोताजी** ( स्त्री० ) [ फा० मुह्ताजी ] दुर्भिक्ष्य; अभाव; जरुरी; आवश्यकता. " पादशाही बन्दे तुम्ही सन्निध असतां पादशाहीची ही दशा होऊन कवडीस मोहोताजी व्हावी हें अपूर्व आहे " ( विमरा २।१२५ ).

**मोताना** ( पु० ) [ ∠ अ० मौत् ] लढाईत मरण पावलेल्यांच्या मुलाबाळांस देणगी ( होके १२३ ).

**मोबदला; मोबादला; मुबादला** ( पु० ) [ अ० मुबादला ] बदला; वसूल; उसनफेड; ऐवजी. " त्या आकारा बर्हुकूम दरोबस्त अम्मल-मोबादला द्यावा " ( मराचिथोशा ५३ ).

**मोम्-जामा** ( पु० ) मेण-कापड. " खर्च किरकोळ खाद्या व मोम-जामा यांस; व हुण्डणावळ अधिक लागली " ( मदबा १।२१२ ).

**मोम्-दील** मेण-हृदयी. " प्राणत्यागच केला तर नाहक दुर्निमित्य होईल यास्तव मोम्दीलही जाली " ( मदबा १।११५ ).

**मोम्-बत्ती** ( स्त्री० ) मेण-बत्ती. " झाडें मोम्बत्त्यांचीं लावणें तीं पुसून लावावीं " ( साने-पयाव २८६ ).

**मोमी इलै** [ अ० मूमा इलैह् ] मशार्निल्हे " नरसिङ्गराव मोमीइले " ( साने-पयाव ९० ).

**मोमीन** [ अ० मूमिन् ] धर्माळू; मुसल्मान कोष्टी.

**मोर्चा; मोर्चाल** ( पु० ) [ फा० मूर्चा; मूर्चाल् ] तोफा ठेवण्यासाठीं केलेला उन्चवटा; टप्पा-गुज़रा; दम्दमा; चौकी; रोख.

**मोर्तब** [ अ० मुरत्तब् ] तयार; सुव्यवस्थित; ( न० ) मोर्तब सूद ' अशी अक्षरें कोरलेला छाप मारणें. " सदर्हू प्रमाणें तुज कौल मोर्तब " ( पेद-समा २१७ ).

**मोर्तब बर्दार** ( पु० ) शिक्के-मोर्तब सम्भाळणारा.

**मोरी** ( स्त्री० ) [ फा० मूरी ] साण्डपाणी वाहून नेणारा मातीचा नळ; पाणी साण्डण्याची जागा.

**मोसबा** ( पु० ) [ अ० मुहासबा ] हिशेब; हिशेब-पत्रक; पर्वा.

**मोसबेकरी** ( पु० ) हिशोबकरणारा ( वाड सभा २।१९६ ).

**मोसम** ( पु० ) [ अ० मौसिम् ] हङ्गाम, काळ; ऋतू.

**मोसमी** [ फा० मोसिमी ] कांहीं काळ-पर्यन्त टिकणारा; हङ्गामी.

**मोहकम** [ अ० मुह्कम् ] भक्कम, दृढ. " हा करार राजे यांजकडूनच बहाल व मोहकम जहाला " ( साने-पयाव ४०३ ).

**मोहतरफा** ( पु० ) [ फा० मुहृतरिफा ] "पाण्ढरी हक्कांना मोहतरफा म्हणतात" ( गांवगाडा ५४ ).

**मोहतसीब** ( पु० ) [ अ० मुहृतासिब् ] निषिद्ध कर्मांची चौकशी व निवाडा करणारा धर्मशास्त्री. त्याचीं व काजीचीं कर्तव्यें अशीं साङ्गितलेलीं आहेत. "कज्जे तोडणें व मामले फैसला करणें; ज्या बायकोस आईबाप वगैरे कोणी नसेल तिचा मोहतूर लावणें व मेलेले मनुष्याचे मालाचा धर्मा-प्रमाणें हिस्सा करणें व चक्-बन्दी व शराचे कागद् वगैरे लिहिणें; शुक्रवारचे दिवशीं निमाज् व जमात करणें, व पुरलेला व आईबाप मेलेले मुलाचा माल, शोध करून संरक्षण करणें, व मेलेले मनुष्यानें जें कांहीं साङ्गितलें असेल तें धर्माप्रमाणें करणें व इमाम लोक व मोआजीन लोक यांची चौकशी करणें, व वाईट लोक व कैफ करणारे लोक यांजला मनाई व बन्द करणें, व मराठी देवळांतील मूर्ती वगैरे मोडणें व धर्मांतील नवी चाल बन्द करणें व जिनसांचे निरख व वज़न व गज़ व माप हे सर्व बरोबर ठेवीत जाणें" ( वाड-सनदा ७७-७९ )

**मोहबत** ( स्त्री० ) [ अ० महब्बत् ] प्रेम; कृपा; मुर्वत.

**मोहर; मोहोर** ( स्त्री० ) [ फा० मुहृर् ] सील; सोन्याचें नाणें, शिक्का; शिक्का बाळगणारा ( ? ). "दर्बारचे मोहोर हशमुल्लाखां" ( राजवाडे ८।२०४ ).

**मोहेर-कन्द** ( पु० ) [ ∠ फा० कन्दन्= खोदणें ] मोहरेचा शिक्का, ठसा खोद-णारा" ( भाइसम-ससवृ ८५ ).



**मोहर-बन्द** सीलबन्द; बन्द करून लाखोटा केलें गेलेलें.

**मोहरम** ( पु० ) [ अ० मुहर्रम् ] अरबी वर्षाचा पहिला महिना; ताबूताचा सण.

**मोहरम** [ अ० महरूम् ] पराभूत; नामो हरम; ( पु० ) पराभव; धुव्वा. "या उपर बार्ग्यांची फौज़ ...बेलाशक मोह-रम करूं" ( पाब १२ ). "यांणीं इराणी दुराणींचा मोहोरम केला." ( पाब २५ ).

**मोहरा** ( पु० ) [ फा० मुहूरा ] मणी; अहिमणी; कवडा; उत्कृष्ट मनुष्य; घोटणी; गुळगुळीतपणा. "कागद् ज़ाडा, मोहरा करून बळकट न फुटत ऐसे करावे" ( वाड-बाबा २।१५७ ). "कागद् चाङ्गले बळकट मज़्बूद, मोहरा बहुत होय या तऱ्हेचे" ( वाड-बाबा २।१५७ ). "या हत्तीस भाले राजे यांनीं लाऊन फौज़ेचा मोहरा (=रोख, आघाडी ) फिरविला" ( मदरु ११४ ).

**मोहरी** [ फा० मुहूरी ] सही-शिक्केदार. "मोहरी दस्तायेवज़" ( राजवाडे ७। ३५ ).

**मोहरीर** ( पु० ) [ अ० मुहर्रिर् ] लेखक; देशपाण्ड्याचा गुमास्ता..

**मोहरें** ( न० ) [ फा० मुहरा ] सोङ्गटी; शङ्ख. रण-मोहरें=रण-शङ्ख. "शृङ्गें काहळ्या रणमोहरीं" ( मुक्तेश्वर आदि-पर्व २३।१५९ ).

**मोहरेदार** [ फा० मुहृरा-दार् ] घोटीव गुळगुळीत व चकाकित कागद.

**मोहल्ला** ( पु० ) [ अ० महल्ला ] व्यूह; लढाई; हङ्गामा; शहराचा भाग; गल्ली. "फौजेचा मोहला ( ? गाहा ) करून

मोगलाचे गोटावर चालले " ( खरे ५।२०९६ ). " पठाण यांजकडील शें दोनशें लोक वाढून छबिन्यावर चालोन गेले; मोहला जाहला, गोळा गोळी जाहली " ( खरे ११।५६५९ ). " त्यांचा इरादा मोकाबला करावा असा आहे, वडिलांचाही इरादा आहे कीं त्यास अङ्गावर घेऊन मोहला पावावा " ( खरे ११।६०८० ).

**मोहसबा** ( पु० ) मोसबा; आढावा. " मोहसबा इहलोक व परलोक विषयीं घेत जावा " ( साने–पयाव ४३७ ).

**मोहसली** ( पु० ) [ अ० मुहस्सिल् ] महसूल करणारा शिपाई ( गांवगाडा ५८ ).

**मोहिमी** मोहिमेचा. " धोण्डोपन्त गोखले यांस मोहिमी वस्त्रें देऊन " ( मदरु २१४ ).

**मोहीब** (पु०) [अ० मुहिब्ब् ] स्नेही ( राजवाडे १५।२५३ ); आपण अर्थी हा शब्द पत्र व्यवहारांत येतो जसें, "येथील खैर–सल्ला जाणून मोहिब्बीं आपली खैरसल्ला हर्वक्त कलमी मर्कूम करीत असलें पाहिजे " ( पारसनीस–ब्रप २३४ ).

**मोहीबान–पन्हा** स्नेह्यांचा आश्रयदाता ( राजवाडे ३।७१ ).

**मोहीम** ( स्त्री० ) [ अ० मुहिम्म् ] महत्वाचें कार्य; अङ्गीकृत कार्य; स्वारी; दौड; धावणी. " मोहिमेचे (=कामाचे) दिवस होते, याजकरितां नबाबांकडून ज़ाबास चार दिवस लागले " ( राजवाडे ७ खलप २।१०५ ).

**मोहिम–शीर** मोहिमेवर; मोहीम–गर्क. " हरिपन्त तात्या व होळकर वगैरे सर्दार मोहाम्शीर आहेत " ( खरे ८।४११९ ).

**मौकूफ** [ अ० मव्कूफ् ] तहकूब; मुल्तवी.

**मौज** ( स्त्री० ) [ अ० मौज् = तरङ्ग ] लहर; आनन्द; मजा.

**मौजूद** [ अ० मव्जूद् ] विद्यमान; हज़र; तयार. " टिपू सरन्ज़ामसुद्धां पाऊसकाळ न म्हणतां लढाईस मौजूद " ( साने–पयाव २५९ ).

**मौजे** ( न० ) [ अ० मव्ज़िअ ] खेडें.

**मौत** ( न० ) [ अ० मौत् ] मरण. "आतां राजे यांचे अगोदर आपणास मौत येईल तर बरें " ( मदरु ११७७ ).

**मौलवी** ( पु० ) [ अ० मव्लवी ] इस्लामधर्मशास्त्री.

**मौला** [ अ० मव्ला ] प्रभू; ईश्वर

**मौलाना** [ अ० मौलाना=आमचे साहेब ] मौलवी.

**मौसूफ** [ अ० मव्सूफ् ] मज़्कूर; मशार्निल्हे " नबाब मौसूफ " ( राजवाडे १०।१६५ ).

**यक्–सुखनीपणा** ( पु० ) [ फा० यक्सुखुन् ] एकवचनीपणा. " यक्–सुखनीपणाची नेकी व खुबी सर्व टोपीकरांस जाहिरीस येई तें करणें वाजीब व लाजीम आहे " (राजवाडे १०।२८०).

**यकीन** [ अ० यकीन् ] निश्चित. " आम्ही हरामखोर असें खचित यकीन जालें असल्यास आम्हास परिच्छिन्न गोश्माली करावी " ( ऐस्फुले ४९ ).

**यख्त्यार; यख्त्यारी** अख्त्यार, अख्त्यारी पहा.

**यगानगत** ( स्त्री० ) [ फा० यगानगत् ] ऐक्य; सख्य. "बाळाजीराव यांनीं आम्हांस यगानगतीचे मार्गें जें साङ्गून पाठविलें तीं दोस्ती त्यांचे पाठीमागें आम्ही अदा केली " (राजवाडे ५।८६).

**यजीद्ख़त; यजीत्‌-ख़त** ( न० ) [८फा० आझाद्=मुक्त ] सोडचिठ्ठी.

**यह्‌तियात** ( स्त्री० ) [ अ० इह्‌तियात् ] काळजी; बन्दोबस्त. "तुम्ही आपले बचावाची यह्‌तियात करीत जावी" ( राजवाडे ५।९१ ). "पागेची यह्‌तियात नाहीं " ( राजवाडे ५।२०० ).

**यह्‌सान** ( न० ) [ अ० इह्‌सान् ] कृपा; उपकार; एह्‌सान.

**यह्‌सान् मन्द** [ फा० इह्‌सान् मन्द् ] कृतज्ञ ( राजवाडे १।१३२ ).

**या** [ अ० या ] हे; अरे. "देवाचें नांव 'या ख़ुदा' असें घेऊन " ( मद्रु १।८३ ).

**या** [ फा० या ] अथवा; का; व. "पत या तेज बुडाली " ( ख़रे १।१५० ). "बातमी ख़री या खोटी " ( ख़रे ९। ४७९५ ). "सुस्ती या काहिली इत्यादि अन्याय " ( मराआ ३० ). "बुन्देलियानें सुप्रवृत्त होऊन तुमच्या मनोद्यानुरूप मामलीयत विल्हेस लाऊन टाकली कीं नाहीं ? या तह करूं नये, ख़ुन्जावेंच हाच त्यांनीं विचार चित्तांत आणिला आहे ! " ( साने-पयाव ५८ ). "तेव्हां सुरतेवर या तख़्त या ताबूत म्हणून स्वारी केली " ( काप्रइसा ४८ ).

**याकुती** ( स्त्री० ) एक औषध.

**याकूत** ( पु० ) [ अ० याक़ूत् ] ताम्बड्या रङ्गाचें एक रत्न.

**याद; यादी** ( स्त्री० )[ फा० याद् ] स्मरण; सूची.

**याद्-गिरी** ( स्त्री० ) [ फा० याद्-गार् ] स्मारक; स्मृति ( ऐस्फुले २९ ).

**याद्-दास्त** ( स्त्री० ) [ फा० याद्-दाश्त् ] सूची; रोख़ा; सूची-बद्ध ( मराचिथोरा ७३ ).

**याद्-बस्त; याद्-हस्त** ( स्त्री० ) [ फा० याद्-हस्त् ] सूची. "कितेक जिन्नस सुर्टीत गेला त्याची याद्-बस्त " ( राजवाडे ११३६ ).

**याद्-बूद** ( स्त्री० ) [ फा० याद्-बूद् ] निश्चित यादी; ठराव. "या प्रमाणें बाबाजी पन्तास याद्-बूद करून देऊन पागेचीं दोन घोडीं बसावयास देऊन आधीं रवानगी करून द्यावी " ( ख़रे १२।६४०९ ). "तुम्ही करार-मदार याद्-बूद ठीकच केली आहे " ( ख़रे ६।२९२२ ). 'आण-शपत यादी-बुदी व्हावयाच्या आहेत, होतील " ( ख़रे ६।३०९२ ).

**यानी** [ अ० यअनी ] त्याचा अर्थ असा कीं, म्हणजे; पुढें ( राजवाडे १५।४९ ).

**यार** ( पु० ) [ फा० यार् ] स्नेही; दोस्त; जार; हत्ती बरोबर चालणार भालाईत.

**यारी** ( स्त्री० ) [ फा० यारी ] मैत्री; दोस्ती

**यारेदी** ( पु० ) [ फा० यारी-दिह् ] मदतनीस; वतनाची देसरख करणारा.

**येक-जहती** ( स्त्री० ) स्नेह; मैत्री. "हमेशा मकातीब पाठवून दोस्ती येक्-जहती दीन-ब-दीन जादा होय " ( राजवाडे १०।३१२ ).

**येकसरें** [ फा० यक्सर् ] तावडतोब; एकदम.

( स्त्री० ) [ ८फा० यक्स् ] स्नेह. तर्फेन येख्लास व येक-सुईची तरक्की

*रोज़–ब–रोज़ ज्यादा होत असावी* " ( राजवाडे १९।१०५ ).

**येख्लास** ( पु० ) [ अ० इख्लास् ] अन्तः-शुद्धी; स्नेह. " मुख्य येख्लास वाढावा" ( खरे ८७५ ).

**येगानगत** ( स्त्री० ) यगानगत; ऐक्य. "दोन्हीकडून दोस्ती व येगानगत रोज़–ब–रोज़ वृद्धींत असावी (दिमरा १।१४५).

**येहसान; येसान** ( न० ) यहूसान; कृपा; उपकार. " या गृहस्थावरी तुम्ही येह-सान करून निरोप दिल्हा यामुळें तो उपकारी आहे " ( खरे ९१६ ).

**येहसान्मन्दी** ( स्त्री० ) कृतज्ञता ( पद्मव ९९ ).

**येल्गार; एल्गार; इल्गार** ( पु० ) [ तु० ईल्घार् ] मोहीम; दौड; नेटाचें कूच; चढाई; हल्ला. " त्याणीं दुसरे दिवशीं कूल सरन्ज़ामासुद्धां त्या पल्टणावर येऊन इल्गार केला " ( साने–पयाव ४७९ ).

**येल्ची** ( पु० ) [ तु० ईल्ची ] एल्ची; वकील; प्रतिनिधी.

**यैन** [ अ० ऐन् ] ऐन; भर; मुद्दल; तत्वतां. " साठ लाखाची बेरीज़ यैन व इज़ाफा मिळोन सिद्ध केली " ( राजवाडे ७। ५३ ). " हज़्रत जेथें राहतील तेथें आम्ही समागमें येऊन रहावें हें यैन सलाह व लाज़म " ( राजवाडे ७।८६ ).

**रईस** ( पु० ) [ अ० रईस् ] सर्दार; अधि-कारी; राजा. " अव्वल घरचा बन्दो-बस्त नीट राखावा हें रईसास लाज़म " ( भा–ऐपयाव २१ ).

**रक्कम; रकम** ( स्त्री० ) [ अ० रकम् ] द्रव्यसङ्ख्या; ऐवज़; कलम; लेख; पत्रिका. " पेशावरचे सुभेदारास रक्कम सादर जाली कीं पुलाची तयारी कर-विणें " ( दिमरा २।५७ ).

**रक्बा** ( पु० ) [ अ० रक्बा ] गांवा-खालची ज़मीन.

**रकम्बन्द; रकम्वार** कलम्वार.

**रकमी** कलमी; मह्लग.

**रकाना** ( पु० ) [ ? अ० रुक्न्=स्तम्भ ] कागदाचा उभा भाग; कॉलम.

**रख्णा; रख्ना** ( पु० ) [ फा० रख्ना ] खण्ड; खलेल; भेद. " पुढें देण्यास रख्णा पडला " ( मद्बा २।२१० ). " त्या दर्म्यान अलीकडे रख्ने जाहले" ( वाड–मा १।२२१ ).

**रख्त–खाना** ( पु० ) [ फा० रख्त्–खाना ] कापड–खाना; कचेरी. " अज़् रख्त-खाने राजश्री शिवाजी राजे साहेब दाम–दौलत हू ".

**रख्ने–सूरत** ( स्त्री० ) बिघाडाची गोष्ट. " दर्म्यान रख्ने–सूरत ते तर्फेनें अम-लांत आली " ( वाड–मा १।६६ ).

**रग** (स्त्री०) [फा० रग्=धमनी] धमनी; नस; ज़ोर; मस्ती; मग्रुरी. रग जिरविणें. शिक्षा करून नरम करणें. "मिठी मारा, सळसळती साऱ्या रगा " ( प्रभाकर १३१ ). " अष्टाङ्गीं रगा दाटती " ( प्रभाकर १५० ). " मदनरगा या त्वरितगती जिरुं दे रे " ( प्रभाकर १८७ ).

**रगड** [ अ० रघद्=विपुलता ] विपुल.

**रग्दार; रगेल** ज़ोरदार; मस्त; उन्मत्त.

**रङ्ग** ( पु० ) [ फा० रङ्ग् ] रङ्ग; सूख; मज़ा; युक्ती; तजेला.

**रङ्ग-ढङ्ग** ( पु० ) युक्ति-कारवाई; फन्द.

**रङ्ग-दार** रङ्गीत.

**रङ्ग-बहार** ( पु० ) वसन्त-मौज; सुख. " रङ्ग-बहार एकान्तीं लुटा । घर सुन्दर कर पोपटा" ( प्रभाकर १४० ).

**रङ्ग-बाजी** पत्त्यांतील एक खेळ.

**रङ्ग-महाल** ( पु० ) विलास-मन्दिर.

**रङ्ग-रेज़** ( पु० ) [ फा० रङ्ग्-रेज़् ] रङ्गारी.

**रङ्ग-रोगण** ( न० ) [ फा० रङ्ग्-इ रौघन् ] तेलिया रङ्ग.

**रङ्गाई** ( स्त्री० ) [ फा० रङ्गाई ] रङ्ग देण्याबद्दल मजुरी.

**रङ्गामेज़** ( पु० ) [ फा० रङ्गामेज़् ] चितारी; दाम्भिक.

**रङ्गामेजी** दाम्भिक; कृत्रिम, (स्त्री०) चित्र-कल; कुटिलता; दाम्भिकपणा. "भीमनाथ केदार राममन्दिर रङ्गामेजीचें" ( प्रभाकर ७८ ). " लौकिकार्थ बहुता तऱ्हेनें गोड भाषण बोलतात; परन्तु चित्तांत भाव कुटिल; रङ्गामौजी बोलणीं बोलतात " (खरे ११।६०५५). " रङ्गामेजी व खातर्ज़माच आहे " ( राजवाडे १०।१३२ ).

**रङ्गी; रङ्गीन** [ फा० रङ्गीन् ] रङ्गीत. " तुम्ही रङ्गीन फेटा पाठविला तो पावला " (राजवाडे २२।८९). " हरजिनसी यकवटऊन रङ्गीन " ( प्रभाकर ७९ ).

**रङ्गेल** विलासी; ललितकलाप्रिय.

**रज़ई; रज़ाई** [ फा० रज़ाई ] दुलई; रूदार पाङ्घरूण. " रज़ाई दुरकी " ( वाङ-समा १।६३ ).

**रज़ब** ( पु० ) [ अ० रजब् ] अरबी वर्षाचा सातवा महिना.

**रज़ा** ( स्त्री० ) [ अ० रिज़ा ] आज्ञा; सम्मती; परवानगी; नोकरी वरून दूर रहाण्याची मुभा; सुटी. " तेथून जैसी रज़ा सादीर होईल त्याप्रमाणें वर्तणूक केले जाईल " ( राजवाडे ८।७ ). " किला त्याचे हवाले करणें म्हणौनु रज़ा फर्माविली " ( राजवाडे १७।८ ).

**रज़ा-तलब** ( स्त्री० ) आज्ञा; इच्छेप्रमाणें. " कुसाजी ...आमचे रज़े-तलबेंत राहून साङ्गितल्याप्रमाणें वर्तणूक करून कार्यसिद्धी केली " ( राजवाडे १०।४१८ ). "त्याचे रज़ा-तलब वर्तोन" ( राजवाडे १५।२०४ ).

**रज़ावन्द; रज़ाभन्द** [ फा० रिज़ामन्द् ] कबूल; खूश; सन्तुष्ट. " पुण्यांतील सावकार...निदान पावणा लाख रुपये पावेतो नजर द्यावयास रज़ावन्द जाहले आहेत कीं मुम्बईचा माल आणावयास मोकळीक द्यावी " ( खरे५।२३१८ ). " स्वार व प्यादे अगदी कण्टाळले आहेत...लोक रज़ावन्द नाहीत " ( खरे ५।२३९६ ). " रयतेस राजी व रज़ामन्द राखून " ( राजवाडे ६।३०२).

**रज़ावन्ती; रज़ावन्दी; रज़ामन्दी** (स्त्री०) [ फा० रिज़ामन्दी ] सम्मती; खुशी; खूश-करणें; समजूत. " यांनीं आमची रज़ावन्दी केली" (साने-पयाव ३२६)

**रञ्जीस** ( स्त्री० ) [ फा० रञ्जिश् ] त्रास; त्रस्त. " दर्म्यान इस्कील करून गोसावी मज़्कूर यांसी रञ्जीस करितां " ( राजवाडे २०।१७२ ). " लोक बहुत रञ्जीस आहेत " ( राजवाडे ३।८३ ). " तुम्ही रञ्जीस न होणें " ( इम ९३ ).

**रञ्जी** (स्त्री०) [ ∠ फा० रञ्जिश् ] कण्टाळा. वैताग. रञ्जीस येणें=त्रासून जाणें.

**रत्तल** (पु०) [अ० रत्ल्] चाळीस तोळ्याचें वजन.

**रत्ब; रब्त** (पु०) [अ० रब्त्] ठराव; करार; सन्धी. " मुरादखानानें वाजीद्-अलीखानाशी फार रत्ब केला आहे " (राजवाडे ११।१९४).

**रतीब** (पु०) [अ० रातिब्; रातिबा] रोजी नियमित देणें; शिधा; खुराक.

**रद्द** (स्त्री०) [अ० रद्द] परतवणें; फेड; नामन्जूर.

**रद्द-कर्ज** (न०) कर्ज-फेड. " बाकी राहील ऐवज रद्द-कर्जास लावून देतों" (खरे ८।४३२२).

**रद्दी** (स्त्री०) [फा० रद्दी] त्याज्य; कवडीमोल; वापरलेला कागद.

**रद्द-बदल; रद्द-बदली** (स्त्री०) [फा० रद्द्-उ-बदल्] तहचर्चा; वकिली; शिष्टाई; तरफदारी; भीड-खर्ची. "सोन्धे-करी यांची रद्-बदल लागली असे " (साने-पयाव ६९ ). " गेली गोष्ट सुधारावी म्हणजे त्यांची रद्-बदल न चालेल असा विचार काय आहे ? " (खरे ५।२३५७). " कोणी कोणाची रज़्-बदली करूं नये ऐशी बन्दी जाली होती " (खरे ९।४५३३).

**रन्ज्** (पु०) [फा० रञ्ज्] दुक्ख; नाखुशी.

**रन्ज़्क** (स्त्री०) [फा० रञ्ज़्] बन्दुकीचा अगर तोफेचा काना; त्यावर घातलेली दारू. रन्ज़्क खाणें=दारू जळून बार न उडणें.

**रन्ज़्णें** दुक्खी होणें " जे का रन्ज़्ले गान्ज़्ले । त्यासि म्हणे जो आपले " (तुकाराम).

**रन्धा** (पु०) [फा० रन्दा] लाकूड गुळ-गुळीत व सपाट करण्याचें सुतारी हत्यार.

**रफ्त** (पु०) [फा० रफ्त्] चाल. " राव-पन्तप्रधान यांजकडील सदांरांशिही रफ्त आश्नाईचा आहे " (राजवाडे ५। १०१).

**रफा** (स्त्री०) [अ० रफअ] निराकरण. " इन्शा अल्लाहु ताला, थोडेच दिवसांत खलश रफाही होईल (राजवाडे ५। १५७). " रफा जाली " (राजवाडे ६।३७७).

**रफाकत; रफीकत** (स्त्री०) [अ० रिफा-कत्] स्नेह; सख्य. " तुम्ही इङ्ग्रे-जांची रफाकत करणें ठीक नाहीं " (दिमरा १।१२३). " म्हणजे आम्ही रफीकतींत राहूं " (दिमरा १।२०७). " रिफाकत " (राजवाडे ७।१८).

**रफायत; रफाहीयत** (स्त्री०) [अ० रफा-हत्; रफाहीयत् ] भरभराट. " किफा-यत सर्कार व रफायत राया (∠रआया= प्रजा) अमलांत आणोन " (राजवाडे १५।११३). " आपले रयासतीची बन्दोबस्ती व खल्खुलाचे (∠खल्कुह्हा= तींतील लोक) रफाहीयतीवर असावें " (वाड-समा १।३२८).

**रफीअल्कदर** [अ० रफीउल्कद्र्] उच्च दर्जाचा (इम ६५).

**रफीक** (पु०) [अ० रफीक्] स्नेही; दोस्त. " रफीक होऊन सेवा करून दाखवूं; अब्दालीस तम्बी करूं " (इम २६०). " तुम्ही दौलतीचे पुराणे रफीक यास्तव तुम्हांपाशी आलों आहोंत " (होळ्के १२३).

**रफू** (पु० स्त्री०) [फा० रफू∠अ० रफ्व्] कापडाचें छिद्र विणून बुज़्विणें; तुणणें.

**रफूक** ( पु० ) [ अ० रुफ्क् ] मेहेरबानगी; स्नेह. " एके ठिकाणीं रफुकाचें कलम असावें " ( साने-पयाव २२१ ).

**रफूगार** ( पु० ) [ फा० रफूगर् ] तुणणारा.

**रफे-दफे** ( स्त्री० ) [ अ० रफअ दफअ ] निवाडा; निकाल; निराकरण; निरवा-निरव; व्यवस्था. " तेथील रफे-दफे हुजूरच जाहली " ( खरे ९६२ ). " आजी पावेतों रफे-दफे होऊन तेथून कूच झालेंच असेल " ( खरे ४।१८२१ ). " देणेदाराची कोचवण किती आहे याची रफे-दफे धणी अथवा आपण करून मला मोकळें करावें " ( होकै २० ). " खान स्नेहावर, अन्तीं मुस्तकीम म्हणोनच हे गोष्ट रफेदफे जाहली " ( साने-पयाव ८९ ). " असें जाहल्यास मागाल रफे-दफे करून त्यासही भेटीस बोलवावें हेंच केलें असें " ( राजवाडे ११२८९ ).

**रफे-खलश** ( पु० ) [ फा० रफ्-इ-खलिश् ] वैराचें निराकरण. " आमची त्याची रफै-खलिश व्हावा ऐसें बेतांत आणिलें आहे " ( ऐकिप्र ४१ ).

**रफे-शर** ( पु० ) [ अ० शर्=वाईटपणा ] वैराचें निराकरण. " रफै-शर केला व तस्फियाचा नकशा ठरविला " ( वाड-कैफियती १०० ).

**रबाब; रुबाब** ( पु० ) [ अ० रुअब् ] धाक; दरारा. " रबाब पूर्ववत् जमून इन्दुरास आले " ( होकै २९ ).

**रबिलाखर** ( पु० ) [ अ० रबीउल्आखिर् ] अरबी वर्षाचा चौथा महिना.

**रबिलावल** ( पु० ) [ अ० रबीउलअव्वल् ] अरबी वर्षाचा तिसरा महिना.

**रब्बी** ( स्त्री० ) [ अ० रबीई=वासन्तिक ( पीक ) ] वैशाखपीक. " गारा फाल्गुन मासीं पडल्या; रब्बी बुडाली " ( राजवाडे ३।९६४ ).

**रमज़ान** ( पु० ) [ अ० रमझान् ] अरबी वर्षाचा नववा महिना. या महिन्यांत मुसलमान लोक दिवसां उपास रोज़ा करितात.

**रमज़ान-गाई** ( स्त्री० ) एक कर. " मुळकाचे दस्तावर रमज़ानिगाई कदीम तहनाम्याप्रमाणें न घ्यावी " ( वाड-मा ११२२३ ).

**रमल** ( न० ) [ अ० रम्ल् ] देवदूत जिब्रईलनें प्रेषित दनियल यास शिक-विलेली वाळूवर रेघा काढून त्यावरून भविष्य वर्तविण्याची कला.

**रमुजी** विचित्र; चित्ताकर्षक.

**रमूज़** ( स्त्री० ) [ ? अ० रुमूज़् ] गम्मत; मौज.

**रय्यत; रयत** ( स्त्री० ) [ अ० रईयत् ] प्रजा. " साम्प्रत गनिमाचे धामधुमे करितां व दुष्काळाकरितां रयती गेली, मेली; रुईजुई राहिली " ( राजवाडे १६।४३ ). " कौल देऊन आज्ञा केली तर रयत उमेद धरून किर्दी करितील " ( राजवाडे ६।१४८ ). " रानांत कोठें पिकें आहेत तेथें उपद्रव बहुत होतो; रयता दिल्गीर " ( खरे ११।६१७३ ).

**रयत्वारी** ( स्त्री० ) [ फा० रईयत्वारी ] प्रत्येक कुळाशीं सर्कारनें साऱ्याचा स्वतन्त्र ठराव करण्याची गैर-जमीन्दारी पद्धती.

**रया; रयाया; राया** [ अ० रआया अनेक व० रईयत्चें ] प्रजा; शेतकरी वर्ग. " किफायत सर्कार व रफायत राया "

( राजवाडे १५।११३ ). "रयायानी तपे कानद खोरें" ( राजवाडे १६।४९ ).

**रया; रयात; रयायत** ( स्त्री० ) [ अ० *रिआयत्* ] कींव; कृपा; क्षमा; सूट; अदब; भीड. "परन्तु तुम्ही आतां शास्त्राची आज्ञा उलट करून आपले मग्रूरीनें रया सोडून देऊन त्या सतीस मारितां" ( ऐटि २।३४ ). "बे कैदी जाली आहे...मनस्वी भाषणें आहेत, सर्वांनीं रया सोडली" ( खरे ६।२९ ६२ ). "त्यांचीं घोडीं अवघीं तबेल्यास लावणें, ये विषयीं रयात् न करणें" ( सभासद ४८ ). "या कालीं आम्हांवर रयात केली तर आम्हीही बहुत कामास येऊं" ( खरे ५९६ ). "रयात जालिया रयत तज़ावज़ा होणार नाहीं; पुढें उमेदीनें लावणी करार-वाके करितील" ( चन्द्रचूड-दप्तर १।५१ ). "साल मज्कुरीं खण्डणीची रयात करावी" ( खरे ४।८ १७ ). "महिपतरावांनीं क्रूरपणा धरून जेथें सांपडेल तेथें पैका घेतला; कोणाची रू-रयात अगर वळख धरिली नाही" ( खरे ९६३ ). "कोण्ही कांहीं रयायत करील ऐसें नाहीं; काम होय तोंवर कोरडी मिनत करितात; मन्सब द्यावयासी तयार; जागीर कपर्दिकेची न देत" ( राजवाडे ६।३३१ ). "राजश्रीस जागीर सरन्जामी आलियावर तुम्हांस रयायत पांच हज़ाराची पर्गणाचे पैकीं करार होईल" ( राजवाडे १५। १०० ).

**रयत-रज़ावन्ती** ( स्त्री० ) रयतेची खुशी. "पाऊस कमी; पिकें तमाम वाळतात; त्यामध्यें रयत-रज़ावन्तीनें वसूल घेतच आहों" ( खरे ५।२४०९ ).

**रव** ( पु० स्त्री० ) [ फा० रव् ] रस्ता; चाल. "येथें एकवेळ लटिकें पडलें म्हणजे मनुष्यास पुन्हा जवळ उभें राहूं देत नाहीत; येथील रव या प्रकारचा" ( राजवाडे ८।२२० ). "मङ्गळवेढ्याचीं पांच सात खेडीं रवेस लागतात." ( खरे ११२३ ).

**रवा** [ फा० रवान् ] चालू. "यासी दुम्बाले व रवां दारन्द (=त्यांनीं ठेवावें) ( गोइसा १६ ). "आपणास इनाम... कार्किर्दी-दर-कार्किर्दी मोकासियानी माजी मुतैन रवा अस्त" ( राजवाडे १५।१४५ ).

**रवादार** ( पु० ) [ फा० रवादार् ] अनुमोदक. "तुम्ही सर्कार-नुक्सानीचे रवादार कांहीं नाहीं" ( राजवाडे ७ ५६ ).

**रवानकी** ( स्त्री० ) विदागी. "रवानकीचीं वस्त्रें" ( राजवाडे १२।१९२ ).

**रवानगी** ( स्त्री० ) [ फा० रवानगी=चालणूक ] पाठवणूक; उत्तर-पत्र; आगाऊ खर्ची; नालबन्दी. "श्रीमन्त वसईचे मुक्कामीं असतां बहुत पत्रें आपलीं आलीं व त्यांच्या रवानग्याही बहुत जाल्या" ( राजवाडे ६।५८२ ). "सत्रावे रबिलावलचे रवानगींत तपशील लिहिला त्याजवरून ध्यानांत आलेंच असेल" ( राजवाडे ५।१९९ ). "लोकांस रवानगी नाहीं; घोडों पडलीं या विचारें लोक दारीं बसतील" ( साने-पयाव ३२४ ).

**रवाना** चालूं; प्रेषित.

**रवा-सुदगी** ( स्त्री० ) [ ८फा० रवाना शुदा=पावते झालेला ] पावती. "बाकी रसद हुज़ूर रु॥ ८०० पैकीं रवासुदगी

सेटी खाटक हुजूर-बाजार लस्कर रु॥ १०० " ( राजवाडे १५।१०१ ).

**रवेश** ( स्त्री० ) [ फा० रविश् ] चाल; रीत. " इन्साफाची रवेश दर्किनारा ठेऊन खुद्-गर्जीवर नजर देऊन साक्षी सरकारांत देण्याविषयीं ताकीद न केली " ( खरे ७।३५७० ). "गोसावियाचे इनामतीस उपद्रव द्यावा ही कोण रवेश ! " ( राजवाडे १५।२१९ ).

**रवेश्वार** चालीप्रमाणें; योग्य.

**रसम; रस्म** ( स्त्री० ) चाल-रीत. "आलमदुनियास हेच रहा व रस्म " ( सानेपयाव ४६७ ).

**रस्म-रव** ( स्त्री० ) चाल-रीत. " आं साहेबही त्यांचे रस्म-रव यास खूब वाकीफ " ( साने-पयाव ४७६ ).

**रस्मीयात** ( स्त्री० ) [ अ० रस्मीयात् ] वहिवाट. "वस्त्रें शादीचे रस्मीयातीचीं" ( राजवाडे ७ खलप ११२ ).

**रस्ता** ( पु० ) [ फा० रस्ता ] मार्ग; नियम; सडक.

**रस्ते-बन्दी** ( स्त्री० ) सडक तयार करण्याचें काम.

**रसद; रस्त** ( स्त्री० ) [फा० रसद् ] मामलेदारानें एखाद्या पर्गण्याचा इजारा घेतला म्हणजे जी रक्कम त्यास सर्कारांत आगाऊ भरावी लागे ती : दारूगोळा धान्य वगैरे युद्धोपयोगी सामुग्री.

**रसम-रियायत** ( स्त्री० ) वहिवाटीचें अवलम्बन; माफक-दस्तूर भेट. " वस्त्रें वगैरे रसम-रियायत केली " ( जोरा ५६ ).

**रसानगी** ( स्त्री० ) ! दुसऱ्याच्या मुखें अगर चिट्ठीनें दिलेली पर्वानगी.

**रसीद** ( स्त्री० ) [ फा० रसीद् ] पावती; पोंच, कबज्. " वकील मज्कूर यांणीं हुजूर अर्जदास्त रसीद करून " (राजवाडे १५।२९९ ). " हे रुपये जरूर... हवाला करून रसीद पाठविणें " (राजवाडे ६।३३३ ).

**रसीदन** [ फा० रसीदन् ] पावणें; पोहोंचणें. " आतां रसीदन मिसेली देखनांची " ( राजवाडे १५।१५६ ).

**रसूम; रुसूम** ( पु० ) [ अ० रुसूम् अनेक व० रस्मचें ] फी; कर.

**रसूल** ( पु० ) [ अ० रसूल् ] प्रेषित; पैगम्बर. " खुदा व रसूल-खुदाची शपथ आहे " ( दिमरा १४५ ).

**रह-गुजरी** [ फा० रहगुजर् ] वाटसरू; फिरस्ता; गैर-वतन्दार. " दोन चार दुकान्दार रहगुदरी ठेऊन " ( वाडबाबा २।२१६ ).

**रह-दारी** ( स्त्री० ) [ फा० राह्-दारी= रस्तापट्टी ] रस्ता-पट्टीची माफी; सर्वसामान्य लोकांची ये जा; आपद्रफ्त; वाहतूक; वर्दळ. " इङ्ग्रजांस थैली पावतांच रहदारीचें दस्तक रवाना केलें" ( खरे ७।३७८६ ). " त्याजवरी यन्दा नापीक; तशांत लष्करची रहदारी " ( खरे ८।१० ).

**रहा** ( स्त्री० ) [ फा० राह् ] मार्ग; चाल; वर्तन; रीत. " रघुनाथराव यांस सुरतेहून खुस्कीचे रहानें मुम्बईस रवाना केलें " ( खरे ७।३५७० ). " साक्षी घेतल्यावर ( मुम्बईकरांनीं ) लिहून पाठविलें कीं पूर्तकेश घेणार म्हणून आम्ही घेतली ! हे रहा कोण !" ( खरे ७।३५६८ ).

**रहा-रीत** ( स्त्री० ) चाल-रीत. " साम्प्रत त्यांची रहा-रीत मराठे लोकांप्रमाणेंच आहे " ( भा-जुऐगो २७ ).

**रहा-दार** [ फा० राहूदार् ] वाटसरू; वाहतूक करणारा; मार्ग-रक्षक. "वाणी उदमी वगैरे रहादार यांस लुटून वाटा मारितात " ( वाड-समा २।१५५ ). " माङ्ग, रामोसी, व रहदार " ( भाइसम १८३४ अहवाल १६ ).

**राज-तख्त** ( न० ) राजधानी. " किल्ला रायगड राज-तख्त " (चित्रगुप्त १६७).

**राज-रोस** [ फा० रोझ्-इ-रौशन् ] दिवसां ढवळ्यां.

**राजी** [ अ० राझी ] कबूल; खूश.

**राजी-बिराजी** ( स्त्री० ) सुख-दुक्ख, सङ्कट. " राजी-बिराजीचे दिवस; सर्व वस्तवानीसह कुटुम्ब एका किल्लेत; तेव्हां स्थळाचा मज्बुदी पाहिजे " ( खरे ५।२२१२ ).

**राजी-नामा** ( पु० )[ फा० राझीनामा ] कबुलायत; कैफियत; बे-तकारपत्र; राजी खुशीनें नोकरी सोडल्याचें पत्र; इस्ताफा. "हर्दो वादियांचे राजीपणें राजीनामे लेहून घेऊन " ( राजवाडे १५।४७ ). " बेपारी मज्कुराचें कापड झाडियानसी देऊन त्याचा राजीनामा पाठऊन देणें " ( राजवाडे ६।६०६ ).

**रातबा-मसाला** ( पु० ) रोजी खुराक व इतर योग्य खर्च. " तेथील कमावीसदार यांस तुम्ही रातबा-मसालेविशीं कागद व जासूद जोडी देणें " ( साने-पयाव २०२ ).

**राबता** ( पु० ) [ अ० राबिता ] अनुबन्ध; स्नेह; ये-जा. " आपला व खानाचा स्नेह व राबता बराच आहे " ( साने-पयाव १६). "आज माणसांचा राबता दिसत नाही " ( मदरु ११५५).

**रास्त; रास्ती** [ फा० रास्त् ] सरळ; खरा; योग्य. " हुजूर आलियावर रास्ती न्याय करून " ( मराआ ३१ ).

**रास्त-कौली** ( स्त्री० ) सत्यवकेपणा. " यांत रास्त-कौली इङ्ग्रेजांची कोठून राहिली ! " ( ऐटि ११५९ ).

**रास्त-गो** [ फा० रास्त्-गो ] खरें बोलणारा.

**रास्त-गोई** ( स्त्री० ) [ फा० रास्त्-गोई ] सत्यभाषण. " दुनियेंत रास्त-गोई परमेश्वरानें किमिया दिली आहे; जो वचनास अन्तर करितो त्यास या लोकीं परलोकीं जागा नाहीं " ( ऐटि ११५९ ).

**रास्त-मामलगी** ( स्त्री० ) न्याय्य वर्तन. " त्या प्रमाणें गायकवाड यांचें पत्र आणून ठेविलें असतां महाल गुजास्त न केले हे रास्त-मामलगी कीं काय" ! ( खरे ७।३५७२ ).

**रास्त-रवी** ( स्त्री० ) सरलगामित्व; सरळपणा. " जदीद करार झाला त्याची ही अहवाल, तेव्हां रास्तरवी कायमी कोठें राहिली ! " ( खरे ७।३५७० ).

**रास** [ अ० रास्=डोकें ] नङ्ग. "आम्हाजवळ पागेचीं घोडीं रास चवदा आहेत " ( खरे ८।४०४४ )

**राह; रहा** ( स्त्री० ) [ फा० राह् ] मार्ग; वाट. " जेन्राल मज्कूर ताव आणितां न सकतां राहेंत आपले हमराही सरन्जाम टाकीत...गढीच्या आसरेस जाऊन पोहोंचला" ( राजवाडे १०।१८७ ). " दीड महिना राह साहेबाचे यावयाची पाहिली " ( इम

६८ ). " आम्ही त्यास राहावर आणूं, निदान त्यास तम्बी करूं " ( राजवाडे १।४६ ).

**राहूदार** ( पु० ) [ फा० राहू-दार ] मार्गदर्शक; नाकेवाला ( राजवाडे ६। २७० ).

**रिआया** रआया; प्रजा. " रिआया व मुज़ारियान पर्गणे चाकण " ( राजवाडे ६।१५३ ).

**रिकाबी; रिकेबी** ( स्त्री० ) [ अ० रिकाबी ] बशी.

**रिकीब्** ( स्त्री० ) [ अ० रिकाब् ] घोड्यावर चढतांना व बसल्यावर पाय टेकण्यासाठीं जिनाच्या दोन्ही बाजूस सोडलेल्या कड्यांपैकीं एक; स्वारी; बशी. " भाऊसाहेब केवळ परशुराम अवतार...दूर रिकिबीस तर्वार फत्ते करून...अवतार सम्पविला" ( पाब ४६ ).

**रिफाकत** ( स्त्री० ) [ अ० रफाकत् ] सङ्गत; स्नेह. " तुम्ही रघुनाथराव यांची रिफाकत सोडून देणें " ( खरे ७।३५६९ ). " सबब आम्हांसी रिफाकत ठेऊन आपले ठायीं मज्बुतीनें असावें " ( जोरा २९ ).

**रिवाज्** ( पु० ) [ अ० रिवाज् ] रूढी; चाल; शिरस्ता. रीत-रिवाज=चालरीत.

**रिश्वत** ( स्त्री० ) [ अ० रिश्वत् ] लांच. " भवानीपन्तांच्या मार्फत दहालक्ष पावेतों रिश्वत घेऊन हङ्गामा होऊं दिला नाही " ( पद्मव ६८ ).

**रिसाल्दार; रिसालेदार** ( पु० ) [ फा० रिसालादार् ] घोड-दळावरील अधिकारी.

**रिसाल्दारी** ( स्त्री० ) घोडदळाचें आधिपत्य.

**रिसाला** ( पु० ) [ अ० रिसाला ] घोडदळाची तुकडी; सामुग्री; सरन्ज़ाम. " त्यांत साल मज्कुरीं तोफा बाण जेजाला यांचा रिसाला बहुत तयार करविला " ( खरे ८७५ ).

**रुई** ( स्त्री० ) [ फा० रूय् ] प्रकार; मार्ग. " त्यांत घरोब्याचे रुईनें बहुत प्रकारें लिहिलें " ( राजवाडे ६।५८२ ).

**रुका** ( पु० ) [ अ० रुक्आ ] पत्र. " शादीचा रुका ( राजवाडे ७। २०४ ).

**रु-कार** ( पु० ) सम्मती लेखाची नक्कल केल्यावर रुजुवात घेतल्याबद्दल ' रु ' असें केलेलें चिन्ह.

**रुख्सत; रुस्कत** ( स्त्री० ) [ अ० रुख्सत् ] जाण्यास पर्वानगी; निरोप; रजा; पर्वानगी; सुट्टी; बिदा. " वकिलास मात्र रुस्कतीचीं वस्त्रें देऊन बिदा केलें " ( दिमरा १।१०२ ). " आम्हास पातशाहाकडे रुक्सत करावें (=भेटवावें ) ( दिमरा १।९४ ). " आमची तांचियतेसी बे-आरामी राहती; याजकरितां आम्ही तीन महिन्याची रुख्सत घेऊन हवा खायासी समुद्राचे वाटेनें मद्राजेस जातों " ( पद्मव ९३ ). " इतकें बोलून आम्हां त्रिवर्गास रुख्सत करून आपण मिसला पहावयास गेले " ( राजवाडे १।२३ ). " सेनासाहेब सुभा मोंगलापासून रुस्कत होऊन गेले " ( खरे २।५६५ ).

**रु-ज़ामा** ( पु० ) रूदार आङ्गरखा; पातळ गादी.

**रुजुवात** ( स्त्री० ) [ ∠ अ० रुज्अत, रुजूअ ] ताडून पाहणें; प्रत्यय; लक्ष्य; निष्ठा. " गलीम-पराभव प्रत्यक्ष जनांत

रुजुवातीस आला या आनन्दें... खुशाली " ( चित्रगुप्त ४५ ). " तुम्ही पादशाही रुजुवातीनें असणें " ( सभासद ४७ ). " एक दोन राजे पादशाही रुजुवात होते . ते मारिले " ( सभासद ९ ).

**रुजू** ( स्त्री० ) [ अ० रुजूअ ] लक्ष्य; निष्ठा; सादर; दाखल; सर्कार्‌जमा; जप्त; मान्य; पसन्त. " ते वख्तांत इकडील कायेमी समजून मग सर्वांनीं रुजू आणीत आणीत आणिली " ( ऐटी ३।१७ ). रुजू घालणें=ताडून पाहणें. " पूर्वील बिशादीचे जाबते रुजू घालावे " ( सभासद २३ ).

**रुत्बा** ( पु० ) [ अ० रुत्बा ] दर्जा; मर्तबा; पदवी. " अष्ट प्रधानाचे बरोबरीचा रुत्बा " ( भा-ऐपयाव १०३ ).

**रु-बकार** [ फा० रू-ब-कार् ] सलक्ष्य; तन्मयतेनें; सन्मुख; पुढें, दर्पेश. " कित्येक मोठमोठ मस्लतीचे विचार ज़रूर बोलावयाचे रु-बकार येऊन पडले आहेत " ( खरे ८।४३१५ ). " त्यास विज्वर प्रसङ्ग रु-बकार जाहलियास किल्ले पुरन्धर समीप आहे " ( राजवाडे १०।८२ ).

**रुब-रू; रो-ब-रो** [ फा० रू-ब-रू ] समोर; समक्ष; अपेक्षित. " तुम्ही उरूबरू बसा " ( दिमरा १।११९ ). " नित्यानीं लढाई रुबरू आहे " ( दिमरा १।२०१ ).

**रुबेरूब** रुबरू. " गाजुदीखान याचे वज़ारतीविषयीं भाऊसाहेब यांस आम्ही रुबेरूब विनन्ती केली " ( भाव ९१ ).

**रु-माल** ( पु० ) [ फा० रूमाल् ] ( तोण्ड पुसण्याचें ) चौकोनी फडकें; दस्तमाल दप्तर.

**रुश्वत ; रिश्वत** ( स्त्री० ) लांच. " ख्यानती, रुश्वती, बन्दर-तवाई ' ( मेस्तक पुस्तक-ज़मेलेखन १३० ). लांच-रुश्वत = लांच-लुचपत. " येथें कांहीं लांच-रुश्वत चालेना " ( चित्रगुप्त ४१ ).

**रुस्कत** रुख्सत पहा.

**रुसूम** ( पु० ) [ अ० रुसुम् ] हक्क-पैका; कर; ज़मिनीच्या उत्पन्नांतील देशमूख देशपांडे यांचा भाग.

**रुस्तमराव** एक पदवी ( मराठि थोरा ५२).

**रुस्तुमी** ( स्त्री० ) [ फा० रुस्तमी ] शौर्य. " शाबास तुमच्या हिंमतीची व दिलेरी रुस्तुमीची !" ( साने-पयाव १४० ).

**रू-रयात** ( स्त्री० ) तोण्ड-भीड. " कोणाची रू-रयात न धरितां उभयतांचा हरएक मज्कूर मनास आणून वाजबी असेल त्याप्रमाणें विदित करणें " ( खरे ७।३४९० ). " महिपतरावांनीं क्रूरपणा धरून जेथें सांपडेल तेथें पैका घेतला; कोणाची रू-रयात अगर मुलाख धरिली नाही " ( खरे ९६३ ).

**रुयदाद; रुएदाद** [ फा० रुयदाद् ] प्रविष्ट प्राप्त. " आं अमारत्-पन्हाकडील खैरीयत कलमी करून शादमानी रूयदाद होय तें केलें पाहिजे " ( साने-पयाव ९८३ ). " शादमानी रुएदाद न जाहली " ( राजवाडे १०।२८७ ).

**रूख; रोख** ( पु० ) [ फा०रुख् ] तोण्ड; लक्ष्य; रोख; दिशा. " ते इङ्ग्रजी वकिलास रूख देणारच नाहींत " ( दिमरा १।५४ ). " तेव्हां बाद-बर्साम

हाच रूख धरील" (दिमरा १।५५). "मोंगलाचा दगाबाजीचा रूख नज़रेनें पाहिला तर याजकरितांही खबर्दारीनें रहावें लागलें" (राजवाडे १।४६). "रूख कोणीकडे जावयाचा हें समजलें नाहीं" (राजवाडे १०।२६५). "आम्ही तळेगांवचे सुमारें त्याचे रुखावर आलों" (राजवाडे १०।१३६).

**रेजक् -दाणी** (स्त्री०) छर्रे गोळ्या ठेवण्याचें पात्र (वाड-बाबा २।४२).

**रेज़गी** (स्त्री०) [फा० रेज़गी] मोड; किरकोळ नाणें.

**रेज़ा** (पु०) [फा० रेज़ा] तुकडा कापडाचा.

**रेशमी** [फा० रेशमी] रेशमाचें.

**रेशिम** (न०) [फा० रेशम् ∠ अब्रीशम्] कृमिज तन्तू.

**रोख** (पु०) रूख; कटाक्ष; झोंक; हेतू.

**रोखा** (पु०) [अ० रुक्आ] पत्र.

**रोगण** (न०) [फा० रौग़न्] तेलिया-रङ्ग.

**रोगणी** तेलिया रङ्ग दिलेला. "रोगणी भिन्ती, लखलखाट वर तय्यारी" (प्रभाकर ९२). "भंवतीं छत, भिन्ती लाल रोगणी" (प्रभाकर २१६).

**रोज़** (पु०) [फा० रोज़्] दिवस; प्रत्यहीं.

**रोज़ा** (पु०) [फा० रोज़ा] रमज़ान महिन्यांत मुसल्मान लोक जो उपवास (निरशन) करितात तो; या उपवासांत सूर्योदयापूर्वी व सूर्यास्तानन्तर जेवण्याची मुभा असते.

**रोज़ा** (पु०) [अ० रौज़ा] बाग; समाधिमन्दिर; दर्गा.

**रोजी** (स्त्री०) [फा० रोज़ी] एक दिवसाचें वेतन; खर्ची; एका दिवसास.

**रोजीना** (पु०) [फा० रोज़ीना] दैनिक खर्च; दैनिक. "रोजीना चार हत्तीस पञ्चवीस रुपये खर्च (खरे २।५४०).

**रोब; रोआब** (पु०) [अ० रुअब्] धाक; दरारा; सलाबत. "तेव्हां हे शकल सल्तनतीचे बेहबुदीची, पातशाहीचे दाब-रोबाची सर्कारांतून अमलांत आली" (राजवाडे १२।१२). "हा दाब-रोआब सर्वांनां दिसों लागला" (राजवाडे ७ खलप २।२७).

**रोबरो** रूबरू पहा.

**रोशन** [फा० रोशन्] विशद; स्पष्ट; श्रुत. "बन्दगीस रोशन होय हे अर्दास" (राजवाडे १५।७६).

**रोशनाई** (स्त्री०) [फा० रोशनाई] दिवेबत्तीचा लखलखाट; दीपोत्सव.

**रोशनी** (स्त्री०) [फा० रोशनी] रोशनाई. "रात्रीं रोशनीनें नबाब दोलाचे येथें आले" (राजवाडे ७।१०४).

**रौनक** (स्त्री०) [फा० रौनक्] भपका; शोभा. "दौलतींत कांहीं बाकी राहिली नव्हती, त्या दौलतीस खावन्दाबरोबर रौनक आणिली" (राजवाडे ५।८६).

**रौनक-अफ्ज़ा** [फा० रौनक्-अफ्ज़ा] शोभावर्धक. "हज़रत येथें रौनक-अफ्ज़ा होणार (राहणार)" (राजवाडे ७।१०६).

## ल

**लक्तर** (न०) [फा० लत्] फाटकें वस्त्र; चिन्धी.

**लकवा** (स्त्री०) [? अ० लकब् टोपण नांव] डब; खोड.

**लगाम** ( पु० )[ फा० लिगाम् ] घोड्याला ताब्यांत ठेवण्यासाठीं व वळविण्यासाठीं त्याच्या जबड्यांत अडकविलेली सळई व तिला बान्धलेले हातांत धरण्याचे दोर.

**लगामी** अधीन.

**लङ्गडा** [ फा० लङ्ग् ] पायानें अधू; पाङ्गळा.

**लङ्गडणें** एक पाय अधू असल्यानें दुसऱ्या पायावर भार टाकून चालणें.

**लङ्गडी** ( स्त्री० ) एक पाय दुमडून दुसऱ्या एकाच पायानें उड्या मारीत चालणें.

**लङ्गर** ( पु० ) फा० लङ्गर् ] होडीचा नाङ्गर; दोर-खण्ड; मठ.

**लज़्जत** (स्त्री० ) [ अ० लज़्ज़त् ] रुची; गोडी; खुमारी.

**लज़्जत्-दार** रुचकर; स्वादिष्ट.

**लण्ड** ( पु० )[ फा० लन्द् ] शिश्न.

**लण्ड** [ फा० लवन्द् ] देवधर्माला न जुमानणारा विषयीं मनुष्य; कलन्दर.

**लत्ता** ( स्त्री० ) लात पहा.

**लत्ता** ( पु० ) [ फा० लत्ता ] चिन्धी; धडपा.

**लत-कोडगा** ( पु० ) लाथा खाऊन निगरगट्ट व निर्लज्ज झालेला.

**लवण्डी** ( स्त्री० ) [ फा० लवन्द् ] वेश्या; दासी; रखेली.

**लवा** ( पु० ) [ अ० लिवा = निशाण ] सत्ता. "तेथें सर्कारचा अम्मल व लवा" ( खरे ७।३५६६ ).

**लवाजिमा; लवाज़मा** ( पु० ) [ अ० लवाझिमात् ] आवश्यक वस्तू व माणसें; परिवार; गाड्या घोडे नोकर वगैरे इत्माम; अट. "बरोबर लवाजिमा मातबर" ( मराचिथोशा ३६). "जाहीदारींत सर्वांस दोस्तीचे लवाजिमे जाहीर होतील" ( राजवाडे ५।१७३ ).

**लवाजीम** ( पु० ) [ अ० लवाझिम् ] हक्क, कर. "हक-दक वगैरे लवाजीम कूल जे असतील ते वसूल करून सर्कारांत ज़मा करणें" ( वाड-बाबा २।४५ ).

**लवाद** ( पु० ) [ अ० लवाझ् = कैवारी ] पन्च.

**लश्कर; लस्कर** ( न० ) [ फा० लश्कर् ] सैन्य; फौज; गोट.

**लश्करी** [ फा० लश्करी ] सैन्यासम्बन्धी.

*ला-इलाज* [ *अ० लाइलाज्* ] निरुपाय; लाचार; निरुपायानें. "आतां वारंवार तुम्ही विचार लिहूं लागला तेव्हां ला-इलाज जाणून लिहिलें आहे" ( खरे ११२८ ). "रघुनाथराव यांची फौज लाइलाज होऊन कौल घेऊन निघाली" ( ऐटि १।५९ ). "यास्तव लाइलाज़ राहिलों" ( राजवाडे ६।५६२ ).

**लाइलाजी** ( स्त्री० ) निरुपाय, व्यर्थ. "लाइलाजीस्तव दूर पत्रीं सेवेसी विनन्ती लिहितों" ( दिमरा १।२० ). "तर लाइलाजी खेद करून सार्थक नाही" ( राजवाडे ६।४५५ ).

**लाकीन** [ अ० लाकिन् ] पण. "लाकीन भोंसले यांजकडोन पत्रें आलीं नाहीत" ( साने-पयाव ८४ ).

**लाचार** [ फा० लाचार् ] क्षीणोपाय; हतयत्न; ( पु० ) निरुपाय. "परन्तु एक चिरञ्जीव शत्रूचे हातीं सांपडलेमुळें निरुपाय जाणोन लाचार होऊन चाकरी करितों" ( खरे ६।२९२२ ). "तो लाचाराचा बयाण लिहितां न ये" ( ऐटि १।३५ ).

**लाचारगी** ( स्त्री० ) निरुपाय. " परन्तु हुज़ुरांत साम्प्रत खर्चाची तक्लीफ बहुत आहे; यास्तव लाचारगी आहे " ( राजवाडे १०।२७३ ).

**लाचारी** ( स्त्री० ) निरुपाय; दैन्य. "लाचारीस मात्र कूच करून चाललों " ( राजवाडे १२।७९ ). " हल्ली लाचारीमुळें वाट खर्च व सवारी व पोशाक वगैरे सरन्जाम कर्ज–वाम करून तयार केले " ( पद्मव १०१ ).

**लाज़म; लाज़ीम** [ अ० लाझिम् ] योग्य. " हमेशा खत्–किताबतीचा सिलसिला जारी असावा हें लाज़म आहे " ( खरे ७।३५६४ ).

**लाज़मा** ( पु० ) [ अ० लाझिमा ] कर; हक्क.

**लाज़वर्त** ( न० ) [ फा० लाज्वर्द् ] नीलमणी. " मोतें काहली आणि हुर्मोज़ । लाज़ावर्तें पांवळीं " ( मेस्तक–४१).

**ला–जबाब** [ फा० ला–जवाब् ] निरुतर. " म्हणून यांसी यथा मतीनें बोलून लाज़बाब केलें " (राजवाडे १२।२२).

**लाथ; लत्ता** ( स्त्री० ) [ फा० लत् ] पादाघात. " हृदयावरी मारिली लात " ( मुक्तेश्वर-विराटपर्व ३।६५ ).

**लायक** [अ० लाइक् ] पात्र; योग्य. " ज़मीन पडीत ज़मा–खेरीज़ लायक–जिराईत " ( वाड–सनदा ९१ ).

**लायकी** ( स्त्री० ) [ फा० लायकी ]पात्रता योग्यता; कर्तृत्वशक्ती.

**लायनी** ( स्त्री० ) [ अ० लअन् ] अपशद्धभाषण. "रयतीस लायनी सिवीगाली न करणें व तश्वीस न देणें " ( राजवाडे १६।२९ ). " लायणी–बद्गोई केली" ( राजवाडे २०।२२० ).

**लाल** ( पु० ) [ अ० लअल् ] माणिक.

**लाल** [ फा० लाल् ] ताम्बडा; सुर्ख.

**लाली** ( स्त्री० ) रक्तिमा.

**ला–वलद** [ अ० लावलद् ] निपुत्रिक. " तो लावलद; लेकीन हिले हयात असतां मुतबन्ना (= दत्तक) पुत्र घेतला " ( राजवाडे २२।१०३ ).

**लास** ( स्त्री० ) [ फा० लाश् ] प्रेत; शव; मुड्दा.

**लिफाफा** ( पु० ) [ अ० लिफाफा ] पत्रवेष्टन.

**लिभास** ( पु० ) [ अ० लिबास् ] पोशाक. " वाटे लाविला, दिला घरस्वामीचा लिभास " ( होनाजीबाळ १६५ ).

**लिबासी** [ फा० लिबासी ] कृत्रिम; तक्लुबी. " हे नक्कल लिबासी आहे " ( राजवाडे २०।६२ ).

**लुक्का** ( पु० ) [ अ० लुक्का ] नीच धूर्त मनुष्य; लुच्या.

**लुक्सान** ( न० ) नुक्सान.

**लुङ्गी** ( स्त्री० ) [ फा० लुङ्गी ] काचा; पश्चा; पायज़मा.

**लुचा** (पु०) [फा० लुचा व्यसनी, बद्फैली] ठक; काफर; सोदा.

**लुचाई; लुचेगिरी** ( स्त्री० ) धूर्तता; ठकबाजी.

**लुत्रा** ( पु० ) [ फा० लुत्रा ] चोम्बडा; चुगल्खोर; बड्बड्या.

**लुत्फी** [ ८ अ० लुत्फ् = मेहेर्बानी ] कृपादत्त ( वाड-मा ३।१०९ ).

**लेकीन** [ फा० लेकिन् ८ अ० लाकिन् ] पण; परन्तु.

**लेज़ीम** ( न० ) [ फा० लेझम् ] धातूच्या चकत्या ओंवलेली लोखंडी सांखळी ज्यास अडकविली आहे असें व्यायामाचे धनुष्याकृती हत्यार.

**लेहाज़ा** [ अ० लिहाझा ] म्हणून; सबब ( राजवाडे १०।१२८ ).

## व

**वक्त; वख़्त; वखत** ( पु० स्त्री० ) [ अ० वख़्त् ] काळ; वेळ.

**वख़्त-ग़ैर-वख़्त** वेळीं अवेळीं; अवेळीं. " *अम्बारखाना चाडूगला वख़्त-ग़ैर वख़्त कामा आला*" ( भाइसम १८३४ अहवाल ४९ ).

**वक्त-गुज़राण** ( स्त्री० ) काल-क्षेप. " परागन्दा होऊन परमुलकास जाऊन वख़्त-गुज़राण करीत असतां " ( राजवाडे १५।३१८ ).

**वक्त-शीर** वेळेवर.

**वक्फा** ( पु० ) [ अ० वक्फा ] थाम्बणूक; मुक़ाम. " वीस दिवस कमठाण्यावर वक्फा " ( राजवाडे ७।८६ ).

**वक्र; वकर** ( पु० ) [अ० वकार्] प्रतिष्ठा; नक्श. " यांत श्रीमन्तांचा वक्र काय राहिला ! " ( खरे १।४०७ ). " आपला वकर नाहीं " ( राजवाडे ६।४१९ ). " कमाविसदार यांचा वकर किमपि नाहीं यामुळें दाब रहात नाहीं " ( मद्बा २।५० ).

**वकफीयत** ( स्त्री० ) वाकफीयत पहा.

**वकालत** ( स्त्री० ) [ अ० वकालत् ] शिष्टाई; वकिली. " सेवकास वकालतीचे जाबसाल लिहावयास प्रयोजन नाहीं " ( राजवाडे ११५ ).

**वकायनिगार; वकायेनिगार** ( पु० ) [ फा० वकाइअ-निगार् ] वृत्तान्त लेखक; वाकनीस; अख्बारनीस. " सर्व वकायनिगार चहूंकडे खबरा लिहितात " ( राजवाडे ६।४१९ ). " गुलाम अहमद् वकायेनिगार... ..कर्जदारांनीं अटकाऊन ठेविले होते " ( दिमरा २।८५ ).

**वकाया** ( स्त्री० ) [ अ० वकाइअ अनेक व० वाकिआचें ] वृत्तान्त. " पासा वकायाच्या फर्दा रोज़च्या पाठविल्या " ( दिमरा १।१२४ ).

**वकिली; वकीलत** ( स्त्री० ) वकिलाचा पेशा; शिष्ठाई; प्रतिनिधित्व.

**वकील** ( पु० ) [ अ० वकील् ] प्रतिनिधी; मुख्त्यार; न्यायसभेंत एका पक्षाचें म्हणणें पुढें माण्डणारा; राज्याचा इतर राजदर्बारीं असलेला प्रतिनिधी.

**वकील-मुत्लक** ( पु० ) [ फा० वकील्-इ-मुत्लक् ] कुल्-अख्त्यारी वकील. " कर्नल मज़्कुरास वकील-मुत्लक व व आमचे ठिकाणीं जाणून, त्याचें केल्यास आमचें व कुम्पनीचें केलें जाणावें " ( ऐटि २।१४ ).

**वकील-मुत्लकी** ( स्त्री० ) वकील-मुत्लकाची पद्वी व काम. " श्रीमन्त पन्तप्रधान यांचे नांवें वकील-मुत्लकी व मीर-बक्शीगिरी हे दोन्ही पर्दे देऊन त्यांची नायबत आम्ही तुम्हांस देतों " ( दिमरा १।१०९ ).

**वकूब** ( पु० ) [ अ० वुकूफ़ ] ज्ञान; अक्कल; कर्तृत्वशक्ति.

**वकूब्दार** [ फा० वुकूफ्दार् ] जाणता; सूज्ञ; काबील " तुझा जाणता मातबर भाऊ वकूब्दार असेल " ( राजवाडे २०।६४ ).

**वग** ( स्त्री० ) [ अ० वक्अ ] प्रतिष्ठा; पत; वशिला. " जगजीवनाची बहीण खांसा सुन्द्राबाई दमाजीच्या भावास ( दिली ) आहे; तिकडे यास वग-मोठी आहे " ( पारसनीस-ब्रप २५७ ).

**वग-वशिला** ( पु० ); **वग-वसीलत** ( स्त्री० ) पत-मध्यस्थी. " आमचा वग-वशिला पायांखेरीज़ नाहीं "

( खरे १।१७८ ). " दर्बारीं यांचा वग-वशिला कोणी नाहीं" (खरे ६३२). " परन्तु वग-वसीलतीमुळें भिडेनें कागद्-पत्र करून घेऊन ज़ोरावरीनें वतन खातात " ( वाड-सनदा १४३ ).

**वगैरे; वगैरा** [ अ० वघेरा ] आणि इतर; इत्यादि.

**वज़न** ( न० ) [ अ० वज़्न् ] गुरुत्व; तोल; इज्ज़त; प्रतिष्ठा.

**वज़न्दार** [ फा० वज़्न्दार् ] जड; तोल्दार; प्रतिष्ठित. "वज़न्दार गणोजी ताण्डेल" ( चित्रगुप्त १२४ ).

**वज़्नी** [ फा० वज़्नी ] तोलण्याचा.

**वज़ा** (स्त्री०) [ अ० विदाअ ] पाठवणूक. " कोणाचे हुनर कैसे असतात हें कळत नाहीं; या करितां वरचेवरीं गडाखालेंच ज़ाब्साल देऊन वज़ा करीत जावें " ( राजवाडे ८।९१ ).

**वज़ा** ( स्त्री ० ) [ अ० वज़्अ ) वर्जन; वज़ा-बाकी; कमी करणें.

**वज़ा; वज़े** ( स्त्री० ) [ अ० वज़्ह् ] तऱ्हा; प्रकार. " मुम्बईस तोतया येत असतां तुम्ही दस्तगीर करून नेला याची वज़े काय ? " ( खरे ७।३५७१ ). " फौज़ेचा गाहा बरे वज़ेनें राखून " ( राजवाडे ८।१६७ ). "तुझे बाबें नरसो दामोधरें हुज़ूर हलाल्खोरी बहुत वज़ा साङ्गितली " ( राजवाडे १५।३१ ). —वजा= तुल्य; प्रकारचा;- काडी-वजा वगैरे.

**वज़ाई** ( स्त्री० ) [ अ० वज़्अ ] खालच्या दर्ज़ावर आणणें. " रिसाल्या सम्बन्धानें बहाली, बडूतर्फी, तरक्की किंवा वज़ाई करण्याचा पूर्ण हक्क तुम्हांकडे राहील " ( राजवाडे ७।१५ ).

**वज़ाबाकी** ( स्त्री० ) वर्जन; वज़ा.

**वज़ारत** ( स्त्री० ) [ अ० विज़ारत् ] वजिरी; प्रधानकी.

**वज़ारत्-मआब** वजीर; एक पदवी.

**वजीरत; वजिरी** ( स्त्री० ) दिवाणगिरी. " वजिरात " ( दिमरा २।१३ ).

**वजीर** ( पु० ) [ अ० वज़ीर् ] प्रधान.

**वतन** ( न० ) [ अ० वतन् = जन्मभूमी ] " जात, धन्दा, वंशपरम्परागत काम, चाकरी, नेमणूक, उत्पन्न, अधिकार, मानपान, हक्क वडिलोपार्जित मिळकत स्थावर अगर स्थावराच्या योग्यतेची जङ्गम मालमत्ता; जन्मभूमी या सर्वांस वतन शब्द लावतात " ( गांवगाडा १६ ).

**वतन्दार** ( पु० ) " सर्व गांवकऱ्यांना, मग ते कोणत्याही धन्द्यावर पोट चालवोत, वतन्दार ही सामान्य संज्ञा आहे " ( गांवगाडा १५ ). " वतन्दारांचीं वतनें वतन्दारांच्या दुमाला केल्या विरहित पोट-तिडीक लागोन मुलूक मामूर होत. नाही ऐसें कळों आलें " ( राजवाडे १६।४४ ).

**वतनी** जिथें वतन आहे अगर जन्म झाला तें.

**वफा** ( स्त्री० ) [ अ० वफा ] इमानीपणा.

**वफादार** [ फा० वफादार् ] इमानी.

**वफादारी** ( स्त्री० ) इमानीपणा. " तुम्ही इमानें इतबारें वफादारीनें चालोन चाकरीची खबरा ठेवाल तों पावेतों जहागीर बे-खल (ल)चालेल " (म-म-व १६ ).

**वफात** ( स्त्री० ) [ अ० वफात् ] मृत्यू.

"बाटेत लस्लीन वफात पावले" (खरे ७।३५७३).

वर [ फा० बर् ] उपरि.

वर्क; वर्ख (पु०) [अ० वरक् ] पृष्ठ; पान; धातूचा कागदासारखा पातळ पत्रा; तगट. "दुसरी अख्बार चिनापट्टणाहून सौदागरांनीं लिहिली त्याचा एक वर्ख" (राजवाडे ७:२२).

वर्ज़ोर [ फा० बर्ज़ोर् ] कडक. "वर्ज़ोर नतिजा" (राजवाडे १५।३८१).

वर्म (न०) [ ?अ० वर्म् ] गळूं; नाज़ूक जागा.

वरात (स्त्री०) [अ० बरात् ] हुण्डी; चेक.

वरावर्द (स्त्री०) [फा० बरावर्द् ] अन्दाज़; हिशेब; गणना.

वल्लद; वलद (पु०) [अ० वलद् ] पुत्र. "सूरज वल्लद बापू जोशी ज्योतिषी वतन्दार जुन्नर" (बाड–सनदा ८५).

वल्ली; वली (पु०) [अ० वली ] साधू; वेडसर; विक्षिप्त; वेडा–पीर.

वली–न्यामत [ अ० वली–निअमत् ] श्रीमन्त. "वलीन्यामत रावसाहेब पण्डित प्रधान" (राजवाडे १०।१६५).

वली–हद; वली–अहद (पु०) [ अ० वली–अहद् ] राज्यवारस; युवराज. "वली–अहद" (राजवाडे १।३६३). "त्याचे पुत्रास बाहेर काढून वली–हद केलें" (राजवाडे १।३६२).

वली–हद्दी (स्त्री०) युवराज–नेमणूक; यौवराज्य. "अली गोहर याचे पुत्र बाहेर काढून वलीहद्दी करावी हा निश्चय होऊन शुक्रवारचा मुहूर्त करार केला आहे" (राजवाडे १।३६३).

वश्यत–नामा (पु०) [ फा० वसीयत्–नामा ] मृत्युपत्र. "खण्डेराव रास्ते यांनीं मरते वेळेस मी जवळ नसतां वश्यत्–नामा केला त्यांत मला मुख्त्यार लिहून ठेविलें" (भाइसम १८३८ अहवाला ९).

वशिला (पु०) [ अ० वसीला ] मध्यस्थ; मध्यस्थी; शिफारस. "त्यास वशिला करून" (राजवाडे ३।५५).

वशिला–वग (स्त्री०) मध्यस्थी. "हिमायत म्हणावी तर, वशिला–वगा म्हणावा तर स्वामी खेरीज़ आमचा, आमची गोष्ट बरी–साङ्गेसारखा कोणी नाहीं" (राजवाडे ३।१२३).

वस्तरा; वस्त्रा (पु०) [ फा० उस्तरा ] हजामतीचा चाकू; वाखर.

वस्ताद (पु०) [ फा० उस्ताद् ] गुरू; मर्मज्ञ; निष्णात; धूर्त; कावेबाज़. "वस्ताद गङ्गु हैबती तेथिल रहिवाशी" (प्रभाकर १९४).

वस्ताद–गिरी (स्त्री०) धूर्तता; कावेबाजी.

वस्तादी (स्त्री०) [ फा० उस्तादी ] प्राविण्य; मर्मज्ञता. "पीळ–पेच अर्थ अक्षरांत वस्तादीचे" (प्रभाकर ६२).

वस्तू [ अ० वासिता = माध्यम ] कडून; गुज़ारतीनें. "यांचें वस्तू आपले सर्बरा होऊन साध्य घडावयाचें नाहीं" (मराचिस १४).

वस्वास; वस्वसा (पु०) [ अ० वस्वास्, वस्वसा ] भीती; काळजी; पर्वा; संशय; अन्देशा. "जहाले कामाचा वस्वसा न धरितां समयीं महाराजांचा मनोरथ सिद्धीस नेणें" (चित्रगुप्त ५).

वस्वासी संशयी. "आईसाहेब (= ताराबाइ) वस्वासी फार" (साने–पयाव १२३).

**वसुली** वसुलासम्बन्धी.

**वसूल** ( पु० ) [ अ० वुसूल् ] आवक; उत्पन्न; उगवणूक. " वुसूल " ( राजवाडे १५।२०६ ).

**वसूल-बाकी** ( स्त्री० ) वसूल न झालेली उगवावयाची रक्कम.

**वसे** ( स्त्री० ) [ अ० वुस्आ ] विस्तार. " किल्याची वसे पाहून खुद्द आले " ( खरे ११।६१३२ ).

**वहमा** ( पु० ) [ अ० वाहिमा ] भय; धाक. " करवीरच्या राजकारणाचें दृढीकरण जाहलें म्हणजे यजमानांस वहमा पडेल कीं यांस भारी आसरा जाहला " ( खरे ११।१७२ ). " त्यांची फौज़ व तुम्ही मिळोन राहिला तरी यांसही वहमा पडेल " ( खरे ११।२४२ ). " येथें सर्कारांत वहमा पडला कीं ... भाऊ साहेब यांचें त्याचें सूत्र एकविचारें आहे " ( खरे ११।५७५६ ).

**वहिमी** संशयखोर; संशयास्पद. " वहिमी जाती मध्यवस्तींत ठेवणें धोक्याचें असतें " ( गांवगाडा ४ ).

**वहीम** ( पु० ) [ अ० वह्म् ] संशय; शङ्का.

**वाकई** [ फा० वाकिई ] दुरुस्त; योग्य. " सर्कारांतूनही कुलाहू-पोशांस तम्बी वाकई अमलांत येईल " ( साने-पयाव ४६६ ).

**वाकनीस; वाकेनीस** ( पु० ) [ फा० वाकिआ-नवीस् ] अखबार्नवीस; वकायनिगार. " वाकेनीस " ( राजवाडे ६।५०९ ).

**वाकब, वाकफ; वाकीफ** [ अ० वाकिफ् ] जाणता; हुशार; तज्ज्ञ; माहीत; ठाऊक. " माझे चालीस व कामास वाकब या मुलखांत जे साहेब लोक आहेत तेच मजवर वहीम धरूं लागल्यास पुढें नावाकब सर्दार येतील तेव्हां मुश्कल पडेल असें मनांत आणून मी लिहिलें आहे " ( भाइसम १८३८ अहवाल ९ ). " मुशीरुल्मुल्कासारखा ज़बर्दस्त, त्याची अवस्था काय झाली हें वाकफ " ( राजवाडे ५।१६८ ).

**वाकफीयत** ( स्त्री० ) [ अ० वाकिफीयत् ] माहिती. " पागेचे कामांत महमद् अजीम्खां यांचीच वकफीयत चाङ्गली' ( राजवाडे ७।५६ ).

**वाकफगार** जाणता; हुशार. " वाकफगार " ( खरे ११३९९ ).

**वाकफगारी** ( स्त्री० ) माहीतगारी; हुशारी. " तुम्हांस वाकफगारी आहे " ( राजवाडे १२।६१ ).

**वाका** ( पु० ) [ अ० वाकिआ ] वर्तमान; हकीगत; मृत्यू. " ते समयीं वाकू निसांनीं महाराज बोलिले प्रमाणें वाकाही लिहिला " ( चित्रगुप्त १३७ ). " मातुश्री हैदराबादेंत बे-आराम होती तिचा वाका जाल्याचें वर्तमान आलें " ( राजवाडे ७।८३ ).

**वाका फौत** ( स्त्री० ) मरण. " २७ जिल्कादीं पादशाची वाका-फौत जाली " ( राजवाडे ११।५५ ).

**वाकीफ** जाणता; वाकफ; माकूल; माहीत. " सदर्हू मज़्कुराचे राजश्री रामचन्द्रपन्त वाकीफ आहेत " ( साने-पयाव ३३४ ). " आपाजी मनुष्य काम-चङ्ग, मोगलाईत वाकीफ आहे " ( राजवाडे ८।२१४ ). " स्वभाव स्वामीस वाकीफ आहे " ( राजवाडे १।१३१ ).

**वाखा** ( पु० ) [ अ० वाकिआ ] अनर्थ; घोर संकट; युद्ध; संहार; महामारी.

" बेलोलखानाचा थोर वाखा केला " ( सभासद ४९. ) " धन्याचा हात पावेना असें झालें तरीं परिच्छिन्न मामलेदारादि लोकीं वाखा होऊन मरावें " ( मराआ ३१ ).

**वा-गुज़ास्त** ( स्त्री० ) [ ∠ फा० वा-गुज़ाश्तन् ] सोंपवणूक. " ठाणीं वा-गुज़ास्त करावीं म्हणून असदअली-खानाचीं पत्रें येतात " ( राजवाडे ५। १३२ ). " कितेक गांव आपले तस-रुफांत आहेत ते इकडील अमिलाकडे वा-गुज़ास्त करावयाची ताकीद यावी" ( राजवाडे ७।९६ ).

**वाज़्-पूस; वाज़पुशी** ( स्त्री० ) [ फा० बाज़पुर्स ] चौकशी; विचारणा. " साव-कार येथें कोण आहेत म्हणून वाज़्-पूस करावयास लागले " ( खरे ८। ३९७४. ) " त्यांची यांची गांठ पड-ल्यावर स्वारांनीं वाद्-पुसी केली, तेव्हां ज़ाब्सालांत अन्तर पडलें" ( खरे १। ४२८ ).

**वाज़बुल्-अर्ज़** ( स्त्री० ) [ अ० वाजिबु-ल्अर्ज़् ] लेखी आज्ञा. " वाज़बुल्अर्ज़ पातशहापासून दस्खत करून मागितली" ( दिमरा १।८६ ).

**वाजवी; वाजीब** [ अ० वाजिब् ] न्याय्य; रास्त; मुनासब. "तें करणें वाजीब व ला-जीम आहे " ( राजवाडे १०।२८० ).

**वाज़े; वाज़ेह** [ अ० वाझिह् ] स्पष्ट; विशद. " वाज़े मरातब कृष्णराव यास कलमी केले त्यावरून वाज़े होईल " ( राजवाडे १०।१६७ ). " व सदाकत्-दस्तगाह मज़्कूर लिहिताल त्यावरून वाज़ेह होईल" ( साने-पयाव ४६७ ).

**वाद्गार; वाद्गारी** [ फा० याद्गार ] स्मारक; स्मृतिवश " जो. उपकार आपण करितील तें आपलें नांव राहील वाद्गारी " ( राजवाडे ६।६०२ ).

**वा-पस** [ फा० वापस् ] परत. " अम्मल मुम्बईकरांनीं कोलूकराराखेरीज़ कब्ज़ा केला तो वापस करवितों " ( खरे ७।३ ५७२ ). "नारोपन्त यास वापस साहेबां-जवळ पाठविलें असे" (खरे १२।६८१५).

**वायदा; वाईदा** ( पु० ) [ अ० वअदा ] वचन; मुदतीचा ठराव. "सोळा दिवसांचा वाईदा करून गेले आहेत " ( खरे ४। १८३१ ). " कदाचित् फौज दूर न जाहली तरी वाईदा होनांच श्रीमन्तांसी आम्ही गांठ घालावी " ( खरे ५।२६ १० ).

**वायदे-बन्दी** ( स्त्री० ) मुदत-शीर फेडीचा ठराव. " याशी वायदेबन्दी मार्गेश्वर अखेर ५०० रुपये, पौष अखेर ५०१ " ( वाड-बाबा २।५ ).

**वायाब** [ फा० वायाब् ] प्रवेशाची पर्वानगी मिळालेला.

**वार्याबी** ( स्त्री० ) [ फा० वार्याबी ] भेटीची पर्वानगी; राबता. " तो दिवस रात्र दौलाची प्रकृत अस्वस्थ; कोणाची वार्याबी नाही " ( राजवाडे ७।१११ ).

**वारद; वारीद** [ अ० वारिद् ] प्रविष्ट; दाखल; प्राप्त. " खैरीयत खत-खलिता वारीद होत नाही " ( राजवाडे ३।९० ). " तेव्हां एका दौलतीवर कांहींएक विचार येऊन वारद जाला तर त्याचे परिहाराची तद्बीर दुतर्फाचे विचारें होत आली " ( राजवाडे ५।८५ ). " नाना-प्रकारचे अन्देशे येऊन वारद होतात " ( राजवाडे ७।१८६ ). " जयपूरवा-

त्याचें पारिपत्य करावें तों शिरावर बर-सात वारद झाली " ( होके १२ ).

**वारस; वारीस** ( पु० ) [ अ० वारिस् ] वडिलोपार्जित सम्पत्तीचा हक्कदार; मालक; वाली; कैवारी. " पाटील बाबा ज़मिनीचा वारस होऊं पाहतो " ( जोरा ११७ ). " गरीब-गुरचांचा वारस ईश्वर आहे" ( चिरा ४७ ).

**वारसा; वार्सा** ( पु० ) [ अ० वर्सा ] वंशपरम्परागत आलेली सम्पत्ती; अशा सम्पत्तीवरील हक्क; मालकी. " मामलत देत असतां ज़मिनीचा वार्सा करूं लागले " ( जोरा १३० ).

**वारिस्-दार** ( पु० ) हक्कदार; वारस. " या नूतन हक्कास वरकड तुमचे वारीस्दारांस समन्ध नाही " ( राजवाडे १७।४३ ). " या दौलतींत आमचे कांहीं नाही! हेच वारीस्दार!" ( मद्या १।८४ ).

**वाला-कदर** [ फा० वाला-कद्र ] उच्च पदवीचा ( राजवाडे १५।१७१ ).

**वाला-जाह** [ फा० वाला-जाह् ] उच्च पदवीचा ( राजवाडे १५।३६३ ).

**वाला-जाही** ( स्त्री० ) थोर-कीर्ति; प्रसिद्धी. " जिकडे इन्साफ तिकडे फत्ते, हे वालाजाही झाली व ज़हुरांत आलें " ( खरे ७।३५७२ ).

**वाला-मनाकब** [ फा० वाला-मनाकिब् ] थोर-गुणांचा ( राजवाडे ३।४५१ ).

**वाला-शान** [ फा० वाला-शान् ] वाला-जाह.

**वाली** ( पु० ) [ अ० वाली ] धनी; कैवारी; रक्षणकर्ता. " ही लूट नौतिची लाली, तूं माझा वाली, इश्काची शिपायावाणी बान्धलिस ढाली" (होनाजीबाळ ९४).

**वास्त-पुस्त** ( स्त्री० ) वाज़पूस; चौकशी.

**वास्ता** ( पु० ) [ अ० वासिता ] मध्यस्थी. " तुमचे वास्ता दर्म्यांन आहे याज करितां तहमूल जाला, नाही तरी यांचा तदारूक करणें लाज़म आहे " ( राज-वाडे २२।६१ )

**वास्ते** [ अ० वासिता ] साठीं. " कित्येक पोशीश मस्लतीच्या मज़्मुनावास्ते अज़म राघो विठ्ठल यांस फिरस्ताद् केले असत" ( साने-पयाव ३८७ ).

**वासलात** ( स्त्री० ) [ अ० वासिलात् = एका बाबीखालीं आलेल्या सर्व रक-मांची ज़मा ] हिशेब; निकाल. " तहा पासोन वासलातीचा ऐवज़ही माघारा देविला " ( राजवाडे ७ खलप ११५ ).

**वाहदीयत** ( स्त्री० ) [ अ० वाहिदीयत् ] ऐक्य; स्नेह. " दोही दौलतीची असी वाहदीयेत " ( राजवाडे ७।१५२ ).

**वाह! वाह!** [ फा० वाह् ] ओहो!

**वाहवा** ( स्त्री० ) [ फा० वाह्वाह् ] शाबा-सकी; स्तुती; शाबास!

**वाही** [ अ० वाही ] खोटें; निष्प्रमाण. " सदाशिव रड्डी अलाहिदा राहिल्याचें तहकीक किंवा वाही वर्तमान हें खचित समजल्यावर मागाहून विनन्ती लिहि-ण्यांत येईल " ( राजवाडे ५।१९९ ).

***विज़ार*** *( स्त्री० ) [ अ० इज़ार ] पायज़मा.*

**विदा** ( स्त्री० ) [ अ० विदाअ ] पाठवणूक. " त्यांची विदा मुहूर्तेकरून बाहेर केली" ( राजवाडे १०।४२२ ).

**विमा** ( पु० ) [ फा० बीमा ] ठराविक मुदतींत जिवास अगर मालास अपाय झाल्यास भरपाईबद्दल नियमित रक्कम मिळण्यासाठीं हप्तेबन्दीनें पैसे भरण्याची व्यवस्था.

**विराकत; इराकत** ( स्त्री० ) [ अ० इराकत् ] लब्धी.

**विलायत्; विलायती** ( स्त्री० ) [ अ० विलायत् ] प्रान्त; परदेश; इङ्ग्लण्ड; युरोप. " शहाजी महाराज...चित्रदुर्गांत विलायतीमध्यें...मृत्यू पावले " ( सभासद् ५२ ). "विलायती खराब पडली होती, त्यास रयतेस धीर भरंवसा देऊन वसाहत केली आहे " ( वाड-सनदा १७४ ).

**विलायती** परदेशी; विचित्र.

**वैराण** [ फा० वैरान् ] उध्वस्त; पडीत; ओसाड.

**वैराणी** ( स्त्री० ) [ फा० वैरानी ] गैर-आबादी; नासाडी, ओसाडी. " त्या मुलखाची दशा आबादी-वैराणीची काय पहावी "! ( ऐटि ५।११ ).

## श

**शक** ( पु० ) [ अ० शक्क् ] शङ्का ( इम १९८ ).

**शक-अन्देशा** ( पु० ) संशय; भय. " कोणेविशीं शक-अन्देशा न धरणें " ( राजवाडे १५।६४ ).

**शक-शूभ** ( पु० ) [ ८अ०शुब्ह ] शङ्का; संशय. " शक-शूभ दिलांत न आणितां करार-बमोजीब खातर्जा सज़ा करावी " ( साने-पयाव ४६६ ).

**शक्-दील** साशङ्कचित्त. " रयत शक्दील होऊन तज़ावज़ा जाली आहे " ( पारनीस-ब्रच २७ ).

**शक्कल; शकल** ( स्त्री० ) [ अ० शक्ल् ] योजना; व्यवस्था; स्थिती; प्रकार. " बन्दोबस्ताची शकल आणि तद्बीर नेक असेल ती करावी " ( राजवाडे ५।८० ). " इकडूनही हे शक्कल जलद नमूदांत यावी म्हणोनं पत्रें जातात " ( साने-पयाव ४७७ ). " गांवची हे शकल ! व करोडचे दर्माईचाही कांहीं ठीक नाहीं " ( राजवाडे ६।५९२ ).

**शकस; शख्स** ( पु० ) [ अ० शख्स् ] माणूस. " कदाचित् शास्त्रमार्गाप्रमाणें एकादी सतीं गेली आणि पुन्हां अग्नींतून बाहेर निघाली तर तिला जो कोणी ज़बर्दस्ती करून आंत टाकील किंवा तोडून टाकील त्या शक्सास आम्ही खुनी असा जाणून त्याचें परिपत्य मुनासब आहे त्याप्रमाणें केलें जाईल " ( ऐटि २।३५ ). " तर्फेन दोस्तीची तरकी व्हावी, याजकरितां एक मातबर शकस रवाना करितों " ( खरे ७।३५६९ ).

**शकी** [अ० शकी] दुर्दैवी. "लढाई होऊन बाराभाई यांची फौज गारत होऊन पाण्डुरङ्ग शकी वगैरे ना-सर्दार पाडाव आलेला मज्कूर आपणासही मालूम जहाला असेल" ( साने-पयाव ३८५ ).

**शङ्कर-पाळा** ( पु० )[ फा० शकर्पारा ] एक गूळ, तूप, कणकीचा तळीव पदार्थ.

**शदत** ( पु० ) [ अ० शिद्दत् ] सक्ती, ज़ोर. " बिल्कैल या मुलकांत बारिशेचा शदत फार आहे ", ( राजवाडे १०।१८२ ).

**शब्खून** ( पु० ) [ फा० शब्खून् ] रात-छापा. " सर्कारच्या फौजांवर शब्खून घालावा हा इरादा इङ्ग्रजांनीं करून रात्रौ पोख्त सरन्ज़ामानसी चालून आले" ( राजवाडे १९।८० ). " रात्रौ त्या पल्टणांनीं दुसरे मार्गें येऊन शब्खून

घातला " ( राजवाडे १९।९४ )· "शकुनास फिरङ्गी हुशार " ( खरे ८।४३५६ ). " इसामिया याजवर' शकून पडल्याचें वर्तमान उठलें होतें " ( राजवाडे ५।९३ ).

शर्त ( स्त्री० ) [ अ० शर्त् ] अट; नियम; पैज; कर्तव्यता; कसोशी; पराकाष्ठा. " आईसाहेबांस शपथ दिली ती शर्त करणें ती केली" ( मराचिथोशा २६ ). " किल्याचे लोक मुरारबाजी पडला म्हणोन गणना न करितां शर्तीनें भाण्डूं लागले " ( सभासद ३४ ). " गोविन्द महादेव याणें ब्राह्मण होऊन शिपाई पणाची शर्ती केली " ( वाड-सनदा २०१ ). " श्रीमन्तांचे बुद्धीची शर्त आहे " ( खरे ९।४८४४ ).

शर्त-नामा ( पु० ) [ फा० शर्तनामा ] तह; कराऱ्नामा ( इम १० ).

शर्त-बे-शर्त शर्तीनें. " फिरून चालून येण्याची उमेद् धरावी तों सदाशिव-पन्तांनीं कुतऱ्-तोड करून सर्व शत्रूंस आपल्या लष्करांत शर्तबेशर्त करून दामटून घातले " ( पाव २५ ).

शर्त-मर्दी ( स्त्री० ) शौर्य-पराकाष्ठा. " सेवा शर्त-मर्दीनें केली " ( खरे ४। १८०८ ).

शर्थ ( स्त्री० ) शर्त; कमाल; पराकाष्ठा; हट्ट.

शर्बत्-खोरी ( स्त्री० ) वाङ्निश्चयाचा फलाहार. " सैफन्मुलूक यांची कन्या साहेब-जादे यांस देण्याचा निश्चय होऊन ... शर्बत्-खोरी जाली " ( राजवाडे ७।१४८ ).

शर्मिन्दगी ( स्त्री० ) [ फा० शर्मन्दगी ] लाज; लजीलपणा. " हल्लीचे शिकस्तेची गैरत आणि शर्मिन्दगी नवाबास फार जाली आहे " ( राजवाडे ५।१९ ).

शर्मिन्दा [ फा० शर्मन्दा ] लज्जान्वित; ओशाळा. " चाकरी करून शर्मिन्दे व्हावे यांत कांहीं लौकीक नाही " ( खरे ४।१८२१ ).

शर्यत ( स्त्री० ) [ अ० शर्त ] पैज; शर्थ; घुरशीची दौड. " शर्यतीनें लोक भाण्डूं लागले ".( मदरु १।४७ ).

शर्यत ( स्त्री० ) [ अ० शरीअत् ] इस्लाम धर्मशास्त्र.

शर्यत्-पन्हा इस्लामधर्मशास्त्रज्ञ. " शर्यत्पन्हा काजी मुहमद् " ( राजवाडे १८। ७६ ).

शरा ( पु० ) [ अ० शर्अ ] इस्लामधर्मशास्त्र; शास्त्रनिर्णय. " दावे तेथील शरा -अन्वये फैसले करीत जाणें " ( वाड-सनदा ७६ ). " कागद्-शराचा करून दिला " ( वाड-शाछ १८३ ).

शराकत ( स्त्री० ) [ अ० शिराकत् ] दोस्ती; सामलात ( राजवाडे ५।११ ).

शराकत-दार ( पु० ) वांटेकरी. " दुसरे कोणास त्याचा हिस्सेदार व शराकतदार न जाणावा " ( वाड-सनदा ७५ ).

शराब ( स्त्री० ) [ अ० शराब् ] मद्य; दारू.

शराबी [ फा० शराबी ] मद्यपी.

शरीक ( पु० ) [ अ० शरीक् ] वांटेकरी; पातीदार; साथीदार; दोस्त. " ज्या अर्थी शिंन्दे होळकर श्रीमन्तांचे शरीक होऊन आम्हासी बदलून गोष्ट साङ्गतील तेव्हां छावणी पडली तरी करून फडशा करणें प्राप्तच आहे " ( खरे ५।२१८५ ). " तेव्हां एवढे मस्लतीस शरीक होऊन तोण्ड पहात

बसावें, कजिया काढावा यांत फल काय? " ( खरे ८।४३१८ ). " तेव्हां जिवानसीं शरीक आहों " ( राजवाडे ८।१६८ ).

**शरीयत्-पुन्हा** शरीअत्पन्हा; इस्लाम धर्मशास्त्रज्ञ. " शरीयत्पन्हा महम्मद हैदर " काजी ( वाड-सनदा ७४ ).

**शशोपन्ज्** ( पु० ) [ फा० शशोपञ्ज् ] सङ्कट; अडचण. " राजाजीही शशोपन्ज़ांत आहेत " ( राजवाडे ५।१०० ).

**शह** ( पु० ) [ फा० शह्=राजा ] बुद्धिबळाच्या डावांत केलेली राजाची अडवणूक व हुसकावणी; धाक; दरारा. " जें कर्तव्य तें सलाबतीनें मातबरीनें आपली इभ्रत शह यांजवरी पडोन नक्श होय तें करावें " ( खरे १।२४० ).

**शहर** ( न० ) [ फा० शह्र् ] नगर. "गांवची हुन्नरी व व्यापारी वस्ती फुगली आणि काळीपेक्षां पाण्ढरी बळावली कीं त्या गांवाची शहरांत गणना होऊं लागते " ( गांवगाडा २ ).

**शहर्-पन्हा** ( पु० ) [ फा० शह्र्-पनाह् ] तटबन्दी; कोट.

**शहा** ( पु० ) [ फा० शाह् ] राजा; अधिराज.

**शहा** [ फा० सियाह् ] कृष्ण. शहा-काळें=काळें कुट्ट.

**शहान् शहा** ( पु० ) [ फा० शहन्शाह् ] राजाधिराज. " तुम्हास किताब मोठा शहानशहा पादशहा जहाला असता " ( मरुद १।१११ ).

**शहाजङ्ग** युद्ध-सम्राट्; एक पदवी.

**शहाजणें; श्यादानें** ( न० अनेक व० ). [ फा० शादियाना ] मङ्गल-वाद्यें. " श्यादानें वाजवून द्वाही फिरविली " ( राजवाडे ६।५९ ).

**शहाज़ादकी** ( स्त्री० ) [ फा० शाह्ज़ादगी ] राजपुत्रपणा. " ज्यादिवशीं पातशहास शहाज़ादकी सुटून पातशाही जाली " ( ऐटि ५१ ).

**शहाज़ादा** ( पु० ) [ फा० शाह्ज़ाद: ] राजपुत्र.

**शहाज़ादी** ( स्त्री० ) राजकन्या. " चान्द-बीबी नामें शहाज़ादी हिनें कमरबन्दी करून दिल्लीचे फौजेसी लढाई बारा वर्षे केली " ( इस १ चान्दबिबी १० ).

**शहा-नामा** ( पु० ) [ फा० शाह्नामा ] फिर्दौसीनें फार्शी भाषेंत लिहिलेला जुन्या राजावलीवर काव्यग्रन्थ.

**शहामत** ( स्त्री० ) [ फा० शहामत् ] धैर्य; विशाद.

**शहारत** ( स्त्री० ) [ फा० शुह्रत् ] प्रसिद्धी; आवई. " तेव्हां पासून कलम्जारीची शहारत पडून स्वारांच्या चुङ्गी येऊं लागल्या " ( हौके ७८ ).

**शहारा; शारा** ( पु० ) [ अ० शअर् ] रोम. " तया प्रस्तावाच्या अङ्गीं शारे भरे सुमनाचे " ( मुक्तेश्वररम्भाशुक संवाद ४४० ).

**शाई** ( स्त्री० ) [ फा० सियाही ] लिहिण्यासाठीं तयार केलेला काळा अगर कोणत्याही रङ्गाचा द्रव.

**शाई-शिरे** ( स्त्री० ) शिर्‍याची शाई ( राजवाडे ८।२१ ).

**शाही; शाई** ( स्त्री० ) [ फा० शाही ] राज्य; अम्मल; पद्धत.

**शाक-बे-शाक; शक-बे-शक** ( पु० ) शङ्का-कुशङ्का; ऊहापोह; चर्चा. " ते याद तुम्हाकडे येणार; त्याजवर

शाक-बे-शाक होय नव्हे होऊन सलाह जाणार " ( राजवाडे ७।८२ ).

**शागिर्द** ( पु० ) [ फा० शागिर्द् ] शिष्य; सेवक; देवपुजेचें साहित्यकरणें, धोतरें धुणें, पाणी भरणें वगैरे कामें करणारा ब्राह्मण.

**शागिर्द-पेशा** ( पु० ) नौकर चाकर.

**शागिर्दी** ( स्त्री० ) [ फा० शागिर्दी ] सेवा. " सखारामपन्त बोलिले होते कीं विठ्ठल सुन्दर याची शागिर्दी करीन परन्तु आपले मनोरथ सिद्धीस नेईन " ( खरे ११३९४ ).

**शाद** [ फा० शाद् ] आनान्दित. " हमेशा खैर्-आफियतचें खत पाठवून दील शाद करीत जावा " ( राजवाडे १९। ९५ ).

**शादमानी** ( स्त्री० ) [ फा० शादमानी ] आनन्द; खुशाली; कुशल.

**शादियानें; शहाजणें** [ फा० शाद्याना ] मङ्गल वाद्यें. "शादियाने वाजवावयाची पर्वानगी जाली " ( दिमरा २।९४ ).

**शादी** ( स्त्री० ) [ फा० शादी ] लग्न समारम्भ; विवाह; निका.

**शान** ( स्त्री० ) [ अ० शअन् ] प्रतिष्ठा; डौल. " त्यांत मजा नाहीं व मैत्रीची शान रहात नाही " ( राजवाडे ३। ३७२ ). " शान कशी दिसते ! खराच कार्भार असल्यास इत्माम छपणार नाही " ( खरे ९।४७६६ ). " सारी शान केवळ लहरी " ( प्रभाकर ).

**शान्-शौकत** (स्त्री०) **शान-शोक** (पु०) [ फा० शान्-उ-शौकत् ] प्रतिष्ठा; थोरवी; डामडौल; भपका. " राज्यावर कायम करून शान-शोकती करितां वसुली बारा लक्ष रुपये आकाराचा मुलूख नेमून देऊन " (मदरु ११५४).

**शाबान** ( पु० ) [ अ० शअबान् ] अरबी वर्षाचा आठवा महिना.

**शाबास** [ फा० शाबाश् ∠ फा० शाद्-बाश् ] सुखी रहा ! वाहवा ! धन्य ! ( स्त्री० ) धन्यता. " शाबास तुमचे खान्दानाची असे " ( राजवाडे १२। १२३ ). " कांहीं शाक-भाजी मागतों ते देतां तुम्ही कष्टी होतां; शाबास तुझा धीर ! " ( पारसनीस-ब्रप ३०२ ).

**शाबाशी; शाबासकी** ( स्त्री० ) [ फा० शाबाशी ] धन्यवाद. " तेव्हां शामसिङ्गानें शाबासी दिली " ( जोरा ८५ ).

**शाबिती** ( स्त्री० ) सिद्धता; प्रस्थापन.

**शाबीत** [ अ० साबित् ] सिद्ध; प्रस्थापित.

**शाबुती** ( स्त्री० ) सुरक्षितपणा; सलामत; अढळपणा. " चिरञ्जीव शाबुतीनें आला हाच लाभ जाणोन " ( खरे ११६६ ). " नियत-शाबुदी " "=सद्बुद्धीचा अढळपणा ( होकै १३).

**शाबूत** [ अ० सुबूत् ] दुरुस्त; व्यवस्थित, प्रस्थापित. " याजकडे तीन खून शाबूत जाहले " ( वाड-बाबा २।५५ ).

**शामत** ( स्त्री० ) शहामत पहा.

**शाम्दान** ( न० ) [ फा० शमादान् ] मेणबत्तीची ठाणवी.

**शामियाना** ( पु० ) [ फा० शाम्याना ] मोठा डेरा.

**शामील; सामील** [ अ० शामिल् ] समाविष्ट. " ज्याणीं बल्वा केला, त्यांत शामील जाले असतील त्यांचेंहि पारिपत्य कारणें " ( राजवाडे ७।४१ ).

**शायद** [ फा० शायद् ] कदाचित्. "शायद गरज़्गो मनुष्याचे साङ्गण्यावर शुबाह व वस्वास राजे साहेबांचे अन्तःकरणांत प्राप्त होईल" (राजवाडे १०।२५१ ).

**शायस्ता** [ फा० शाइस्ता ] योग्य. "ज़मियत शायस्ता पैदा करून" ( राजवाडे १७।१६ ).

**शाल** ( स्त्री० ) [ फा० शाल् ] उञ्ची लोंकरी वस्त्र.

**शास्त** ( स्त्री० ) [ अ० सियासत् ] शिक्षा; दण्ड. "साहेब जे शास्त अथवा गुन्हेगारी घेतील ते आपण कबूल असे" ( राजवाडे १६।१८७ ). "शास्ताखानास शास्त केली" ( समासद २९ ). "कोणी चोरून ठेविली आणि सर्कारास दाखल जाली नाही असें जाल्यास त्या असामीस शास्त करावी; गर्दन मारावी" ( मदरु १।३९).

**शाह-गोश; शाहगोज़** ( पु० ) [ फा० सियाह् गोश् ] रानमान्ज़र; एक पारधी ज़नावर.

**शाहदी** ( स्त्री० ) [ फा० शाहिदी ] साक्ष. "कोणी ज़मीनदार महादजी देस्मूख मसूरकर याची शाहदी याल म्हणजे मारिले जाल" ( राजवाडे १५।१८ ).

**शाहिदी-नामा** ( पु० ) साक्षी पत्र ( वाड-समा ३।६९ ).

**शाहिरी** ( स्त्री० ) [ फा० शाइरी ] कवित्व; कवि-सम्बन्धी.

**शाही** ( स्त्री० ) [ फा० शाही ] राज्य. "सारे शाहींत अस्कारियाचा" ( चित्रगुप्त २० ).

**शाहीद** ( पु० ) [ अ० शाहिद् ] साक्षादार; साक्षी. "आम्ही ईश्वरास शाहिद ठेऊन कर्तव्यार्थ तो करितों" ( राजवाडे ६।६१९ ).

**शाहीर** ( पु० ) [ अ० शाइर ] कवी; पोवाडा-लावणीचा कवी.

**शिक्का; सिक्का** ( पु० ) [ फा० सिक्का ] मुद्रा; छाप; ठसा. "बादशाहाची चाल अशी आहे कीं ... शिक्क्यांत नांव भरावयाचें तें आपले नांवाचीं अक्षरें ज्या आयतेंत ( = कुराण-वचनांत ) किंवा हदीसांत ( = पैगम्बर-वचनांत ) निघतील ते हदीस किंवा आयत त्या शिक्क्यांत भरावी म्हणजे तो शिक्का आपले नांवाचा जाहला" ( वाड-सनदा २३ ).

**शिक्के-कटयार** ( स्त्री० ) अधिकार चिन्हें.

**शिक्के-नसि** ( पु० ) मुद्राधिकारी.

**शिक्ची; शिक्केची** ( पु० ) शिक्का लावणारा ( भाइसम-ससवृ ८५ ).

**शिक्वा** ( पु० ) [ अ० शक्वा ] तक्रार; कागाळी. "न जाणों, पूर्वीं खोजीम कुली खानांहीं गिल्लाशिक्वाही आमचा काय लिहिला असेल ?" राजवाडे ६।६०२ ).

**शिकन्दर** [ फा० सिकन्दर् ] ग्रीक जगज्जेता अलेक्झाण्डर; महाबलाढ्य व पराक्रमी. शिकन्दर ताले = शिकन्दरा प्रमाणें उञ्चीचे ग्रह.

**शिकन्दराची दिवाल** ( स्त्री० ) याजूज व माजूज नांवाच्या रानटी लोकांपासून संरक्षण व्हावें म्हणून शिकन्दरानें एक अत्यन्त भक्कम व बेलाग अशी भिन्त

यान्धली अशी दन्तकथा आहे. हीच ता चिनी भिन्न तर नव्हे ? कारण शिकन्दरानें चीनवर स्वारी केल्याच्या कथा आहेत. " व स्नेहही (नबाबाचा) कायम राहील जैशी शिकन्दराची दिवाळ " ( खरे ८७७ ).

**शिकम** ( न० ) [ फा० शिकम् ] पोट. " चुनांचे भोंसले स्वराज्याचे शिकमांत तेव्हां मिलाफी सलूख करून घेतील हें कयासांत येत नाहीं " ( साने–पयाव ४७७) " फुल्चरीचे मकान फरासिसांचे सिकमांत आहे तें घेऊन बन्दोबस्त करावा " ( राजवाडे ७ खलप ११३० ).

**शिकल** ( स्त्री० ) [ अ० सैकल् ] चकाकी; जिल्हई; पाणी; अब्रू. " ज़ङ्ग लागला न लागला हें पाहून, वरचेवर शिकल करवून " ( भोकु ११ ). " पूर्व क्रमास शिकल राहील " ( होकै ७३ ).

**शिकल्गार** ( पु० ) [ फा० सैकल्गर् ] हत्यारें साफसूफ करून पाणी देणारा (भोंकु ४०). "शिकल्कर" ( खस्वाब ४ ).

**शिक्कल** ( स्त्री० ) [ अ० शक्ल् ] सूरत; तोण्ड; बिशाद; हिक्मत.

**शिकस्त** ( स्त्री० ) [ ∠म० कस्त ∠अ० कस्द् ] पराकाष्ठा.

**शिकस्त** ( स्त्री० ) [ फा० शिकस्त् ] पराभव; मोड; पराभूत; भग्न. " मीर-फैजल्लास त्यांणीं शिकस्त दिल्ही " ( खरे ७८५ ). "इङ्ग्रजांस ऐसी शिकस्ती कोणी दिली नव्हती " ( राजवाडे १०।१३९ ). " राजश्री सुभेदारांकडील लोकाची शिकस्त जाली " ( दिमरा २।१६५ ). " परन्तु "सिवाड" जाया न जाहली व शिकस्तही न जाहली " (वाड–बाबा २।१४४). "सर्कारचे कार्खान्यांतील थोरल्या तोफांची मारगिरी आज रात्रौ सुरू करून दिवाळ शिकस्त जाल्यावर उपरान्तिक हल्ल्याचा बेत ठरेल " ( खरे १२।६२९० ).

**शिकार** ( स्त्री० ) [ फा० शिकार् ] सावज; मृगया.

**शिकार–खाना** ( पु० ) पारधी पशुपक्ष्यांचा सङ्ग्रह; तो ठेवण्याची ज़ागा.

**शिकार-गाह** ( पु० ) [ फा० शिकार्गाह् ] शिकारीची ज़ागा; शिकार. " कमठाणें येथें शिकार्गाहाकरितां नबाब जाऊन राहणार " ( राजवाडे ७।८५ ).

**शिकारी** [ फा० शिकारी ] मृगयेसम्बन्धी; ( पु० ) पारधी.

**शिगूफ** ( स्त्री० )**शिगूफा** ( पु० ) [ फा० शिगाफ् ] फूट, बखेडा; मखेला. "दर्म्यान असे सिगुफेमुळें मोठे मस्लतींत कमती येते " ( राजवाडे १०।१६५ ). " तों दर्म्यान अलीजाह यांचा शिगूफा खडा झाला " ( राजवाडे ५।१२९ ). " याच तऱ्हेने सर्कारांतही राजकारणांची शक्कल करून आं मेहेर्बास कलमी करून सिगोफे बर्पा करितील " ( साने–पयाव ४६६ ).

**शिज्दा; सिज्दा** ( पु० ) [ अ० सिज्दा ] ज़मीनीवर डोकें टेंकून वन्दन.

**शिताब; शिताबी; शिताफी** ( स्त्री० ) [ फा० शिताब् ] त्वरा; चपळाई; कौशल्य; हिक्मत; हिक्मतीनें ( सभासद १७;५७ ). " दिरिङ्ग एक क्षणाचा न करणें बहुत शिताफीनें जाणें " ( भाऐपयाव १०४ ). " तरी देखत आज्ञापत्र जेथें असाल तेथून कूच करून सिताफीनें जाऊन मशार्निल्हेस सामील होणें " ( राजवाडे ६।२१९ ).

**शित्ता; सित्ता** [ अ० सित्त ] सहा.

**शित्तैन; सित्तैन** [ अ० सित्तीन् ] साठ.

**शिनाज़ोरी; सिनाज़ोरी** ( स्त्री० ) [ फा० सीना-ज़ोरी ] धैर्य; सामर्थ्य.

**शिपर; सिपर** ( स्त्री० ) [ फा० सिपर् ] ढाल.

**शिपाई** ( पु० ) [ फा० सिपाही ] सैनिक; चाकर; पट्टेवाला.

**शिपाईगिरी; शिपायगिरी** ( स्त्री० ) [ फा० सिपाहगरी] क्षात्रधर्म; शौर्य; मर्दुमकी; बे-हिक्मती मर्दुमी. " केवळ शिपाईगिरीच करीत नाहीं; हिक्मतीनेंच लढाई करूं " ( ऐटि २।२६ ). " दत्तबांचा स्वभाव शिपायगिरीचा आहे यास्तव रागें करून असमयीं अस्थानीं निकडीस प्रवर्ततील " ( साने-पयाव ३२२ ). " शिपाईगिरीची व मन्सुबेबाज़पणाची शर्त करून यशास पात्र व्हावें ऐसेच आह्मां " ( साने-पयाव ३३३ ).

**शिपाई-बाणा** ( पु० ) लश्करी-बाणा.

**शिफ्ला; सिफ्ला** [ अ० सिफ्ला ] नीच.

**शिफारशी** शिफारस-वज़ा; शिफारशीमुळें वर चढलेला.

**शिफारस; सिफारस** ( स्त्री० ) [ फा० सिफारिश् ] प्रशंसा; तारीफ; वशिला; तारीफ-पत्र. " स्वामीकडील सिफारस आणून कार्य करून घ्यावें " ( राजवाडे १२।१० ). " तेधवां पादशाहापाशीं बहुत शिपारस चन्द्ररायाची जाहली कीं बडे मर्द आदमी आहेत आणि ज़ोरावर " ( ऐस्फुले २३ ).

**शिबन्दी; सिबन्दी** ( स्त्री० ) [ फा० सिह्-बन्दी ] वसुलीच्या कामासाठीं ठेविलेली फौज.

**शिया** एका मुसल्मानी धर्मपन्थाचें नांव. सुन्नी पहा.

**शिर्का; सिर्का** ( पु० ) [ फा० सिर्का ] आम्लासव.

**शिर्चश्मा** ( पु० ) [ फा० सर्चश्मा ] झरा; प्रियजन.

**शिर्ज़ोर** [ फा० सर्ज़ोर् ] उन्मत्त; बण्डखोर.

**शिर्ताज़** ( पु० ) एक मस्तकीं बान्धण्याचा अलङ्कार; मुगटमणी.

**शिर्दीदे** [ फा० सर्-इ-दीदा ] डोळ्यावर; मस्तकीं ( राजवाडे ८।६ ).

**शिर्पाव** ( पु० ) [ फा० सरोपा ] पायघोळ अङ्गरखा; बहुमानाचा पोशाख. " जवाहीर, सिरोपाव वगैरे जिन्साना पाठविला " ( जोरा ८ ).

**शिर्पेंच** ( पु० ) [ फा० सर्पेच् ] पागोट्याला पुढच्या बाजूस बान्धण्याचा एक अलङ्कार.

**शिर्बन्द; शिर्बस्ता** ( पु० ) [ फा० सर्बन्द् ] पागोटें.

**शिरस्ता** ( पु० ) [ फा० सर्रिश्ता ] वहिवाट; नियम; दण्डक.

**शिरस्तेदार** ( पु० ) सर्कार्कून.

**शिरा** [ फा० सिरह् ] उत्तम. " शिरा दारू चाङ्गली " ( साने-पयाव २८५ ). "दिवटे ... शिरा असतील त्यांजकडून" ( साने-पयाव २८७ ). " बेतर्तूद असतां काम शिरा जालें " ( खरे ९। ४६७२ ).

**शिलक** ( स्त्री० ) [ अ० शल्क् ] सर्वत्ती; फेर. " त्यावेळेस इकडून दोन शिलका म्हणजे फैरा एका क्षणांत केल्या "

( राजवाडे ३।१९१ ). " तोफ्खान्याला शिलक दिली " ( साने-पयाव ५४ ).

**शिल्लक** ( स्त्री० ) [ अ० सल्ख् महिना अखेर; फा० सिल्क्-बन्दी मासिक आढावा ] बाकी

**शिलकी** उर्वरित.

**शिलगावणें** [ ∠ अ० शल्क् ] पेटवणें; बत्ती देणें.

**शिल्शिला; सिल्सिला;** ( पु० ) [ अ० सिल्सिला ] सांखळी; सूत्र; सम्बन्ध; परम्परा; ऋणानुबन्ध; युद्धसूत्र; कफला. "मोहबतजङ्ग याजकडे वर्तमान कळविण्याचा शिल्शिला जारी असावा " ( खरे ८।४३५० ). " चहूंकडे शिल्शिला; त्यापक्षीं कांहीं सामान जवळ पाहिजे " ( खरे ११।५७७७ ). " लहान थोर मिळून साठ शिल्शिला आमांराचा फिरता ठेविला " ( साने-पयाव ८७ ).

**शिलेखाना** ( पु० ) [ फा० सिलह्खाना ] शस्त्रागार.

**शिले-जोर** ( पु० ) शस्त्रसामार्थ्य. "दत्ताजी शिन्दे यांणीं शिलेजोरानिशीं मारवाडी मार्गे सारोन गावांत घातले " ( भाब १६ ).

**शिले-टोप** ( पु० ) जिरे-टोप.

**शिलेदार** ( पु० ) [ फा० सिलह्दार् ] हत्यारी; स्वतःच्या घोडा ठेऊन सर्कारी लश्करी नौकरी करणारा राऊत. " आतां नित्य उठोन कर्जदारांचे पायां पडावें; शिलेदारांचे पायां पडतां पडतां कपाळ छिनत चाललें " ( पारसनीस-ब्रप ४१ ).

**शिले-पोस** [ फा० सिलह्पोश् ] चिलखती; हत्यारबन्द; कवच-युक्त. " महागिरी शिलेपोस" ( वाड-समा ३।९ )." शिले पोस पल्टणें लाविती पठाण जरीचे सम्ले " ( प्रभाकर ४७ ).

**शिवाय** [ अ० सिवाअ ] बाहेर; बाह्य; खेरजि; वाचून; आणि वर " शिवाय पाटीलबावाचे परवानगी, इकडून तिकडे कोणी जाऊं पहात नाहीं " ( दिमरा ११११९ ). " इङ्ग्रेज शिवाय तोफाताहफ, सव्वीस लक्ष रुपये दर्साल देत होते " ( दिमरा ११।१०४ ). " देवाची जात मस्लहती-शिवाय आहे " ( राजवाडे ५।१३७ ). " तुमच्या वचना शिवाय एकन्दर नाहीं " ( साने-पयाव ४५५ ). " आम्ही सर्वप्रकारें श्रीमन्तांचे मर्जीशिवाय ... नाहीन " ( राजवाडे १०।१८३ ).

**शिसा** ( पु० ) [ फा० शीशा ] काचेची मोठी कुपी. " गुलाब शिसे उत्तमसे तीन चार पाठविलेत तर बरें होतें " ( पारसनीस-ब्रप २५३ ).

**शिस्त** [ फा० शिस्त् ] निशाण; नेम; बन्दोबस्त; रीत; शिरस्ता. " शिस्त धरुन वनिं करोल वधितां हरणें ठिकाणीं अडखळती " ( प्रभाकर २३६ ).

**शिस्त-वार** पद्धत्शीर; नियमानुसार.

**शील** ( स्त्री० ) [ अ० सिलह् ] हत्यार; चिलखत. " शीलचा राऊन " ( इपुखिरो १० )

**शुक्र; शुकर** ( पु० ) [ अ० शुक्र् ] आभारप्रदर्शन. " ईश्वरें पुनर्जन्म केला त्याचा शुकर कोठवर करावा ! " ( राजवाडे ६।६२१ ).

**शुक्र्-गुज़ार; शुकर्-गुज़ार** [ फा० शुक्र्-गुझार् ] आभारी; कृतज्ञ.

**शुक्र्-गुज़ारी; शुकर्-गुज़ारी** ( स्त्री० ) आभार प्रदर्शन; कृतज्ञता. " बडे साहेबानें आम्हांपासून नवी डाकेविसीं आपली शुक्र्-गुज़ारी व येहसान्-मन्दीचें विनान्तिपत्र याजकरितांच लिहविलें " ( पद्मव ९९ ).

**शुका** ( पु० ) [ अ० शुक्का ] राजाज्ञापत्रिका; फर्मान.

**शुजाअत व शहामत-दस्तगाह** शौर्य-धैर्य-निधी; एक पदवी ( इम ६५. ).

**शुदामद; सुदामत** ( स्त्री० ) [ फा० शुदामद् ] वहिवाट. " कानगोह याचे दसरीं शुदामद आहे " ( राजवाडे ६। ५५४ ).

**शुबाह; शुभह** ( पु० ) [ अ० शुब्हा ] सन्देह; वहीम; संशय. " शायद गरज़्गो मनुष्याचे साङ्गण्यावरून शुबाह व वस्वास राजेसाहेबांचे अन्तः करणांत प्राप्त होईल " ( राजवाडे १०। २५१ ). " याच चालीनें तर्फैन दिलांत शुभह आणितील " ( साने-पयाव ४७८ ).

**शुरका** ( अनेक व० शरीकचें ). " तीन शरिकांपैकीं येकासी नमूद जाल्यास त्यानें दोन शुरकांस इतला द्यावी " ( राजवाडे ७।८ ).

**शुशुमार** ( पु० ) [ फा० सूस्मार् ] सुसर. " शुशुमार घडियाळ मत्स्य मगर " ( मुक्तेश्वर-आदिपर्व २९।७७ ).

**शेख** ( पु० ) [अ० शैख ] पीर; वृद्ध साधू.

**शेख-चिल्ली** [ चिल्ला पहा ] तपस्वी; औलिया.

**शेखी** ( स्त्री० ) [ फा० शेखी ] प्रौढी; बढाई, ऐट.

**शेखी-शोखी** ( स्त्री० ) गर्वाची वागणूक. " मिरजेस फौज् गुन्तली यामुळें हैदर् नाइकानें शेखी-शोखी केली आहे " ( खरे १।२३८ ).

**शेत्-खाना** ( पु० ) [ फा० सिह्हत्-खाना आरोग्य-गृह ] शौचकूप.

**शेम्ला** ( पु० ) [ फा० शम्ला ] सम्ला पहा.

**शेर** ( पु० ) [ फा० शेर् ] वाघ; धाडशी व कर्तबगार माणूस; ज़बर्दस्त. " परन्तु ऐशा बखेडियानीं दुश्मन शेर होतात " ( राजवाडे १२।८३ ).

**शेर्-खोर** पुण्ड; उन्मत्त ( मराआ| १४ ).

**शेर्-पणा** ( पु० ) ज़ोरावरी; सामर्थ्य ( राजवाडे ८।४ ).

**शेर्-बाजी; शेर्-बाज़ू** ( स्त्री० ) सरशी; वर्चस्व. " हे आपले ठायीं आपली बहुत शेर-बाजी मानितात " ( जोरा ११५ ). " सर्वांवरी तुमची शेर्बाज़ू झाली. "

**शेर-शिकार** ( स्त्री० ) [ फा० सैर्-उ-शिकार् ] मर्दानी खेळ; सहल व मृगया करणें. " नवाब वजीर लख्नौस स्वस्थ शेर्-शिकार करून आहेत " ( दिमरा १।३१६ ).

**शेहेर** ( न० ) शहर. " शेहेर सातारा मोडकळीस आला होता त्याची वसाहत केली " ( मदरु १।१६४ ).

**शोख; शौक** ( पु० ) [ अ० शौक् ] प्रेम; आवड; नाद. " इतकें राजश्री बाबासाहेबांचे शोखासाठीं येथें राहणें जालें " ( राजवाडे ६।५०३ ).

**शोखीन; शौकी** रङ्गेल; अभिरुचि-युक्त; ललितकलांचा भोक्ता.

**शोखी** ( स्त्री० ) [ फा० शोखी ] ऐट; जुलूम; अमर्यादा. " शेंपन्नासानिशीं वाढून यावें अशी शोखी त्याची होतीं ती तूर्त मोडली " ( खरे ७।३५९९ ). " कर्नाटकांत फारच हैदर- नाइकानें शोखी केली" ( खरे ११९७ ). " शौखी " ( = बण्ड ) (राजवाडे ३।४११ ).

**शोर** ( पु० ) [ फा० शोर् ] ओरड; गल्बला; दङ्गा " ( चित्रगुप्त ४४ ). " जशी कोयळ करती शोर " ( अनन्तफन्दी ७७ ).

**शोहरत** ( स्त्री० ) [ अ० शुह्रत् ] प्रसिद्धी; आवई; कीर्ती. " तमाम लोकांत शोहरत जाली कीं यास पातशाहानीं बोलाविलें आहे व याची तगिरी जाली आहे " ( दिमरा १।१२८ ). " शोहरत -आम ( = सामान्य ) जाली कीं ब्राम्हणांचीं घरें खाली करवितात " ( राजवाडे ७।१०६ ). " सर्कार्- फौजेची आमदनी व शोहरत ऐकून " ( दिमरा १।२८३ ).

**शोहरा** ( पु० ) कीर्ती; अस्करा ( खरे ७।३५७५ ); प्रसिद्धी. " तमा-तवके दाखऊन शोहरा करितील " ( साने- पयाव ४६६ ).

**शौर** ( पु० ) [ अ० शुअर् ] शहाणपण. " त्यामध्यें कांहीं शौर राहिला नसे " ( पारसनीस- ब्रप २३८ ).

**शौरत** ( स्त्री० ) [ ! अ० सौरत् ] हल्ला; पराक्रम; धाक; सलाबत. " त्याणीं आपले फौजेस लेहून वेढा उठविला, किंवा फौजेचे शौरतीनें उठला ! " ( खरे ८।३९२४ ). " त्यास आपण तेथें होते म्हणून शत्रूस शौरत पडून कार्य जाहलें " ( खरे ८।३९२४ ).

## स

**स्वाद** ( पु० ) [ अ० सहीह् = अचूक या शब्दाचा पहिला वर्ण स्वाद् ] सही. " दिवाणाचें दस्खत यादीवर करविले की पाहिली आणि स्वाद केला " ( राजवाडे २०।१८ ).

**स्वार; सवार** ( पु० ) [ फा० सवार् ] आरूढ; अश्वारूढ; अश्वारूढ शिपाई.

**स्वारी; सवारी** ( स्त्री० ) [ फा० सवारी ] आरूढ व्यक्ती; मोहिम; दौड; धावणी वाहन; आपण या अर्थी बहुनावाचक. "स्वारी नव्हे हें स्वयंवर झालें, श्रीमन्तांस ऐश्वर्य मिळालें " ( प्रभाकार ५३ ). " खान मज्कूर ज़मिनीवर लम्बे जाले तेव्हां घोडे उधळून गेले; जवळ स्वारी नव्हती; सबब लोकांनी उण्टावर बान्धोन आणिले " ( खरे ९।४४६८ ).

**स्वारी-शिकारी** ( स्त्री० ) मोहीम. " हे भाऊसाहेबांस बर्दास्त न होतां जाब दिल्हा कीं स्वाऱ्या-शिकाऱ्या करून देणें घरास आणावें हे चाल कोठील!" ( होके २७ ).

**स्वाल-जाब** ( पु० ) जाब्साल ( खरे २। ६१५ ).

**सई; सही** ( स्त्री० ) [ अ० सअय् ] प्रयत्न; कोशीस. " आम्ही सई करावयास चुकत नाही " ( राजवाडे १।१२५ ). " माझे कार्याविषयीं तुम्ही मध्यस्तापासी सई करावीं " ( राजवाडे ७ खलप २। २४ ). " आपणाकडील कामांत सई व कोशीस करणेचा मज्कूर...मालूम

जाला " (राजवाडे १०।१६० ). "आपल्याकडील कामाची सही व कोशीस करण्यास इकडून कसूर व्हावयाचा नाही " ( राजवाडे २२।५ ).

**सई; सही** [ अ० सहीह् = निर्दोष ] बरें, खरें; जित. "हें काम कर तर सई" "येरवी वसई सई होती असें नवतें व टोपकर अभिरूप होते " ( साने–पयाव ४९ ).

**सईफ** ( स्त्री० ) [ अ० सैफ् ] तर्वार. "सईफ आहे ते तर्वार ज़रूर रामसिङ्गास साङ्गून मागावी " ( राजवाडे १२।६२ ).

**सकलात; सकलाद** ( स्त्री० ) [ अ० सकलात् ] एक प्रकारचें शेन्दरी अथवा निळें कापड.

**सक्का** ( पु० ) [ अ० सक्का ] पाणी देणारा नोकर; भिस्ती. "पखाली व सके यांजकडून पाणी पोहोंचवीत होतों " ( मद्बा २।१२२ ). शिवाय पहा ( मराचिथोशा ४७ ).

**सक्त; सख्त; सखत** [ फा० सख्त् ] कठिण; कडक. "ऐशा तीन सबबेनें बायका आपला दील सक्त करून ( सती ) जातात " ( ऐटि २।३३ ).

**सख्त–गो** वाचा– निष्ठुर. "शाहाजी सख्त –गो फार यास्तव कोणाशी बनत नाही " ( दिमरा २।२३ ).

**सख्त–गोई** ( स्त्री० ) निष्ठुर–भाषण.

**सक्ती** ( स्त्री० ) [ फा० सख्ती ] कडकपणा; जुलूम; बलात्कार.

**सखावत** ( स्त्री० ) [ अ० सखावत् ] दानधर्म. "सकोवतीचा माल आहे " ( राजवाडे १५।१३७ ).

**सखी** [ अ० सखी ] धर्मात्मा; दानधर्म करणारा.

**सखून** ( पु० ) [ फा० सखुन् ] शब्द. "ही दानाई ईश्वरांनीं ज्यास बक्शीस केली त्यांचे सखुनाची पास ठेवणें लाजीम " ( राजवाडे ५।८६ ). "विजई लोक सखुनास गुन्तावयाचे नव्हेत " ( राजवाडे १०।२८० ). "हे मोहिमां नजीक पोहोंचल्यावर मूं–ज़बानी दोस्तीचे सकून अयान करितील " ( पारसनीस–ब्रच २४ ).

**सङ्ग–तरास** ( पु० ) [ फा० सङ्ग्–तराश् ]. पाथरवट ( मेस्तक–पुस्तक–ज़मेलेखन ७५ ).

**सङ्गमरवर** ( पु० ) [ फा० सङ्ग्–मर्मर् ] आरस्पान.

**सङ्गमरवरी** आरस्पानी.

**सङ्गी** [ फा० सङ्गीन् ] दगडी. "गणपतीचे दिवाणखान्याचे दुमज़ल्यावरून कारञ्जाचे आङ्गें सङ्गी फर्शावर ज़मिनीस आले " ( साने–पयाव ४४५ ). "त्याहा घ्यावयासी ध्याले सङ्गी उत्तम दडस लवकर नतापेन ऐसे दोन......पाठवून देणें " ( राजवाडे ६।३९२ ).

**सङ्गीन** [फा० सङ्गीन्] दगडी; वज़न्दार; जड; मज़्बूत; जय्यत; सुन्दर; उत्कृष्ट. ( स्त्री० ) बागनेट; बन्दुकीच्या नळीला बसविलेला अरुन्द पात्याचा लाम्ब सुरा. " सङ्गीन कुच भर्दार सजिव सजदार गुल्गेन्द उसासले " ( प्रभाकर ११३ ). "करार जाहलेया पेस्तर तुम्हांस सङ्गीन जाईल " ( राजवाडे १५।१३६ ). "रजपुतास बन्दूगींत आणून फौज़

सङ्गीन तयार करविली " ( राजवाडे ६।५८९ ). " सङ्गीन चौगर्दा ऐने " ( प्रभाकर १४२ ). " सङ्गीन ज्याचा सूर ताल रे " ( प्रभाकर १८० ). "भाग्य राजाचें सङ्गीन" ( इपुस्खिपो५).

**सज़ा** ( स्त्री० ) [ फा० सज़ा ] शिक्षा. " ही गोष्ट लटकी जाली तरी पातशा मज सज़ा पोचविते " ( राजवाडे १५।४ ).

**सज़ावल** ( पु० ) [ फा० सज़ावल् ] वसूल तगादा करणारा; ढालाईत. " प्रस्तुत नबाबाचे सज़ावल येऊन त्याची सुटका होईल तर करणें " ( खरे १।४१९ ). " सर्वांचे मागें चोप्दार व सज़ावल लाऊन निकड केली आहे " ( राजवाडे ७।५८ ). " त्याज़ला न्यावयाबद्दल भागानगराहून नबाबाकडून सज़ावल आले " ( साने-पयाव ७७ ).

**सज़ावार** [ फा० सज़ावार् ] योग्य ( मराचिथोरा ६४ ).

**सञाब** ( पु० ) [ फा० सज़ाफ् ] कांठ; किनार; मग्जी; शेण्डी भोंवतील घेरा.

**सत्रन्ज़** ( पु० ) [ फा० शत्रञ्ज् ] बुद्धिबलाचा खेळ.

**सत्रञ्जी** ( स्त्री० ) [ फा० शत्रञ्जी ] जाड खास विणीव जाज़म. " त्याजवरी जडावाचें जीन करून दिल्हे; त्याजवरी खूश न जाहले; मग शत्रेञ्ज केली " ( वाड-सनदा ७० ).

**सत्का**, **सतगा** ( पु० ) [ अ० सद्का ] दानधर्म; ओंवाळणी; कुरवण्डी. "महाराजांचें मुज़ऱ्यास जाऊन आपले योग्यतेनुसार सत्का खैर जाहल्याचा दोन-चार-दहा-पांच रुपये या प्रमाणें जाहलें " ( खरे ११।५६६८ ). " सत्के व खैरात-बहुत झाली " ( इम १७९ ). " आतां हा प्राण महाराजांचे चरणांवरून लवण-प्राय सत्गा आहे " ( चित्रगुप्त ८५ ).

**सत्का-मत्का** ( पु० ) " माङ्गांना दर अमवास्येच्या दिवशीं सत्का-मत्का-उडदाची डाळ, राळें अगर इतर धान्य, पीठ, मीठ, मिर्च्या तेल इत्यादि जिन्नस-घरोघर मिळतो " ( गांवगाडा १०४ ).

**सतम** ( न० ) [ फा० सितम् ] ज़ुलूम; कहर. " भला शिपाई दिवाणासा दिसतो परन्तु वाघावर सतम केलें " ( ऐस्फुले २४ ).

**सतविणें; सतावणें** त्रासविणें; त्रस्त करणें.

**सतार** ( स्त्री० ) [ फा० सितारा=तीन तारांचें वाद्य ] एक तन्तुवाद्य.

**सदी; सद्दी** ( स्त्री० ) [ फा० सदी ] शतक. " बारावी सदी आजच भरली म्हणून बहुत खेद केला " ( चित्रगुप्त १०९ ). " पुढें धर्म उच्छिन्न होऊन तेरवी सद्दींत कुफ्राण माजेल " ( ऐस्फुले ६५ ).

**सद्दी** ( स्त्री० ) [ ? ∠ अ० सअद् ग्रहाची शुभ दृष्टी ] सुदैव.

**सद्रा** ( पु० ) [ अ० सुद्रा ] अङ्गरख्याच्या आंत घालावयाचें पातळ कापडाचें पैरण; कुडतें.

**सद्मा** ( पु० ) [ अ० सद्मा ] धक्का; अनर्थ. " मोठा सद्मा गुज़रला " ( राजवाडे ७ खलप २१२७). " बाद्-नारायणराव साहेब; त्यांचे चालीचा बोध पहावा तोंच जो सद्मा गुज़रला हा जाहीरच आहे " ( ऐटि ३।१७ ).

**सदर** ( स्त्री० ) [ अ० सद्र ] श्रेष्ठासन; राजसभामण्डप; (पु०) घाय; मुख्य; वरिष्ठ.

"दुसरे दिवशीं राजे सदरेंत बैसले" (सभासद १२). "सदर-दिवाणी-अदालत" (स्त्री०) मुख्य दिवाणी न्यायकचेरी व "सदर-निज़ामत-अदालत" (स्त्री०) मुख्य फौज़दारी कचेरी.

**सदर्हू** उपरिनिर्दिष्ट.

**सदाकत – दस्तगाह** प्रामाणिकपणाचा निधी; एक अल्काब. "सदाकत्-दस्तगाह नरसिङ्गराव तमाजी" (साने-पयाव ४६७).

**सदारत** (स्त्री०) [अ० सदारत्] मुख्याप्रधानकी.

**सदे** [∠ फा सद् = शम्भर] दर-सदे=दर शेंकड्यास.

**सन्ज़ुदा** [? फा० सञ्जीदा] तोलदार; सङ्गीन; भारी; जय्यत. "सर्व प्रकारें हशमांनीं व फौजेनें व कित्येक गोष्टींनें सन्जुदे आहेत" (साने-पयाव १०१). "तरी तुम्ही आपलीं ज़हाजें सन्ज़ुदा करून सामान-सरन्ज़ाम सुद्धा तयार होऊन जलमार्गें येऊन सामील होणें (साने-पयाव १२२).

**सन्दान** (स्त्री०) [फा० सन्दान्] ऐरण.

**सन्दूक** (स्त्री०) [अ० सन्दूक्] पेटी.

**सन** पु० [अ० सना] शक; वर्ष.

**सनई** (स्त्री०) [फा० सुर्नाय्] पिपाणी सारखें एक मधुर वाद्य. "सनया नफेरिया बुरङ्गें" (मुक्तेश्वर वनपर्व १२।५९).

**सनद** (स्त्री०) [अ० सनद्] अधिकार-पत्र; प्रमाण-पत्र; राजपत्र.

**सनद-अस्नाद** (स्त्री०) [अ० अस्नाद् अनेक व० सनद्चें] सनदा. "फितूर-मध्यें सनद-अस्नाद जळोन गेली" (गोइसा १२). "तूं उभा राहिलास तर तुझी सनद-अस्नाद टाकणें" (राजवाडे २०।४७).

**सनदी** [फा० सनदी] सनद्-शीर. "हे मोख्तसर ज़मीनदार व पातशाही सनदी ज़मीदार आहेत" (राजवाडे १५। १००).

**सनद-शीर** सनदी; कायद्यास धरून.

**सनवात्-बाकी** (स्त्री०) [अ० सनवात् = वर्षें] अनेकवर्षांचा थकलेला, उगवला न गेलेला वसूल.

**सब्त** [अ० सब्त्] लिखित; निश्चित. "हा अहद्-नामा......सब्त जाहाला आहे" (पेअ ६१).

**सफर** (स्त्री०) [अ० सफर्] यात्रा-प्रवास.

**सफर्-नामा** (पु०) प्रवास-वर्णन.

**सफर** (पु०) [अ० सफर्] अरबी वर्षाचा दुसरा महिना.

**सफा** [अ० सफा] साफ.

**सफाई** (स्त्री०) [फा० सफाई] स्वच्छता; अन्तः शुद्धी; गुळगुळीतपणा; नीटनेटकेपणा; प्राविण्यामुळें येणारी सहजता.

**सफाईदार** स्वच्छ; गुळगुळीत; नीटनेटकें; सहजसुन्दर.

**सफे-जङ्ग; सफे-जङ्गी** (स्त्री०) [अ० सफ्फ् = शिपायांची रांङ्ग] खडा-जङ्गी; खडें युद्ध; घोरान्दर युद्ध. "वजीर सफेजङ्ग लढाई लढत नाहीं याजकरितां फैसला होत नाहीं" (राजवाडे १।५०). "कालच्या मोंग-

लावर उभयतां चिरञ्जिवांनी सफेजङ्गी केली " ( खरे १।२८ ). " तोफा लहान सफेजङ्गीच्या दोन शेरी अडतसि आहेत"(खरे१२।६६८४).

सफेजङ्ग-बहादूर एक किताब ( मराचिथोरा ५२ ).

सफेत; सफेद [ फा० सफेद् ] शुभ्र; श्वेत.

सफेता ( पु० ) पाण्ढरा रङ्ग.

सफेती ( स्त्री० ) [ फा० सपेदी ] धवलिमा; भिन्तीस चुना देणें. "पांचव्या मजल्यावरतीं सफेतीचा थाटग" (प्रभाकर ९४).

सफेल (स्त्री०) [अ० फसील्] तटाची भिन्त. " इकडील अलङ्ग फोडून ...पलीकडील सफेल फोडून गोळा पार झाला " ( होके २० ). " शनिवारीं रात्रीं समग्र किल्ला सफेलीवरी फिरून पाहिला " ( चिरा ४५ ).

सब्जा ( पु० ) [ फा० ∠ सब्झा ] एक सुगन्धी वनस्पती.

सब्जी ( स्त्री० ) [ फा० सब्झी ] हिरवेंपण; पालेभाजी.

सब्नीस; सब्नवीस (पु० ) [ फा० सफ्नवीस् ] " सब्निसांनीं लश्करची जमा, सुदती, तैनात, हजीर, गणती करणें ते सर्दार, मुजम्दार कार्भारी यांस बसवून त्यांचे विचारें करावी " ( वाड—सनदा १२६ ).

सब्निशी ( स्त्री० ) सब्निसाचें काम व हुद्दा.

सब्आ [ अ० सब्अ ] सात.

सब्ईन [ अ० सब्ईन् ] सत्तर.

सबज़ [ फा० सब्ज़् ] हिरवा. " दरोबस्त काम एकरङ्गी सबज़ रङ्गाचेंच जालें आहे " ( ऐकिप्र ६२ ).

सबब ( स्त्री० ) [ अ० सबब् ] कारण; निमित्त; बहाणा; म्हणून. " ऐशा तीन सबबेनें बायका आपला जीव सक्त करून सती जातात " ( ऐटि ३।३३ ). " सुनेनें जीव दिला; सबब, तिच्या भ्रताराने तोण्डावर मारिली म्हणून " ( वाड शाछ १८७ ).

सबर [ अ० सब्र् ] धीर; सबुरी. " सबर व विवेक करावा " ( साने—पयाव ४६७ ).

साबिना ( पु० ) छबिना. " राजे सर्व सबिन्यासहित तानाशा पादशहाचे शादमहालास दाखल जहाले " ( मदरु १।९५ ).

सबील ( स्त्री० ) (?) वरात. " खर्च तोडून अदवानीवर सबील करावी " ( राजवाडे ५।१८७ ).

सबूर [ अ० सबूर् ] सधीर ( ऐटि ५। १ ); थाम्ब !

सबूर; सबुरी ( स्त्री० ) [ फा० सबूरी ] शान्तपणा; तहकुबी. "परन्तु ते दिवशीं सबूर करविली " ( खरे ६३१ ).

सम्ला ( पु० ) [ फा० शम्ला ] फेट्याचा मागें पाठीवर सोडलेला पदर. " शिलेपोस पल्टणें लाविती पठाण जरीचे सम्ले " ( प्रभाकर ४७ ).

सम्शेर ( स्त्री० ) [ फा० शम्शेर् ] तर्वार.

सम्शेर-बहादूर तर्वार-शूर; मस्तानीच्या मुलाचें नांव; गायकवाडांचा किताब.

सम्शेरा-सम्शेर ( स्त्री० ) तर्वारीची काटा-काटी. " लढाई बरे वजेनें सम्शेरा-सम्शेर जाहली " ( राजवाडे १।२४४ ).

सम्मत ( स्त्री० ) [ अ० सम्त् ] दिशा; तरफ. " कमळनैन सेकीन सम्मत

निम्ब" ( राजवाडे १५।१७२ ). " शेट महाजन समतानिह्वाय. " ( राजवाडे १५।१८९ ).

**सम्मान** [ अ० सामान् ] आठ.

**सम्मानीन** [ अ० समानीन् ] ऐंशी.

**समई** ( स्त्री० ) [ फा० शम्अ ] दिवा; ठाणवी; खाम्बदार पणती.

**सय्यद** [ अ० साय्यिद् ] बिबी फातमा हिच्या वंशांतलि मनुष्य.

**सयर** ( स्त्री० ) [ अ० सैर् ] सहल; सैर. " सलाबत-जङ्ग दर्गाकुलीखानाचे बागामध्यें सयरे-बदल तिसरां प्रहरां गेले " ( राजवाडे ११७६ ).

**सर** [ फा० सर् ] शिर; खुमार; मुख्य. " बैल सर पांचशें नव्वद पाठविले " ( राजवाडे १।२७८ ).

**सर्कत** ( स्त्री० ) [ अ० शिर्कत् ] भागीदारी; वांटणी; हिस्सा. " टिपू सुल्तानावर स्वारी कम्पनी सर्कार, नबाब, पेशवे या तिन्ही सर्कारांनीं सर्कतीनें केली " ( राजवाडे ७।१८ ).

**सर्कत-दार** ( पु० ) भागीदार; पातीदार.

**सर्कत-नामा** ( पु० ) भागीदारीचा करार-नामा.

**सर्कार** ( न० ) [ फा० सर्कार् ] अधिकारी मण्डळ; राज्य; प्रान्त. " वडिलीं परिच्छिन्न मजल दरमजल मुद्गल सर्कारांत जावें " ( खरे ११२१ ).

**सर्कारी** राज्यचालका सम्बन्धी.

**सर्खवास** ( पु० ) मुख्य नौकर.

**सर्खेल** ( पु० ) [ फा० सर्खैल् ] सेनापती; रिसाल्यावरलि अमल्दार; आङ्गरे यांचा किताब.

**सर्गरम** [ फा० सर्गर्म् ] उद्युक्त; मोह्हीमशीर. " इनाम दरोबस्त खात जाणें व पर्गणे मज़्कुरीचे आबादानीस व मामुरीस सर्गरम असणें " ( वाड-सनदा १४० ). " सिन्दे बादशाही कामावर सर्गरम " ( राजवाडे ७ खलप ११२८ ).

**सर्गश्त** ( स्त्री० ) [ फा० गश्त् ] मिरवणूक. " या प्रमाणें होऊन शेवटीं रङ्ग करविला; सर्गश्त व मेह्दीही निघाली " ( राजवाडे ७।८७ ).

**सर्चश्मा** ( पु० ) [ फा० सर्चश्मा ] झऱ्याचा उगम; उगम; मुख्य.

**सर्जा** ( पु० ) [ फा० शर्झा = गर्जणारा उग्र ( सिंव्ह ) ] सिंव्ह.

**सर्ताज़** ( पु० ) [ फा० सर्ताज़् ] प्रमुख; मुख्य; एक दागिना.

**सर्जेराव** एक किताब.

**सर्द** [ फा० सर्द् ] थण्ड; ओसलर; दमट.

**सर्दार** ( पु० ) [ फा० सर्दार् ] बडा अधिकारी; मन्सब्दार; श्रीमन्त व अभिजात मनुष्य. " ज्या ज्या वाटा पळून जावयाच्या आहेत तेथें चौक्या ठेऊन, पळतील त्यांस धरून परिच्छिन्न डोचकीं मारणें; सर्दार अगर प्यादा न म्हणणें ( पारसनीस ब्रच ७७ ).

**सर्दारकी; सर्दार्-गिरी; सर्दारी** ( स्त्री० ) [ फा० सर्दारी ] अधिकार; अधिकारित्व; मुत्सद्देगिरी. " सुरतेची सर्दाइगिरी करावी ऐशी आज्ञा " ( पद्मव १९ ). "( आपांनीं ) शिपाईगिरिची रीत केली, सर्दार्गिरीचा प्रकार न केला " ( साने-पयाव ३२० ). " तुम्हीही आजपावेतों शिपायगिरी केली; आतां सर्दारीची रीत धरून ताज़्विजीनेंच कांहीं कामें करावीं " ( साने—पयाव ३२१ ).

**सर्दी** ( स्त्री० ) [ फा० सर्दी ] थण्डी; गारठा; ओलावा.

**सर्नामा** ( पु० ) [ फा० सर्नामा ] अल्काब; पत्रारम्भींचा मायना; आडनांव.

**सर्नौबत** ( पु० ) [ फा० सर्नौबत् ] सेनापती.

**सर्पोस** ( पु० ) [ फा० सर्पोश् ] आच्छादन; चादर; गुप्तगोष्ट; गुप्तपणा. " आज पावेतों सर्पोस राखिला तो उघड होऊन नाशास कारण होतें " ( खरे ९।५०४२ ). " छपरपलङ्गीं शेज फुलांची कुणि करिं शृङ्गारिती । कुणी सर्पोस वरुन पसरिती " ( प्रभाकर २३२ ).

**सर्फराज़्** [ फा० सर्फराज़् ] ऊर्जित; उन्नत; बहाल; अर्पित. " नबाबांनीं मोहबत्‌जङ्ग सर्फराज़् करून " ( खरे ८।४३४१ ). " बे–शर्त काम इमानें इतबारें केल्यावर रूपावन्त होऊन तुम्हांस सर्फराज़् केलें जाईल " ( वाड–समा १।१३४ ). " कमरुद्दीन खानास लाहोर मुल्तानची सुबेदारी सर्फराज़् केली " ( राजवाडे ६।४१८ ).

**सर्फाराजी** ( स्त्री० ) [ फा० सर्फराज़ी ] उभारणी; बढती.

**सर्फा** ( पु० ) [ अ० सर्फा ] फायदा; नफा. " बहुत दिवस राहिलियावरी सब्नीस ज़ागा धारतिल येणें करून तुमचा काय सर्फा आहे ! " ( राजवाडे १५।३६७ ). " रुपेंदागिने नवे हुकेरीचे टांकसाळेस शिक्का पाडून सोय कशी पडते, अथवा खण्डून देणेची सोय कशी पडते याची रमारमी पाहून सोय सर्फेची दिसेल तैसें करून ऐवज़् नरमुन्दे यास पावता करावा " ( खरे १०।५६०३ ).

**सर्फेवार** फायदेशीर.

**सर्बत** ( न० ) [ अ० शर्बत् ] पेय; फळाचा रस व साखर घालून केलेलें थण्ड पेय.

**सर्बरा** [ फा० सर्बराह् ] व्यवस्थित; पुरें. " रुपये पाठवणें म्हणजे काम सर्भरा होईल " ( राजवाडे १६।२६६ ).

**सर्बरा; सर्बराई; सर्बराही** ( स्त्री० ) [ फा० सर्बराही ]; व्यवस्था; तर्तूद; गरज़ांची भागवणूक; पाहुणचार. " जे काम साङ्गाल त्याची सर्बरा करूं " ( राजवाडे ६।५६४ ). " त्यास इतक्यावर सत्वर ऐवज़ाची सर्बरा होऊन यावी " ( राजवाडे १०।३२५ ). " जाटासी पैक्याची सर्बराह न होय " ( दिमरा १।३१२ ). " पैक्याची सर्बराई–तर्तूद करून ... ऐवज़ाची रवानगीच होऊन येई तें करावें " ( राजवाडे १०।१९६ ). " मुलूख काबीज होतो त्यास सर्बरा–चौकशीस कार्कून ठेवावा " ( सभासद २४ ).

**सर्ब–मोहर** [ फा० सर्बमुहर् ] लाख–बन्द; मोहर्–बन्द. " त्यांत कित्येक दफ्तरें सर्बमोहर व कित्येक बे–मोहरेचीं या प्रमाणें लिहिलीं " ( राजवाडे ७ खलप २१९ ).

**सर्बसर** सरासरी. " तिजाई सूट सर्बसर पाहून द्यावी " ( वाड–समा १।१५७ ).

**सर्बारगी** ( स्त्री० ) सर्बागिरी. " पन्नास घोडियाचे सर्बारगी तुम्हांसी दिधले असे " ( राजवाडे १५।३६४ ).

**सर्मोय** [ फा० सरिमूय ] बालाग्रही; यत्किञ्चित्‌ही. " आइन्दा सरमाय ( ? सरमोय ) वेगळेंपण दिसत नाहीं " ( राजवाडे १०।२७८ ).

**सर्सब्जी** ( स्त्री० ) [ फा० सर्सब्ज़ी ] टव-टवीतपणा; भरभराट. "ज्यांत पातशाहाची सर्सब्जी ते गोष्ट पातशाहांस... अर्ज़ करावी" ( दिमरा ११६२ ). "याची हिफाजत केलियांतच दौलतीची सर्सब्जी (! सर-सबाजी ) आहे" ( साने–पयाव ४९३ ).

**सर्हद्द** ( स्त्री० ) [ फा० सर्हद्द ] सीमा.

**सरन्ज़ाम** ( पु० ) [ फा० सरन्जाम् ] साधन–सामुग्री; व्यवस्था; निवाडा; निकाल; मान–मरातब ठेवितां यावी म्हणून अगर लढाईच्या वेळीं हुकमी मदत करितां यावी म्हणून मन्सब्दारास दिलेली जागीर. "हनोज़ मुबाद्लियाचा सरन्ज़ाम जाला नाहीं" ( इम- ६५ ). "सर्कारचें काम ब–वजे–अहसन सरन्ज़ाम करीत जावें" ( राजवाडे १५।११३ ). "पोक्त ज़माव सरन्ज़ाम–माफीक वाढवावा" ( वाड–शाछ २७).

**सरन्ज़ामी पद्धती** फौजेच्या अधिकाऱ्यांना नक्त मोईन न देतां त्यांना खासगी व लश्करी खर्चासाठीं जहागीर देण्याची पद्धती.

**सरद** ( स्त्री० ) सर्हद्द; पर्यन्त. "राजापुरी पावेतों सरद दर्याकिनारा मोकळा केला" ( सभासद ५२ ).

**सरदणें** सर्द होणें; ओलसर, दमट होणें.

**सरन्दाज़** डोक्याचा; हुशार. "अन्ताजी काळो उमर वर्सें दहावर, ल्याख ( लायक ) शाहाणा, लिहिणार, सरन्दाज़ होता" ( भाइसम–द्विसवृ ५२ ).

**सरफ़्–खास** ( पु० ) [ अ० सर्फ़् = खर्च ] खास खर्चासाठीं, ज़ात–खर्चासाठीं तोडून घेतलेला मुलूख. "त्याणीं खालशांतून व सरूफ–खासांतून हात उचलावा" ( राजवाडे ५।५५७ ).

**सरफ़–मईशत** ( स्त्री० ) [ अ० मईशत् = चरितार्थ ] पोट–खर्च. "तेथील महसूल बमय औलाद अहफाद सरफ–मईशत करोन दुवागोई–द्वाम–दौलत–अबद्–पैवन्द मश्गूल रहातील" ( राजवाडे २०।२८६ ).

**सराई** ( स्त्री० ) [ फा० सराय् ] धर्मशाळा. मुशाफर–खाना.

**सराफ** ( पु० ) [ अ० सर्राफ़् ] सोनें चान्दी, नाणें, हुण्डी व्याज बट्टा वगैरे करणारा.

**सराफा** ( पु० ) [ अ० सर्राफा ] सराफ-बाज़ार; सावकारा.

**सराफाई** ( स्त्री० ) सराफी ( इपुस्खिपो २३४ ).

**सराफी** ( स्त्री० ) [फा० सर्राफी] सराफाचा धन्दा; मार्वाडीपणा; कन्जूषपणा. "बातमी चीज़ मोठी आहे यांस दोन रुपये खर्च जाले तरी चिन्ता नाहीं; यांत सराफी करूं नये" ( राजवाडे ६।५०९ ).

**सरायन्दा** ( पु० ) [ फा० सरायन्दा ] गाणारा; गवई.

**सरासर** [ फा० सरासर् ] साद्यन्त; पूर्ण; तमाम.

**सरासरी** ( स्त्री० ) [ फा० सरासरी ] सामान्यप्रमाण; अद्मासें; सर्वस्वी; साधारणतः "आधीं तुम्हीच सरासरी हरामखोरी केलीत" ( राजवाडे १५।३७१ ).

**सरू** ( पु० ) [ फा० सर्व् ] एक सडपातळ सदा हिरवें दिसणारें झाड. फार्शी कवी प्रियेच्या बान्ध्याला सरूची उपमा देतात. "माझा तूं लावण्याचा सरू" ( परशराम १६८ ).

**सरूदार** सरूच्या आकाराचा. " खाम्ब चौगर्दा सरूदार मधिले मजल्यासी " ( प्रभाकर ).

**सरेमो; सर्मोय** [ फा० सरि-मू ] बाला-ग्रही " करार केला त्यांस कसूर सरेमो ग्रही यावयाची नाहीं " ( साने-पयाव ४८४ ).

**सरोदा** ( पु० ) [फा० सुरोद् ] एक वाद्य.

**सल्तनत** ( स्त्री० ) **सल्तना** ( पु० )[अ० सल्तनत्; सल्तना ] सुल्तानी; राज्य; फौज्. " बुनगे व सल्तनत दोन कोशां-वर उतरले " ( खरे ९।४७९५ ). " सल्तना" ( पाब ७ ).

**सल्ला; सला; सलाह** ( पु० स्त्री० )[ अ० सलाह् ] योग्य; हितवाद; उपदेश. " पुरन्धरास तीन हज़ारांनिशी रवाना करणें सला नाहीं" (राजवाडे १०।७९). " तेव्हां सलाह काय करूं ! " ( खरे ८।४३५६ ). " जशी तुम्हास सल्लाह वाटेल तसें करावें " ( साने-पयाव १११ ).

**सलाह-ऐन** ऐन-सलाह; विशेष योग्य व इष्ट गोष्ट. " नवाब साहेब खेमेदाखल जाले हे सलाह ऐन पडली " ( राज-वाडे १९।१०४ ).

**सलाह-तदबीर** ( स्त्री० ) सल्ला-मस्लत. "जें होणें तें तर्फैनच्या इत्तहयानें व सलाह् -तद्बिरीनें व्हावें " ( राजवाडे १०।१६७ ).

**सलाह-कार** (पु०) सल्लागार (जोरा २९).

**सलाह-दौलत** राज्यास इष्ट. " होवेहि फन्दी व मकरी त्यांची उपेक्षा करणें सलाह-दौलत नाहीं " ( राजवाडे १९।१०० ). " हें सल्लाह-दौलत नाहीं " ( साने-पयाव ४७२ ).

**सलाह-नेक** हितवाद; इष्ट. " सलाह नेक असेल त्याची आपण आज्ञा करावी " ( राजवाडे ५।२०५ ).

**सलाह-वक्त** समयोचित. " आतां रहावें हें सलाह-वक्त नाहीं " (खरे ८।४२५१).

**सल्ला-गार** ( पु० ) हितवाद साङ्गणारा; सचिव.

**सल्ला** ( पु० ) [ अ० सिलाह्; सुल्ह् ] तहाचें बोलणें; तह; सख्य. " सल्ला-ममता राजियाशी करून " ( चित्रगुप्त ७९ ). " सल्ला-मामला होत आहे, बोली चाली आहे ( राजवाडे १०।३३ ).

**सल्लास** [ अ० सलास् ] तीन.

**सल्लाशीन** [ अ० सलासीन् ] तीस.

**सलक; शलक** ( स्त्री० ) [ अ० शल्क् ] फैर; सर्बत्ती. " जवळ जातांच तोफांची व गाडद्यां यांची सलक केली " ( खरे ७।३४८० ). " सलका झडल्या " ( खरे ८।४३६९ )

**सलमलाहु तआला** [ अ० सलिमल्लाहुत आला ] ईश्वर संरक्षण करो.

**सलातीन** [ अ० सलातीन् अनेक व० सुल्तान् चें ] राजपुत्र " पातशाही सलातीन आहेत; त्यांस उपोषणें पड-तात " ( राजवाडे १०।२७४ ). "किल्ल्याची व बेगमात व पातशाह-ज़ादे व सलातीन व नाज़र यांची ज़प्ती केली " ! " ( दिमरा १।२७२ ).

**सलावत** ( स्त्री० ) [ अ० सलाबत् ] मज़्बुती; धाक; वचक; दरारा; धास्त; मज़्बूत. " त्यावरून त्यांनीं सलावत खाऊन केळवे माहीम येथील लोक उठवून माघारे नेले; गनिमाची सलावत वाढविली " ( पारसनीस-वच ७६ )

**सलाम** ( पु ) [ अ० सलाम् = शान्ती; सलाम् अलैकुम् तुम्हांला शान्ती मिळो.] तास्लीम; वन्दन.

**सलाम बादज़् सलाम** वन्दनापागून वन्दन; अनेक नमस्कार.

**सलामत** ( स्त्री० ) [ अ० सलामत् ] सुरक्षितपणा; सुरक्षित. "श्रीमन्त रावसाहेबांस सलामत असावी म्हणजे बाकी फिकीर करीत नाहीं " (खरे ६।३१७७) "शिर सलामत तर पगड्या पन्नायशी " ( मराठी म्हण ). " ईश्वर आपल्यास सलामत बे-मलामतराखो" ( दिमरा १।८२ ).

**सलामत-बे-सलामत** विशेष सुरक्षित व सुस्वरुप. " ईश्वर त्यांस सलामत-बे-सलामत राखो आणि दिवसेंदिवस अधिक प्रताप होवोत " ( राजवाडे १२।३४ ).

**सलामालकी** ( स्त्री० ) परस्परांस सलाम करणें.

**सलामी** ( स्त्री० ) भेटीच्या वेळचें परस्परवन्दन; बहुमान; भेट; सामना. " गायकवाड सर्कारास एकवीस तोफांची सलामी आहे "

**सलुकी; सलुखी** शान्ततात्रिय. " नारो आप्पाजी शहाणे माणूस सलुखी म्हणून त्याणीं हें कार्य केलें" ( खरे १।४५१ ).

**सलूक; सलोखा** ( पु० ) [ अ० सुलूक् ] शिष्टाचार; सख्य; सरळभाव. " बक्सीनें नजीबखान रोहिल्याचे हातें सलुका करून " ( राजवाडे ६।३३० ).

**सव्दा; सव्दागर; सव्दागिरी** सौदा, सौदागर सौदागिरी पहा.

**सव्लत** ( स्त्री० ) सौलत पहा.

**सवाद** ( स्त्री० ) [ अ० सवाद् ] काळी; गांवा भोंवतील शेतकी-ज़मीन. " दर सवाद् कस्बे मज़्कूर " ( राजवाडे १५।१३१ ).

**सवार** ( पु० ) स्वार; अश्वारूढ; आरूढ.

**सवारी** ( स्त्री० ) स्वारी पहा.

**सवाल** ( पु० ) [ अ० सुआल् ] प्रश्न; मागणी.

**सवाल** ( अ० ) [ अ० शव्वाल् ] अरबी वर्षाचा दहावा महिना.

**सहल** ( स्त्री० ) [ अ० सैर् ] फेर-फटका; हवाखात फिरणें.

**सहलणें** सहल करणें.

**सहल-शिकार** ( स्त्री० ) सैर-शिकार; मर्दानी खेळ ( दिमरा १।२२० ).

**सहल** [ अ० सह्ल् ] सोपें; साधें; ज़ुज़्बी. " गाज़दीखान आलिया सहल पडेल " ( साने-पयाव १३७ ). " सहल कामा करितां श्रीमन्तांसी करोडेचे पेचांत न यावा " ( राजवाडे १०।२१३ ).

**सही** [ अ० सहीह् ] अचूक; योग्य; खरें; बरोबर; थेट; पूर्ववत; बहाल; नियोजित; ( स्त्री० ) मज़्कूर बिनचूक व मान्य असल्याची खूण म्हणून स्वहस्तें स्वनाम लिहिणें; दस्कत. " ती याद सही व मान्य असे " ( राजवाडे ७।२२ ). " सही थोरल्या राजांसारखी पुण्डाई करून हा देह शिवाजी राजा होणार " ( गडकरी-राजसंन्यास १६ ). " फौज्

वर्तर्फे केली होती ते सही करून " ( राजवाडे ३।४५५ ).

**सही-सलामत** सुखरूप; सुरक्षित.

**साअत; साईत; सात** ( स्त्री० ) [ अ० साअत् ] घटिका; मुहूर्त. " नजुमियास बोलावून साअत पांच घटका रात्रीची ठरली" (राजवाडे ५।२७). " पन्तप्रधान प्रथम स्वारसि निघणार तेव्हां साअत नेक पाहिजे "(राजवाडे ७।१९३). "उद्यीक बसावयाची साईत आहे " ( राजवाडे ३।३४६ ). " नेक सात खेमेदाखल जालों" (राजवाडे १९।१०५) " तें ( खत ) सात-नेक पोहंचलें " ( साने-पयाव ४७५ ).

**साकी** ( पु० ) [ अ० साकी ] गुत्त्यांतील दारूचा पेला भरून देणारा पोऱ्या.

**साकीन; सेकीन** ( पु० ) [ अ० साकिन् ] राहणारा. "मधुकीर गोसावी साकीन अम्बोर्डे " ( राजवाडे १५।१३८ ). " सेकीन " ( राजवाडे १५।१७२ ).

**साख्त** ( स्त्री० ) [ ∠ फा० साख्तन् ] सम्बन्ध; सख्य; बजावणी. " कोणाचें म्हणणें रावशिन्दे यांसी साख्त आहे " ( राजवाडे ७।१९५ ). "आपला जिम्मा साख्त करीत जाईल " ( राजवाडे ८।२१७ ).

***साख-सूरत*** *उघडपणें; राजरोस.*

**साखर-पारा** ( पु० ) [फा० शकर्-पारा ] खोबरेंपाक.

**साज्** ( पु० ) [ फा० साज़् ] जीन वगैरे सामान; पोशाक ( विशेषतः कञ्चनीचा).

**साज्- सामान** ( न० ) अस्बाब; सरञ्जाम. "साज़सामान कूल लुटून नेलें " ( ऐच २४ ). " उन्देरीस साज़-सामान घेऊन येतो " ( साने—पयाव ६६ ).

**साजिन्दा** ( पु० ) [ फा० साज़न्दा ] बजवय्या.

**साजीस; साजीश** ( स्त्री० ) [ फा० साज़िश् ] सन्धान; सख्य; युक्ति; हुन्नर ( राजवाडे ८।४८ ). " किल्लेदाराशी साजीश करून सव्वीस कोठे बारूदचे किल्ल्यांतील उडविले " (दिमरा २।३६). " राजे मज्कुरांचा विचार आहे कीं ... इङ्ग्रेज़ाची अन्तस्थ साजीश राखून वजिराचा कार्भार करावा " ( दिमरा २।६० ).

**सादर** [ अ० सादिर् ] उद्भूत; उद्धृत; प्रविष्ट; रुजू " हुकूम सादर जाहला आहे तो पाहून मेहेर्बानी सम्पादून घेणें " ( चित्रगुप्त ८ ). " मुभियाचे नांवें सनदा सादीर केल्या असेती " ( राजवाडे १५।५५ ).

**साधा** [ फा० सादा ] अनलङ्कृत; गैरहिकमती; सरळ वृत्तीचा; गरीब.

**सानीनूहाल** [ अ० सानील्हाल् ] पुन्हा; यापुढें. " सानीनूहाल त्याची प्रती निघाली; कोठें तरी झूटी गलथ असे " ( राजवाडे २०।६७ ).

**साफ** [अ०साफ्] निर्मल; स्वच्छ; गुळगुळीत; स्पष्ट. साफ करणें =छाटून टाकणें. " जो आढळेल त्यास पाहतांच त्याचे कान व *नाक साफ करीत जावें " ( राजवाडे* ५।६६ ).

**साफ-सुफी** ( स्त्री० ) घांसून पुसून स्वच्छ व्यवस्थित करणें.

**साबक; साबीक** [ अ० साबिक् ] पूर्वील; पूर्वी ( खरे ७।३५६५ ). " ब-दस्तूर साबिका=साबीक दस्तूर=पूर्वील वहिवाटीप्रमाणें. " वर्सें साबीक दस्तूर येऊनं " ( साने-पयाव १२३ ).

**सावण; साबू** ( पु० ) [ अ० साबून् ] मळ धुवून काढण्याचें फेंस उत्पन्न करणारें मिश्रण.

**साबीत** शाबीत पहा.

**साबान** ( पु० ) [ अ० शअबान् ] अरबी वर्षांचा अठवा महिना.

**सामल** सामील पहा.

**सामलात** ( स्त्री० ) सामील होणें; कट; समाइकी; संयुक्त-मिळकत. " भाऊसाहेबांच्या सामलातीस नबाबा-कडील फौज् व शिन्दे यांजकडील चार पल्टणें तोफासुद्धां द्यावी " ( खरे ११।५९०५). "त्याचे सामिलातींत आणखी असाम्या आहेत असें ऐकण्यांत आहे " ( खरे ११।५६६७ ). "जागले पाटलांची कसूर किंवा सामलात दिसून आल्यास त्यांचें इनाम काढून तें त्यांच्या बिरादरांना देण्यांत येतें " ( गांवगाडा ५९ ). " एक रुईखेड मात्र सामलातींत आहे " ( राजवाडे १०।२५० ).

**सामान** ( न० ) [ फा० सामान् ] सामुग्री; अस्बाब; चीज्-वस्त. ( पु० ) पोशाख; चिल्खत. "लष्करांत कूल ज़री सामान केलाच होता " ( सभासद् ६८ ). " परन्तु अङ्गांत सामान यामुळें वार कारेगार झाले नाहीत " ( खरे ५।२१३६ ). " सतींचें सामायन करा म्हणती " ( होपे २२ ).

**सामान-सुमान** ( न० ) चीज्-वस्त.

**सामलि; सामल** [ अ० शामिल् ] अन्तर्भूत; समाविष्ट; भागीदार; मदत्नीस. " हडोतीचे मैदानांत हाडे सामळ करून सामना केला " ( होकै २८ ).

**सायवान** ( पु० )[ फा० सायवान् ] छप्पर तम्बू. " निद्रेस डेरा पेशजी चहूं सायवानाचा होता त्याप्रमाणें करावा " ( खरे १०८५ ).

**सायवान्दार** सायवानाचा. " खाव्यांची राहुटी चान्दणी सायवान्दार आहे ती लौकर आली पाहिजे " ( खरे ११। ५६७४ ).

**सार्वान** [ फा० सार्बान् ] उण्टवाला.

**सालिगिरे** ( स्त्री० ) [ फा० सालगिरिह् ] वर्षगांठ; वाढ दिवस, ज्या दिवशीं एका सूताला गांठ मारितात. " नवाबाची सालिगिरे" ( राजवाडे ५।२७ ). "सालिगरेचे ज्याफतीची तयारी " ( राजवाडे ७।८२ ). " सालिगिरीहच्या समारम्भांतही बहुत आरास करावी" ( ऐस्फुले ३४ ).

**साल** ( न० ) [ फा० साल् ] वर्ष. " ईश्वर त्याजला बहुसाल ( दीर्घायुषी ) करो " ( राजवाडे ३।३५३ ).

**साल-गुदस्त** [ फा० साल्-इ- गुज़श्ता ] गेलें वर्ष (दिमरा १।१८८); गेल्या वर्षी.

**साल्-जाब** ( पु० ) जाब-साल. " मोगलाच्या विचारें पाहतां हे उभयतां सर्दार देशीं असावे म्हणजे मोगलाशी साल-जाब होऊन बन्दोबस्त होईल " ( राजवाडे १।१२ ). " तरी साल-जाब करून मशार्निल्हेस माघारें लौकर पाठविणें " (राजवाडे ६।३९३). " या प्रमाणें सोईचे स्वाल-जाब आहेत. " ( खरे १०।५२०७ ).

**साल-दर-साल** प्रतिवर्षी.

**साल-ब-साल** वर्षांवर्ष; वर्षानुवर्ष. "ऐसें साल-ब-साल चालत आलें आहे " ( राजवाडे १५।१४० ).

**साल-हाल** चालू साल. " साल-हाल व

सालगुदस्तची खण्डणीची बेबाकी करून देणें " ( दिमरा ११९८ ).

**साला-बाद** [ फा० साल्-बअद्=वर्षान न्तर ] दर्वर्षी. " सालाबाज् " (राजवाडे १५।२४० ).

**सालाबाद-प्रमाणें** दर-वर्षी प्रमाणें.

**सालाना; सालीना** [ फा० सालियाना ] वार्षिक.

**सालोसाल** वर्षानुवर्ष.

**साहेब** ( पु० ) [ अ० साहिब् ] स्वामी; युरोपियन टोपीवाला.

**साहेब-किराण** [ अ० साहिब् किरान् ] शुभग्रहांच्या युतीमुळें वैभव श्रेष्ठ. " शहाजहान साहेब-किरान याणीं बत्तीस वर्षे बादशहात करून उपरान्त राहिले " ( वाइ-सनदा १४९ ).

**साहेब-चाकरी** ( स्त्री० ) स्वामिसेवा.

**साहेब-ज़ादा** ( पु० ) [ फा० साहिब्-ज़ादा ] प्रभु-पुत्र; उमराव. " इकडे प्रभु बाजिराय तिकडे फतेसिङ्ग साहेब् ज़ादा " ( अनन्तफन्दी ४६ ).

**साहेब-नौबत** ( स्त्री० ) हत्तीवरील मोठा डङ्का; ( पु० ) ज्याला डङ्क्याचा मान आहे असा.

**साहेब-मुलूक** ( पु० ) खुश्कीवरील राजा. "आम्हांशी जो साहेब-मुलूख असेल तो दुश्मनी करूं शकत नाहीं " ( ऐटि १।६० ).

**साहेब-यख्तियार** ( पु० ) अधिकारी.

**साहेब-रियासत** ( पु० ) राज्यकर्ता. ( राजवाडे १९।१६ ). " दक्षणचे सर्व साहेब रियासत यांचा एक जाला " ( साने-पयाव ४७३ ).

**साहेब-हिम्मत** धैर्यवान्. " फत्ते-नसीब व साहेब-हिम्मत आहेत; करितां हर एक प्रकारें फिरङ्गियाचे फौजेस तङ्ग करितील " ( चिरा १९ ).

**साहेबी** (स्त्री०) खावन्दी; प्रभुत्व. "मुलखांत साहेबी कार्कुनाखेरीज़ कोणाची नाहीं " ( सभासद २४ ). " त्याची साहेबी, ज़ुलूम-कसाला सोसेना "(पेदसमा २१).

**सिकञ्जा** ( पु० ) [ फा० शिकञ्जा ] पेच; सङ्कट. " लढाईचे सिकञ्ज्यांत संङ्कटांत पडावें हें मुनासीब नाहीं " ( पेअ ६५ ).

**सिकन्दा** [ फा० शिकञ्जा ] पेचांत धरून तङ्ग; हैराण; शिकस्त. " रजपूत बहुत सिकन्दे केले; रोज़ कोसभर चालूं पावले नाहीत " ( राजवाडे ६।२९२ ). " ऐसें चार घटिका युद्ध बहुत उत्तम होऊन रजपूत सिकन्दे करून थण्डे केले " ( राजवाडे ६।६४८ ). " पुरन्धर बमय लस्कर घेरा घालून सिकिन्दा केला " ( राजवाडे १८।८८ ).

**सित्त** [ अ० सित्त ] सहा.

**सित्तैन** [ अ० सित्तीन् ] साठ.

**सितारा** ( पु० ) [ फा० सितारा ] तारा ( ऐटि ११४४ ).

**सिपर-समशेर** ढालतवारवाला. " त्यास चार हज़ार ज़मावांत कूल सिपर-समशेर असे लोक आहेत; करोल बिल्कूल नाहीत " ( राजवाडे ७।१२८ ).

**सिकम** ( न० ) [ फा० शिकम् ] पोट; शिकम पहा.

**सिजील** ( स्त्री० ) [ अ० सिजिल्ल् ] दाखला; दुसरी नोन्द. " तेच मुदतीचे विजापूरचे काजीची सिजील आहे " ( गोइसा २३ ).

**सिबत** ( पु० ) [ अ० सब्त् ] करार. " या गोष्टीनें मज़्कुरांत द्यावें तेसा सिबत जाला " ( इम १९५ ).

**सिले** [ अ० सिलह्=हत्यार ]. कवच-हत्यारबन्द. " हत्ती आणऊनु सिले करविले" (भाइसम-द्विसवृ १७४).

**सीम** [ फा० सिवुम् ] तिसरा ( राजवाडे ८।९५ ).

**सुकर-गुज़ारा** ( पु० ) शुक्र-गुज़ारी म्हणजे आभार प्रदर्शन; परन्तु पुढील वाक्यांत सुकर गुज़ारा कदाचित् सं. सु-कर याच्या घोंटाळ्यानें सुखचरितार्थ या अर्थानें वापरला गेला आहे. " आमचा सुकर-गुज़ारा कम्पीणी सर्कारचे भरंवशावर होत आहे " ( मद्रु २।१४२ ).

**सुकाणू** ( न० ) [ अ० सुक्कान् ] गल्बताच्या पिछाडीस गल्बत वळविण्याचें साधन असतें तें.

**सुकाणू-गीर; सुकाणूदार** ( पु० ) [ फा० सुक्कान्-गीर् ] सुकाणू धरणारा.

**सुखून; सखून** ( पु० ) [ फा० सुखुन् ] शब्द; वचन. " आपले सुखुनाबद्दल दौलतेनसी व ज्याननसी कोसीस करूं" ( राजवाडे १।५२ )

**सुज़ना** ( पु० ) [ फा० सोज़न् = सुई ]. सुवा; टोंच्या; दाभण.

**सुतर्नाळ** ( स्त्री० ) [ फा० शुतुर्नाल् ] उण्टावरील तोफ.

**सुतर्बमोहर** ( ? ) सर्बमोहर; गुप्त. " मन्सब्याची रीत प.हतां सुतर्बमोहर आहे" ( खरे ४।१५७२ ).

**सुतर्स्वार** ( पु० ) [ फा० शुतुर्सुवार् ] उण्टावरील स्वार.

**सुदामत** ( स्त्री० ) [ फा० शुदामद् ] चाल; प्राचीन वहिवाट; सलोखा; पूर्वीपासून; पूर्ववत्; सरळ; सरळपणें. " घरोब्यानें ऐक्यतेनें उभयपक्षीं सुधामत चालावा" ( राजवाडे ८।१८१ ). "कोंकणचे मार्ग सुदामत चालूं लागले " ( खरे ६। २७२३ ). " तेव्हां संशय प्राप्त जाहला कीं चिकोडीकर गृहस्थ सुदामत नव्हत" ( खरे ११।६०३७ ). " परन्तु नाना सुदामत साङ्गतील, न साङ्गतील " ( खरे १०।५३३८ ). " ऐवज येणें त्यास तो सुदामत फडशा करीत नाही " ( खरे ११।६००९ ). " आमचें व त्यांचें सुदामत नाही; पेशजी त्यांनीं इङ्ग्रजांचे मस्लतीत आपल्यासी बेमानी केली " ( राजवाडे १९।.० ).

**सुदूर याफ्तन्** उद्भवन मिळविणें, सादर होणें. " फर्मान हुमायून शरफ सुदूर याफ्त् " ( राजवाडे १५।३६३ ) = सन्मान्य राजाज्ञा उद्भूत झाली.

**सुन्ता** ( स्त्री० ) [ अ० सुन्नत् ] शिश्नत्वचेचा छेद करण्याचा मुसल्मानांचा एक धार्मिक विधी.

**सुन्नी** [ अ० सुन्नी ] मुसल्मानांतील एक धर्मपन्थ. सुन्नी लोक पहिल्या तीन खलिपांना चौथ्या खलिपाइतकाच मान देतात; तर शिया लोक पहिल्या तिघांचा तीव्र निषेध करितात व चौथा खलिपा हज़्रत अली यास व याच्या वंशास फार पूज्य मानितात.

**सुपूर्द** [ फा० सुपुर्द् ] ताबीन; हवालीं." पुढें शाहु महाराज यांणीं पेशव्यास सर्व राज्याधिकार सुपूर्त केला " ( प्रामस ३९ ).

**सुबिकी** ( स्त्री० ) [ फा० सबुकी ] हलकेपणा; गैर–तोलदारी; अप्रतिष्ठा. "आपण घाबरे होऊन त्यांच्या गळां पडूं लागल्यानें सुबिकी दिसेल" ( राजवाडे १०।३५५ ).

**सुभा** ( पु० ) [ फा० सूबा ] प्रान्त; प्रान्ताधिकार; प्रान्ताधिकारी. "यानें अदावतीनें सुभा ( = सुभेदाराकडे ) जाऊन चुगली केली" ( वाड–चाचा २।३ ).

**सुभेज़ात** [ फा० सूबजात् ] सुभे. "कन्धार व हिरात वगैरे सुभेज़ातचा बन्दोबस्त" ( दिमरा २।६६ ).

**सुभेदार** ( पु० ) [ फा० सूबदार् ] प्रान्ताधिकारी; मल्हारराव होळकरांचें टोपण नांव.

**सुभेदारी** ( स्त्री० ) सुभेदाराचा अख्त्यार व हुद्दा.

**सुमार** ( पु० ) [ फा० शुमार् ] गणती; अन्दाज; तर्क; विचार; रोख; प्रमाण; अभ्यास; नेम; बेत. "चित्ते सुमार दोन" ( चित्रगुप्त ). "श्रीमन्त माघारे एव्हांच फिरले तरी फौज़ देशास येतांच फुटेल, यास्तव बाहेर फिरतात हा एक सुमार" ( खरे १।३९४ ). "मज़ल–दर–मज़ल नर्मदा उतरून आले पार, धरला दख्खनचा सुमार" ( साने–पयाव ५२ ). दहाचा सुमार असेल. खाण्याचा सुमार असावा. सुभार धरून बार त्या नेमाचा केला" ( उमाजी नायकाचा पोवाडा ).

**सुर्ख रङ्गी** ताम्बड्या रङ्गाचा. "तुम्ही शादीचे सुर्खरङ्गी पोशाग ज़वाहीर घालून सिकन्दर जहान यांचे हवेलीस हुज़र असणें" ( राजवाडे ७।२०३ ). "दौलानीं शादीचा रुका सुर्ख–रङ्गीन कागदावर लेहून पाठविला कीं तुम्ही यावें" ( राजवाडे ७।२०४ ).

**सुर्खरू; सुरूख–रू** [ फा० सुर्ख़–रू ] उजळ तोण्डाचा; मुक्त. "भगवान् सुर्खरू करील तोच सुदिन समजावा" ( राजवाडे ६।३९५ ). "निर्भीडपणें खरा प्रसङ्ग केल्यास, कोण सुरूख–रू कोण खाली पाहतो हेंहि ध्यानास येईल" ( ऐटि ३।६२ ).

**सुर्ख–रूई; सुर्ख–रोई** ( स्त्री० ) [ फा० सुर्ख़–रूई ] बहुमान; आब; सुटका. "त्याजकडून घडलें नाहीं इतकी सुर्ख–रोई आहे" ( राजवाडे ५।१७७ ).

**सुर्खी** ( स्त्री० ) [ फा० सुर्खी ] लाली; तजेलेदार गुलाबी छटा; लाल–शाई.

**सुर्नीस** ( पु० ) सनदा वराती कौलनामे वगैरेवर सुरू सूद बार या तीन शब्दांचा शिक्का मारण्याचें काम ज्याच्याकडे असे तो अधिकारी.

**सुर्मा** ( पु० ) [ फा० सुर्मा ] मोत्याचें केलेलें नेत्राञ्जन.

**सुर्वार** ( स्त्री० ) [ फा० शुल्वार् ] विज़ार.

**सुरई** ( स्त्री० ) [ अ० सुराही ] चम्बू; कुजा.

**सुरत** ( स्त्री० ) [ अ० सुरत् ] चेहरा; सौन्दर्य; प्रतिमा; पुतळा; रूपरेषा; हकीगत; स्थिती; प्रकार; गांठ. "चन्द्री कळवन्तीण साम्प्रत गाण्यांत, नाचण्यांत, सुरतींत, हावभाव बतावणींत येथें सर्व दौलत्दारांचे पसन्तींत आहे" ( जुऐगो ११ ). "इन्दुरीं मल्हारजी होळकर सुभेदार व खण्डेराव होळकर यांच्या सुरती पाषाणाच्या सङ्गमरवरी करून स्थापिल्या" ( मदबा २।५५ ).

" कामाची सुरत मजला साङ्गावी " (भाब २१). "पुढें तिकडील सुरत दिसण्यांत येईल त्या बेतानें जें कर्तव्य तें करावयाचें" (खरे ८।४३५८). "दाभाडे यांनीं बिघाडाची सुरत दाखविली " ( राजवाडे ४।३८ ). " परन्तु फिरून यावयाची सुरत दिसत नाहीं व तह–रह चारी सन्दर्भाचा प्रकार काडीमात्र नाहीं " ( खरे १।४४५ ). " पुढें नदीचें पाणी उतरल्यावर गिल्च्यांची सुरत घ्यावी " ( भाके १० ).

**सुरत्–पाक** देखणा.

**सुरत्–पिजीर** [ फा० सूरत्–पिझीर् ] यशस्वी. " दिलखवाह मतालीब कार सुरत् पिजीर होऊन " ( साने–पयाव ३८४ ).

**सुरत्वान** सुन्दर. " स्थापनेस प्रतिमा आणिल्या त्यांत सुरत्वान नाहींत " ( खरे ९।४७९३ ).

**सुरत–हाल** ( पु० ) कैफियत; हकीगत. " शङ्करराजीस वतनासी तालुका नाहीं म्हणून आमलाल्या दस्कत व शिक्क्यानसीं सुरत–हाल करून लश्करांत पाठविला " ( वाड–सनदा ९५ ).

**सुरवात; सुरुवात** ( स्त्री० ) [ ∠ अ० शुरूअ ] प्रारम्भ.

**सुरा** ( पु० ) [ अ० सूरा ] कुराणाचा खण्ड.

**सुराख** ( पु० ) [ फा० सुराघ् ] शोध; पाळत. " या धामधुमींत सयाजीराजाचा मुलगा रुस्तुमजी हा बालवयांत होता; त्या सुराख राखून तोतया अब्दुल्लानें ज़बर्दस्तीनें धरिला " ( भाइसम–ससबृ ६७ ).

**सुरू** [ अ० शुरूअ ] चालू. आरब्ध;

**सुरू; सरू** ( पु० ) [ फा० सर्व् ] Cypress नांवाचें एक सडपातळ, उंच, सरळ वर निमुळतें होत जाणारें, सदा हिरवें टवटवीत दिसणारें झाड. फार्शी कवितेंत प्रियेच्या शरीरयष्टीशी सरूची तुलना करणें रूढ आहे.

**सुरूदार** सरूच्या आकाराचा ( साम्य ) ( चित्रगुप्त १७ ).

**सुरुसन** [ अ० शुहूर् = महिने ] हिज्री शकानन्तर सातशें पञ्चेचाळीस ७४५ वर्षांनीं म्हणजे इसवी सन १३४४ तेराशे चव्वेचाळीस सालीं सुरू झालेला शक.

**सुल्तान** ( पु० ) [ अ० सुल्तान् ] पादशहा; अनियंत्रित सत्ता चालविणारा; जुलमी राजा.

**सुल्तान–ढवा** ( पु० ) येल्गार; हल्ला. " पुरन्धरास आपण सुल्तान ढवा करितों आणि गड घेतों "

**सुल्ताना** ( स्त्री० ) [ अ० सुल्ताना ] महाराणी.

**सुल्तानी** ( स्त्री० ) आधिराज्य; जुलमी राजसत्ता; सुल्तानासम्बन्धी.

**सुलह** ( पु० ) [ अ० सुल्ह् ] सलूख; सख्य. " पेस्तर रुक्नुद्दौला याचे मारिफत सुलह करून" ( राजवाडे १।५३ ).

**सुलाख** ( पु० ) [ फा० सूराख् = भोंक ] सोन्याच्या दागिन्यांतील धातूच्या शुद्धतेची परीक्षा पाहण्यासाठीं त्याला पाडलेलें भोंक.

**सुलाखणें** अन्तर्बाह्य परीक्षा करणें. "प्रभाकराचें कवन सुलाखुन सरस्वतीनें पाठविलें " ( प्रभाकर १६३ ).

**सुस्त** [ फा० सुस्त् ] मन्द; आळशी.

**सुस्ताई; सुस्ती** ( स्त्री० ) [ फा० सुस्ती ] मन्दत्व; आळस; दिरङ्ग. " या उपरी तऱ्ही ऐवज़ पाववावया बाबें सुस्ती न करणें " ( राजवाडे १५।१८२ ). " लौकर कोणतें यावें, आणि सुस्तीनें कोणतें यावें हा विचार धन्यास, कार्भार करणारास असावा " ( मद्बा १।४३ ).

**सुस्तावणें** मन्द होणें.

**सूज़** ( स्त्री० ) [ फा० सोज़् = दाह ] शरीरावर विकारामुळें येणारी फुगी.

**सेना–खास–खेल** गायकवाडांचा किताब.

**सेव** ( पु० ) [ फा० ] सफर्चन्द. " सेव तो आलेच नाहीत " ( दिमरा १।१०१ ). " विलायती मेवा सेव दाणे पन्धरा एक पेटारी सेवेसी पावेल " ( दिमरा १।२२ ).

**सेरणी; शेरणी** ( स्त्री० ) [ फा० शीरिनी ] मिठाई; ज्याच्या बाज़ूनें न्याय झाला त्यानें आनन्दप्रदर्शक म्हणून द्यावयाची रक्कम; हरखी. " सीर्णी ( राजवाडे १५।६४ ).

**सेला** ( पु० ) [ फा० सैलाब् ] लोण्ढा. " दत्ताजी शिन्दे इकडे तोण्ड करीत तों इकडील फौजेचे सेले तोण्डासन्मुख येत " ( भाब ६३ ).

**सेहत** ( स्त्री० ) [ अ० सिह्हत् ] तन्दुरुस्ती; प्रकृतिस्वास्थ्य. " आपल्यास सेहत जालियाचे खुशीचे पार्चे " ( साने–पयाव ४६७ ).

**सैतान** ( पु० ) [ अ० शैतान् ] घोरकर्मा; पापमूर्ती.

**सैफ** ( स्त्री० ) [ अ० सैफ् ] तर्वार.

**सैर** ( स्त्री० ) [ अ० सैर् ] सहल; निसर्ग–निरीक्षण. " आग्र्याची सैर करावयास या प्रान्तीं आले आहेत " ( दिमरा १।३०१ ). " आजी प्रातःकाळीं प्रहरदिवसा उपरी थोरले श्रीमन्त बागांत सैर करावयास गेले " ( राजवाडे ६।५८७ ).

**सोख्त** [ फा० सोख़्त् ] दग्ध. " सरञ्जाम सर्व सोख्त जाला " ( दिमरा २।४ ).

**सोखी** ( स्त्री० ) उन्मत्तपणा; शोखी पहा. " शामलांनीं सोखी करून बाणकोटास अपाय केला " ( वाड–शाछ २६ ) " या उपर गनिमांनीं सोखी करून मोर्चे काबीज केलें " ( पारसनीस–ब्रच ७९ ).

**सोडत** ( स्त्री० ) [ अ० शर्त ] शर्यत; लॉटरी.

**सोपा** ( पु० ) [ अ० सुफ्फा ] ओटा; पडवी; चौकाच्या चारी बाज़ूची उन्च जागा.

**सोबत** ( स्त्री० ) [ अ० सुहूबत् ] सङ्गत; बरोबर. " तें सर्व तुमच्या वडिलांपासून सोभतीस आहेत " ( साने–पयाव १७).

**सोबती** ( पु० ) स्नेही; साङ्गाती.

**सोमल** ( न० ) [ अ० सुम्बुल़ ] एक प्रकारचें विष.

**सोर** ( पु० ) [ फा० शोर् ] ओरड; आकान्त. " भजनीं लोकनिन्देचा सोर माजे थोर अभिशापें " ( मुक्तेश्वर आदिपर्व १६।१०१ ).

**सोल्दाद** [ जर्मन सोल्डाट् ] सोजीर; शिपाई. " लोकांचे सोल्दाद " ( राजवाडे ५।१३९ ).

**सोहलत; सौलत** ( स्त्री० ) [ अ० सुहलत् ] सवड; साम. "मन्सुब्यास सोहलत राहिली नाही " ( इम २९५ ). " ज़रब देतां येत नाही सोहलतीनेंच होईल तेथवर

पहात आहों " ( खरे ७।३४४७ ). " प्रयागची रद्-बदल आहे; तोही मन्सुबा सोहलतीनें होईल तरी करावा " ( साने-पयाव ३३८ ).

**सौगन्द** ( स्त्री० ) [ फा० सौगन्द् ] शपथ. " मुसल्मान होऊन मोडील त्यास सौवराची सौगन्द असे " ( राजवाडे १५।१३५ ). " यार्णी सौगन-शपथ घालोन पाद्शहास साङ्गून पाठविलें कीं तुम्ही पुढें न येणें " (मदूरु १।८५).

**सौदा** ( पु० ) [ फा० सौदा ] क्रयविक्रय; व्यवहार.

**सौदागर; सौदागीर** ( पु० ) [ फा० सौदागर् ] व्यापारी. " भिन्न भिन्न सौदागरीं । सहवर्तमान जाया कुमरी सुहृद् बन्धु सुखनिर्भरीं । वसते झाले जवळिके " (मुकेश्वर-सभापर्व २।९१).

**सौदागरी** व्यापारी; गैर लढाऊ. " ज़हाज़ सौदागरी " (वाड-समा २।६५ ).

**सौदागरी; सौदागिरी** ( स्त्री० ) व्यापार. " इङ्ग्रजांची सौदागिरी आपले रियासतींत चालूं केली " ( खरे ७।३५६४).

**सौब** [ अ० सौब् ] बाज़ू; तर्फ. " अज़-सौब-जन्रल "( भा-ऐ पयाव ४५ ). " अजीं सोब " ( काप्रइसा २२ ).

**सौलत** सोहलत पहा.

## ह

**हऊस** ( स्त्री० ) हौस; इच्छा. " परस्पर बिघाडाविसीं हऊस राहिली नाही " ( चन्द्रचूड-दप्तर १।१०५ ).

**हक्क** ( पु० ) [ अ० हक्क् ] सत्य; स्वत्व; मालकी; अधिकार; प्राप्तव्य; पगार; नेमणूक; सम्बन्ध. " ज्याजती होईल तितकी किम्मत करून त्याच्या हक्कांत धरावी " ( सभासद् २३ ). ' पाटील कुळकर्णी यांसी हक्क बान्धून दिला " ( सभासद् २५ ). " रहम ( = दया ) त्याचे हकांत ज़रूर आहे " ( राजवाडे ११।८३ ). " नो कुम्पनीचे हक्कामध्यें अतिशय हानीकर व इङ्ग्रज़ांचे ज़ातीचे प्रतिष्ठेच्या केला " ( ऐटि २।१३ ). " आम्ही मोहिह्याचे हक्कामध्ये हमेशाचे दर्गामध्यें शुक्रगुज़ारी करीत असतों " ( पारसनीस ब्रप २४० ).

**हक्क होणें** मरणें. " गणेश राम दातार हक जाले "( राजवाडें १०।१२९ ). " नजबखानास राजयक्ष्मा रोग होऊन चौदावे रबिलाखरीं हक जाला " ( मदुचा १।११८ ). **हक करणें** देहान्त शिक्षा करणें. " शिवाजी आपला पुत्र परन्तु पाद्शाहानीं त्याजला हाक करणें, सुखरूप करावा; जें मानेल तें करावें " ( मदुरु १।१६ ).

**हक्क-दार** ( पु० )[ फा० हक्-दार् ] मालक; हक्क साङ्गणारा; वारस.

**हक-रसूम; हक-लाजिमा** निरनिराळ्या प्रकारचे हक्क.

**हक-ताला** [ अ० हक्क्-तआला ] उच्च ईश्वर. " एखादे आपले हिन्दूंचे तीर्थी बसोनु हक-तालाची बन्दगी करून हज़रत साहेबास दुवा देऊनु " ( इम ६७ ).

**हक-परस्ती** ( स्त्री० ) सत्यपूजा; कृतज्ञता ( पेअ ६१ ).

**हक-नाहक; हकनाक** [ फा० हक्क्-ना-हक्क् ] नाहक; विनाकारण; अन्यायानें. "आज दीड महिना हक-नाहक फिरतों " ( चन्द्रचूड दप्तर १।

१३७ ). "वेधिलें चित्त हकनाक उशिर लाविला" ( प्रभाकर १३१ ).

**हकीगत; हकीकती** ( स्त्री० ) [ अ० हकीकत् ] सत्य; माहिती; वर्तमान. "साहेबीं हकीकती मनास आणून पाहतां" ( राजवाडे १७।३८ ).

**हकीम** ( पु० ) [ अ० हकीम् हिक्मत *जाणणारा ] यूनानी वैद्यक जाणणारा.*

**हकीम** ( पु० ) [ अ० हाकिम् हुकूम सोडणारा ] अधिकारी; अमील. "त्याचे हकिमाचे इतल्लोशिवाय स्वारी निभावून जाणार नाही" ( खरे १०।५६१४ ).

**हाकिमी** ( स्त्री० ) [ फा० हाकिमी ] अधिकार; अमिली. "प्रान्त मज्कूर हकिमी गङ्गाधर प्रतिनिधी यांजकडे होती" ( वाड-बाबा २।३२ ).

**हङ्गाम** ( पु० ) [ फा० हङ्गाम् ] मोसम; काळ; ऋतु.

**हङ्गामशीर** हङ्गामाचेवेळीं; वेळेवर. "या गांवावरी हङ्गामशीर प्रजन्य पडला नाही" ( राजवाडे ६।१८५ ). "काय तुझें देणें असेल तें हङ्गाम् शिर घेणें" ( राजवाडे १५।२४ ).

**हङ्गामा** ( पु० ) [ फा० हङ्गामा ] गर्दी; दङ्गा; बखेडा. "नेतेसमयीं दोन चार माणसें जखमी जालीं; हङ्गामा जाला होता" ( राजवाडे १।२५ ).

**हङ्गामी** तात्पुरती; मोसमी; गैर-कायम.

**हज़रत** ( पु० ) **हज़रती** ( स्त्री० ) राजास पैगम्बरास अगर इमामादि श्रेष्ठ व वन्द्य पुरुषास या शब्दानें स्वामी या अर्थानें सम्बोधितात.

**हज़र; हाज़र; हजीर** [ अ० हाज़िर् ] विद्यमान.

**हज़र-जबाबी** [ फा० हाज़िर्जवाब् ] ताबडतोब समर्पक उत्तर देणारा; समयसूचक.

**हज़र-नीस** हज़री माण्डणारा.

**हज़री; हजिरी; हजेरी** ( स्त्री० ) विद्यमानता.

**हजेरीची फौज्** नेहमीचें खडें सैन्य.

**हजाम** ( पु० ) [ अ० हज्जाम् ] न्हावी.

**हजामत** ( स्त्री० ) [ अ० हजामत् ] श्मश्रू. केस काढणें; डोक्यावरील केस भादरणें.

**हज़ार** [ फा० हज़ार् ] सहस्र. "तोफ हज़ारो हज़ार सुटली" ( प्रभाकर ५२ ).

**हज़ारा** ( पु० ) [ फा० हज़ारा ] अनेक धारा पाडणारें कारन्जें.

**हज़ारी** ( स्त्री० ) सहस्र सैनिक बाळगिण्याची मन्सब.

**हजिरा-हजीर** तात्पुरती व्यवस्था करून केलेलें. "कांहीं हजिराहजीर असें करून निघालों" ( खरे १।२६६ ). "चिरञ्जीव पण्ढरिनाथानें हजिराहजीर जीन रवाना केले" ( खरे ९।१८ ).

**हाजिमा** ( पु० ) [ अ० हज़ीमा ] धुव्वा; फजिता. "पुढें डौल कसा होतो पहावें परन्तु हजिमा आहे" ( खरे ९।४८७४ ).

**हजीर-ज़ामीन** एखाद्यास अमुक ठिकाणीं हज़र करून देण्याची हमी घेणारा ( राजवाडे १५।११४ ).

**हजीर-मज़ालस** सभासद; ( स्त्री० ) भरसभा. "याचा महज़र ... महाराजांचे समोर हाज़र-मज़ालसींत जाला" ( राजवाडे १५।२८१ ).

**हद्द** ( स्त्री० ) [ अ० हद्द ] मर्यादा; सीमा; पराकाष्ठा. "आतां हद्द झाली" (सभासद् ६६ ). "लष्करपणाची हद्द जैसी होती तैसी केली, दर भाण्डणीं मोंगलासी गांठी घालून बरीं झुन्जें दिल्हीं" ( वाड–सनदा १७३ ).

**हद्द–महदूद**[फा० हद्द–ई–महूदुद्]मर्यादित. "हद्द–महदूद पाण्डरीवरी जें उत्पन्न होईल तें निमें दोनी ठाईं तारोतार वांटून यावें (राजवाडे १५।५१).

**हद्द–हदूद** (स्त्री०) [ अ० हुदूद् अनेक व० हद्द चें ] मर्यादा. "हद्द–हदूद बान्धणें" ( राजवाडे ६।५७९ ). " गांव गन्नाचे सिवेच्या हद्द–हदोदी " ( मद्‌रु १।१२).

**हदीस** ( स्त्री० ) [ अ० हदीस् ] "पैगम्बराचें वाक्यास हदीस असें म्हणतात" ( वाड–सनदा २३ ).

**हनोज्** [ फा० हनोज़् ] अद्यापि; अजून ( राजवाडे १०।१६४ ).

**हप्त– हज़ारी** ( स्त्री० ) [ फा० हफ्त्–हज़ारी ] सप्त सहस्र सैनिकांचें आधिपत्य.

**हप्ता** ( पु० ) [ फा० हफ्ता ] आठवडा; किस्त. "बाकी निमे ऐवज़ राहिला त्याचे तीन हफ्ते ठरले आहेत" ( वाड–समा १।३४४ ).

**हप्ते–बन्दी** ( स्त्री० ) किस्त–बन्दी.

**हबशी** [ अ० हबशी अबिसीनियांतील ] जज़िरेकर श्यामल.

**हम–खास** [ फा० आम्–खास् ] सर्वसामान्य; प्रसिद्धपणें, निश्चयपूर्वक.

**हमगी** [ फा० हमगी ] सर्व. "खानगौडा दत्तक घेतलेला व तिघी बायका हमगीस आणून ठेविलें" ( खरे ९।४६९८ ).

**हम्ज़ात** ( फा० हम्ज़ाद् ] सारख्या वयाचा ( चित्रगुप्त १७ ).

**हम्बीर** ( पु० ) [ अ० अमीर् ] सर्दार. "बसूनिया हम्बीर करिती विचार हल्ला करा एकदांची" ( इपुस्त्रिपो १६० ). " आले कचेरीस बोलाविले हम्बीर " ( इपुस्त्रिपो २२० ).

**हम्बीरराव** एक किताब.

**हम्–रस्ता** [ ∠अ० आम् ] सार्वजनिक रस्ता.

**हम्राह** [ फा० हम्राह् ] सङ्गती; बरोबर; सामील. "आपलें उत्तम जाणाल तें करणें; आम्ही तुमचे हम्राह आहोंत" ( राजवाडे १।१९८ ). "पेशजी किनवीचेही हम्राह होता" (राजवाडे ५।१५० ). "फौज़ हम्रा ( = गोळा ) करून सुभा पातशाई याजवर आणून घालावे" ( होकै ७ ).

**हम्राई; हम्राही** (स्त्री०) [ फा० हम्राही ] सङ्गत; जुथ; बरोबरीचा. "ज्यांजवर रुपया येतो त्यांजला ज़खम लागली असतां हळद्–फटकूं मिळणें कठिण; तेव्हां फौजेची हम्राई राहते कशी !" ( होकै ३ ). "हम्राही ज़मियेत–पैकीं" (राजवाडे १०।१८६ ). "हम्राई" ( दिमरा १।१५२ ).

**हम्वार** [ फा० हम्वार् ] सारखी; प्रसन्न; सरळ. "ज्यांत त्यांची मर्जी हम्वार राहे तें करणें योग्य" ( इम २५५ ). "लेकीन हम्वार न जाले" ( खरे ७।३५६५ ).

**हम्शाई** [ फा० हम्साया=शेजारी ] शेजारील. "त्या प्रान्तींचे वतन्दार हम्शाई गावींचे" ( राजवाडे १५।८० ).

**हमाम्-खाना** ( पु० ) [ अ० हम्माम् ] जिथें उष्ण जळ मिळतें असें स्नानगृह.

**हमाल** ( पु० ) [ अ० हम्माल् ] ओझें वाहणारा; भारवाहक; मजूर; कुली.

**हमाली** ( स्त्री० ) [ फा० हम्माली ] हमालाचा पेशा अगर काम; मजुरी.

**हमी** ( स्त्री० ) [ अ० हामी जबाबदारी घेणारा ] जबाबदारी; जामीनकी. "याप्रमाणें हामी-निशा सावकारी देतात" ( मदबा २।२०६ ).

**हमीदार** ( पु० ) ज़ामीन; जबाब्दार. "ती जवळून आपण ऐवज़ाचा हमीदार घेतला" ( ऐटि १।२२ ).

**हमेणी; हमिनी** ( स्त्री० ) [ अ० हिम्यान् ] पैसे ठेवण्याचा लाम्ब कसा; पिशवी. "कम्बरेस हामिन्या द्रव्याच्या" ( मदरु १।६४ ).

**हमेश; हमेशा** [ फा० हमीशा ] नेहमी.

**हयात; हयाती** ( स्त्री० ) [ अ० हयात् ] आयुष्य; जिन्दगी; जिवन्तपणा; उमर; जिवन्त. "आज येथून आमची हयात खुण्टली यैसें भविष्य केलें" ( भाइसम १८३४ पावृ २१२ ). "काय हयाती बाकी असेल ते, ते स्थळीं अखेर होय तर उत्तम आहे" ( मदबा १।१५६ ). तह-हयात=हयातीपर्यन्त.

**हयासा** ( पु० ) [ फा० हयासा ] जेर्बन्द.

**हर्-एक** [ फा० हर्यक् ] प्रत्येक; चिल्कूल. 'जुने लोक वगैरे यांस हर-एक उपद्रव न केला' ( मराचिस २८ ).

**हर्कत** ( स्त्री० ) [ अ० हरकत् ] हाल-चाल; विरोध; आक्षेप; अडथळा; विलम्ब. "बेडर मज्कूर काबू-वख्त पाहून जागा व मकानें घ्यावयाचे उद्देशें हर्कत करणार" ( राजवाडे ५।६८ ). "येवढे रईस यांची हर्कत व्यर्थ होणें चाङ्गलें नाहीं" ( राजवाडे ७।१९४ ).

**हर्कसा** कोणत्याही रीतीनें. "हर्कसा प्रविष्ट होय असें करावें" ( खरे ४।१८०० ).

**हर्कामी** प्रत्येक कामास उपयोगी पडणारा.

**हर्कार-गिरी** ( स्त्री० ) ज़ासूदाचें काम ( दिमरा १।२ ).

**हर्कारगी** ( स्त्री० ) हर्कारगिरी. "तुजे बाप नार शेणवी यासी हर्कारगी मिरास देसाई यांणीं मोकर करून दिवाण-चाकरीती ठेविले होते" ( सासंइ-जुले २५ ).

**हर्कारा; हल्कारा** ( पु० )[ फा० हर्कारा ] पडेल तें काम करणारा; ज़ासूद; टेहळ्या. "तेथील लश्करची माहीयेत खरी कळावी म्हणून दोघे हर्कारे पाठविले होते" ( चिरा ४४ ).

**हर्गाह** [ फा० हर्गाह् = जेव्हां जेव्हां ] ज्या अर्थी. "हर्गाह कीं कार्बाज मुतशरीफ नाही, बहात्तर वर्से नाही; आणि सनद-अस्नादही नाही, मर्द तुफानी आहे" ( राजवाडे २०।४७ ).

**हर्गीज़; हर्गीस** [ फा० हर्गिज़् ] कधींहि; बिल्कूल. "या उपर इङ्ग्रजास पुरती तम्बी द्यावी हेंच मनांत आहे तर आपण हर्गीज़ तह करूं नये" (खरे ७।३७०६). "चिरञ्जीव भाऊसाहेब आल्याखेरीज तुम्ही हर्गीज़ न व्हावें" ( साने-पयाव १४९ ). "जे मजला मानिती माझ्या विचारें वर्तती। ते हर्गीस झोला न पावती। न नाडतीं जीं" ( श्रीसमर्थकृत

दिवटा ६ ). " ज़हर हर्ताळ घातला आहे, हा हर्गीस वांचणार नाही " ( भाइसम १८३४ पावृ १४३ ).

**हर्जिनसी** नानातऱ्हेचा. " श्रीगणेशपूरच्या नवबागेंत हर्जिनसी झाडें वरचेवरी आणून लावून देतों " ( खरे ८।४१२१.)

**हर्दम** [ फा० हर्दम् ] प्रतिक्षणीं.

**हर्दम्-ख्याली** [ फा० हर्दम्ख़ियाली ] लहरी; अस्थिर; लबाड. " ( शिन्दे ) ज़ात्या हर्दम्ख़्याली......कसें करितील याचा विश्वास नाही " ( खरे ७।३२ ४७ ). " बोलणें हर्दम् ख्याली दिसतें " ( खरे ८।३९३० ). " त्यांत तो ( हैद-रअली ) हर्दम्ख़्याली आहे " ( खरे १०९६ ).

**हर-दर्हाल** केव्हांही. " हर्दर्हाल मोहिब्बाचे कामामध्यें तफावत तज़ावज़ कारणार नाही" ( परसनीस ब्रप २४० ).

**हर्दू; हर्दो** [ फा० हर्दू ] दोघेही; दोन्ही. "हर्दो जणांचा ज़मान घेणें " ( राजवाडे १५।४६ ). "तरी हर्दू गांव" ( राजवाडे ८।१३० ).

**हर्फ; हरफ** ( पु० ) [ अ० हर्फ़् ] अक्षर; लेख; ठपका; दोष."तहनाम्यांत कांहीं हर्फ नीट करावयाचे ते करून " ( राजवाडे ५।३३ ). " श्रीचा शिक्का, याप्रमाणें हरफ = श्रीभार्गवचरण परमहंस ब्रह्मेन्द्र शरण " ( पारसनीस=ब्रच ८९ ). "बल्की पन्तप्रधानावर हर्फ आणि-ला " ( राजवाडे ६।६१८ ). " हर्फ ठेवून बोलतां हें ठीक नाही " ( खरे ८।४३५४ ).

**हर्फ-ब हर्फ** अक्षरशः " कलमांची फर्द सर्कारची आली ती हर्फ-ब-हर्फ वाचून दाखविली " (राजवाडे ७।८). " कलमा केलें तें हर्फ-ब-हर्फ दिल्निशीन जालें " ( राजवाडे १०।३९१ ).

**हर्वजे़नें** कोणत्याही रितीनें. " शिकन्दरि याहून शादल निघाला म्हणजे मार्गीच गांठून हर्वजे़नें शिक्षा करितों" (राजवाडे ६।६२३ ). " साटकास हर्वजे़नें नसी-यत करून ब्राम्हणाची मुली सोडून देवणें " ( वाड-शाछ १०४ ).

**हर्हमेश** नेहमी.

**हर्हुन्नरी** अनेक कलांत निष्णात.

**हराम** [ अ० हराम् ] निषिद्ध; अन्यायाचा.

**हराम्खोर** [ फा० हराम्खुर् ] अप्रामाणिक; स्वामिद्रोही; लुच्चा.

**हराम्खोरी** ( स्त्री० ) [ फा० हराम्खुरी ] अप्रामाणिकपणा; स्वामिद्रोह; लुच्चे-गिरी.

**हराम्ज़ादगी** ( स्त्री० ) [ फा० हराम्ज़ा-दगी ] लुचाई; स्वामिद्रोह. " ज़मी-दारांनीं हराम्ज़ादगी केली " ( राजवाडे ११२४६ ). " रयत हराम्ज़ादगी करून अम्मल सुरळीत देत नाही " ( राज-वाडे ८।१५८ ).

**हराम्ज़ादा** [ फा० हराम्ज़ादा ] जारज; लबाड; स्वामिद्रोही; धूर्त. " मराठे हराम्ज़ादे, आठ दिवस अगोदर पळाले; हजीर असते तरी कैद करितों " ( सभासद ४८ ).

**हराम्ज़ादी** ( स्त्री० ) हराम्ज़ादगी, लबाडी. " त्यांच्या हराम्ज़ाद्या व मकरे सर्व नवाब बहादूर यांचे ध्यानांत " ( राज-वाडे १९।५९ ).

**हराम्-नमकी** ( स्त्री० ) निमकहरामी. " पादशहाशी ज्यानें हराम्नमकी बे-अदा केली " ( भा-ऐपयाव २१ ).

**हरामी** लबाड; कपटी; ( स्त्री० ) हरामखोरी. " शिवाजी हरामी आहे " ( सभासद ४८ ).

**हरिफाई; हरिफी** ( स्त्री० ) [फा० हरीफी ] धूर्तता; चतुराई; कावेबाजी. " आतां तुमची त्यांची भेटी खासे खासे यांची करवितों; तुम्ही हरिफी करून कार्यभाग करणें तो करावा " ( सभासद १५ ).

**हरीफ** [ अ० हरीफ़् ] धूर्त ;काबीज; कावेबाज़; ( पु० ) शत्रू. " मराठे हरीफ बहुत आहेत, असें बोलले " ( सभासद ४९ ). " आतां जाऊन हरिफासी मुकाबला करावें " ( दिमरा ११२६१ ).

**हरोल; हरोळी** (स्त्री०) [फा० हरावुल् ] आघाडी; बिनी; पुढारी; पुढें. " तुम्ही या मन्सबियास हरोल होऊन मन्सबा सिद्धीस जाय तें करणें " ( वाड-शाछ ३० ).

**हल्का; हल्गा** (पु०) [अ० हल्का ] कडी ( छताची अगर तुळईची ). " फाणसें पिंवळीं हल्क्यांना " ( प्रभाकर ९३ ). " लावून रुपेरी हल्के हिन्दुळे बान्धिले " ( प्रभाकर ).

**हल्कारा** ( पु० ) हर्कारा; ज़ासूद.

**हलगर्जी** [ फा० अहल्-इ-गरज़् = स्वार्थी ] निष्काळजी.

**हल्ला** ( स्त्री० पु० ) [ अ० हम्ला ] चढाई; छापा; एल्गार. " शिवाजी आपला पत्र याजवरी हल्ला करावी " ( सभासद १० ).

**हली; हाली** [ फा० हाली ] आज; वर्तमानकालीं.

**हल्वा** ( पु० ) [ अ० हल्वा ] मिठाई; साखरेच्या पाकांत घोळून कांटेदार बनविलेले सङ्क्रान्तीस द्यावयाचे तीळ.

**हल्वाई** ( पु० ) [ फा० हल्वाई ] मिठाई बनवून विकणारा.

**हलाक** [ अ० हलाक् ] क्लान्त; क्षीण; दरिद्री. " दोन तीन चपेट होऊन बहुत हलाक जहालों आहों." (चित्रगुप्त ७९)

**हलाखी; हलाकी** ( स्त्री० ) थकवा; पडती; दारिद्र्य; दुर्दशा. "आपलें राज्य नवें; त्याहीमध्यें दोन तीन चपेटे होऊन हलाखी झाली आहे" ( सभासद ४७ ). "लश्करांत दाणा-चारा मिळेना तेव्हां हलाकींत आले" ( मराचिथोरा ५८ ).

**हलाल** [ अ० हलाल् ] विहित; धर्म्य; न्याय्य; विधिपूर्वक मारलेल्या पशूचें ( मांस. ) "मुलानानें कात्या न दिला तर बकरें मुर्दाड रहातें म्हणजे तें हलाल होत नाहीं" ( गांवगाडा ११३ ) हलाल करणें=नुस्लीम विधिपूर्वक पशू मारणें; जबे करणें.

**हलाल्खोर** ( पु० ) [ फा० हलाल्खुर् ] झाडू; भङ्गी; हलकें काम करणारा. "क्षेत्र मज़्कूरच्या गल्ल्या हलाल्खोरांकडुन झाडवून निर्मळ राखणें " ( वाड-समा ३।१९ ). "सेवकाचे घरा आसपास सोळा हलाल्खोर यांची चौकशी बसविली आहे " ( जोरा ११७ ).

**हलाल्खोरी** ( स्त्री० ) [ फा० हलाल्खुरी ] हलका धन्दा; प्रामाणिकपणा; इमानीपणा. "तुझे बाबें नरसो दामोधरें हुज़ूर हलाल्खोरी बहुत वजा ( =प्रकारें ) साङ्गितली" ( राजवाडे १५।३१ ).

**हव्यास** (पु० )[ ? अ० हवस् ] तीव्र, इच्छा; छन्द; नाद.

**हवल्दार** ( पु० ) [ फा० हवालादार् ] कांहीं शिपायांचा नाईक.

**हवस** ( स्त्री० ) हौस. "आपल्या असलाद् ( ? असलन्=बिल्कूल ) पुन्याई मामल्याची हवस कांहीं राहिली नाहीं" ( इम ६७ ).

**हवा** ( स्त्री० ) [ अ० हवा ] वारा; शीतोष्णमान; धुन्दी. " उतरली भरज्वानीची हवा " ( परशराम १५१ )

**हवाई; हवई** ( स्त्री० ) [ फा० हवाई ] चन्द्रज्योत; छापा (?); वायवी; अ-जड. "तेथून सडे होऊन गेज् फौज् येत चालली म्हणजे त्याजवरी हवाई करावयास येईल" ( खरे १।२०७ ). "गेली दूर अवई, नार सवई, हवई जशि सुटली" ( प्रभाकर २३९ ).

**हवा-दोज्** (?) गगनचुम्बी; उन्च. "ज़मी दोज़ हवादोज़ शामीने" ( भाइसम १८३४ अहवाल ४८ ).

**हवाल** ( पु० स्त्री० ) [ अ० अह्वाल् ] स्थिती; हाल-हवाल. "वाचून दाखवितील त्याजवरून कच्चा हवाल अवघा ध्यानास येईल" ( दिमरा १।१३३ ).

**हवालणें** सिपूर्द करणें; सोंपविणें.

**हवालत** ( स्त्री० ) **हवाला** ( पु० ) [ अ० हवालत्-हवाला ] सोंपवणूक; जबाब्दारी; भिस्त. "अठरा लक्ष रुपये हवालतीस होते तेही परिहार करून" ( मदरु २।१४ ). "डेङ्गला मज्कूर यांचें ठिकाण लाऊन जिवन्त अगर मेला सर्कारांत हवाला करून देईल त्याजला बक्षीस दान लक्ष रुपये व हज़ार रुपयांचा गांव इनाम इङ्ग्रज बहादूर यांचे वियमानें दिल्हा जाईल" ( भाइसम १८३४ अहवाल १६ ).

**हवाशीर** जेथें हवा खेळती मोकळी आहे अशी ( ज़ागा ).

**हवेली** ( स्त्री० ) [ फा० हवीली ∠ अ० हवाला ] मन्दिर; वाडा; मोठें उन्च सुशोभित घर; राजधानीच्या भोंवतील भाग; गिर्द.

**हवेली-दाखल** गृहप्रविष्ट. " आम्ही हवेली दाखल जाहलों " ( राजवाडे ६।२८८ ).

**हश्मत्पन्हा** [ फा० ह्श्मत्पनाह् ] वैभवशाली.

**हशम** ( पु० ) [ अ० हशम् ] परिवार; नोकर-चाकर; शिपाई-प्यादा.

**हशम-नवीस** ( पु० ) हशमाकडील कारकून.

**हशील** ( न० ) [ अ० हासिल् ] प्राप्त; लभ्य; प्राप्ती; नफा; फी; तात्पर्य. " पुढें मुद्दे हशील होतील " ( खरे २।५४८ ). " साहुकारीमुळें जकातीचेंच हाशील होईल " ( मराआ ३७ )

**हस्त-बूद** ( पु० ) [ फा० हस्त्-बूद् = आहे-होता ] सारा; मुल्की; वसुली. " शिन्द्याचे हस्तबूद अम्मल चालू लागले " ( खरे ८।४०४६ ).

**हस्बुल्हुकूम** ( पु० ) [ अ० हस्बुल्हुक्म् = आज्ञेप्रमाणें ] आज्ञापत्र. " सुरजमल व माधोसिङ्ग यांस हस्बुल्हुकूम व जयाप्पास खिलत वगैरे पाठविणें " ( राजवाडे ६।३९७ ).

**हाकीम** ( पु० ) [ अ० हाकिम् ] अधिकारी. " तेथील हाकिमचे बळानें प्यादे बसवून " ( राजवाडे ६।२९७ ).

**हाकीम-शरा** ( पु० ) काजी-शरा; धर्मशास्त्री. " काजी अब्दुल्ला बीन काजी महम्मद हाकीम-शरा " ( राजवाडे १८। २१ ).

**हाज़त** ( स्त्री० ) [ अ० हाजत् ] ज़रूरी; अडचण. " परशुरामपन्त यांस बिल्कैल इङ्ग्रज़ांचे तम्बी करितां आणवावे ऐसी हाज़त नाहीं " ( राजवाडे १९।१०६ ). " कलमी करावयाची हाज़त नाही " ( साने-पयाव ४७२ ). " मुकर ( =पुनः पुन्हा ) ल्याहावें याची हाज़त नाही " ( साने-पयाव ४७६ ).

**हाज़म करणें** [ अ० हाझिम् = पळविणारा ] लुटणें. " रस्ता हाज़म करून ठेविला आहे " ( राजवाडे ११।४५ ).

**हाज़र्बाशी** ( स्त्री० ) [ फा० हाझिर्बाशी मुलाज़मत; वास्तव्य. " दर्बारीं हाज़र्बाशी करून सर्कारची दौलत्खाई चिन्तीत आहों " ( चिरा ३५ ).

**हाज़र-मज़ालीस** हज़र-मज़ालीस पहा.

**हाजी** ( पु० )[ फा० हाजी ∠ अ० हाज्ज् ] हज्ज् म्हणजे मक्केची यात्रा करून आलेला मुसल्मान.

**हाम-खास** ( पु० ) आमखास; दर्बार कचेरी. " हाम-खास भरविला म्हणजे कचेरी " ( मदरु १।७७ ).

**हामी** ( पु० ) [ अ० हामी ] हमीदार. " हमी मातबर त्रिम्बक शेट गुज़र देतों " ( पारसनीस-ब्रप ६१ ).

**हाय-दोस** ( पु० ) [ फा० या दोस्त ! = हे मित्रा ! ] मोहरमांतील दङ्गल.

**हायल** [ अ० हाईल् ] भयङ्कर. " लेकीन हा मसेला हायेल आहे " ( राजवाडे५। १५७ ).

आहे त्या स्थितींत; ठायींचे ठायीं. " आपण शिवाजीवरी जातों, त्यास हाल्बुद्द ठेवितों " ( सभासद ५९ ).

**हाल** [ अ० हाल् ] हली. ( पु० ) सुस्थिती; त्राण; ( अनेक वचनी ) दुर्दशा. " ऐसें झालें असतां हाल करार बमोजीब मुम्बईकर यांणीं अमलांत न आणिलें " ( खरे ७।३५७३ ). " लस्कर-पायमालीनें रयतीचा हाल राहिला नाही " ( राजवाडे १८।५३ ).

**हाल-अपेष्टा** ( स्त्री० ) दुर्दशा.

**हाल-अहवाल** ( पु० ) कैफियत; वर्तमान. " एणें प्रमाणें आपला हाल-अहवाल खातरेसी आणितां " ( राजवाडे १८।३१ ).

**हाल-हकीगत** ( स्त्री० ) कैफियत. " आमची हाल-हकीकत विदित करून " ( इऐ ५।४८ ).

**हाल-हवाल** ( पु० स्त्री० ) कैफियत; दुर्दशा. " रयतीचा हाल-हवाल जाहीर केला " ( राजवाडे १८।५३ ). " हाल-हवाल असेल तत्रापी हे खण्डणी सोडतात असा अर्थ नाहीं "( खरे ११४५ ).

**हालत** ( स्त्री० ) [ अ० हालत् ] सुस्थिती, त्राण. " मुलकांत हालत कांहीं राहिली नाही " ( मदबा १।२१३ ).

**हाली; हाल्ली** [ फा० हाली ] साम्प्रत. " हाल्ली " ( राजवाडे ३।९७ ).

**हाली-मवाली; अहाली-मवाली** [ अ० अहाली व मवाली ] उच्चनीच सर्व लोक; हमखास. " यावरी तमाम अहाली व मवाली पर्गणे मज्कूर व गिर्दूनवाही ज़मीदार हर कोणी लहान थोर साङ्गताती जें " ( वाड-सनदा १४० ).

**हाली-माजी** ( स्त्री० ) कान्ती; बखेडा. "आमचे दौलतींत हाली-माजी होत

गेल्यामुळें कागदपत्र दाखलेशीर राहिला नाही " (राजवाडे ११३१२). "राज्याचें हालीमाजीचे विज्वरामुळें शिरस्ता मोडत आला आणि हक्क–रुसूमही झाडून उगवेना सबब नादारीस आलों आणि लोकांचे कर्जदारी जाहलों " ( राजवाडे १३।९१ ). " त्याणीं व तुम्ही मिळोन सावनूर तालुक्याचा बन्दोबस्त पक्का राखावा; हाली–माजी होऊं देऊं नये " ( खरे ११।६०९७ ).

**हालोहाल** तत्काळ; ताबडतोब.

**हाव** ( स्त्री० ) [अ० हवा ] हव्यास; लोभ.

**हावरा** ( पु० ) लोभी.

**हासिया** ( स्त्री० ) [ अ० हाशिया ] किनार ( ऐंटि ११३४ ).

**हासल; हासील** [ अ० हासिल् ] हशील पहा. "मन्सूबा हासल होईल" ( राजवाडे ८।२०३ ). " हासिलाची ( =जकातीची ) माफीची आज्ञा व्हावी " ( खरे ११।५९२१ ). " त्यांतील हासील ( =तात्पर्य ) कलम्वार करण्या करितां आज्ञा केली आहे " ( खरे ९।४७८९ ).

**हासिली** हसील देणारा; दस्ती. " आणिकही झाडें हासिली तीं तीं पाहिजेत लिहिलीं " ( मेस्तक–पुस्तक–जमा लेखन ५३ ).

**हिक्मत** ( स्त्री० ) [ अ० हिक्मत् ] शहाणपण; युक्ती; कावा.

**हिक्मती** शहाणा; कावेबाज; हुन्नरी.

**हिकायत** ( स्त्री० ) [ अ० हिकायत् ] कथा; गोष्ट.

**हिकायती; हिकाती** तक्रारखोर.

***हिज्री*** *[ ∠ अ० हिज्रा = वतनत्याग ]* हज्रत मुहम्मद पैगम्बर मक्का सोडून मदिनेकडे गेले त्या दिवसापासून म्हणजे इसवी सन ६२२ च्या जुलैच्या सोळाव्या तारखेपासून सुरू झालेला शक.

**हिफाजत; इफाजत** ( स्त्री० ) [ अ० हिफाझत् ] संरक्षण; आश्रय. " शिद्दी अब्दुला बेदरचे हिफाजतीस जात होता" ( राजवाडे ५।६१ ). " पटणचरूचे हिफाजतीकरितां अगोदर नबाबांनीं सिताबराव अमील यास ... पाठविलें " ( राजवाडे ५।११९ ).

**हिम्दाद** ( स्त्री० ) इम्दाद; मदत. "मदत–हिम्दाद " ( सासंइ–तह २ ).

**हिम्मत** ( स्त्री० ) [ अ० हिम्मत् ] महत्वाकाङ्क्षा; निश्चय; धैर्य; उत्साह; उमेद. " ज्याशी नित्य नूतन सम्पादीन ही हिम्मत त्यानें हुजुरात सजावी" ( मराआ १३ ). " प्रस्तुत तोहमास्प कुलीनें बाजी जिङ्किली आहे; परन्तु अवघ्या हिंदूंनीं हिम्मत बान्धिल्यास व आमच्या फौजा मातबर गेल्यास हिन्दूंचीच बादशाही होईल ऐसा प्रसङ्ग दिसतो"(पारसनीस–ब्रच ११८).

**हिम्मन्दार; हिमती** धैर्यवान्.

**हिम्मत–बहाद्दर** शूरवीर; एक पदवी.

**हिम्मत–मर्दानपणा** ( पु० ) दिलेरी–मर्दुमी. " सर्वांचीं ज्ञानें, हिम्मत–मर्दानपणा मजला ठाऊक आहेत; पानपतावर भाऊस टाकून आलेत " ( खरे १।४८१ ).

**हिमाईत; हिमायत; हिमात** ( स्त्री० ) [ अ० हिमायत् ] संरक्षण; आश्रय; आधार; मदत; ज़ोरावरी. "तें एकीकडे *राहून पेण्डारी यांची हिमाईत करून स्वा*मींचा क्रोध होऊन स्वामी उपोषणें करितात हें काय ?" (खरे९।४५४८)."आह-

मियानें त्याची हिमात केली तर आम्ही काय करावें !" (पारसनीस–ब्रप २१४). "आउन्धकर हिमायेतीनें आउतें धरितात; परन्तु ईश्वर त्यांस नतिजा देतो; परन्तु भाग्यामुळें चित्तांत आणित नाहीत" ( राजवाडे ६।१३ ).

**हिमायत्‌दार; हिमाती** आश्रित.

**हिर्शी** लोभी.

**हिरासा** [ फा० हिरासान् ] भयभीत; त्रस्त; हैराण. "इतक्यांत खळोजी शिन्दे... दर्कूच हापड्डास आल्यानें दरोबस्त शक्ति हिरासा होऊन ... पानपताकडे गेले" ( दिमरा १।१६४ ). "ते हिरासा आहेत" ( दिमरा १।११७ ).

**हिरीस** ( स्त्री० ) [ अ० हिर्स् ] लोभ; हावरेपणा.

**हिलाल** ( पु० ) [ अ० हिलाल् ] चन्द्रकोर; चन्द्रज्योत; टेम्भा. "सोयऱ्यांचे मण्डपांत पुरुष व बायका रात्रीचे जाण्यायेण्यास हिलाल दिवटया अगोदर बातमी राखोन सिद्ध करून ठेवाव्या" ( साने–पयाव २८८ ).

**हिल्ला** ( पु० ) [ अ० हीला ] युक्ती; कारवाई. "त्यास कांहीं एक हिल्ल्यानें दूर घालवावें ऐसें मनांत आणून लाम्बविलें असेल तर ईश्वर जाणें" ( खरे १२। ६६७५ ).

**हिल्ला–हर्कत** ( स्त्री० ) युक्तिप्रयुक्तीनें केलेला विरोध.

**हिशेब; हिशोब** ( पु० ) [ अ० हिसेब् ∠हिसाब् ] गणती; ज़माखर्च; पर्वा.

**हिशेब–कितेब** ( पु० ) जमाखर्चाचे कागद वगैरे; ज़माखर्च.

**हिशेबी** [ फा० हिसाबी ] न्याय्य; व्यवस्थित; सरळ; हिशोबासम्बन्धी.

**हिस्सा** ( पु० ) [ अ० हिस्सा ] वांटा; भाग.

**हिस्सेदार** ( पु० ) [ फा० हिस्सादार् ] वांटेकरी.

**हिस्सेरशी; हिस्से–रसीद** ( स्त्री० ) [ फा० हिस्सा–रसद् ] सारखी वांटणी; वांटा. "मशार्निले याच्या विद्यमानाची शिबन्दीची हिसे-रसीद बेहड्याच्या अज़्मासें निवडून पाठविली आहे" ( साने-पयाव ९२ ). "त्याची हिस्सेरसीद्...रघुनाथ नाईक याजवर साडे बारा हज़ाराची ठरली" ( राजवाडे ७।३९ ).

**हिसाब** ( पु० ) हिशेब; पर्वा. "त्याचा हिसाब काय धरावा !" ( मराचिथोशा ४३ ).

**हिसाबी–किताबी** रास्त; वाजवी. "ऐसें हिसाबी–किताबी असतां" ( राजवाडे १५।२६ ).

**हिसार** ( पु० ) [ अ० हिसार् ] गड "बजानब कार्कुनानी हिसार जावली" ( राजवाडे २०।१५९ ).

**हुक्का** ( पु० ) [ अ० हुक्का ] गुडगुडी; ज्वालाग्राही पदार्थांनीं भरलेलें पात्र; बॉम्ब ( मराआ ६;३४ ).

**हुक्के–बर्दार** ( पु० ) हुक्का साम्भाळणारा ( राजवाडे ६।१२९ ).

**हुकमत** ( स्त्री० ) [ अ० हुकूमत् ] अधिकार; सत्ता.

**हुकमत–पन्हा** सत्ताधीश.

**हुकमती** अधिकारी. "मोगलाईंत हुकमती केसांची टोळी दाढी खालीं लोम्बत होती ती मराठशाहींत कवटीवर चढली एवढाच लाभ" ( गडकरी–राजसंन्यास २० ).

**हुकमी** आज्ञाधारक; आज्ञेप्रमाणें; ताब्यां-तील.

**हुकूम** ( पु० ) [ अ० हुक्म् ] आज्ञा; पत्त्याच्या खेळांत डावापुरता ठरलेला ज़ोरावर रङ्ग.

**हुकूम-अहकाम** ( पु० ) अधिकार; सत्ता. "तालुक्यांत सर्व हुकूम-अहकाम त्याजकडील" ( राजवाडे ७।४९ ).

**हुकूम-खुदाई** देवाज्ञा. "मल्हारभटास हुकूम-खुदाई जालियावरी" ( राजवाडे २०।३४६ ).

**हुकूम-नामा** ( पु० ) [ फा० हुक्म्-नामा ] न्यायनिर्णयपत्र.

**हुकूम-बर्दार** आज्ञाधारक.

**हुज्ज़त; हुज़त** ( स्त्री० ) [ फा० हुज्जत् ] पोत्यास ऐवज़ ज़मा झाल्याची पावती; पावती; वाद; तक्रार; घासाघीस; अड-थळा. "ज़मा असत म्हणोन हुज़त लिहून दिल्ही असे" ( वाड-बाबा २। ४४ ). "लुटी करितांना कित्येकांनीं हुज्ज़त केली त्यांस ज़खमी केलें" ( चिरा ३१ ).

**हुज्ज़तखोर** = घासाघीस घालणारा; तक्रारी.

**हुज़रात; हुज़ुरात** ( स्त्री० ) खुद्द हुज़ूरची खडी फौज़ "ज्याशी नित्य नूतन सम्पादीन ही हिम्मत त्यानें हुज़ुरात सजावी" ( मराआ १२ ). "हुज़रात आणि गैबती। सेवनमार्ग द्विधा असती। दोहींत मुख्य हुज़ुराती। सन्निध सेवा" ( मेस्तक पुस्तक ३८ ).

**हुज़ऱ्या** ( पु० ) निकटवर्ति सेवक.

**हुज़ूर** ( पु० ) [ अ० हुज़ूर् ] विद्यमानता; दर्बार; हज़रत; दर्बारांत; समक्ष.

**हुज़ूर-कामगार** ( पु० ) राजाचा खास अधिकारी.

**हुज़ूर-पागा** ( स्त्री० ) राजाचा खास रिसाला.

**हुज़ूर-बाज़ार** ( पु० ) मुख्य पेठ.

**हुज़ूर-हशम** ( पु० ) खास राजाचे शरीर-संरक्षक शिपाई.

**हुद्दा** ( पु० ) [ अ० उह्दा ] काम; अधिकार. "केवळ लिहिणें येईना, कमाविशीही न केली, त्यास मुल्कीचा हुद्दा न साङ्गावा" ( सभासद २४ ). "योजिला आहे गृहस्थ यास टाकून दुसऱ्यास हुद्दा साङ्गाल तर जो करील त्यास आपूं व मुलख तुमच्या हातचा जाईल म्हणोन आज्ञा" ( पारसनीस-ब्रप ६१ ).

**हुद्दा-मामला** ( पु० ) काम ( राजवाडे ८।१३४ ).

**हुद्देदार** ( पु० ) [ फा० उह्दादार् ] अधिकारी.

**हुन्नर** ( पु० ) [ फा० हुनर् ] कौशल्य; कला; युक्ती; चमत्कार. "हुन्नर ही नवाच केला" ( सभासद ३१ ). "पुढें काय हुनेर [१]करावा म्हणोन चिन्तातुर जाहाले" ( मदरु ११।५३ ).

**हुन्नर-वन्द; हुन्नर-वन्त** [ फा० हुनर्मन्द् ] कलानिपुण; कावेबाज़. "समागमें शिल्पीकार हुनर-वन्द कारागर त्या देशींचे आणून" ( मदरु १।२२ ). "औरङ्गजेब पादशाह बहुत हुनेरबन्द बेमानी आहे" ( मदरु ११५० ).

**हुन्नर्-वन्दी** ( स्त्री० ) [ फा० हुनर्मन्दी ] कलमी; कावेबाज़पणा.

[१ फा० ऊ-ब-ऊ ] जसेंच्या तसें.

**हुमायून** [ फा० हुमायूनी ] पातशाही. "फर्मान हुमायून" ( राजवाडे २०।१० ).

**हुर्मत; हुर्मती** ( स्त्री० ) [ अ० हुर्मत् ] मान; अब्रू; पत. "दिल्लीपतीची हुर्मत राखावी" ( पाव १६ ). "सर्दार लोकांची हुर्मत तुम्ही घेणार हें चाङ्गलें कीं काय!" ( हव ३४ ). "चिरंजिवाची हुर्मती आपण बचाविली, हा उपकार विसरणार नाहीं" ( राजवाडे ६।३२६ ). "आपली कांहीं हुर्मती राखत नाहींत" ( राजवाडे १६।२८ ).

**हुर्मुजी** [ फा० हुर्मुझी ] इराणच्या आखातांतील उत्कृष्ट ( मोती ). "तुमचे रूप जसें हुर्मुजी दाणा जी" ( होनाजीबाळ १६९ ).

**हुशार** [ फा० हुश्यार् ] बुद्धिमान्; चलाख; तर्तरीत; सावध; प्रोत्साहित.

**हुशारी** ( स्त्री० ) [ फा० हुश्यारी ] बुद्धिमत्ता; चलाखी; तर्तरी; सावधागिरी; ताजेंतवानेंपण.

**हुस्न** ( न० ) [ अ० हुस्न् ] चाङ्गलेंपण; सौन्दर्य. "यांतील हुस्न लिहिलें" ( राजवाडे ७ खलप २।१०६ ).

**हुस्न-कुभे** ( स्त्री० ) [८ अ० कुब्ह्=कुरूपता ] गुणदोष. "हज़्रतींनीं एक वाक्यतेनें नेक-सलाह पुसावी, म्हणजे यांत हुस्न-कुभे कोणती आहे ती ध्यानांत येईल" ( राजवाडे ५।८४ ).

**हूल** ( स्त्री० ) [ ? अ० हौल्=भयानकता ] भयावहवार्ता; आवाई.

**हेजिबत; हेजिबी** ( स्त्री० ) दौत्य; शिष्टाई. "गडीचे हेजिबतीचें काम कुमाजीस साङ्गावें" ( जुऐगो ३९ ). "तुवां त्याचे साङ्गातें सला-हेजिबाती करणें" ( भाइसम-द्विसवृ १७२ ). "हेजिबी-वकिली" ( मद्रु १।२० ).

**हेजीब** ( पु० ) [ अ० हाजिब् ] वकील.

**हेल्करी** [ ? फा० अह्ल्कार् ] कामकरी; मजूर; विशेषतः हमाल.

**हेलबी** [ फा० हलबी ] अलेप्पो येथील.

**हैदोस** ( पु० ) रणखन्दल. "तेव्हां नामी नामी सर्दार व धारकरी नांवा-बिनांवाचे यांणीं जिवित्वाची तमा न धरितां बेलाशक हैदोसच केला" ( पाव ४० ).

**हैबत** ( स्त्री० ) [ अ० हैबत् ] दरारा; धास्त. "फौजेनें हैबत खाल्ली, आतां तह ठरवावा" ( होकै १२ ).

**हैबती** भ्याड.

**हैबतराव** एक पदवी.

**हैरत** ( स्त्री० ) [ अ० हैरत् ] धास्त. "लढाईची जुरत न ठेवितां हैरत खाऊन फरारी जाले" ( चिरा १७ ).

**हैराण** [ अ० हैरान् ] आश्चर्यचकित; हतबुद्ध; दङ्ग; त्रस्त; क्लान्त; दुर्दशाग्रस्त. "एक ससा पैदा जाला, त्यानें कुतरियाचा दुमाला घेऊन कुतरा मारिला; पातशहाचें नज़रेसी पडला यावर पातशहा हैरान जाहले. दङ्ग आपले जागां होऊन" ( भाइसम १८३४ पावृ २०८ ).

**हैराण-परेशान** हैराण; त्रस्त व चिन्ताक्रान्त. "लश्करांत महागाई फार; रुपयास ७ शेर अन्न मिळत नाहीं म्हणून सर्व लोक बहुत हैराण-परेशान आहेत" (दिमरा २।३५). "फिरङ्गाणच्या मन्सुब्यामुळें हैराण पेरेशाम जाहले" ( पारसनी-ब्रच ७६ ).

**हैराणगी; हैराणी** ( स्त्री० ) [ फा० हैरानी ] दुर्दशा; आपदा. "तेणें करून आपली

हैरानगी जाली " ( राजवाडे १५।२९० शिवाय १५।३७८ ).

**हैवान** ( पु० ) [ अ० हैवान् ] पशु; जना-वर; पशुतुल्य.

**हैवानी** पशुतुल्य.

**होका** ( पु० ) हुक्का; बॉम्ब.

**होद्दा** (पु०) हुद्दा; जिम्मा; काम. "ज्यापक्षीं संल्तनतेच्या बन्दोबस्ताचा होद्दा तुम्हां-कडे लागला, तेव्हां फौजेची उस्तवारी व कर्ज़-परिहार करणें तुम्हांस अगाध नाहीं " ( ऐच ११७ ).

**होश; होशा** ( पु० ) [ फा० हूश् ] उत्साह; त्राण. "त्यांचें राजकारण विध्वंस जाहलें; त्यांचा होश गेला " ( राजवाडे १०।५९ ). "आतां मोंगलामध्यें होशा तिळतुल्य राहिला नाही " ( राजवाडे १।२५८ ).

**हौद** ( पु० ) [ अ० हौज़् ] टाकें.

**हौदा** ( पु० ) [ अ० हौदज् ] हत्ती वरील बसायची कठडेदार ज़ागा.

**हौशी** उत्साही; रसिक; सदभिरुचियुक्त; भोक्ता.

**हौस** ( स्त्री० ) [ फा० होस् ∠ अ० हवस् ] इच्छा; आवड; नाद; उमेद.

**हौसला** ( पु० ) [ अ० हौसला ] कर्तृत्व; शक्ती; इच्छा; हेतू. " काम मोठें, हौसला थोडा; कसेंही करून पेशामद करावी म्हणून बोलावयास जातात " ( राजवाडे ५।११ ). " त्यांचा मानस-होसला उत्तम आहे " ( राजवाडे १०।५९ ).

# पुरवणी

## अ

**अकब** [ अ० अक़ब् ] मागून; नन्तर. 'अकब अन्दाज़ आशूरा " ( साने-पयाव ३८५ ) ८ अक़बन् अज़् आशूरा= आशू-यानन्तर.

**अकलवन्त** बुद्धिमान्. " हरिपन्त फडके बहुत अकल्वन्त होते परन्तु बोलणें नानासारखें प्रामाणिक असा भरंवसा लोक धरीत नव्हते " ( पेअ २ ).

**अज़्तरीक-मेहेर्बानी** कृपापूर्वक. " अज़्तरीक मेहेर्बानी, दर्खास्त करितात कीं व्याज माफ करावें " ( साने-पयाव ४००).

**अज़्रूय** [ फा० अज़्रूइ ] रुईनें; रीतीनें. " अज़्रूय वाजबीच्या व हक-परस्तीच्या व इन्साफाच्या रीतीनें इन्फिसाल करितील " ( पेअ ६१ ).

**अज़्मत** ( स्त्री० ) [ अ० अज़्मत् ] थोरवी; करामत; चमत्कार. " अब्दुल्खान फोडी देवाला, कांहीं अज़्मत दावा मला " ( इपुस्त्रिपो ).

**अज़म** ( पु० ) [ अ० अज़्म् ] विचार; सङ्कल्प; निश्चय. " लढाईचा अज़म मुक़र केला आहे " ( साने-पयाव ४९२ ).

**अजीं सोब** [ ८ अ० सौब् = मार्ग ] यामार्गे; याकरितां ( काम्इसा २२ ).

**अज़ीज़** दीन; मोताद्. " अन्नास अजीज़ जाइलों " ( इऐ ५।१०३ ).

**अदब-खाना** ( पु० ) तुरुङ्ग. " आठ दहा महिने अदब-खाना, पायीं बेडी घालून बहुत कष्टी केलें " ( वाइ-सनदा ३४ ).

**अन्करीब** [ अ० अन्क़रीब् ] जवळ; लौकरच. " फिल्हाल मस्लहतीचे रोज़ अन्करीब येऊन पोहंचतील " ( साने-पयाव ३८४ ). " खर्चाचा मञ्जूर तर खर्चासही येथून अन्करीब पाठवीत असों " ( सासंइ-जुले ७५ ).

**अनुफा-अडीश्री** ( स्त्री० ) [ ८ अ० अलूफा ] उल्फा. " जे शिपाई लोक सर्कार इङ्ग्रजांकडून रहातील त्यांस अनुफा-अडीश्री श्रीमन् महाराज राजे देतील " ( साने-पयाव ४०१ ).

**अफ्ज़ाईश** ( स्त्री० ) [ फा० अफ्ज़ाइश् ] वाढ ( पेअ ६१ ).

**अफ्तरी** ( स्त्री० ) दैन्यावस्था. " राजाची अफ्तरी " ( इपुस्त्रिपो २३१ ).

**अफराद्** एकटा. " हाली विसाजी राम, कृष्णाजी बायदेऊ याचा फर्ज़न्द् हा अफराद् देशपाण्डेगिरीची वारिसी होय " ( भाइसम १८३४ अ ५७ ).

**अम्बर** ( पु० ) [ अ० अम्बर् ] एक सुगन्धी पदार्थ. " व तोळा भर अम्बर " ( पारसनीस-ब्रप २७२ ).

**अम्मल-बजावणी** ( स्त्री० ) तामील.

**अमिराई** ( स्त्री० ) सर्दार-वैभव. "आहे घरीं पुरी अमिराई" ( प्रभाकर १३९).

**अमीर-राव** एक पदवी ( मदरु १।१२ ).

**अयान; अयां** [ अ० अयान् ] व्यक्त; श्रुत. "मुक्द्मे इज़्हार केले अयां जाले ( साने-पयाव ४९० ).

**अर्गा-जुर्गा** ( पु० ) ]∠फा० जर्गाह् ] वेढा ( ? ) "मोंगलाचा अर्गानर्गा केला आहे; दाणा, गल्ला, वैरण, काडी कूल बाद ( ? = बर्बाद् ) जाहली आहे" ( साने-पयाव २९ ).

**अर्ज़** मारूज़; श्रुत. "हे खबर श्रीमन्त खुदावन्त न्यामत यांस अर्ज़ होतांच" (साने-पयाव ४८२).

**अर्जी-मर्जी** ( स्त्री० ) स्नेह. "अर्जी-मर्जीमध्यें विकल्प उडवा" ( परशराम १६४ ).

**अल्गर्जी** [ फा० अहलि-गरज़् ] स्वार्थी. "आतां कशाला जाऊन राहिला पोकळ अल्गर्जी ?" ( परशराम १७१).

**अल्तम्गा** ( पु० ) [ तु० अल्तम्घा ] राजानें दिलेली ज़मीन बक्षिसाची सनद. "पर्वांना अल्तम्गा" ( साने-पयाव २३ ).

**अलड्गा** ( स्त्री० ) राङ्ग; फरा. "रास्त्यानीं एक अलड्गा धरून" ( साने-पयाव ५४ ).

**अलम** [ अ० अलम् ] झेण्डा. "भाण्डीं, फिरङ्गा, अलम, निशाण" ( मेस्तक-पुस्तक; ज़मेलेखन १३९ ).

**अलम-रौशन** जगद्विख्यात. "त्याचा फायदा तो अलम-रौशन आहे" ( साने-पयाव ).

**अला-बला** ( स्त्री० ) इडा-पिडा. "मी एकटा मेलों तरी शिवाजी राजे यांची अला-बला गेली; लाख मरावे परन्तु लाखांचा पाळणारा कायम रहावा" ( मदरु १।५४ ).

**अली-गोल** [ फा० अह्लि-गोल् ] गोलन्दाज़; तोफची. "पुण्याहून बारूद आली त्याजबरोबर अली-गोल दोनशें नवें माणूस आलें" ( खरे १२।६३४४ ).

**अव्वल-कारकून** मुख्य कारकून.

**अस्कारा** ( पु० ) "नाजूक रुपडें दिपडें ठिकडें जिकडे तिकडे अस्कारा" ( परशराम १७४ ).

**अस्तबाल** ( पु० ) [ फा० इस्तबल् ] तबेला; पागा. "पील्खाना व अस्तबालास व उण्टांस दाणा नाहीं; फाके गुज़रतात" ( राजवाडे १।५४ ).

**अस्मानी-सुल्तानी** ( स्त्री० ) "अस्मानी-सुल्तानी मज़रा असावी" ( सासंइ-जुले ९२ ).

**असुदगी** ( स्त्री० ) [ फा० आसूदगी ] शान्तता; भर्भराट. "तिनी सर्काराची नज़र रयतीचे व मुल्काचे व शहरचे असुदगीवर सादर आहे" ( पेअ ६२ ).

**असुदें** ( न० ) [ फा० आसूदा ] शान्त; समृद्ध. "तुम्ही अटक पावेतों मूलुक काबीज केला; आतां मोहिमेस राज्य असुदें कोणते ?" ( भाव ३७ ). "राज्यही असुदें आहे; पैसा पाहिजे तितका मिळेल" ( भाव ३५ ).

**अहल** [ अ० अह्ल् ] लोक ( पेअ ५९ ).

**अहाली-मवाली** उच्च नीच सर्व दर्जांचे लोक. हाली-मवाली पहा.

## आ

**आइन्दे** [ फा० आयन्दा ] येणारा; पुढें; पुढील सालीं; यन्दां. "हाली व आइन्दे" ( साने-पयाव ४९३ ). "सर्कारचे वचनाची कायमी कशी तें आइन्दे ज़हुरांत येईल" ( राजवाडे १०।१६६ )

**आखीरश** [ फा० आखिरश् ] त्याच्या अन्तीं; अखेर. "त्यावर दुसरे दिवशीं आखीरश इङ्ग्रज़ बे-हिम्मत होऊन" ( साने-पयाव ४८० ).

**आगा** ( स्त्री० ) [ फा० आगाही ] माहिती. " परन्तु समयास फौज़ नव्हती व बाघ पाठीवर येईल ही आगा नव्हती" ( खरे १२।६६३५ ).

**आगा-पिछा** ( स्त्री० ) जान-पिछान; माहिती.

**आजीज़** दीन. "मारतां मारतां मरावें परन्तु केवळ आजीज़ होऊं नये" ( भाव ७ ).

**आज़ू-बाज़ू** चाऱ्ही-बाज़ू.

**आदत** ( स्त्री० ) [ अ० आदत् ] संवय. "जयाजी शिन्दे यांस आदत अशी होती कीं स्नानानन्तर मुखावर धोतर घेऊन क्षणभर डोळे चोळीत रहावें" ( भाव १५ ).

**आफ्रीन** ( स्त्री० ) [ फा० आफ्रीन् ] स्तुती. "बहुत खुश्वक्त होऊन आपल्या तद्बिरेस व ज़ुरतेस तहसीन व आफ्रीन फर्माविली" ( साने-पयाव ४८२ ).

**आबाद; आबादान** [ फा० आबाद्; आबादान् ] स-सरन्ज़ाम. "दिल्लीहून सरन्ज़ाम आणवून सारें लश्कर आबाद करावें" (भाव १११). "सरन्ज़ामही येऊन पोहोंचेल; लश्कर आबादान झाल्यावरी पुन्हां गिल्च्यांचें पारिपत्य करूं" ( भाव १११ ).

**आबाय-अज़्दाद** [ अ० आबा व अज़्दाद् ] बाप-आजे; बाप-ज़ादे; पूर्वज. " अज़् कदीमुल् अय्याम व आबाय अज़्दाद् मोकर असे " ( वाड-सनदा १४० ).

**आमदन** ( न० ) [ फा० आमदन् ] येणें; आगमन. " आं अमारत्पन्हाचें आमदन या जिल्ह्यास जल्दीनें होय तें करावें " ( साने-पयाव ३९४ ).

**आयत** ( स्त्री० ) [ अ० आयत् ] " ईश्वराचें वाक्य कुराण-शरीफच्या ग्रन्थांत असतें त्यास आयत असें म्हणतात " ( वाड-सनदा २३ ).

**आश्नाई** ( स्त्री० ) [ फा० आश्नाई ] परिचय; स्नेह. " तेथें रङ्गोजी पटवारी या आश्नाई होती त्या आसरियानें राहिलों " ( भाइसम १८३४ पावृ १४१ ).

**आशक** ( पु० ) [अ० आशिक्] प्रणयी; अनुरक्त. " सम्भाजी मजवर फिदा होऊन मला न पाहतां आशक जाहला" ( गोखांचिशाब ११ ). " ते ( सम्भाजी राजे ) परस्त्रियांवर आशक होते " ( मदरु १।१०६ ).

---

## इ

**इज़्ज़त-हुर्मती** ( स्त्री० ) मानपान. " पेशजी यांच्या वडिलांची इज़्ज़त हुर्मती चालली आहे तैसी यांची चालविणें " ( वाड-सनदा १६ ).

**इतराज़** [ अ० इअतिराज़् ] नाराज़. " न जावें तरी खावन्द इतराज़ होतात " ( पारसनीस-ब्रप १३८ ).

**इमान** ( न० ) वचन. " यावी सेजेची बाईल पण इमान देऊं नये " ( इपुखिपो ४२ ). " त्या पञ्जयापासीं तुमचा इमान ( = श्रद्धा ) असावा " ( मदरु १।११३ ).

**इलाईत** ( स्त्री० ) विलायत; मुलूख. "देश इलाईत । काबीज केलें तळकोंकण " ( इपुखिपो १ ).

**इश्क-पेच्** एक पुष्प विशेष. " इश्क-पेच् गुल्छब सदोदित भरशेवती सांवरी" ( प्रभाकर १५४ ).

**इश्की** [ फा० इश्की ] प्रेमाचा. " झडूं दे इश्की नौबद् वाजिव चौघडा " ( सगनभाऊ २ ). " प्रसन्नता मर्जी उभयतां इश्की सागरा आलें भरतें " ( सगनभाऊ ५ ).

---

## उ

**उज़ू-तवाज़ू** ( स्त्री० ) प्रार्थना. "तों अब्दुल अली दुराणी जुमा मशिदीस येऊन आपला स्वधर्म उज़ू-तवाज़ू करीत होता" ( भाव २७; शिवाय पहा भाव ५२ ).

**उम्दगी** ( स्त्री० ) थोरवी. "ज़मियनच्या सर्दारास दोनी सर्कारच्या बुज़ुर्गी व उम्दगीवर प्रतेष्ठतेचे व इज़्ज़तीचे रस्म अमलांत येतील" ( पेअ ५८ ).

**उम्दा** थोर; विश्वसनीय; उत्कृष्ट. "दोन उम्दे मनुष्य दिली दोस्ती जाहीर करा-वयास रवाना करीत आहों" ( पेअ ६५ ) "तलफ चुकऊन पोशाख दिधला खूप उम्दा भर्ज़री" ( पर-शराम १२४ ).

**उमेद्वारी; उमेद** ( स्त्री० ) वय; पण. " हे आपले उमेद्वारींत आल्यानन्तर त्यांचें लग्न केलें" ( मदरु १।११ ). "ते आपले उमेदींत आल्यानन्तर त्या फत्तेसिङ्गास मोठी योग्यता देऊन" ( मदरु १।१२१ ).

**उम्बराव** ( पु० ) उमराव. "बावीस उम्ब-राव मिळून आले बाच्छाय-समेला" ( इपुखिपो ६ ).

**उल्फा** ( पु० ) उन्फा; शिधा. "सिधे-उल्फे" ( मदरु १।८१ ).

**ऐना** शोभा दायक प्रिय वस्तु. "कम्बर्बस्ता करून निघे निज मन्दिरचा ऐना" ( प्रभाकर १२३ ).

---

## क

**कयास** ( पु० ) कयास. "नजर मुम्बई सुरतेवर ठेवितील किंवा काय मन्सबा-करितील हें कयासांत येत नाही" (साने –पयाव २५९ ).

**कतार** ( स्त्री० ) राङ्ग. "बारा हज़ार बाणांची कतार" ( इपुखिपो १०९ ).

**कदर** ( स्त्री० ) मर्जी. "आदरें करून विनवितां कदर कां कठीण करितां तुम्ही !" ( प्रभाकर १२१ ).

**कन्दुरी** ( स्त्री० ) [ फा० कन्दूरी ] मुस-ल्मान साधुपुरुषाच्या स्मृत्यर्थ होणारा प्रार्थनेचा व अन्नदानाचा समारम्भ; देवास बळी देणें. " शेखसल्लाची करूं कन्दुरी मशीरन् बोलले" ( साने-पयाव ५३ ).

**कब्ज़-दस्त** हस्तगत. "प्रान्त मज़्कूर कबदस्त जाहला"(साने–पयाव ३७९).

**कम्तर** कमी. " त्यांत अन्तर आम्ही व आमचे वंशज लेकरांचे लेकरीं वतन वगैरे चालविण्याविषयीं कम्तर करणार नाही. "

**कम्बर** ( स्त्री० ). कम्बर–पट्टा. " सोडीना कम्बर कधीं काढीना पायज़मा" ( प्रभाकर ६४ ).

**कम्बर्का** ( पु० ) कम्बर्गा. " सीतर पहाड पहा जीवबादादा कम्बक्र्यांत सोडी बार " ( इपुस्निपो १९५ ).

**कमिन** [ फा० कमीन् ] अगदीं हलक्या दर्जाचा; स्वतः; बन्दा. " कमीनाचे बाईल व मूल ब-नाम कमली व राम ऐसे दस्तगीर होऊन " ( भाइसम–द्विसवृ ५० ).

**कर्ज़न्बदी** ऋणको. " सायावांचून बैल मेले, कर्जबन्दी झाला " ( परशराम १२० ).

**कर्दन–बस्तन** ( न० ) [ फा० शब्दशः करणें-बान्धणें ] हिशेब. " कर्दन बस्तन गुणाकार भागाकार करावयाचा सराव बहुत असावा " ( साने–पयाव ४५९ ).

**कर्वळ** करोळ. " नामी कर्वळ आहे हुजुरांत " ( साने–पयाव ५४ ).

**करोळी** ( स्त्री० ) करोळाचा मारा. " श्रीमन्तांकडील बार्गीर झाडून जमा होऊन करोळी सुरू झाली " ( साने–पयाव ४५ ).

**कसूर–कोताई** ( स्त्री० ) चूक-न्यून. " स्वामी सेवेचे ठायीं आम्हांपासून कसूर–कोताई हा कालपर्यन्त जाली नाही व पुढेंही होणार नाही " ( साने–पयाव ६८ ).

**कहर** ( पु० ) भयङ्कर वर्षाव. " तोफेचा एकच वर्षला कहर " ( साने–पयाव ५५ ).

**काबील** कर्तृत्ववान्. " एक काबील मनुष्य नजीबखान रोहिला आहे " ( भाव २० ).

**काबू–तलब** सन्धिसाधू. " इङ्ग्रज़ बेइमान, काबू–तलब " ( साने–पयाव ४६४ ).

**कार** ( न० ) [ फा० कार् ] काम. " त्या मवाफीक कार सुरत–पिजीर होऊन " (साने–पयाव ३८४ ).

**कार्गर** [ फा० कार्गर् ] लागूं; प्राणहारक. " कुशीस सुऱ्याचा मार केला. काम कार्गर होतांच जयाप्पा शिन्दे चौरङ्गावरून ज़मिनीवर आले " ( भाव १५ ).

**काहली** ( स्त्री० ) [ फा० काहिली ] आळस; सुस्ती. " जेणें जेणें काहली केली, तेणें जीविका बुडविली " ( मेस्तक–पुस्तक; लेखनाधिकार ७२ ).

**किल्लगाही** वन्य; किल्लेगाह. " किल्लगाही खान " ( भाइसम–पसवृ १३५ ).

**किम्मत्–दार** मौल्यवान्. " शालू चान्दणी किम्मत्दार " ( पारसनीस–ब्रप १२८ ).

**किल्ली** ( स्त्री० ) हिकमत; युक्ती. " विषयविडा देऊन भुलवितिल लववुन हरकिल्ली" ( परशराम १४२ ).

**किल्ल्यानिहाय** किल्लोकिल्लीं. " किल्ल्या–किल्ल्यानिहाय तोफा कराविल्या " ( मदरु १।१४५ ). " असे कैद करून किल्ल्यानिहाय ठेविले " ( मदरु १।१४६ )

**किस्मत** ( स्त्री० ) दैव. " जागें नसीब इङ्ग्रजांची किस्मत शाबूत " ( होपो १६ ).

**कुल्कुल्ला** ( पु० ) सर्वाधिकारी. " कार्भारी तुमचा भाऊ, कुल्कुल्ला घरांत जाऊ " ( परशराम ११९ ).

**कुशाद** प्रशस्त. " खासे रस्ते व पात्राची जागा कुशाद राखावी" ( साने–पयाव २८४ ).

**कूच–ब–कूच** मज़ल दर–मज़ल. "आम्ही आपले दोस्तीवर नज़र देऊन कूच–ब–कूच रवाना होऊन गेलों असों"(साने–पयाव ४८६ ).

**कोक** ( स्त्री० ) मधील फुगीर उन्चवटा. " बुचड्याचा आधी झोंक, त्यामधीं ठेवी नोक–कोक " (प्रभाकर १११)

**कदम्बोसी** ( स्त्री० ) पादचुम्बन. " व निरोप घ्यायास दिधला जर बडी फजर साहेबके कदम्बोसी करनेकूं हुज़ूडखडे होऊं " ( मब ६७ ).

**कन्दुरी** ( स्त्री० ) मांस सागुती. " त्या कन्दुरीचीं पुर्ष्पे जालीं ते करामत देखोन " ( मब १०३ )

**कबज़–दस्त** हस्तगत. " मुल्क कबज़–दस्त केला " ( मब १०३ ).

**कुफ्राणदार** काफीर; परधर्मी; कुभाण्डी. "जर (=कीं ) हा सोमठाकूर कुफ्राण्दार" ( मब ४६ ).

---

## ख

**ख्याल** ( पु० ) प्रेम; विलास; फन्द. " फार भिऊन वागतों; पडूं ना दुसऱ्याच्या ख्यालीं ग " ( प्रभाकर १७४ ).

**ख्याली** विलासी.

**खज़ाने–पूर** श्रीमन्त. " शिन्दे केवळ खज़ानपूर; सर्दार द्रव्यदृष्टी होते; त्यांस कांहीं द्रव्याची पर्वा नव्हती" (भाब५६).

**खर्खरा** (पु०) खन्त. " रसरङ्गाचा काल वृथा निघून जातो खरा। म्हणुन हृदयास वाटे खर्खरा हो " ( प्रभाकर १०१ ).

**खानदान** कुलीन. " खण्डेराव नाईक निम्बाळकर... यांणीं ... शिपायगिरीची शर्त करून (वळवन्तराव मेहेन्दळे यांचा) मुर्दा सोडविला; शीर कापूं दिलें नाहीं; निदान खानदान मनुष्य याप्रमाणें कामास येतें " ( भाब १०९ ).

**खाना** ( पु० ) [ फा० खाना ] घर घराणें. "बद्–दुवा दिल्ही कीं या दोघांचा खाना खराब" (मदरु १।११८).

**खिमा** ( पु० ) [ अ० कीमा ] मांसाचे अत्यन्त बारीक तुकडे करून केलेला पदार्थ; बारीक तुकडे.

**खिसा** ( पु० ) [ अ० किस्सा ] बोला चाली; तण्टा. "बाज़ारांत आडवे होऊन, दिवाण यांचे हातास हात घालून तन्खे विषयींचा ज़ाब बोलून खिसा झाला...आपसांत तर्वार चालून उजवे हातास ज़खम झाली" (होकै २).

**खिरापत** ( स्त्री० ) खैर–आफियत; प्रसाद; तबरूक; किसलेला नारळ व साखर घालून केलेला वांटावयाचा प्रसाद.

**खुतु; खूत** [फा० खुद] शिरस्त्राण. "अङ्गांत जिरे खुतु घालून " ( मदरु १।५२ ).

**खुम्ब; खूम** लोक; ज़ात. "कानू–कायदे अठरा खुम्ब ज़ागे ज़ागे चौथरे नेमून दिले ( मदरु १।१५ ). ' पाटेल सर्व खुमाचा " ( मब ५१ ).

**खुमारी** ( स्त्री० ) मौज "दाखवी किती थर–काउन गेन्द खुमारी" ( प्रभाकर २०७).

**खुर्द–बुज़ुरूख** लहान थोर. " हें सर्व खुर्द–बुज़ुरूख यांस माहीत आहे " ( वाङ्–कैफियती १०० ).

**खुर्दा** ( पु० ) लहान नाणीं; मोड.

**खुर्मा** खारीक ( भाइसम, द्विसवृ १७२ ).

**खुश्बईदार** सुगन्धी ( मेरनक पुस्तक; ज़मेलेखन १३९ ).

**खैरात** ( स्त्री० ) कुरवण्डी. " खैरात

जिवाची करून सखयावरून" ( परशराम १७० ).

**खोजा** निर्वृषण. "बसवन्तराव आपा कासुरडे खोज्या होण्याचें कारण हेंच" ( मदरु ११५२२ ).

---

## ग

**गम्गीनी** ( स्त्री० ) दुक्ख. "हें ऐकून दिलास बहुत गम्गीनी व खपगी जाली" ( साने–पयाव ४६७ ).

**गर्जी** शौकी. "माझ्या घरच्यांची कठिण मर्जी हो याला नुमजे हा बायकांचा गर्जी" (रामजोशी ४१).

**गर्दनूबाजी** ( स्त्री० ) तळहातावर शीर घेऊन लढणें.

**गर्मी** ( स्त्री० ) उष्णता. "दाटली दिव्याची गर्मी सदनान्तरीं" ( प्रभाकर १०० ).

**गिरी** ( स्त्री० ) मूर्च्छा. "आली पाहतां मज गिरी" ( परशराम १४८ ).

**गुज़ाज़्गर, गुदाज़्गर** [ ८ फा० गुदाझ् = रस कर ] टांकसाळींतील धातू गाळणारा ( भाइसम ससवृ ८५ ).

**गुल्गेन्द** ( पु० ) पुष्पगुच्छ. "सङ्गीन कुच भर्दार, साजिव सजदार, गुल्गेन्द उसासले" (प्रभाकर ११३).

**गुल्जार** सुसम्पन्न. "बाच्छाई तक्त गुल्जार; दिसे रङ्गबहार पुण्याची वस्ती" ( होनाजी बाळ १७८ ). "मनीं हौस होती फार। पुणें शहर करिन गुल्जार" ( इपुखिपो ५५ ).

**गुल्परी** ( स्त्री० ) पुष्पाङ्गना. "उभी गुल्परी नमून या पदीं कर जोडून सेवेमधीं"। ( परशराम १४२ ).

**गुलाब** गुलाबपाणी. "गुलाब शिसे उत्तमसे तीन चार पाठविलेत तर बरें होतें ( पारसनीस–ब्रप २५३ ).

**गुलाब-कन्द** ( पु० ) गुल्कन्द. "गुलाबकन्द वज़न पक्के एक शेर पाठविला तो घेणें" ( पारसनीस–ब्रप १२९ ).

**गुसल** ( स्त्री० ) आङ्घोळ. "आराम होऊन गुसल केली"(साने–पयाव ४६७).

**गैबत** गैब. "त्यांतच गैबत जाले; त्यांचा मुर्दा देखील दृष्टीनें कोणी देखिला नाही" ( भाव ६३ ).

**गबती** ( स्त्री० ) गैर–हुज़ूर नोकरी. "हुज़रात आणि गैबती। सेवनमार्ग द्विधा असती। दोहींत मुख्य हुज़ुराती सन्निध सेवा" ( मेस्तक–पुस्तक ३८ ).

**गैबी** निनांवी. "गैबी अर्ज़" ( खान्देशांत अजून सर्वसामान्य प्रचारांत ).

**गर** अन्यायाचें. "हें तुम्ही गैर केलें" ( मदरु ११००६ ).

**गर–इतबार** ( पु० ) अविश्वास. "ते समयीं तमाम फौज़ेस गैर–इतबार जाहला" ( भाव ८० ).

**गर–इमान** ( न० ) अनिष्ठा. "आमचें गैर–इमान असतें तरी आम्ही आजपर्यन्त येथें तुम्हापाशीं न ठरतों. "( भाव १११ ).

**गैर–खुशी** ना-कबूल. "खुशी किंवा गैर खुशी असा हा कौल बायकांशी" ( परशराम १८९ ).

**गैरी** ( स्त्री० ) अन्याय. "ज्याकडेस गैरी लागेल त्यापैकीं मसाला होनु एक देणें ( सासंइ–जुले ८८ ).

**गोर–कपण** मूठमाती. "त्यास गोर–गपण प्राप्त जाला नाहीं" ( भाव ९७ ). "गोर–कपणेचीं साहित्यें करून त्यांचीं सार्थकें केलीं." ( भाव १०७ ).

## घ

**घुस्सा** ( पु० ) कोप. " मोठा घुसा येऊन " ( मदरु ११९७ ).

**घुसूलखाना** ( पु० ) स्नानगृह; सल्वत्-खाना ( मदरु १५३ ).

**घोस** ( पु० ) मांस. " अम्बाबाईनें घोस गाईचा पाहिला " ( इपुखिपो ५५ ).

## च

**चङ्ग** ( पु० ) एकवाद्य. " हातांत घेऊन चङ्ग रङ्ग ज़मवीला " ( होपो १५ ).

**चादर** ( स्त्री० ) कौलाचा पाण्ढरा बावटा. " त्यापेक्षां चादर फिरवून किल्ला स्वाधीन करूं " (गोखचिशाव ३५).

**चास्नीगर** [ ∠ फा० चाश्नगिर् ] नाणें पाडण्याच्या मिश्र चान्दीची परिक्षा करणारा ( भाइसम-ससवृ ८५ ).

**चुस्त** [ फा० चुस्त् ] चपल; तङ्ग. " जरी मुण्डासे पायजमे चुस्त पायाला जी " ( होपो ८ ).

## छ

**छान्दारी** ( स्त्री० ) भपका. " त्यांचा स्वभाव खर्चाचा छान्दारीचा आहे " ( काप्रइसा ५३ ).

## ज

**ज़बराइ** ( स्त्री०) ज़ोर-ज़बरी. "ज़र पदरीं तर ज़बराईनें सन्यासि खोटें करि रेटून। ज़र पदरीं तर ज़बराईनें ज़वळ कचेरी सदा फेल " ( परशराम १३९ ).

**ज़बा** विधिपूर्वक हत्या. " म्हैस नगाऱ्यास गांव पाण्ढरीनें व सकारीनें दिल्यास काजीनें ज़बा करून द्यावी " ( भाइसम चसंवृ ६४ ).

**ज़मा** ( पु० ) ज़माव. " बहादुरस्याजवळ ज़मा सर्व झाला " ( मब ७० ).

**ज़र** ( पु० ) [ फा० ज़र् ] सोनें. " ज़र पदरीं जर नसला तर तो नर संसारीं येऊन बैल " ( परशराम १३८ ).

**ज़लद** ( स्त्री० ) जल्दी. " त्यानें पुण्यास माळ्याकडे जाऊन जलद् करून. "

**ज़वेर-खाना** ( पु० ) ज़वाहीर-खाना ( प्रभाकर ४६ ).

**जहान** ( स्त्री० ) [ फा० जहान् ] लोक; सैन्य. "तीन लाख मिळाली जहान पेशवे शाही ( इपुखिपो १८८ ).

**ज़ात** स्वतः " इन्द्रोजी कदम ...ज़ातीचे घोड्यास चान्दीचे नाल करून नाल्-बन्दी करीत होता " (मदरु ११२५ ).

**जादूखोर** कपटी; हिक्मती. " शिवाजी राजा मोठा हुनेर्वन्त जादूखोर आहे " ( मदरु ११५३ ).

**जान** ( स्त्री० ) [ फा० जान् ] प्राण. " बाण लागतां होयांत जान सोडिली " ( इपखिपो २१४ ).

**ज़ाबता** ( पु० ) कडक शिस्त. " लश्करचे लोकांनीं ताकीद् न ऐकतां त्यांच्या गर्दना मारिल्या; ज़ाबता बसविला " ( मदरु ११८५ ).

**जार** ( फा० ज़ार् ] बेज़ार. " भाल्याच्या अणीनें इङ्ग्रज़ ज्यार केले " ( होपो १३ ).

**जिल्हईदार** उजळेदार; चकाकित. "जिल्ह-ईदार अप्करे वाटतें आज चरकीं धारिले " ( प्रभाकर ११९ ).

**जिलेवन्त** शोभिवन्त. " तरूराव जिलेवन्त, नाचती सभाङ्गना आनन्दांत " ( प्रभाकर ४१ ).

**जीन-बन्द** घोड्यावर स्वार. "तो त्वरेनें जीनबन्द होऊन...चालून आला" ( मकुइ १।४५ ).

**ज़ुदा** निराळा; पृथक्. "इजवर करुं आम्ही दुसरी बायको मोजुन शेर देउं ज़ुदा" ( परशराम ११८ ).

**जेर-ज़बर** दुर्बळ-सबळ. "त्यास कळों न देतां बिघाड करावा; मग जेर-ज़बर कोण किती तें पहावें" ( गोखचिशाव ८० ).

**ज़ोस** ( पु० ) [ फा० जोश् ] आवेश; ज़ोर.

---

## त

**तगारी** ( स्त्री० ) थाळी. "आमचे तगारींत जेवावें" ( मदरु १।१०८ ).

**तऱ्हेबाज़** लहरी; छन्दी. "तऱ्हेबाज़ ती अधीच खिलाडू नवऱ्याच्या गोष्टी ऐकून। मिष दुखण्याचें करून निजली पडदे लाविले मग चौकून" ( परशराम १०७ ).

**तवर** ( पु० ) [ अ० तहव्वुर् ] आवेश. "उभतीचा तवर केली झड घालून तल्वार" ( परशराम १०९ ). "शहर पुण्याच्या भर रस्त्यामधिं भर नवतीचा तवर नवा" ( परशराम १७४ ).

**तवाका** ( पु० ) तोक; गळेबन्द. "पायांत बेडी व गळ्यांत तवाका घालून कैदेंत ठेविले" ( ममब ११ ).

**तहसील** ( स्त्री० ) वसुली. "तहसिलीस प्यादे सर्कारचे देविले जातील" (सासंइ-जुले ९१ ).

**ताईत** ( पु० ) गळ्यांतला ताईत = प्रियपात्र. "गळ्यांतल्या ताइता तुला मी आङ्घुळ घालीते" ( परशराम १७५ ).

**ताज़** ( पु० ) मुगूट. "ते समयीं डोकीस ताज़ व अङ्गांत बारीक अङ्गरखा व पाण्ढरी सुर्वार" ( मदरु १।१३० ).

**ताज़गी** ( स्त्री० ) तजेला. "शिवाजी राजे यांची ताज़गी आतां कानानें ऐकवत नाही; ताज़गी म्हणजे मोठा पराक्रम म्हणोन दिल्गीर जाहले" ( मदरु१।७७).

**ताब** ( पु० ) अवसान. "ताब हिन्दूंनीं रे ताब हिन्दूंनीं घेतला हरून" ( इपुखिपो १९१ ).

**ताबी** ( स्त्री० ) ताबा. "आपले ताबी मध्यें ठेविला" ( मच ४० ).

---

## द

**दर-बि-दर** [ फा० दर्-बि- दर् ] दारोदार; भणङ्ग. "दौलताबादचें राज्य सर्व पदरच्यांनीं दिल्लीपतीच्या घरांत नेऊन घातलें आणि आपले वडिलांस दर-बि-दर केलें" (गोखचिशाव ११).

**दराब** ( पु० ) [ अ० ज़र्राब् ] "शिक्का मारून नाणें पाडणारा" ( भाइसम-ससवृ ८५ ).

**दिली** [८ फा० दिल्] जानी. "दोन उम्दे मनुष्य दिली दोस्ती जाहीर करावयास रवाना करीत आहों" ( पेअ ६५ ).

**दुम्ची** ( स्त्री० ) "मार्वाडी हटेले रजपूत महा पराक्रमी...त्यांणीं आपले हिमतीनें कन्दहारचा पातशाहा दुराणी गिल्चा याची पगडी व दुम्ची सोडविली" ( भाव ९ ).

**दुमाला** (पु०) पिच्छा; पाठलाग. "पळतां फाजीलखान त्याचा दुमाला घेतला" ( इपुखिपो २० ). "एक ससा पैदा जाला, त्यानें कुतरियाचा दुमाला घेऊन कुतरा मारिला" ( भाइसम १८३४ पावृ २०८ ).

**दुश्मनी** ( स्त्री० ) वैर. " लढाईचा इरादा धरून मी वागत नसतां दुश्मनीच धरून वांकडेपणा करितात; त्यांची समजूत व्हावी कशी !" ( गोखचिशाब ३४ ).

**देहन्दगी** (स्त्री०) देणगी. " बक्शिसें आणि देहन्दगी" (भाइसम १८३४ षावृ१३९).

---

## न

**नकीब** ( पु० ) लल्कान्या. "पुढें लल्कारी चोप्दार, नकीब त्याच्या मोहोर " ( होपो ११ ).

**नखरेदार** ऐटबाज़. "पातळ नखरेदार मुलायम फूल चौकडीचें " ( प्रभाकर ९६ ).

**नगीना** ( पु० ) [ फा० नगीन् ] अङ्गठींतला खडा; हिरा. " सारी अमदाबाद बघाया लोटली सेना-इश्कनगीना " ( सगनभाऊ २० ). " विश्वासराव नानाचा पुत्र नगीना" (इपुखिपो १३५).

**नफराई** ( स्त्री० ) हलकी चाकरी; सेवा. " लेकराचे लेकरीं पटेलगी खाऊन दिवाण-नफराई करून सुखी असो " ( मकुइ ३।२५ ).

**नवाज़णें** वाखाणणें. " जिकीर सोडून फकीर झाले जो तो रुपाला नवाजी " ( परशराम १७४ ).

**नसलन् बाद नसल** वंशपरम्परा (पेअ५९).

**ना-काबील** कर्तत्वशून्य. " अहमद् शाह यास बादशाही झाली तो केवळ ना-काबील " ( भाब २१ ).

**ना-दार** सडा; जरिदा. "गनीम केवळ सडे नादार " ( भाब ७७ ).

**नाबूद** सफाई; साफ. " गांवीं टोळ येऊन शेतें नाबूद खाऊन नाशाडी जाहली " ( सासंइ-जुले ९४ ).

**नामूस** ( पु० ) ख्यात; पराक्रम. " याउपरान्त देवनरेंचे पाईकें नामूस केला म्हणोन पद ठाकूर पावला" ( मब ३८ ).

**नामोहरमी** ( स्त्री० ) अपेश. " केवळ आपणच दुराग्रह करावा तरी अवघी नामोहरमी आपणाकडे येईल" (भाब८).

**निगा** ( स्त्री० ) नज़र; दृष्टी; प्रीती. " सम्भाजी महाराज याणीं मजवर निगा ठेविली; तोच माझा खावन्द " ( मदरु १।१११ ). " ज्याच्यावर फिरली निगा, दरिद्र्य दूर केलें " ( होपो १ ).

**निमक** ( न० ) मीठ; उपकार. " असें उभयतां बापलेकांनीं चाकरी करून निमक अदा केलें " ( मदरु १।१६५ ).

**नैशाकर** ऊंस ( भाइसम-द्विसवृ १७२ ).

**नोक** ( स्त्री० ) झोंक. ' करितात कवन गातात मधुर नोकींत" (प्रभाकर१३२).

---

## प

**प्याजी** फिकट गुलाबी; पाटल. "जहनेचादी पोशाख गुलाबी प्याजी " ( सगनभाऊ ३८ ). " उन्च ज़रीचा शालू नेसुन राङ्गीबेरङ्गी प्याजी" (सगनभाऊ४३).

**पड्दा** ( पु० ) अन्तर. " आतां दुरून दुरून पडद्यानें शब्द बोलतां " ( प्रभाकर २५५ ).

**पन्हेदार** रुन्द. " उधार मजवर दुधार आणवा पन्हेदार लेऊन चुडे " ( परशराम २१० ).

**पिढीज़ाद** ( ८ ज़ादा ) वंशपरम्परागत.

**पल्वान** हत्तीवाला; माहूत. " हत्ती पील्वानाच्या पाठीवर सोण्ड फिरवूं लागला " ( सासंइ-रापुपो ४ ).

**पेशवेशाही** पेशवे थाटाचें. " अफ्तागीर घ्यावे पेशवेशाही" (भाइसम-तृसवृ६५).

**पैरावणें**-ला वस्त्रें देणें. " सर्व आपुलें दळ पैराविलें " ( मब ३९ ).

---

## फ

**फन्द** ( पु० ) नाद; विलास. "वाटें तुशी करावा फन्द गडे हा पूर्वीचा ऋणानुबन्ध " (परशराम २०३ ). " यशाच्या फन्दांत ( = उन्मादांत ) निमग्न झाले होते; तों गर्वाचें घर खालीं " ( भाब ८२ ).

**फना** फस्त. " शहर लुटोन फना केलें " ( मदरु १।७३ ).

**फकीर–फुकरा** गोर-गरीब. (मन्सूर अल्ली ) "उदास वृत्तीनें अतीत-अभ्यागत, फकीर–फुकरा यांस द्रव्यदान व अन्नदान करीत आपण ज़त्या आपले स्वकर्मी उज़्तवाज़ू करून सावध होता" ( भाब ५२ ).

**फर्माईस** ( स्त्री० ) हुकूम. " फर्माईस केली पाहिजे ( मब ६७ ).

---

## ब

**बद्–दुवा** ( स्त्री० ) बेदुवा; शाप. " बद्-दुवा दिल्ही कीं या दोघांचा खाना खराब" ( मदरु १।११८ ).

**बलाई** (स्त्री०) बला; सङ्कट. " कोणी कांहीं समजावील आणि आपल्यावर येखादी बलाई येईल" (मदरु १।१२१).

**बहा** ( स्त्री० ) [ फा० बहा ] किम्मत; खर्च " कागद्–बहा ससालि रुपये पञ्चवीस देविले जातील " ( सासंइ–जुलै ९१ ).

**बिन्दी** (स्त्री०) बिनी. "ज्याचा नगाऱ्याचा घोडा पुडच्या बिन्दीला, निशाणाचा हत्ती पुडच्या बिन्दीला" (सासंइ–७पो),

**बे–इज्ज़ती** गैर–अब्रूदार. "बेइजती लोक तुम्ही " ( मब ४० ).

**बे–तमा** बे–गुमानपणें. " खान्द्यावर टाकून पदर बोले बे–तमा, लग्नाच्या नवऱ्याशी बोले बे–तमा " ( परशराम १११ ).

**बे–बहार** बहारदार; बहारीचा. "बे–बहार गुलाबी तरू भोंतीं सरू, चम्पक, मोगरा" ( परशराम १८८ ). " अङ्गावर जोहार दिसे बे–बहार " (होपो २० ).

**बे–हाल** दुर्दशा. " मग प्राण अवस्था होतील हालाचे बेहाल " ( परशराम १४३ ).

**बे–होश** मूर्ख. "पादशाह बेहोश, त्याणें सारासार विचार ध्यानांत राखावा तें न करितां बे–फाम राहिला " (भाब २२).

**बैरख** ( स्त्री० ) निशाण. " उठल्या बैरखा निशाणें " (प्रभाकर ५१ ).

**बोर** लाल घोडा. " भला घोडा अस्सल काबूलचा लाल बोर टाकम तुर्की " ( परशराम १९६ ).

---

## म

**मज़ला** ( पु० ) [ अ०मन्झिला ] इमारतीचा ताल.

**मदूलसी** ( स्त्री० ) सभा ( मब ६७ ).

**मिनेदार** मिन्याचें काम ज्यावर आहे असा. " गोठ, हातसर, जवे, खिज़मत्या, मिनेदार करीं चुडे " ( प्रभाकर ११८ ).

**मिसरी** ( स्त्री० ) मिसर देशांतील साखर. "डुलत खुलत चाले, झुलत झुलत बोले शब्द जसे मिसरी" ( प्रभाकर १११ ).

**मुजाहीक** [ अ० मुझाइक् ] मुजाहीम. "एकमेकाला मुजाहीक न होतां सुख-रूप आपआपले मार्गी जात येत असावें" ( सासंइ–तह १ )

**मुसेजर** एक प्रकारचें कापड. "मुसेज-रीच्या सुर्वारा" ( इपुखिपो १४ ).

**मेवा** ( पु० ) फळ. "नवतीचा नाजूक मेवा। कोण्या सवतीला पहावेना हाय रे देवा" ( प्रभाकर २५८ ).

**मैराप** ( स्त्री० ) महिराप. " मैरापच्यिा सर्जा केल्या जशी दुसरी द्वारका " ( परशराम २१२ ).

**मोहबत** ( स्त्री० ) प्रेम. " धर्माची प्रीत नव्हे पाक मोहबत सत्ता सारखी " ( सगनभाऊ ३५ ).

---

## र

**रमूज** (स्त्री०) मौज; गम्मत. "कोण दिसेना प्राणप्रियकरे, चल रङ्गमहालीं रमूज करूं " ( सगनभाऊ ४४ ). " विष-याच्या रमुजा केल्या " ( परशराम १९५ ).

**रायजादा** ( पु० ) [ फा० रायजादा ] राजपुत्र. " सुल्तानजी रायजादे " ( सासंइ–जुले ४२ ).

---

## ल

**लाव** लवा; निशाण. " लाव–लश्कर फौजेचा थाट " ( होपो १८ ).

---

## व

**विराखत** ( स्त्री० ) इराखत; लध्वी. " जरा सैल करा मजला। विराकतीला उशीर झाला " (उमाजी नायकाचा पोवाडा).

---

## श

**शहर** ( पु० ) कांटा; रोमाञ्च. "मऊ सेजे वरती निजतां उठती अङ्गीं शहर " ( परशराम १७९ ).

**शहर्–पन्हा** ( पु० ) कोट. " तों पुढें फौज गेली म्हणोन शहरची बन्दोबस्ती न करितां शहरपन्हा खालीच होता " ( भाव २३ ).

**शाहीर–गिरी; शाहीरकी** ( स्त्री० ) कवित्व. "रामकृष्ण गुणी रामा कासार; शाहिरकीमधिं सदा मगन " ( परश-राम १०७ ).

**शील** ( न० ) बकर. " शीलचा राऊत " ( इपुखिपो १० ).

**शिना** ( पु० ) [ ? फा० सीना ] छाती. " त्याची दुराटी बन्दूक लाविली शिन्याला " ( सासंइ–रापुपो ३ ).

---

## स

**सआब्दार** मग्जीदार; कांठदार. " भर्जरी झूल हत्तीला सआब्दार " ( होपो ६ ).

**सलाबत** मज्बूत. " तो दुर्ग असाध्य, सलाबत; मोर्चे लाऊन सुरुङ्ग लावावे तरी रान रेतीचें; सुरुङ्गास यत्न नाही " ( भाव ३ ).

**सही** ( स्त्री० ) बरोबर असल्याची निशाणी. " त्यावरी आपणही सही घातली " ( मब ४२ ).

**सिकाबन्द** शिक्केदार " ऐसें खत रायें सिकाबन्द दिधलें. " ( मब ३६ )

समाप्त.

NO 61

# शब्द-सूची

उपसर्ग किंवा प्रत्यय किंवा प्रत्यय-वजा धातू लागून होणारे शब्द पुढील सूचींत दिलेले नाहीत. एखाद्या शब्दाचीं अपभ्रष्ट रूपें अनेक असल्यास शुद्ध अथवा परिणत रूपच येथें दिलें आहे. कोशांत द्यावयाचे राहून गेलेले शब्द या सूचींत समाविष्ट केलेले आहेत.

| | |
|---|---|
| अईन | آئین |
| अक्दस | اقدس |
| अक्ल | عقل |
| अक्बर (= सर्वश्रेष्ठ) | اکبر |
| अकब | عقب |
| अकस | عکس |
| अकारीब | اقارب |
| अकीक (एक रत्न) | عقیق |
| अख्त्यार | اختیار |
| अख्तर (= तारा) | اختر |
| अख्बार | اخبار |
| अख्बार्-नवीस | اخبار نویس |
| अखुंजी (= पन्तोजी) | آخوند |
| अखेर | آخر |
| अगर | اگر |
| अङ्गुस्तान | انگشتدان |
| अङ्गूर | انگور |
| अङ्गेज़ | انگیز |
| अज़् | از |
| अज्नास | اجناس |
| अज़्रा | از راه |
| अज़्मत | عظمت |
| अज़्मास | آزمائش |
| अजब | عجب |
| अज़म | اعظم |
| अज़म | عزم |
| अजायब | عجائب |
| अज़ात | آزاد |
| अज़ान | اذان |
| अजीं | ازین |
| अजीबात | ازین بعد |
| अजीज़ | عاجز |
| अजीज़ (=सन्मान्य) | عزیز |
| अजिजी | عاجزی |
| अज़ुर्दगी | آزردگی |
| अज़ुर्दा | آزرده |
| अज़ुर्दार | آجره ۷ |
| अज़ून | هنوز |
| अञ्जाम | انجام |
| अञ्जीर | انجیر |
| अञ्जुमन | انجمن |
| अत्तर | عطر |
| अत्तर्दाणी | عطردان |
| अत्राफ | اطراف |
| अत्लस | اطلس |
| अद्ना | ادنی |
| अद्ल = शिक्षा | عدل |
| अदब | ادب |
| अदा | اداء |
| अदालत=न्यायकचेरी | عدالت |
| अदावत = वैर | عداوت |
| अन्करीब | عنقریب |
| अन्दाज़ | انداز |
| अन्देशा | اندیشہ |

| | |
|---|---|
| अननस = फळविशेष | عين الناس |
| अनाम ( =लोक ) | انام |
| अनामत | امانت |
| अनार | انار |
| अनीन | عنان |
| अप्करा | آبکاره |
| अप्तर | ابتر |
| अफजाईश | افزائش |
| अफताब | آفتاب |
| अफराद | افراد |
| अफलाद | احفاد |
| अफसोस | افسوس |
| अफवा | افواه |
| अफीण | افیون |
| अब्कारी | ابکاری |
| अब्दागीर | آفتابگیر |
| अब्रश ( टिपकेदार ) | ابرش |
| अब्लक | ابلق |
| अब्रू = प्रतिष्ठा | آبرو |
| अबर-चबर | چرب |
| अबद-पैवन्द | ابد پیوند |
| अबीर | عبیر |
| अम्बर | عنبر |
| अम्बार | انبار |
| अम्बारी | عماری |
| अम्मल | عمل |
| अमला | عمله |
| अमल्दार | عملدار |
| अमदानी | آمدنی |
| अमन-चैन | امن-چمن |
| अम्मा | اما |
| अमानी | امانی |
| अमारत्पन्हा | امارت پناه |
| अमीन | امین |
| अमील | عامل |
| अमीर | امیر |
| अमेज (स्त्री०) मिश्रण, मिश्र | آمیز |

| | |
|---|---|
| अयां | عیان |
| अयाळ | ایال |
| अयाळ (=स्त्री, पत्नी ) | عیال |
| अर्कानी दौलत | ارکان دولت |
| अर्क | عرق |
| अर्क = पोटकिल्ला | ارک |
| अर्कशी | اره کش |
| अर्ज़ | عرض |
| अर्ज़ ( = रुन्दी ) | عرض |
| अर्ज़-दास्त | عرض داشت |
| अर्ज़-बेगी | عرض بیگی |
| अर्ज़ल | ارذل |
| अर्ज़ानी | ارزانی |
| अर्बा | اربع |
| अर्बैन | اربعین |
| अर्सा | عرصہ |
| अराबा | عرابہ |
| अल्काब | القاب |
| अल्खालक [ (स्त्री०) म[illegible]ीदार रुजामेफर्गोल ] | الخالق |
| अलगुजा [ ( न० ) पांवा ] | الغوزه |
| अलतम्गा | التمغا |
| अल्बत् | البتہ |
| अल्विदा | الوداع |
| अलुफ | الف |
| अल्ला | الم |
| अलङ्ग | النگ |
| अलम | اعلم |
| अलल् हिशेबी | علی الحساب |
| अलाहिदा | علیحده |
| अलुदा ( = संमिश्र ) | آلوده |
| अलैकुम् सलाम | علیکم اسلام |
| अव्वल | اول |
| अश्रफ | اشرف |
| अश्रफी | اشرفی |
| अश्राफ | اشراف |
| अशर | عشر |
| अशरीन | عشرین |
| असीर | اسیر |

| | |
|---|---|
| अस्करा | آشکارہ |
| अस्तर | آستر |
| अस्तनी | آستین |
| अस्तबाल ( <ग्रीक ) | اصطبل |
| अस्नाद् | اسناد |
| अस्पस्वार | اسپ سوار |
| अस्बाब | اسباب |
| अस्मत्पन्हा | عصمت پناہ |
| अस्मान | آسمان |
| अस्मानी | آسمانی |
| अस्लूब | اسلوب |
| अस्सल | اصل |
| असर | اثر |
| असान (=सोपं ) | آسان |
| असामी | اسامی |
| असुर्दे | آسودہ |
| अह्काम | احکام |
| अह्वाल | احوال |
| अहद् | عہد |
| अहद् | ازحد |
| अहल्कार | اہل کار |
| अह्सन | احسن |
| अहादी | احدی |
| अहाली–मवाली | اہالی و حوالی |
| अहिनी | آہنین |
| आं | آن |
| आंकी | آنکہ |
| आगा | آگاھی |
| आज़ार | آزار |
| आतश्कदा | آتشکدہ |
| आतश्बाज़ | آتشباز |
| आतश्बाजी | آتشبازی |
| आतार | عطار |
| आदत | عادت |
| आदमी | آدمی |
| आदा | عائدہ |
| आदाब | آداب |
| आफ्ताबा | آفتابہ |
| आफ्रीन | آفرین |
| आफत | آفت |

| | |
|---|---|
| आब | آب |
| आब्ख़ुरा | آبخورہ |
| आब्ताब | آبتاب |
| आब्दार्–ख़ाना | آبدارخانہ |
| आब–हवा | آب و ہوا |
| आबाद् | آباد |
| आबादान | آبادان |
| आबाय–अज़्दाद् | آباء و اجداد |
| आम | عام |
| आमद् | آمد |
| आमद्न | آمدن |
| आमद्रफ्त | آمد رفت |
| आयत | آیت |
| आर्ज़ूव | آرزو |
| आर्ज़ूमन्द् | آرزومند |
| आराम | آرام |
| आरास | آرائش |
| आरीयत | عار |
| आरीफ | عارف |
| आलम | عالم |
| आलगीर् | عالمگیر |
| आलम्पन्हा | عالمپناہ |
| आला | اعلی |
| आलीजा | عالی جاہ |
| आवज़ा | آورجہ |
| आवई | آوا |
| आवाज़ | آواز |
| आवारा | آوارہ |
| आश्नाई | آشنائی |
| आशक | عاشق |
| आशूरा | عاشورہ |
| आस्ते | آہستہ |
| इक्राम | اکرام |
| इक्रार | اقرار |
| इख़्लास | اخلاص |
| इज़्ज़त | عزت |
| इज़्ज़त्–आसार | عزت آثار |
| इज़्ज़त्–दस्तगाह | عزت دستگاہ |
| इज़्ज़त्महा | عزت مآب |

| | |
|---|---|
| इज़हार | اظہار |
| इज़ा | ایذا |
| इज़ार | ازار |
| इज़ारा | اجارہ |
| इज़ाफा | اضافہ |
| इत्लाख़ | اطلاق |
| इतफाक | اتفاق |
| इतबार | اعتبار |
| इत्माम | احتمام |
| इतराज़ | اعتراض |
| इतला | اطلاع |
| इत्तहाद | اتحاد |
| इद्गा | عید گاہ |
| इन्कार | انکار |
| इन्तकाल | انتقال |
| इन्तज़ाम | انتظام |
| इन्तज़ार | انتظار |
| इन्फिसाल | انفصال |
| इन्साफ | انصاف |
| इन्साफ–गुजी | انصاف گزین |
| इन्शाल्ला ताला | انشاء اللہ تعالی |
| इनाम | انعام |
| इनायत | عنایت |
| इफाज़त | حفاظت |
| इब्न | ابن |
| इब्लाग | ابلاغ |
| इब्लीस | ابلیس |
| इबादत | عبادت |
| इबारत | عبارت |
| इभ्रत | عبرت |
| इम्ला | عملہ |
| इमान | ایمان |
| इमाम | امام |
| इमायत | حمایت |
| इमारत | عمارت |
| इर्तिबात | ارتباط |
| इर्शाद | ارشاد |
| इर्साल | ارسال |
| इराखत=लध्वी | اراقت |
| इराण | ایران |
| इरादा | ارادہ |
| इल्लत [(स्त्री०)=दोष,रोग] | علت |
| इल्ज़ाम | الزام |
| इलम | علم |
| इलाखा [ (पु०) प्रान्त, सम्बन्ध] | علاقہ |
| इलाज़ | علاج |
| इलाही | الهی |
| इश्क | عشق |
| इश्कील | اشکال |
| इशारा | اشارہ |
| इस्तकलाल | استقلال |
| इस्तक्बाल | استقبال |
| इस्तमाल । | استمالت |
| इस्तस्वाब | استصواب |
| इस्ताद | استعداد |
| इस्तावा | استوا |
| इस्तीफा | استعفاء |
| इस्तियाक | اشتیاق |
| इस्दार | اصدار |
| इस्लाम | اسلام |
| इसन्ने | اثناء |
| इसम | اسم |
| इसवी | عیسوی |
| इह्दे | احدی |
| ई | این |
| ईद | عید |
| उज़म | عظم |
| उज़ू | وضو |
| उज़ू–तवाज़ू | تواضع ے |
| उज़्र | عذر |
| उल्फा | علوفہ |
| उब्हत–मन्झिलत | أبہت منزت |
| उम्दा | عمدہ |
| उमर | عمر |
| उमराव | أمراء |
| उमेद | أمید |
| उर्दू ( =सैन्य, गोट ) | أردو |
| उर्फ | عرف |
| उरूस | عروس |
| उश्टर (=उण्ट) | اشتر |
| उस्तवारी | أستواری |
| ऊद ( =धूप) | عود |

| | |
|---|---|
| एक्का | یکہ |
| एकबाल-पनाह | اقبال پناہ |
| एक-सर | یکسر |
| एकसान | یکسان |
| एकसू | یکسو |
| एलगार | ایلغار |
| एल्ची | ایلچی |
| एहसान | احسان |
| ऐन | عین |
| ऐनक [ (न०) उपनेत्र] | عینک |
| ऐना | آئینہ |
| ऐपत | عافیت |
| ऐब | عیب |
| ऐवज़ | عوض |
| ऐवजी | بعوض |
| ऐश | عیش |
| औकात | اوقات |
| औज़ार | اوزار |
| औरत | عورت |
| औलाद | اولاد |
| औलिया | اولیا |
| औसाफ | اوصاف |
| कङ्गाल | کنگال |
| कङ्गोरा | کنگرہ |
| कज्जा | قضیہ |
| कज़ल्बास | قزلباس |
| कज़ा | قضا |
| कज़ाख | قزاق |
| कजाग | قزاق |
| कट्टा | قطع |
| कत्तल | قتل |
| कत्तल्बाज़ | قتلباز |
| कतलाम | قتل عام |
| कतबा | کتابہ |
| कतार | قطار |
| कद ( स्त्री०)उञ्ची, मजाल | قد |
| कदम | قدم |
| कदम्बोस | قدمبوس |
| कद्र | قدر |
| कद्र्दान | قدردان |
| कदीम | قدیم |

| | |
|---|---|
| कदीमल् अय्याम | قدیم الایام |
| कन्दील | قندیل |
| कन्दुरी | کندوری |
| कनाथ | قنات |
| कनात [ (स्त्री०=खस्ते ] | قناعت |
| कपाप्-चिनी | کباب چینی |
| कफन | کفن |
| कफश-दोज़(जोडे शिवणारा) | کفش دوز |
| कफनी | کفنی |
| कफालत | کفالت |
| कफारत | کفر ے |
| कबई [ (स्त्री०) फगाल] | قبا |
| कबज़ | قبض |
| कबर | قبر |
| कबरस्तान | قبرستان |
| कबालत | قبالہ |
| कबाहत | قباحت |
| कबिला | قبیلہ |
| कबिलेमाही | قبل ماہ |
| कबूल | قبول |
| कबूतर | کبوتر |
| कम | کم |
| कमसल | کم اصل |
| कम्तर | کمتر |
| कमी | کمی |
| कम्तरीन | کمترین |
| कम्पेस | کم وبیش |
| कम्मर | کمر |
| कम्बर्गा | کمر گاہ |
| कमर्बन्द | دمر بند |
| कम्बर्-बस्ता | کمربستہ |
| कमान | کمان |
| कमानगार | کمانگر |
| कमाल | کمال |
| कयास | قیاس |
| कर्ज़ | قرض |
| कर्णा | قرنائی |
| कर्यात | قریت ے |
| कराचळी (= सतेजत वीर ) | قلاچوری |
| करामत | کرامت |

| | |
|---|---|
| करामात | کرامات |
| करार | قرار |
| करार-दाद | قرارداد |
| करार-वाके | قرارواقعی |
| करिणा ( = सन्दर्भ ) | قرینہ |
| करोल | قراؤل |
| कल्कल | کلکل |
| कल्बी | قلبی |
| कल्मा | کلمہ |
| कल्हई | قلعی |
| कलगी ( स्त्री० ) | کلغی |
| कलन्दर | قلندر |
| कलम | قلم |
| कलाबतू | قلابتون |
| कव्हा | قهوه |
| कवायत | قواعد |
| कवाल | قوال |
| कबाला (पु०) दस्तैवज़ | قبالہ |
| कवी-दील | قوی دل |
| कशिदा (पु०) नक्शी | کشیده |
| कशीस | کشش |
| कस | کس |
| कस्त | قصد |
| कस्रत | کثرت |
| कसब | کسب |
| कसम | قسم |
| कसर | قصر |
| कसलमन्द | کسلمند |
| कसा ( पु० = बन्द ) | کشہ |
| कसाई | قصائی |
| कसाब | قصاب |
| कसाला | کسالہ |
| कसीद | کشید |
| कसूर | قصور |
| कसोशी | کوشش |
| कहर | قہر |
| कहरी | کاری |
| कही | کهی |
| काथल | قاهو |
| कागद | کاغد |
| काज़गी | قائزه |
| काजी | قاضی |
| कानू | قانون |
| कानुगो | قانون گو |
| कापूर | کافور |
| काफर | کافر |
| काफला | قافلہ |
| काफीर | کافر |
| काबीज | قابض |
| काबील | قابل |
| काबूची | قابوچی |
| काबू | قابو |
| का दा | قاعده |
| कायम | قائیم |
| कायम मकाम | قائم مقام |
| कार्किर्द | کارگرد |
| कार्कून | کارکن |
| कार्खाना | کارخانہ |
| कार्गर | کارگر |
| कार्चोबी | کارچوبی |
| कार्पर्दाज़ | کارپرداز |
| कार्भार | کاروبار |
| कार्वाण | کاروان |
| कारागीर | کاریگر |
| काल्बूत | کالبد |
| काशीद | قاصد |
| काहिरा ( =जयस्वी ) | قاہره |
| काहिली | کاہلی |
| किताब | کتاب |
| किताब | خطاب |
| कित्ता | قطعہ |
| किन्खाप | کمخاب |
| किन्तान | کتان |
| किनार | کنار |
| किफायत | کفایت |
| किब्लेगाह | قبلہ گاه |
| किब्ले-नुमा ( = दिशादर्शक यन्त्र ) | قبلہ نما |
| किम्मत | قیمت |

| | |
|---|---|
| किमया | کیمیا |
| किर्द | کرد |
| किर्दसार लागवड | کردزار |
| किर्माणी (ओवा) | کرمانی |
| किर्मिजी | قرمزی |
| किराण ( = शुभग्रह युती ) | قران |
| किराया | کرایہ |
| किल्ला | قلعہ |
| किल्ली | کلید |
| किलाफ | خلاف |
| किलावा | کلاوہ |
| किस्त | قسط |
| किस्ती | کشتی |
| किस्मत | قسمت |
| किस्सा | قصہ |
| किसान | کسان |
| कुडूतें | کرتہ |
| कुती | قوطی |
| कुद्दा | قدوہ |
| कुद्रत | قدرت |
| कुन्ज | کنج |
| कुन्हा | کھنہ — کینہ |
| कुफ्राण | کفران |
| कुफर | کفر |
| कुफार | کفار |
| कुभाण्ड | کفران |
| कुभे | قبح |
| कुमक | کمک |
| कुमैत | کمیت |
| कुर्निसात | کورنشات |
| कुर्बाण | قربان |
| कुराण | قرآن |
| कुर्रेबाज | قرعہ باز |
| कुल्कुल्ला | کل کلان |
| कुल्फी | قفلے |
| कुलाबा | قلابہ |
| कुल्हामोश | کلاہ پوش |
| कुली | قلی |
| कूली | کل |

| | |
|---|---|
| कुलूप | قفل |
| कुवत | قوت |
| कुशाद | کشاد |
| कुस्ती | کشتی |
| कुशून | قشون |
| कुही | کوهی |
| कूच | کوچ |
| कूल | کل |
| केरबा | کهربا |
| के | کی |
| केंची | قیچی |
| केद | قید |
| कैद | کید |
| कैफ | کیف |
| कैफत (स्त्री०) कारस्थान | کیفیت |
| कैफियत | کیفیت |
| केली | کیلی |
| कोका | قوقہ |
| कोत्वाल | کوتوال |
| कोता | کوتاہ |
| कोम | قوم |
| कोशीस | کوشش |
| कोळञ्जन | خولنجن |
| कौल | قول |
| ख्याल | خیال |
| ख्वार | خوار |
| ख्वाहीश | خواہش |
| खकाणा | خاکانہ |
| खची | خصی |
| खजाना | خزانہ |
| खजिना | خزینہ |
| खजील | خجل |
| खतरा | خطرہ |
| खत | خط |
| खतम | ختم |
| खता | خطا |
| खञ्जीर | خنجر |
| खाञ्जगी | خنجری |
| खता (स्त्री०) नुकसान | خطا |

| | |
|---|---|
| खतीब | خطیب |
| खतूत | خطوط |
| खन्दक | خندق |
| खप्पा | خفہ |
| खफीफ | خفیف |
| खबर | خبر |
| खबर्दार | خبردار |
| खमस | خمس |
| खमीर | خمیر |
| खखंग | خارخار |
| खर्गोस | خرگوش |
| खर्च | خرچ |
| खर्बूज़ | خربزہ |
| खर्मस्त ( = मस्त ) | خرمست |
| खराद | خراط |
| खराब | خراب |
| खरीद | خرید |
| खरीप | خریف |
| खल्वत | خلوت |
| खलक | خلق |
| खलद् अय्याम दौलतहू | خلد ایام دولتہ |
| खला-मला | خلا ملا |
| खलाशी | خلاصی |
| खलास | خلاص |
| खलिता | خریطہ |
| खलिफा | خلیفہ |
| खलेल | خلل |
| खवास | خواص |
| खवीस ( = दुष्ट ) | خبیث |
| खसखस | خشخاش |
| खस्त | قصد |
| खस्त | خستہ |
| खसूसीयत | خصوصیت |
| खा.न खाई | خواهی نخواهی |
| खाक | خاک |
| खातर | خاطر |
| खात्री | خاطر |
| खान्का | خانقاہ |
| खान्सामा | خانساماں |
| खाना | خوان |
| खानगी | خانگی |
| खानदान | خاندان |
| खान्पोश | خوانپوش |
| खानत | خیانت |
| खाना | خانہ |
| खाना-जङ्गी | خانہ جنگی |
| खान ज़ाद | خانہ زاد |
| खानेशुमारी | خانہ شماری |
| खाबान (पु०) ताटवा | خیابان |
| खाब्गा | خوابگاہ |
| खाम | خام |
| खामखा | خواہ مخواہ |
| खामी | خامی |
| खामोश | خاموش |
| खावा | خاروہ |
| खालसा | خالصہ |
| खाली | خالی |
| खावन्द | خاوند |
| खास | خاص |
| खास्दार | خاص بردار |
| खिज़्मत | خدمت |
| खिफ्त | خفت |
| खिलत | خلعت |
| खिस्मीस | کشمش |
| खिसारत | خسارہ |
| खुजस्ते | خجستہ |
| खुजा | کوزہ |
| खुत्वा | خطبہ |
| खुद्द | خود |
| खुदा | خدا |
| खुदातर्सी | خداترسی |
| खुदावन्त-न्यामत | خداوند نعمت |
| खुफिया | خفیہ |
| खुबी | خوبی |
| खुमारी | خمار |
| खुर्ची | کرسی |
| खुर्जी (=पडशी) | خورجین |
| खुर्द | خرد |
| खसंन्दगी | خرسند |
| खुराक | خوراک |

| | |
|---|---|
| खुल्द-मकान | خلد مکان |
| खुलास | اخلاص |
| खुलासा | خلاصہ |
| खुश्क | خشک |
| खुश्कसाली | خشکسالی |
| खुश्की | خشکی |
| खुर्मी | خرمی |
| खुश्नुदी | خوشنودی |
| खुश्नुमा | خوشنما |
| खुशामत | خوش آمد |
| खुशाल | خوشحال |
| खुसूस | خصوص |
| खून | خون |
| खूप | خوب |
| खूम | قوم |
| खूश | خوش |
| खेमा | خیمہ |
| खेरीज़ | خارج |
| खेल्खाना | خیلخانہ |
| खेश | خویش |
| खैर | خیر |
| खैर-ख़ाह | خیرخواہ |
| खैरात | خیرات |
| खैरीयत | خیریت |
| खो खो | قاہ قاہ |
| खोगीर | خوگیر |
| खोजा | خوجہ |
| खोय ( घाम ) | خوی |
| खोय (स्त्री०) स्वभाव | خوی |
| ग्वाही | گواہی |
| गई-गुदर | گاہ |
| गच | گچ |
| गची | گچی |
| गज़ | گز |
| गहजब | غضب |
| गज़ल | غزل |
| गन्ज़ | زنگ |
| गन्ज | گنج |
| गञिफा | گنجیفہ |

| | |
|---|---|
| गड़प | غرب |
| गदर | غدر |
| गदा | گدا |
| गन्दकी | گندگی |
| गनिमात (स्त्री०) चाङ्गली गोष्ट | غنیمت |
| गनीम | غنیم |
| गप्प | گپ |
| गप्सप | گپ شپ |
| गफलत | غفلت |
| गम्ज़ा | غمزہ |
| गमी | غم |
| गर्क | غرق |
| गर्गशा | غرغشہ |
| गर्द | گرد |
| गर्दन | گردن |
| गर्दपोस | گرد پوش |
| गर्दी | گردي |
| गरज़ | غرض |
| गरज़गो | غرض گو |
| गरम | گرم |
| गरीब | غریب |
| गरीब-नवाज़ | غریبنواز |
| गरीब पर्वर | غریب پرور |
| गरूर | غرور |
| गल्बत | غلبت |
| गलत | غلط |
| गल्ला | غلہ |
| गल्बा | غلبہ |
| गलिच्छ | غلیظ |
| गलेफ | غلاف |
| गवस ( चौकशी ) | غوص |
| गस्त | گشت |
| गाजी | غازی |
| गाफील | غافل |
| गायबाना | غائبانہ |
| गारद | غارت |
| गालब | غالب |
| गालीचा | غالیچہ |
| गाशा | غاشیہ |

| | |
|---|---|
| गिर्द | گرد |
| गिर्द-नवांई | گرد نواحی |
| गिर्दावरी | گرداوری |
| गिर्दी | گردی |
| गिर्वीदगी | گرویدگی |
| गिरफ्तार | گرفتار |
| गिरव | گرو |
| गिराणी | گرانی |
| गिरामी (=श्रेष्ठ) | گرامی |
| गिरिफ्तन ( – पकडणें ) | گرفتن |
| गिरे | گرہ |
| गिलावा | گلابہ |
| गिल्ला | گلہ |
| गुङ्ग=मूक दङ्ग | گنگ |
| गुज़राण | گذران |
| गुडूप | غروب |
| गुदस्त | گذشتہ |
| गुन्ज़ाईस | گنجائش |
| गुन्हा | گناہ |
| गुना | گونہ |
| गुफ्तगो | گفت و گو |
| गुबार | غبار |
| गुम्शुद | گم شد |
| गुमज़ | گنبذ |
| गुमान | گمان |
| गुमास्ता | گماشتہ |
| गुर्दा | گردہ |
| गुरबा | غربا |
| गुल्कन्द | گلقند |
| गुल्छबू | گل شبو |
| गुल्जार | گلزار |
| गुल्नार | گل انار |
| गुल्बदन | گلبدن |
| गुल्बाङ्ग | گلبانگ |
| गुल्बस | گل عباس |
| गुलाब | گلاب |
| गुलाब-पाश | گلاب پاش |
| गुलाब-शकर ( स्त्री ) | گلاب شکر |
| गुलाम | غلام |
| गुसल | غسل |

| | |
|---|---|
| गू | گہ |
| गूम | گم |
| गूल | گل |
| गूल | غول |
| गैब | غیب |
| गैरत | غیرت |
| गैराद | غیرات |
| गोता | غوطہ |
| गोदी | گودی |
| गोफ्त-गो | گفت و گو |
| गोया | گویا |
| गोर | گور |
| गोश्माल | گوشمال |
| गोश्वारा | گوشوارہ |
| गोशा | گوشہ |
| गोस्पंच | گوشپیچ |
| गौर | غور |
| गौरशी | غوررسی |
| घज़न्फर | غضنفر |
| घुघी | قوقی |
| घुमट | گنبد |
| घोगा | غوغا |
| चक | چک |
| चकते | چغتای |
| चङ्ग | چنگ |
| चन्द | چند |
| चपाती | چپاتی |
| चबर | چرب |
| चम्चा | چمچہ |
| चमन | چمن |
| चरक | چرخ |
| चर्का | چرخہ |
| चर्ब | چرب |
| चर्बी | چربی |
| चर्मी | چرمین |
| चर्म-दोज़ | چرمدوز |
| चरिन्दा | چرندہ |
| चलाख | چالاک |
| चश्म-पोशी | چشمپوشی |

| | |
|---|---|
| चश्मा | چشمہ |
| चहारूम | چہارم |
| चाऊस | چاوش |
| चाक करणें | چاک کردن |
| चाकर | چاکر |
| चाकू | چاقو |
| चादर | چادر |
| चापट | چپات |
| चापणें | چاپیدن |
| चापलोशी | چاپلوسی |
| चाबूक | چابک |
| चाबूक-स्वार | چابک سوار |
| चास्नीगार | چاشنیگر |
| चीक | چیغ |
| चिराग | چراغ |
| चिल्खत | چہلقد |
| चिल्ला | چلہ |
| चिल्ली | چلی |
| चीज़ | چیز |
| चीण | چین |
| चुगली | چغل |
| चुङ्गाल | چنگال |
| चुनांचे | چنانچہ |
| चुनीदा | چنیدہ |
| चप | چوب |
| चेहरा | چہرہ |
| चोप | چوب |
| चोपदार | چوبدار |
| चौथरा | چوترہ |
| चौहाशी चारकिनारी | حاشیہ |
| छबिना | شبینہ |
| छबी | شبیہ |
| छान | شان |
| छान-छोक | شان و شوکت |
| छापखाना | چاپخانہ |
| छापा | چاپیدن |
| ज्यान | زیان |
| ज्वान | جوان |
| ज़क | دق |
| ज़कात | ذکات |
| ज़किरा | زخیرہ |
| ज़खम | زخم |
| ज़खमाना | زخمانہ |
| जङ्ग | جنگ |
| ज़ङ्ग | زنگ |
| जङ्गल | جنگل |
| जङ्गाल ( पु० ) | زنگار |
| ज़जिया | جزیہ |
| ज़न्जिरा | جزیرہ |
| ज़न्जीर | زنجیر |
| जड-जवाहीर | زرو جواہر |
| जदीद | جدید |
| जन्नत्-नशीन | جنت نشین |
| ज़नान्खाना | زنان |
| ज़नाना | زنانہ |
| ज़नानी | زنانی |
| जनाब | جناب |
| ज़नावर | جانور |
| ज़नूब ( =दक्षिण ) | جنوب |
| ज़प्त | ضبط |
| ज़फ्त-रफ्त | ضبط و ربط |
| ज़बर | زبر |
| ज़बर्दस्त | زبردست |
| ज़बान | زبان |
| ज़बानी | زبانی |
| ज़बाब | جواب |
| जबाँतरास | زبانتراس |
| ज़बाब्दार | جوابدار |
| ज़बे | ذبح |
| ज़बून | زبون |
| ज़म्बिया | جنبیہ |
| ज़म्बुरा | زنبورہ |
| ज़म | جمع |
| ज़मरूद | زمرد |
| ज़मा | جمع |
| ज़मात | جماعت |
| ज़मादिलावल | جمادي الاول |
| ज़मादिलाखर | جمادي الاخر |
| ज़मान | ضمان |
| ज़माना | زمانہ |

| | |
|---|---|
| ज़मीन्दार | زمین دار |
| ज़मीदोज़ | زمین دوز |
| ज़मीये | جمیع |
| ज़मियत | جمعیت |
| जइयत | زائد |
| ज़र | زر |
| ज़र–कमर ( = सुवर्णकटिबन्ध ) | زرکمر |
| ज़र्गा | جرگہ |
| ज़रा–ज़रा | زرہ - ذرہ |
| ज़र्तारी | زرتار |
| ज़र्द | زرد |
| ज़र्दोजी | زردوز |
| ज़र्बाफी | زربفت |
| ज़रब | ضرب |
| ज़रा | ذرہ |
| ज़रा–ब–ज़रा | ذرہ بذرہ |
| ज़रिदा | جریدہ |
| ज़री | زرین |
| ज़रीब (पु०) क्षेत्रमाप, क्षेत्रमापन | جریب |
| ज़रीब्दार | جریب |
| ज़रूर | ضرور |
| जल्सा | جلسہ |
| जल | جل |
| जलद् | جلد |
| जलद्–कलम (स्त्री०) लेखन–चापल्य | جلد کلمی |
| जला–वतन | جلاوطن |
| ज़लाद् | جلاد |
| जलाल | جلال |
| जलील | جلیل |
| जलूस | جلوس |
| ज़व्हेर | جوہر |
| ज़व | جو |
| ज़वादी | زباد |
| जवांमर्द | جوانمرد |
| ज़वार (स्त्री०) आसमन्तात् | جوار |
| ज़वाहीर | جواہر |
| ज़शन | جشن |
| जहन्नम ( =नरक, अग्निस्थान ) | جہنم |
| ज़ेहन–नशीन | ذہن نشین |
| ज़हमत | زحمت |
| ज़हर | زہر |
| जहागीर | جاگیر |
| जहाज़ | جہاز |
| जहान | جہان |
| जहांदीद् | جہان دیدہ |
| जहांबाज़ | جانباز |
| जहाती | بجہت |
| ज़हूर | ظہور |
| ज़ागा | جایگاہ |
| ज़ जम | جاجم |
| ज़ात | ذات |
| जादा | زیادہ |
| जादू | جادو |
| जान्दार जेमतेम जिवन्त क्षीण | جاندار |
| जान | جان |
| जानबैन | جانبین |
| जाफत | ضیافت |
| जाफर्मानी केशरी | جعفرانی |
| ज़ाफरा | زعفران |
| जांफिशानी | جان فشانی |
| ज़ाब-साल | جواب و سوال |
| जा–ब जा | جا بجا |
| ज़ाबीत | ضابط |
| ज़ाबता | ضابطہ |
| ज़ाम्ब | جام |
| ज़ामगी | جامگی |
| ज़ामदानी (स्त्री०) कपडे ठेवण्याची पेटी | جامہ دان |
| ज़ामदार | جامہ دار |
| ज़ामा | جامہ |
| ज़ामीन | ضامن |
| ज़ायदाद | جایداد |
| ज़ाया | ضائع |
| जारत | ضیارت |
| जारी | جاری |
| जालीम | ظالم |
| जास्त | زیادت |

| | |
|---|---|
| जासूद | جاسوس |
| जाहली | جاہلی |
| जाहिराणा | ظاہرانہ |
| जाहिरात | ظاہر |
| जाहीर | ظاہر |
| जिकीर | ذکر |
| जिक्क | دق |
| जिग्-जिग | جق جق |
| जिगर | جگر |
| जिद्द | ضد |
| जिन्हार | زنہار |
| जिन्दगानी | زندگانی |
| जिन्दगी | زندگی |
| जिन्द | جن |
| जिन्नस | جنس |
| जिना | زینہ |
| जिम्मा | ذمہ |
| जिरायत | زراعت |
| जिरे | زرہ |
| जिल्काद | ذی القعدہ |
| जिल्हई | جلا |
| जिल्हा | ضلع |
| जिल्हे | جلوہ |
| जिल्हेज | ذی الحج |
| जिलीद ( = बान्धीव पुस्तक ) | جلد |
| जिलीब | جلو |
| जीन | زین |
| जील-सुभानी | ظل سبحانی |
| ज़ुज़्दान | جزدان |
| ज़ुज़वी | جزوی |
| ज़ुज़रसी | جزرسی |
| ज़ुदा | جدا |
| ज़ुब्दतुल्-एक्रान | زبدۃ الاقران |
| ज़ुबा | جبا |
| जम्मस (स्त्री०) कच हर्कत | جنبش |
| ज़ुम्मा | جمعہ |
| ज़ुम्ला | جملہ |
| ज़ुमानणें | گمان |

| | |
|---|---|
| ज़ुर्माना | جرمانہ |
| ज़ुरत | جرات |
| ज़ुरा | جرہ |
| ज़ुल्कद्र | ذوالقدر |
| ज़ुल्हाई ( = विणकर ) | جولاہہ |
| ज़ुलाब | جلاب |
| ज़ुलूम | ظلم |
| ज़ूज़ | جزء |
| ज़ूद | زود |
| जेगा | جیغہ |
| जेब | جیب |
| जेब-व-जीनत | زیب و زینت |
| ज़ेर | زیر |
| ज़ेर्बन्द | زیر بند |
| ज़ेर्बार | زیربار |
| ज़ैफ | ضعیف |
| ज़ैल | ذیل |
| ज़ाडा | جوراب |
| ज़ोर | زور |
| ज़ोरावर | زورآور |
| ज़ोज़ा | زوجہ |
| झक | دک |
| झान्ज़ | سنج |
| झुलप | زلف |
| झूल | جل |
| झोक | ذوق |
| टन्चाई | تنگ چای |
| टर्बूज | تربزہ |
| डफ | دف |
| डबा | دبہ |
| डबीर | دبیر |
| डाग | داغ |
| डागदुजी | دوز |
| डाव | داو |
| डेग | دیگ |
| डोल | دول |
| डौल | دول |
| ढेलज़ | دہلیز |

ढोल دہل
तख्त تخت
तख्त-पोशी تخت پوش
तख्तराव تخت روان
तक्दम تقدم
तक्दमा تقدمہ
तक्रार تکرار
तक्रीब تقریب
तक्रीर تقریر
तक्लादी تقلیدی
तक्लीफ तکلیف
तक्लुबी تقلبی
तक्वा تقویہ
तक्शीर تقصیر
तक्सुची تکذب
तक्शीम تقسیم
तक्या تکیہ
तग्दीर تقدیر
तग्मा تغما
तगाई تقاوی
तगादा تقاضا
तगाफली تغافل
तगारी تغاری
तग़ीर تغییر
तङ्ग تنگ
तज़्करा تذکرہ
तज़्वीज़ تجویز
तज़ावज़ تجاوز
तजेला تجلی
तणाव طناب
तद्बीर تدبیر
तदारूक تدارک
तन تن
तन्खा تنخواہ
तन्दुरुस्ती تندرستی
तनहा تنہا
तनाखोरी تن خوری
तफ्शील تفصیل
तपास تفحص
तफ्रका تفرقہ

तफ्रीक تفریق
तफज़ूल تفضل
तफावत تفاوت
तब्दिलि تبدیل
तब्लख تبلق
तब्ला طبلہ
तबियत طبیعت
तबक طبق
तबञ्चा تبانچہ
तबरूक تبرک
तबल्दार تبردار
तबाख طباخ
तबीब طبیب
तबेला طویلہ
तम्बाखू تنباکو
तम्बी تنبیہ
तम्बू تنبو
तम्बोरा تنبورہ
तमसूक تمسک
तमा طمع
तमानीयत تمانیت
तमाम تمام
तमाशा-बीन تماشا بین
तमाशा تماشا
तयार تیار
तर्कश ترکش
तर्कीब ترکیب
तर्कीम ترقیم
तर्जुमा ترجمہ
तर्जुमान सर्कारी भाषान्तरकार ترجمان
तर्तीब ( स्त्री० ) व्यवस्था ترتیب
तर्दूद تردد
तर्फ طرف
तर्बियत تربیت
तर्बेज़ تربیت
तर्र; तर تر
तर्हा طرح
तरक्की ترقی
तरस ترس
तराज़ू ترازو

| | |
|---|---|
| तराणा | ترانہ |
| तरास ( पु० ) पत्ते–काट | تراش |
| तरी ( स्त्री० ) जलमार्ग | تری |
| तरीक | طریق |
| तल्ख | تلخ |
| तलफ | تلف |
| तल्लफ | طلب |
| तलब | طلب |
| तलवून–मिज़ाजी | تلون مزاجی |
| तलाख | طلاق |
| तलाव | طلاب |
| तलावा | تلایہ |
| तलास | تلاش |
| तवक्कूल | توکل |
| तवाई | تباهی |
| तवक्का | توقع |
| तवक्कूफ | توقف |
| तवज्जेह | توجہ |
| तवर | تہور |
| तवल्लूद | تولد |
| तवा | تابہ |
| तवाज़ू | تواضع |
| तवाना | توانا |
| तवाफ | طواف |
| तवारीख | تواریخ |
| तवालीयत | توالیت |
| तश्कीस ( चिकित्सा) | تشخیص |
| तशरीफ | تشریف |
| तश्वीस | تشویش |
| तशफ्फी | تشفی |
| तस्त | طشت |
| तास्फिया | تصفیہ |
| तस्दी | تصدیع |
| तस्बी (स्त्री०) स्मरणी | تسبیح |
| तस्बीर | تصویر |
| तस्बी = स्वरूपसाधर्म्य ) | تشبیہ |
| तस्लीम | تسلیم |
| तसदूक | تصدق |
| तसरूफ | تصرف |

| | |
|---|---|
| तसल्ली | تسلی |
| तसू | تسو |
| तहकीक | تحقیق |
| तहकूब | توقف |
| तहखाना | تہخانہ |
| तहद्द | تاحد |
| तहनाळ | تہنال |
| तहमूल | تحمل |
| तहशीन | تحسین |
| तहशील | تحصیل |
| तहहयात | تاحیات |
| ताईत | تعویذ |
| ताकद | طاقت |
| ताकीद | تاکید |
| ताकूब | تعقب |
| ताख्त–ताराज़ | تاخت تاراج |
| तागायत | تاغایت |
| ताज़ ( = मुगट, टोपी ) | تاج |
| ताज़–महाल | تاج محل |
| ताज़ा | تازہ |
| ताजिया | تعزیہ |
| ताजी | تازی |
| ताजीम | تعظیم |
| ताजूब | تعجب |
| ताफ्ता | تافتہ |
| ताफा | طائفہ |
| ताब | تاب |
| ताबा | تابع |
| ताबीन | تابعین |
| ताबूत | تابوت |
| ता–मग्दूर | تامقدور |
| तामील | تعمیل |
| तामूल | تامل |
| तार | تار |
| ताराज़ | تاراج |
| तारीख | تاریخ |
| तारसूखाना | طہارت خانہ |
| तारीफ | تعریف |
| तालीक | تعلیقہ |
| तालीम | تعلیم |

| | |
|---|---|
| तालुका | تعلقہ |
| ताले | طالع |
| ताव | تاب |
| तावण | تاوان |
| तावदान | تابدان |
| तास | طاس |
| ताशा | طاسہ |
| ताहाल | تاحال |
| ताहूद | تعہد |
| तिज़ारत | تجارت |
| तिरन्दाज़ | تیر انداز |
| तिस्सा | تسع |
| तीर | تیر |
| तुक्का | تکہ |
| तुकमा | تکمہ |
| तुकूमराई (स्त्री०) रानतुळशीचें बी. | تخم ریحان |
| तुणतुणें=चोण्डकें | طنطنہ |
| तूत | توت |
| तुन्द | تند |
| तुफान | طوفان |
| तुमान | تنبان |
| तुमार | طومار |
| तुर्बत | تربت |
| तुरन्ज़ | ترنج |
| तुरा | طرہ |
| तुरुङ्ग | ترنگ |
| तुरूक | ترک |
| तूल | طول |
| तेघा | تیغہ |
| तेज़ | تیز |
| तेज़गी ( स्त्री० ) पांणीदारपणा | تیز |
| तेजाब | تیزاب |
| तैन | تعین |
| तैनात | تعینات |
| तैबज़ पानसुपारी | توضع |
| तैश | طیش |
| तोक | طوق |
| तोता ( पु० ) पोपट | طوطی |
| तोदा | تودہ |
| तोफ | توپ |

| | |
|---|---|
| तोफा–ताहफ | تحفہ تحائف |
| तोफीर | توفیر |
| तोब्रा | توبرا |
| तोबा | توبہ |
| तोरा | تورہ |
| तोश | توش |
| तोशेखाना | توشہ خانہ |
| तोशक | توشک |
| तोशीस | تشویش |
| तोस्दान (न०) दारूगोळीची पिशली | توشدان |
| तोहमत | تہمت |
| तौर | طور |
| दख़ल | دخل |
| दग्दगा | دغدغہ |
| द ल्बाज | دغلباز |
| दगा | دغا |
| दङ्ग | دنگ |
| दङ्गल | دنگل |
| दप्तर | دفتر |
| दफन | دفن |
| दफा | دفعہ |
| दफातें | دفعات |
| दफिना | دفینہ |
| दफे | دفع |
| दब्दबा | دبدبہ |
| दम्दमा | دمدمہ |
| दम | دم |
| दमा | دمہ |
| दमान | دامن |
| दमामा | دمامہ |
| दर | در |
| दर्कार | درکار |
| दर्किनार | درکنار |
| दर्खास्त | درخواست |
| दर्गा | درگاہ |
| दर्ज़ा | درجہ |
| दर्ज़ी | درزی |
| दर्द | درد |
| दर्बार | دربار |

| | |
|---|---|
| दर्म्यान | درمیان |
| दर्या | دریا |
| दर्याप्त | دریافت |
| दर्यावर्दी | دریانورد |
| दर्वाज़ा | دروازہ |
| दर्वाण | دروان |
| दर्वेश | درویش |
| दरक | درک |
| दरज़ | درز |
| दरदवन्त | دردمند |
| दराज़ | دراز |
| दराब | ضراب |
| दरीं | درین |
| दरुणी | درونی |
| दरोग | دروغ |
| दरोगा | داروغا |
| दरोबस्त | دروبست |
| दल-बादल | دل بادل |
| दलाल | دلال |
| दवा | دواء |
| दवादवी | دوادوی |
| दशा | دسم |
| दस्कत | دستخط |
| दस्त | دست |
| दस्तक | دستک |
| दस्त-दराजी | دست درازی |
| दस्त-बोसी (स्त्री. हस्तचुम्बन) | دست بوسی |
| दस्ता | دستہ |
| दस्ताना | دستانہ |
| दस्तार | دستار |
| दस्तूर | دستور |
| दस्तैवज़ | دست آویز |
| दहशत | دہشت |
| दहा | دہ |
| दाइया | داعیہ |
| दाई | دایہ |
| दाई | داعی |
| दायम | دائیم |
| दाखल | داخل |
| दाखला | داخلہ |

| | |
|---|---|
| दाणा | دانہ |
| दाणादाण | دانہ دانہ |
| दाणा | دانا |
| दाद | داد |
| दानत | دیانت |
| दाम | دام |
| दायरा | دائرہ |
| दार-मदार | دارمدار |
| दारू | دارو |
| दाल्चिनी | دارچینی |
| दाल (स्त्री०) चर्मपट्टा | دوال |
| दालन | دالان |
| दावण | دامن |
| दावा | دعوا |
| दास्तन | داشتن |
| दिक्क | دق |
| दिक्कत | دقت |
| दिगर | دگر |
| दिद्वान | دیدوان |
| दिमत | ذمت |
| दिमाख | دماغ |
| दिरङ्ग | درنگ |
| दिरम | درم |
| दिल्जोई | دلجوئی |
| दिल्दार सहृदय; धीर | دلدار |
| दिल्देही | دلدہی |
| दिल्भर | دلبر |
| दिलावर | دلاور |
| दिलेर | دلیر |
| दिवाण | دیوان |
| दिवाणा | دیوانہ |
| दिवाळ | دیوال |
| दिवाळगिरी (स्त्री०) भिन्तीतील खिळा अथवा आंकडा | دیوارگیر |
| दी | دی |
| दीन | دین |
| दील | دل |
| दुआब | دوآب |
| दुकान | دکان |
| दु-किसा | دوقطعہ |

| | |
|---|---|
| दुचश्मी=समोर चेहऱ्याचें (चित्र) | دوچشمی |
| दुनिया | دنیا |
| दुबार | دوبار |
| दुमूची | دمچی |
| दुम्दारी | دمداری |
| दुम्बाला | دمبالہ |
| दुय्यम | دویم |
| दुर्बीण | دوربین |
| दुरन्देश | دوراندیش |
| दुरी | دوری |
| दुरुस्त | درست |
| दुवा | دعا |
| दुस्मन | دشمن |
| दुहाशी दोनकडांनाचकिनार आहेअसा | حاشیہ |
| दुही | دوئی |
| दूम | دوم |
| दूर्दस्त | دوردست |
| दाखील | داخل |
| देणगी | دہندگی |
| देरी | دیری |
| देह | دہ |
| दोस्त | دوست |
| दोस्तदार | دوست دار |
| दौत | دوات |
| दौर (= घेर, परिकर ) | دورہ |
| दौलत | دولت |
| दौरा ( पु० फिरती ) | دور |
| धडूपा | درپہ |
| धास्त | دہشت |
| न्यहायत | نہایت |
| न्यहाल | نہال |
| न्याबत | نیابت |
| न्याहारी | ناہاری |
| नईस | نعش |
| नक्कल | نقل |
| नक्शा | نقش |
| नक्शी | نقش |
| नक्की | یقین |
| नकास | نقاش |
| नकाल | نقال |

| | |
|---|---|
| नकाशा | نقشہ |
| नकाहत | نقاہت |
| नकीब | نقیب |
| नख्चीन ( न० ) नराणी | ناخن چین |
| नगद;नक्त | نقد |
| नगारा | نقارہ |
| नगीना | نگینا |
| नङ्ग | ننگ |
| नज़राणा | نذرانہ |
| नज़र | نذر |
| नज़र | نظر |
| नज़ाफत | نظافت |
| नजीक | نزدیک |
| नज़ूम | نجوم |
| नतिजा | نتیجہ |
| नदाफ( = कापासशोधक ) | نداف |
| न-दारद | ندارد |
| नफर | نفر |
| नफा | نفع |
| नफी | نفی |
| नफेरी | نفیر |
| नवाब | نواب |
| नम्दा | نمد |
| नमत | نمط |
| नमुदी | نمود |
| नमुना | نمونہ |
| नर्मीना | نرم |
| नर | نر |
| नरद | نرد |
| नरम | نرم |
| नरी | نری |
| नवसागर ( पु० ) | نوشادر |
| नवाजीस | نوازش |
| नवार | نوار |
| नविस्ता | نوشتہ |
| नवीसन्दा | نویسندہ |
| नशियत | نصیحت |
| नशीब | نصیب |
| नशेक्ची | نشاق - چی |
| नस्तर | نشتر |
| नस्रत | نصرت |

| | |
|---|---|
| नस्राणी | نصرانی |
| नसल | نسل |
| नहर | نہر |
| ना-कारा | ناکارہ |
| नाचार | ناچار |
| नाचीज़ | ناچیز |
| ना-दान | نادان |
| ना-दार | نادار |
| नाबूत | نبود |
| नाराज़ | ناراضی |
| नालस्ती | ناراست |
| नाखुदा | ناخدا |
| नाज़र | ناظر |
| नाज़री-बाज़ार | ناظری بازار |
| नाज़ल | نازل |
| नाज़ूक | نازک |
| नादर | نادر |
| नान-पर्वेशी ( ? ) ज़न-पर्वर्श | زن‌پرورش |
| नान-खटाई ( एक मिठाई ) | نان‌خطائی |
| नान-कुराण | نان‌وقران |
| नाफर्मानी( = जाम्भळा ) | گل نافرمان |
| नाफा | نافہ |
| नाम्जा | نامجا |
| नाम्ज़ाद | نامزد |
| नाम्वर | نامور |
| नाबद | نبات |
| नामा | نامہ |
| नामी | نامی |
| नामुश्की | ناموس |
| नामोस | ناموس |
| नायब | نائب |
| नारिङ्ग | نارنگ |
| नाल | نعل |
| नालीस | نالش |
| नासूर | ناسور |
| नाहबी | ناہبی |
| निका ( चाङ्गला ) | نیک |
| निका | نکاح |
| निखालस | خالص |
| निगा | نگاہ |

| | |
|---|---|
| निगेबानी | نگہبانی |
| निगादास्त | نگہداشت |
| निगारश | نگارش |
| निगाह-बाज़ | نگاہ‌باز |
| निघाल्कत | نگاہ ـ حرکت |
| निजाम | نظام |
| निफाक | نفاق |
| निमक | نمک |
| निमक-हराम | نمکحرام |
| निमक-हलाल | نمکحلال |
| निम्चा | نیمچہ |
| निमा | نیمہ |
| निमा | نیم |
| निमाज | نماز |
| नियत | نیت |
| नियाज़ | نیاز |
| निरख | نرخ |
| निविश्तन | نوشتن |
| निस्प | نصف |
| निशस्त | نشست |
| निशा | نشئہ |
| निशा | نشاط |
| निशाण | نشان |
| निशाणी | نشانی |
| निस्बत | نسبت |
| नुक्ता | نکتہ |
| नुक्ता | نقطہ |
| नुक्सान | نقصان |
| नूर | نور |
| नेक | نیک |
| नेचा ( पु० ) झर्झरी | نیچہ |
| नेज़ा ( पु० ) भाला | نیزہ |
| नेफा | نیفہ |
| नेस्त | نیست |
| नै-शकर | نی شکر |
| नोक | نوک |
| नौकर | نوکر |
| नौ | نو |
| नौबत | نوبت |
| नौरोज़ | نوروز |

| | |
|---|---|
| प्याजी | پیازی |
| प्यादगान | پیادگان |
| प्यादा | پیادہ |
| प्यादी | پیادی |
| प्याला | پیالہ |
| पन्ज़ा | پنجہ |
| पञ्जाब | پنجاب |
| पड्दा | پردہ |
| पड्दपोशी | پردہ پوشی |
| पद्र | پدر |
| पन्हा | پہنا |
| पन्हा | پناہ |
| पनीर | پنیر |
| पर्गणा | پرگنہ |
| पर्गरी | پرگر |
| पर्वान | پربان |
| पर्वर्दा | پروردہ |
| पर्वर्दिगार | پروردگار |
| पर्वर्श; पर्वरीस | پرورش |
| पर्वा | پروا |
| पर्वानगी | پروانگی |
| पर्वाना | پروانہ |
| पर | پر |
| परिन्द | پرندہ |
| परी | پری |
| परेशान | پریشان |
| पलङ्ग | پلنگ |
| पलाण | پالان |
| पलिता | فتیلہ |
| पशम | پشم |
| पशेमान | پشیمان |
| पस्पा | پسپا |
| पसन्त | پسند |
| पसोपेश | پس و پیش |
| पहारा | پہرہ |
| पायक | پیک |
| पाक | پاک |
| पागा | پایگاہ |
| पाजी | پاجی |
| पाद्शहा | پادشاہ |

| | |
|---|---|
| पायखाना | پایخانہ |
| पाय्दामा | پایدام |
| पाय्पोस | پاپوش |
| पाय्माल | پایمال |
| पाया | پایہ |
| पायाब | پایاب |
| पार्चा | پارچہ |
| पार्शी | پارسی |
| पारेदोज ठिगळें लावणारा | پارہ دوز |
| पालखी | پالکی |
| पास्वान (=पहारेकरी) | پاسبان |
| पास | پاس |
| पासङ्ग | پاسنگ |
| पिंजिरा | پنجرا |
| पिस्ता | پستہ |
| पिसाब ( पु० ) लघ्वी | پیشاب |
| पीर | پیر |
| पीर-ज़ादा | پیرزادہ |
| पील | پیل |
| पुदिना | پودنہ |
| पुर्कस | پرخاش |
| पुर्शिदा | پرسیدہ |
| पुर्शीस | پرسش |
| पुलावा | پلو |
| पुस्त | پشت |
| पुस्तङ्ग | پشتنگ |
| पुस्त-गर्मी | پشتگرمی |
| पुस्त-पन्हा | پشت پناہ |
| पुस्ती ( स्त्री० ) | پشتی |
| पूर | پر |
| पूल | پل |
| पेच | پیچ |
| पेरोज़ | فیروزہ |
| पेश | پیش |
| पेश्कद्मी | پیش قدمی |
| पेश--कबज़ | پیشقبض |
| पेश्कस | پیشکش |
| पेश्कार | پیشکار |
| पेश्खाना | پیشخانہ |

| | |
|---|---|
| पेश्खेमा | پیشخیمہ |
| पेश्दस्ती | پیشدستی |
| पेश्मान | پیشمان |
| पेश्रफत | پیشرفت |
| पेश्वा | پیشوا |
| पेश्वाज़ | پیشباز |
| पेशर्जा | پیش ازین |
| पेशन्देशी | پیش اندیشی |
| पेशा | پیشہ |
| पेशामद | پیشامد |
| पेशीन | پیشین |
| पेस्तर | پیشتر |
| पेहरण; पेरण | پیرهن |
| पैगम्बर | پیغمبر |
| पैगाम | پیغام |
| पैज़ार | پیزار |
| पैदर्पै | پی درپی |
| पैदा | پیدا |
| पैदास | پیدائش |
| पैबन्दी | پیوند |
| पैमान | پیمان |
| पैमास | پیمائش |
| पैरवी | پیروی |
| पैलवान | پہلوان |
| पैलू | پہلو |
| पैवस्त | پیوست |
| पैहम | پیہم |
| पोक्त | پختہ |
| पोत | پود |
| पोतें | پوتہ |
| पोफळ | پوپل |
| पोलाद | پولاد |
| पोशाख | پوشاک |
| पोशीदा | پوشیدہ |
| पोशीस | پوشش |
| फक्त | فقط |
| फकीर | فقیر |
| फज़र | فجر |
| फज़ल | فضل |
| फजीत | فضیحت |

| | |
|---|---|
| फत्ते | فتح |
| फन्द | فن |
| फन्ना | فنا |
| फर्गोल | فرغول |
| फर्ज़न्द | فرزند |
| फर्जाम | فرجام |
| फर्जी | فرزین |
| फर्द | فرد |
| फर्मान | فرمان |
| फर्मास | فرمائش |
| फरक | فرق |
| फरस | فرش |
| फर्हत | فرحت |
| फरागत | فراغت |
| फरामोश | فراموش |
| फरारी | فرار |
| फरास | فراش |
| फरीद | فرید |
| फरेब | فریب |
| फरोक्त | فروخت |
| फलाकी | فراخی |
| फलाणा | فلان |
| फवारा | فواره |
| फस्त | فصد |
| फस्त | پست |
| फस्ली | فصلے |
| फस्सल | فصل |
| फहामिन्दा | فہمیدہ |
| फाका | فاقہ |
| फाखरा | فاخره |
| फाज़ल | فاضل |
| फाजील | فاضل |
| फाटा | طائفہ |
| फाणस | فانوس |
| फात्या | فاتحہ |
| फार्कत | فارغ خط |
| फार्शी | فارسی |
| फायश | فاش |
| फारीक | فارغ |

| | |
|---|---|
| फासला | فاصلہ |
| फिक्रा | فقرہ |
| फिकीर | فکر |
| फित्ना | فتنہ |
| फित्ना-अङ्गरेजी | فتنہ انگیزي |
| फित्रत | فترت |
| फितूर | فتور |
| फिद्वी | فدوی |
| फिदा | فدا |
| फिर्याद | فریاد |
| फिरङ्गी | فرنگ |
| फिरस्ताद | فرستاد |
| फिल्फौर | فی الفور |
| फिल्वाके | فی الواقع |
| फिल्हाल | فی الحال |
| फिसाद | فساد |
| फुकरा | فقرا |
| फुर्सत | فرصت |
| फेरिस्त | فہرست |
| फेरिस्ता | فرشتہ |
| फैज़-बक्षी | فیض بخشی |
| फैल | فعل |
| फैल-ज़ामीन | فعل ضامن |
| फैला | فعلہ |
| फैसल; फैसला | فیصل |
| फौज़ | فوج |
| फौत | فوت |
| बक्तर | بکتر |
| बक्रीद | بقرعید |
| बक्शी | بخشے |
| बक्शीस | بخشش |
| बका | بقاء |
| बकाल | بقال |
| बख्त | بخت |
| बखर | خبر |
| बगल | بغل |
| बगिचा | باغیچہ |
| बङ्की (?) | بیگی |
| बच्चा | بچہ |
| बजा | بجا |

| | |
|---|---|
| बज़ाज़ | بزاز |
| बत्ता | بتہ |
| बद | بد |
| बद्माश | بدمعاش |
| बद्दल | بدل |
| बद्रका | بدرقہ |
| बद्रा | بدرہ |
| बदक | بطک |
| बदल | بدل |
| बदाम | بادام |
| बन्द | بند |
| बन्दर | بندر |
| बन्दा | بندہ |
| बन्दूक | بندوق |
| बन्देस | بندش |
| बन्दोबस्त | بندوبست |
| बबर्जी | باورچی |
| बयान | بیان |
| बयाणा | بیعانہ |
| बर्कत | برکت |
| बर्कन्दाज़ | برق انداز |
| बर्करारी | برقراری |
| बर्खास्त | برخاست |
| बर्खुर्दार | برخوردار |
| बर्गुज़र | برگزشتن |
| बर्ची | برچی |
| बर्ज़ोर | برزور |
| बर्तर्फ | برطرف |
| बर्तर | برتر |
| बर्दार ( सफल ) | بردار |
| बर्दास्त | برداشت |
| बर्पा | برپا |
| बर्फ | برف |
| बर्फी | برفی |
| बर्बाद | برباد |
| चर्मा | برمہ |
| बर्हम | برهم |
| बराबर | برابر |
| बरामद | برآمد |
| बराय | برائے |

| | |
|---|---|
| बल्के | بلکہ |
| बल्वा | بلوا |
| बला | بلا |
| बशारत | بشارت |
| बस्ता | بستہ |
| बस्स | بس |
| बसालत | وصال |
| बहर | بہار |
| बहरामन्द | بہرہ مند |
| बहा | بہا |
| बहाणा | بہانہ |
| बहाद्दर | بہادر |
| बहार | بہار |
| बहाल | بحال |
| बाकी | باقی |
| बाग | باغ |
| बागायत | باغات |
| बागी | باغی |
| बाङ्ग | بانگ |
| बाज़ | باز |
| बाज़ार | بازار |
| बाजी | بازی |
| बाज़ू | بازو |
| बाजे | بعض |
| बाड | بیاض |
| बातमी | باطنی |
| बातील | باطل |
| बाद ( = वायु ) | باد |
| बादज़ | بعد از |
| बादशहा | بادشاہ |
| बापज़ादा | باپ - جد |
| बाब | باب |
| बार्कस | بارکش |
| बार्गीर | بارگیر |
| बार्दान | باردان |
| बार्बर्दारी | باربرداری |
| बार्याब | باریاب |
| बार्हा | بارہا |
| बारीक | باریک |
| बारीश | بارش |

| | |
|---|---|
| बारूद | باروت |
| बालायेश | بالائش |
| बालिस्त | بالشت |
| बालीक | بالغ |
| बाले-किल्ला | بالا |
| बिचारा | بیچارہ |
| बिचोबा | بیچوبہ |
| बिछायत | بساط |
| बिजन | بیجان |
| बिदा | وداع |
| बिदाती | بدعتی |
| बिनावर | بنابر |
| बिनी | بینی |
| बिबी | بیبی |
| बिमार | بیمار |
| बिरञ्जी | برنجین |
| बिरादर | برادر |
| बिल्कूल | بالکل |
| बिल्वर; बिलोर | بلور |
| बिलन्दर | بلند |
| बिशाद | بساط |
| बिस्तरा ( पु० ) अन्थरूण | بسترہ |
| बिस्मिल्ला | بسم اللہ |
| बिस्यार | بسیار |
| बुज़ुर्ग | بزرگ |
| बुटा | بوتہ |
| बुणगा | بنگاہ |
| बुत्परस्त | بت پرست |
| बुत्फरोश | بت فروش |
| बुत्शिकन | بت شکن |
| बुद्रूक | بزرگ |
| बुन्ध ( = खोड ) | بن |
| बुनियाद | بنیاد |
| बुर्खा | برقع |
| बुर्जी | برج |
| बुरूज़ | بروج |
| बुल्दा | بلدہ |
| बुल्बूल | بلبل |
| बुलन्द | بلند |
| बुलाक | بلاق |

| | |
|---|---|
| बेअबस=वृथा | عبث |
| बेगम | بیگم |
| बे–गमी | بی غم |
| बेगार | بیگار |
| बेज़ार | بیزار |
| बेदार | بیدار |
| बेरिज़ | بیریج |
| बेल्दार | بیلدار |
| बेश्मी | باسم |
| बेश | بیش |
| बेहबूद | بہبود |
| बेहतन्माल | بی تن مال |
| बेहेत्तर | بہتر |
| बेहेस्त | بہشت |
| बैत | بیت |
| बैतुलमाल | بیت المال |
| बैरक | بیرق |
| बोगदा | بوغار |
| बोचकें | بقچہ |
| बोय | بوی |
| बोर | بورا |
| बोरिया | بوریا |
| भक्कम | محکم |
| भिस्त | بیست |
| भिस्ती | بہشتی |
| म्यान | میان |
| म्याना | میانہ |
| मक्ता | مقطع |
| मक्तूब | مکتوب |
| मक्मूर | مخمور |
| मग्रबी | مغربی |
| मक्सूद ( = हेतु ) | مقصود |
| मकर | مکر |
| मकान | مکان |
| मकातीब | مکاتیب |
| मख्दूम | مخدوم |
| मख्फी | مخفی |
| मख्मल | مخمل |
| मख्मूल | مخمور |
| मख्लशी | مخلصی |

| | |
|---|---|
| मग्ज़ी | مغزی |
| मग्दूर | مقدور |
| मग्रब | مغرب |
| मग्रूर | مغرور |
| मगज़ | مغز |
| मगर | مگر |
| मज़्कूर | مذکور |
| मज़्बूत | مضبوط |
| मज़्बूर | مجبور |
| मज़्मू | مجموع |
| मज़्मून | مضمون |
| मज़्लस | مجلس |
| मज़्हला | مجہلہ |
| मज़ल | منزل |
| मज़ला | منزلہ |
| मज़ा | مزہ |
| मजाल | مجال |
| मज़ालस | مجالس |
| मजीद | مجید |
| मज़ूर | مزدور |
| मझेला | مجہلہ |
| मत्ता | متاع |
| मत्लई | مطلع |
| मत्लब | مطلب |
| मत्लूब | مطلوب |
| मतालीब | مطالیب |
| मदत | مدد |
| मद्-नज़र | مدنظر |
| मदार | مدار |
| मदारी | مداری |
| मदारुलमहाम | مدارالمہام |
| मन्जूर | منظور |
| मन्दील ( उश्री फेटा) | مندیل |
| मन-मुराद | مراد |
| मन्सब | منصب |
| मन्सुबी | منصفی |
| मन्सुबा | منصوبہ |
| मन्सूर | منشور |
| मना | منع |
| मनाकब ( =सद्गुण ) | مناقب |

| | | | |
|---|---|---|---|
| मनुका | منقی | मवाशी | معاصی |
| मनोरा | منارہ | मवेशी | مویشے |
| मबादा | مبادا | मश्गूल | مشغول |
| मम्नुनी | ممنونی | मश्रक ( = प्राची ) | مشرق |
| मम्लकत्–मदार | مملکت مدار | मश्रू | مشروع |
| मय्या | مائیہ | मश्वरा | مشورہ |
| मय्यातैन | مائتین | मश्हूद | مشہود |
| मयत | میت | मशाक | مشک |
| मये | مع | मशायक | مشایخ |
| मर्क़ूम | مرقوم | मशागत | مشقت |
| मर्ज़ी | مرضی | मशार्निल्हे | مشارالیہ |
| मर्तबान | مرتبان | मशाल | مشعل |
| मर्द | مرد | मशीद | مسجد |
| मर्दाना | مردانہ | मस्करी | مسخرہ |
| मर्दुमी | مردمی | मस्त | مست |
| मर्फ़ा | مرفہ | मस्नद | مسند |
| मर्मर | مرمر | मस्रूर | مسرور |
| मर्वारीद | مروارید | मस्लत | مصلحت |
| मर्शा | مرثیہ | मस्विदा | مسودہ |
| मर्सूल | مرسل | मसर्रत | مسرت |
| मर्हूम | مرحوم | मसादा | مساعدہ |
| मर्हमत | مرحمت | मसाला | مصالح |
| मरातीब | مراتب | मसीहा | مسیحی |
| मराम ( = इच्छा ) | مرام | मसुदा | مسودہ |
| मरादबा | مرابطہ | मसुरुल् अनाम | مشہورالانام |
| मरामत | مرمت | मसुरुल्–हज़रत | مشہورالحضرت |
| मलई | ملائی | महकूब | موقوف |
| मलऊन | ملعون | महज़ब | مذہب |
| मल्फ़ूफ़ | ملفوف | महज़र | محضر |
| मल्बूस | ملبوس | महितापी | مہتابی |
| मलम | مرہم | महिताब | مہتاب |
| मलिका | ملکہ | महदूद | محدود |
| मलिदा | ملیدہ | महशूर | مشہور |
| मलीक | ملک | महसूल | محصول |
| मलूल | ملول | महा | ماہ |
| मवाखज़ा | مواخذہ | महामूर | معمور |
| मवाजीन | موذن | महाल | محل |
| मवाज़ा | مواضعہ | महासरा | محاصرہ |
| मवाफ़ीक | موافق | महिना | ماہینہ |
| मवाली | معالی | माकूल | معقول |

| | |
|---|---|
| माजी | ماضی |
| माजूम | معجون |
| मात | مات |
| मातकद्‌म | ماتقدم |
| मातबर | معتبر |
| मातम | ماتم |
| मातल | معطل |
| माद्‌चोंद् | مادر |
| माद्‌वान | مادیان |
| मान्द्‌गी | ماندگی |
| माम्द्‌ा | ماندہ |
| मानत | معانت |
| मायना | معنے |
| माने | مانع |
| माफ़ | معاف |
| माफ़क | موافق |
| माफ़जत | محافظت |
| माफ़लात | مفاعلت |
| मामलत | معاملت |
| मामूर | معمور |
| मामूल | معمول |
| माया | مایہ |
| मारका | معرکہ |
| मार्फ़त | معارفت |
| मारूज़ | معروض |
| माल | مال |
| माल | مآل |
| मालक | مالک |
| मालियत | مالیت |
| माल्ज़ाद्‌ी | مالزادہ |
| मालीम | معلم |
| मालीस | مالش |
| मालूम | معلوم |
| माविज़ा | معاوضہ |
| माश ( चरित ) | معاش |
| माशूक़ | معشوق |
| माहतानी (?) | ماتحتانی |
| माहवल | محول |
| माहवारी | ماهواری |
| मिजान | میزان |
| मिज़ाज़् | مزاج |
| मिज़ास | مزاج |
| मिन्कबल ( =पूर्वी ) | من قبل |
| मिन्ज़ुम्ला ( = एक-न्दरीनें ) | منجملہ |
| मिन्हू | من ھو |
| मिन्नत | منت |
| मिना | مینا |
| मिन्बाद् ( = यापुढें ) | من بعد |
| मियाद्‌ी | میعادی |
| मिर्धा | میردہ |
| मिरास | میراث |
| मिलक | ملک |
| मिस्री | مصری |
| मिस्कील | مسکین |
| मिस्त्री | مسطری |
| मिसल | مثال |
| मिसाल | مثال |
| मिळ्कत | ملکت |
| मीर | میر |
| मीर–ज़ाद्‌ा | میرزادہ |
| मी–रसानद् | میی رساند |
| मुक्बरा | مقبرہ |
| मुक़र | مقرر |
| मुक्काम | مقام |
| मुकाद्‌म | مقدم |
| मुकद्दमा | مقدمہ |
| मुकद्दर | مقدر |
| मुकय्यद् | مکید |
| मुकाबला | مقابلہ |
| मुकेस | مقیس |
| मुख़्तसर | مختصر |
| मुख़्त्यार | مختار |
| मुख़ालीफ़ | مخالف |
| मुच्‌लका | مچلکا |
| मुज़्कर | مذکر |
| मुज़्मला | مجملا |
| मुज़्रत | مجرد |
| मुज़रा | مجری |
| मुज़य्यन | مزین |
| मुज़न्ना (=सन्देह) | مظنہ |

| | | | |
|---|---|---|---|
| मुज़ाईक | مضائق | मुफ्ती | مفتی |
| मुज़ाका | مضائقہ | मुफ्सद् | مفسد |
| मुज़ारियान | مضارعان | मुफसल | مفصل |
| मुज़ावर | مجاور | मुफाइज़ा | مفاوضہ |
| मुज़ाहीम | مزاحم | मुफासला | مفاصلہ |
| मुज़ाहिमत | مزاحمت | मुफीद् | مفید |
| मुज़ेरी | مضارع | मुब्लक | مبلغ |
| मुद्दा | مردہ | मुबारक | مبارک |
| मुद्दे-फरास | مردہ فروش | मुभा | مباح |
| मुत्पाक | مطبخ | मुर्गी | مرغ |
| मुत्लक | مطلق | मुर्दाड | مردار |
| मुत्सद्दी | متصدی | मुर्दाड-शेङ्ग | مردار سنگ |
| मुतआकीब | متعاقب | मुर्वत | مروت |
| मुतफर्कात | متفرقات | मुरक्का | مرقع |
| मुतफीक | متفق | मुरब्बा | مربیٰ |
| मुतबन्ना | متبنا | मुरब्बी | مربی |
| मुतमर्रीद | متمرد | मुरस्सा | مرصع |
| मुतवज़्ज़े | متوجہ | मुराद् | مراد |
| मुतवातीर | متواتر | मुरीद् | مرید |
| मुतसरीफ | متصرف | मुल्की | ملکی |
| मुताबत | متابعت | मुल्ज़ीम | ملزم |
| मुताबीक | مطابق | मुल्तवी | ملتوی |
| मुतालीक | متعلق | मुल्ला | ملا |
| मुतैन | متعین | मुलाखत | ملاقات |
| मुद्दई | مدعی | मुलाज़मत | ملازمت |
| मुद्दई-इले | مدعی الیہ | मुलाहिज़ा | ملاحظہ |
| मुद्दा | مدعا | मुलामा | ملمع |
| मुद्दाम | عمداً | मुलायम | ملائیم |
| मुद्दत | مدت | मुलूख | ملک |
| मुदाई | مداعی | मुश्क | مشک |
| मुदाम | مدام | मुश्कस | مشخص |
| मुदारत | مدارات | मुश्कील | مشکل |
| मुन्कीर | منکر | मुश्फीक | مشفق |
| मुन्शी | منشی | मुशाफर | مسافر |
| मुन्सफ | منصف | मुशाहिरा | مشاہرہ |
| मुनका | منقی | मुस्तक्बील | مستقبل |
| मुना | معاینہ | मुस्तकीम | مستقیم |
| मुनादी | منادی | मुस्ताकी | مشتاقی |
| मुनाफा | منافع | मुस्तेद् | مستعد |
| मुनायब | مناب | मुस्लीम | مسلم |
| मुनीम | منیب | | |

| | |
|---|---|
| मुसन्ना | مثنی |
| मुसल्मान | مسلمان |
| मुसव्वर | مصور |
| मुसाहेब | مصاحب |
| मेख | میخ |
| मेज़ | میز |
| मेज़्बानी | میزبانی |
| मेण | موم |
| मेणा | میانہ |
| मेवा | میوہ |
| मेहतर | مہتر |
| मेहनत | محنت |
| मेहमान | مہمان |
| मेहेर | مہر |
| मेहेर्बान | مہربان |
| मेहेराप | محراب |
| मैदा | میدہ |
| मैदान | میدان |
| मोईन | معین |
| मोकल | موکل |
| मोका | موقع |
| मोख्लीसान | مخلصان |
| मोंगल | مغول |
| मोघम | مبہم |
| मोजदात=गणना | موجودات |
| मोजा | موزہ |
| मोजीब | موجب |
| मोझ्या | مواضعہ |
| मोत | موت |
| मोताद् | محتاج |
| मोताना | موتانہ |
| मोबदला | مبادلہ |
| मोम्ज़ामा | مومجامہ |
| मोमीइलै | موصی الیہ |
| मोमीन | مومن |
| मोर्चेल | مورچال |
| मोर्तब | مرتب |
| मोरी | موری |
| मोसबा | محاسبہ |
| मोसम | موسم |
| मोहतर्फा | محترفہ |
| मोह.तसीब | محتسب |
| मोहबत | محبت |
| मोहर | مہر |
| मोहर्-कन्द | مہرکند |
| मोहरम | محرم |
| मोहरम | محروم |
| मोहरा | مہرہ |
| मोहरीर | محرر |
| मोहरेदार | مہرہ دار |
| मोहल्ला | محلہ |
| मोहसल्ली | محصل |
| मोहीब | محب |
| मोहीम | مہم |
| मौकूफ | موقوف |
| मौज़ | موج |
| मौजूद | موجود |
| मौजे | موضع |
| मौलवी | مولوی |
| मौला | مولا |
| मौसूफ | موصوف |
| यगानगत | یگانگت |
| यहतियात | احتیاط |
| या | یا |
| याकूत | یاقوت |
| याद | یاد |
| याद-दास्त | یاد داشت |
| याद-हस्त | یادهست |
| याद-बूद | یودبود |
| यानी | یعنے |
| यार | یار |
| यारेदी | یاری دہ |
| येकूज़हती | جہت |
| येक्सुई | سو |
| रईस | رئیس |
| रक्कम | رقم |
| रक्बा | رقبہ |
| रकाना | رکن |
| रख्ना | رخنہ |
| रख्त-खाना | رخت خانہ |
| रग | رگ |

| | |
|---|---|
| रगड | رغد |
| रङ्ग | رنگ |
| रङ्गरेज़ | رنگ ریز |
| रङ्गामेजी | رنگامیزی |
| रज़ई | رضائی |
| रज़ब | رجب |
| रज़ा | رضا |
| रञ्जीस | رنجش |
| रत्तल | رطل |
| रब्त | ربط |
| रतीब=उकाडा | راتبہ |
| रद्द | رد |
| रद्-बद्लं | ردوبدل |
| रन्ज़क | رنجک |
| रन्धा | رندہ |
| रफ्त | رفت |
| रफाकत | رفاقت |
| रफायत | رفاہت |
| रफाहीयत | رفاہیت |
| रफीअल्कद्र | رفیع القدر |
| रफीक | رفیق |
| रफू | رفو |
| रफूक | رفق |
| रफे-दफ | رفع-دفع |
| रबाव | رعب |
| रबिलाखर | ربیع الاخر |
| रबिलावल | ربیع الاول |
| रब्बी | ربیعی |
| रमज़ान | رمضان |
| रमल | رمل |
| रमूज़ | رموز |
| रय्यत | رعیت |
| रयाया | رعایا |
| रयायत | رعایت |
| रव | رو |
| रवां | روان |
| रवानगी | روانگی |
| रवाना | روانہ |
| रवा शुद्गी | روانہشد |
| रवेश | روش |
| रस्म | رسم |

| | |
|---|---|
| रस्मीयात | رسمیات |
| रस्ता | رستہ |
| रसद् | رسد |
| रसीद्गी (=पेवस्तगी) | رسیدگی |
| रसीद् | رسید |
| रसीद्न | رسیدن |
| रसूम | رسوم |
| रसूल | رسول |
| रह | رہ |
| रहदारी | رہداری |
| रहा | راہ |
| राज़रोस | روز روشن |
| राजी | راضی |
| राबता | رابطہ |
| रायज़नी ( =विचार करणें ) | رایزنی |
| रायज़ादा | رایزادہ |
| रास्त | راست |
| रास | راس |
| रिकाबी | رکابی |
| रिकीब | رکاب |
| रियासत (= राजवट) | ریاست |
| रिवाज़ | رواج |
| रिश्वत | رشوت |
| रिसाला | رسالہ |
| रुई | روی |
| रुक्का | رقعہ |
| रुख्सत | رخصت |
| रुज़ुवात | رجعت |
| रुजू | رجوع |
| रुत्बा | رتبہ |
| रु-बकार | روبہ کار |
| रूबरू | روبرو |
| रुबाव | رعب |
| रुमाल | رومال |
| रुस्तुमी | رستمی |
| रू | روی |
| रूयदाद | رویداد |
| रेज़गी | ریزگی |
| रेज़ा | ریزہ |
| रेशा ( = तन्तू ) | ریشہ |

| | |
|---|---|
| रेशमि | ریشم |
| रोख | رخ |
| रोखा | رقعہ |
| रोगण | روغن |
| रोज़ | روز |
| रोज़ा=उप | روزہ |
| रोज़ा | روضہ |
| रोशन | روشن |
| रोशनाई | روشنائی |
| रौनक | رونق |
| लक्तर | لتر |
| लकब | لقب |
| लगाम | لگام |
| लङ्गडा | لنگ |
| लङ्गर | لنگر |
| लज़्ज़त | لذت |
| लण्ड | لند |
| लण्ड | لوند |
| लत्ता | لت |
| लवण्डी | لوند |
| लवा | لوا |
| लवाज़मा | لوازمہ |
| लवाजीम | لوازم |
| लवाद | لواد |
| लश्कर | لشکر |
| लहज़=क्षण | لحظہ |
| लहम | لمحہ |
| लाकीन | لاکن |
| लाचार | لاچار |
| लाज़म | لاجم |
| लाज़वर्द | لاجورد |
| लाबूद (=अवश्यमेव; सर्वथा | لابد |
| लायक | لائق |
| लायनी | لعن |
| लाल | لعل |
| लाल | لال |
| लास | لاش |
| लिफाफा | لفافہ |
| लिभास | لباس |

| | |
|---|---|
| लुक्का | لقمہ |
| लुङ्गी | لنگی |
| लुच्चा | لچہ |
| लुत्रा | لترہ |
| लुत्फी | لطف |
| लेकीन | لیکن |
| लेजीम | لیزم |
| लेहाज़ा | لہذا |
| वक्कल=खटलें, रसेली | وکل |
| वक्त | وقت |
| वक्फा | وقفہ |
| वक्र | وقار |
| वकालत | وکالت |
| वकायेनिगार | وقائع نگار |
| वकाया | وقائع |
| वकील | وکیل |
| वकूब | وقوف |
| वग | وقع |
| वगैरे | وغیرہ |
| वज़न | وزن |
| वज़ा | وضع |
| वजे | وجہ |
| वज़ारत | وزارت |
| वतन | وطن |
| वफा | وفا |
| वफात | وفات |
| वर | بر |
| वर्ख | ورق |
| वरात | برات |
| वल्लद | ولد |
| वली | ولی |
| वली–न्यामत | ولی نعمت |
| वली–अह्द | ولی عہد |
| वश्यत | وصیت |
| वशिला | وصیلہ |
| वस्तरा | استرہ |
| वस्ताद | استاد |
| वस्तू=माध्यमें | واسطہ |
| वस्वास | وسواس |
| वसूल | وصول |

| | |
|---|---|
| वसे | وسعہ |
| वहमा | واہمہ |
| वहीम | وهم |
| वाकई | واقعے |
| वाकनीस | واقعہنویس |
| वाकब | واقف |
| वाकफीयत | واقفیت |
| वाका | واقعہ |
| वाकीफ | واقف |
| वाखा | واقعہ |
| वा–गुज़ास्त | واگزاشت |
| वाज़–पूस | بازپرس |
| वाजबुलअर्ज़ | واجب‌العرض |
| वाजवी | واجبی |
| वाज़ेह | واضع |
| वा–पस | واپس |
| वाम | وام |
| वायदा | وعدہ |
| वार्याब | بارياب |
| वारद | وارد |
| वारस | وارث |
| वारसा | ورثہ |
| वाला | والا |
| वाली | والی |
| वास्ते | واسطہ |
| वासलात | واصلات |
| वाहदीयत | واحديت |
| वाह ! | واه |
| वाहवा | واه واه |
| वाही | واهی |
| विज़ार | ازار |
| विमा | بیمہ |
| विरासत | اراقت |
| विलायत | ولايت |
| वैराण | ويران |
| शक | شک |
| शक्ल | شکل |
| शकस | شخص |
| शकी | شقے |
| शक्कर–पाळा | شکرپارہ |

| | |
|---|---|
| शद्त | شدت |
| शब्खून | شبخون |
| शर्त | شرط |
| शर्थ | شرط |
| शर्मिन्दा | شرمندہ |
| शर्यत | شريعت |
| शर्यत | شرط |
| शर | شر |
| शरा ( = धर्मशास्त्र ) | شرع |
| शराकत | شراکت |
| शराब | شراب |
| शरीक | شريک |
| शशोपन्ज़ | شش و پنج |
| शस्त ( = अङ्गठा ) | شست |
| शह | شہ |
| शहर | شہر |
| शहर–पन्हा | شہرپناه |
| शहा | شاه |
| शहा | سياه |
| शहान्शहा | شہنشہ |
| शहाज़णें | شاد يانہ |
| शहाज़ादा | شاہزاده |
| शहाजिरे | شہ زیرہ |
| शहातूत | شہتوت |
| शहामत | شہامت |
| शहारा | شعر |
| शाई | سياهی |
| शाही; शाई | شاهی |
| शागिर्द | شاگرد |
| शाद | شاد |
| शादमानी | شادمانی |
| शादी | شادی |
| शान | شان |
| शाबान | شعبان |
| शाबास | شاباش |
| शाबीत | ثابت |
| शाबूत | ثبوت |
| शामदान | شمع دان |
| शामियाना | شاميانہ |
| शायद | شايد |

| | |
|---|---|
| शायस्ता | شائستہ |
| शाल | شال |
| शास्त | سیاست |
| शाहगोज़ | سیاہ گوش |
| शाहीद | شاہد |
| शाहीर | شاعر |
| शिक्कल | شکل |
| शिक्का | سکہ |
| शिक्रा=ससाणा | شکرہ |
| शिक्वा | شکوہ |
| शिकञ्जी=सर्बत | سکنجبین |
| शिकन्द्र | سکندر |
| शिकम | شکم |
| शिकल | صیقل |
| शिकस्त | شکست |
| शिकस्त;कस्त | قصد |
| शिकार | شکار |
| शिगूफा | شگاف |
| शिङ्गरूप | شنگرف |
| शिज़्दा | سجدہ |
| शिताब | شتاب |
| शिताफी | شتاب |
| शित्ता | ستع |
| शिनाज़ोरी | سینہ زوری |
| शिपर | سپر |
| शिपाई | سپاھی |
| शिप्ला | سفلہ |
| शिफारस | سفارش |
| शिबन्दी | سہبندی |
| शिमाल (=उत्तर) | شمال |
| शिया | شیعہ |
| शिर्का | سرکہ |
| शिर्ज़ोर | سرزور |
| शिर्दीदे | بہ سرودیدہ |
| शिर्पाव | سروپا |
| शिर्पेंच | سرپیچ |
| शिरस्ता | سررشتہ |
| शिरा | صرح |
| शिरीनगार=हल्वाई | شیرینی |
| शिलक | شلق |

| | |
|---|---|
| शिल्क | سلخ |
| शिल्शिला | سلسلہ |
| शिले | سلح |
| शिलेदार | سلحدار |
| शिवाय | سواء |
| शिसा | شیشہ |
| शिस्त | شست |
| शील | سلح |
| शुक्र | شکر |
| शुक्रगुज़ार | شکر گذار |
| शुका | شقہ |
| शुकूर (= कुशल) | شکر |
| शुजायत | شجاعت |
| शुबाह | شبہہ |
| शुरका | شرکا |
| शुशुमार | سوسمار |
| शेख | شیخ |
| शेत्खाना | صحت خانہ |
| शेर् | شیر |
| शेरणी | شیرینی |
| शोख | شوخ |
| शोर | شور |
| शोला | شعلہ |
| शोहरत | شہرت |
| शौक | شوق |
| शौकत | شوکت |
| शौर | شعور |
| शौरत | سورت |
| स्वाद | ص |
| स्वार | سوار |
| सई | سعی |
| सही | صحیح |
| सईफ | صیف |
| सकलाद | سقلات |
| सक्का | سقا |
| सक्त | سخت |
| सखावत | سخاوت |
| सखी | سخی |
| सखून | سخن |
| सङ्गजिरें | سنگ جراحہ |

| | |
|---|---|
| सङ्ग-तरास | سنگ تراش |
| सङ्गमरवर | سنگ مرمر |
| सङ्गीन | سنگین |
| सज़ा | سزا |
| सजावल | سزاول |
| सञ्जाब | سنجاف |
| सतरञ्ज | شطرنج |
| सतरञ्जी | شطرنجی |
| सत्का | صدقہ |
| सतम | ستم |
| सतार | ستارہ |
| सदी | صدی |
| सद्वी | سعد |
| सद्रा | سدرہ |
| सद्मा | صدمہ |
| सद्र | صدر |
| सदाकत | صداقت |
| सदारत | صدارت |
| सदे | صد |
| सन्जुदा | سنجیدہ |
| सन्दान | سندان |
| सन्दूक | سندوق |
| सन | سنہ |
| सनई | سرنائی |
| सनद | سند |
| सनवात | سنوات |
| सनीन (=भाला) | سنان |
| सब्त | ثبت |
| सफ्तालू=एक फळ | شفتالو |
| सफर | سفر |
| सफर | صفر |
| सफा | صفا |
| सफाप ( स्फटिक ) | شفاف |
| सफे जङ्गी | صف جنگ |
| सफेत | سفید |
| सफेल | فصیل |
| सब्जा | سبزہ |
| सब्जी (पालेभाजी) | سبزے |
| सब्नीस | صف نویس |
| सब्या | سبع |

| | |
|---|---|
| सबज़ | سبز |
| सबब | سبب |
| सबर | صبر |
| सबूर | صبور |
| सम्ला | شملہ |
| सम्शेर | شمشیر |
| सम्मत | سمت |
| सम्मान | ثمان |
| समयी | شمع |
| सय्यद | سید |
| सर्कत | شرکت |
| सर्कार | سرکار |
| सर्खेल | سرخیل |
| सर्गरम | سرگرم |
| सर्गश्त | سرگشت |
| सर्ज़ा | شرزہ |
| सर्ताज़ | سرتاج |
| सर्द | سرد |
| सर्दार | سردار |
| सर्नामा | سرنامہ |
| सर्नौबत | سرنوبت |
| सर्पोस | سرپوش |
| सर्फराज़ | سرفراز |
| सर्फा | صرفہ |
| सर्बत | شربت |
| सर्बरा | سربراہ |
| सर्बमोहर | سربمہر |
| सर्बसर | سربسر |
| सर्मोय | سرمو |
| सर्सब्जी | سرسبزی |
| सर्हद्द | سرحد |
| सरन्ज़ाम | سرانجام |
| सरफ | صرف |
| सराई | سرای |
| सराफ | صراف |
| सरायन्दा | سرایندہ |
| सरासर | سراسر |
| सरू | سرو |
| सरोदा | سرود |
| सलगम | شلغم |

| | |
|---|---|
| सल्तनत | سلطنت |
| सल्ला | صلاح |
| सल्ला | صلح |
| सल्लास | ثلاث |
| सल्लमल्लाहु तआला | سلم اللہ تعالی |
| सलातीन | سلاطین |
| सलाबत | صلابت |
| सलाम | سلام |
| सलामत | سلامت |
| सलूक; सलोखा | سلوک |
| सवाद | سواد |
| सवाल | سوال |
| सहल | سیر |
| सहल | سہل |
| सही | صحیح |
| सायत | ساعت |
| साकी | ساقی |
| साकीन | ساکن |
| साख्त | ساخت |
| साखर | شکر |
| साखर-पारा | شکرپارہ |
| साज़ | ساز |
| साजिन्दा | سازندہ |
| साजीस | سازش |
| सादर | صادر |
| सादीलवार | صادروارد |
| साधा | سادہ |
| सानक: रोटी | صحن |
| सानी | ثانی |
| साफ | صاف |
| साबीक | سابق |
| साबण; साबू | صابون |
| साबान | شعبان |
| सामलात | شاملات |
| सामान | سامان |
| सामील | شامل |
| सायर=पट्टीविशेष | سایر |
| सायवान | سایوان |
| सार्वान | ساربان |
| साल्गिरे | سال گرہ |
| साल | سال |
| साल-ज़ाब | سوال و جواب |
| सालस | سلیس |
| सालाबाद | سال ابد |
| साहेब | صاحب |
| साहेब-किराण | صاحب قران |
| साहेब-ज़ादा | صاحب زادہ |
| सिकञ्जा | شکنجہ |
| सित्त | ست |
| सितारा | ستارہ |
| सिजील | سجل |
| सीम | سوم |
| सुकाणू | سکان |
| सुकाकूल-मिस्त्री | ثقاقل مصری |
| सुज़ना | سوزن |
| सुतर | شتر |
| सुदामत | شدآمد |
| सुन्ता | سنت |
| सुन्नी | سنی |
| सुपूर्द | سپرد |
| सुबिकी | سبکی |
| सुभा | صوبہ |
| सुम्ब ( पु० ) खोट | سم |
| सुम्ब-तरास | سم تراش |
| सुमार | شمار |
| सुर्ख | سرخ |
| सुर्ख-रु | سرخ رو |
| सुर्खाई=लाली | سرخ |
| सुर्मा | سرمہ |
| सुर्वार | شلوار |
| सुरई | صراحی |
| सुरत | صورت |
| सुरुवात | شروع |
| सुरू | شروع |
| सुरा | سورہ |
| सुराख | سوراخ |
| सुरुसन | شہورسنہ |
| सुल्तान | سلطان |
| सुलह | صلح |

| | |
|---|---|
| सुलाख, | سورا |
| सुस्त | سست |
| सू=बाजू | سو |
| सवे | سیب |
| सेला | سیلاب |
| सेहत | صحت |
| सैतान | شیطان |
| सैर | سیر |
| सोख्त | سوخت |
| सोपा | صفہ |
| सोबणी=लाकडी झांकण | چوبین |
| सोबत | صحبت |
| सोमल | سنبل |
| सोहलत | سہولت |
| सौगन्द | سوگند |
| सौदा | سودا |
| सौब | صوب |
| हक्क | حق |
| हक्क-परस्ती | حق پرستی |
| हकनाहक | حق ناحق |
| हकीगत | حقیقت |
| युनानी=मुसलमानी (वैद्यक) | یونانی |
| हकीम | حکیم |
| हकीम | حاکم |
| हङ्गाम | ہنگام |
| हङ्गामा | ہنگامہ |
| हज़रत | حضرت |
| हज़र | حاضر |
| हज़र-जबाबी | حاضرجواب |
| हजिरी | حاضر |
| हजाम | حجام |
| हजामत | حجامت |
| हज़ार | ہزار |
| हजिमा | ہزیمہ |
| हद्द | حد |
| हदूद | حدود |
| हदीस | حدیث |
| हनोज़ | ہنوز |
| हप्त | ہفت |

| | |
|---|---|
| हप्ता | ہفتہ |
| हबशी | حبشی |
| हम-खास | عام خاص |
| हमगी | ہمگی |
| हम्ज़ात | ہمذات |
| हम्बीर | امیر |
| हम्राह | ہمراہ |
| हम्वार | ہموار |
| हम्शाई | ہمسایہ |
| हमाम्खाना | حمام |
| हमाल | حمال |
| हमी | حامی |
| हमिणी | ہمیان |
| हयात | حیات |
| हयासा | ہیاسہ |
| हर्कत | حرکت |
| हर्कारा | ہرکارہ |
| हर्गाह | ہرگاہ |
| हर्गीज़ | ہرگز |
| हर्दम्ख्याली | ہردم خیالی |
| हर्दम | ہردم |
| हर्फ | حرف |
| हरांजी | ہراج |
| हराम | حرام |
| हराम्ज़ादा | حرامزادہ |
| हरामनमकी | حرام نمکی |
| हरीफ | حریف |
| हरोल | ہرول |
| हल्का | حلقہ |
| हलगर्जी | اہل غرض |
| हल्ला | حملہ |
| हल्ली | حالی |
| हल्वा | حلوا |
| हलाक | ہلاک |
| हलाल | حلال |
| हलाल्खोर | حلال خور |
| हव्यास | ہوس |
| हवा | ہوا |
| हवई | ہوائی |

| | |
|---|---|
| वाल | احوال |
| वाला | حوالہ |
| वेली | حوالی |
| श्मत | حشمت |
| शम | حشم |
| शील | حاصل |
| स्तबूद् | ہست بود |
| स्बुल्हुकूम | حسب الحکم |
| ाजत | حاجت |
| ाजर्बाशी | حاضرباشی |
| ाजी | حاجی |
| ायदोस | ہائے دوست |
| ायल | ہائل |
| ाल | حال |
| ालत | حالت |
| ाली–माजी | حالی ماضی |
| ाव | ہوا |
| ाशिया; हाश | حاشیہ |
| ेकमत | حکمت |
| ेकायत | حکایت |
| ेकायती | حکایتے |
| ेज़्री | ہجری |
| ेफाज़त | حفاظت |
| ेम्दाद् | امداد |
| ेम्मत | ہمت |
| ेमायत | حمایت |
| ेरासान | ہراسان |
| ेरीस | حرص |
| ेलाल | ہلال |
| ेला | حیلہ |
| ेशोब; हिशेब | حساب |

| | |
|---|---|
| हिस्सा | حصہ |
| हिस्सेरशी | حصہ رسید |
| हिसार | حصار |
| हुक्का | حقہ |
| हुक्केबाज़ | حقہ باز |
| हुकमत | حکومت |
| हुकूम | حکم |
| हुज्जत | حجت |
| हुज़रात | حضورات |
| हुज़ूर | حضور |
| हुद्दा | عہدہ |
| हुन्नर | ہنر |
| हुमा ( पु० ) घोड्याचा तुरा | ہما |
| हुमायून | ہمایون |
| हुर्मत | حرمت |
| हुर्मुजी | ہرمزد |
| हुशार | ہوشیار |
| हुस्न | حسن |
| हूल | ہول |
| हेजीब | حاجب |
| हेल्करी | اہل کار |
| हैबत | ہیبت |
| हैरत | حیرت |
| हैराण | حیران |
| हैवान | حیوان |
| होश | ہوش |
| होद | حوض |
| हौदा | ہودج |
| हौस | ہوس |
| हौसला | حوصلہ |

समाप्त.

लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी, पुस्तकालय
*Lal Bahadur Shastri National Academy of Administration Library*
मसूरी
MUSSOORIE

अवाप्ति सं०
Acc. No............................

कृपया इस पुस्तक को निम्नलिखित दिनांक या उससे पहले वापस कर दें।

Please return this book on or before the date last stamped below.

| दिनांक Date | उधारकर्ता की संख्या Borrower's No. | दिनांक Date | उधारकर्ता की संख्या Borrower's No. |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

Mar-R
491.5539146 जे० नं० 61
फार्शी
अवाप्ति सं०
ACC. No..................
वर्ग सं. पुस्तक सं.
Class No................ Book No..............
लेखक
Author...... पटवर्धन, माधव त्रिंबक
शीर्षक
Title...... फार्शी मराठी कोश ।
...........................

| निर्गम दिनांक Date of Issue | उधारकर्ता की सं. Borrower's No | हस्ताक्षर Signature |
| --- | --- | --- |

Mar R LIBRARY JD 61
LAL BAHADUR SHASTRI
National Academy of Administration
491.5539146 MUSSOORIE
फार्शी
Accession No. ________

1. Books are issued for 15 days only but may have to be recalled earlier if urgently required.
2. An over-due charge of 25 Paise per day per volume will be charged.
3. Books may be renewed on request, at the discretion of the Librarian.
4. Periodicals, Rare and Reference books may not be issued and may be consulted only in the Library.
5. Books lost, defaced or injured in any way shall have to be replaced or its double price shall be paid by the borrower.

*Help to keep this book fresh, clean & moving*